स. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २१२६



यशवंतराव चव्हाण

क भाषणे : १९६२ ते १९६९

REFBK-0017737

२७
२७१६
२७१६



युगांतर

निवडक भाषणे

१९६२ ते १९६९

युगांतर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७५७२५ वि: निबंध
२११६ टी. वि: २१३१७



यशवंतराव चव्हाण



REFBK-0017737

कॉन्टिनेन्टल प्रकाशन,
पुणे ३०



प्रकाशन क्रमांक ५६२

प्रकाशक : अ. अं. कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
१९६।१९ टिळक रोड, पुणे ३०

प्रथमावृत्ति : शिवजयंती, ७ मे १९७०

पुनरावृत्तींचे सर्व हक्क प्रकाशकाकडे
इतर सर्व हक्क
सौ. वेणूताई चव्हाण
रेसकोर्स रोड, नवी दिल्ली ११, यांचेकडे

किंमत : वारा रुपये

मुद्रक : चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय, 'शिवपार्वती', पुणे ३०

युगांतराचे अंतरंग

'सह्याद्रीच्या वाऱ्या'नंतर प्रसिद्ध होणारा माननीय श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या भाषणांचा हा दुसरा अधिकृत भाषणसंग्रह. हा भाषणसंग्रह आज 'युगान्तर' या नावाने प्रसिद्ध होत आहे. 'युगान्तरा'त संकलित करण्यात आलेल्या भाषणांची पार्श्वभूमी आणि विचारधारा 'सह्याद्रीच्या वाऱ्या'तील भाषणांपेक्षा अगदी निराळी आणि त्यांचे लक्ष्यही त्याचप्रमाणे अगदी निराळे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर महाराष्ट्राचे आर्थिक आणि भावनात्मक दृष्ट्या संवर्धन आणि त्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रयत्नांची दिशा यांचे दिग्दर्शन मुख्यत्वे करून 'सह्याद्रीच्या वाऱ्या'त केलेले आहे, तर स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अस्तित्वात आलेल्या नव्या हिंदुस्थानच्या ध्येयधोरणांचे, त्याच्या आशा-आकांक्षांचे, राष्ट्रीय स्तरावर प्रतीत होणाऱ्या त्याच्या नव्या सामर्थ्यांचे आणि हिंदुस्थानपुढे आज उभ्या असलेल्या अनेक ज्वलंत समस्यांचे उत्कट विवरण 'युगान्तरा'त समाविष्ट करण्यात आलेल्या अनेक भाषणांतून श्री. यशवन्तरावजींनी केलेले आहे. स्वातंत्र्य-प्राप्तीनंतरच्या हिंदुस्थानचे प्रश्न, त्यांचे स्वरूप, त्यांची व्याप्ती, त्यांचे परस्पर-संबंध, त्यांचे विशिष्ट वातावरण वगैरे सर्वच गोष्टी स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीच्या काळापेक्षा इतक्या निराळ्या आणि नवीन आहेत की, हिंदुस्थानात सुरू झालेल्या नव्या युगाचे या गोष्टी प्रतीक म्हणून मानाव्या लागतील. जुना हिंदुस्थान आता पार बदलत चालला आहे. त्याच्या ठिकाणी नव्या हिंदुस्थानच्या उभारणीचे, त्याच्या

बांधणीचे काम आज सुरू आहे. एका युगातून दुसऱ्या युगात हिंदुस्थान आज जातो आहे. या संक्रमणाच्या काळात हिंदुस्थानचे आणि हिंदुस्थानच्या प्रश्नांचे स्वरूप श्री. यशवंतरावजींना जसे दिसले तसे ते त्यांनी वाणीच्याद्वारे या भाषणांतून व्यक्त करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राजकीय दृष्ट्या स्वयंप्रज्ञेचे राष्ट्र म्हणून हिंदुस्थान पहिल्या प्रथमच अस्तित्वात आला. यापूर्वीही शेकडो वर्षे हिंदुस्थान, हिंदुस्थान म्हणून अस्तित्वात होताच, परंतु तो सांस्कृतिक दृष्ट्या; स्वतंत्र लोकशाही राष्ट्र म्हणून नव्या हिंदुस्थानचे जे प्रश्न आज त्याच्यापुढे उभे आहेत तसे प्रश्न हिंदुस्थानपुढे यापूर्वी कधीही उभे नव्हते. राष्ट्रीय एकतेचा प्रश्न, योजनाबद्ध विकासाचा प्रश्न, संरक्षणाचा प्रश्न आणि परराष्ट्रीय नीतीचा प्रश्न हे सर्व प्रश्न आज नव्याने त्याच्या पुढे उभे आहेत. जागतिक व अन्तर्गत शांततेवर आधारलेल्या लोकशाही मार्गाने हे प्रश्न सोडविण्याचा तो प्रयत्न करतो आहे. पण या सर्व प्रयत्नांचा मध्यबिन्दू जर कोठला असेल तर तो हिन्दुस्थानातील सामान्य माणूस हा आहे. मध्यबिन्दू अशा अर्थाने की, तो या प्रयत्नांचे साध्यही आहे आणि साधनही आहे. या सामान्य माणसात वैचारिक क्रान्ती झाल्याशिवाय, त्याच्या पायात नवे आर्थिक सामर्थ्य उभे राहिल्याशिवाय ज्या अर्थाने स्वतंत्र हिंदुस्थान दुनियेत उभा राहू इच्छितो तसा तो उभा राहू शकणार नाही.

हिंदुस्थानने स्वीकारलेल्या समाजवादी धोरणाचाही हाच अर्थ आहे. परंतु हे सर्व घडून येण्यासाठी हिंदुस्थानला अनेक प्रश्नांशी सामना द्यावा लागणार आहे. पण हे सर्वच प्रश्न इतके अवाढव्य आणि गुंतागुंतीचे आहेत की, त्यातून यशस्वी रीतीने पार पडण्यासाठी, आपले सर्व धैर्य, आपली सर्व बुद्धिमत्ता, आपली सर्व निर्णय-शक्ती आणि आपले सर्व शहाणपण पणाला लागणार आहे.

हिंदुस्थानच्या एकतेचा प्रश्न हा आज अशाच अवाढव्य प्रश्नांपैकी एक आहे. त्याने आज एवढे उग्र रूप धारण केले आहे की, राष्ट्र म्हणून हिंदुस्थानचे भवितव्य धोक्यात येते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. भाषावाद, प्रान्तीयवाद, विभागीयवाद, जातीयवाद हे सर्व वाद या प्रश्नाचीच निरनिराळी रूपे आहेत. ठाम भूमिकेवरून निर्धाराने या सर्व संकटांशी मुकाबला करून हिंदुस्थानचे ऐक्य अबाधित राखले पाहिजे असे श्री. यशवंतरावजी पदोपदी सांगत असतात. हिंदुस्थानच्या ऐक्याचा प्रश्न हा आज श्री. यशवंतरावजींच्या चिंतनाचा आणि चिंतेचा सर्वांत मोठा विषय आहे. त्यासंबंधीच्या विचारांचे पडसाद या संग्रहातल्या त्यांच्या अनेक भाषणांतून उमटलेले दिसून येतील.

हिंदुस्थानने विचारपूर्वक स्वीकारलेल्या लोकशाही आणि समाजवाद या पायाभूत विचारप्रणालींवर त्यांची जीवनश्रद्धा आधारलेली आहे, परंतु हिंदुस्थानात समाजवादाची पावले ज्या दिशेने पडावयास पाहिजेत त्या दिशेने ती अद्यापि

पडत नाहीत याची त्यांच्या मनाला खंत आहे. त्यांच्या मनातली ही खिन्नता आणि गरिबीशी कधीही तडजोड करता कामा नये, लोकभाषा हीच ज्ञानभाषा असली पाहिजे हे आणि यांसारखे विचार व्यक्त करताना दिसून येणारा त्यांचा स्वभाव यांचा जन्म त्यांच्या मनात असलेल्या कारुण्याच्या भावनेतून झालेला आहे. नवबौद्धांसंबंधीचा त्यांचा दृष्टिकोणही याच भावनेच्या मुशीत तयार झालेला आहे.

ज्या क्रियाशील विचारसंपन्नतेतून कर्तृत्व आणि नेतृत्व निर्माण होते ती विचार-संपदा या संग्रहातील त्यांच्या अनेक भाषणांत प्रतीत होते. आर्थिक विकासाचा आणि संरक्षणाचा अन्योन्य संबंध त्यांनी उत्तम प्रकारे या पुस्तकाच्या सुरुवातीच्या भाषणांतून मांडलेला आहे. शिक्षणासंबंधीचे त्यांचे मूलग्राही विचार या पुस्तकातून वाचकांना पाहावयास मिळतील. सामाजिक प्रगतीमागच्या प्रेरणांचे उत्कट विवरण करताना, इतिहासाचे मर्म विशद करून सांगताना, वाङ्मयातील अनुभूतीची व्याप्ती दर्शविताना आणि पक्षसंघटनेच्या या देशातील तत्त्वप्रणालींचा आणि कार्यपद्धतीचा वेध घेताना श्री. यशवंतरावजी आपणाला या भाषणांतून दिसतील.

हिंदुस्थानचे स्थैर्य आणि हिंदुस्थानचा विकास हे दोन भारतीय प्रज्ञेला आणि भारतीय पौरुषाला आव्हान देणारे आज सर्वांत मोठे प्रश्न असून त्यांच्यासंबंधीच्या विचारांनी त्यांचे मन आज व्यापून राहिले आहे. या विचारांचा आत्मा भारतीय

आहे. संकुचित मर्यादांच्या पलीकडे पोचलेले, भारताचे भवितव्य त्याच्या आधुनिक स्वरूपात पाहणारे आणि आपल्या मूलभूत विचारांशी एकनिष्ठ राहणारे त्यांचे नेतृत्व ही राष्ट्राला लाभलेली एक मोठी देणगी आहे. जनतेतून निर्माण झालेल्या या नेतृत्वात इतिहासाला नवीन वळण लावण्याचे सामर्थ्य आहे. अशा या विचारसंपन्न आणि कर्तृत्वसंपन्न नेत्याचे मुख्यत्वेकरून राष्ट्रीय समस्यांसंबंधीचे विचार या संकलनात समाविष्ट करण्यात आले आहेत. एका अर्थाने हे विचार महाराष्ट्राचे राजकीय विचारधनच आहे. महाराष्ट्रातील जनता हीच या धनाची वाटेकरी असल्यामुळे ह्या धनाचा ठेवा या संकलनाच्या रूपाने तिच्याकडे सुपूर्त केला आहे. त्याचा महाराष्ट्रातील जनतेने विवेकपूर्ण स्वीकार करावा एवढीच या संकलनामागची अपेक्षा.

मुंबई, शिवजयंती, ७ मे १९७०

अनुक्रमणिका

१ १

सत्त्वपरीक्षेचा क्षण

जाहीर सभा

सांगली, दिनांक १८–११–६२

२ ११

आजचा क्षात्रधर्म

जाहीर सभा

चौपाटी, मुंबई, दि. १९–११–६२

३ १९

संरक्षणाचा अन्वयार्थ

जाहीर सभा

तुळजापूर, दि. २३–४–६३

४ २६

संरक्षणाची मूलसूत्रे

जाहीर सभा

औरंगाबाद, दि. २६–४–६३

५ ४६
आमचे हुकमी पत्ते
जाहीर सभा
कामगार मैदान, मुंबई, दि. ४–११–६४

६ ६७
व्यर्थ न हो बलिदान
जाहीर सभा
महाराष्ट्र क्लब मैदान
पुणे, दि. ३–१०–६५

७ ८५
संकट ही संधि
यशवंत बेसिक ट्रेनिंग कॉलेजच्या इमारतीचा उद्घाटन समारंभ,
वर्धा, दि. २६–१२–६५

८ ९४
खडतर वाटचाल
जाहीर सभा
ठाणे, दि. २४–४–६६

९ १११
पहिले पाऊल
चाकूर, मराठवाडा, दि. ११–५–६६

१० ११८
विकासाची शर्यत
उजनी प्रकल्पाचे भूमिपूजन
उजनी, मराठवाडा, दि. ७–३–६६

११ १२७
नवी प्रतिज्ञा
उदगीर पाणी पुरवठा योजनेचे उद्घाटन
उदगीर, मराठवाडा, दि. ११–५–६६

१२ १३७
सहकाराचे पथ्य
बॉम्बे स्टेट कोऑपरेटिव्ह लॅण्ड मॉर्गेज बँकेचा रौप्य महोत्सव,
मुंबई, दि. १४–४–६६

१३ १४६
शेती व नागरीकरण
भिवंडी नगरपालिका शतसांवत्सरिक महोत्सव,
भिवंडी, दि. २४–४–६६

१४ १५८
समाजक्रांतीचे रसायन
यशवंत बेसिक ट्रेनिंग कॉलेजच्या इमारतीचा उद्घाटन
समारंभ, वर्धा, दि. २६–१२–६५

१५ १६३
माध्यमिक शिक्षणाचे महत्त्व
माध्यमिक शिक्षण मंडळाचे उद्घाटन
पुणे, दि. ७–३–६६

१६ १६९
लोकभाषा हीच ज्ञानभाषा
के. जे. सोमय्या आर्ट्स व कॉमर्स कॉलेजचा पायाभरणी
समारंभ, कोपरगाव, दि. ७–९–६७

१७ १७७
अमृताचे कुंभ
शिवाजी विद्यापीठ दीक्षान्त समारंभ
कोल्हापूर, दि. ६–१०–६४

१८ १८६
राष्ट्रभाषेचा प्रश्न
अखिल भारतीय राष्ट्रभाषा प्रचार समिती, वार्षिक अधिवेशन,
औरंगाबाद, दि. २८–५–१९६६

१९ १८६
तरुणांपुढील कार्याची दिशा
अभ्यासगट
दिल्ली, जानेवारी १९६८

२० १९४
सामाजिक प्रगतीच्या प्रेरणा
दादासाहेब गायकवाड सत्कार समारंभ,
नासिक, दि. १३–१०–६८

२१ २०२
आमची मूळ समस्या
कोल्हापूर नगरपालिका सत्कार समारंभ,
कोल्हापूर, दि. ६–१०–६४

२२ २१२
आजच्या साहित्याकडून अपेक्षा
मराठी साहित्य संमेलन
हैदराबाद, दि. २५–१२–६५

२३ २२२
मराठी रंगभूमीची अखंड परंपरा
मराठी नाट्यपरिषद, ४७ वे अधिवेशन,
नांदेड, दि. ३१–१–६५

२४ २२९
इतिहासाचे मर्म
मालोजीराजे आणि शहाजीमहाराज ग्रंथ प्रकाशन समारंभ,
रंगमंदिर, नायगाव, मुंबई, दि. २–७–६७

२५ २३६
सोन्याचा सोहळा
छत्रपती शिवराय काव्य प्रकाशन समारंभ,
पुणे, दि. १४–१०–६८

२६ २५३
काँग्रेसची ऐतिहासिक भूमिका
परिसंवाद, ज्युनियर चेम्बर ऑफ कॉमर्स,
अहमदाबाद, दि. ४-९-६६

२७ २७३
आमच्या सामर्थ्याचे जीवनस्रोत
काँग्रेस कार्यकर्त्यांचे शिबिर.
मुंबई, दि.२०-५-६८

२८ २९५
विचारनिष्ठेची उजळणी
काँग्रेस कार्यकर्त्यांचे शिबिर,
मुंबई, दि. २२-५-६८

२९ ३०८
पक्षसंघटनेच्या बदलत्या दिशा
ठाणे जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यकर्त्यांची सभा,
ठाणे, दि. २४ ४-६६

३० ३२४
आर्थिक प्रश्नाचे राजकीय स्वरूप
अखिल भारतीय काँग्रेस कमिटी अधिवेशन,
बंगलोर, दि. ११-७-६९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७१७२५ वि: निबंध
क्रमांक २९१६ नों: दि: २९/३/७२

१ सत्त्वपरीक्षेचा क्षण



तीन वर्षांपूर्वी याच ठिकाणी उभा राहून, मी त्या वेळी होऊ घातलेल्या महाराष्ट्राच्या भावी धोरणासंबंधाने काही महत्त्वाचे निवेदन केले होते. पण आज मी जो येथे आलो आहे, तो कोणत्याही प्रकारचे निवेदन करण्याकरिता आलेला नसून आपला निरोप घेण्यासाठी म्हणून आलो आहे. उद्या याच वेळी महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रिपदाचा मी राजीनामा देणार आहे, आणि परवा सकाळी अधिकाराची सूत्रे नव्या मंत्रिमंडळाच्या स्वाधीन करून मी दिल्लीची वाट धरणार आहे. आतापर्यंत मुख्यमंत्री म्हणून मी जशी भाषणे करीत होतो तशी भाषणे यापुढे मला करता येणार नाहीत. उद्या संध्याकाळी मुंबईस कदाचित मी एखादे भाषण करीनही; पण परवा संध्याकाळी जेव्हा मी दिल्लीच्या वाटेला लागेन तेव्हापासून फारशी भाषणे न करण्याचे बंधन, संरक्षणमंत्री म्हणून मी स्वतःवर लादून घेणार आहे. कारण, राजकीय तत्त्वांच्या वादात न पडता, लढाईचा हा प्रसंग कोणत्या रीतीने हाताळला पाहिजे, या प्रश्नावरच मला आता सर्व लक्ष केन्द्रित करावे लागणार आहे.

आज आपण वातम्या ऐकल्या असतील. सर्वंध उत्तर आघाडीवर चिनी सैन्याने नेटाने प्रतिहल्ला केला आहे आणि काही काही ठिकाणी त्यांची प्रगती होऊन राहिली आहे. याचा अर्थ असा की, आमची जी प्राथमिक पिछेहाट झाली आहे ती अजून चालूच आहे. आपण असे समजू नका की, ही लढाई म्हणजे चारदोन दिवसांची, चारदोन महिन्यांची अशी लढाई आहे. साठ कोटी लोकसंख्या असणारा चीन गेली कित्येक वर्षे आपले सैन्यबळ आणि शस्त्रबळ वाढविण्यासाठी तयारी करीत होता; आणि याच काळात आपल्या देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने आत्यंतिक गरज म्हणून, आणि मानवी मूल्यांसंबंधी आमच्या मनात जो विश्वास होता त्यामुळे तत्त्व म्हणून, आम्ही शांततेच्या तत्त्वाचा स्वीकार केला. याप्रमाणे शांततेचा विचार करणारा आपला देश आणि तोंडाने शांततेचा मंत्र म्हणत म्हणत खिशातील खंजिराला हात घालणारा चीन यांची आज रणांगणावर गाठ पडली आहे. चीनने हा जो आपल्यावर हल्ला चढविला आहे त्यात त्याला प्राथमिक यश येऊन राहिले आहे. एका अत्यंत कठीण मोक्याच्या ठिकाणी आज आपला देश सापडला आहे. अशा विकट प्रसंगी मी संरक्षणमंत्री झालो म्हणून तुमच्या चेहऱ्यावर आनंद दिसतो आहे, अभिमान दिसतो आहे, आणि तो स्वाभाविकही आहे. परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपण एका फार मोठ्या स्थानावर चाललो आहोत अशी माझी भावना नाही. लढाईचे बोलावणे आले आहे, रणांगणाची हाक आली आहे म्हणून तिकडे धावत जाणाऱ्या सैनिकाच्या भावनेने मी चाललो आहे. आज माझे मन येथे नसून दिल्लीत आहे. आज तेथे जी परिस्थिती निर्माण झाली आहे त्या परिस्थितीत मी अद्यापि येथे आहे याची माझ्या मनाला खंत लागून राहिली आहे. पण जाण्यापूर्वी नवीन मंत्रिमंडळ तर वसविले पाहिजे. एवढ्या मोठ्या प्रेमाने, हौसेने, आवडीने आपण या राज्याचा हा इमला उभा केला, तो कोणाच्या तरी स्वाधीन करून मला गेले पाहिजे. यासाठीच केवळ मी आज येथे अडकून पडलो आहे.

जाण्यापूर्वी मी आपल्याला एक विनंती करतो. उद्या संध्याकाळपर्यंत तुम्हाला तुमचा नवा मुख्यमंत्री कोण असेल याचा अंदाज लागेल. तो

कोणीही असेल, कोठल्याही जिल्ह्यातील असेल, परंतु तुमची सगळी शक्ती आणि श्रद्धा महाराष्ट्राच्या कामाकरिता तुम्ही त्याला दिली पाहिजे. व्यक्तीचे मोठेपण महत्त्वाचे नाही, राज्याचे मोठेपण महत्त्वाचे आहे, ही गोष्ट आपण कधीही विसरू नका.

मला जेव्हा आपल्या नेत्यांनी या नवीन कामगिरीविषयी विचारले तेव्हा हा आपल्या देशाच्या जीवनमरणाचा प्रश्न असल्यामुळे मी त्याला त्वरित मान्यता दिली. ओघानेच महाराष्ट्राचा प्रश्न निघाला. त्या वेळी मी त्यांना आश्वासन दिले की, माझ्या पाठीमागे महाराष्ट्राचे काम बरोबर चालेल याची खबरदारी माझ्या पक्षातले लोक घेतील, माझ्या प्रांतातले लोक घेतील. माझी त्याबद्दल खात्री आहे. कारण कठीण प्रसंगाच्या वेळी आपली जबाबदारी कशी पार पाडावी याची त्यांना चांगली माहिती आहे. ज्या परिस्थितीत मी चाललो आहे त्या परिस्थितीत आपल्या भावना आणि आपले प्रेम यांची मला फार गरज आहे. एवढ्या मोठ्या जबाबदारीच्या कामगिरीवर चाललो असताना माझ्या मनात त्यामुळे केवढा धीर राहील याची आपण कल्पना करा. मी हे जे काम माझ्या शिरावर घेतले आहे ते माझे एकट्याचे काम नाही. त्यामागे भारतातील अनेकांचे आशीर्वाद आहेत; आणि या कार्याच्या यशसिद्धीसाठी महाराष्ट्रातील मन नी मन, आणि महाराष्ट्रातील घर नी घर माझ्यासाठी प्रार्थना करील, माझे अभीष्ट चिंतील, असे माझे मन मला आज सांगते आहे. येथून जात असताना मी याच भावनेने चाललो आहे हे मी आपणांस या प्रसंगी सांगू इच्छितो.

या देशाने आजपर्यंत जे धोरण अवलंबिलेले आहे, त्या मूळ धोरणात लढाईचा डाव अंगावर आला म्हणून दोष आहेत असे समजण्याचे कारण नाही. आपल्या देशावर आक्रमण करून आपले स्वातंत्र्य संकटात आणण्याच्या निर्धाराने आपल्या शेजारचा एक देश प्रयत्न करतो आहे. त्यात त्याला थोडेसे यशही मिळाले आहे. परंतु या देशातील चाळीस कोटी लोक मुर्दाडपणाने त्याचे हे आक्रमण चालू देतील हे अगदी अशक्य आहे. आम्ही अगदीच काही मेलेल्या आईचे दूध प्यालेली माणसे नाही आहोत. आमच्यामध्येही स्वाभिमान आहे, आत्मविश्वास आहे. आज

कदाचित आमच्या हातात शस्त्रे नसतील, परंतु स्वातंत्र्याचे आणि देशा-संबंधीचे प्रेम तुमच्या आमच्या मनामध्ये आज इतक्या तीव्रतेने निर्माण झालेले आहे की, मरून जाऊ पण हटणार नाही, ही भूमिका आम्ही स्वीकारली आहे. आपले काही जवान कामास आले अशा वातम्या आता संध्याकाळी रेडिओवर येत असतात. अगदी फुलासारखी निवडलेली तरुण माणसे आज आघाडीवर लढत आहेत; हुषार, बुद्धिमान माणसे आघाडीवर लढत आहेत. ती तुमच्या आमच्यासाठी तेथे आपले प्राण ठेवीत आहेत. देशासाठी मृत्यूला कवटाळताना त्यांच्या मनात कोणत्या भावना येत असतील ? हजारो वर्षांच्या आमच्या ज्या परंपरा आहेत, आमची जी माणुसकीची नीती आहे, आमची जी तेजस्विता आहे, त्या सगळ्यांच्या रक्षणासाठी आम्ही हे लोकशाहीचे राज्य या देशात उभे केले आहे. या राज्यावर एक जबरदस्त हल्ला करून त्याचे स्वातंत्र्य, त्याची मूल्ये धोक्यात आणण्याचा शत्रूकडून जो प्रयत्न चालला आहे, त्याचा निकराने प्रतिकार करण्यासाठी आपले जवान मृत्यूला सामोरे जात आहेत; आणि प्रसंग पडला तर आपल्या पाठोपाठ या देशातील सगळे लोक मरण्यासाठी तयार होतील, याच भावनेचे ते आज तेथे लढत राहिले आहेत. त्यांच्या या भावनेची आपण सतत आठवण ठेवा.

मी दिल्लीस गेल्यानंतर अचानक काही नवीन परिस्थिती निर्माण होईल असे आपण समजू नका. कारण ज्याला संपूर्ण युद्ध म्हणतात अशा प्रकारचे आजकालच्या युद्धाला स्वरूप प्राप्त झाले आहे. लढाईच्या आघाडीवर सैनिक लढतो तसाच त्याच्या पाठीमागे असणारा प्रत्येक मनुष्यही आपापल्या क्षेत्रामध्ये लढत असतो. सैनिकाच्या हातात जे शस्त्र असते ते शस्त्र निर्माण करणारी, नवीन नवीन शस्त्रांचे संशोधन करणारी, युद्धकालातील कारखाने चालविण्यासाठी लागणारी एक विशिष्ट औद्योगिक परिस्थिती निर्माण करणारी, सैनिकांकरिता लागणारे अन्न आणि इतर सामग्री पोहोचविण्यासाठी विमाने, रेल्वे आणि मोटारी या वाहतुकीच्या साधनांचे कार्यक्षमतेने संघटन आणि संयोजन करणारी, शेतीचे उत्पादन वाढविण्याचा सतत प्रयत्न करणारी, अशा प्रकारच्या अर्थव्यवस्थेला एक

विशिष्ट आणि व्यापक स्वरूप युद्धकाळात आधुनिक युद्धामुळे प्राप्त होते. आपण असे समजू नका की, लढाईवर गेलेला सैनिकच फक्त लढणार आहे. आपण असे मानले पाहिजे की, आपण प्रत्येकजण आपापल्या क्षेत्रात लढतो आहोत. कारण आधुनिक लढाईमध्ये सैनिक तर लढतोच, पण त्या सैनिकाच्या पाठीमागे डावपेच आखणारा सेनापती, राज्यकारभार हाकणारा मंत्री, सैनिकाला शस्त्र पुरविणारा तंत्रज्ञ, कारखान्यात काम करणारा कामगार, शेतीचे उत्पादन वाढविणारा शेतकरी, सरकारी नोकरीत काम करणारा कर्मचारी यांपैकी प्रत्येक जण, शत्रू देशातील आपापल्या क्षेत्रातील व्यक्तीबरोबर आधुनिक युद्धात लढत असतो. आधुनिक युद्धाचे हे वैशिष्ट्य आहे की, एका देशाची शक्ती, त्याची अर्थव्यवस्था, त्याचे कार्य-कौशल्य, त्याची कार्यक्षमता ही दुसऱ्या देशातील शक्तीशी, अर्थव्यवस्थेशी, कार्यकौशल्याशी आणि कार्यक्षमतेशी लढाई करीत असते. एक संपूर्ण शक्ती दुसऱ्या संपूर्ण शक्तीशी लढत असते. तेव्हा ही लढाई दीर्घ काल चालू राहील या दृष्टीनेच तुम्हा-आम्हाला आता तयारी करावयाची आहे. या बाबतीत आपल्या मनात कोणत्याही प्रकारचा संदेह असता कामा नये.

आज मला निरोप देण्यासाठी आपण येथे जमला आहात. परंतु नुसता निरोप देऊन हे काम भागणार नाही, किंवा दोन-चार लाख रुपयांची देणगी देऊनही हे काम संपणार नाही. उद्या माणसांची हाक येणार आहे. त्यासाठी आपण तयारी ठेवली पाहिजे. कारण चीनची एक ठराविक युद्ध-नीती आहे. आम्ही येथून एक हजार सैनिक लढण्यासाठी पाठविले की, त्याच्या प्रतिकारासाठी लगेच तो तीन हजार सैनिक पाठवितो. आमची लोकसंख्या चाळीस कोटी तर त्यांची साठ कोटी आहे. म्हणजे साठ कोटी लोकांशी चाळीस कोटी लोकांना आज लढावयाचे आहे. तेव्हा आपल्या सैनिकांची संख्या आपल्याला वाढवावीच लागेल. साखर आणि घासलेटा-साठी दुकानावर जशा रांगा लागतात तशा रांगा उद्या भरतीची केन्द्रे उभी राहिली तर त्या भरतीच्या केन्द्रावर लागल्या पाहिजेत. महाराष्ट्रातील प्रत्येक तरुण माणसाने, हाक आल्यानंतर मनाच्या उमेदीने म्हटले पाहिजे की, चला, मलाही हिमालयाची लढाई लढलीच पाहिजे. पूर्वी उत्तरेत जाऊन आपण

अनेक लढाया लढलो आहोत, कधी जिंकलोही आहोत आणि कधी हरलोही आहोत. पण लढाईत हरलो तरी आमचे मन कधी हरले नाही. देश संकटात आला की, त्याच्या रक्षणासाठी धावून जावयाचे असा आमचा बाणा आहे, अशी आमची परंपरा आहे; आणि याच भावनेने आज मी चाललो आहे. पण तुमच्यातील प्रत्येक माणसाला वाटले पाहिजे की, आपल्या सगळ्यांच्यातर्फे केवळ आपला मुख्यमंत्री देऊन चालणार नाही. तर प्रत्येक घराघरातून माणसे देण्याची आपण तयारी ठेवली पाहिजे. एकोणीस-वीस वर्षांपुढच्या प्रत्येक तरुणाने आपल्या मनाशी खूणगाठ बांधली पाहिजे की, आज ना उद्या मला लढाईचे बोलावणे येणार आहे; आणि हे बोलावणे नक्की येणार आहे हे मी आपल्याला सांगू इच्छितो. मग ते सहा महिन्यांत येईल किंवा एक वर्षात येईल. पण त्यासाठी आपल्याला तयारी करावी लागेल. अलीकडच्या लढाईचे स्वरूप मी मघाच सांगितले. म्हणून मोठ्या कठोरपणाने आपल्या मनातला निर्णय आपण पार पाडला पाहिजे. या बाबतीत चीन जितका कठोर आहे तितकेच कठोर तुम्हा-आम्हालाही बनले पाहिजे.

आपल्या देशाच्या इतिहासात आजपर्यंत आपण अनेकांशी लढाया लढलो. पण त्या लढायांपेक्षा आज जी लढाई आपण अंगावर घेतली आहे त्या लढाईचे स्वरूप आणि आकार अगदी वेगळा आहे. उत्तरेकडच्या खैबर घाटातून पूर्वी आमच्यावर आक्रमणे आली, पण ती आम्ही पचवली. पश्चिमेकडून आलेल्या इंग्रजांशी, फ्रेंचांशी, पोर्तुगिजांशी आम्ही लढाया लढलो; पण त्यांचा लढण्याचा खाक्या वेगळा होता, त्यांची लढण्याची पद्धत वेगळी होती. ते औद्योगिक क्रान्तीचे तत्त्व घेऊन आले होते, एक नवीन तन्हेचे तंत्र घेऊन आले होते. आमच्यापेक्षा संख्येने कमी असले तरी आमच्यामध्ये फूट पाडून आणि आमच्यातील दुबळेपणाचा फायदा घेऊन त्यांनी आपला मार्ग सुकर केला होता. परंतु गेल्या हजारो वर्षांच्या इतिहासात चीन आणि हिंदुस्थान यांच्यामध्ये कधी लढाई झालेली नाही. पण त्याचे श्रेय चीनलाही नाही आणि हिंदुस्थानलाही नाही. त्याचे श्रेय हिमालयाला आहे. तो आमच्या मधोमध अभेद्य असा उभा राहिला आहे.

तीन-चार वर्षांपूर्वी चौ-एन्-लाय हिंदुस्थानात आले होते, त्या वेळी ते मुंबईलाही आले होते. त्या वेळी केलेल्या भाषणात जणू काय हातात संताची माळ घेऊन ते म्हणाले होते की, गेल्या दोन हजार वर्षांत तुमची आमची कधी लढाई झालेली नाही. त्यांनी ही गोष्ट कदाचित त्या वेळी चांगूलपणानेही सांगितली असेल. परंतु ही गोष्ट इतिहासात अद्यापि घडली नाही याबद्दल त्यांना मनातून फार खंत वाटत असावी. दोन हजार वर्षांत जे घडले नाही ते त्यांना आता करावयाचे आहे. त्यांना ते करावयाचेच असेल तर आपलीही तयारी असली पाहिजे. नाही तर या देशातील लोकांना जगता येणार नाही.

हिंदुस्थानच्या इतिहासात पूर्वी कधीही न घडलेली अशी ही गोष्ट आज घडत असून तिला आपल्याला तोंड द्यावे लागत आहे. चीनचे हे आक्रमण या देशावर पूर्वी झालेल्या आक्रमणांपेक्षा अगदी वेगळ्या प्रकारचे आहे असे मघा मी म्हणालो. त्याचप्रमाणे आजचा हा शत्रूही अगदी वेगळ्या प्रकारचा आहे, त्याची शक्तीही वेगळी आहे. परंतु आज (त्याच्याशी) सामना देताना हिंदुस्थानातही एक फार मोठा फरक झाला आहे. आज ज्या हिंदुस्थानवर चीनने हल्ला केला आहे तो हिंदुस्थान जुन्या इतिहासातील हिंदुस्थान राहिलेला नाही. आपण सगळ्या आक्रमणांचा इतिहास काढून पाहा. आमच्यावर पूर्वी उत्तरेकडून किंवा पश्चिमेकडून जी आक्रमणे झाली त्यांचे स्वरूप असे होते की, आक्रमकाने दिल्ली काबीज केली की हिंदुस्थान त्याच्या ताब्यात जात असे. जो आक्रमक दिल्लीमध्ये आपल्या नावाची ग्वाही फिरवील तो हिंदुस्थानचा बादशहा बने असा आतापर्यंतचा मामला होता. सबंध देश जिंकण्यासाठी आक्रमक कधीच आमच्याकडे आला नाही. निदान लढाई करून सबंध देश कोणी जिंकला नाही. गावागावामध्ये लढाई झाली आणि आक्रमक एकेक गाव काबीज करीत गेला असे फारसे कधी घडलेले नाही. पंजाबातून आत शिरून आक्रमक दिल्लीमध्ये गेले आणि दिल्लीचे बादशहा झाले. मग ते लोदी असोत, घोरी असोत किंवा इतर कोणी असोत. परंतु आज हिमालयाच्या एका कोपऱ्यात परकीयांच्या सैन्याने पाऊल ठेवताच सबंध हिंदुस्थान विजली चमकल्या-

सारखा जागा झाला आहे. हा बदललेला हिंदुस्थान एक हिंदुस्थान आहे, जागृत हिंदुस्थान आहे. आपल्या प्रदीर्घ इतिहासात घडलेली ही एक अगदी नवीन घटना आहे. हा बदललेला हिंदुस्थान आज आपले सत्त्व रक्षण करण्याच्या तयारीने उभा राहिलेला आहे; आणि म्हणून तुम्हा-आम्हाला आपसातील आपले जे मतभेद असतील ते या वेळी बाजूला ठेवले पाहिजेत. आमचे धोरण बरोबर की तुमचे धोरण बरोबर हे वाद लढाई जिंकल्यानंतर आपण निवांतपणे करू. त्याला माझी तयारी आहे.

गेली अनेक वर्षे आम्ही शांततेने थोडीफार तयारी करण्याचा प्रयत्न करतो आहोत. ही तयारी आम्ही केली नसती, तर आजच्यापेक्षा अधिक दुबळ्या देशाला या संकटाला तोंड द्यावे लागले असते. स्वातंत्र्यप्राप्ती-नंतरच्या काळात आमची आर्थिक शक्ती वाढविण्याचा आम्ही केवढा तरी प्रयत्न केला आहे. याचाच अर्थ आम्ही आमचे डिफेन्स पोटेन्शियल म्हणजे संरक्षणाची तयारी करण्याचे सामर्थ्य वाढविलेले आहे. ते आता उपयोगात आणण्याचे काम तुम्हा-आम्हाला करावे लागणार आहे.

एका बाबतीत मात्र आपणाला आता सावध राहिले पाहिजे. ज्यांच्या मनात चीनबद्दल प्रेम आहे अशा लोकांपासून तुम्हा-आम्हाला जरूर सावध राहिले पाहिजे. ही गोष्ट साफ आहे. बाकी दुसऱ्या गोष्टींची तुम्हा-आम्हाला चिंता करण्याचे आज काही कारण दिसत नाही.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट तुम्हाला सांगावयाची होती. परवा कोल्हापूरच्या आपल्या भाषणात डॉ. राधाकृष्णन् यांनी एक फार चांगला विचार सांगितला. ते थोर विचारवंत आहेत, तत्त्वचिंतक आहेत. एखादा मोठा गंभीर विचार आपल्या भाषणात ते सहज सांगून जातात. परवा कोल्हापूरला ते म्हणाले की, एक प्रकारच्या कष्टाच्या, दुःखाच्या आणि कारुण्यमय जीवनाच्या एका विशिष्ट पर्वामध्ये आज आपण प्रवेश करतो आहोत; आणि 'युद्धपर्व' हे नेहमीच असे असते. युद्धाच्या कथा ऐकावयास रम्य असतात. परंतु प्रत्यक्षात या पर्वात डॉ. राधाकृष्णन् यांनी म्हटल्याप्रमाणे कितीतरी कारुण्य भरलेले असते. आता या चिनी आक्रमणाचीच गोष्टी घ्या. त्याचा प्रतिकार करण्यासाठी घराघरातून तरुण

लढावयास जातील. कधी कुणाला आपल्या भावाला, कधी कुणाला आपल्या मुलाला तर कधी कुणाला आपल्या पतीला मुकण्याची पाळी येईल. घराघरातून आपल्याला हे ऐकावे लागणार आहे. परंतु त्यासाठी काही वर्षे तरी आपण आपल्या मनाची तयारी ठेवली पाहिजे. लढाईसाठी ज्या वेळी देश तयारी करतो त्या वेळी मनगट लोखंडासारखेच वळकट करावे लागते, त्याचप्रमाणे मनही लोखंडासारखेच वळकट करावे लागते. आम्ही आमच्या जुन्या लढायांच्या कहाण्या ऐकतो. पानिपतची लढाई आम्ही हरलो. तेथील कहाणी सांगताना आमची लाख बांगडी फुटली असे आमच्याकडील शाहीर सांगतात. अशा बांगड्या या युद्धातही फुटतील. त्यासाठी आपण तयारी ठेवली पाहिजे. युद्धकालातील जीवन हे कारुण्यमय जीवन आहे, दुःखी जीवन आहे. पण या कारुण्याच्या पाठीमागे एक प्रकारचा स्वाभिमान आहे. हे दुःखी जीवन आपण बुद्ध्याच पत्करले आहे. ही आपली सत्त्वपरीक्षा आहे. शब्द आपण सहज बोलून जातो. पण प्रसंग पडला तर सत्त्वपरीक्षेकरिता हवा तो त्यागही करावा लागतो. सत्त्वपरीक्षेचा हा काळ या देशाच्या इतिहासात आज आलेला आहे. तो किती काळ चालणार आहे हे मला सांगता येणार नाही. पण लढाईवर जाणाऱ्या सैनिकाच्या मनात एक निर्णय पक्का असतो. कदाचित पहिली दुसरी लढाई आपण हरू, पण सर्वांत महत्त्वाची लढाई आपण जिंकूच जिंकू. निकालाची ही जी लढाई असते ती खरी अखेरची लढाई. ही अखेरची लढाई जो जिंकतो तो जेता बनतो.

आज आपल्यासमोर बोलत असताना माझ्या मनात येणाऱ्या भावना मला आपल्याजवळ व्यक्त केल्या पाहिजेत म्हणून मी हे सर्व बोलतो आहे. महाराष्ट्राच्या राज्यासंबंधी मी जरूर चिंता करतो. पण जनमन जागृत असल्यानंतर मी तरी चिंता का करावी ? आपण सर्वजण पाठीमागे आहात. आणि आपल्या सर्वांचे एक मन आहे. गेल्या आठ-दहा दिवसांमध्ये सगळ्या पक्षांच्या लोकांची माझ्याकडे पत्रे आली आहेत. मला जरूर अभिमान वाटतो की, महाराष्ट्रातर्फे हे प्रतिनिधित्व करण्याचे भाग्य मला लाभले. परवा-परवापर्यंत महाराष्ट्रातील पक्षांनी सभेत एकमेकांना विरोध केला; पण

आतली खरी गोष्ट अशी आहे की, हे सर्वच जण मला सांगतात की, 'जा, तुम्ही आता पुढे जा. महाराष्ट्राची चिंता करू नका.' मग मी कशाकरिता चिंता करू महाराष्ट्राची ? आपण सगळे महाराष्ट्राचे धनी आहात, मालक आहात. तुम्हाला त्याची चिंता आहे. जाताना थोडी फार हुरहुरही होती मनात. पण ती चारच दिवसांपुरती. परंतु आज ती हुरहुर राहिलेली नाही. परवाच एका सभेत बोलताना सासरी जाणाऱ्या मुलीचे उदाहरण मी सांगितले. सासरी जावेसे वाटते, पण माहेर तर सुटत नाही. तशीच काहीशी स्थिती माझ्या मनाची थोड्या दिवसांपूर्वी झाली होती. पण आज ती राहिलेली नाही. सासरी जाण्यासाठी माहेरमधले माझे मन आता पूर्ण निघालेले आहे.

या सांगली शहरात मी आजपर्यन्त अनेक वेळा आलो. या शहराने आणि या जिल्ह्यातील जनतेने व कार्यकर्त्यांनी माझ्यावर फार मोठे प्रेम केले आहे. मी वादाचा विषय झालो होतो तेव्हाही आपण माझ्यावर प्रेम केले, माझे म्हणणे ऐकून घेतले आणि माझ्या पाठीमागे उभे राहिलात; आणि मी थोडेफार यश मिळविले तेव्हाही आपण माझ्याबरोबर राहिलात; आज तर मी महाराष्ट्राची सीमा ओलांडून बाहेर चाललो आहे, एका मोठ्या कठीण अशा कामगिरीवर चाललो आहे. पण माझ्या मनात आत्मविश्वास आहे. आजपर्यंत अनेक वेळा आपल्याजवळ माझ्या मनातल्या गोष्टी बोलण्याचा मी प्रयत्न केला आहे. प्रत्येक वेळी आपण त्या भावनेचा सन्मान केला. आजपर्यंतचा माझ्यासंबंधीचा तोच भाव आपण पाठीमागे ठेवा. या जिल्ह्यात वारंवार पूर्वी मी येत असे. असा एकही महिना गेला नसेल की या ना त्या निमित्ताने मी या जिल्ह्यात आलो नाही. परंतु आता कदाचित कित्येक महिन्यांत आपली गाठ पडणार नाही. पण मी कोठेही असलो तरी तुमचे आणि माझे मन सदैव एकमेकांच्या जवळ राहो. तुमचे जीवन सुखाचे जावो आणि माझ्या कामात मला यश मिळो अशी मी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो.

जाहीर सभा, सांगली, दि. १८-११-६२

२ आजचा क्षात्रधर्म

जवळ जवळ दोन तास आपण या ठिकाणी बसला आहात. मुळात मला येण्यास थोडासा उशीर झाल्यामुळे आपल्याला जास्त बसावे लागले. आज मुंबई शहरातर्फे मला निरोप देण्याचा समारंभ आपण करीत आहात. एक जोखमीचे काम शिरावर घेऊन मी मुंबई शहराबाहेर, महाराष्ट्र राज्याबाहेर चाललो आहे. एक महिना झाला. याच चौपाटीच्या वाळवंटात मी आपल्यापुढे चीनच्या प्रश्नासंबंधाने बोलत होतो. त्या वेळी मला कल्पना नव्हती की, एक महिना पुरा होण्याच्या आतच नियती मला दिल्लीस घेऊन जाणार आहे. त्या वेळी लोकमान्य टिळकांच्या पुतळ्याला साक्ष ठेवून मी म्हणालो होतो की, देशाची हाक आली तर मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देऊन मी निघून जाईन. तो शब्द खरा करण्याची वेळ आता आली आहे. मला आता गेलेच पाहिजे. आणखी एका तासाने मी मुख्य-मंत्रिपदाचा राजीनामा देणार आहे. देशाची हाक आली म्हणून मी तिकडे जातो आहे. संरक्षणमंत्रिपदाची मोठी जागा चालून आली म्हणून मी जातो आहे असे मात्र आपण कृपा करून समजू नका. पण ही देशाची

हाक आहे. देशाच्या नेत्याने मारलेली हाक आहे. त्याकरिता सैनिक म्हणून प्रसंग पडल्यास जान देईन या भावनेने मी तिकडे जात आहे. मी हे वक्तृत्वाच्या आवेशाने बोलत नसून माझे हृद्‌गत मी आपल्यासमोर बोलतो आहे.

१९४२ साली असाच मी माझ्या मनातल्या भावनांचा विचार करीत होतो, शोध घेत होतो. सगळा संसार उधळून मी त्या वेळी बाहेर चाललो होतो. काय भावना होती माझी त्या वेळी ? वनवासात जाण्याच्या भावनेने मनाची तयारी करून मी त्या वेळी बाहेर पडलो. आजही येथून जात असताना तशीच काहीशी भावना माझ्या मनात आहे. हा आपला निरोप समारंभ आहे, पण माझे मन आज या समारंभात नाही. आपण प्रेमाने योजलेल्या या समारंभाचे महत्त्व मी मानतो. कृपा करून मी त्याचा अवमान करतो असे समजू नका. आपण मला मूल्यवान विमान दिले आहे आणि तशीच तोफही दिली आहे. पण त्याने लढाई जिंकली जाणार नाही. त्यासाठी आज जिद्द पाहिजे आहे. हिंदुस्थानचे सत्त्व हरण करण्याचा हा जो चीनचा प्रयत्न चाललेला आहे, त्यासाठी प्रसंग पडला तर वनवासात जाण्याची हिंदुस्थानने तयारी केली पाहिजे. याच भावनेने आपल्याला या लढाईकडे पाहिले पाहिजे. तरच ही लढाई आपण जिंकू शकू.

सरक्षणमंत्री म्हणून तुम्ही मला पाठवीत आहात. तुमच्या सगळ्यांच्या तर्फे जामीन राहण्याकरिता मी दिल्लीस चाललो आहे असाच याचा मी माझ्या मनाशी अर्थ करतो आहे. १९४२ चे वनवासाचे पर्व गांधीजींच्या पुण्याईने अखेर आनंदाचे पर्व झाले. १९४७ साली दुनियेच्या इतिहासात एक किमया घडली. सबंध दुनिया जिंकण्यासाठी बाहेर पडलेला हिटलर आणि सबंध आशिया खंड पादाक्रांत करण्याकरिता बाहेर पडलेला जपान यांसारख्या जबरदस्त लष्करी शक्तींचा ज्याने शेवटी पराभव केला, त्या इंग्रजाला या देशातल्या निःशस्त्र लोकांपुढे शरण यावे लागले. अशी ही मोठी किमया घडली. गांधीजींनी या देशात एक जबरदस्त शक्ती निर्माण केली होती, कणखर पोलादी मन तयार केले होते. त्या पोलादी मनापुढे

इंग्रजाला हार खावी लागली. पण आम्हाला वाटले की, ती आमचीच किमया होती; आणि आम्ही राहिलोही होतो त्याच नादात. पण गांधीजींनी निर्माण केलेले हे पोलादी मन आज थोडेसे ढिले झाले आहे की काय, याचा तुम्हा-आम्हाला शोध घेतला पाहिजे.

आपल्या देशावर चीनकडून झालेले हे आक्रमण अती मोठे असे आक्रमण आहे. हिंदुस्थानच्या इतिहासामध्ये यासारखे आक्रमण यापूर्वी कधीही झाले नव्हते. पूर्वी आमच्यावर आक्रमणे झाली ती वायव्येच्या सरहद्दीतून किंवा समुद्राच्या पाठीवरून. कोणी तराजू घेऊन आला तर कोणी धर्माची समशेर घेऊन आला, आणि त्याने दिल्ली जिंकली. पण हा जो नवीन आक्रमक आमच्या देशावर येऊन राहिला आहे, त्याच्या पाठीमागे जबरदस्त शक्ती आहे. तो तुमच्या आमच्या देशाला आज पादाक्रांत करण्याच्या तयारीने येतो आहे. प्राथमिक विजय मिळाल्यामुळे त्याच्या मनात थोडासा अहंकारही निर्माण झाला असेल. त्याच्याशी मुकाबला करण्यासाठी आपल्याला आपल्या मनातील जिद्द कायम ठेवावी लागेल. कृपा करून आपण असे समजू नका की, मी दिल्लीत पोहोचलो की, काही तरी जादूचा खेळ होईल. चीनला हटविण्यासाठी तुम्हा-आम्हाला जबरदस्त तयारी करावी लागेल, वर्षानुवर्षे तयारी करावी लागेल. आपली आज ही जी प्राथमिक पिछेहाट होते आहे तिचा अर्थ आपण समजून घेतला पाहिजे. चीन हा एक जबरदस्त देश आहे. आपल्या एका माणसागणिक तीन माणसे तो भिडवितो आहे. तेव्हा प्रसंग पडला तर त्याच्याइतकी माणसे तरी आपण उभी केली पाहिजेत किंवा आपल्या जवानांची ताकद, कौशल्य, कार्यक्षमता आणि लढाऊ वृत्ती आपण दुपटीने किंवा तिपटीने वाढविली पाहिजे. तरच ही लढाई आपण जिंकू शकू.

प्रत्यक्ष युद्धक्षेत्रापासून दूर असलेल्या तुम्हा-आम्हाला या लढाईकडे केवळ प्रेक्षकाच्या भूमिकेने पाहता येणार नाही. सबंध देशाची जी जिद्द आहे, सबंध भारताचे जे एकत्व आहे, त्याची ही परीक्षा आहे. त्यासाठी आपण तयार असले पाहिजे, आपण आपल्या मनाची कणखरता निर्माण केली

पाहिजे. १९२० ते १९४५ चा कालखंड आपण आठवा. त्या काळातील कार्यकर्त्यांना स्वतःची अशी एक जिद्द होती. रस्त्यारस्त्याने अनवाणी हिंडताना, रानावनातून ठेचाळत हिंडताना मी त्यांना पाहिले आहे आणि तुरुंगामध्ये देशासाठी त्यांनी उपसलेले कष्टही मी पाहिले आहेत. देशासाठी कोणताही त्याग करण्याची त्यांची तयारी होती. त्यांच्या त्या पराकोटीच्या त्यागी वृत्तीची या देशाला आज फार गरज आहे. हिंमतीने ताठ उभे राहून, त्यांची ती शान, त्यांचा तो क्षात्रधर्म आज आपण उभा केला पाहिजे. हा क्षात्रधर्म आपणांस उभा करावयाचा असेल तर, माणसामाणसामध्ये आपण ही जिद्दीची भावना निर्माण केली पाहिजे. बोलताना, काम करताना, हिंडताना, फिरताना याशिवाय दुसरा विषय आपल्याला सुचता कामा नये. देशाभिमानाचे आणि स्वातंत्र्याचे इतके वेड जेव्हा देशाला लागते तेव्हाच तो देश आपले स्वातंत्र्य राखू शकतो हे आपण पक्के लक्षात ठेवा.

आपण मला पाठविता आहात याचा अर्थ आपण मला दिलेल्या भावनांची शक्ती माझ्या पाठीमागे उभी आहे असा मी समजतो. अनेक धर्मांच्या मंडळींनी येथे प्रार्थना म्हटली. मी त्यांचा आभारी आहे. महाराष्ट्राचे राज्य सुरू होताना अशाच सगळ्या धर्मांच्या मंडळींनी प्रार्थना म्हणून आपले आशीर्वाद त्याला दिले आणि सगळ्यांच्या आशीर्वादाने आपले राज्य चांगले चालले. आजसुद्धा त्याच प्रार्थनांचे पाठबळ मी माझ्यावरोवर घेऊन चाललो आहे.

या देशातील स्वातंत्र्यप्रेमावर माझा विश्वास आहे. या देशामध्ये लोकमान्य टिळकांचा आवाज उठला आणि या देशामध्ये महात्मा गांधींनी प्राण ओतले. त्यांना काय आम्ही आज विसरणार आहोत ? महात्मा गांधींचे रक्त दिल्लीच्या तक्ताजवळ सांडलेले आहे हे कृपा करून लक्षात ठेवा. तो पवित्र माणूस तुमच्या आमच्या नजरेसमोर हिंडला, हे तुमचे आमचे परम भाग्य. राम आणि कृष्ण यांच्या गोष्टी आम्ही ऐकतो पण तुमच्या आमच्या डोळ्यांसमोर रामकृष्णासारखा माणूस प्रत्यक्ष चालला, बोलला, हिंडला, फिरला. ज्या दिल्लीच्या तक्ताजवळ त्यांचे रक्त सांडले त्या तक्ताला शाप होता. त्या तक्तावर बसून कोणी शंभर वर्षे तर कोणी दोनशे वर्षे राज्य करावे व नंतर

ते राज्य नाहीसे व्हावे असा त्या तक्ताला शाप होता. तेथे घोरींचे, लोदींचे अगर मोगलांचे अधिराज्य दीडशे-दोनशे वर्षांपेक्षा अधिक राहिले नाही. परंतु त्या तक्ताजवळ गांधीजींचे जे रक्त पडले त्यातून त्या शापाचा जणू उःशाप झाल्याचे आपण मानले पाहिजे. ते तक्त आता तुम्हा-आम्हाला सांभाळावयाचे आहे. ते तक्त कोणा एका व्यक्तीचे नाही, कोणा एका धर्माचे नाही, कोणा एका वर्गाचे नाही. ते या देशातल्या चाळीस-पंचेचाळीस कोटी लोकांचे तक्त आहे आणि त्याचे रक्षण करणे हे तुमचे आमचे कर्तव्य आहे. तुमचे आमचे हे तक्त जोपर्यंत चंद्रसूर्य उगवत राहतील तोपर्यंत कायम राहिले पाहिजे, कारण ते आमच्या स्वातंत्र्याचे व लोकशाहीचे प्रतीक आहे. अशा तऱ्हेची देशभक्तीची भावना आपल्या मनात फुलली पाहिजे, पेटली पाहिजे. त्यासाठी या देशातील प्रत्येक माणूस एक किल्ला बनला पाहिजे. पूर्वी ह्या सह्याद्रीच्या माथ्यावर राज्याच्या रक्षणासाठी ठिकठिकाणी दुर्ग बांधण्यात आले होते. आता या डोंगरावरच्या किल्ल्यांनी राज्ये जिंकता येणार नाहीत, राखता येणार नाहीत. त्यासाठी तुम्हा-आम्हाला तुमच्या आमच्या मनामध्ये निर्धाराचे दुर्ग उभे केले पाहिजेत. प्रत्येक स्त्री, प्रत्येक पुरुष, प्रत्येक मूल या देशाच्या स्वातंत्र्याचे रक्षण करणारा एक किल्ला बनला पाहिजे. अशी शक्ती या देशात आपण निर्माण करू शकलो तर चीनचा पराभव करण्यासाठी असंख्य शस्त्रांची आणि विमानांची आपणांस गरज लागणार नाही. अन्याय करण्याकरिता जो बाहेर पडला आहे तो अशा हिंमतीपुढे दुबळा पडतो असा इतिहासाचा अनुभव आहे. तोच अनुभव पुन्हा आपल्याला आल्याशिवाय राहणार नाही.

इतिहासात हिंदुस्थानने कोणावर अन्याय केला नाही. आम्ही शांततेचे धोरण पाळले. ज्या तत्त्वाचा आम्ही पाठपुरावा केला त्या तत्त्वाबद्दल आम्हाला पश्चात्ताप होत नाही. मी आपल्याला सांगतो की, आम्ही कोणावर अन्याय करणार नाही, कुठल्याही देशावर चाल करून जाणार नाही. मानवतेच्या मूल्यांचे रक्षण करण्याच्या हिंमतीने या देशाचे रक्षण करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. परंतु आमच्यावर आक्रमण करण्याचा कोणी प्रयत्न केल्यास त्याचा आम्हाला जरूर प्रतिकार करावा लागेल. पण याचा

अर्थ आम्ही आमचे तत्त्व सोडतो आहोत असा नाही. आमच्या तत्त्वाचा अखेर विजय होणार नसेल तर मानवतेच्या सेवेची सगळी भाषा खोटी ठरणार आहे. हिंदुस्थानातील कोट्यवधी गरीब जनतेचे हे राज्य आहे. या जनतेच्या जीवनामध्ये नवीन आनंद निर्माण व्हावा, सौख्य निर्माण व्हावे या उच्च ध्येयाने प्रेरित झालेले आणि त्यासाठी झटणारे असे हे राज्य आहे. त्याला गांधीजींचा आशीर्वाद आहे, त्याला लोकमान्य टिळकांचा आशीर्वाद आहे. त्याने राणा प्रताप, शिवाजीमहाराज आणि झाशीची राणी यांचा क्षात्रधर्म स्वीकारला आहे. अशा या देशाचे स्वातंत्र्य जाणार असेल तर या दुनियेमध्ये कोण स्वतंत्र राहणार आहे? आता आपण हिंमतीने पुढे जाण्याची जिद्द बाळगली पाहिजे, वनवासात जाण्याची मनाची तयारी केली पाहिजे. जेव्हा वनवास घडतो तेव्हाच रामायण लिहिले जाते. आपण अशी मनाची तयारी आज माझ्यासमोर दाखविली आहे. महाराष्ट्राचा प्रतिनिधी म्हणून मी दिल्लीस माझ्या कामासाठी जेव्हा हजर होईन तेव्हा आपली ही भावना मी मनामध्ये नित्य बागवीन.

महाराष्ट्रातून बाहेर जाताना माझ्या मनाला जरूर दुःख होते आहे. पण घरापासून दूर जाताना माणसाला नेहमीच वाईट वाटते. माझे हे दुःख तशाच प्रकारचे आहे. असे दुःख वाटणे हा मानवी स्वभावच आहे. मीही माणूसच आहे. मलाही जिव्हाळे आहेत, आपुलकी आहे, वैयक्तिक संबंध आहेत. गेल्या सहा वर्षांमध्ये तुम्ही मला जिव्हाळा लावलात आणि मीही तुम्हाला जिव्हाळा लावला. छोटे छोटे काम निघाले की, तुम्ही माझ्याकडे धावत यावे. कुठे छोटासा प्रश्न उभा राहिला की, मी तेथे धावत जावे. तुम्ही माझ्याकडे तुमचे प्रश्न आणावेत आणि मी ते सोडविण्याचा प्रयत्न करावा. अशी आपण गेली सहा वर्षे प्रश्न मिटविण्याची जणू शर्यतच लावली होती. या सहा वर्षांच्या कालात या ना त्या कामाच्या निमित्ताने, या तुमच्या चौपाटीच्या बाळबंटापासून आमच्या कन्नमवारजींच्या चांदा जिल्ह्यातल्या वैनगंगेच्या बाळबंटापर्यंतचा सगळा महाराष्ट्र मी हिंडलो आहे, फिरलो आहे. दक्षिणेकडच्या गोव्याच्या सरहद्दीपासून ते उत्तरेच्या सातपुड्याच्या शिखरापर्यंतचा सगळा मुलूख मी अनेक वेळा पायांखाली

घातला आहे. या सर्व पायपिटीत मी तेथली जमीन पाहिली आहे, तेथली माणसे पाहिली आहेत, शेतकरी पाहिले आहेत, कामगार पाहिले आहेत, साहित्यिक पाहिले आहेत, कलावंत पाहिले आहेत, कारखानदार पाहिले आहेत, व्यापारी पाहिले आहेत, गरीब माणसे पाहिली आहेत आणि श्रीमंत माणसेही पाहिली आहेत. या सगळ्यांनी मला जीव लावला आहे. या सर्वांतून जाताना माझे मन थोडेसुद्धा हालत नाही असे मी कसे म्हणू? पण कर्तव्याची भावना जागृत असताना मनाला एक प्रकारची खंत लागली होती की, मी अद्यापि का गेलो नाही? पण दिल्लीस जाण्यापूर्वी मी कायद्याने घेतलेली येथील जिम्मेदारी पुरी करूनच मला गेले पाहिजे. त्यातून सुटका नाही. म्हणून मला थोडे येथे थांबावे लागले आहे.

उद्या सकाळी महाराष्ट्राच्या नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी होईल आणि नंतर संध्याकाळी मी दिल्लीस जाईन. म्हणजे उद्याचा सबंध दिवस मला एका अर्थाने सुट्टी आहे. गेली सोळा वर्षे मी या सरकारी कामाच्या रगाड्यामध्ये गुंतलो आहे. १९४६ साली मी तुमच्या मुंबई शहरात आलो. महाराष्ट्रातल्या एका छोट्या गावातला एक छोटासा कार्यकर्ता म्हणून मी तुमच्या शासनामध्ये सामील झालो. तेव्हापासून गेली सोळा वर्षे या ना त्या कामामध्ये मी येथे गुंतलो आहे. कधी पार्लमेंटरी सेक्रेटरी राहिलो, तर कधी मंत्री राहिलो. गेली सहा वर्षे तुम्ही मला तुमचा मुख्यमंत्री बनविले आहे. पण या सोळा वर्षांत मला सुट्टी अशी कधी मिळाली नाही. मी जेव्हा आजारी पडतो तेव्हाच मला थोडा विसावा मिळतो. उद्या सकाळी कन्नमवारजींच्या अंगावर मुख्यमंत्र्याची वस्त्रे चढली म्हणजे मी परवा सकाळी साडे नऊ वाजता दिल्लीमध्ये पुन्हा दुसरी वस्त्रे धारण करीपर्यंत मला सुट्टी आहे, मी पूर्ण मोकळा आहे; आणि सुट्टी म्हणजे कशी असते याचा अनुभव उद्या मला पहिल्याने येणार आहे.

बस. आणखी जास्त काय सांगू? महाराष्ट्राचे राज्य चांगले चालेल यात मला बिलकूल शंका नाही. तुमच्यातर्फेच जर ही नवीन जिम्मेदारी घेण्याकरिता मी चाललो आहे तर महाराष्ट्राची काळजी फक्त मलाच एकट्याला आहे असे तरी मी कशाला म्हणू? महाराष्ट्राची चिंता महा-

राष्ट्राच्या जनतेला आहे. मला अभिमान वाटतो की, महाराष्ट्राची जनता जागृत जनता आहे, प्रश्न समजणारी आहे, दिलखुलास बोलणारी आहे. आपली सगळी जिम्मेदारी सांभाळून काम करणारे येथे विचारवंत आहेत, राजकारणी आहेत आणि तसेच येथे जागृत अनुयायीही आहेत. महाराष्ट्र हे जागृत दैवत आहे. तेव्हा महाराष्ट्र चांगला चालेल याबद्दल माझ्या मनामध्ये बिलकूल शंका नाही.

आपले हे मुंबई शहर म्हणजे हिंदुस्थानची शान आहे. अलग अलग धर्मांचे, अलग अलग भाषांचे, भिन्नभिन्न विभागांचे आणि आम दुनियेतील देशांचे लोक या मुंबई शहरामध्ये येऊन राहिले आहेत. अशा या मुंबईचा मी प्रतिनिधी होतो आणि दिल्लीस गेल्यानंतरही काही अंशाने मी मुंबईचाच प्रतिनिधी राहणार आहे. देशावर ज्या ज्या वेळी संकट आले त्या त्या वेळी ही मुंबई नेहमीच आघाडीवर राहिलेली आहे आणि या वेळीही मुंबई आघाडीवरच राहील असा मला दृढ विश्वास आहे. आणि म्हणून आपण कुठल्याही धर्माचे असा, कुठल्याही पंथाचे असा, हे जे संरक्षणाचे नवीन पर्व आपल्या देशाच्या इतिहासात सुरू होत आहे असे मी मानतो, त्या पर्वाची जिम्मेदारी घेण्याकरिता आपण सर्वजण ताठ उभे राहा. म्हणजे भारतावर आलेले चीनचे हे संकट सूर्य उगवल्यानंतर ढग जसे वितळून जातात तसे, तुमच्या सामर्थ्याचा सूर्य तुम्ही उभा केल्यानंतर वितळून जाईल, बर्फासारखे वितळून जाईल. बस. मी पुन्हा एकदा आपले आभार मानतो, आपले आशीर्वाद मागतो. जाण्यापूर्वी आपल्याला मी दोन घोषणा देणार आहे त्या माझ्याबरोबर आपण म्हणा. " भारतीय सेना झिंदाबाद ", " भारतीय आझादी अमर रहे " या दोन गोष्टींची आम्हाला सतत जाणीव राहिली पाहिजे. त्यासाठी प्रत्येक माणसाने आवाज दिला पाहिजे. जो आवाज देणार नाही त्याला मी चीनचा दोस्त मानणार आहे. पुन्हा एकदा म्हणा " भारतीय सेना झिंदाबाद ", " भारतीय आझादी अमर रहे ".

जाहीर सभा, चौपाटी, मुंबई दि. १९-११-६२

३ संरक्षणाचा अन्वयार्थ

आज तुळजा भवानीमातेच्या दर्शनाला येत असताना माझ्या मनात काय भावना असतील याचा तुम्ही अंदाज करू शकता. परंतु केवळ माझ्या भावना प्रदर्शित करण्यासाठी मी येथे आलो नसून माझे काही विचार आपल्याला सांगावेत म्हणून मी येथे आलो आहे. माझ्या भावना नम्रतेच्या आहेत, भक्तिभावाच्या आहेत. १९५७ च्या सुरुवातीस महाराष्ट्रातल्या एका अत्यंत कठीण काळात मी असाच तुळजा भवानीमातेच्या दर्शनासाठी आलो होतो. त्यानंतर मध्येच पुन्हा एकदा भवानीमातेच्या दर्शनासाठी येऊन गेलो. पुढे स्थानांतर करून दिल्लीस गेल्यानंतर भवानी-मातेचे दर्शन घ्यावे असे बरेच दिवस उत्कटतेने माझ्या मनात वाटत होते. मनातली इच्छा अशी होती की, कुणालाही न कळविता शांतपणे देवीचे दर्शन घ्यावे व तिची मनोभावे प्रार्थना करावी. परंतु योग असा आहे की, कोठेही जावयाचे झाले तरी त्याला यात्रेचे स्वरूप येते, समारंभाचे स्वरूप येते; आणि त्यामुळे माझ्या मनातली ही भावना तशीच राहून जाते.

आपण मला आज तलवार दिली आहे आणि त्या तलवारीचा तुमच्या भावनेचे प्रतीक म्हणून मी स्वीकार केला आहे. परंतु तलवारीने लढाई जिंकावी असा काळ आज राहिलेला नाही. आजचा काळ, आजचा जमाना, आपल्या विचारांची तलवार साफ आहे की नाही, आपल्या मनातल्या भावना साफ आहेत की नाहीत, आपल्या प्रतिज्ञा साफ आहेत की नाहीत हे पाहण्याचा आहे. आजची लढाई ही विचारांची लढाई आहे, एका अर्थाने ती तत्त्वांची लढाई आहे. आपण ज्या देशाच्या रक्षणाकरिता उभे राहिलो आहोत त्या देशाचे आजचे रूप आगळे आहे, त्याच्या आजच्या आकांक्षा वेगळ्या आहेत, आणि तो देश ज्या दुनियेत जगू इच्छितो ती दुनियाही आगळी आहे, वेगळी आहे. त्या दुनियेतले प्रश्न, त्या दुनियेतले लोक, आणि त्यांच्या मागण्या व आकांक्षा यांचेही रूप पार बदलून गेले आहे. इतिहासाचा दाखला घेत घेत, वाट पुसत पुसत पुढे जावे असे सांगतात. परंतु तुम्हा-आम्हाला इतिहासाची पुनरावृत्ती करावयाची नाही. तुम्हा-आम्हाला नवीन इतिहास घडवावयाचा आहे, नवीन काळातला इतिहास घडवावयाचा आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या नवीन काळातला हा इतिहास घडविण्याचा आपण प्रयत्न करीत असताना, एक नवीन तऱ्हेचे संकट, एक नवीन तऱ्हेची जिम्मेदारी आपल्या देशावर आली आहे. चीनच्या हल्ल्यानंतर निर्माण झालेली परिस्थिती आपण सर्वजण जाणता आहात. मी तिचे जास्त वर्णन करू इच्छित नाही. परंतु एक जबरदस्त धक्का बसून देश एकदम जागा व्हावा अशा प्रकारची परिस्थिती आज आपल्या देशात दिसते आहे. स्वातंत्र्याकडे निव्वळ एक वैभवाची गोष्ट याच भावनेने आम्ही पाहावयाला लागलो होतो. परंतु हातामध्ये आलेली सत्तासुद्धा जनतेच्या सेवेकरिता घेतलेले एक व्रत आहे. या दृष्टीने सत्ता ही एक प्रकारची जोखीम बनते. पण जोखमीची वस्तू सांभाळण्याकरिता प्रसंगोपात्त जीवावरचा धोकाही पत्करावा लागतो, हा तुमचा आमचा नित्याचा अनुभव आहे. हिंदुस्थानला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर तुमचे आमचे वैभव थोडेफार वाढले. परंतु त्याचबरोबर या स्वातंत्र्याच्या रक्षणाची जबाबदारी, जी माणसे अधिकारावर

आहेत त्यांचीच केवळ नसून या देशातील प्रत्येक माणसाची ती जिम्मेदारी आहे याची जाणीव सामान्य जनतेत बऱ्याचशा अंशाने पहिल्या प्रथम चीनच्या आक्रमणानंतर निर्माण झाली. ही जाणीव लोकांमध्ये अद्यापि कायम आहे आणि ही जाणीव तुम्हा-आम्हाला कायम टिकविली पाहिजे.

या संघर्षाच्या पाठीमागे जे धोरण आहे त्याचे स्वरूप एव्हाना आपल्या लक्षात आले असेल. संरक्षण-प्रयत्न म्हणजे केवळ संरक्षणनिधी जमविणे नव्हे. तो तुम्ही देतच आहात. पण निव्वळ संरक्षणनिधी मागण्यासाठी मी येथे आलो नाही. तो आपण दिला नाही तरी आपल्यावर माझा रोष होणार नाही. पण मी आपणाला ही गोष्ट जरूर विचारणार आहे की, या देशाच्या संकटकाळामध्ये निर्माण झालेल्या परिस्थितीचे चित्र तुम्हाला समजले आहे की नाही? त्यामध्ये तुमचा जो हिस्सा आहे तो देण्यासाठी तुमच्या मनाची तयारी झाली आहे की नाही? माझ्या मते हा फार महत्त्वाचा प्रश्न आहे. याचा अर्थ प्रत्येक माणसाला रणांगणावर जाऊन उभे राहावे लागेल असा नाही. परंतु आज देशाच्या संरक्षणाच्या प्रयत्नामध्ये प्रत्येक माणसाने सैनिकासारखे काम केले पाहिजे. हातामध्ये बंदूक घेऊन लढणारा सैनिक किंवा विमानातून आपले लक्ष्य टिपणारा वैमानिक हे देशाच्या रक्षणाच्या कामामध्ये जितकी महत्त्वाची कामगिरी बजावतात तितकीच महत्त्वाची कामगिरी या देशातला प्रत्येक माणूस, या देशातली प्रत्येक स्त्री आणि पुरुष बजावू शकतो असा आताचा जमाना आहे; आणि ही जाणीव तुम्हा-आम्हाला या देशामध्ये निर्माण केली पाहिजे, दृढ केली पाहिंजे.

आणखी एकदोन महत्त्वाच्या गोष्टी मी आपल्यासमोर ठेवतो. आपल्या देशावर चीनने केलेले हे आक्रमण म्हणजे या देशामध्ये आम्ही आजपर्यंत जी मूल्ये वाढविली, त्या मूल्यांवरच एक प्रकारे झालेले हे आक्रमण आहे. निव्वळ एक देश जिंकून तो आपल्या ताब्यात घ्यावा एवढाच उद्देश या आक्रमणामागे नव्हता, तर त्याहीपेक्षा, काही विशिष्ट विचार आमच्यावर लादावेत अशा तऱ्हेची भावनाही त्याच्या पाठीमागे होती. आपण हिंदुस्थानची नव्याने रचना करीत होतो म्हणजे एक

प्रकारच्या नवीन तत्त्वांची वाढ आपण आपल्या देशामध्ये करीत होतो. आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण वेगवेगळी भाषिक राज्ये उभी केली. या भागामध्ये आपण महाराष्ट्राचे राज्य उभे केले, तिकडे कर्नाटक उभा राहिला, कुठे गुजराथ उभा राहिला, कुठे बंगाल उभा राहिला. या सगळ्या राज्यांमार्फत आपल्या देशामध्ये एक प्रकारचे नवीन जीवन निर्माण करण्याची आपण खटपट करीत होतो. पण आज एकदम हे संकट आमच्यावर आल्यामुळे आमचा तो प्रयत्नच मुळी आता संकटामध्ये सापडतो की काय ही धास्ती निर्माण झाली आहे. पूर्वी आम्ही विचार करीत होतो की, जलसिंचन योजनांची कामे पार पाडावीत, शिक्षणाचा जोरात प्रसार करावा, उद्योगधंद्यांची वेगाने वाढ करावी. पण आज असा विचार मनात येतो की, ही कामे थोडी मागे पडली तरी चालतील, परंतु सैन्याची शक्ती वाढविण्याचे काम आधी केले पाहिजे. एक प्रकारे आमच्या देशाची प्रगती साधण्याचा आमचा जो प्रयत्न आहे, त्या प्रयत्नावरच चीनने हा हल्ला केला आहे. हिंदुस्थानला एक प्रकारच्या आर्थिक अडचणीत टाकावे, आणि हिंदुस्थान ज्या लोकशाहीच्या मार्गाने प्रगती करण्याचा प्रयत्न करतो आहे त्या प्रयत्नालाच एक मोठा धक्का द्यावा हा या चीनच्या आक्रमणापाठीमागचा हेतू आहे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे गेली पंधरा वर्षे आपण या हिंदुस्थानमध्ये शांतता राखण्याचा जो प्रयत्न केला त्यामागे फार महत्त्वाचे तत्त्व आहे, हे मी आपणांस सांगू इच्छितो. लढाईकरिता लढाई हा विचार मानवजातीच्या प्रगतीचे लक्षण आहे असे मी मानीत नाही. प्रसंग पडला तर छाती पुढे काढून, मान ताठ ठेवून, प्राण जाईपर्यंत लढले पाहिजे आणि समोरून चालून येणाऱ्या शत्रूचा निःपात केला पाहिजे. परंतु समोर शत्रू नसेल तेव्हा आपली सर्व शक्ती, आपला सर्व निर्धार, जनसेवेचे व्रत हातात धरून, जेणे करून जनतेचे कल्याण साधेल अशा प्रकारचे सामर्थ्य वाढविण्याच्या कामी आपण लावला पाहिजे. अशा प्रकारचा प्रयत्न आपण हिंदुस्थानात गेली पंधरा वर्षे करीत होतो. आम्हाला शांतता हवी होती. नुसत्या हिंदुस्थानातच नव्हे तर सबंध दुनियेमध्ये आम्हाला शांतता

हवी होती, आजही हवी आहे. शांतता असल्याशिवाय देशाची प्रगती करण्याची आम्हाला संधीच मिळणार नाही. चोरीमारीचे, जाळपोळीचे अस्थिर वातावरण निर्माण झाले, तर खेड्यामध्ये शेती करणारा शेतकरी शेती करू शकत नाही, व्यापार करणारा मनुष्य व्यापार करू शकत नाही. प्राथमिक मूलभूत स्वरूपाची प्रगती करण्याचा प्रश्न या देशात अडून पडलेला होता. ते काम करण्याची संधी आम्हाला मिळालीच नाही. पण पंडित नेहरूंच्या अत्यंत शहाणपणाच्या धोरणामुळे गेली पंधरा वर्षे या देशाला शांतता लाभली आणि आम्ही आमच्या देशाची काहीशी प्रगती करू शकलो. त्यात आमचा जो एक विचार होता त्याचा मी आजही उल्लेख करू इच्छितो. स्वतःचे रक्षण करण्यासाठी हिंदुस्थानला शेवटी स्वतःच्याच सामर्थ्यावर अवलंबून राहावे लागेल. अर्थात जे कोणी आमचे मित्र असतील त्यांची आम्ही जरूर मदत घेऊ. अमेरिकेने आम्हाला मदत दिली त्याबद्दल त्यांना धन्यवाद ! आणखीही मदत मागू. पण ती मदत घेत असताना आमच्या तत्त्वाचा, आमच्या स्वाभिमानाचा आम्ही विक्रय करणार नाही.

हिंदुस्थानचे रक्षण करावयाचे म्हणजे काय करावयाचे ? हिंदुस्थानचे रक्षण करावयाचे याचा अर्थ फक्त आमच्या नागरिकांचे रक्षण करावयाचे एवढाच नाही. हिंदुस्थानचे रक्षण करावयाचे याचा अर्थ हिंदुस्थानने ज्या नवीन तत्त्वांची जोपासना केली, ज्या तत्त्वांच्या जोरावर आपले स्वातंत्र्य उभे केले, ती तत्त्वे आणि ते स्वातंत्र्य यांचेही आम्हाला रक्षण करावयाचे आहे. प्रसंग पडला तर आमच्या प्राणांची किंमत देऊनही आम्हाला ही जबाबदारी पार पाडली पाहिजे. पंडित नेहरूंनी कुठल्याही गटात सामील न होण्याचे एक स्वतंत्र तत्त्व या दुनियेमध्ये निर्माण केले. मी तर असे सांगत असतो की, चीनने हिंदुस्थानवर केलेले हे आक्रमण म्हणजे एका अर्थाने आंतरराष्ट्रीय क्षेत्रातले आमचे जे अलिप्ततावादाचे धोरण आहे त्या अलिप्ततावादाच्या धोरणावर केलेले आक्रमण आहे. चीनची अशी इच्छा आहे की, आम्ही एक तर अमेरिकेच्या गोटात जाऊन बसावे किंवा एक तर चीनच्या गोटात जाऊन बसावे. आम्ही अलिप्त राहता कामा

नये; आमच्या अकलेने आम्ही दुनियेच्या प्रश्नांकडे पाहता कामा नये. सर्वंध प्रश्नाचे मूळ जर कुठे असेल तर ते हे आहे. चीनला सर्व हे शस्त्राच्या मदतीने घडवून आणावयाचे आहे. आमच्या काही मित्रांचा आग्रह आहे की, आम्ही आमचे धोरण सोडून द्यावे. मला वाटते चीनला यापेक्षा अधिक चांगल्या प्रकारे आपण मदत करू शकणार नाही.

या देशातील लोकशाहीचे रक्षण करून समाजवाद निर्माण करण्याचा आमचा निर्धार आहे. या लोकशाहीचे, समाजवादाचे आणि आमच्या परंपरांचे रक्षण करणे हाच खरा हिंदुस्थानच्या रक्षणाचा अर्थ आहे; आणि म्हणून मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे आजची ही जी लढाई आहे ती आगळी लढाई आहे, तत्त्वांची लढाई आहे, नवीन निर्धाराची लढाई आहे.

तुम्ही आम्ही आज ज्या भारतात राहतो आहोत तो विसाव्या शतकातला भारत आहे. तुमचे आमचे प्रश्न आज पार बदललेले आहेत. परंतु तुळजा भवानीमाता आमच्या आधी जन्माला आलेली असून आमच्यानंतरही राहणार आहे. अनंत काळपर्यंत राहणार आहे. तिने या काळातही आम्हाला आशीर्वाद द्यावेत अशी तिला मी प्रार्थना केली आहे. या महाराष्ट्राच्या भूमीवर तुळजा भवानीमातेचा वरदहस्त असून तिच्या आशीर्वादाने अनेक कर्तबगार माणसांना यश लाभले आहे. पण आज मी माझ्या एकट्याकरिता यश नाही मागितले. मला आणखी काय यश पाहिजे आहे ? मी फक्त एकच मागणे देवीला मागितले की, भारतीय जनतेचे हे राज्य चिरकाल टिकावे व त्याकडे कुणाचीही वाकडी नजर फिरता कामा नये, अशा प्रकारची परिस्थिती ज्यायोगे निर्माण करता येईल असे सामर्थ्य आमच्या मनामध्ये दे, आमच्या मनगटामध्ये दे. मला विश्वास आहे की, आपण कार्यतत्पर राहिल्यास आपल्याला हे सामर्थ्य प्राप्त होईल. कारण भारतावर आजपर्यंत अनेक आक्रमणे आली आणि गेली. पण भारत स्वतःचे तत्त्व आणि सत्त्व घेऊन अचल उभा राहिला आहे. महाराष्ट्रावर झालेल्या आक्रमणांचा इतिहास माझा तोंडपाठ आहे. महाराष्ट्रावर आक्रमण करणाऱ्यांपैकी एका जबरदस्त आक्रमकाला तुळजा-

पूरच्या भवानीमातेने कायमच्या वास्तव्यासाठी मराठवाड्यातच थोडीफार जागा दिलेली आहे. तेव्हा आक्रमणाची मला भीती वाटत नाही. पण भीती वाटते ती एवढीच की, तुमचे आमचे मन दुबळे बनेल की काय? तुमचे आमचे मन दुफळीने फुटून जाईल की काय? ते होता कामा नये. एवढी शक्ती जर आपण या महाराष्ट्रामध्ये आणि भारतामध्ये निर्माण करू शकलो तर दुनियेतल्या तोफांची, विमानांची किंवा ॲटम बॉंबची शक्तीच काय पण इतर कोणतीही शक्ती हिंदुस्थानचा पराभव करू शकणार नाही असा माझा विश्वास आहे. बस. आपण इतक्या प्रेमाने येथे जमलात, उन्हातान्हात थांबलात, याबद्दल तुमचा मी अतिशय आभारी आहे. महाराष्ट्रातल्या जनतेची आठवण हीच माझी रोजची प्रार्थना असते. दिवसाची सुरुवात तुमच्या सगळ्यांच्या आठवणीने होते. तुमच्या सगळ्यांच्या या आठवणीत तुमची शक्ती मला प्रतीत होते. तुमची ही शक्ती, तुमचे हे आशीर्वाद आज भारताच्या सेवेसाठी मला उपयोगी पडोत अशी पुन्हा एकदा प्रार्थना करतो आणि माझे भाषण पुरे करतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७५७२५ वि: निबंध
क्रमांक २११६ नों: दि: २१/३/७१

जाहीर सभा, तुळजापूर, दि. २३-४-६३

४ संरक्षणाची मूलसूत्रे

गेले दोन दिवस मी आपल्या मराठवाड्याच्या दौऱ्यावर आहे. अनेक ठिकाणी अनेक लोकांना भेटलो, अनेकांशी बोललो; आणि आज आपल्या शहरामध्ये आल्यानंतर, जरूर आपल्यापुढे हजेरी दिली पाहिजे या भावनेने मी येथे आलो आहे. आपण येथे जे मोठ्या प्रेमाने माझे स्वागत केले त्याबद्दल मी आपल्या सर्वांचे पहिल्या प्रथम आभार मानतो.

संरक्षणाच्या प्रश्नासंबंधाने गेले सहा-सात महिने या देशामध्ये इतके बोलले गेले आहे, इतके लिहिले गेले आहे, की त्यासंबंधाने काही नवीन सांगण्यासारखे नाही. तरी पण या प्रश्नासंबंधीचा एक विशिष्ट दृष्टिकोण आपल्यापुढे मांडण्याची आज जरूर गरज आहे. तो म्हणजे सबंध देशाच्या दृष्टीने संरक्षणाच्या प्रश्नाकडे कसे पाहिले पाहिजे हा होय. संरक्षणाची तयारी करणे म्हणजे निव्वळ निधी जमा करणे नव्हे. हे काम आपण करीतच आहोत. बीड जिल्ह्यामध्ये आणि उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये मी गेलो असताना मला निधी अर्पण करण्यात आला. आज आपल्या जिल्ह्याने मला येथे निधी अर्पण केला. निधी जमविण्याचे हे कार्य

ठिकठिकाणी होऊन राहिले आहे. या कामी कलाकार श्रम घेत आहेत, गरीब मनुष्य आपल्या परीने मदत करतो आहे, ज्याला जे जे सुचेल ते ते तो करतो आहे. संरक्षणाच्या प्रश्नाची तीव्र जाणीव लोकांच्या मनामध्ये निर्माण झाली आहे, याचा हा एक उत्तम पुरावा आहे. पण एवढेच काम पुरेसे नाही. कारण निव्वळ पैशाने लढाई जिंकता आली असती तर शस्त्रांचे कारखाने काढण्याऐवजी आपण टांकसाळीच काढल्या असत्या. कारण ते पुष्कळच सोपे आहे. पण निव्वळ पैशाने शस्त्रे पैदा होत नसतात. संरक्षणाच्या पाठीमागचा हा दृष्टिकोण आपण समजावून घेणे अत्यंत आवश्यक आहे. संरक्षण ही काही तात्पुरती गोष्ट नाही हे आता स्पष्ट झाले आहे. संरक्षण ही एक महत्त्वाची समस्या आहे आणि तिच्याशी प्रत्येक व्यक्तीचा संबंध आहे, हे आपल्याला समजले पाहिजे. संरक्षण ही गोष्ट अशी नाही, की शेजाऱ्याचे गेले तर मला काय त्याचे? देशाच्या स्वातंत्र्यावर जेव्हा गदा येते, संकट येते, तेव्हा तुम्ही आम्ही सर्व, निव्वळ आपल्या स्वाभिमानाच्या दृष्टीनेच नव्हे, तर तुमच्या आमच्या सौख्याच्या दृष्टीने, तुमच्या आमच्या भवितव्याच्या दृष्टीने संकटात सापडलो आहोत असा त्याचा अर्थ होतो; आणि म्हणून संरक्षणाच्या पाठीमागे ज्या महत्त्वाच्या गोष्टी आहेत त्या आपण समजावून घेतल्या पाहिजेत.

हिंदुस्थानवर आज हे जे आक्रमणाचे संकट आलेले आहे त्यातून एक चांगली गोष्ट निघाली आहे. ती अशी की, या संकटामुळे आपला संबंध देश खऱ्याखुऱ्या अर्थाने एकरूप झाला आहे. तुम्हाला आठवत असेल की, गेल्या वेळी याच बागेमध्ये सरदार पटेल यांच्या पुतळ्याच्या उद्घाटन-प्रसंगी बोलत असताना संबंध भाषणभर मी तुमच्यापुढे राष्ट्रीय एकात्मते-संबंधी बोलत होतो. सप्टेंबरमध्ये ही लढाई सुरू झाली. त्याच्या जरा अगोदर म्हणजे ऑगस्ट महिन्यामध्ये या देशातील अतिशय जबाबदार माणसे राष्ट्रीय एकात्मतेबद्दल चिंता करीत होती. मी त्या वेळी देशातल्या दोन-चार समित्यांवर काम करीत होतो. मद्रासकडे, आसामकडे सर्वत्र हिंडत होतो. विभागाविभागांचे वाद चालले होते, भाषाभाषांचे वाद चालले होते, मागासपणाचे वाद चालले होते. त्या वेळी आपण सर्व एक राष्ट्र

म्हणून वागण्याऐवजी भाषेच्या अभिमानाने, धर्माच्या अभिमानाने, विभागाच्या अभिमानाने, एकमेकांपासून फुटून निघतो की काय अशा प्रकारची चिंता निर्माण झाली होती. परंतु पुष्कळ वेळा विचार करून समजत नाही, ते अनुभवाने सिद्ध होते. या बाबतीतही तसेच घडले. पण त्याबद्दल आपण चीनला धन्यवाद दिले पाहिजेत! चीनने आमच्यावर आक्रमण करताच संबंध देशातील जनता एकमनाने, एकमुठीने या देशाच्या रक्षणाकरिता उभी राहिली. हा एक नवीन अनुभव आला. हिंदुस्थानच्या एकतेचा हा नवीन अनुभव म्हणजे तुमच्या आमच्या जीवनातली सगळ्यात मोठी शक्ती आहे. आपल्याला संरक्षणाची आता जी तयारी करावयाची आहे ती केवळ एक वर्षासाठी नाही, पाच वर्षांसाठी नाही किंवा दहा वर्षांसाठीही नाही; तर हिंदुस्थानचे स्वातंत्र्य अबाधित व कायम राहावे म्हणून कित्येक वर्षे सातत्याने आपणांस ही तयारी करावी लागणार आहे. संरक्षणाचा मूळ पाया जर कुठला असेल तर या देशातल्या प्रत्येक माणसाच्या मनात आपल्या देशाच्या स्वातंत्र्याबद्दल असलेले जाज्वल्य प्रेम, जाज्वल्य भक्ती हा आहे. कितीही संकटे आली, कितीही आपदा आल्या, कितीही विकट प्रश्न निर्माण झाले तरीही या जाज्वल्य देशप्रेमातून निर्माण झालेली आपली राष्ट्रीय एकता आपण टिकविली पाहिजे; अखंडित, अबाधित राखली पाहिजे. आज आपणांपुढे पुष्कळच प्रश्न आहेत— विकासाचे प्रश्न आहेत, भाषांचे प्रश्न आहेत, विभागांचे प्रश्न आहेत; आणि अशाच प्रकारचे अनंत प्रश्न असेच सतत निर्माण होत राहणार आहेत. परंतु या सर्व प्रश्नांच्या पाठीमागे देशाच्या एकतेची जी भावना आहे ती तुम्हा-आम्हाला कायम ठेवली पाहिजे, टिकवली पाहिजे. या भावनेला थोडासाही का होईना तडा गेला आहे असे ज्या दिवशी शत्रूला वाटेल त्या दिवशी या देशावर पुन्हा निश्चित संकट येईल हे आपण समजले पाहिजे.

पुष्कळ वेळा लोक विचारीत असतात की, चीन आपल्या देशावर चाल करून आला काय आणि पुन्हा परत गेला काय? हे सर्व कसे घडले? कोणती कारणे होती त्यामागे? अनेक कारणे आहेत त्यामागे. लष्करी कारणे आहेत, राजकीय कारणे आहेत. परंतु माझ्या मते या

सर्वांत एक मूलभूत कारण आहे. कम्युनिस्ट आक्रमण जेव्हा सुरू होते तेव्हा ते आक्रमित देशाच्या लष्करी शक्तीचा सतत अंदाज घेत असते. परंतु याहीपेक्षा अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्या देशावर हे आक्रमण झालेले असेल त्या देशातील जनताच मुळी वेकीने, आपसातील अंतर्विरोधामुळे बंड करून उठेल असा या आक्रमकांचा अंदाज असतो, अपेक्षा असते; आणि या अपेक्षेप्रमाणे बंड झाले म्हणजे आपल्याला अनुकूल असलेल्या पक्षाला आपल्या काखोटीत मारून आपल्या योजनेप्रमाणे त्या देशात राज्य निर्माण करावयाचे आणि मग परत फिरावयाचे असा या आक्रमकांचा मामला असतो. इतिहासाचा हा दाखला आहे. चीनने आपल्यावर आक्रमण केले त्या वेळी त्यानेसुद्धा आपल्या मनाशी असाच काही हिशेव केला असला पाहिजे. चीनने असा विचार केला असावा, की या देशात वेकीची भावना आहे. तेव्हा आपण आक्रमण केल्यास गडबड होऊन आपले हस्तक बंड पुकारून उठतील अशीच काहीशी त्याची अपेक्षा असावी. परंतु या देशात तसे काहीच घडून आले नाही. उलट ज्या वेगाने चीनच्या सैन्याने हिंदुस्थानच्या भूमीवर आक्रमण केले, त्याच वेगाने या देशाच्या जनतेतील एकतेची भावना दृढ होत गेली. माझ्या मते चीन परत जाण्याचे हे एक मुख्य कारण आहे. ही एकतेची भावना हीच तुमची आमची खरी शक्ती आहे. ती या देशाच्या संरक्षणाच्या सर्व शक्तीचा मूळ पाया आहे. या देशाच्या एकतेचे, स्वातंत्र्यप्रियतेचे हे सामर्थ्य तुम्हा-आम्हाला कायम ठेवले पाहिजे. एवढेच नव्हे तर ते सतत वाढत राहिले पाहिजे. ही अत्यंत मूलभूत गोष्ट ज्या क्षणी आम्ही विसरू त्या क्षणी या देशाच्या संरक्षणाचा मूळ पायाच तुम्ही आम्ही उखडून टाकला असा त्याचा अर्थ होईल. तेव्हा ही महत्त्वाची गोष्ट आपण कधीही नजरेआड करता कामा नये.

यानंतर दुसरी एक मूलभूत गोष्ट मी आपणांस सांगू इच्छितो. १९४७ साली आपण स्वतंत्र झालो. आपण स्वतंत्र झाल्यानंतर आपल्या आजूबाजूची ज्या नव्या घटना घडल्या आहेत त्या आपण समजून घेतल्या पाहिजेत. स्वतंत्र हिंदुस्थानाबरोबरच पाकिस्तानचीही निर्मिती झाली.

त्यानंतर १९४८–४९ मध्ये आपल्या शेजारच्या चीनमध्ये मोठी थोरली क्रांती झाली आणि कम्युनिस्ट राजवटीने सबंध चीनचा तावा घेतला. साठसत्तर कोटी लोकांचा हा अवाढव्य देश लष्करी पद्धतीने चालणाऱ्या एका राजवटीच्या नियंत्रणाखाली गेला. आपल्या देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने ही एक अत्यंत महत्त्वाची घटना घडली. आपल्या शेजारी लष्करी पद्धतीने विचार करणाऱ्या हुकूमशाहीची ही एक अत्यंत जबरदस्त अशी शक्ती निर्माण झाली. या अतिशय महत्त्वाच्या गोष्टीचा तुम्हा-आम्हाला विचार करणे भागच होते. परंतु १९४७ साली जेव्हा आपला देश स्वतंत्र झाला तेव्हा या देशामध्ये अपरंपार अंतर्गत प्रश्न पडून राहिलेले होते. या देशात शेकडो संस्थानिक होते. त्यांचा प्रश्न होता. त्याचप्रमाणे निरनिराळ्या जातीजमातींचे, निरनिराळ्या राज्यांचे शेकडो अंतर्गत प्रश्न पडून होते. तुमच्या हैदराबादचा प्रश्न पडून होता, गोव्याचा प्रश्न पडून होता. या देशासाठी लोकशाहीची घटना तयार करावयाची होती. अशा प्रकारचे गुंतागुंतीचे शेकडो प्रश्न आपल्यापुढे होते. अशा परिस्थितीत आर्थिक दृष्ट्या अतिशय अविकसित असलेल्या या देशाच्या जीवनात एक प्रकारची शक्ती निर्माण व्हावी म्हणून या देशात शांतता नांदली पाहिजे आणि त्याच्या आवतीभोवतीही शांतता राहिली पाहिजे, अशा प्रकारचे धोरण स्वीकारणे आपल्याला प्राप्त होते. देशाच्या कल्याणाच्या दृष्टीने ते अत्यंत आवश्यकही होते. स्वतंत्र झाल्याबरोबर आम्ही आमच्या घरचे मालक झालो या भावनेने म्यानातली तलवार बाहेर काढून ती आम्ही आमच्या अंगाभोवती फिरवीत राहिलो असतो तर आमच्या आवतीभोवती आम्ही असंख्य शत्रू निर्माण केले असते. तेव्हा तसे काही न करता मानवजातीच्या कल्याणासाठी आणि आमच्या स्वत:च्याही कल्याणासाठी आम्हाला दुनियेमध्ये शांतता हवी असे आम्ही जाहीर केले; आणि म्हणून आम्ही कुणाशी वैर करू इच्छित नव्हतो. पाकिस्तानशी, चीनशी, रशियाशी, इंग्लंडशी, अमेरिकेशी, कुणाशीही आम्ही वैर करू इच्छित नव्हतो. त्यामुळेच आपण सर्वजण भाई भाई म्हणत होतो. चिनी हिंदी भाई भाई, रूसी हिंदी भाई भाई, इंग्रज हिंदी भाई भाई, अमेरिकन हिंदी भाई भाई, पाकिस्तानी हिंदी भाई

भाई, सगळेच भाई भाई. तेव्हा शांततेचे धोरण ठेवून इतर देशांशी देवाणघेवाण करावी, त्यांची मदत आपण घ्यावी, आपली मदत त्यांना द्यावी, उद्योगधंदे काढावेत, शिक्षण वाढवावे, नाना तऱ्हेच्या योजना पार पाडाव्यात असा आम्ही उपक्रम सुरू केला. देशात आणि देशाबाहेर शांततेचे वातावरण असले तरच प्रगतीचे काम करता येते अशी आमची धारणा होती. शांततेच्या आपल्या या नीतीमुळे गेल्या पंधरा वर्षांमध्ये आपण या देशात पुष्कळच प्रगती करू शकलो.

पण आपण पुष्कळ प्रगती करू शकलो असे जे मी आता म्हणालो त्याचा अर्थ आपण नीट समजावून घ्या. पुष्कळ लोकांची अशी समजूत आहे की, अशा प्रकारच्या प्रगतीपेक्षा आपण जास्त सैन्य ठेवले असते तर अधिक बरे झाले असते; आणि नेमका येथेच या प्रगतीचा संरक्षणाच्या प्रश्नाशी संबंध येतो. आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, निव्वळ परेड करणारे सैन्य म्हणजे संरक्षणाची तयारी नव्हे. आजकालची लढाई ही एक जबरदस्त गोष्ट आहे. जुन्या काळी आपल्याकडे सैन्याचे तांडेच्या तांडे असत. तरीही आमच्या देशावर जी आक्रमणे झाली त्या आक्रमणात आमचा पराभव झाला. त्याचे मुख्य कारण असे आहे की, दुनियेमध्ये नवीन आक्रमक शस्त्रांची जी वाढ होत गेली तिकडे आमचे दुर्लक्ष झाले. मोगल बादशहा बाबर ज्या वेळी या देशावर चाल्ून आला त्या वेळी या देशात मोठमोठे रजपूत, शीख आणि इतर राजे होते, आणि त्यांच्याजवळ मोठमोठी सैन्येही होती. तरीही बाबराने त्या सर्वांचा लढाईत पराभव केला. याचे कारण काय? याचे खरे कारण बंदुकीची दारू वापरून लढाई करण्याचे नवीन शास्त्र बाबर आपल्याबरोबर घेऊन आला हे आहे; आणि म्हणून आमचा पराभव झाला. आज तर या शास्त्रात प्रचंड स्थित्यंतर घडून आलेले आहे. आजकालची लढाई म्हणजे निव्वळ माणसांच्या बळाची लढाई नाही. निव्वळ माणसांचेच बळ म्हटले तर चीनजवळ सत्तर कोटी आणि आमच्याजवळ पंचेचाळीस-पन्नास कोटी मनुष्यबळ आहे. म्हणजे आम्ही असे गृहीत धरावयाचे की काय की सत्तर कोटींचा हा देश नेहमीच आपल्या चाळीस कोटींचा पराभव करणार

आहे ? तसे असते तर चार-पाच कोटींची लोकसंख्या असणाऱ्या इंग्लंडने आमच्यावर इतका काळ कसे राज्य केले ? तेव्हा खरी गोष्ट ही आहे की, ही जी शक्ती आहे ती केवळ मनुष्यबळाची शक्ती नसून ती शस्त्रास्त्रांची शक्ती आहे. ही शक्ती, हे सामर्थ्य एका अर्थाने देशाच्या संरक्षणाची नवीन तऱ्हेची यंत्रणा आहे. परंतु या सामर्थ्याची वाढ देशाची तांत्रिक आणि आर्थिक प्रगती झाल्याशिवाय होऊच शकत नाही. काही लोक म्हणत असतात की, आम्ही पंचवार्षिक योजना पार पाडीत राहिलो आणि संरक्षणाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले. पण त्यांच्या हे लक्षात येत नाही की, या पंचवार्षिक योजनांमुळे आम्ही जी काही तांत्रिक आणि औद्योगिक प्रगती आमच्या देशामध्ये केली त्यामुळे या पंधरा वर्षांच्या काळात, संरक्षणाची तयारी करणाऱ्या यंत्रणेचा पाया आम्ही अधिक बळकट करीत गेलो. त्यामुळेच प्रसंग आल्यावरोबर आम्ही आमची शक्ती एक प्रकारच्या आत्मविश्वासाने वापरू अशा तऱ्हेचा विश्वास आमच्या मनामध्ये निर्माण होऊ शकला. तेव्हा आपण लक्षात ठेवले पाहिजे की, संरक्षणाची तयारी करणे याचा खरा अर्थ आमच्या देशाच्या आर्थिक आणि तांत्रिक प्रगतीची गती वाढविणे हा आहे.

आमच्यावर चीनचा हल्ला झाला त्यापूर्वीच्या दुनियेचे चित्र, एका वाजूला कम्युनिस्ट जग, दुसऱ्या वाजूला पश्चिमी जग आणि तिसऱ्या वाजूला आम्ही अलिप्त राहिलेली नवीन राष्ट्रे असे होते. आज त्यामध्ये फरक पडलेला आहे. कारण असे की, चीन आणि रशिया ही जरी कम्युनिस्ट राष्ट्रे असली तरी जबरदस्त शक्ती असणारी ही राष्ट्रे शेजारी शेजारी आहेत, आणि त्यांच्यामध्ये एक प्रकारची स्पर्धा निर्माण झालेली आहे. या स्पर्धेचे स्वरूप तरी कसे आहे पाहा. रशियाने आपल्या देशात प्रचंड प्रगती करून लोकांचे जीवनमान वाढविलेले आहे, साधनसंपत्ती वाढविलेली आहे आणि त्याचवरोवर युद्धाच्या दृष्टीने लागणाऱ्या नवीन सर्वनाशक शस्त्रांचा प्रचंड साठाही त्याने करून ठेवलेला आहे, तरीही नुसत्या तत्त्वाच्या आणि मोठेपणाच्या नादी लागून युद्ध केल्यास या युद्धात आपलाही संपूर्ण विध्वंस होईल यावद्दल त्याच्या मनात शंका नाही. याचे कारण त्याचा प्रतिस्पर्धी-

सुद्धा तितकीच जबरदस्त शस्त्रास्त्रे असणारा देश आहे. त्यामुळे ज्या युद्धामध्ये स्वतःचा सर्वनाश होईल अशा युद्धात उतरण्यास आज रशियाची तयारी नाही; आणि नेमकी हीच गोष्ट चीनला नामंजूर आहे. रशिया युद्धात उतरला नाही तर चिनी लोक आहेत तसेच रशियाच्या पाठीमागे राहतील, त्यांना त्यांच्यापुढे जाण्याची कधीच संधी मिळणार नाही, अशी चीनची भावना आहे. दुसरी गोष्ट म्हणजे युद्ध झाल्याशिवाय जगामध्ये कम्युनिझमची वाढ होत नाही असे त्यांच्या परात्पर गुरूने त्यांना शिकविलेले आहे. शिवाय त्यांची लोकसंख्या इतकी वाढलेली आहे की, नुसत्या कम्युनिझमने त्यांचा प्रश्न सुटणार नाही. वाढणाऱ्या लोकसंख्येसाठी त्यांना आणखी मुलूख पाहिजे आहे. दक्षिणेकडे समुद्र पाहिजे आहे, बाजारपेठा पाहिजे आहेत. नवीन वेगळ्या तऱ्हेचा विस्तारवादी असा हा दृष्टिकोण आहे. चीनच्या आकांक्षा वाढत चालल्या आहेत हेच त्याचे कारण आहे. त्यामुळे कम्युनिस्ट गटामध्ये आज सरळ सरळ उघड उघड दोन पक्ष आहेत. युद्ध झाले पाहिजे, युद्ध होणे महत्त्वाचे आहे असे मानणारा चीनचा एक पक्ष, आणि हे तत्त्व मंजूर वा नामंजूर असणारा, परंतु युद्धामुळे आज दुनियेचाही फायदा नाही आणि आपले तर सगळ्यात मोठे नुकसान आहे या जाणिवेमुळे, तुम्हीही राहा आणि आम्हीही राहतो, तुम्हीही जगा आणि आम्हीही जगतो, अशा तऱ्हेने विचार करणारा रशियाचा दुसरा पक्ष. रशियाने आज हे धोरण स्वीकारलेले आहे. अशा परिस्थितीत काही माणसे विचारीत असतात की, आपल्या अलिप्ततावादाचा काय अर्थ आहे ?

हिंदुस्थानने अलिप्ततावादाचे जे धोरण स्वीकारलेले आहे त्याचा अर्थ आम्ही नवीन अस्पृश्यता निर्माण केली आहे असा नाही. तुम्ही आमच्या देशात येऊ नका आणि आम्ही तुमच्या देशात येणार नाही असा त्याचा अर्थ नाही. आज दुनियेमध्ये जे दोन प्रमुख गट आहेत, त्यांतील काही राष्ट्रे एकमेकांशी लष्करी कराराने बांधली गेली आहेत. करार अशा प्रकारचा की, एक राष्ट्र संकटात सापडले म्हणजे करारातल्या दुसऱ्या राष्ट्रांनी त्याच्या मदतीसाठी धावून जावयाचे. पण आमचे म्हणणे फक्त

एवढेच आहे की, आम्हाला सगळ्या राष्ट्रांची दोस्ती पाहिजे आहे, मैत्री पाहिजे आहे, परंतु कुणाच्याही लष्करी करारामध्ये सामील होण्याची आमची इच्छा नाही. अलिप्ततावाद सोडून द्या असे जे म्हणतात त्यांच्या म्हणण्याचा सरळ आणि साफ अर्थ असा आहे की, आज रशियाची आणि आपली जी मैत्रीची भूमिका आहे ती आपण सोडून द्यावी आणि रशियाला आपला विरोधक समजून दुसऱ्या गटामध्ये आपण आपल्याला बांधून घ्यावे. चीनला नेमके हेच हवे आहे. हिंदुस्थानवर चीनचे जे आक्रमण झाले, त्याच्या मुळाशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हेही एक कारण असण्याचा संभव आहे. रशिया सांगत असतो की, अलिप्ततावादी राष्ट्रे ही पुरोगामी राष्ट्रे आहेत. एवढेच नव्हे तर तो त्यांच्याशी मैत्री ठेवू इच्छितो. याउलट अलिप्ततावादी राष्ट्रे ही अलिप्त राहता कामा नयेत अशी चीनची विचारसरणी आहे. त्याच्या दृष्टीने एक तर ती अमेरिकेच्या गटात गेली पाहिजेत किंवा ती चीनची गुलाम तरी बनली पाहिजेत. याशिवाय तिसरा रस्ताच राहत नाही. दुनियेचे सरळ दोन भाग व्हावयास पाहिजेत. एक भाग कम्युनिस्ट दुनिया आणि दुसरा विगरकम्युनिस्ट दुनिया. या आग्रहामध्ये आज चीन पडलेला आहे. याला रशियाचा विरोध असेल तर तो मानण्यास चीन तयार नाही. चीनच्या या आक्रमणात रशिया काय करतो हेही कदाचित चीनला पाहावयाचे असेल. हाही या आक्रमणामागचा एक हेतू असण्याचा संभव आहे. तेव्हा या सगळ्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपण आपल्या अलिप्ततेच्या धोरणाचा अर्थ नीट समजून घेतला पाहिजे.

आपली आर्थिक प्रगती आणि आपले संरक्षण हे दोन्ही प्रश्न एकमेकाशी संलग्न आहेत एवढेच नव्हे तर ते या अलिप्ततेच्या धोरणाशी अत्यंत निगडीत आहेत. आर्थिक प्रगतीच्या सगळ्या क्षेत्रांत शिरल्याशिवाय हिंदुस्थानच्या संरक्षणाची तुम्हा-आम्हाला तयारी करताच येणार नाही. संरक्षणमंत्री म्हणून जर मला देशाचे रक्षण करावयाचे असेल, तर त्यासाठी निव्वळ लक्षावधी माणसे उभी करून भागणार नाही. देशासाठी आपल्या प्राणांची आहुती देण्यास तयार असणाऱ्या या वीर माणसांच्या केवळ त्यागाने देशाचे संरक्षण करता येणार नाही. त्यासाठी आधुनिक

तन्हेच्या नवीन शस्त्रास्त्रांची आपणांस बांधणी करावी लागेल, जबरदस्त विमानदल उभारावे लागेल. विमानदल म्हणजे नुसती विमाने नव्हेत. विमानदलाला अत्याधुनिक अस्त्रे लागतात, अत्याधुनिक यंत्रसामग्री लागते, त्याचप्रमाणे खास शिकवून तयार केलेले शेकडो तज्ज्ञ वैमानिक लागतात. हजारो तज्ज्ञ यंत्रज्ञ लागतात. त्यांच्यातील प्रत्येकजण एकेका विषयाचा तज्ज्ञ असतो. वैमानिक फक्त विमान चालवू शकतो. परंतु विमानतळावर आणि विमानात असणाऱ्या तंत्रज्ञांच्या मदतीशिवाय वैमानिकाची स्थिती एखाद्या आंधळ्यासारखी होईल. तेव्हा या प्रत्येक गोष्टीत आपणांस आपली पात्रता वाढवावी लागेल. समुद्राचे रक्षण करावयाचे असेल तर आपल्याजवळ पहिल्या प्रतीचे नौदल असले पाहिजे. पण नौदल तयार करावयाचे म्हणजे साध्या बोटी बांधून चालत नाही. त्याही आज आधुनिक तन्हेच्या शस्त्रास्त्रांनी सुसज्ज असाव्या लागतात. हे सर्व उसनवारीने आणून राष्ट्राचे स्वातंत्र्य राखले जात नाही. स्वातंत्र्याचे रक्षण करण्याकरिता लागणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या निर्मितीचे सामर्थ्य दुसऱ्याकडे आणि स्वातंत्र्याची मालकी फक्त आमच्याकडे. अशाने स्वातंत्र्याचे रक्षण होत नाही. एवढेच नव्हे तर ते स्वातंत्र्यही खरे नव्हे. आमच्या देशाचे रक्षण करण्याकरिता दुसऱ्यांची सतत मदत घ्यावी लागणार असेल तर पुष्कळ वेळा मनात विचार येतो की, आम्ही इंग्रजांना या देशातून घालवले तरी कशाकरिता? आम्ही फक्त स्वातंत्र्याचे नाममात्र मालक बनावयाचे आणि दुसऱ्यांना देशाच्या रक्षणासाठी बोलवावयाचे असे आम्ही आमच्याकडे पूर्वी केले आहे. तैनाती फौजांचा इतिहास हा एक मोठा विलक्षण इतिहास आहे. पूर्वीच्या राजांना आपली राज्ये सांभाळता येत नव्हती, त्यांचे रक्षण करता येत नव्हते. पण गादी तर राहिली पाहिजे. मग ही संरक्षणाची मक्तेदारी—कॉन्ट्रॅक्टस्—त्यांनी इंग्रजांना आणि फ्रेंचांना दिली. पण या मक्तेदारांनी विचार केला की, हे लोक बावळे आहेत. करार करून राज्याचे रक्षण करण्याची मक्तेदारी जर हे आपल्याला देत आहेत तर मग यांची राज्येच का नाही आपण आपल्या ताब्यात घेऊ? त्यांनी हे फार थोड्या काळात करून दाखविले आणि ते हिंदुस्थानचे मालक बनले. आपण यापासून बोध घेतला पाहिजे.

आपल्याला या देशाच्या स्वातंत्र्याचे रक्षण करावयाचे असेल तर स्वातंत्र्याच्या रक्षणाकरिता लागणारी सगळी साहित्यसामग्री निर्माण करण्याचे शास्त्र, संघटना आणि साहित्ययोजना आपणास आपल्या देशातच तयार करावी लागेल. त्याशिवाय आपल्या स्वातंत्र्याला फारसा अर्थ राहणार नाही. मी हे आपल्याला अगदी साध्या शब्दांत सांगण्याचा प्रयत्न करतो आहे. या देशाच्या आर्थिक आणि तांत्रिक प्रगतीची वेगवान तयारी करणे हाच आपल्या संरक्षणाचा अत्यंत मूलभूत प्रश्न आहे. काही लोक सांगत असतात की, तूर्त हे सर्व बंद ठेवा. या देशात विद्युत्प्रकल्पांचे जे काम चालले आहे, जलसिंचन योजनांचे जे काम चालले आहे, रेल्वेच्या विकासाचे जे काम चालले आहे, किंवा विकासाची जी इतर कामे चालू आहेत यांपैकी कोणते काम आपण बंद ठेवणार आहात? उद्या अन्नधान्य कमी पडू लागले म्हणजे आपण युद्धसाहित्य मिळविणार की अन्नधान्याची आयात करीत बसणार? रेल्वेमार्ग नसला तर आपण हालचाली कशा करणार? विद्युत्-निर्मिती झाली नाही तर आपली औद्योगिक आणि तांत्रिक प्रगती कशी होणार? तेव्हा विकासाचे कोणतेही काम आपण बंद ठेवले तर त्यातून संरक्षणाला धोका निर्माण होईल, हे आपण विसरता कामा नये.

औरंगाबाद जिल्ह्यातील माझ्या मित्रांनो, तुळजापूरकर मित्रांनी एक भली मोठी तलवार काल मला मोठ्या प्रेमाने नजर केली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. ही तलवार मोठ्या अभिमानाने मी माझ्याजवळ ठेवणार आहे. माझ्या कुटुंबातल्या वारसांना मला दुसरे काही ठेवता आले नाही तरी तुळजापूरकरांनी दिलेली ही तलवार एक मोठा वारसा म्हणून ते मोठ्या अभिमानाने आपल्याजवळ बाळगतील व तिची मोठ्या आदराने पूजा करतील. पण ही पूजेची वस्तू झाली. त्यामुळे ही लढाई जिंकता येणार नाही. एक साधा सैनिक लढत ठेवावयाचा असेल तर त्यासाठी आज किती गोष्टींची गरज लागते याची आपल्याला नीटशी कल्पना नसेल. सैन्याच्या एका डिव्हिजनमध्ये किती सैनिक असतात? सामान्यतः अठरा ते वीस हजार सैनिकांची एक डिव्हिजन असते. या अठरा ते वीस हजार सैनिकांची ज्या ठिकाणी छावणी असते त्या ठिकाणी अठरा ते

वीस हजार माणसांचे एक नवीन शहरच वसते. पण सैन्य नुसते हवा खाऊन राहत नाही. या अठरा-वीस हजार सैनिकांच्या जेवणाची व्यवस्था करावी लागते, त्यांना लागणारे सामान आणण्याची, त्यांना लागणारा दारूगोळा, हत्यारे पोचविण्याची व्यवस्था करावी लागते, आजारी सैनिकांचे औषधपाणी करावे लागते. थोडक्यात म्हणजे ते एक संपूर्ण नवीन जीवनच बनते. त्यांना साहित्य पोहोचविणारा ड्रायव्हर, त्यांना माहिती पुरविणारा सिग्नलमन, त्यांचा संपर्क साधणारा तंत्रज्ञ, त्यांना सतत मदत करणारा वैमानिक वगैरे असंख्य लोकांची ती एक सबंध नवीन दुनियाच बनते. नवीन युद्धशास्त्रात ही सगळी शास्त्रे इतकी झाली आहेत की त्यांच्या हिशेबात एक मिनिटाचीही चूक झाली तर त्याचे प्रायश्चित्त सगळ्यांना भोगावे लागते. तेव्हा या सर्व गोष्टी तुम्हा-आम्हाला कार्यक्षमतेने पार पाडावयाच्या असतील तर या देशाच्या आर्थिक प्रगतीचे जे तत्त्व आपण स्वीकारले आहे, त्या तत्त्वाचा आपल्याला त्याग करता येणार नाही. ज्या दिवशी ह्या तत्त्वाचा आपण त्याग करू त्या दिवशी देशाच्या संरक्षणाच्या प्रश्नाची धूळधाण होईल हे आपण नक्की समजा. माझ्या या सगळ्या म्हणण्याचा सारांश असा की, देशाची अंतर्गत आर्थिक नीती, देशाची परराष्ट्रनीती आणि देशाची संरक्षणनीती ही परस्परावलंबी असतात, एवढेच नव्हे तर राष्ट्रीय नीतीच्या एकाच सूत्राची ही केवळ वेगवेगळी रूपे असतात. कुठल्याही देशाची संरक्षणनीती अलग, परराष्ट्रनीती अलग आणि अंतर्गत आर्थिक नीती अलग अशी परिस्थिती निर्माण झाली म्हणजे त्या देशाचे भवितव्य धोक्यात येते. याच तीन सूत्रांवर आजपर्यंत या देशाचा राज्यकारभार चालला आहे, या देशाच्या प्रगतीचे काम चालले आहे. ही त्रि-सूत्री आपण या देशाच्या संरक्षणाची महत्त्वाची नीती मानली पाहिजे. देशाच्या एकतेच्या दृष्टीने आणि समाजवादाच्या दिशेने खंबीरपणे वाटचाल करण्याच्या दृष्टीने, देशाची तयारी करणे आणि देशाच्या आर्थिक प्रगतीचा प्रयत्न करणे ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. त्याचबरोबर यातून निर्माण होणाऱ्या समर्थ्याच्या आधारे संरक्षणाची तयारी करीत राहणे हीही तितकीच महत्त्वाची गोष्ट आपण समजली

पाहिजे.

कोठल्याही देशाच्या संरक्षण योजनेमध्ये बाहेर न दिसणारे असे जे काम एका बाजूस चाललेले असते, ते म्हणजे वैज्ञानिकांचे. वैज्ञानिक लढाईवर जात नाहीत, की खांद्यावर बंदुका घेऊन परेड करताना दिसत नाहीत. काहीशा अंधाऱ्या पण शांत अशा प्रयोगशाळेत ते प्रयोग करीत बसलेले असतात. रशिया आणि अमेरिका आज पहिल्या प्रतीची राष्ट्रे झाली. ती निव्वळ तेथल्या राज्यकर्त्यांच्या हुषारीमुळे नव्हे. या राज्यकर्त्यांनी ज्या धोरणांचा अवलंब केला त्यांची या राष्ट्रांना जरूर मदत झाली असेल. परंतु या सगळ्याच्या पाठीमागे नवीन शस्त्रास्त्रांचा शोध लावण्यासाठी ज्यांनी आपल्या जीवाचे रान केले असे शेकडो वैज्ञानिक आज त्या देशांमध्ये आहेत. त्यांच्यामुळेच अणुबॉम्बचा शोध लागला. ज्या शास्त्रज्ञाने हा शोध लावला त्याने लक्षावधी सैनिकांपेक्षा जास्त महत्त्वाची कामगिरी बजावली आणि आपल्या देशाचे सामर्थ्य वाढविले. आपल्या देशाचे सामर्थ्य ज्यायोगे वाढेल अशा प्रकारचे काम यापुढे आपल्या देशातील शास्त्रज्ञांकडून व्हावयास पाहिजे; आणि मी आपल्याला सांगू इच्छितो की, अशा तऱ्हेचे संघटित प्रयत्न या देशातील शास्त्रीय क्षेत्रात सुरू झालेले आहेत. त्याला फळे येण्यास अद्यापि काही काळ लागेल. पण कोणत्याही प्रकारची घबराटीची भावना निर्माण न करता आपणांस जे ठिकाण गाठावयाचे आहे त्यासंबंधी आपले मन निश्चित करून, स्थिर करून त्या मार्गाने जाण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.

चीनच्या मनात या देशासंबंधी विरोधी भावना आहे ही उघड गोष्ट आहे. आजपर्यंत आम्ही समजत होतो की, सर्व दुनियेत आमचे मैत्रीचे संबंध आहेत, आणि म्हणून ही मैत्रीची भावना वाढविण्याचेच आम्ही सगळीकडे प्रयत्न करीत गेलो. पण आजपर्यंत ज्याला आम्ही मित्र मानले त्यानेच आपणहून आपला डाव आज मोकळा केला आहे. त्याच्या हातातला पत्ता आता आम्हाला समजला आहे. तो सांगत असे की, माझ्या हातात मैत्रीचा पत्ता आहे. म्हणून आम्हीही आमच्या हातात मैत्रीचा पत्ता धरून होतो. आता त्याने आपल्या हातातला पत्ता उघडा केला आहे. त्या

पत्त्यावर मैत्री लिहिलेली नाही. त्या पत्त्यावर समशेर कोरलेली आहे, बंदूक कोरलेली आहे, आक्रमण रेखाटलेले आहे. आता आम्हाला पूर्वीच्या मैत्रीच्या पत्त्याऐवजी शस्त्रास्त्रांचा पत्ता आमच्या हातामध्ये घेतला पाहिजे. पण आमच्या हातात मैत्रीचा पत्ता होता म्हणजे बावळटपणाचा पत्ता होता असे समजण्याचे कारण नाही. आमची नीती, फुलासारखे वागतील त्यांच्याशी फुलासारखे वागावयाचे आणि वज्रासारखे वागतील त्यांच्याशी वज्रासारखे वागावयाचे, ही आहे. पण मुद्दामहून वैराची नीती अंगीकरणे ही शहाणपणाची गोष्ट आहे असे मी मानीत नाही. तुमचा आमचा वारसा वैराच्या नीतीचा नाही, आणि त्याबद्दल आम्हाला अभिमान आहे. आमची परंपरा ही शूरांची परंपरा आहे. कोणी चढाईची भाषा केली, कोणी वैराची भाषा केली, तर त्या चढाईच्या आणि वैराच्या भाषेला तितक्याच वळकट हातांनी उत्तर दिल्याशिवाय हिंदुस्थान राहणार नाही, अशा हिंमतीने आज आम्ही काम करू इच्छितो. माझी स्वतःची तशी उमेद आहे.

आर्थिक प्रगतीच्या बाबतीत इतर देशांचीही आम्हाला मदत लागेल. ती आम्ही मागतोच आहोत. पण काश्मीरचा तुकडा कापून द्या मग मदत मिळेल, असे जर कोणी म्हणत असेल तर तसला सौदा करण्यास हिंदुस्थान तयार नाही. ज्यामुळे अपमान होईल, अभिमान तुटून जाईल, दडपणाखाली वागावे लागेल अशा प्रकारची कोणतीही गोष्ट हिंदुस्थान करणार नाही. दडपणाखाली काम करण्याची नीती टाकून देणे म्हणजेच आमच्या दृष्टीने अलिप्ततावाद होय. ज्यांची मदत हवी आहे त्यांची आम्ही मदत घेऊ. विचारांची, शस्त्रास्त्रांची, ज्ञानाची देवाणघेवाण आम्ही करू, आमचे सामर्थ्य वाढविण्याचा आम्ही प्रयत्न करू. पण आमच्या सामर्थ्याचे रक्षण करण्याच्या दृष्टीने मूळ गोष्ट जर कोणती असेल तर ते तुमचे आमचे राष्ट्रप्रेम ही आहे, आणि त्यावर माझा जबरदस्त विश्वास आहे. हा एक नवीन हिंदुस्थान घडलेला आहे. आजचा हिंदुस्थान हा पंचवीस वर्षांपूर्वीचा हिंदुस्थान नसून तो नवीन हिंदुस्थान आहे. बदललेल्या हिंदुस्थानचे हे चित्र तुमच्या आमच्या मनासमोर सतत दिसले पाहिजे. पूर्वी आपल्या देशामध्ये अनेक सैन्ये होती. रजपुतांची होती, शिखांची होती, मराठ्यांची

होती, मुसलमानांची होती आणि पठाणांचीही होती. पण ही सैन्ये एकमेकांच्या विरुद्ध लढली. कधी शिखाशिखांच्यात झगडा, कधी रजपुता-रजपुतांच्यात झगडा, कधी शीख-रजपुतांच्यात झगडा, कधी मराठा-मुसलमानांच्यात झगडा असे या लढायांचे स्वरूप होते. पण शीख, रजपूत, मराठे, पठाण, बंगाली, पंजाबी, गुजराथी, कानडी, तामिळी— थोडक्यात सर्वच्या सर्व भारतीय एकमुखाने हिंदुस्थानच्या रक्षणासाठी रक्त सांडण्याकरिता आज पहिल्यानेच एकत्र येऊन उभे राहिले आहेत. हा हिंदुस्थान नवीन आहे. पंधरा वर्षांत निर्माण झालेला हा हिंदुस्थान आहे. आणखी पाच-पंधरा वर्षे आपली शक्ती वाढविण्यासाठी त्याला मिळाली तर या हिंदुस्थानकडे वाकड्या नजरेने पाहण्याची कोणाची हिंमत होणार नाही.

यापुढील दहा-पंधरा वर्षांचा काळ हा हिंदुस्थानच्या जीवनातील एक अत्यंत जोखमीचा काळ आहे, जबाबदारीचा काळ आहे. या काळात या देशातील तुम्ही-आम्ही माणसे किती समजूतदारपणाने पावले टाकतो, किती गतीने पावले टाकतो यावर या देशाचे भवितव्य अवलंबून आहे. आमच्या कामाची गती आज पुष्कळच कमी आहे. ती फार जलद वाढली पाहिजे. आमच्या प्रगतीमध्ये जेवढा जीव यावयास पाहिजे तेवढा तो अद्यापि आलेला नाही. काम कमी आणि माणसेच जास्त अशी आज स्थिती आहे. परंतु पाच-पंधरा वर्षांत आम्ही हा वेग वाढवू शकलो आणि औद्योगिक व तांत्रिक क्षेत्रात आम्ही झपाट्याने प्रगती करू शकलो तर मला वाटत नाही की, जगातील कोणताही देश मग तो सत्तर कोटी लोकांचा असो वा शंभर कोटी लोकांचा असो, या देशावर अन्याय करू शकेल, आक्रमण करू शकेल.

या देशावर आजपर्यंत अनेक आक्रमक आले. आम्ही फुटून राहिलो आणि काही वेळा आक्रमकांनी आम्हाला पराभूतही केले. पण या देशाने आपली परंपरा कधी सोडली नाही. आम्ही लढतच राहिलो. हिंदुस्थानची परंपरा ही चितोडची परंपरा आहे, जोहाराची परंपरा आहे. राणा प्रताप पराभूत झाल्यानंतर चितोडमधून बाहेर पडला, रानावनात राहिला, पण गुलाम होण्याचे त्याने कधीही मान्य केले नाही. महाराष्ट्राचा इतिहासही

हीच गोष्ट सांगतो. डोंगराडोंगरांतून, खिंडीखिंडींतून आणि छोट्या छोट्या किल्ल्याकिल्ल्यांतून आम्ही लढलो, गनिमी काव्याने शेकडो वर्षे लढत राहिलो. शिखांचाही हाच इतिहास आहे. तो आत्मयज्ञाचा इतिहास आहे. देशाभिमानाने प्रेरित होऊन सरहद्दीच्या रक्षणाकरिता शिखांनी आपल्या पोटची मुले बलिदान केली आहेत. अशी ही आमची बाणेदारपणाची, आत्मयज्ञाची, बलिदानाची परंपरा आहे. जे आक्रमक येथे आले त्यांना आमच्याशी समरस तरी व्हावे लागले किंवा खुषीने येथून निघून तरी जावे लागले. आज या हिंदुस्थानमध्ये एका जमातीचे, एका धर्माचे राज्य नाही. या देशातल्या चाळीस कोटी जनतेचे हे राज्य आहे. हे राज्य टिकले पाहिजे, राहिले पाहिजे, अशा उमेदीने या देशातील जनता आज उभी राहिली आहे. या जनतेच्या स्वातंत्र्याकडे कोणीही सहजासहजी वाकड्या दृष्टीने पाहणार नाही असा विश्वास तुम्हा-आम्हाला या देशामध्ये निर्माण केला पाहिजे. हा विश्वास संरक्षणाच्या शस्त्रागारातले अत्यंत महत्त्वाचे शस्त्र आहे हे आपण समजून घेतले पाहिजे.

संरक्षणाची ही अशी भूमिका आहे. त्यासाठी काय करावे लागेल? सगळे काही करावे लागेल. केवळ संरक्षणनिधी जमा करून सुटेल असा हा प्रश्न नाही. तुम्ही जे काम करता ते किती उत्कृष्टपणे करता याला फार महत्त्व आहे. हिंदुस्थानातील प्रत्येक मनुष्य जे काम करतो ते पहिल्या प्रतीचे घडल्याशिवाय हिंदुस्थान पुढे जाणार नाही; आणि म्हणून तुम्ही ज्या क्षेत्रात असाल त्या क्षेत्रात किती न्यायाने, प्रामाणिकपणाने आणि कार्यक्षमतेने काम करता हीच हिंदुस्थानच्या सामर्थ्याची खरी कसोटी आहे. विशेषत: तरुण पिढीने ही जिम्मेदारी ओळखली पाहिजे.

स्वातंत्र्याच्या रक्षणाकरिता पिढी कशी तयार होते? लढण्यासाठी साहसी, धाडसी वृत्तीची तर जरुरीच असते. परंतु त्याहीपेक्षा स्वत:चे जीवन त्यागाच्या तयारीने देण्याच्या आणि त्या भावनेने ते जगण्याच्या वृत्तीत खरे म्हणजे देशाच्या सामर्थ्यशाली जीवनाचे प्रत्यंतर येते. म्हणून मी आपणाला आणि विशेषत: तरुण मंडळींना सांगेन की, प्रसंग पडला तर अशा प्रकारचा त्याग करण्याची तुम्ही मनाची तयारी ठेवा.

आज मी असे पाहतो की, सैन्यामध्ये जाण्याकरिता म्हणून जी तरुण मुले येतात त्यांपैकी ऐशी टक्के मुले नाकारावी लागतात. कोणाची छाती लहान आहे, तर कोणाच्या डोळ्यांत दोष आहे, तर कोणामध्ये इतर काही न्यून आहे. म्हणजे शंभर मुलांपैकी वीस मुले चांगली म्हणून स्वीकारली जातात आणि बाकीची ऐशी मुले नाकारली जातात. याला दोन कारणे आहेत. त्यांपैकी एक कारण म्हणजे समाजाच्या सुस्थितीसाठी कमीत कमी साधनांची जी व्यवस्था व्हावयास पाहिजे ती अद्यापि आपल्याकडे झालेली नाही. पण त्याला दुसरेही कारण आहे. आपल्याकडे चांगल्या प्रकारची म्हणजे शरीराने चांगली वा बुद्धीने हुषार अशी जी मुले आहेत त्यांना आपण सैन्यात गेले पाहिजे अशी अद्यापि तळमळ नाही. चांगला डॉक्टर होण्याची अगर चांगला इंजिनियर होण्याची शक्यता असेल तर मग सैन्यात जाच का? खेड्यापाड्यामध्ये सुद्धा सरपंच होण्याची शक्यता असेल तर मग कशाला जा सैन्यात? असा हा साधा सरळ हिशेब आहे. याचे मुख्य कारण म्हणजे सैनिकाकडे पाहण्याची आमची दृष्टीच फार चमत्कारिक आहे. मला माझ्या लहानपणची एक आठवण येते. मी माझ्या गावी होतो. गावात पंचायत भरली होती. गावातील चांगली प्रतिष्ठित वडीलधारी माणसे जमली होती. गावातलाच काही स्थानिक प्रश्न होता. चर्चा चालली होती. हे काम या पद्धतीने करावे की त्या पद्धतीने करावे यासंबंधी. आमच्या गावात लष्करातून जाऊन आलेला एक मनुष्य होता. पेन्शन घेऊन आला होता. म्हातारा होता. गावातलाच तो. त्याला वाटले आपणही काही बोलले पाहिजे. म्हणून तो उठून उभा राहिला आणि तो काही बोलणार इतक्यात गावचा जो पुढारी होता तो म्हणाला, 'कोण रे तू? अरे तू तर फलटनवाला. तुला काय समजणार या गावच्या गोष्टी? बैस खाली.' म्हणजे फलटनवाला हा निरुपयोगी मनुष्य असतो असा आमचा समज झाला आहे.

खेड्यापाड्यांतील माणसांसंबंधी असाच अनुभव इतर प्रकारेही येतो. खेड्यातील एखाद्या माणसाला तीन-चार मुले असली आणि त्याला मुलांसंबंधी आपण विचारले तर तो काहीसे असे उत्तर देतो, 'मोठा मुलगा

हुषार आहे, चलाख आहे. त्याला कॉलेजात शिकायला पाठविले. चांगला शिकून तयार होईल असे वाटते. नंबर दोन शरीराने चांगला आहे. त्याला पहिलवान करायचे ठरविले आहे. चांगला खुराक देतो त्याला खायला. नंबर तीन जरा ढोक्याने असाच आहे. त्याला शेती करायला दिली आहे.' म्हणजे ज्याला शरीराची ताकद नाही आणि बुद्धीची ताकद नाही त्याने शेतीत राहिले पाहिजे असा आमचा हिशोब. कशी सुधारणार आमची शेती? संबंध देशाची शक्ती ज्या शेतीवर अवलंबून आहे तीत काम केले पाहिजे मात्र कनिष्ठ माणसाने. हे असे कसे चालणार? संरक्षणाचा प्रश्न महत्त्वाचा आहे, आद्य प्रश्न आहे. पण सैन्यात जावयाचे कोणी? तर ज्यांना नेहमीच्या दैनंदिन जीवनामध्ये कोठे वाव नाही त्यांनी. अशाने देशाची प्रगती होणार नाही, देश पुढे जाणार नाही. आपल्यातील हुषार, कर्तबगार तरुणांनी देशासाठी कराव्या लागणाऱ्या त्यागाचा आपला वाटा उचलला पाहिजे. मी आपल्याला एक जुनी गोष्ट सांगतो. १९४२ सालच्या चळवळीच्या वेळी आमच्या भागामध्ये म्हणजे मी ज्या भागातून आलो आहे त्या भागामध्ये चळवळ फार जोरात सुरू होती. तेव्हा या चळवळीमध्ये पुढारी कोणी व्हावयाचे अशी आमच्यामध्ये एकदा चर्चा निघाली. फार सोपी गोष्ट होती. वर्तमानपत्रांतून ज्याचे नाव छापून येत असे तो पुढारी होत असे. पण १९४२ मध्ये वर्तमानपत्रांत नाव छापून येत नव्हते. त्या चळवळीचे स्वरूपच निराळे होते. मग पुढारी व्हावयाचे कोणी? तेव्हा अशी कसोटी निघाली की, मरण्यासाठी जो तयार असेल त्याने पुढारी व्हावे. पण हे फार अवघड असे काम होते. आज तुम्ही आम्ही हे काम करण्यास तयार आहोत काय? उत्कृष्ट हुषार मुलगा, कर्तबगार मुलगा सैन्यात जाणार नसेल तर गावामध्ये संरक्षणाच्या कामाला महत्त्व आहे अशी प्रवृत्ती निर्माण होणार कशी? ज्याच्या घरात पन्नास शंभर एकरांची जमीन आहे, ज्याच्या घरात चांगला व्यापार चाललेला आहे, ज्याच्या घरात चांगली प्रॅक्टिस चाललेली आहे त्याचा मुलगा त्या त्या गोष्टींतच लक्ष घालणार आणि ज्याच्या घरामध्ये काही नाही, त्याचा मुलगा लढाईवर जाणार. कशी चालणार अढाई अशाने?

आता वेळ अशी आलेली आहे की, ही सर्व मूल्ये बदलली पाहिजेत, आपली दृष्टी बदलली पाहिजे. दान द्यावयाचे असेल तर ते उत्कृष्ट गोष्टींचे द्यावे लागते. देशासाठी द्यावयाचे दानही असेच असले पाहिजे. नको असलेली गोष्ट दान देणे, याला दान म्हणत नाहीत. वडील वारले किंवा आई वारली म्हणजे आपल्याला सर्वांत प्रिय असलेली वस्तू त्यांच्याकरिता सोडावयाची अशी आपल्यामध्ये पद्धत आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी यज्ञ योजिला आहे असे जर आपण मानीत असाल तर या यज्ञात आहुती उत्कृष्ट गोष्टींची दिली पाहिजे. अशा प्रकारची आपल्या मनाची तयारी असली पाहिजे. हा मनाचा प्रश्न आहे. म्हणून जी तरुण मुले असतील, जी वीस-बाविशीतील मुले असतील, त्यांची अशी भावना असली पाहिजे की, ही तर देशाची हाक आहे, ही तर मर्दुमकीची वेळ आहे. ह्या वेळेला मला गेलेच पाहिजे, त्यासाठी माझी तयारी आहे. याचा अर्थ सगळ्यांनाच सैन्यात जागा आहे असा नाही. परंतु तुमची वृत्ती काय आहे, तुमची भावना काय आहे, तुमचे मन काय आहे, ही महत्त्वाची गोष्ट आहे. विशेषत: तरुणांकडून मी अशी अपेक्षा करतो की, देशाच्या संरक्षणाच्या प्रश्नासंबंधी त्यांच्या प्रेरणा कोणत्या असल्या पाहिजेत याची त्यांना जाणीव आहे. तशी त्यांना जाणीव असेल तर मी म्हणेन, की देशाच्या संरक्षणाचा प्रश्न त्यांना बरोबर समजलेला आहे.

गेल्या दहापंधरा वर्षांमध्ये आपल्या देशात आपण जी परराष्ट्रनीती आणि जी अंतर्गत आर्थिक नीती स्वीकारली आहे ती या संरक्षणाच्या तयारीची मूळ पावले आहेत. ही मूलभूत भूमिका आहे. ती टाकून देऊन अमेरिकेशी मैत्री केली असती तर आम्ही वाचलो असतो असे काही मंडळींना वाटते. पण हा वेडेपणा आहे. माझी अमेरिकेबद्दल काही तक्रार नाही. चँग-कै-शेकच्या मदतीला अमेरिकाच होती, कोरियामध्ये अमेरिकाच होती आणि व्हिएटनाममध्येही आता अमेरिकाच आहे. पण काय घडले आणि काय घडते आहे हे आपण पाहतोच आहोत. भाडोत्री सैन्याच्या मदतीने आणि दुसऱ्याकडून उधारीने घेतलेल्या मदतीवर काही छोट्या मोठ्या गरजा भागतात, पण देशाचा संसार चालविता येत

नाही. तुम्ही-आम्हीसुद्धा खाजगी जीवनात उधारउसनवारीने मागून आणतो. पण केव्हा? कधी एखाद्या वेळी अडले म्हणजे. पण सारखा उसन वारीने संसार चालला तर तो फार दिवस टिकत नाही. हिंदुस्थानातील चाळीस कोटी जनतेच्या स्वातंत्र्याचा संसार आपणास उभा करावयाचा असेल तर तुमची आमची शक्ती काय आहे व ती कशी वाढेल याचा विचार प्रथम झाला पाहिजे; आणि म्हणून आमची जी मूलभूत भूमिका आहे ती बरोबर आहे अशी आमची धारणा आहे. त्यासाठी मदतीची जरुरी असेल तर ती मदत आम्ही मागितली पाहिजे आणि आम्ही ती मागतोही आहोत. पण त्यासाठी अलिप्ततेचे धोरण सोडण्याचे काय कारण? आम्ही अमेरिकेकडे मदत मागतो आणि जरूर असेल तर रशियाकडेही मदत मागतो. यामध्ये नुकसानीची अशी कोणती गोष्ट आहे? तेव्हा मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपल्या देशाचे नेते पंडित जवाहरलालजी यांनी जी मूलसूत्रे सांगितली, ती खंबीर आहेत, निश्चित आहेत. त्यासंबंधी मनामध्ये तसूभर शंका निर्माण झाली तर संरक्षणाची फळी तेवढी दुबळी झाली असा त्याचा अर्थ होईल. म्हणून पंडितजींनी सांगितलेल्या या त्रिसूत्रीवर आपण मनापासून विश्वास ठेवला पाहिजे. त्यासंबंधी तुमचे जे वैयक्तिक कर्तव्य असेल, जी जबाबदारी असेल ती पार पाडण्याची तुम्ही तयारी ठेवली पाहिजे. तशी तयारी तुम्ही ठेवलीत तर तुम्ही हिंदुस्थानच्या संरक्षणाचे खरे शिपाई बनलात असे मी समजेन. आपण या खऱ्या अर्थाने देशाचे शिपाई बना अशी आपल्याला प्रार्थना करून मी माझे हे भाषण संपवितो.

जाहीर सभा, औरंगाबाद, दि. २६-४-६३

५ आमचे हुकमी पत्ते

कामगार भागामध्ये येऊन मी सत्कार घ्यावा अशी आपली फार दिवसांची इच्छा होती. पण मी सामान्यतः सत्काराला घाबरतो. कारण लोकांकडून हारतुरे घ्यावेत असे काही घडले नसताना त्यांच्याकडून अशा प्रकारचा सत्कार करून घेण्यात मला फारसा आनंद वाटत नाही. पण आपल्याशी बोलण्याची, आपल्याला मनातल्या चार गोष्टी सांगण्याची माझी बऱ्याच दिवसांची इच्छा होती. म्हणून मुंबईस दिवाळीच्या निमित्ताने माझ्या आईस भेटण्यासाठी आलो असताना आपल्यालाही या शुभ प्रसंगी भेटण्याची संधी साधावी या भावनेने मी आज येथे आलो आहे. आपल्या मनात कोणते प्रश्न आहेत याचा मला अंदाज आहे. परंतु काही महत्त्वाच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नांबाबत सध्या जी परिस्थिती आहे तिच्यासंबंधी आपल्याशी बोलण्याचे मी ठरविले आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रात सध्या गोव्याचा जो ज्वलंत प्रश्न निर्माण झाला आहे त्यासंबंधीही मला थोडेसे बोलले पाहिजे. या बाबतीत मला जे काही सांगावयाचे आहे ते मी शेवटी सांगणार आहे.

आज आपला देश एका मोठ्या कठीण कालखंडातून चालला आहे. परंतु दोन दिवसांपूर्वीच आपल्या या मुंबई शहरात भारताचे मुख्य प्रधान लाल बहादूर शास्त्रीजी आले असताना आपण सगळ्यांनी त्यांच्यावर जो प्रेमाचा वर्षाव केला, तो या देशात एक नवीन विश्वास निर्माण झाल्याचा आज जो अनुभव येतो आहे त्याचे प्रतीक आहे. पंडित नेहरूनंतर या राष्ट्राचे नेतृत्व करण्यासाठी जनतेच्या भावना ओळखणारा, जनतेच्या भावना समजून घेणारा नवा नेता या कठीण काळात आम्हाला मिळाला याचा आमच्या मनाला जरूर आनंद होतो.

आपल्या राष्ट्रापुढे आज जे कठीण प्रश्न आहेत त्या सगळ्या प्रश्नांची आपण एकदा उजळणी घेतली पाहिजे. दोन वर्षांपूर्वी आपल्या देशापुढे एक नवीन प्रश्न निर्माण झाला होता. १९६२ च्या ऑक्टोबरमध्ये चीनचे आपल्या देशावर आक्रमण झाले आणि एक नवीन समस्या या देशापुढे आ वासून उभी राहिली. त्या वेळी आपल्यापुढे जे प्रश्न होते ते सोडविण्याच्या खटाटोपात आपण होतो. कोणतेही नवीन राष्ट्र उदयास येते तेव्हा त्या राष्ट्रापुढे इतिहासातून चालत आलेले, परंपरेतून निर्माण झालेले काही प्रश्न असतात. आपला हिंदुस्थान देश शेकडो वर्षे पारतंत्र्यात राहिला. या विशिष्ट परिस्थितीतून निर्माण झालेले आपले जे मूलभूत प्रश्न होते त्या प्रश्नांकडे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सावधानतेने लक्ष देऊन आपले धोरण आखण्याचा दृष्टिकोण त्या वेळच्या नेत्यांपुढे होता; आणि मी आपणाला सांगू इच्छितो की, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या मूलभूत प्रश्नांकडे पाहण्याचा जो दृष्टिकोण त्या वेळच्या नेतृत्वाने स्वीकारला त्यालाच आपण हिंदुस्थानचे धोरण मानले पाहिजे.

मूलभूत स्वरूपाचे आपले जे तीन-चार प्रश्न आहेत त्यांच्या उजळणीची आज फार गरज भासते आहे. त्यांपैकी पहिला प्रश्न म्हणजे हिंदुस्थानच्या एकतेचा प्रश्न. हिंदुस्थान हा किती विविधतापूर्ण देश आहे याची, हिंदुस्थानचे संपूर्ण दर्शन घेतले म्हणजे कल्पना येते. मी जेव्हा हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांमध्ये कामाच्या निमित्ताने हिंडू लागलो तेव्हा मला या विविधतेचा पूर्ण प्रत्यय आला. पण या सगळ्या

विविधतेतही एक प्रकारची एकतेची भावना आहे. या एकतेत मनाचा, संस्कृतीचा, परंपरेचा, सर्वांना एकत्र ठेवणारा असा एक पिंड आहे. या एकतेच्या प्रश्नावर देशाला बांधून ठेवण्याचे जे काम पूर्वी आपल्या नेत्यांनी केले त्याची आजही फार गरज भासते आहे. कारण या देशात आज प्रांतीय असा एखादा लहानसाही प्रश्न निर्माण झाला, तर आपले सगळे मूलभूत रागलोभ जागे होतात. आपल्या जीवनामध्ये, हिंदुस्थानच्या राष्ट्रीय जीवनामध्ये हे एक संकट आहे. त्याचा विचार करण्याची आज गरज निर्माण झाली आहे.

असाच दुसरा एक प्रश्न आपल्या नेत्यांनी हाती घेतला. तोही फार मूलभूत प्रश्न आहे. शेकडो वर्षे विकासाची प्रक्रिया बंद पडल्यामुळे या देशाची प्रगती होऊ शकली नाही. त्यामुळे अनेकविध प्रश्न जसे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये निर्माण झाले तसेच ते समाजाच्या जीवनामध्येही निर्माण झाले. त्यातून मार्ग काढण्यासाठी योजनेचा प्रश्न हाती घेण्यात आला. त्याचबरोबर योजनेच्याद्वारे या देशामध्ये समाजवादी समाज निर्माण करण्याचे धोरणही स्वीकारण्यात आले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हिंदुस्थानच्या विकासाच्या दृष्टीने ही दोन धोरणे जशी निश्चित करण्यात आली त्याच-प्रमाणे, स्वतंत्र हिंदुस्थानला जगातील सगळ्या देशांच्या परिवारामध्ये एक महत्त्वाचे स्थान प्राप्त झाल्यामुळे, हिंदुस्थानला आपली जागतिक नीती निश्चित करणे आवश्यक होऊन बसले; आणि ही नीती निश्चित करताना आपण जे मुख्य सूत्र म्हणून मानले ते जागतिक शांततेचे सूत्र होते.

मी ह्या सगळ्या जुन्या पण मूलभूत स्वरूपाच्या गोष्टी आपणाला विशिष्ट हेतूने सांगतो आहे. व्यक्तीच्या किंवा देशाच्या जीवनामध्ये जेव्हा संशयाचे, संभ्रमाचे, संकटाचे प्रश्न निर्माण होतात तेव्हा आपल्या मूलभूत तत्त्वांची आठवण करणे अतिशय महत्त्वाचे असते असे मी मानतो. अर्जुनाला संभ्रम निर्माण झाला त्या वेळी त्याला भगवान श्रीकृष्ण भेटले. पण तुम्हा-आम्हाला थोडेच भगवान श्रीकृष्ण भेटणार आहेत? तुमचे आमचे भगवान श्रीकृष्ण म्हणजे आपली मूलभूत तत्त्वे, आपले मूलभूत सिद्धांत. ह्या सिद्धांतांची मनाशी उजळणी करणे हा स्वत:ला मदत करण्याचा एक अतिशय चांगला

असा मार्ग आहे. मी हे आपल्याला निव्वळ काही तात्त्विक सांगतो आहे अशातला भाग नाही. मी अनेक वेळा ब्रिजच्या डावातील एक गोष्ट सांगत असतो. ब्रिजचा डाव आपण खेळता की नाही हे मला माहीत नाही. पण मी पूर्वी खेळत होतो. हातातील पानांपैकी कोठले पान टाकू, हे पान टाकू की ते पान टाकू, असा ज्या वेळी मनात संभ्रम उत्पन्न होतो त्या वेळी कोणते पान खेळावे यासंबंधी ब्रिजच्या डावामध्ये एक नियम आहे. "व्हेनेवर इन डाऊट प्ले धी ट्रम्प" असा तो नियम आहे. राजकारणामध्ये आणि देशाच्या जीवनामध्ये आपण आता काय करावे, कोणत्या तऱ्हेने पावले टाकावीत यासंबंधी जेव्हा संभ्रम निर्माण होतो तेव्हा आपण हुकमाचा पत्ता हातात घेतला पाहिजे. आणि आपला हा हुकमाचा पत्ता म्हणजे आपली मूलभूत तत्त्वे आणि आपले मूलभूत सिद्धांत. आज या देशाच्या जीवनात मनाला संभ्रमात टाकणारे अनेक प्रश्न तुमच्या आमच्यासमोर उभे राहिलेले आहेत. हे करू की ते करू, हे बरोबर होईल की ते बरोबर होईल अशा प्रकारचे चांगल्या चांगल्या माणसांच्या मनात संभ्रम निर्माण करणारे प्रश्न आज आपल्यापुढे निर्माण झालेले आहेत. अशा वेळी आपण आपल्या हुकमाचा पत्ता खेळला पाहिजे. आपल्या मूलभूत सिद्धांतांची उजळणी केली पाहिजे.

पूर्वीच्या काळी राजकारणामध्ये दोन मार्ग होते. आपले म्हणणे बरोबर असेल तर बरोबर म्हणावयाचे आणि ज्याचे म्हणणे बरोबर नाही असे आपल्याला वाटत असेल त्याला दोन शिव्या द्यावयाच्या की संपले काम. राजकारण आता एवढे सोपे राहिलेले नाही. ज्या वेळी अनेक मार्ग समोर दिसतात, आणि या मार्गाने गेलो तर मुक्कामावर पोहोचू की त्या मार्गाने गेलो तर पोहोचू असा ज्या वेळी मनात संभ्रम निर्माण होतो त्या वेळी नेमके कोणत्या मार्गाने गेले पाहिजे हे ज्याला समजेल तो नेता. नेत्याची माझी व्याख्या ही आहे. आज अशा नेतृत्वाची आपल्याला फार गरज आहे.

हिंदुस्थानने आता कोणत्या मार्गाने गेले पाहिजे हे निश्चित करण्याचा प्रश्न आज आपल्यापुढे निर्माण झालेला आहे. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात निर्माण झालेले सध्याचे वातावरण आपण पाहातच आहात. मला वाटते याच वेळी

मी आपल्यासमोर बोलावयास आलो हेच ठीक झाले. माझा रशियाचा दौरा ठरल्यानंतर मी येथे यावे अशी आपली इच्छा होती. पण त्या वेळी मी आपणाला नाही म्हटल्याचा शहाणपणा माझ्या नंतर लक्षात आला. कारण जो रशिया मी पाहून आलो तो रशिया चार आठवड्यांत पार बदलून गेलेला आहे. मी त्या वेळी आलो असतो तर रशियातील बऱ्याच गोष्टींचा खुलासा करणे मला अवघड गेले असते. दुनिया आज इतक्या वेगाने बदलते आहे, की या बदलत्या दुनियेत आपल्याला फार विचार करून पावले टाकावी लागतील. गेल्या अडीचाळीस तासांत दुनिया पुष्कळच बदललेली आहे. या बदललेल्या दुनियेतील काही गोष्टी आपल्या दृष्टीने शुभ आहेत तर काही अशुभही आहेत. यांपैकी उल्लेख करण्यासारख्या मुख्य गोष्टी म्हणजे इंग्लंडमध्ये मजूरपक्ष अधिकारावर आला, क्रुश्चेव्हची सरकारमधून बाहेर रवानगी झाली, आणि चीनने अणुबॉम्बचा स्फोट केला या होत. जगात या ज्या महत्त्वाच्या गोष्टी घडल्या, त्यामुळे एक प्रकारचा विचाराचा जो तोल असतो, परिस्थितीचा जो तोल असतो तो तोल थोडासा सुटल्यासारखी आज परिस्थिती निर्माण झाली आहे.

ही जी नवीन परिस्थिती निर्माण झाली आहे तिच्यातील दोन गोष्टींचा हिंदुस्थानशी प्रत्यक्ष संबंध आहे. एक गोष्ट आपण कबूल केली पाहिजे ती ही की, सोव्हिएट रशिया आणि हिंदुस्थान यांचे घनिष्ट मैत्रीचे संबंध आहेत. हे संबंध निव्वळ राजकारणापुरते मर्यादित नाहीत. एका राष्ट्राचा मुख्य मंत्री दुसऱ्या राष्ट्राच्या मुख्य मंत्र्याशी चांगले बोलतो यात फारसा मोठेपणा नाही. एकमेकांबद्दल चांगले बोलावेच लागते. हा व्यवहार आहे. परंतु राष्ट्रांची एकमेकांबद्दलची जी आपुलकीची भावना असते तिच्या पाठीमागे, एका देशाच्या जनतेच्या मनात दुसऱ्या देशाच्या जनतेबद्दल जी भावना असते तीच शेवटी फार महत्त्वाची असते.

रशियामध्ये संरक्षणाच्या प्रश्नाबाबत काय चर्चा झाली हा महत्त्वाचा पण अलग प्रश्न आहे. क्रुश्चेव्हचे काय धोरण होते, त्यांना का जावे लागले हा रशियाचा अंतर्गत प्रश्न आहे. पण एक गोष्ट मी आपल्याला सांगू इच्छितो की, माझ्या रशियाच्या दौऱ्यात सोव्हिएट जनतेच्या मनामध्ये

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वतंत्र.
अनुक्रम ... दिः ...
आमचे हुकमी पत्ते : ५१
९७६३०

हिंदुस्थानच्या जनतेबद्दल खऱ्याखुऱ्या अर्थाने मला प्रेम पाहावयास सापडले. तेथला सामान्य पुरुष आणि सामान्य स्त्री यांच्या नजरेत, हिंदुस्थानचा माणूस पाहिल्यानंतर एक प्रकारची चमक पाहावयास मिळते. हा जो अनुभव रशियात येतो तो फार महत्त्वाचा आहे. त्याचे कारण आपण शोधले पाहिजे. माझ्या मताने ते कारण असे आहे की, हिंदुस्थानच्या जनतेची दुनियेमध्ये एक प्रतिमा निर्माण झालेली आहे आणि ती सगळ्या देशांच्या मनापर्यंत जाऊन पोहोचलेली आहे. ती प्रतिमा ही आहे की, दुनियेतल्या मानवजातीच्या रक्षणाकरिता ज्या शांततेची गरज आहे, त्या शांततेच्या तत्त्वाकरिता तत्त्वनिष्ठेने उभा राहणारा हा देश आहे. परंतु ही शांततेची गरज त्या लोकांना जितकी पटलेली आणि समजलेली आहे तितकी ती येथल्या सर्वसामान्य माणसांना पटलेली आणि समजलेली आहे असे मला वाटत नाही. याचे कारण, युद्ध म्हणजे काय असते हे त्यांनी प्रत्यक्ष अनुभवले आहे. युद्ध ही काय चीज आहे, युद्धासाठी काय त्याग करावा लागतो, युद्धाचे काय परिणाम घडतात, याचे सामान्य स्वरूप तुम्हा-आम्हाला विचाराने कळते, पण ते आपल्या भावनेपर्यंत येऊन पोहोचलेले नाही; आणि जोपर्यंत प्रश्न भावनेपर्यंत जाऊन पोचत नाहीत तोपर्यंत ते खऱ्या अर्थाने समजून येत नाहीत असा माझा अनुभव आहे. त्यासाठी प्रश्न भावनेला जाऊन भिडावे लागतात. माझ्या समजुतीने हा शांततेचा प्रश्न, ज्या ज्या देशांकडून गेली दोन महायुद्धे खेळली गेली, त्या त्या देशांतील लोकांना जास्त चांगला समजतो. जितका तो सोव्हिएट रशियातील लोकांना समजतो तितकाच तो अमेरिकेतील लोकांनाही समजतो, असे माझे मत आहे. कारण लढाईचे परिणाम काय होतात याचा त्यांना चांगला अनुभव आहे. युरोप खंडातील लोकांनी गेल्या महायुद्धात स्वतःच्या देशाचे रक्षण करताना इंच इंच जमीन जाळून घेतलेली आहे. घराघराचा प्रतिनिधी, बाप, मुलगा, आई, सून, बहीण, भाऊ, कोणीना कोणी, या युद्धात कामी आलेला आहे. पानपतच्या लढाईनंतर महाराष्ट्रातील घराघरात त्या वेळी जो अनुभव आला असेल तशाच प्रकारचा अनुभव या सर्व देशांतील लोकांना या महायुद्धात आलेला आहे. रशियात असताना

मी लेनिनग्राडला गेलो होतो. लेनिनग्राड हे मुंबईच्या मानाने लहान शहर आहे आणि वीस वर्षांपूर्वी तर ते पुष्कळच लहान होते. त्या वेळी ते तीस एकतीस लाख वस्तीचे शहर होते. या तीस लाख वस्तीच्या शहराने जर्मनीच्या सैन्याशी नऊशे दिवस लढत दिली आणि या नऊशे दिवसांच्या लढाईमध्ये तीस लाखांपैकी सहा लाख लोक मारले गेले. किती भयानक गोष्ट होती ही, याची कल्पना तेथे गेल्यानंतर येते. या ठार झालेल्या लोकांचे व्यक्तिशः दफन करण्यास जागा नव्हती म्हणून या कामगार मैदानाच्या जवळ जवळ दुप्पट एवढ्या जागेतच या सहाच्या सहा लाख माणसांचे दफन करण्यात आले. आज तेथे त्यांचे स्मारक बांधण्यात आले आहे. मी तेथे गेलो त्या दिवशी ऐन दुपारच्या वेळी पुष्पगुच्छ व पुष्पचक्रे वाहण्यासाठी शेकडो लोकांची गर्दी त्या दफनभूमीवर जमली होती. आज काही विशेष दिवस आहे का असे मी तेथील अधिकाऱ्याला विचारता हे येथील नेहमीचेच दृश्य आहे असे त्याने उत्तर दिले. बाराही महिने रोज अशीच गर्दी तेथे होत असते. कारण लेनिनग्राड शहरातील प्रत्येक कुटुंबातला कोणीना कोणी माणूस या दफनभूमीत गाडला गेला आहे. स्वातंत्र्यासाठी इतकी जबर किंमत त्यांना द्यावी लागली. त्यामुळेच या देशातील लोकांना शांततेचे महत्त्व पुरेपूर पटले आहे; आणि म्हणून हिंदुस्थानचे शांततेचे धोरण ते बरोबर समजू शकतात. त्यांच्या बोलण्यामध्ये हिंदुस्थानसंबंधी मी जी आपुलकी पाहिली, जो जिव्हाळा पाहिला, त्या आपुलकीचा आणि जिव्हाळ्याचा अर्थ काय होता ? त्याचा अर्थ हा होता की, तुमच्या देशाने स्वीकारलेले जे राजकीय शांततेचे तत्त्व आहे ते जागतिक शांततेचे तत्त्व आहे; त्या तत्त्वासाठी तुम्ही लढता आहात म्हणजे तुम्ही तुमच्यासाठी लढता आहात असे नसून त्या तत्त्वाद्वारे तुम्ही आमच्यासाठीही लढता आहात; आमच्या कुटुंबावर येणारी जी उद्याची दुःखे आहेत ती दुःखे टाळण्याचा प्रयत्न आम्ही जितका करतो तितकाच प्रयत्न तुम्हीही करता आहात. रशियातील लोकांच्या मनात हिंदुस्थानसंबंधी जो जिव्हाळा आणि आपुलकी मला आढळली त्याचा अर्थ हा असा आहे. मानवजातीचा परस्पराशी जो संबंध जोडला गेला आहे त्यासंबंधाचे शांततेचे तत्त्व हे प्रतीक आहे.

सोव्हिएट रशियासंबंधीचा हा जो अनुभव मी आपल्याला सांगितला तोच अनुभव पंडित नेहरूंना जवळ जवळ वीस वर्षांपूर्वी अमेरिकेमध्ये आला होता. १९४८ साली पंडित नेहरू अमेरिकेचा पहिला दौरा करून परत आले त्या वेळी शिवाजी पार्कवर मुंबईच्या जनतेने त्यांचे फार मोठे स्वागत केले होते. दोन फर्लांगावर लांब उभा राहून मी त्यांचे भाषण ऐकत होतो. त्या भाषणाचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. शांततेच्या तत्त्वाच्या संदर्भात मला त्या भाषणाची नेहमी आठवण होते. ते म्हणाले होते की, अमेरिकेने माझे खूप स्वागत केले, तेथल्या पंडितांनी स्वागत केले, धनिकांनी केले, गरिबांनी केले, शास्त्रज्ञांनी केले, पुरुषांनी केले, स्त्रियांनी केले. पण पंडितजींना असा प्रश्न पडला होता की, या सर्व लोकांनी त्यांचे हे स्वागत कशासाठी केले? पंडितजी अमेरिकेत असेतोपर्यंत त्यांना या प्रश्नाचे उत्तर सापडले नाही. परंतु अमेरिकेहून परत येत असताना त्यांच्या मनात या प्रश्नाचा एकदम खुलासा झाला. अमेरिकन लोक त्यांना मान देत होते तो ते केवळ हिंदुस्थानचे मुख्य प्रधान होते म्हणून नव्हे, तर पंडितजींच्या शब्दांत त्यांना गांधीजींचा आवाज ऐकू येत होता. त्यांच्या मनात असलेले शांततेचे तत्त्व त्यांना पंडितजींच्या शब्दांत प्रतीत होत होते.

ही सर्व पार्श्वभूमी मी तुम्हाला एवढ्याकरिता सांगतो आहे की, हिंदुस्थानच्या अंतर्गत प्रश्नांचा विचार करताना या जागतिक शांततेच्या तत्त्वाकडे तुम्हा-आम्हाला दुर्लक्ष करता येणार नाही. ज्याप्रमाणे आपल्या योजनांचा विचार करताना या देशामध्ये शेवटी समाजवादी समाज निर्माण करण्याचे आपले ध्येय आहे हे आपल्याला विसरता येणार नाही, किंवा हिंदुस्थानच्या एकतेच्या प्रश्नाकडे आपल्याला दुर्लक्ष करता येणार नाही, त्याचप्रमाणे हिंदुस्थानच्या सर्व प्रश्नांचा विचार करताना जागतिक शांततेच्या प्रश्नाकडेही आपल्याला दुर्लक्ष करता येणार नाही. कारण दुनियेत शांतता असल्याशिवाय हिंदुस्थानात शांतता राहूच शकणार नाही; आणि हिंदुस्थानात शांतता असल्याशिवाय शेकडो वर्षे गरिबीचा जो प्रश्न या देशामध्ये अडून पडलेला आहे तो सुटू शकणार नाही. हा प्रश्न सोडविण्यासाठी लक्षावधी

लोकांना आपल्याला कार्यक्षम करावे लागेल. त्यासाठी प्रचंड प्रयत्न करावे लागतील, भगीरथ प्रयत्न करावे लागतील. पण या देशात शांतता नांदू शकली तरच हे प्रयत्न यशस्वी होऊ शकतील. हिंदुस्थानच्या सामाजिक आणि आर्थिक क्रांतीचा प्रश्न, हा जागतिक शांततेच्या प्रश्नाशी अतिशय एकरूप झालेला आहे, ही महत्त्वाची तात्त्विक भूमिका तुम्हा-आम्हाला नजरेआड करता येणार नाही. हिंदुस्थानच्या संरक्षणाच्या प्रश्नाची चर्चा करतानासुद्धा या जागतिक पार्श्वभूमीचा विचार आपल्या मनातून हालला तर संरक्षणाच्या प्रश्नाचा विचार आपल्याला बरोबर करता येणार नाही ही महत्त्वाची गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे.

आज जे अनेक कठीण प्रश्न हिंदुस्थानपुढे आहेत, त्यांत अन्न-धान्याचाही प्रश्न आहे. या बाबतीत राज्य सरकारे आणि हिंदुस्थान सरकार आपापल्या परीने प्रयत्न करीत आहेत. पण त्या चर्चेत मी जाऊ इच्छित नाही. एक गोष्ट मात्र खरी की, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या या सोळा-सतरा वर्षांच्या काळात प्रयत्न करूनही अन्नधान्याचा हा जो मूलभूत प्रश्न आहे तो सुटला आहे असे आपल्याला खात्रीने म्हणता येत नाही. ही वस्तुस्थिती आहे. याची कारणे काहीही असोत, पण हा प्रश्न सोडविला पाहिजे. त्याचा पूर्ण विचार झाला पाहिजे यात शंका नाही. हे जे सगळे न सुटलेले प्रश्न आहेत व जे सोडविण्याचा आपला प्रयत्न आहे, त्यांत आणखी काही गंभीर प्रश्नांची भर पडली आहे. त्यामुळे आमची जबाबदारी किती वाढते आहे ते मी आपणाला सांगू इच्छितो. हा प्रश्न तुम्ही सोडवू शकला नाही किंवा तो प्रश्न तुम्ही सोडवू शकला नाही असे केवळ बोलून हे प्रश्न सुटणार नाहीत. "अ" सरकारने हा प्रश्न सोडविला नाही किंवा "ब" सरकारने तो प्रश्न सोडविला नाही असे नुसते म्हणून प्रश्न सुटत नसतात. प्रश्न सोडविण्यासाठी त्या प्रश्नांच्या पाठीमागे गेले पाहिजे.

आज काय परिस्थिती आहे? १९६२ साली चीनचे संकट आपल्यावर आले तेव्हा आपण तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कामास सुरुवात केली होती. मला वाटते हे सगळे प्रश्न विशेषतः कामगारांना अवगत असले

पाहिजेत. आमच्यापुढे आज खरा महत्त्वाचा प्रश्न हा आहे की, प्राधान्य कशाला द्यावयाचे ? मूलभूत उद्योगधंद्यांच्या वाढीला द्यावयाचे की दैनंदिन गरजा भागविणाऱ्या वस्तूंच्या निर्मितीला द्यावयाचे ? रशियासारख्या कम्युनिस्ट देशालाही हा प्रश्न आज भेडसावीत आहे. तेव्हा देशाच्या प्रगतीसाठी योजना तयार करताना सगळ्या गोष्टींचा विचार करून आपण समतोल राखतो आहोत किंवा नाही हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. मोठ्या उद्योगधंद्यांनाही प्राधान्य दिले पाहिजे आणि दैनंदिन गरजा भागविणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनालाही प्राधान्य दिले पाहिजे. दोन्ही प्रकारच्या या उद्योग-धंद्यांमध्ये तोल साधण्याचा आपण आपल्या पंचवार्षिक योजनांत प्रयत्न करतो आहोत. हे प्रश्न किती गंभीर आहेत, किती कठीण आहेत हे आपल्याला समजावे आणि त्याचे महत्त्व आपल्या लक्षात यावे एवढ्या-करताच मी या गोष्टींचा आपल्यापुढे उल्लेख केला.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेची करोडो रुपयांची जिम्मेदारी आपल्या खांद्यावर घेऊन ती पार पाडण्याचा आपण प्रयत्न करीत असताना संरक्षणाच्या प्रश्नांची नवीन जबाबदारी आपल्यावर येऊन पडली आहे, म्हणून तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत आणि पुढल्या चौथ्या पंचवार्षिक योजनेत आर्थिक प्रगतीचे जे काम आपल्याला अंगावर घ्यावे लागणार आहे ते काम तर आपण पुरे केलेच पाहिजे. परंतु त्याबरोबरच संरक्षणाच्या प्रश्नाकडेही आपल्याला आता विशेष लक्ष दिले पाहिजे. संरक्षणावर हल्ली आपण जवळ जवळ साडेआठशे ते नऊशे करोड रुपये दरसाल खर्च करतो आहोत. पूर्वी आपण दरसाल चारशे सव्वाचारशे करोड रुपये खर्च करीत होतो. आता आपण संरक्षणाची एक पंचवार्षिक योजना तयार केली आहे. त्या योजनेची जसजशी अंमलबजावणी होत जाईल, प्रगती होत जाईल तसतसे आपल्याला दरसाल जवळ जवळ एक हजार करोड रुपये खर्च करावे लागतील. म्हणजे तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या आणि चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या स्वरूपात येणाऱ्या ज्या आर्थिक जबाबदाऱ्या आहेत, त्या तर आपण स्वीकारल्या पाहिजेतच, पण त्याचबरोबर संरक्षणाच्या या पंचवार्षिक योजनेची जबाबदारीही आपण स्वीकारली

पाहिजे, हा या संरक्षणाच्या प्रयत्नाचा अर्थ आहे. यातून अर्थात काही आपत्ती निर्माण होतील, कष्ट निर्माण होतील, दुःखे निर्माण होतील; 'पण हे सर्व सहन करण्याची मनाची तयारी असल्याशिवाय संरक्षणाची भाषा बोलणे राष्ट्राला कधी शक्य होणार नाही. म्हणून या सगळ्या प्रश्नांचा विचार करताना आपल्यावर जी जबाबदारी पडणार आहे तिची ही पार्श्वभूमी कृपा करून आपण आपल्या मनामध्ये ठेवण्याचा प्रयत्न करा. त्याशिवाय ज्या वेगाने व ज्या तेजाने आपणांकडून प्रयत्न व्हावयास पाहिजेत तशा प्रकारचे प्रयत्न आपणांकडून होऊ शकणार नाहीत. राष्ट्राने ही दुहेरी जबाबदारी पत्करलेली आहे आणि ती आपण पार पाडलीच पाहिजे.

चीनकडून या देशाला जो धोका आहे त्या धोक्याच्या दृष्टीने या देशाच्या संरक्षणाची तयारी करण्याचा आपण प्रयत्न करतो आहोत, पण त्याचबरोबर चीनही अगदी स्वस्थ बसलेला नाही. चीनने आता राजकीय डावपेचांना सुरुवात केली आहे. त्याने पाकिस्तानशी जी मैत्री जोडली आहे त्या मैत्रीला अधिकाधिक रंग चढत चालला आहे. कोणी कोणाशी मैत्री करावी हे सांगण्याचा तुम्हा-आम्हाला अधिकार नाही. पण त्या मैत्रीतून आपल्या दृष्टीने जर धोके निर्माण होणार असतील तर त्या धोक्यांची नोंद आपण जरूर घेतली पाहिजे, आणि जरूर पडल्यास त्या दृष्टीने आपण तयारीही करीत राहिले पाहिजे. हा शहाणपणाचा मार्ग आहे, आणि या शहाणपणात आम्ही कमी पडणार नाही असा आमचा विश्वास आहे. चीनकडून आपल्याला धोका आहे यात शंका नाही. १९६२ साली ज्या तयारीने चीनने या देशावर आक्रमण केले त्याच तयारीने आजही तो तेथे आहे. आपल्या सरहद्दीवर आज त्याचे सैन्य खडे आहे. पुढे त्यात कदाचित वाढही होईल. आम्ही जशी आमची तयारी करतो आहोत तशीच तयारी तोही करतो आहे. रस्त्यांचे बांधकाम चालू आहे, ल्हासाच्या पलीकडे रेल्वे बांधण्याची त्याची तयारी चालू आहे. नवे नवे विमानतळ उभारण्याचा तो प्रयत्न करतो आहे. चीनकडून या सर्व गोष्टी होत असताना आपणही अगदी स्वस्थ बसलेलो नाही. पण मी आपणाला सांगू इच्छितो की, राष्ट्राच्या संरक्षणाचा विचार करीत असताना राष्ट्राच्या आर्थिक

प्रश्नांकडे आपणास दुर्लक्ष करता येणार नाही. दुर्दैवाने १९६२ च्या ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये आपल्याला जो अनुभव आला त्यामुळे आपले मन जरा पोळलेले आहे. मला त्याची कल्पना आहे. दुधाने तोंड भाजले म्हणजे मनुष्य ताकही फुंकून पितो असे म्हणतात. तशाच प्रकारची थोडीशी ही गोष्ट आहे. पण एक गोष्ट मला स्पष्ट करावीशी वाटते. चीन हिंदुस्थानवर सैन्यानिशी चालून आला तर त्यालाही काही, मर्यादा आहेत. तो किती सैन्यानिशी येऊ शकेल याचा एक अंदाज आहे. आपण जेव्हा संरक्षणाची तयारी करतो तेव्हा ज्याला संभाव्य धोक्याचे मूल्यमापन–असेसमेन्ट ऑफ थ्रेट—म्हणतात त्या मूल्यमापनाच्या अनुरोधाने आपण तयारी करीत असतो. पण संरक्षणाच्या या तयारीचा परिणाम आमच्या देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रयत्नावर होणार नाही याची आम्हाला काळजी घेतली पाहिजे. आपण आपल्या देशाच्या संरक्षणाची तयारी करून समर्थ बनले पाहिजे यात शंका नाही. पण हे करीत असताना देशाच्या आर्थिक प्रगतीचे काम थंडावले तर या देशावर महान संकट येईल, या देशात अराजक निर्माण होईल. हा धोका लक्षात घेऊनच आपण आपल्या कामाची आखणी केली पाहिजे.

त्याग करून आपण आपल्या देशाचे रक्षण केले पाहिजे असे म्हटले जाते. हे सर्व ठीक आहे. पण देशाचे रक्षण करावयाचे म्हणजे काय हिमालयाचे रक्षण करावयाचे की या देशातील गरिबीचे आणि भूकमारीचे रक्षण करावयाचे ? या देशाचे रक्षण करावयाचे याचा अर्थ माझ्या मते असा. या देशामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काही नवीन आशा निर्माण झाल्या आहेत, काही नवीन मूल्ये निर्माण झाली आहेत, काही नवीन अधिकार निर्माण झाले आहेत. एक नवा मानव हिंदुस्थानमध्ये बनतो आहे. लोकशाही समाजवादाच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या या माणसाचे आपल्याला रक्षण करावयाचे आहे, ही भावना आपल्या मनात बळावली पाहिजे आणि म्हणून संरक्षणाची तयारी करीत असताना देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रयत्नामध्ये तसूभरसुद्धा ढिलाई होता कामा नये हा विचार आपण आपल्या नजरेसमोर सतत ठेवला पाहिजे. किंबहुना विकासकार्याच्या बाबतीत

जास्त जिम्मेदारी घेता येत असेल तर ती आपण घेतली पाहिजे. थोडक्यात म्हणजे विकासाच्या आघाडीवरही आपल्याला लढले पाहिजे आणि संरक्षणाच्या आघाडीवरही लढले पाहिजे. या दुहेरी आघाडीवर लढाई जिंकणे हे मोठे कठीण काम आहे. पण ते हिंदुस्थानला पार पाडावयाचे आहे. आजचा हा मूलभूत प्रश्न हिंदुस्थानच्या सगळ्याच नेत्यांची एका अर्थाने परीक्षा घेणारा ठरणार आहे. पण मी आपणाला सांगू इच्छितो की, ह्या राष्ट्रीय प्रश्नाचे गंभीर स्वरूप जर आम्ही जनतेच्या मनापर्यंत पोहोचवू शकलो आणि जनतेचा या प्रश्नाबाबत पाठिंबा मिळवू शकलो तर हा कठीण प्रश्न सोडविण्यात हिंदुस्थान अखेर यशस्वी होईल. माझ्या मनात यासंबंधी बिलकूल शंका नाही. पण या विचारामध्ये तुम्ही सर्व मनोभावे भागीदार होणार असाल तरच हे यश आपणांस लाभणार आहे. राज्य-कारभाराची जबाबदारी ज्यांच्यावर आहे त्यांनी हे सगळे प्रश्न समजावून घेतले पाहिजेत, आणि त्यांची उत्तरे दिली पाहिजेत. जनतेसंबंधी शासनाची जी जबाबदारी आहे ती शासनाने पार पाडलीच पाहिजे. त्या बाबतीत काही चुका होत असतील तर त्या दुरुस्त झाल्या पाहिजेत. परंतु त्याचबरोबर राष्ट्राच्या गंभीर समस्यांची जी जिम्मेदारी आहे, तिच्याबाबतीत विचाराची व भावनेची तुम्ही आम्ही सर्वांनी भागिदारी पत्करली नाही तर आजच्या काळात या राष्ट्राचे प्रश्न सोडविणे कठीण जाईल.

तुमचे कामगारांचे जे प्रश्न असतील त्यांच्या बाबतीत तुम्ही जागरूक राहिलात तर ती आवश्यक व योग्य अशीच गोष्ट होईल. कामगारा-संबंधीची माझी भावना आपल्याला माहीत आहेच. मी तर असे मानतो की, हिंदुस्थानातील गरीब शेतकरी, कामगार आणि मध्यमवर्ग यांचा त्रिवेणी संगम होऊन एकमनाने हिंदुस्थानच्या उत्कर्षासाठी ते लढत राहिले, तर हिंदुस्थानचा समाजवाद तुमच्या आमच्या डोळ्यादेखत साकार झालेला आपल्याला पाहावयास मिळेल. निरनिराळ्या वर्गांच्या मागण्या असतील, अपेक्षा असतील, पण त्या सर्वांच्या पाठीमागे राष्ट्राच्या प्रश्नांची पार्श्वभूमी आहे, हे आपण विसरता कामा नये. या सर्वच गोष्टींत आपण राष्ट्रीय प्रश्नांच्या पार्श्वभूमीशी जरा जुळते घेतले नाही तर मला वाटते आपल्या-

कडून फार मोठी चूक होईल. आमचे कोठलेही प्रश्न असोत, मग ते कामगारांचे असोत, शेतकऱ्यांचे असोत, मध्यम वर्गीयांचे असोत, महाराष्ट्रीयांचे असोत, गुजराथ्यांचे असोत, हिंदूंचे असोत, मुसलमानांचे असोत, ख्रिश्चनांचे असोत किंवा निव्वळ ते वैयक्तिक स्वरूपाचे असोत. ज्या ज्या वेळी हे प्रश्न निर्माण होतील त्या त्या वेळी आपण एवढाच विचार करा की, या प्रश्नांचा आणि राष्ट्रीय प्रश्नांचा कोठे संबंध लागतो आहे का? त्यांची आणि राष्ट्रीय प्रश्नांची संगती निर्माण होते आहे की नाही? की त्यांच्यामध्ये कोठे विरोध निर्माण होतो आहे? आपल्या सर्व प्रश्नांची या दृष्टीने विचार करण्याची ही वेळ आहे. तुमचे प्रश्न तुम्ही सोडून द्या, असे मी कधीच म्हणणार नाही. पण ते प्रश्न आपण अशा पद्धतीने मांडू या, त्याच्यासंबंधी अशा तऱ्हेने आग्रह धरू या, ते अशा तऱ्हेने सोडवून घेण्याचा प्रयत्न करू या की त्यातून राष्ट्राची शक्ती कमी न होता, ती वाढण्यास त्यामुळे उलट मदतच होईल.

त्याचबरोबर, संरक्षणाची तयारी करण्याच्या या काळातसुद्धा समाजवादाच्या लढाईची जाणीव जर आपण जागती ठेवली नाही तर राष्ट्राला फार मोठा धोका निर्माण होईल, हेही मला आपल्याला सांगितले पाहिजे. कामगारांमध्ये, गरीब शेतकऱ्यांमध्ये, मध्यमवर्गामध्ये ही जागृती आम्हाला सतत तेवत ठेवली पाहिजे, वाढविली पाहिजे. ज्या हिंदुस्थानचे आपल्याला रक्षण करावयाचे आहे तो सबंध हिंदुस्थान या बाबतीत जागता असला पाहिजे. आम्ही इंग्रजांशी लढत असतानासुद्धा हा प्रश्न निर्माण झाला होता. आम्ही ज्या स्वराज्याकरिता लढत होतो त्या स्वराज्याचे स्वरूप काय असावे यासंबंधी त्या वेळी प्रश्न निर्माण झाले होते, आणि वैचारिक संघर्षही निर्माण झाले होते. आजही जेव्हा राष्ट्राच्या प्रश्नांचा विचार करतो तेव्हा, हा हिंदुस्थान शेवटी कशा तऱ्हेचा घडवावयाचा आहे याची आम्हाला जाणीव असली पाहिजे. माझ्या मनात या बाबतीत काही शंका नाही. हिंदुस्थानात अजून उघडीनागडी हिंडणारी गरिबी ही जर अशीच हिंडत राहणार असेल तर या स्वातंत्र्याला आणि आज आपण करीत असलेल्या सर्व प्रयत्नांना काहीच अर्थ राहणार नाही. आम्हाला

ही गरिबी हटविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मनाची गुलामगिरी हटविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्या समाजामध्ये प्रत्येक मनुष्य स्वाभिमानाने आपली मान उंच करून निर्भयपणे वावरू शकेल, त्याला पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र मिळेल, त्याला आपल्या बुद्धीचा आणि शीलाचा विकास करण्याची संधी मिळेल अशा प्रकारचा समाज आपणास निर्माण करावयाचा आहे. अशा प्रकारचा समाज निर्माण करण्याची प्रतिज्ञा करून आपण सर्वजण वाटचाल करू या.

आणखी एक विचार मला आपल्याला जरूर सांगितला पाहिजे. चीनने अलीकडे जो अणुबॉम्बचा स्फोट केला त्या बाबतीत आपण काय करणार आहोत असे लोक मला नेहमी विचारीत असतात. चीनच्या संभाव्य आक्रमणाबाबत आम्हाला संरक्षणाची तयारी केली पाहिजे याबद्दल माझ्या मनात बिलकूल शंका नाही. ज्या तऱ्हेचे आक्रमण चीनने १९६२ साली केले तशाच तऱ्हेचे आक्रमण करण्याचा चीनने पुन्हा प्रयत्न केला तर ते हिंदुस्थान यशस्वी होऊ देणार नाही, हे मी आपणांस सांगू इच्छितो. परंतु चीनने अणुबॉम्ब केला, की आम्हीही अणुबॉम्ब केलाच पाहिजे अशी भूमिका आपल्याला घेता येणार नाही. कारण या बाबतीत हिंदुस्थानची एक जागतिक प्रतिमा आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. अणुबॉम्बसंबंधी आपला दृष्टिकोण काय आहे हे पहिल्याने स्पष्ट झाले पाहिजे. अणुबाँब हे संरक्षणाचे शस्त्र आहे की सर्वनाशाचे शस्त्र आहे? हिंदुस्थानचा संरक्षणमंत्री या नात्याने माझी जिम्मेदारी ओळखून मी आपल्यासमोर बोलतो आहे. मी आपणाला सांगू इच्छितो की, अणुबाँब हे संरक्षणाचे हत्यार नसून ते सर्वनाशाचे हत्यार आहे. हिंदुस्थानने अणुबाँब केलाच पाहिजे या भूमिकेत आपण एकदा पडलो की, मग आपल्या प्रगतीचे आणि आपल्या आर्थिक विकासाचे जे प्रश्न आहेत त्यांच्यावर तर याचा परिणाम होईलच परंतु त्याचबरोबर जागतिक शांततेच्या दृष्टीने हिंदुस्थानने जी भूमिका घेतली आहे त्या भूमिकेचाही आपल्याला त्याग करावा लागेल. लोक असे विचारत असतात की, हिंदुस्थानवर चीनने अणुबॉम्ब टाकला तर काय होईल? पण चीन हिंदुस्थानवर तावडतोब

अणुबॉंब टाकील असा भोळाभाबडा विचार मनात आणून आपण घबराट निर्माण करता कामा नये. चीनचा प्राथमिक हेतू अगदी साधा आहे. त्याने जो पहिला अणुबॉंब निर्माण केला आहे त्याचा मूळ हेतू आम्हाला घाबरविणे हा आहे. चीनने एक अणुबॉंब उडविल्याबरोबर आम्ही घाबरून गेलो, म्हणजे आम्ही लढाई हरलो असा त्याचा अर्थ होणार आहे. कोठल्याही राष्ट्राने कोठल्याही राष्ट्रावर आक्रमण करण्यासाठी अणुबॉम्बचा दुरुपयोग केला तर ते युद्ध त्या दोन राष्ट्रांपुरते मर्यादित राहणार नाही ही सरळ उघड गोष्ट आहे. चीनने हिंदुस्थानवर अणुबॉम्बचा हल्ला केला तर जागतिक शांततेची भूमिका घेणाऱ्या हिंदुस्थानला जगामध्ये मित्र मिळणार नाहीत अशी आपण खोटी भावना करून घेण्याचे कारण नाही; आणि त्यासाठी आपण त्यांच्याशी करारमदार करण्याची आज आवश्यकताही नाही. असले करार करण्यास कोठलेही शहाणे राष्ट्र तयार होणार नाही. तुमच्यावर अणुबॉम्ब पडला की तुमच्या मदतीला यावयाचे याचा अर्थ त्या राष्ट्राने आपला अणुबॉम्ब वापरला पाहिजे आणि त्या राष्ट्रावर होणारा अणुबॉम्बचा हल्ला स्वीकारला पाहिजे. कुठलेही राष्ट्र इतक्या भोळेपणाने वागेल असे समजण्याचे कारण नाही. पण तत्त्वाच्या भूमिकेवर खंबीरपणाने आम्ही उभे राहिलो, आणि एखाद्या राष्ट्राने अणुबॉम्बसारख्या सर्वनाश करणाऱ्या शस्त्राचा हिंदुस्थानविरुद्ध वापर करण्याचा प्रयत्न केला तर शांततावादी दुनियेतील लोकमत तुम्हा-आम्हाला एकटे सोडील असेही मानण्याचे कारण नाही. पण भयवादाचा दृष्टिकोण एकदा संरक्षणाच्या कामामध्ये शिरला की संरक्षणाच्या दृष्टीने अणुबॉम्बच्या निर्मितीला भयंकर महत्त्व येईल, आणि या देशातील जे दुसरे मूलभूत प्रश्न सुटले पाहिजेत म्हणून आग्रहाने सांगण्याचा आपण प्रयत्न करतो आहोत ते सगळे प्रश्न मागे पडल्याशिवाय राहणार नाहीत.

सर्वनाशाची लढाई होण्याचा हिंदुस्थानमध्ये संभव निर्माण झाला तर हिंदुस्थानला मदत करणारा जागतिक शांततेचा हिंदुस्थानचा जो सिद्धांत आहे, त्यासंबंधीची त्याची निष्ठा हेच त्याचे सगळ्यात मोठे हत्यार आहे, हे मी आपणाला सांगू इच्छितो. सगळ्या अणुबॉम्बना पचविणारी ही जी

शक्ती आपल्या विचारामध्ये आणि श्रद्धेमध्ये आहे तिचे आपण रक्षण केले पाहिजे. हे रक्षण आम्ही करू शकलो नाही, तर घबराटीने शत्रूने दोन अणुबॉम्ब केले म्हणून आम्ही चार केले पाहिजेत, त्याने दहा केले म्हणून आम्ही वीस केले पाहिजेत, अशी शर्यत लागेल. परंतु अशाने हिंदुस्थानचे भले होणार नाही. मी सुरुवातीला दिल्लीला गेलो तेव्हा एक गृहस्थ मोठा गंभीर चेहरा करून माझ्याकडे आले. ते अतिशय देशाभिमानी होते. त्यांच्या तीव्र राष्ट्रभक्तीबद्दल मला बिलकूल शंका नव्हती. ते मला म्हणाले की, शत्रूचे एक लाख सैन्य असेल तर आपण दोन लाख सैन्य उभे केले पाहिजे, शत्रूजवळ पाच लाख सैन्य असेल तर आपले दहा लाख सैन्य असले पाहिजे. पण अशा रीतीने सैन्य वाढवीत नेण्याची ही लढाई संपणार तरी कोठे? हे मोठे कठीण काम होऊन बसेल. परंतु अशा प्रकारच्या भयवादाने विचार करता येत नाही, तो लढाईत उपयोगी पडत नाही, आणि संरक्षणाच्या दृष्टीने अशा प्रकारे प्रश्न वाढविण्याने फारशी मदतही होत नाही. म्हणून संरक्षणाची तयारी करीत असताना अशा प्रकारच्या भयवादाचा विचार आपल्या मनात येता कामा नये. एक प्रकारच्या आत्मविश्वासाने पण जागरुकतेने आणि शहाणपणाने आपण तयारी केली पाहिजे.

आमच्या मैत्रीचा विश्वासघात करून आमच्यावर आघात करण्यास चीनसारखे एक राष्ट्र तयार झाले, पण आमच्या संकटकाळात वेगवेगळी समाजव्यवस्था असणारी, वेगवेगळे संस्कार व विचारप्रणाली असणारी अमेरिका, रशिया आणि इंग्लंड यांसारखी राष्ट्रे आमच्या मदतीला धावून आलेली आहेत. दुनिया निव्वळ शत्रूंनी व विश्वासघातक्यांनी भरलेली आहे अशा समजुतीने दुनियेचा आणि हिंदुस्थानचा विचार करणे गैर ठरेल. तत्त्वनिष्ठ आणि संकटाच्या वेळी मदतीस धावून येणारी मित्रराष्ट्रेही हिंदुस्थानने जुळवून ठेवलेली आहेत. त्यांची आज आपल्याला मदत होत आहे. क्रूश्चेव्ह आपले पद सोडून गेले, तेव्हा लोकांच्या मनात काहीसा संभ्रम निर्माण झाला. क्रूश्चेव्ह गेले याचे व्यक्तिशः मला जरूर दुःख झाले. कारण हिंदुस्थानचे ते मनापासूनचे मित्र होते असा माझा स्वतःचा अनुभव

आहे. परंतु क्रूश्चेव्ह गेल्यावरोवर हिंदुस्थानशी झालेले करार रशियाकडून मोडले जातील असे मला केव्हाही वाटले नाही. पण अशा प्रकारची भावना निदान काही लोकांच्या मनात तरी निर्माण झाली होती. रशियाने हे करार मोडावे आणि रशियाशी आपले शत्रुत्व निर्माण व्हावे अशी कदाचित त्यांची इच्छा असावी. परंतु गेल्या महिन्याभरात जी माहिती हाती आली आहे त्यावरून ही गोष्ट घडणार नाही हे स्पष्ट होते. मित्र म्हणून जी वचने रशियाने आम्हाला दिलेली आहेत, ती तंतोतंत पाळण्याचे आश्वासन रशियाने आपणाला पुनःपुन्हा दिलेले आहे, आणि माझी खात्री आहे की, आणखी काही दिवसांनी मी इंग्लंडला जाईन तेथेही मला हाच अनुभव आल्याशिवाय राहणार नाही. मी हे सर्व आपल्याला अशाकरिता सांगतो आहे की, आपल्याला मदत करणारी मित्रराष्ट्रेही आहेत. तेव्हा संरक्षणाचा विचार करताना, जागतिक शांततेच्या तत्त्वाचा स्वीकार करून जगात आपण जी मैत्रीची भावना निर्माण केलेली आहे ती आपली एक महत्त्वाची शक्ती आहे याची जाणीव आपण जरूर ठेवा, आणि भयवादाचा विचार आपल्या मनामध्ये येऊ देऊ नका. त्याचवरोवर, राष्ट्रभक्तीची भावना आणि समाजवादासाठी आपल्याला जे अखंड प्रयत्न करावे लागतील त्यांच्यासंबंधीची सतत जागरूकता आपण आपल्या मनाशी नेहमी ठेवली, आणि त्याप्रमाणे आचरण करण्याचा आपण प्रयत्न केला, तर आपले राष्ट्रीय प्रश्न पुष्कळच सुलभ होतील यासंबंधी मला शंका नाही.

मी सुरुवातीला म्हणालो की, महाराष्ट्राच्या एका प्रश्नासंबंधी मला थोडासा खुलासा केला पाहिजे. तो प्रश्न म्हणजे गोव्याचा प्रश्न. या प्रश्नाबाबत मी जे बोलणार आहे ते संरक्षणमंत्री या नात्याने बोलणार नसून व्यक्तिगत नात्याने बोलणार आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात जबाबदारीने काम करणारा मी एक कार्यकर्ता आहे. मी हिंदुस्थानच्या राजकारणात गेलो काय किंवा जगाच्या राजकारणात गेलो काय, शेवटी माझे पाय या मातीवर उभे आहेत आणि या मातीतच मला परत यावयाचे आहे हे मला विसरून चालणार नाही. सुरुवातीला जेव्हा हा प्रश्न निर्माण झाला त्या वेळची माझी भूमिका एकदा आपल्यापुढे स्वच्छ करतो. महाराष्ट्राचा मुख्य-

मंत्री म्हणून काम करीत असताना, राष्ट्रीय दृष्टीने या प्रश्नाचा विचार करून मी माझी भूमिका जाहीर केली. त्या भूमिकेला माझ्या सगळ्या सहकाऱ्यांचा पाठिंबा होता. कारण त्या सगळ्यांच्या सल्ल्याने मी ती भूमिका घेतलेली होती. गोवा महाराष्ट्राचा म्हणून तो आम्हाला द्या अशी मागणी आम्ही केली नाही. गोव्याचे आमचे जवळचे नाते आहे, पण राष्ट्रीय दृष्टीने या प्रश्नाचा विचार करताना या प्रश्नाचा निर्णय गोव्याच्या जनतेने घ्यावा अशी भूमिका आम्ही सुरुवातीला घेतली, आणि अत्यंत संयमाने आम्ही ती पाळली. खरे म्हणजे आमचा भाऊ आमच्या घरी यावा अशी मागणी करणे तेव्हा सुद्धा गैर ठरले नसते. पण त्यामुळे या प्रश्नाची गुंतागुंत होत राहिली असती. म्हणून आम्ही ती चूक केली नाही. गेल्या निवडणुकीमध्ये तेथल्या जनतेने आपल्याला महाराष्ट्रात जावयाचे आहे असा कौल दिला. माझे स्वत.चे स्पष्ट मत आहे की, गोव्यातील महाराष्ट्रीय जनतेची ही जी रास्त भावना आहे ती खरी झाली पाहिजे. पण या प्रश्नाची गुंतागुंत न करता तो सोडविण्यासाठी मदत व्हावी अशा प्रकारची भूमिका मी आज घेतलेली आहे. या भूमिकेतून मी आज आपल्यापुढे बोलतो आहे तो निव्वळ पक्षीय भावनेने बोलत नाही. मी शेवटी तुमच्याच प्रान्तातला, तुमच्यातलाच एक आहे. तुमच्याच प्रेमाने, तुमच्याच आशीर्वादाने, तुमच्याच शक्तीने मी वाढलेलो आहे. माझी शक्ती जर तुमच्या कामी' येणार नसेल तर माझ्या शक्तीचा काय उपयोग ? ही माझी मूळ भूमिका आपण लक्षात ठेवा.

या प्रश्नासंबंधी दुसरी जी एक भूमिका आहे ती ही की या प्रश्नाचा आणखी दहा वर्षे विचार होता कामा नये. या दहा वर्षांच्या काळाला एवढे मोठे काय महत्त्व आहे हे मला समजत नाही. ह्या प्रश्नाचा निर्णय लवकर घेण्यात यावा आणि या दहा वर्षांच्या अटीवर हा प्रश्न लांबकळत राहू नये असा प्रयत्न आपण करीत राहिले पाहिजे. काँग्रेसचे अध्यक्ष, पार्लमेन्टरी बोर्डाचा असा जुना निर्णय आहे, असे म्हणतात. हा निर्णय जर जुना आहे तर तसे आतापर्यंत का सांगितले नाही असे मला काही लोक विचारतात. पण मी आपणाला सांगू इच्छितो की, असा निर्णय पार्लमेन्टरी

बोर्डाच्या बैठकीत झाल्याची कल्पना मला परवापर्यंत नव्हती. हा निर्णय एप्रिलमध्ये झाला असे सांगण्यात येते. मग तो आजपर्यंत बाहेर का सांगितला गेला नाही याची मला कल्पना नाही. परंतु तो एक तांत्रिक भाग आहे. समजा, हा निर्णय घेतला गेला असेल. पण घेतलेले निर्णय बदलू नयेत असे कोणी सांगितले? शेवटी निर्णय जे घ्यावयाचे असतात ते लोकांच्या हिताकरिता, लोकांच्या इच्छेला मान देऊन घ्यावयाचे असतात. निर्णय महत्त्वाचे की लोक महत्त्वाचे असा प्रश्न निर्माण झाला तर लोक महत्त्वाचे असेच मी म्हणेन. आणि जेव्हा लोक आणि निर्णय यांच्यात संघर्ष निर्माण होतो तेव्हा लोक विजयी होतात, असा इतिहास आहे. येथे येण्यापूर्वी पार्लमेंटरी बोर्डाच्या बैठकीत या प्रश्नाचा पुन्हा फेरविचार झाला पाहिजे अशी मागणी मी श्री. कामराज यांच्याकडे केली आहे. मी आपल्याशी बोलायला आलो तेव्हा ही गोष्ट आपणाला सांगितली पाहिजे म्हणून ती मी आपल्याला सांगितली.

गोव्याच्या प्रश्नाबाबत आणखी एक गोष्ट सांगण्यात येते. महाराष्ट्राच्या आणि गोव्याच्या एकीकरणाच्या आड तेथील ख्रिश्चन समाज आहे असे पुष्कळ वेळा बोलले जाते. माझा यावर विश्वास नाही. ख्रिश्चन समाज आणि हिंदू समाज यांच्यामध्ये निष्कारण हा संघर्ष निर्माण करण्याचे पातक कोणी करू नये. या मुंबई शहरामध्ये लक्षावधी ख्रिश्चन आहेत. परंतु महाराष्ट्रात आल्यामुळे येथल्या ख्रिश्चनांचे नुकसान झाले आहे असे माझ्या ऐकण्यात आलेले नाही. तेव्हा या एकीकरणाच्या प्रश्नाला अशा प्रकारचे धार्मिक स्वरूप देण्याचा प्रयत्न करणे चुकीचे ठरेल. गोवा महाराष्ट्रात येऊ नये असे म्हणणारे जसे काही ख्रिश्चन आहेत तसेच काही हिंदूही आहेत; आणि गोवा महाराष्ट्रात यावा असे म्हणणारे जसे हिंदू आहेत तसे ख्रिश्चनही आहेत. तेव्हा या प्रश्नाला अकारण धर्मभेदाचे चुकीचे स्वरूप दिले जाऊ नये अशी माझी सगळ्यांना कळकळीची विनंती आहे—महाराष्ट्रातल्या पुढाऱ्यांना आहे आणि महाराष्ट्राबाहेरच्या पुढाऱ्यांनाही आहे. महाराष्ट्राच्या जीवनामध्ये निर्माण झालेल्या या महत्त्वाच्या प्रश्नाचा आपण काही तत्त्वाने, काही नैतिक विचाराने, काही राजकीय विचारांच्या निष्ठेने निर्णय घेतला

पाहिजे. या प्रश्नासंबंधी माझी जी भूमिका आहे ती मी आपल्याला सांगितली. आपण तिचा आपल्या मनाशी विचार करावा. शेवटी, महाराष्ट्राच्या जनतेच्या भावनेशी माझे जीवन एकरूप राहील एवढेच मी आपणाला आश्वासन देतो व आपली रजा घेतो.

जाहीर सभा, कामगार मैदान, मुंबई, दि. ४-११-६४

६ व्यर्थ न हो बलिदान

आज आपल्या या सभेत बोलत असताना जवळ जवळ तीन वर्षांपूर्वी ज्या सभेत मी पुणे शहराचा निरोप घेतला त्या सभेची आठवण माझ्या मनात सारखी येत आहे. मध्यंतरीच्या काळात मी पुण्याला येत असे, त्या वेळी जाहीर सभा घेण्यासंबंधी आपले कार्यकर्ते मला सुचवीत असत. पण बोलण्यासारखे काही घडले म्हणजे मी जरूर येईन आणि सभेत बोलेन असे मी त्यांना सांगत असे. बोलण्यासारखे थोडेसे घडले आहे म्हणून मी आज आपणापुढे आलो आहे. पाकिस्तानबरोबरच्या युद्धाचा हा जो प्रश्न आहे त्या प्रश्नाच्या पाठीमागची परिस्थिती, त्याच्या पाठीमागच्या विचाराचा संदर्भ आपल्यापुढे ठेवावा या उद्देशाने आज मी येथे आलो आहे. आपण आज माझा हा जो सन्मान करीत आहात तो ज्या शूर जवानांनी, पंजाबच्या आणि काश्मीरच्या रणभूमीवर बहादुरी गाजवून हिंदुस्थानचा नवा इतिहास लिहिला, त्या बहादुरांचा हा खरा सन्मान आहे, माझा नाही; आणि सन्मानाच्या भावनेने आज मी येथे आलेलोही नाही. हिंदुस्थानच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाची घटना घडत असताना तुमचा प्रतिनिधी म्हणून,

तिथला एक क्रियाशील साथीदार म्हणून, दिल्लीत हजर राहण्याचे भाग्य मला लाभले यातच माझा सन्मान झाला असे मी जरूर मानतो. ईश्वराजवळ प्रार्थनाच करावयाची झाली तर मी एवढीच प्रार्थना करीन की, महाराष्ट्राचा मान आणि महाराष्ट्राची शान ज्यायोगे वाढेल असे काम करण्याची शक्ती, असे शब्द उच्चारण्याची संधी ईश्वराने मला द्यावी. यापेक्षा अधिक मोठ्या वरदानाची माझी अपेक्षा नाही.

प्रत्येक देशाच्या जीवनामध्ये असे काही प्रसंग येतात की, त्या प्रसंगी जर तो देश तडफेने उठून उभा राहिला नाही, आपल्या स्वाभिमानाला जागला नाही, आपल्या कर्तृत्वाला मिळालेली आव्हाने त्याने स्वीकारली नाहीत, तर तो नष्ट झाल्याशिवाय राहात नाही. आजच्या या प्रसंगी लोकमान्य टिळकांचे शब्द मला चांगले आठवतात. लोकमान्यांना कोणीसे विचारले होते की, स्वराज्यासाठी जर आपण धडपड करीत आहात तर प्रत्यक्ष सशस्त्र बंड आपण का करीत नाही ? त्यावर त्यांनी उत्तर दिले होते की, पन्नास टक्के त्यांना या बाबतीत खात्री वाटत असती तर बाकीचे पन्नास टक्के ते परमेश्वरावर सोडून द्यावयास तयार झाले असते. म्हणजे पन्नास टक्केच माणसाला यशाची खात्री देता येते, बाकीचे पन्नास टक्के धोका पत्करून पण धैर्याने पुढे जावयाचे असते; आणि अशा प्रकारे धोका पत्करण्याची राष्ट्राने तयारी दाखविली नाही तर त्याला राष्ट्र म्हणता येणार नाही. हिंदुस्थानच्या इतिहासातील या कठीण प्रसंगी ज्या धैर्याने व धिम्मेपणाने हिंदुस्थानने पावले टाकली, तशी ती टाकली नसती तर या गुंतागुंतीच्या जगात हिंदुस्थानला आज राष्ट्र म्हणून जगता आले नसते.

काश्मीरचा प्रश्न कसा निर्माण झाला, त्याबद्दलच्या जुन्या कहाण्या मी सांगत बसत नाही. कारण त्या सर्वांना मुखोद्गत आहेत. परंतु सतरा वर्षांपूर्वी नवा हिंदुस्थान जन्माला आला त्या वेळी तो आपल्याबरोबर एक नवी शक्ती घेऊन आला, नव्या आशा घेऊन आला, नवे वर घेऊन आला त्याबरोबरच तो एक शापही घेऊन आला. ज्यांच्याबरोबर लढून आम्हाला स्वराज्य मिळवावे लागले त्यांच्या अवकृपेमुळे हा शाप निर्माण झाला. ज्यांनी या हिंदुस्थानचे स्वातंत्र्य हिरावून घेऊन येथे स्वतःचे अधिराज्य निर्माण केले

होते, त्यांनीच येथून जाताना एक विषारी विचार पाठीमागे सोडून दिला. हा विषारी विचार हिंदुस्थानच्या दृष्टीने शाप ठरला आणि या विषारी विचारातूनच पाकिस्तानचा जन्म झाला. तो विचार हा की, येथील मुसलमान हा एक स्वतंत्र देश आहे. धर्म हा एक स्वतंत्र देश बनू शकतो हा भयानक विचार जर हिंदुस्थानने स्वीकारला तर हिंदुस्थानला हिंदुस्थान म्हणून राहण्याची शक्यताच नाही. या प्रश्नावर अधिक बोलून मी गुंतागुंत वाढवू इच्छित नाही. पण माझ्या मनापुढे पुष्कळ वेळा असा प्रश्न पडतो की, इंग्लंडमध्ये कुठल्याही पक्षाचे सरकार असो, त्याच्या मनात नेहमी हिंदुस्थानविरुद्ध विचार का येतो? हा विचार समजून घेण्यासाठी विचार करता मला त्यातून एकच कारण दिसते की, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी लढलेल्या स्वातंत्र्य सैनिकांवर अजूनही इंग्रजांचा रोष आहे. त्यांना असे वाटते की, हिंदुस्थानातील गांधी, टिळक व नेहरू यांच्या अनुयायांनीच आम्हाला आशिया खंडातून बाहेर फेकले; आणि म्हणून त्यांच्या मनात हिंदुस्थानसंबंधी अद्यापही काहीसा रोष आहे.

आज हिंदुस्थानचे जीवन एका प्रचंड संकटात आहे. युद्धाचा निर्णय जेव्हा राष्ट्र घेते आणि युद्धाची पावले उचलण्याचा ते प्रयत्न करते, तेव्हा एखादा खळबळजनक चित्रपट किंवा पटकथा आपण पाहतो आहोत, अशा भावनेने कृपा करून आपण आताच्या हिंदुस्थानच्या जीवनाकडे पाहू नका. चित्रपटातला आणि कथानकातला नायक संकटात पडत असताना आपण दुरून पाहत असतो. तुमची आमची परिस्थिती आज अशी नाही. आज आपण एका मोठ्या संकटात सापडलो आहोत. कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता हे संकट तुमच्या आमच्या दाराशी येऊन बसलेले आहे. त्याचा मुकाबला करण्यासाठी आपली सर्वांची तयारी असली पाहिजे. मन तयार असल्याशिवाय संकटाला तोंड देता येत नाही. ज्या कर्तव्याच्या भावनेने हिंदुस्थान स्वतंत्र झाला तीच भावना हिंदुस्थानमध्ये आपण जीवंत ठेवू शकलो, समर्थ ठेवू शकलो, वाढवू शकलो तर एका पाकिस्तानचीच काय पण शंभर पाकिस्तानांचीसुद्धा माझ्या मनाला धास्ती वाटणार नाही.

गेल्या महिन्याभरात हिंदुस्थानात जे घडले त्यामुळे हिंदुस्थानचे जीवन पार बदलून गेले आहे. आमच्या दृष्टीने तर ते बदलले आहेच, पण दुनियेच्या दृष्टीनेही हिंदुस्थानचे चित्र बदलून गेले आहे. दुनियेची अशी कल्पना होती की, शांततेची भाषा करणारे हे राष्ट्र, जरा दबाव टाकला म्हणजे मान तुकवील किंवा त्याला न जुमानता कदाचित पुढेही जाईल, पण प्रत्यक्ष शस्त्राचा उपयोग करण्याची वेळ आली म्हणजे जरूर पाठीमागे जाईल. परंतु गांधीजींचा हिंदुस्थान त्यांना कळला नव्हता, नेहरूंचा हिंदुस्थान त्यांना कळला नव्हता आणि शास्त्रींचाही हिंदुस्थान त्यांना अद्यापि कळलेला नाही. तो त्यांना हळूहळू कळू लागेल. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, जो गांधीजींचा हिंदुस्थान होता, तोच नेहरूंचा हिंदुस्थान होता आणि शास्त्रीजींचाही तोच हिंदुस्थान आहे. प्रसंग बदलले, काळाचे स्वरूप बदलले त्याप्रमाणे अवताराचे रूप बदलले. शत्रूचे रूप जसे असेल त्याप्रमाणे अवतार होतो असे म्हणतात. आज शस्त्रास्त्रांची भीती दाखविणारे बळी राजे आमच्या आवतीभोवती, आमच्या सीमेवर उभे राहिले आहेत. त्या बळीराजांचा समाचार घेण्यासाठी वामन अवताराची गरज आज हिंदुस्थानला भासली. पहिले पाऊल उचलले आहे. दोन पावले अद्यापि बाकी आहेत. लाल बहादूर शास्त्रींची मूर्ती लहान असली तरी मनाने ते असे मजबूत गृहस्थ आहेत की, त्यांना उपमाच द्यावयाची झाली तर ती सह्याद्रीच्या काळ्या फत्तराचीच द्यावी लागेल. मुख्यमंत्री झाल्या-पासून मी त्यांना पाहात आलो आहे. आज ते हिंदुस्थानच्या पंचेचाळीस कोड जनतेचे प्रतिनिधी म्हणून काम करीत आहेत. मला सांगितले पाहिजे की, हिंदुस्थानची कूस भाग्याची कूस आहे. जेव्हा जेव्हा संकटे निर्माण होतात तेव्हा तेव्हा त्या संकटांना तोंड देणारे सुपुत्र तिच्या उदरी जन्माला येतात असा आतापर्यंतचा अनुभव आहे. आज हिंदुस्थानच्या जीवनावर हे जे मोठे संकट आले आहे, त्या वेळी शास्त्रीजींसारखा अत्यंत मजबूत, अत्यंत विनम्र, शब्दाचा सच्चा, दिलाचा पक्का, असा नेता हिंदुस्थानला लाभलेला आहे, हे तुमचे आमचे भाग्य आहे. आम्हाला ह्याचा अभिमान आहे.

परंतु हिंदुस्थानचे आज जे चित्र बनले आहे ते जगाला समजण्याची फार गरज आहे. शांततेवर आमचा विश्वास आहे. युद्धाचे तत्त्वज्ञान हे आमच्या जीवनाचे तत्त्वज्ञान नाही. परंतु त्याचा, युद्धाला आम्ही घाबरतो असा जर कोणी सोईस्कर अर्थ करून घेतला, आणि दिसेल तेथे आम्हाला भीती दाखविण्याचा डाव सुरू केला तर हे सारे सहन करणे हिंदुस्थानला कसे शक्य आहे ? पाकिस्तानने हाच डाव या वेळी काश्मीरमध्ये मांडला. परंतु त्यांचा, हिंदुस्थानासंबंधीचा आणि काश्मीरसंबंधीचा अंदाज चुकला. गेल्या ५ ऑगस्टपासून १ सप्टेंबरपर्यंतची त्यांची सबंध कारवाई तुम्ही पाहिलीत, तर ती कारवाई एका डावाने भरलेली होती असे आपणास दिसून येईल. तो डाव असा की, काश्मीरमध्ये जी मुसलमान जनता आहे तिच्यामध्ये बंडाची हवा निर्माण करून काश्मीरच्या जम्मू खोऱ्यामध्ये आपले सैन्य पाठवून द्यावे आणि काश्मीरमधल्या या मुसलमान जनतेकडून बंडाचा उठाव करण्याचा प्रयत्न करावा. त्यांच्या मदतीला इकडून छांबच्या आणि तिकडून सियालकोटच्या बाजूने जम्मूपर्यंत आपले सैन्य पाठवावे, जम्मूपासून अखनुरपर्यंतचा, आणि जम्मूपासून श्रीनगरला जाणारा, हे दोन्ही रस्ते आपल्या ताब्यात घ्यावे आणि याप्रमाणे सबंध काश्मीर हिंदुस्थानपासून अक्षरशः तोडून टाकावा. तसे झाल्यास काश्मीरची जनता त्यांच्या ताब्यात जाते, एवढेच नव्हे तर काश्मीरमध्ये व लडाखमध्ये असलेले हिंदुस्थानचे सैन्यही कोंडीत पकडले जाते. त्यांनी आपली पावले अत्यंत विचारपूर्वक टाकली होती. हे सर्व करताना त्यांनी कोणाकोणाचा आशीर्वाद घेतला होता याची मला माहिती नाही, आणि कोणाची नावे घेणेही योग्य होणार नाही. पण या कारस्थानामध्ये आमचा उत्तरेकडचा शेजारी जो चीन त्याचा जरूर हात होता यात शंका नाही.

१ सप्टेंबरला छांबच्या भागात पाकिस्तानने आपले पॅटन रणगाडे पाठविले तेव्हा मी त्याचे अनेक अर्थ पाहत होतो. पॅटन रणगाड्यांसारखी जबरदस्त शस्त्रास्त्रे पाकिस्तानला पुरविण्याचे काम गेली दहा वर्षे ज्या मंडळींनी केले, त्या मंडळींच्या मनात आता हे आत शिरलेले सैन्य

काश्मीरचा प्रश्न एकदा कायमचा सोडवून टाकणार, असा कदाचित हिशेब असावा. याला उत्तर म्हणून ६ तारखेला हिंदुस्थानने लाहोरच्या भागात आपले सैन्य पाठविले. या कारवाईसंबंधी काही लोकांच्या ज्या कल्पना आहेत त्या थोड्याशा दुरुस्त करावयास पाहिजेत. मी आपणांस सांगू इच्छितो की, लाहोरच्या भागात आम्ही जे सैन्य पाठविले ते पाकिस्तान कावीज करण्याच्या हेतूने नव्हे. आम्हाला यापुढे एक गोष्ट निश्चित केली पाहिजे. सेनापतीच्या मनात एक विचार, पंतप्रधानांच्या मनात दुसरा विचार आणि या सर्वांचा जनतेच्या मनात तिसराच अर्थ, असे झाल्यास या देशाचे काम आपणास नीट चालविता येणार नाही. कोणत्या हेतूने हे सर्व घडत होते याचे संपूर्ण चित्र तुमच्या मनात असले पाहिजे; आणि म्हणून हे सैन्य पाठविण्याच्या पाठीमागे कोणता हेतू होता हे मी आपणांस सांगू इच्छितो. हिंदुस्थानला अडचणीत गाठून त्याची शोभा करावी असा विचार चीनने नेफामध्ये केला. तशाच प्रकारचा थोडासा विचार पाकिस्तानने कच्छमध्ये करण्याचा प्रयत्न केला. आम्ही फक्त धर्मयुद्धाचे सगळे नियम पाळावेत आणि यांनी आम्हाला कठीण प्रसंगामध्ये गाठून आमचा गळा दाबण्याचा प्रयत्न करावा, याला कधीतरी आळा बसलाच पाहिजे. पाकिस्तानची शस्त्रास्त्रे आणि त्यांची आयुधे, त्यांची सेना आणि तिचे सामर्थ्य यांची, आणि हिंदुस्थानचे सामर्थ्य आणि हिंदुस्थानचे शौर्य यांची, एकदा परीक्षाच करावयाची असली तर त्यासाठी हिंदुस्थानची भूमी निवडण्यापेक्षा पाकिस्तानच्या भूमीवरच हा खेळ खेळला पाहिजे या निर्णयाप्रत आम्ही आलो. पश्चिम पाकिस्तानची गोष्ट मी बोलतो आहे. त्यांचे ते पॅटन रणगाडे, त्यांची ती सुसज्ज सेना यासंबंधी गेली तीन वर्षे मी ऐकत होतो. बाहेरचे आणि आमच्यातलेही काही तज्ज्ञ आम्हाला सांगत की, हे सर्व आपल्याला न झेपणारे असे काम आहे. त्यांचे म्हणणे असे की, पाकिस्तानजवळ रणगाडे बरेच आणि त्यांचे वायु-दलही मोठे जबरदस्त आहे. याला मी होय म्हणू, तर स्वाभिमान दुखावतो; नाही म्हणू तर काल मुंबईहून आलात आणि लागलीच तज्ज्ञाच्या गोष्टी बोलू लागलात असा आरोप येतो, अशा विचित्र पेचात मी सापडलो होतो.

एकदा लोकसभेमध्ये थोडेसे जोराने बोलण्याचा मी प्रयत्न केला. पण मला मध्येच कोणी तरी विचारले, " एका बाजूने पाकिस्तान आणि दुसऱ्या बाजूने चीन आला तर तुम्ही काय करणार ? " मी उत्तर दिले, " लढणार, दोघांशीही लढणार. " इतक्यात मला ज्यांच्याबद्दल आदर आहे असे एक मोठे पुढारी मला म्हणाले, " असे बोलू नका. तुम्ही शिवाजीच्या प्रदेशातले आहात. शिवाजी तोंडाने लढत नव्हता. तो तलवारीने बोलत होता. " आज मला सांगण्यास आनंद वाटतो की, शब्दाने लढू नका, तलवारीने बोला असे आता मला कोणी डिवचून बोलणार नाही. ही गोष्ट मी आपणाला अशासाठी सांगितली की, वरील प्रकारची हवा येथे बनून राहिलेली होती. पण आज लाहोर व सियालकोटमध्ये जे घडून आले आहे त्यामुळे या सगळ्या मंडळींना प्रश्न पडला आहे की हे सर्व घडले कसे ?

सप्टेंबर महिन्याच्या आठ, नऊ, दहा या तीन तारखा म्हणजे लाहोरच्या क्षेत्रात झालेल्या लढाईतील एक महान पेच होता. सगळ्याच गोष्टी तुमच्या-पर्यंत पोहोचत होत्या की नाही हे मला माहीत नाही. परंतु ८-९-१० या दिवशी खेमकरणच्या म्हणजे हिंदुस्थानच्या भूमीवर ती लढाई झाली होती. खेमकरणचा अठ्ठावीस चौरस मैलांचा जो भाग आहे तेथे ही लढाई झाली. रणगाड्यांची ही लढाई तीन दिवस चालली. आणि जिचा स्वत: प्रेसिडेन्ट आयूबखानांनी आपल्या भाषणात उल्लेख केला ती दुसरी लढाई सियालकोटजवळ झाली. या लढाईमध्ये सहाशे रणगाडे होते, त्यांपैकी सुमारे पाचशे पाकिस्तानचेच असावेत. या दोन लढायांनी रणगाड्यांच्या लढाईचा हिंदुस्थानात नवीन इतिहास निर्माण केला. तारीख ८-९-१० हे तीन दिवस मी मन खंबीर करून बसलो होतो. युद्धाची हकीगत तोलामोलाची होती. दोन्ही सैन्ये एकमेकांशी झुंजत होती. गेली दहा वर्षे पाकिस्तानने आपल्या आश्रयदात्यांच्या मदतीने आपले सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न केला होता. लाहोरच्या पूर्वेला आपल्या सैन्याची त्याने जी रचना केली होती ती नुसती संरक्षणाची योजना नव्हती, तर प्रसंग पडल्यास हिंदुस्थानवर आक्रमण करण्याची ती तयारी होती. पण या तीन दिवसांच्या लढाईत या पॅटन रणगाड्यांविरुद्ध आपल्या

सैन्याने केवढा मोठा पराक्रम केला. हा पॅटन रणगाडा म्हणजे एक प्रकारचे प्रचंड यंत्र आहे, एक मोठे जबरदस्त शस्त्र आहे. चाळीस टनी वजनाचा हा रणगाडा एखाद्या अजस्र राक्षसासारखा भासतो. त्याची ती नव्वद मिलिमीटरची तोफ, अत्यंत आधुनिक तऱ्हेच्या इलेक्ट्रॉनिक्सच्या पद्धतीने शत्रूच्या सेनेची पाहणी व टेहेळणी करण्याची त्याची यंत्रणा, बंदुकीचा व तोफेचा मारा करण्याची त्याची ताकद आणि आत असलेल्या माणसाच्या संरक्षणाची त्यात केलेली व्यवस्था, हे सर्व लक्षात घेतले म्हणजे पॅटन रणगाडा हे किती अजस्र शस्त्र आहे याची आपल्याला कल्पना येईल. पण तंत्रज्ञांनी कितीही नवीन नवीन शस्त्रे शोधून काढली असली, नवे शोध लावून कितीही नव्या सामर्थ्यांना जन्म दिला असला तरी सगळ्यात मोठे सामर्थ्य शेवटी ईश्वराने निर्माण केले आहे आणि ते म्हणजे मनुष्य आणि त्याची जिद्द. त्याच्याइतके समर्थ शस्त्र आजपर्यंत निर्माण झालेले नाही. सियालकोट विभागामध्ये जी लढाई झाली ती हिंदुस्थानच्या इतिहासात अमर राहील. या लढाईत एका बाजूने पाकिस्तानचे आणि दुसऱ्या बाजूने हिंदुस्थानचे रणगाडे एकमेकांना भिडले. एका दिवसाच्या याल ढाईत पाकिस्तानचे सदुसष्ट पॅटन रणगाडे गारद झाले तर आपले फक्त सहाच रणगाडे खर्ची पडले. या लढाईत आपल्या सैनिकांचे शौर्य तर दिसलेच, पण तीत आपल्या सामर्थ्याचीही प्रचिती आली. माणसाचे मन पराकोटीला जाऊन पोहोचले की मग ईर्षा निर्माण होते, जिद्द निर्माण होते. एकदा हे सर्व हिमालयात झाले आणि पुन्हा हे आता काश्मीरमध्ये सुरू आहे. मान ताठ ठेवून एकमुठीने या संकटाशी अखेरपर्यंत आता सामना दिलाच पाहिजे, या जिद्दीने आमच्यातला लहानातला लहान सैनिक, तरुणातला तरुण अधिकारी या वेळी लढला. हिंदुस्थानच्या या सैनिकांचा आणि त्यांचे नेतृत्व करणाऱ्या अधिकाऱ्यांचा मला फार अभिमान वाटतो. ते सर्व या वेळी फार बहादुरीने लढले. हिंदुस्थानच्या सर्व कोनाकोपऱ्यांतून त्यांचा भरणा झालेला आहे. त्यांत हिंदू आहेत, मुसलमान आहेत, शीख आहेत, पारशी आहेत, ॲग्लोइंडियन्स आहेत. हिंदुस्थानचा हा नवा इतिहास शब्दाने लिहिला गेलेला नाही. पंजाबच्या आणि काश्मीरच्या भूमीवर हिंदू, मुसलमान, शीख, पारशी या

सगळ्यांनी आपल्या रक्ताने हिंदुस्थानचा हा नवा इतिहास लिहिलेला आहे. तुम्हा-आम्हाला कायमची जाणीव राहील असाच हा इतिहास आहे.

खेमकरणच्या रणभूमीवर भाताच्या आणि उसाच्या शेतीमध्ये पराजित होऊन पडलेले सर्व पॅटन रणगाडे मी प्रत्यक्ष पाहिले. खेमकरणची ही रणभूमी पॅटन रणगाड्यांची स्मशानभूमी ठरली. तेथल्या दोन-चार खेड्यांची मी पाहणी केली आणि ती खेडी पाहिल्यानंतर मला माझ्या लहानपणच्या खेड्यांची आठवण झाली. त्या खेड्यांसारखीच ही खेडी आहेत. आमच्या लहानपणी आम्ही खेड्यांतून हिंडत होतो त्या वेळी त्या खेड्यांच्या आवती-भोवती मोडलेल्या बैलगाड्या पडलेल्या असावयाच्या. खेमकरणच्या खेड्यांच्या आवतीभोवती बैलगाड्यांऐवजी मोडलेले पॅटन रणगाडे पडलेले होते, एवढाच फक्त फरक होता. मी हे ज्याचे वर्णन करतो आहे तो प्रत्यक्ष घडलेला इतिहास आहे. हा इतिहास तुम्ही-आम्ही घडविला. अशा प्रकारचा इतिहास घडविण्याचे सामर्थ्य तुमच्या आमच्यात आहे याची प्रचीती आम्हाला या लढाईत आली, आणि हेच सामर्थ्य तुम्हा-आम्हाला आता वाढवावयाचे आहे. हा सर्व इतिहास घडत असताना हिंदुस्थानचा संरक्षणमंत्री म्हणून जबाबदारी पेलण्याचे भाग्य तुमच्या सगळ्यांच्या आशीर्वादाने मला लाभले याचा मला जरूर अभिमान आहे. पण त्याच-बरोबर हा इतिहास घडत असताना मी हिंदुस्थानचा नागरिक होतो, याचाही मला अतिशय अभिमान वाटतो.

पण हा इतिहास घडण्यापूर्वी हिंदुस्थानचे चित्र काय होते? मला ऑगस्टची आठ तारीख आठवते. मी विशाखापट्टणला आरमाराची पाहणी करण्याकरिता गेलो होतो. पाकिस्तानातून काश्मीरमध्ये घुसखोर येऊ लागल्याची खबर पूर्वीच मिळाली होती. म्हणून तातडीने मी मध्यरात्री दिल्लीला परत आलो. त्या मध्यरात्रीपासून हिंदुस्थानचा नवा इतिहास घडण्यास सुरुवात झाली. हे प्रकरण वाढते आहे याचे स्पष्ट चित्र मला माझ्या मनामध्ये दिसत होते. त्याचा स्पष्ट उल्लेख मी माझ्या पार्लमेंटमधील एका निवेदनात केला होता. आपण कोणत्या दिशेने जाणार आहोत याचे चित्र माझ्या मनात होते. पण त्या वेळी देशामध्ये एक वेगळे वातावरण

निर्माण होत होते. पंजाबमध्ये संत फत्तेसिंगांनी पंजाबी सुभ्याच्या निर्मिती-साठी आमरण उपोषणाची आपली प्रतिज्ञा जाहीर केली होती. मुंबई बंद, पुणे बंद, हिंदुस्थान बंद अशा बंदच्या घोषणा होत होत्या. अन्नधान्याच्या प्रश्नाने माणसांची मने हवालदिल झाली होती. जातीय दंग्याची हवा काही ठिकाणी सुरू झाली होती; आणि हे सगळे होत असताना, या सर्व प्रश्नांच्या पोटात हिंदुस्थान व पाकिस्तान यांच्यामधल्या संग्रामाचा संभव एकसारखा वाढत होता. पण या सर्व घडामोडींतून हिंदुस्थानसंबंधीचा बरोबर अंदाज इतर देशांना घेता आला नाही. हिंदुस्थानची अंतस्थ परिस्थिती फार विकट आहे अशी त्यांनी कल्पना करून घेतली. पण या संघर्षात त्यांना प्रत्यक्ष जे दिसले त्याने ते दिपून गेले. हिंदुस्थानची खरी शान यात आहे. मत-भेद बोलावयास पाहिजे होते त्या वेळी ते आम्ही बोलून दाखविले. पण आमचा शत्रू जेव्हा आमच्यावर चालून आला तेव्हा हिंदुस्थानने आपल्या शौर्याचा आणि स्वाभिमानाचा फणा काढून एकमुखाने त्याला तोंड दिले. हिंदुस्थानचे हे चित्र तुम्ही आम्ही गेल्या पंधरा दिवसांत पाहिले. हा लोक-शाहीचा हिंदुस्थान आहे. या हिंदुस्थानचा नागरिक म्हणून राहण्याचा मला जरूर अभिमान वाटतो असे जे मी आताच म्हटले त्याच्या पाठी-मागची मनोभूमिका ही आहे.

पण एक गोष्ट मात्र मला आपल्याला स्पष्ट सांगितली पाहिजे. ती ही की, संग्रामाची ही कथा अद्यापि अर्धी राहिलेली आहे. अजूनही पाकि-स्तानने लष्करी शक्तीचा वापर न करण्याचे ठरविलेले दिसत नाही. काल परवाच लष्कर हटविण्याची कल्पना आणि विचार आपल्या मनामध्ये नसल्याचे पाकिस्तानने जाहीर केले आहे. याचा अर्थच हा आहे की, युद्धबंदी झाल्यामुळे सर्व प्रश्न संपले आहेत असे ते मानीत नाहीत. आपल्या माहितीकरिता आणि त्यांच्याही माहितीकरिता मला सांगितले पाहिजे की, आम्हीही तसे मानीत नाही. परत त्याच रस्त्याने जावे लागले तर आम्ही जाऊही. पण आम्हाला त्याची हौस आहे असा याचा अर्थ नाही. मात्र यात परीक्षा होणार आहे ती बाहेरच्या पंचांची. शक्तीने कोठलाही प्रश्न सोडवून घेण्याचा यापुढे प्रयत्न झाला तर हिंदुस्थानची

प्रतिक्रिया काय राहील याचा त्यांनी विचार करावा; आणि त्यांनी ह्याही गोष्टीचा विचार करावा की, जागतिक शांततेच्या प्रश्नाला मदत करणारे, शांततेच्या धोरणाने चालणारे, लोकशाही तत्त्वावर आधारलेले, सर्व धर्मांना समान मानणारे असे कोणते राष्ट्र हिंदुस्थानशिवाय या आशिया खंडात आहे ? या राष्ट्राच्या आणि ज्या मूल्यांवर हे राष्ट्र आधारलेले आहे त्या मूल्यांच्या रक्षणाकरिता त्यांची शक्ती आणि त्यांच्या सत्प्रवृत्ती, त्यांचे आशीर्वाद आणि त्यांचे सद्भाव, या राष्ट्राच्या पाठीमागे उभे राहणार आहेत की हुकूमशाहीच्या राजवटीने झिंगलेल्या आणि लढाईची भीती दाखवून इतरांना सतत संकटात टाकण्याचा विडा उचलणाऱ्यांना ते मदत करणार आहेत ? आमच्या मते दुनियेतील पंचांच्यापुढे हाच आज खरा प्रश्न आहे. त्याचा त्यांनी जरूर विचार करावा. आम्ही आमच्या परीने प्रयत्न करून राहिलो आहोत. आमची बाजू, आमची भूमिका, त्यांना नीट कळावी—सद्भावनेने, मैत्रीच्या भावनेने त्यांना कळावी या हेतूने आम्ही आमचे दूत परदेशात पाठविले आहेत. जगाचा निवाडा करण्याची भूमिका घेऊन बसणाऱ्या या पंचांच्या हातात न्यायाचा तराजू आहे की स्वतःच्या स्वार्थाचा विचार आहे याची आता परीक्षा होणार आहे. पण आमचा निर्णय पक्का आहे. शांतता हवी असेल तर शांततेला जरूर मदत करू, पण स्वाभिमानाची 'किंमत देऊन नाही. पंडित नेहरूंनी सांगितलेल्या तत्त्वांवर विश्वास ठेवूनही शास्त्रीजींनी हे विचार मांडले आहेत. ' कम् व्हॉट मे ' ही शास्त्रीजींची घोषणा आहे. हा त्यांचा निर्णय आहे. मग त्याचे जे परिणाम होणार असतील ते होवोत. आम्ही निर्धाराने आणि न्यायाच्या दृष्टीने जे विचार आणि ज्या कल्पना मांडल्या त्यांच्याशी आम्ही जरूर पक्केपणाने राहू. पण सक्तीने, शस्त्रांच्या जोरावर, दोन विधर्मी राष्ट्रांचा सिद्धांत आमच्या गळ्यात मारून काश्मीर आमच्या हातून घेण्याचा कोणी प्रयत्न करील तर त्याच्याशी आम्हाला लढावे लागेल. दुसरी कोठलीही गोष्ट आम्हाला मंजूर नाही. ही भूमिका घेऊन हिंदुस्थान आज या राष्ट्रांशी बोलणी करण्याचा प्रयत्न करतो आहे. ज्यांनी मदत केली त्यांच्या मदतीने, ज्यांनी मदत केली नाही त्यांच्या मदतीशिवाय आम्ही

लढलो आहोत. आमचे राष्ट्र संकटकाळात सुरक्षित ठेवणे हाच खरा आमच्यापुढे आज महत्त्वाचा प्रश्न आहे, आणि म्हणून मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपण या देशात एक नवीन मन:स्थिती निर्माण केली पाहिजे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गेली दहा-पंधरा वर्षे देशाची प्रगती व्हावी, विकास व्हावा म्हणून जे प्रयत्न चालू आहेत त्यांना आपण वाहून घेतले आहे. मीही आपल्यापैकीच एक आहे. प्रगती घडून येऊन सुखसमृद्धी व्हावी आणि जनतेच्या जीवनाचा दर्जा सुधारावा यासाठीच तर आपण स्वातंत्र्य मिळविले आहे. या सगळ्या गोष्टी घडल्या पाहिजेत. पण या सर्व गोष्टी काही काळ बंद ठेवून, कुणाचीही मदत न घेता अंतर्गत साधनांवरच अवलंबून राहून आम्हाला जगण्याची वेळ येणार असेल तर त्यासाठीही तुमची आमची तयारी असली पाहिजे.

संरक्षणासाठी निधी द्या अशी मी हल्ली कोणाकडे मागणी करीत नाही. देश संकटात सापडला आहे अशा वेळी देशासाठी ज्याला द्यावयाचे आहे तो आपुलकीने देईल, खुषीने देईल याबद्दल माझ्या मनात शंका नाही. जो खुषीने देणार नसेल त्याच्यासाठी राष्ट्र दुसरा विचार करील. पण हा प्रश्न महत्त्वाचा नाही. जे पाहिजे ते आपल्याजवळ नाही अशी जेव्हा परिस्थिती निर्माण होईल तेव्हा आपण कसे वागणार आहोत हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. आमची अशी कल्पना झाली आहे की, अमेरिकेकडून येणाऱ्या धान्याच्या बोटींमुळे आम्ही जगलो आहोत. मी आपणाला सांगू इच्छितो की, सत्तरऐंशी टक्के शेती करणाऱ्या या देशाला, पाच-दहा टक्के अन्नधान्याची जी कमतरता भासते ती या संकटाच्या काळी जर कोणी देणार नसेल, तर केवळ त्यामुळे आम्ही मरणार नाही; आणि असे मरणाच्या लायकीचे जर आम्ही लोक असलो तर आम्हाला दुसरा कोणी वाचवूही शकणार नाही. एक तीळ सात भावांनी खाल्ला अशी कहाणी आम्ही ऐकतो. इंग्रज येथे राज्य करीत होता तेव्हा त्याने आपल्या साम्राज्यरक्षणाकरिता रेशनिंग आणले, नियंत्रणे आणली, त्याचा सर्व त्रास आम्ही सहन केला. मग स्वत:च्या देशासाठी तसाच प्रसंग आला तर

आम्ही हे सर्व सहन करणार नाही असे कसे होईल ? आणि ते सहन करावेच लागेल.

आम्हाला सगळ्यांचीच मैत्री हवी आहे. इंडोनेशियाची, मलेशियाची, इंग्लंडची, अमेरिकेची, सोव्हिएट रशियाची, अरब राष्ट्रांची, फ्रान्सची, सगळ्यांचीच मैत्री आम्हाला हवी आहे. ती मैत्री साधण्यासाठी आम्ही जरूर प्रयत्न करू. आमचे मन त्यांना समजून सांगण्याचा आणि त्यांचे मन समजून घेण्याचा आम्ही प्रयत्न करू. पण, हिंदुस्थानने जो मार्ग स्वीकारलेला आहे त्या मार्गावरची त्याची सफर चालूच राहील. " कम व्हॉट मे " संकटे येतील, संकटे सहन करू. आशीर्वाद मिळतील, आशीर्वाद घेऊ. चांगल्या कर्तृत्वाची फलिते हातात येतील त्यांचा आनंदाने स्वीकार करू. परंतु ज्या मार्गाने जाण्याकरिता हिंदुस्थानने पाऊल उचलले आहे त्या मार्गावरून हिंदुस्थान आपले पाऊल मागे घेणार नाही. " कम व्हॉट मे " हा शास्त्रीजींच्या हिंदुस्थानचा निर्धार आहे.

हिंदुस्थानच्या जीवनामध्ये आज जी आव्हाने आहेत ती आपण स्वीकारली पाहिजेत. ती स्वीकारण्याचा आपण प्रयत्न करतो आहोत. परंतु मी आपणांस सांगू इच्छितो की, जोपर्यंत हिंदुस्थान व हिंदुस्थानने स्वीकारलेली मूलभूत तत्त्वे यांच्यासंबंधी स्नेहभावाची दृष्टी काही राष्ट्रे स्वीकारीत नाहीत तोपर्यंत हिंदुस्थानला या तत्त्वासाठी झगडत राहावे लागेल, लढत राहावे लागेल, आपल्या तत्त्वांना बळकटी येईपर्यंत त्याला तिष्ठत राहावे लागेल. हे काम निव्वळ कोणाच्या मदतीने होणार नसून तुमच्या आमच्या सर्वांच्या ताकदीने ते पूर्ण होणार आहे. तुम्हा-आम्हाला आज स्वतःच उभे राहिले पाहिजे, स्वतःची ताकद वाढविली पाहिजे. राष्ट्र त्यामुळे घडते, राष्ट्र त्यामुळे बनते.

मला आपल्याला आणखी दोन-तीन गोष्टी सांगाव्याशा वाटतात. सैन्यात जी कर्तबगार माणसे असतात त्यांची आठवण तुम्हा-आम्हाला विसरता येणार नाही. लढाईची वर्णने ऐकताना फार बरे वाटते. पण त्यासाठी भयंकर किंमत द्यावी लागते. जे पाठीमागे राहतात ते वीर ठरतात, शूर ठरतात, यशस्वी सेनापती ठरतात. इतिहासात त्यांची नावे लिहिली जातात,

त्यांना मानसन्मान मिळतात. पण लढाईत ज्यांचे बलिदान होते त्या शूर वीरांचे जीवन किती मोलाचे असते याची आपणास कदाचित कल्पना नसेल. आजकालच्या सैन्यात, वायुदलात किंवा नौसेनेत केवळ मरण पत्करण्यास सिद्ध झालेल्या माणसाला प्रवेश मिळत नाही. तेथले अधिपती त्याला सांगत असतात, 'तुझी बलिदानाची नुसती तयारी आम्हाला नको आहे. जीवनामध्ये देण्यासारखे तुझ्याजवळ उत्कृष्ट असे काही आहे असे तू सिद्ध करशील तरच बलिदानावर तुझा अधिकार राहील.' उत्कृष्ट बुद्धिमत्ता, उत्कृष्ट शरीरसंपदा, कठीण प्रसंगाला धैर्याने तोंड देण्याचे आणि निर्णय घेण्याचे सामर्थ्य इत्यादी गोष्टी त्याच्याजवळ आहेत किंवा नाहीत याची त्याला परीक्षा द्यावी लागते. झाडावर फुललेले सुंदर फूल जसे आपण देवाला वाहतो त्याचप्रमाणे अत्यंत हुषार, अत्यंत कर्तृत्ववान, अत्यंत समर्थ, नेतृत्वाचे सर्व गुण अंगी असलेली अशी आमच्यातील वेचक वेचक तरुण मुले, आमच्या जीवनाचा, आमच्या संसाराचा हा सुंदर, भव्य फुलोरा, आम्हाला रणचंडीला अर्पण करावा लागतो. त्यांची आठवण आम्हाला कशी विसरता येईल? हे इतके मोल देऊन राष्ट्र वनविण्याचा आज आपण प्रयत्न करतो आहोत.

लाहोर, सियालकोट विभागामध्ये हिंडताना मला अनेक सैनिक भेटले. पंजाबी भेटले, राजस्थानी भेटले, केरळकडले भेटले, महाराष्ट्रातले भेटले. त्या सगळ्यांना गेले पंधरा-वीस दिवस मुळीच उसंत नव्हती. ६ तारखेला सुरू झालेली लढाई २४ तारखेच्या पहाटेपर्यंत चालली होती. खेड्या-खेड्यांतली लहान लहान मुले तुमच्या नावांचा जयजयकार करतात, गावागावातल्या सगळ्यांचे आशीर्वाद तुमच्या मागे आहेत असे मी त्यांना सांगताच त्यांच्या डोळ्यांत मला जो विलक्षण आनंद दिसला, तसा आनंद मी माझ्या जन्मात कधीही पाहिलेला नाही. हे सारे सैनिक कशासाठी लढताहेत, कशासाठी प्राणहुती देत आहेत? घराघरांतून आज जी नवीन नवीन पुष्पे फुलत आहेत, ती फुलून विकसित व्हावीत, त्यांचा सुगंध सर्वत्र पसरावा म्हणून लाख मोलाची ही माणसे आपले बलिदान करण्यास तयार झाली आहेत याची आठवण तुम्ही-आम्ही सदैव ठेवली पाहिजे.

गुजराथचे मुख्यमंत्री श्री. बलवंतराय मेहता यांचा मृत्यू हा आपल्या मर्मस्थानी झालेला या लढाईतला मोठा आघात होय. द्वारकेच्या बाजूने पाकिस्तानी नौसेनेने केलेल्या अचानक हल्ल्यात अनेक लोकांना दु:खाचा तडाखा बसला होता. त्या दु:खी जनतेचे अश्रू पुसण्यासाठी बलवंतराय आपल्या पत्नीसमवेत एका नि:शस्त्र विमानातून चालले होते. परंतु या नि:शस्त्र विमानावर पाकिस्तानी विमानदलाने अमानुष हल्ला केला, आणि या हल्ल्यात बलवंतराय पतिपत्नींना मृत्युमुखी पडावे लागले. कोठलाही वीर सैनिक, मग तो शत्रुपक्षाचा असला तरी नि:शस्त्र माणसाशी कधी लढत नसतो. विमानातून लढणारा वैमानिक जोपर्यंत विमानात आहे तोपर्यंत तो शत्रू. विमानावर हल्ला होऊन तो शत्रुप्रदेशात उतरला तर त्यालाही सहकाऱ्याची वागणूक द्यावयाची ही युद्धनीती आजही पाळली जाते. प्रत्यक्ष बॉम्बगोळे फेकणाऱ्या वैमानिकासंबंधी ही नीती पाळली जाते. पण लोकसेवेशिवाय ज्याच्या हातात दुसरे शस्त्र नव्हते अशा बलवंतराय मेहतांवर पाकिस्तानी विमानदलाकडून भ्याडपणे हल्ला चढविण्यात आला. त्यांच्यावर झालेला हा हल्ला हिंदुस्थानच्या अंत:करणावर फार खोल जखम करून गेला आहे. आम्हाला तो विसरता येणार नाही. विशाल मुंबई राज्यामधले ते आमचे एक सहकारी होते. संस्थानी राजवटीविरुद्ध प्रजापरिषदेचे त्यांनी फार मोठे नेतृत्व केले होते. पंचायती राज्याच्या बिचाराला थोडेसे वेगळे स्वरूप देऊन शब्दरूपाने तो यथोचित मांडण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता. असा हा आमचा साथी अमानुषपणे मारला गेला, त्याचे दु:ख आम्हाला आहे. ते दु:ख आमच्या मनात फार खोल घुसून बसले आहे.

सांगण्यासारख्या अशा अनेक गोष्टी आहेत, मनामध्ये अनेक विचार आहेत. या राज्यामध्ये श्री. वसंतराव नाइकांनी चांगली पावले टाकली आहेत. सबंध देशात जोपर्यंत सध्याचे वातावरण भरून आहे तोपर्यंत उत्पादनाच्या क्षेत्रात आम्ही वेगाने प्रगती करून दाखविली पाहिजे. ज्याला आपण उद्दिष्टे म्हणतो ती आपण आता निश्चित ठरवून घेतली पाहिजेत. मालाच्या किंमती वाढणार नाहीत, गोरगरिबांचे हाल होणार नाहीत याची

काळजी जशी सरकारने घेतली पाहिजे तशीच ती जनतेच्या संघटनांनीही घेतली पाहिजे. विचारपूर्वक हा प्रयत्न झाला पाहिजे. शेतीच्या उत्पादनाकडे जसे आम्हाला लक्ष दिले पाहिजे त्याचप्रमाणे इतर उत्पादनाकडेही आम्ही लक्ष पुरविले पाहिजे. उत्पादनाच्या बाबतीत ज्याला एक प्रकारची शिस्त म्हणतात ती आपण स्वतःच घालून घेतली पाहिजे. कारखानदारांमध्ये, कामगारांमध्ये आणि शासनामध्ये खराखुरा शांततेचा करार होऊन 'बंद'ची भाषा बंद झाली पाहिजे. जर काही बंदच करावयाचे असेल तर हे बंद करण्याचे धोरण बंद केले पाहिजे. संप होऊ नयेत पण त्याबरोबर संप नाहीत म्हणून कामगारांवर अन्याय करण्याचे एखाद्या मालकाने ठरविले तर त्यालाही चोरवाट सापडता कामा नये. त्याचाही विचार झाला पाहिजे. उत्पादनाच्या क्षेत्रात कोठल्याही तऱ्हेच्या काल्पनिक अगर कृत्रिम परिस्थितीमुळे अडचणी निर्माण होणार नाहीत अशा प्रकारचे वातावरण आपण येथे तयार करू या.

शेतीच्या प्रश्नासंबंधी मघाशी वसंतरावजींनी आपल्याला सांगितलेच आहे. वसंतरावजींनी फार मोठी गंभीर प्रतिज्ञा केली आहे. ती नुसती घोषणा नाही. माझा त्यांच्या शब्दावर विश्वास आहे. फक्त एकच गोष्ट मी त्यांना सांगणार आहे. लोकशाहीच्या राज्यामध्ये कोणी कोणाला फाशी देऊ शकत नाही. त्यांच्या प्रतिज्ञेचा खरा अर्थ हा आहे की, त्यांनी जे करावयाचे ठरविले आहे ते केलेच पाहिजे. आपल्याला आता शेतकऱ्यांकडे गेले पाहिजे. मला वाटते हा साधा हिशेब आहे. आम्ही द्राक्षाची शेती वाढवू शकतो, उसाची शेती वाढवू शकतो, दुसऱ्या कुठल्याही प्रकारची शेती वाढवू शकतो, तर मग या देशातल्या लोकांना लागणाऱ्या धान्याची शेती आपण का वाढवू शकत नाही ? एकदा करू या आपण हा प्रयत्न. शिवाजीच्या काळात मावळ्यांना उठविले आणि स्वराज्याचे तोरण बांधले गेले. त्या लढाईमध्ये ते योग्य होते. पण आजच्या ह्या लढाईमध्ये प्रत्येक नागरिकाला सैनिकासारखे लढावे लागणार आहे. तुम्हा-आम्हाला जर सैनिकासारखे काम करावयाचे असेल तर महाराष्ट्रामध्ये तुमच्या मुख्य मंत्र्यांनी केलेली घोषणा तुम्ही खरी करून दाखविली पाहिजे. ही घोषणा म्हणजे महाराष्ट्रातील

लाखो शेतकऱ्यांना आव्हान आहे. दहा टक्के उत्पादन वाढविण्याचे हे तुम्हाला आव्हान आहे. ते आपण जिद्दीने स्वीकारले पाहिजे, आणि हे वाढलेले उत्पादन, पंचायतींच्या ताब्यामध्ये, सहकारी संस्थांच्या ताब्यामध्ये तुम्ही दिले पाहिजे. आम्हाला संरक्षणनिधीऐवजी तुम्ही आता हा निधी द्या. उसाची शेती कमी करा असे मला सुचवावयाचे नाही. पण जरूर पडली तर तेही करा असे मी म्हणेन. सहकारी साखर कारखान्यांच्या वाढीसाठी मी हातभार लावलेला आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा, महाराष्ट्रातील सहकारी कारखानदारीचा, महाराष्ट्रातील बागायती शेतीचा मला अभिमान आहे. पण आज अन्नधान्याच्या बाबतीत परिस्थितीचे जे आव्हान आहे ते आपण स्वीकारले पाहिजे. त्यासाठी एक प्रकारची निश्चित योजना आपण तयार केली पाहिजे. आज सगळ्यांची मने एक झाली आहेत तेव्हा हे सहज शक्य होईल. आपल्यावर आलेले हे संकट संपल्यानंतर पक्षोपपक्षांनी जरूर भांडावे. त्याला माझी हरकत नाही. मग सर्व आखाडे मोकळे आहेत. वैचारिक भूमिकेवर आधारलेले निरनिराळे दृष्टिकोण जनतेसमोर आले पाहिजेत. त्यामुळे लोकशाहीची वाढ होते असा माझा विश्वास आहे. पण एकत्र बसून काम करण्याची आज जी संधी आली आहे तिचा आपण उपयोग करून घेऊ या. हिंदुस्थानने दिलेली ही हाक ऐकून त्याच्या सेवेसाठी आपण धावून गेलो नाही तर हिंदुस्थानचा भावी इतिहास आपल्याला माफ करणार नाही. माझ्यातर्फे नम्रपणे मी आपल्याला एवढेच सांगेन की, तुमच्या आशीर्वादाने काम करण्याची मला ही जी संधी मिळाली आहे त्या संधीचा फायदा घेऊन काम करताना महाराष्ट्राला कोठेही कमीपणा येणार नाही अशी मी काळजी घेईन. व्यक्ती म्हणून मी काम करतो अशी माझी भावना नाही. पंडितजींनी मला बोलावले म्हणून मी गेलो. आज तुम्हाला सांगावयास हरकत नाही की, ज्या वेळी संरक्षण-मंत्रिपदाचा प्रश्न त्यांनी माझ्यापुढे ठेवला त्या वेळी, मी हे पद स्वीकारावे की नाही याचा विचार त्यांनी करावयाचा आहे, मी नाही, असे मी त्यांना उत्तर दिले. हे पद स्वीकारण्यासंबंधीची माझी भावना ही अशी कर्तव्य-पालनाची होती.

मी आज तेथे गेलो आहे तो तुमचा शिपाई म्हणून गेलो आहे. तुमचे आशीर्वाद, तुमच्या सदिच्छा हेच माझे सामर्थ्य राहील. त्याची कधीही कमतरता दाखवू नका. भगिनींना आणि मातांनाही मी हीच विनंती करीन. त्यांच्या आशीर्वादांचीही मला आज फार गरज आहे. शेवटी एक गोष्ट लक्षात असू द्या की ही लढाई आहे. लढाईचा ताजवा डावा उजवा होतो. म्हणून ताजवा कधी डावीकडे, कधी उजवीकडे झाला तर आपण मनात खिन्न होऊ नका. अखेरची लढाई भारतच जिंकणार आहे. कारण भारताच्या बाजूला न्याय आहे. जयहिंद.

जाहीर सभा, महाराष्ट्र क्लब मैदान, पुणे, दि. ३ १०-६५

७ संकट ही संधि

आज आपण माझे भाषण ऐकण्यासाठी येथे मोठ्या उत्साहाने जमला आहात, त्याबद्दल प्रथम मी आपले आभार मानतो. देशात आज जी परिस्थिती आहे तिच्यासंबंधी मी आपल्यासमोर थोडेफार बोलणार आहे. १९६५ साल हे हिंदुस्थानच्या इतिहासामध्ये एक महत्त्वाचे वर्ष मानले जाईल. या साली सुरू झालेले आपल्या देशाच्या इतिहासाचे प्रकरण अद्यापि संपलेले नसून त्याची वाटचाल चालूच आहे. ही वाटचाल कशा प्रकारे होत राहणार आहे, याचा अंदाज आज सांगता येणार नाही. पण एक गोष्ट मात्र खरी की, हिंदुस्थानच्या स्वाभिमानावर १९६५ साली फार मोठा आघात झाला. काश्मीरचा प्रश्न नवीन नव्हता. काश्मीरच्या प्रश्नाने अनेक वेळा वेगवेगळी रूपे घेतली आहेत. पहिली सुरुवात आक्रमणाने झाली. नंतर हे आक्रमण थांबले. परंतु मध्यंतरीच्या काळात अनेक गोष्टी घडल्या आणि पुन्हा दुसरे आक्रमण १९६५ च्या ऑगस्ट-मध्ये झाले. त्याची कसकशी प्रगती झाली त्याचा इतिहास आता सगळ्या दुनियेला माहीत आहे. जी गोष्ट हिंदुस्थान तत्त्व म्हणून स्वीकारीत नाही,

जी गोष्ट स्वीकारणे त्याला इष्ट वाटत नाही, जी गोष्ट त्याला मंजूर नाही ती गोष्ट सामर्थ्याच्या जोरावर त्याच्यावर लादण्याचा प्रयत्न झाला तर त्या सामर्थ्याला तितक्याच सामर्थ्याने हिंदुस्थान उत्तर देऊ शकतो ही गोष्ट आमच्या सेनादलाने दुनियेला दाखवून दिली. गांधीजींच्या या पवित्र भूमीत उभा राहून मी बोलतो आहे. गांधीजींच्या विचाराच्या ज्या निष्ठा होत्या त्या निष्ठा देशाच्या मनात आजही कायम आहेत. त्यांनी जो हिंदुस्थान बनविला, तो बनत असताना सबंध मानवतेचे चित्र त्यांच्या डोळ्यांपुढे होते. शांततेने जीवन जगून प्रगतीच्या दिशेने जाणारी मानवता आणि त्यातील एक हिस्सा असलेली हिंदुस्थानची जनता, या दृष्टीने हिंदुस्थानकडे व हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नाकडे ते पाहत होते, आणि त्यांची ती दृष्टी आमच्यात आजही कायम आहे. आमचा शेजारी जो पाकिस्तान, त्या पाकिस्तानशी वैर करावे, पाकिस्तानी जनतेशी वैर करावे, मुसलमानी राष्ट्राविरुद्ध आमचे राष्ट्र लढवावे असे चित्र आमच्या डोळ्यांपुढे नाही. आजही आमच्या मनात पाकिस्तानी जनतेबद्दल प्रेम आहे, पूर्वी होते व पुढेही राहील.

जी गोष्ट घडली ती निव्वळ युद्धाची हौस किंवा युद्धासाठी युद्ध करण्याची एक वीर वृत्ती या भावनेने घडलेली नाही. चाळीस-पंचेचाळीस कोटी लोकांचा आमचा हा देश स्वतःचे जीवन शांततेने जगू इच्छितो आणि दुनियेच्या दरबारामध्ये शांतताप्रिय राष्ट्र म्हणून सन्मानाने जगण्याची आकांक्षा धरून ती पार पाडण्याकरिता धडपड करीत असतो. आमचे जीवन सुधारावे म्हणून गेली पंधरा-वीस वर्षे आमचे प्रश्न सोडविण्याचे आम्ही सारखे प्रयत्न करीत आहोत. त्याचे आमच्या शेजाऱ्यांना दुःख आहे. आमच्या मार्गात काटे पेरण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. चीनचे आम्ही काय वैर केले होते? चीन आपल्या साम्यवादी पद्धतीने समाज-बांधणीचा प्रयत्न करीत असताना त्याच्या मार्गात अडथळे निर्माण न करता उलट आम्ही त्याला म्हटले, "शुभास्ते पन्थानः सन्तु। चला, तुम्ही तुमचा प्रवास सुरू करा." कारण ते व आपण शेजारी शेजारी आहोत. शिवाय ते मागासलेले होते, आम्हीही मागासलेले होतो. हजारो वर्षे

चीन दबला गेला होता, पण आता तो आपल्या पद्धतीने आपली प्रगती करू इच्छित होता. म्हणून पंडित नेहरूंनी त्याला आशीर्वाद दिले. त्याच्या मैत्रीसाठी आम्ही आमचा हात पुढे केला आणि हिंदी–चीनी भाई भाईच्या घोषणा केल्या. पण याच चीनने आमचा विश्वासघात करून आमच्या पाठीत खंजीर खुपसला. आमच्या मर्मस्थानावर जबरदस्त प्रहार केला. अशाच प्रकारचा प्रहार आमच्यावर करण्याचा पाकिस्तानने उद्योग केला. त्याला त्याच्या भाषेत उत्तर देणे आम्हाला प्राप्तच होते आणि आम्ही ते अगदी चोख भाषेत दिले आहे.

आता हा तंटा किती दिवस चालणार आहे हे कोणी सांगू शकणार नाही. पण एक गोष्ट मी आपणास सांगू इच्छितो की, आपले राष्ट्र स्वतःच्या रक्षणाकरिता म्हणून उभे राहिले आहे. त्याच्या मनामध्ये कोणाचाही द्वेष नाही. परंतु एक गोष्ट स्पष्टपणे, खंबीरपणे या देशापुढे ठेवली पाहिजे, ती ही की, निव्वळ प्रेमाची भाषा बोलून प्रेम मिळत नाही, निव्वळ शांततेची घोषणा करून शांतता मिळत नाही. राष्ट्राच्या आणि समाजाच्या जीवनात मैत्री आणि शांतता टिकवायची असेल तर त्यासाठी मनगटात शक्ती असावी लागते ही गोष्ट खरी असून तिचा अनुभव आपणास येतो आहे. दुनियेच्या बाजारात ही गोष्ट साफ आहे. आम्ही जेव्हा शांततेची, मैत्रीची भाषा बोलतो तेव्हा आम्ही दुबळे लोक आहोत असे आमच्या शेजाऱ्यांना वाटले. आमच्यात प्रतिकार करण्याचे सामर्थ्य नाही म्हणून आम्ही भाई भाई करतो आहोत, असा त्यांचा ग्रह झाला. खरे म्हणजे आम्हाला कोणाशीही शत्रुत्व करावयाचे नाही. पण कोणीही येऊन या देशाला दबवावे, ढकलावे इतका हा देश आज दुबळा राहिलेला नाही. दुर्दैवाने आमच्या इतिहासात आमच्यावर आक्रमणे येत गेली आणि त्या आक्रमणापुढे आम्ही दबत गेलो, ही गोष्ट खरी आहे. चालुक्यांपासून, गुप्त-मौर्यांपासून, शालिवाहनांपासून ते अलीकडच्या रजपूत, शीख, मराठ्यांपर्यंतचा आमचा इतिहास शौर्याचा, उज्ज्वल पराक्रमाचा होता. परंतु पराक्रमाचा हा सगळा इतिहास असूनही आम्ही दबत गेलो. याचे कारण, हे सर्व जरी आमच्याजवळ होते तरी आम्ही एक राष्ट्र नव्हतो, हा आमचा दुबळेपणा होता. आमच्या सेना परस्परांत लढल्या. पण समोर जेव्हा दुष्मन उभा राहिला

तेव्हा मडक्यांच्या उतरंडी ढासळून पडाव्यात तशी आमची राज्ये ढासळत गेली आणि शत्रूंची साम्राज्ये पसरत गेली. परंतु आज आम्ही आत्म-विश्वासाने आमच्या दुष्मनासमोर उभे आहोत. लक्षावधी सैन्य असणारा चीन एका बाजूने आक्रमणाची धमकी देत असून त्याच्या पावलांची चाहूल आमच्या कानावर पडत आहे. दुसऱ्या बाजूस आमच्या आणि पाकिस्तानच्या सेना एकमेकांसमोर उभ्या ठाकल्या आहेत. असे असताना-सुद्धा आज हा देश एका आत्मविश्वासाने उभा आहे. याचे कारण हा देश आज पूर्वीसारखा फुटलेला, फाटलेला राहिलेला नसून तो एकमनाने उभा राहिलेला आहे. त्यात एक प्रकारचा आत्मविश्वास दिसतो आहे. तुमच्या आमच्या जीवनात आज हे जे घडले आहे ते फार महत्त्वाचे आहे. हे सामर्थ्य तुमच्या आमच्या मनात कुठून आले ? निव्वळ नॅट विमानांनी किंवा कुठल्या तरी रणगाड्यांनी हा पराक्रम केलेला नाही. त्यांचा जो पराक्रम आहे त्याचे महत्त्व कमी नाही. परंतु या सर्व पराक्रमाच्या पाठीमागे, या सगळ्या शक्तीच्या पाठीमागे जी विशाल, प्रचंड अशी राष्ट्रभक्ती उभी आहे, तिचे हे सामर्थ्य आहे.

आजकाल विजय कशाचा होतो हे तुम्हा-आम्हाला समजले पाहिजे. चाळीस कोटी लोकांचा हा नवीन भारत आज एका शक्तीने उभा राहिलेला आहे. त्याच्या विविधतेतून आणि या विविधतेच्या एकतेतून जे आज सामर्थ्य निर्माण होत आहे तेच खरे हिंदुस्थानचे सामर्थ्य आहे, आणि नेमक्या याच सामर्थ्याविरुद्ध पाकिस्तानला आणि चीनला वैर करावयाचे आहे. नवीन पद्धतीने, लोकशाहीच्या मार्गाने उभे राहिलेले हे प्रचंड राष्ट्र दुनियेतील एक अत्यंत पराक्रमी, पुरोगामी शक्ती ठरली तर आपले काय होईल ही धास्ती चीनच्या मनात आहे आणि ही धास्ती पाकिस्तानच्याही मनात आहे; आणि म्हणून हिंदुस्थानला मोडून काढण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यांची दृष्टी पुढची आहे, लांबची आहे. निव्वळ हिंदुस्थानच्या सेनेचा त्यांना पराभव करावयाचा नाही. हिंदुस्थानच्या जीवनाचा, हिंदुस्थानच्या विचारांचा, हिंदुस्थानच्या ध्येयदृष्टीचा, हिंदुस्थानच्या प्रगतीचा त्यांना पराभव करावयाचा आहे; आणि म्हणून हे केवळ एका सेनेने दुसऱ्या

सेनेला दिलेले, एका वायुदलाने दुसऱ्या वायुदलाला दिलेले किंवा एका हुकमतीने दुसऱ्या हुकमतीला दिलेले आव्हान नव्हे, तर जे राष्ट्रीयत्व तुमच्या आमच्या देशात आहे, जे लोकशाहीचे जीवन या देशात आकारास येत आहे त्या राष्ट्रीयत्वाला आणि त्या लोकशाही जीवनाला हे आव्हान आहे. आणि म्हणून हे आव्हान सर्वंध राष्ट्राने लोकशाही पद्धतीने स्वीकारले पाहिजे. असा हा महत्त्वाचा आणि दूरगामी स्वरूपाचा प्रश्न आज आपल्या-पुढे आहे.

मला आनंद वाटतो, की जुन्या काळामध्ये आपण जसे दबलेले, फुटलेले लोक होतो तसे आज आपण राहिलेलो नाही आहोत. आपल्यामध्ये मतभेद आहेत, पक्षभेद आहेत, धर्मभेदही आहेत. पण धर्म हा व्यक्ती आणि परमेश्वर यांच्यामधला संबंध आहे. हिंदू आपल्या मंदिरात परमेश्वराला आळविण्याचा प्रयत्न करतो तर मुसलमान आपल्या मशिदीत अल्लाशी संभाषण करण्याचा प्रयत्न करतो. ख्रिस्ती आपल्या चर्चमध्ये परमेश्वराला हाक मारतो तर शीख गुरुद्वारामध्ये परमेश्वराची प्रार्थना करतो. परंतु हे सर्व संपल्यानंतर, मंदिरातून, मशिदीतून, गुरुद्वारातून किंवा चर्चमधून जो माणूस बाहेर पडतो तो हिंदू नाही, मुसलमान नाही, शीख नाही आणि ख्रिस्ती नाही; तो फक्त भारतीय आहे ही भावना आपल्या मनात रुजली पाहिजे.

आपल्या पूर्वजांच्या इतिहासाबद्दल आपल्याला फार अभिमान वाटतो, मलाही वाटतो. परंतु जुना इतिहास, नवीन इतिहास घडविण्याचे सामर्थ्य प्राप्त करून घेण्यासाठी वाचावयाचा असतो. आजही पंजाबच्या आणि काश्मीरच्या भूमीवर केवढा इतिहास घडला आहे. तो इतिहास रक्ताने लिहिलेला इतिहास आहे. पण पंजाबच्या आणि काश्मीरच्या रक्षणाकरिता केवळ पंजाबी आणि काश्मिरी माणसांचे रक्त पडलेले नाही. पंजाबच्या आणि काश्मिरच्या भूमीचे रक्षण करण्यासाठी सगळ्या भारताचेच रक्त तेथे पडले आहे. भारताच्या भूमीवर रक्ताने लिहिलेला हा अमर इतिहास आहे या भावनेने आम्ही ह्या इतिहासाकडे पाहणार आहोत. ज्या तरुण मंडळींनी तेथे जाऊन आत्मबलिदान केले त्यांची आठवण झाली की जीव व्याकूळ होतो. ही सर्व

उमदी, तरुण, तगडी, ताठ, जवान मंडळी होती. त्यांनाही व्यक्तिगत जीवन होते. मनाशी त्यांच्या स्वतःच्या आकांक्षा होत्या, स्वतःचे जीवन बांधण्याचे ते स्वप्न पाहत होते. कुणाचे नुकतेच लग्न झाले होते तर कुणाचे होऊ घातले होते. पण हे सर्व मोह, या सर्व आकांक्षा बाजूला सारून पेटलेल्या डोळ्यांनी त्यांनी मरणाचा मार्ग पत्करला. त्यांनी हा एवढा मोठा त्याग हा विशाल हिंदुस्थान समृद्ध व्हावा, सुखी व्हावा, अमर व्हावा या भावनेने केला आहे. हे सगळे चित्र पाहिले म्हणजे एक प्रकारची स्फूर्ती येते, मन भरून येते. हिंदुस्थानमध्ये ही एक नवी शक्ती निर्माण होत आहे. राष्ट्र जे नित्य चालते, पिढ्यानुपिढ्या चालते ते हुशार, पराक्रमी माणसांच्या त्यागाने बनलेले असते. आजच्या पिढीने आपल्या बलिदानाने या देशाच्या जीवनात शक्ती ओतली आहे आणि ही शक्ती कायम ठेवण्याचे काम तुम्हा-आम्हाला केले पाहिजे. हे काम अद्यापि संपलेले नाही, आणि मी आपल्याला सांगू इच्छितो की, हे काम कधीच संपणार नाही. कारण ज्या राष्ट्राला आजच्या दुनियेमध्ये स्वतंत्र राहावयाचे आहे त्याला आपले स्वातंत्र्य टिकविण्यासाठी सामर्थ्य तयार करता आले पाहिजे, आणि म्हणून या देशामध्ये तुम्हा-आम्हाला हे सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे, व्यक्तीव्यक्तीच्या मनामध्ये हे सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

संरक्षण प्रयत्न, संरक्षण प्रयत्न म्हणजे काय? संरक्षणासाठी लागणारे साहित्य जमा करणे, सेनापती, सैनिक तयार करणे हा जरूर संरक्षण प्रयत्न आहे, आणि हे प्रयत्न यापुढेही होत राहतील. त्यांची या देशामध्ये कधीही कमतरता पडणार नाही. तरुणांनी सैन्यात सामील व्हावे म्हणून येथे इतर देशाप्रमाणे कायदा करावा लागत नाही. सैन्यात स्वखुशीने जाणाऱ्या माणसांची शक्ती आणि संख्या आमच्याजवळ भरपूर आहे. हे आमचे सामर्थ्य आहे. पण आमच्याजवळ फार माणसे आहेत म्हणून काही माणसे दुःख करतात. आर्थिक परिस्थितीसंबंधीचा यात धोका आहे हे खरे आहे. माणसांचे आपल्याजवळ असलेले बळ आपण वापरले नाही तर हेच सामर्थ्य एक ओझे ठरण्याचा संभव आहे. पण ज्या पद्धतीने तरुण माणसे आपल्या सैन्यामध्ये दाखल होतात, त्याकडे पाहिले म्हणजे संख्याबळ हे

आपले जरूर सामर्थ्य आहे असे आपण म्हणू शकतो. माणसे देणे, साधने पुरविणे हा जरूर संरक्षण प्रयत्न आहे, पण या प्रयत्नाच्या याहीपेक्षा काही फार महत्त्वाच्या बाजू आहेत.

माझ्या मते ज्याने मन मजबूत बनेल तो खरा संरक्षण प्रयत्न. त्याची या वेळी खरी परीक्षा होणार आहे. संकटे नसली म्हणजे पराक्रमाची भाषा आणि संकटे समोर उभी राहिली की मुत्सद्देगिरीची भाषा असे चालणार नाही. संकटकाळात घाबरून जाऊन काहीतरी मार्ग काढण्याच्या दृष्टीने राष्ट्राने वागावयाचा प्रयत्न केला तर त्याला राष्ट्र म्हणून राहता येणार नाही. संकट ही एक संधी आहे, या दृष्टीने संकटाकडे पाहण्यास आपण आता शिकले पाहिजे. माझा स्वतःचा अनुभव असा आहे की, संकटासारखी दुसरी संधीच असू शकत नाही. मी तर असे म्हणत असतो की, संकट आले म्हणजे परमेश्वर संधी घेऊन आपल्याजवळ आला आहे असे समजावे. आलेल्या संकटावर आपण मात केली पाहिजे, त्यावर आपण आरूढ झाले पाहिजे. घोड्यावर जसे आपण स्वार होतो त्याचप्रमाणे संकटाला आपले साधन बनवून, वाहन बनवून पुढे जाण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. संकट म्हणजे एक प्रकारचे आव्हान आहे. नुसते आव्हानच नव्हे तर आव्हान आणि संधीही आहे. देशाला देश बनविण्याची, जनतेची शक्ती आणि सामर्थ्य वाढविण्याची ही संधी पाकिस्तानने आपल्याला दिली म्हणून पाकिस्तानला खरे म्हणजे आपला विरोधी म्हणण्यापेक्षा आपणे आपला दोस्तच म्हटले पाहिजे, आणि ही संधी दिल्याबद्दल एकट्या पाकिस्तानचेच काय पण चीनचेसुद्धा आपण आभार मानले पाहिजेत. त्यांनी आमच्यातल्या सुप्त शक्तींना आव्हान देऊन आमच्यात जे उत्कृष्ट आहे त्याला बाहेर येण्याची संधी दिली. सध्याचा काळ हा फार कठीण काळ आहे. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, कठीण काळामध्ये जे राष्ट्र टिकून राहते तेच खरे बलवत्तर राष्ट्र होय. जनमत जागृत झाले, त्याने आव्हान स्वीकारले की, नवी दृष्टी येते, स्वभाव बनत जातात आणि बहादुरीच्या परंपरा निर्माण होतात. अशीच बहादुरीची परंपरा गांधीजींनी निर्माण केली. आम्ही दुबळे लोक होतो.

उमदी, तरुण, तगडी, ताठ, जवान मंडळी होती. त्यांनाही व्यक्तिगत जीवन होते. मनाशी त्यांच्या स्वतःच्या आकांक्षा होत्या, स्वतःचे जीवन बांधण्याचे ते स्वप्न पाहत होते. कुणाचे नुकतेच लग्न झाले होते तर कुणाचे होऊ घातले होते. पण हे सर्व मोह, या सर्व आकांक्षा बाजूला सारून पेटलेल्या डोळ्यांनी त्यांनी मरणाचा मार्ग पत्करला. त्यांनी हा एवढा मोठा त्याग हा विशाल हिंदुस्थान समृद्ध व्हावा, सुखी व्हावा, अमर व्हावा या भावनेने केला आहे. हे सगळे चित्र पाहिले म्हणजे एक प्रकारची स्फूर्ती येते, मन भरून येते. हिंदुस्थानमध्ये ही एक नवी शक्ती निर्माण होत आहे. राष्ट्र जे नित्य चालते, पिढ्यानुपिढ्या चालते ते हुशार, पराक्रमी माणसांच्या त्यागाने बनलेले असते. आजच्या पिढीने आपल्या बलिदानाने या देशाच्या जीवनात शक्ती ओतली आहे आणि ही शक्ती कायम ठेवण्याचे काम तुम्हा-आम्हाला केले पाहिजे. हे काम अद्यापि संपलेले नाही, आणि मी आपल्याला सांगू इच्छितो की, हे काम कधीच संपणार नाही. कारण ज्या राष्ट्राला आजच्या दुनियेमध्ये स्वतंत्र राहावयाचे आहे त्याला आपले स्वातंत्र्य टिकविण्यासाठी सामर्थ्य तयार करता आले पाहिजे, आणि म्हणून या देशामध्ये तुम्हा-आम्हाला हे सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे, व्यक्तीव्यक्तीच्या मनामध्ये हे सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

संरक्षण प्रयत्न, संरक्षण प्रयत्न म्हणजे काय? संरक्षणासाठी लागणारे साहित्य जमा करणे, सेनापती, सैनिक तयार करणे हा जरूर संरक्षण प्रयत्न आहे, आणि हे प्रयत्न यापुढेही होत राहतील. त्यांची या देशामध्ये कधीही कमतरता पडणार नाही. तरुणांनी सैन्यात सामील व्हावे म्हणून येथे इतर देशाप्रमाणे कायदा करावा लागत नाही. सैन्यात स्वखुशीने जाणाऱ्या माणसांची शक्ती आणि संख्या आमच्याजवळ भरपूर आहे. हे आमचे सामर्थ्य आहे. पण आमच्याजवळ फार माणसे आहेत म्हणून काही माणसे दुःख करतात. आर्थिक परिस्थितीसंबंधीचा यात धोका आहे हे खरे आहे. माणसांचे आपल्याजवळ असलेले बळ आपण वापरले नाही तर हेच सामर्थ्य एक ओझे ठरण्याचा संभव आहे. पण ज्या पद्धतीने तरुण माणसे आपल्या सैन्यामध्ये दाखल होतात, त्याकडे पाहिले म्हणजे संख्याबळ हे

आपले जरूर सामर्थ्य आहे असे आपण म्हणू शकतो. माणसे देणे, साधने पुरविणे हा जरूर संरक्षण प्रयत्न आहे, पण या प्रयत्नाच्या याहीपेक्षा काही फार महत्त्वाच्या बाजू आहेत.

माझ्या मते ज्याने मन मजबूत बनेल तो खरा संरक्षण प्रयत्न. त्याची या वेळी खरी परीक्षा होणार आहे. संकटे नसली म्हणजे पराक्रमाची भाषा आणि संकटे समोर उभी राहिली की मुत्सद्देगिरीची भाषा असे चालणार नाही. संकटकाळात घाबरून जाऊन काहीतरी मार्ग काढण्याच्या दृष्टीने राष्ट्राने वागावयाचा प्रयत्न केला तर त्याला राष्ट्र म्हणून राहता येणार नाही. संकट ही एक संधी आहे, या दृष्टीने संकटाकडे पाहण्यास आपण आता शिकले पाहिजे. माझा स्वतःचा अनुभव असा आहे की, संकटासारखी दुसरी संधीच असू शकत नाही. मी तर असे म्हणत असतो की, संकट आले म्हणजे परमेश्वर संधी घेऊन आपल्याजवळ आला आहे असे समजावे. आलेल्या संकटावर आपण मात केली पाहिजे, त्यावर आपण आरूढ झाले पाहिजे. घोड्यावर जसे आपण स्वार होतो त्याचप्रमाणे संकटाला आपले साधन बनवून, वाहन बनवून पुढे जाण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. संकट म्हणजे एक प्रकारचे आव्हान आहे. नुसते आव्हानच नव्हे तर आव्हान आणि संधीही आहे. देशाला देश बनविण्याची, जनतेची शक्ती आणि सामर्थ्य वाढविण्याची ही संधी पाकिस्तानने आपल्याला दिली म्हणून पाकिस्तानला खरे म्हणजे आपला विरोधी म्हणण्यापेक्षा आपणे आपला दोस्तच म्हटले पाहिजे, आणि ही संधी दिल्याबद्दल एकट्या पाकिस्तानचेच काय पण चीनचेसुद्धा आपण आभार मानले पाहिजेत. त्यांनी आमच्यातल्या सुप्त शक्तींना आव्हान देऊन आमच्यात जे उत्कृष्ट आहे त्याला बाहेर येण्याची संधी दिली. सध्याचा काळ हा फार कठीण काळ आहे. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, कठीण काळामध्ये जे राष्ट्र टिकून राहते तेच खरे बलवत्तर राष्ट्र होय. जनमत जागृत झाले, त्याने आव्हान स्वीकारले की, नवी दृष्टी येते, स्वभाव बनत जातात आणि बहादुरीच्या परंपरा निर्माण होतात. अशीच बहादुरीची परंपरा गांधीजींनी निर्माण केली. आम्ही दुबळे लोक होतो.

तीस-चाळीस वर्षांपूर्वीचा काळ कदाचित आपल्याला माहीत नसेल. रावसाहेबांचा, रावबहादुरांचा आणि खानबहादुरांचा तो जमाना होता. त्यांची कृपा लाभावी म्हणून माणसे त्यांना मुजरे करीत, दुबळेपणाने, लाचारीने हिंडत फिरत होती. अशा या देशात गांधीजींनी एक नवी शक्ती ओतली आणि त्याच्या जीवनामध्ये तेज निर्माण केले. आमच्यामध्ये जणू त्यांनी अमृत आणून ओतले आणि हा देश स्वतंत्र झाला. गांधीजींनी या देशात केलेली जनजागृती ही अशी फळाला आली, आणि म्हणून मी म्हणतो की, संरक्षण प्रयत्नांत प्रथम मन मजबूत झाले पाहिजे, समर्थ झाले पाहिजे.

आज आम्ही मैत्रीला मैत्री, प्रेमाला प्रेम देऊ; पण आमच्याशी कुणी दुष्मनी करणार असेल तर आम्ही त्याने दबून जाणार नाही, या भावनेने हिंदुस्थान आज उभा राहिला पाहिजे, त्याशिवाय दुसरा मार्ग राहिलेला नाही, आणि ही भावना, ही शक्ती आम्हाला आमच्या देशामध्ये वाढविली पाहिजे, कायम राखली पाहिजे. तरच आपण आपल्या देशामध्ये संरक्षणाची तयारी केली असे म्हणता येईल. आज संकटाचे जे स्वरूप डोळ्यांपुढे दिसते आहे त्यामुळे तर ही तयारी अधिकच नेटाने करावी लागेल. पाकिस्तानच्या बाजूला युद्धविरामाची हवा आहे. पण कशा तऱ्हेचा युद्ध-विराम होणार आहे हा खरा प्रश्न आहे. चीन तर आम्हाला सारखी आठवण देत असतो की, आम्ही तुमच्या शेजारी आहोत. कधी सिक्कीममध्ये तर कधी नेफामध्ये तर कधी लडाखमध्ये लहान लहान टोळ्या पाठवून आमची तयारी कशी आहे हे अजमावण्याचा तो प्रयत्न करून राहिला आहे. या सगळ्या गोष्टी घडत असताना देखील दुनियेतील पंचांची अशी इच्छा आहे की, आम्ही एकत्र बसून आणि विचारविनिमय करून यातूनही काही मार्ग काढावा. त्यासाठी शास्त्रीजी आता ताश्कंदला जातील आणि मैत्रीचे काही प्रयत्न होतील. परंतु या मैत्रीच्या चर्चेला जातानासुद्धा आम्ही अशा निश्चयाने चाललो आहोत की, आमच्या देशाचे जे स्वत्व आहे त्या स्वत्वाचे तेथे हरण होणार नाही अशाच पद्धतीने आम्ही तेथे वागू. पण या सगळ्या कामाच्या पाठीमागे राष्ट्राची सदिच्छा, राष्ट्राचे तेज, राष्ट्राचे

सामर्थ्य उभे करणे हे काम महत्त्वाचे आहे. ,हे काम आपण करीत राहा, आणि हे काम आपण यशस्वी रीतीने करू शकलात तर हिंदुस्थानचा हा तिरंगा अभिमानाने आज जो डोलतो आहे तो असाच अखंड, अनंत काळपर्यंत डोलत राहील यात मला शंका नाही.

-*-

यशवंत बेसिक ट्रेनिंग कॉलेजच्या इमारतीचा उद्घाटन समारंभ,
वर्धा, दि. २६-१२-६५

८ खडतर वाटचाल

जवळ जवळ अडीच तीन वर्षांनी मी आपल्या या ठाणे शहरात आलो आहे. जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना आणि जनतेला वारंवार भेटण्यासाठी यावे अशी मनात फार इच्छा असते. पण त्या इच्छेप्रमाणे येण्यास जमत नाही. परंतु भिवंडी नगरपालिकेच्या शतसांवत्सरिक समारंभाच्या निमित्ताने मी आपल्या भागात आलो आणि आपणा सर्वांना भेटू शकलो याबद्दल मला फार आनंद वाटतो. आपण नित्याप्रमाणे अतिशय प्रेमाने माझे स्वागत केले त्याबद्दल सुरुवातीला मी आपले आभार मानतो.

गेल्या दोन अडीच वर्षांमध्ये आपल्या देशातील एकंदर परिस्थितीत विलक्षण बदल झालेला आहे. माझ्या मते यापुढील काही वर्षांचा काळ आपल्या देशाच्या राजकारणामध्ये एक प्रकारची काळजी करण्यासारखा जाणार आहे. राजकारण हा शब्द मी येथे अंतर्गत राजकारणातील प्रश्नांच्या, किंवा विविध पक्षांच्या दरम्यान चालणाऱ्या राजकारणाच्या संदर्भात वापरीत नसून, राष्ट्र म्हणून जी काही परिस्थिती या कालात आपल्या देशात राहील तिच्या संदर्भात मी हा शब्द वापरतो आहे. ती परिस्थिती हाताळण्याची

जबाबदारी केवळ काही प्रमुख मंडळींवर सोपविल्याने आपले काम भागणार नसून तिचा आपल्याला अतिशय काळजीपूर्वक अभ्यास करावा लागेल, आणि त्या परिस्थितीतून जे प्रश्न निर्माण होतील त्यांची पार्श्वभूमी लोकांना समजेल उमजेल अशा शब्दांत आपल्याला त्यांच्यापुढे मांडावी लागेल. कारण या पार्श्वभूमीच्या कारणमीमांसेत लोकांना आपण भागीदार केले नाही तर पुढे निर्माण होणाऱ्या प्रश्नांची त्यांना बरोबर कल्पना येणार नाही, आणि म्हणून आज मी आपल्यापुढे काही प्रश्न जरूर ठेवू इच्छितो. संरक्षणाच्या बाबतीत आज देशाची काय परिस्थिती आहे? आणि पुढे ती कशी राहील? हे समजून घेण्याची लोकांमध्ये मला प्रवृत्ती दिसते आहे. म्हणून या प्रश्नासंबंधीही मी आपल्याशी थोडीफार चर्चा करणार आहे.

चीनचे आक्रमण झाले त्या वेळी सबंध राष्ट्र संकटात आहे असे समजून आपण आणीबाणीची परिस्थिती जाहीर केली आणि आणीबाणीसंबंधीचा कायदा केला. त्याची गरज आहे की नाही, हा आज वादग्रस्त राजकीय प्रश्न झाला आहे. पण एक गोष्ट मला सांगितली पाहिजे की, हा आणीबाणीचा कायदा नको असेल किंवा त्यातून निर्माण होणाऱ्या कटकटी नको असतील, तर तो कायदा काढून टाकल्याने मोठे नुकसान होणार आहे असे मी मानीत नाही. हा चर्चेचा प्रश्न आहे, निर्णयाचा प्रश्न आहे. पण त्याचबरोबर मला आपल्याला हेही विचारले पाहिजे की, आपल्या राष्ट्राला परराष्ट्रांकडून आक्रमणाची भीती आहे की नाही? आमच्या देशाच्या स्वाधीनतेवर आमच्या शेजारी राहणाऱ्यांचा वाकडा डोळा होण्याचा संभव आहे की नाही? आज, उद्या किंवा आणखी काही वर्षांनी अशा प्रकारचा धोका नाही असे म्हणून देशाने आपली फसवणूक करून घेणे चुकीचे ठरेल. परंतु 'लांडगा आला रे आला' अशा तऱ्हेची भीती निर्माण करून अतिरंजित पुकारा करणेही योग्य होणार नाही. पण राष्ट्र म्हणून तुम्हा-आम्हाला कुठल्या दिशेने सावध राहिले पाहिजे, कशा प्रकारे सावध राहिले पाहिजे याची काही तरी मीमांसा आपण आपल्या मनाशी केली पाहिजे. कारण ही मीमांसा करण्याची आज नितांत जरुरी आहे.

चीन आणि हिंदुस्थान यांच्यात निर्माण झालेल्या राजकीय संघर्षाच्या

संदर्भात हिंदुस्थानच्या उत्तर सीमेवर आणि विशेषतः हिंदुस्थानच्या पूर्व सीमेवर आज ज्या घटना घडत आहेत त्या आपण लक्षात घेतल्या पाहिजेत. ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यामध्ये आणि या खोऱ्याशी लागून असणारा जो नागा प्रदेश व इतर भाग आहे – ज्याला आपण आदिवासी भूमी असे म्हणतो – त्या भागामध्ये आणि त्याचप्रमाणे नेफामध्ये आज जी परिस्थिती आहे, तिचे आपण बारकाईने निरीक्षण केले पाहिजे. त्याबरोबरच नेफाच्या उत्तरेपासून लडाखपर्यंत अठराशे ते दोन हजार मैल लांबीची आमची जी सरहद्द आहे त्या संबंध सरहद्दीलगत खड्या असलेल्या चिनी सैन्याचे अस्तित्व आपण लक्षात घेतले आणि काश्मीरच्या प्रश्नामध्ये एक प्रकारचा हस्तक्षेप करण्याची चीनची नीती आणि पाकिस्तानबरोबर होऊ घातलेली त्याची आक्रमक स्वरूपाची मैत्री आपण ध्यानात घेतली की, यातून आपल्याला तेथल्या परिस्थितीचे सम्यक दर्शन घडते. हे सर्व पाहिल्यानंतर आमच्या देशाला आता संकट उरलेले नाही असा सल्ला निदान संरक्षणमंत्री म्हणून मी सरकारला देणार नाही, देशाला देऊ इच्छिणार नाही. हे संकट आपल्या डोक्यावर लोंबकळते आहे, ते नाहीसे झालेले नाही हे आम्ही गृहीत धरून चालले पाहिजे.

एखाद्या राष्ट्राला मुद्दाम शत्रू मानून त्याच्याशी कायमचे शत्रुत्व करण्याच्या आग्रहाने मी हे बोलत नाही, किंवा चीन साम्यवादी राष्ट्र आहे आणि हिंदुस्थान साम्यवादी नाही या भावनेनेही मी हे बोलत नाही. तशी दुनियेत अनेक साम्यवादी राष्ट्रे आहेत की, ज्यांची आमची मैत्री आहे, आमचे स्नेहसंबंध आहेत, वाढते स्नेहसंबंध आहेत. त्यांच्या साम्यवादामुळे त्यांच्याशी आमचे वैर राहिले पाहिजे अशी भूमिका आम्ही कधी घेतलेली नाही. अशी भूमिका आमची पहिल्यापासून नव्हती, आजही नाही आणि मला वाटते कधीच राहू नये. कुठल्या तत्त्वाने किंवा कुठल्या पद्धतीने राज्य करावे हा ज्या त्या देशातील जनतेचा अंतर्गत प्रश्न आहे. कुठल्याही देशाच्या तत्त्वाशी आमचे वैर नाही. १९६२ मध्ये लढाईचा प्रसंग आल्यानंतरही चीनबरोबर कायमच्या शत्रुत्वाची भूमिका आम्ही घेतलेली नाही. राष्ट्राला कायमचे मित्र किंवा कायमचे शत्रू कधी नसतात

असे पूर्वी एका राजनीतिज्ञाने जे म्हटले आहे ते खरे आहे. मित्र होते ते कायमचे मित्र राहिले असा जगातील देशांचा अनुभव नाही. तेव्हा एखाद्या राष्ट्राला शत्रू समजून त्याच्याशी कायमचे वैर करणे शहाणपणाचे होणार नाही.

ताश्कंद कराराच्या बाबतीत एक विलक्षण गोष्ट घडली. ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये पाकिस्तानशी आपला संघर्ष झाला. पण त्यानंतर हिंदुस्थान आणि पाकिस्तान या राष्ट्रांनी तातडीने एकत्र येऊन आपल्या प्रश्नांची आपसात चर्चा केली. ही गोष्ट जगातल्या शांततेच्या दृष्टीने नावीन्यपूर्ण तर होतीच, पण त्याहीपेक्षा नवलाईची गोष्ट ही होती की, एका बलिष्ठ साम्यवादी राष्ट्राने पुढाकार घेऊन आपल्या शेजारच्या दोन राष्ट्रांमध्ये मैत्री जोडण्याचा यशस्वी प्रयत्न केला. जगामध्ये साम्यवादाचे राजकारण सुरू झाल्यापासून अशा प्रकारचे उदाहरण पहिल्यानेच घडले आहे. साम्यवादी राष्ट्रांमध्ये मतभेदाची परिस्थिती निर्माण झाल्यास, त्यांच्यामध्ये समझोता करण्याचा प्रयत्न सोव्हिएट रशिया करी असा आजपर्यंतचा अनुभव होता. परंतु एका बलिष्ठ साम्यवादी राष्ट्राने साम्यवादी नसणाऱ्या आपल्या दोन शेजाऱ्यांमधील भांडण, ही आपल्या हितसंबंधाची गोष्ट मानावी आणि त्यांच्यामध्ये मैत्री प्रस्थापित करण्यासाठी आपली प्रतिष्ठा पणाला लावून त्यात यशस्वी व्हावे, ही राजकारणातील एक अतिशय महत्त्वाची अशी घटना मानली पाहिजे.

ताश्कंद कराराचा अर्थ काय आहे? ताश्कंद करार आजही आहे. आम्ही तो मानतो, पुढेही मानणार आहोत आणि पाकिस्ताननेही तो मानला पाहिजे असा आमचा आग्रह राहील. ताश्कंद कराराबाबत पाकिस्तान काय धोरण ठरविते ते आपण जरूर पाहू. पण ताश्कंद करार मोडण्यासाठी पाकिस्तान उत्सुक आहे असे गृहीत धरून आम्ही तो मोडला पाहिजे असे बोलणाऱ्यांना राजकारणही कळत नाही आणि युद्धकारणही कळत नाही, असे माझे स्पष्ट मत आहे. पण हा प्रश्न बाजूला ठेवून, ताश्कंद कराराची पार्श्वभूमी काय आहे ते आपण पाहू. ताश्कंद करारासंबंधी बोलणी सुरू झाल्यानंतर त्यात काश्मीरचा विषय येणे अटळ होते. काश्मीरबाबत

त्या वेळी पाकिस्तानने जितक्या आग्रहाने आपली भूमिका मांडली तितक्याच आग्रहाने हिंदुस्थाननेही आपली भूमिका स्पष्ट केली. या सगळ्या चर्चेनंतर दोन्ही राष्ट्रांचे एकाच बाबतीत एकमत झाले आणि ते म्हणजे काश्मीरबाबत. या राष्ट्रांचे कधीच एकमत होणार नाही, पण असे झाले म्हणून ताश्कंदच्या चर्चा फसल्या नाहीत. ताश्कंदच्या वाटाघाटी यशस्वी झाल्या त्या अशा अर्थाने की, काश्मीरच्या प्रश्नाबाबत पाकिस्तानचे आणि आमचे मतभेद आहेत हे जाहीरपणे स्पष्ट झालेले असतानासुद्धा, एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राविरुद्ध शस्त्र वापरता कामा नये, दुसऱ्या राष्ट्राच्या व्यवहारामध्ये हस्तक्षेप करता कामा नये, या बाबतीत आमचे एकमत झाले. युद्धविरामाच्या रेषे-संबंधाने ज्या अटी असतील त्या संपूर्ण मानल्या पाहिजेत ही कराराची भूमिका होती आणि या भूमिकेवर ताश्कंद करार उभा राहिला. म्हणजे महत्त्वाच्या प्रश्नांबाबत मतभेद असल्यानंतरही दोन राष्ट्रांनी एकमेकांशी कसे वागावे ? हा ताश्कंद कराराचा खरा अर्थ आहे.

या बाबतीत चीनने घेतलेली भूमिका आपण लक्षात घेतली पाहिजे. एका साम्यवादी राष्ट्राने शेजारच्या दोन विगर साम्यवादी देशांमधला मतभेद मिटविण्यासाठी पुढाकार घेऊन त्यात यश मिळविले, परंतु हे यश आपले अपयश आहे असे समजून त्याच्याच शेजारी असणाऱ्या दुसऱ्या एका बलाढ्य साम्यवादी राष्ट्राने, हा करार मोडण्यासाठी आपली सगळी शक्ती व बुद्धी पणाला लावावी ही साम्यवादी राजकारणातली दुसरी आश्चर्याची गोष्ट आहे. काश्मीरच्या जनतेला स्वयंनिर्णयाचा हक्क आहे, आणि तो त्यांना मिळालाच पाहिजे, ही चीनची आज भूमिका आहे. स्वयंनिर्णयाच्या हक्का-बद्दल खरोखरीच चीनला पान्हा फुटला असता, तर काश्मीरच्या जनतेला स्वयंनिर्णयाचा हक्क बहाल करण्यापूर्वी तिबेटच्या जनतेच्या या हक्काबद्दल त्याने विचार केला असता. पण खरी गोष्ट अशी आहे की, तसे करण्याची त्याची तयारी नाही. दुसऱ्याच्या घरावर तुळशीपत्र ठेवण्यासमात्र हे तयार. आमच्या देशातील जनतेच्या हक्काबद्दल उठाठेव करण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. याचे खरे कारण असे आहे की, हिंदुस्थान आणि पाकिस्तान यांच्यामध्ये त्याला संघर्षाचे वातावरण चालू ठेवावयाचे आहे. त्याची आणि

पाकिस्तानची आज जी मैत्री आहे त्या मैत्रीमागे चीनचा एक हेतू आहे आणि तो असा की हिंदुस्थानच्या पाठीमागे सारखे भुंगे राहिले पाहिजेत. चीनची ही जी नीती आहे तिची कारणपरंपरा आपण एकदा शोधली पाहिजे.

मी आपणाला सांगू इच्छितो, की संरक्षणाचे प्रश्न आपणाला समजून घ्यावयाचे असतील तर सैन्य किती शौर्याने आणि धैर्याने लढले यासंबंधीच्या नुसत्या कथा समजून भागणार नाही. राष्ट्रे ही अशी का वागतात ? कधी ती शांततेच्या गोष्टी बोलतात, कधी युद्धाची तयारी करतात आणि कधी प्रत्यक्ष युद्धही करतात. या सगळ्याच्या पाठीमागे त्यांचे राजकीय इरादे काय असतात, कोणत्या हितसंबंधामुळे ती हे सर्व करतात, हे सारे समजून घेण्याचा तुम्ही-आम्ही प्रयत्न केला पाहिजे, आणि म्हणून हा सगळा प्रपंच मी आपल्यापुढे मांडतो आहे. १९६२ साली चीनने हिंदुस्थानवर आक्रमण केले. तोपर्यंत आम्ही मानीत होतो की, हे आमचे भाई आहेत. मनापासून, अगदी प्रामाणिकपणाने या हिंदुस्थानच्या रस्त्यारस्त्यांवर हिंदी चिनी भाई भाई म्हणून आम्ही घोषणा केल्या. काही लोक आता म्हणत असतात की, हा आमचा भोळेपणा होता. असेलही कदाचित आमचा भोळेपणा. पण त्याच्या पाठीमागे एक राष्ट्रीय विचार होता. तो विचार हा होता की, एक नवीन राष्ट्र बनण्याचा आम्ही प्रयत्न करीत असताना आपल्या शेजारच्या एका प्रचंड राष्ट्राशी वैराची भूमिका ठेवून आपल्याला या राष्ट्राचा संसार कधीही शहाणपणाने करता येणार नाही. साध्या खाजगी जीवनामध्येही आपल्याला असे करता येत नाही. शेजाऱ्याला वैरी करून नवा संसार मांडणारी शहाणी माणसे अजून मी या जगात पाहिलेली नाहीत. हिंदुस्थानचीही हीच परिस्थिती होती. त्यामुळे चीनच नव्हे तर सबंध दुनियेतली राष्ट्रे आमची मित्र असली पाहिजेत हा आमचा एक राष्ट्रीय विचार होता. या भूमिकेवर हिंदुस्थानने आपल्या स्वातंत्र्याच्या संसाराची सुरुवात केली. आम्ही हे गृहीत धरून चाललो होतो की, चीन आणि आम्ही मित्र आहोत. पण ते खरे नव्हते. १९६२ मध्ये चीनने केलेल्या आक्रमणाने हे सिद्ध झाले. पण या आक्रमणापाठीमागे चीनचे

काय हेतू होते ? हे आपण पाहिले पाहिजे.

संरक्षणमंत्री म्हणून ज्या दिवशी मी दिल्लीस गेलो, त्याच्या दुसऱ्या दिवशी चीनचे सैन्य माघारी फिरले, आणि मग प्रश्न असा पडला की, या सगळ्या गोष्टींचा अर्थ काय ? ते आले आले आणि परत गेले. याच्या पाठीमागे त्यांचे काय इरादे असावेत, काय हेतू असावेत, याचा जेव्हा अभ्यास झाला, चर्चा झाली तेव्हा त्यातून त्यांचे सरळ सरळ तीन हेतू दिसून आले. १९६२ साली आपल्यावर हल्ला करण्यासाठी चीनने जी वेळ साधली होती त्याच वेळी म्हणजे ऑक्टोबरच्या दुसऱ्या पंधरवड्यामध्ये रशिया आणि अमेरिका यांच्यामधला क्यूबाचा प्रश्न अधिक तीव्र बनत चालला होता. रशिया आणि अमेरिका यांच्यामध्ये अणुयुद्ध सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली होती. नेमके याच वेळी चीनने हिंदुस्थानवर आक्रमण केले. ही पार्श्वभूमी लक्षात ठेवली म्हणजे चीनचे त्या वेळचे इरादे स्पष्ट दिसतात. यांपैकी कोणते इरादे अद्यापि कायम असावेत याचाही शोध आपण घेतला पाहिजे.

मला या बाबतीत जे काही सांगावयाचे आहे ते मी फार गुंतागुंतीच्या शब्दांत सांगणार नाही. सरळ एक गोष्ट आहे की, चीन आणि हिंदुस्थान हे प्रचंड लोकसंख्या असलेले, ज्याला लॅण्डमास म्हणतात, असे विस्तीर्ण भूभाग आहेत. लक्षावधी चौरस मैल भूमी असणारा इकडे हिंदुस्थान पसरलेला आहे तर तिकडे पलीकडे तसाच चीन पसरलेला आहे. दोन प्रचंड भूभाग असलेली राष्ट्रे जेव्हा शेजारी शेजारी असतात तेव्हा त्यांच्यामध्ये कळत न कळत हितसंबंधांचे विरोध निर्माण होत असतात. चीनच्या दृष्टीने त्यांच्यात आणि हिंदुस्थानात जी स्पर्धा होती ती अशी की, आशिया आणि आफ्रिका खंडांतील स्वतंत्र होणारी जी छोटी छोटी राष्ट्रे आहेत त्यांच्यापुढे त्यांचा समर्थ नेता म्हणून कोणाची बळकट प्रतिमा असली पाहिजे— हिंदुस्थानची की चीनची ? या बाबतीत आपले श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्यासाठी हिंदुस्थानशी दोन हात करणे हा एकच मार्ग चीनच्या दृष्टीने चीनला मोकळा होता. दुनियेच्या बाजारामध्ये लष्करी क्षेत्रात, राजकीय क्षेत्रात, आर्थिक क्षेत्रात चीनला महत्त्वाचे स्थान मिळावे, आणि आफ्रिका व

...ठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वतंत्र
क्रमांक ...२.५.५.२.५. दि: ...नि.अंक्षद्द...
वर्ग क्र. ...२.१.१.६.१.१... वर्ग दि: ...२.१.१.६...

आशिया खंडांतील नेतृत्वाबद्दल चीनची जी खरी आकांक्षा आहे ती पुरी व्हावी, एवढेच नव्हे तर जमल्यास सबंध दुनियेतील साम्यवादी राष्ट्रांचे नेतृत्वही आपल्या हाती घ्यावे अशी त्याच्या विचाराची दिशा असली पाहिजे. कारण जो नवा विचार मांडण्याचा चीन प्रयत्न करीत असतो त्यातून ही दृष्टी ओझरती डोकावत असते. आफ्रिका आणि आशिया खंडांतील देशांपुढे चीन हा भारतापेक्षा लष्करी दृष्ट्या अधिक समर्थ देश आहे असे जे प्रदर्शन चीनला करावयाचे होते, ते त्याने हिमालयामध्ये करण्याचे ठरविले आणि तेथे हा उद्योग केला.

दुसरी गोष्ट अशी की, गेली पंधरा-सोळा वर्षे हिंदुस्थानने लष्करी तयारी गौण मानून विकासाची तयारी महत्त्वाची मानली, आणि आपली सगळी साधनसामग्री विकासाच्या कामावर केंद्रित केली. पण लष्करी प्रश्न हिंदुस्थानपुढे येऊन उभा ठाकल्यानंतर, विकासाच्या कामासाठी लागणाऱ्या साधनांतला काही भाग तरी संरक्षणाच्या तयारीत घातल्याशिवाय हिंदुस्थानला दुसरा मार्ग नाही, आणि हा संरक्षणाचा प्रयत्न जसजसा वाढत जाईल, तसतशा हिंदुस्थानच्या आर्थिक जीवनात संकटांच्या राशी उभ्या राहतील हे चीनला माहीत होते. दुसऱ्या देशाच्या जीवनातील संकटांच्या राशी ह्या आक्रमकांच्या नेहमीच संधी असतात, आणि म्हणून लष्करी आक्रमणाच्या रूपाने हिंदुस्थानच्या आर्थिक संकटांचा बोजा अधिकाधिक वाढविण्याचा प्रयत्न करणे हा चीनच्या आक्रमणातला दुसरा उद्देश होता.

चीनचा आणखीही एक उद्देश होता. तो म्हणजे हिंदुस्थानच्या—नॉन्-अलाइनमेन्टच्या — तटस्थेच्या धोरणाला खीळ घालणे हा होय. कुठल्याही प्रकारच्या लष्करी करारात स्वत:ला गोवून घेऊन दुसऱ्याच्या लष्कराच्या भाकऱ्या भाजावयाच्या नाहीत ही हिंदुस्थानने आपली नीती ठरविली होती. ती त्या वेळीही शहाणपणाची होती व आजही शहाणपणाची आहे. परंतु आक्रमणाच्या दबावाखाली हिंदुस्थान चीनला शरण जाईल किंवा अमेरिका व इंग्लंडसारख्या भांडवलशाही देशांच्या पदरात पडेल किंवा एखाद्या लष्करी करारात सामील होईल अशी चीनची अपेक्षा होती. पण या सर्व बाबतींत चीनचा अपेक्षाभंग झाला आहे. असे असले तरी त्यांनी आपले प्रयत्न

ठाणे ग्रंथ संग्रहालय ठाणे
वर्ग क्र.

सोडलेले नाहीत. या प्रयत्नांचे स्वरूप मात्र आता बदलले आहे. हिंदुस्थान व पाकिस्तान यांच्यातील संघर्ष जागता ठेवला पाहिजे असा त्यांचा आता नवा प्रयत्न आहे. परंतु या संघर्षाचे स्वरूप पाकिस्तानने समजून घेतले तर ती गोष्ट पाकिस्तानच्या हिताची ठरेल आणि आमच्याही हिताची ठरेल; कारण हिंदुस्थान आणि पाकिस्तान यांचा संघर्ष झाला पाहिजे अशा प्रकारची भावना मनात ठेवून आम्हाला चालणार नाही. कारण त्यामध्ये पाकिस्तानचाही नाश आहे आणि हिंदुस्थानचेही नुकसान आहे, हे आम्हाला उघड दिसते आहे. पण चीनच्या मैत्रीचा काय परिणाम घडतो ते पाकिस्तानला समजावयास हवे. दुर्दैव हे आहे की, पाकिस्तान अजूनही इतिहासाच्या दृष्टीने काही शिकत नाही. दुसऱ्यांच्या चुकांचा उपयोग आपली सुधारणा करण्यासाठी करावयाचा असतो. 'पुढच्यास ठेच मागचा शहाणा' असे आपण साध्या जीवनामध्ये म्हणतो. दुसऱ्याकडून झालेल्या चुका जर आपण इतिहासामार्फत समजून घेतल्या नाहीत तर इतिहास निरर्थक बनेल. आम्ही काल चीनशी भोळी मैत्री केली, पण आज आम्हाला पश्चात्ताप करण्याची पाळी आली. इंडोनेशियाचीही तीच गत झाली. पण हे पाकिस्तानला समजले पाहिजे. काल जे हिंदुस्थानचे झाले, आज जे इंडोनेशियाचे होत आहे, तेच उद्या पाकिस्तानचे होणार आहे यासंबंधी माझ्या मनामध्ये शंका नाही. परंतु हे समजून घेण्यासारखी आज तेथे परिस्थिती नाही, आणि म्हणून संरक्षणाच्या बाबतीत आपणाला कोणताही धोका पत्करता येणार नाही.

पाकिस्तानच्या मनात हिंदुस्थानसंबंधी विरोधाची भावना मुळातच आहे. पण पाकिस्तान व चीन हे एकत्र आले त्याचे मुख्य कारण कोणते? पाकिस्तान हे मुसलमानी राष्ट्र आहे, पण ते साम्यवादी नाही. उलट चीन हे साम्यवादी राष्ट्र असून मुसलमानी राष्ट्र नाही. तेव्हा चीन आणि पाकिस्तान एकत्र आले ते काही धर्म किंवा साम्यवाद यांच्यामुळे नव्हे, तर हिंदुस्थानसंबंधी या दोन राष्ट्रांच्या मनात असलेला विरोध हेच याचे मुख्य कारण आहे. या बाबतीत चीन आणि पाकिस्तान यांच्या विचारांमध्ये फारसा फरक नाही. पण विरोधावर आधारलेले राजकारण फारसे यशस्वी

होत नाही ही गोष्ट त्यांना समजत नसावी. आपल्या शेजारच्या या राष्ट्रांची हिंदुस्थानसंबंधी ही जी भूमिका आहे आणि तिच्या मागचा जो इतिहास आहे तो आपण समजावून घेतला पाहिजे, आणि हे सर्व लक्षात घेऊन तुम्हा-आम्हाला आपल्या देशाच्या रणनीतीची, राजकारणाची आणि परराष्ट्रीय नीतीची आखणी केली पाहिजे. ही तयारी करावयाची असेल तर त्याचा अर्थ एकच आहे. तो म्हणजे संरक्षणाच्या तयारीचा जो बोजा आपण उचललेला आहे तो आपण चालू ठेवला पाहिजे. जोपर्यंत चीनचे आक्रमक राजकारण चालू राहील, जोपर्यंत चीन आपली राजकीय आक्रमक नीती सोडणार नाही, तोपर्यंत हिंदुस्थानला आपल्या रक्षणाची जय्यत तयारी ठेवावी लागेल ही काळ्या दगडावरची रेघ आहे. या बाबतीत हिंदुस्थानने कुठलीही चूक केली तर ती हिंदुस्थानला अतिशय महाग पडेल हे आपण पक्के लक्षात ठेविले पाहिजे.

ही भूमिका आपण स्वीकारल्यानंतर त्याचे जे अनेक परिणाम होतील त्यांपैकी एक परिणाम असा आहे की, अवाढव्य लष्करी खर्चाचा बोजा हा हिंदुस्थानच्या दृष्टीने नित्याचा बोजा होऊन बसेल. एकदा का हा बोजा सुरू झाला की, मग ती नित्याची बाब होऊन बसते. एकदा तुम्ही तुमची वैमानिक शक्ती, सैन्यशक्ती एका विशिष्ट मर्यादेपर्यंत नेऊन पोहोचविली, की तिच्याखाली तुम्हाला ती पुन्हा आणता येत नाही. आपल्या संसारामध्ये आपण एका विशिष्ट मर्यादेपर्यंत खर्च वाढविला की, मग तो खाली आणणे फार अवघड होते, हा तुमचा-आमचा घरोघरचा अनुभव आहे. तीच गोष्ट देशाच्या जीवनाच्या बाबतीतही खरी आहे. आतापर्यंत हिंदुस्थान एका खांद्यावर विकासाच्या खर्चाचा बोजा घेऊन चालला होता, पण आता एका खांद्यावर विकासाचा बोजा व दुसऱ्या खांद्यावर संरक्षणाचा बोजा घेऊन त्याला पुढचा प्रवास केला पाहिजे. अगदी साध्या प्रतीकाच्या भाषेत बोलावयाचे झाल्यास मला हिंदुस्थानचे हे चित्र दिसते आहे की, रस्ता डोंगराळ आहे, वेळ उन्हातान्हाची आहे, जवळपास पाणी मिळेलच याची खात्री नाही, साथीला माणसे असतीलच असा भरवसा नाही, परंतु खांद्यावर हे दोन्ही बोजे घेऊन वाटचाल ही केलीच पाहिजे. हिंदुस्थानची

जी सफर चालू आहे त्या सफरीतला आजचा जो मुक्काम आहे त्याचे हे चित्र आहे.

आणि त्याबरोबरच आपले दुसरेही अनेक अंतर्गत प्रश्न आहेत. गरिबीचा प्रश्न आहे, शिक्षणाचा प्रश्न आहे, शेतीचा प्रश्न आहे, आपले असे लाख प्रश्न आहेत. या देशातील प्रत्येक माणसाच्या जीवनामध्ये निर्माण होणारा एकेक प्रश्न म्हणजे या देशापुढील एकेक समस्या आहे. तेव्हा हे बोजे तर आहेतच, पण संरक्षणाच्या तयारीतून निर्माण होणारे जे प्रश्न आहेत ते अत्यंत दूरगामी स्वरूपाचे असल्यामुळे ते सोडविण्यासाठी या राष्ट्राला यापुढे अतिशय दक्षता घ्यावी लागेल.

मला आणखी एक गोष्ट आपणाला सांगितली पाहिजे. तिचे आजच्या परिस्थितीच्या संदर्भात फार महत्त्व आहे, आणि म्हणून मी जेथे जेथे जातो तेथे तेथे आग्रहाने ही एक गोष्ट सांगतो. ती गोष्ट अशी की, हिंदुस्थानबाबत चीनची आणि पाकिस्तानची ही जी भूमिका आहे तिचा अर्थ काय? त्यांचे हिंदुस्थानसंबंधीचे काय निदान आहे? हिंदुस्थानच्या बाजूने विचार करताना पाकिस्तान आणि चीनचे मनोव्यापार काय आहेत हे समजून घेण्याचा जसा आम्ही प्रयत्न करतो तसेच हिंदुस्थानचे मनोव्यापार जाणून घेण्याचा प्रयत्न चीन आणि पाकिस्तानही करीत असतील. त्यांच्यातील जबाबदार मंडळींनी जी वक्तव्ये केली आहेत त्यांचा एकच अर्थ आहे. तो म्हणजे हिंदुस्थान हा एक फुटणारा देश असून या देशामध्ये इतके कठीण प्रश्न आहेत की, राष्ट्र म्हणून तो राहूच शकणार नाही. असे हे आपल्या देशासंबंधीचे त्यांचे निदान आहे. शत्रूलासुद्धा आपल्यासंबंधी काय वाटते हे आपण समजून घेतले पाहिजे; आणि म्हणून मी आपणांस सांगू इच्छितो की, संरक्षणाची तयारी सैन्य, विमानदळ, नौदल करीत राहतीलच. परंतु त्याचबरोबर अत्यंत मूलभूत स्वरूपाचा प्रयत्न या देशात तुम्हा-आम्हाला करावयास पाहिजे, आणि तो म्हणजे या देशाचे मनोबल वाढविण्याचा. त्याची प्रचीती खऱ्या अर्थाने हा देश एकजीव झाला, एकजिनसी झाला, एकात्म झाला या अनुभवात आली पाहिजे. एवढेच नव्हे तर हा अनुभव आपल्या शत्रूंनाही आला पाहिजे. तरच आपले राष्ट्र, राष्ट्र म्हणून पुढे

जाईल.

गेल्या वर्षी आपल्याला हा अनुभव आला असला तरी आपल्यात काही दोष आहेत. मी जसे आपले गुण सांगतो तसेच आपले जे दोष असतील तेही मी आपल्याला सांगितले पाहिजेत. आत्मनिरीक्षणासाठी आपण हे सर्व केले पाहिजे. पण हे आत्मनिरीक्षण आपण घडलेल्या गोष्टींतून केले पाहिजे, काल्पनिक गोष्टींतून नव्हे. १९६५ च्या ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये पाकिस्तानचे आक्रमण सुरू झाले त्यापूर्वी भारतात कसल्या प्रकारच्या घोषणा होत होत्या, कसल्या प्रकारचे मोर्चे निघत होते ते आपण आठवा. त्या वेळी ते चित्र पाहत असताना मन थोडेसे साशंक होत होते की, राष्ट्र एका बाजूने संरक्षणाची तयारी करीत आहे तर दुसऱ्या बाजूने आमची अंतर्गत परिस्थिती ही अशी दुर्बल आहे. पण मी हेही चित्र पाहिले आहे की, पाकिस्तानने केलेल्या आक्रमणाला उत्तर देण्याकरिता हिंदुस्थानची सेना जेव्हा पाकच्या दिशेने निघाली तेव्हा या सगळ्या घोषणा बंद झाल्या, हे सगळे मोर्चे बंद झाले आणि सबंध देश एकमनाने वागला. ही अतिशय चांगली गोष्ट झाली. ही कहाणी येथे संपली असती तर मला फार बरे वाटले असते. पण ही कहाणी येथे संपत नाही. ताश्कंदचा करार झाला आणि आमचा भाऊबंदकीचा वाद पुन्हा सुरू झाला. पुन्हा बंदच्या घोषणा, पुन्हा बंदचे उठाव, पुन्हा मोर्चे, पुन्हा ते कौरव-पांडवांचे महाभारत सुरू. मी कोणाला दोष देण्याच्या दृष्टीने हे सांगत नाही. लोकांची गाऱ्हाणी मांडण्यासाठी जे पक्ष किंवा जे नेते खटपट करीत असतील त्यांचा हेतू वाईट नसेलही. पण हेतू महत्त्वाचा नसून त्याचा परिणाम काय होतो आहे ही गोष्ट महत्त्वाची आहे. आमच्या विरोधी असणारे राष्ट्र आमच्यासंबंधीचे त्यांचे धोरण आमच्या हेतूवरून ठरवीत नसते, तर ते येथे प्रत्यक्ष निर्माण होणाऱ्या परिस्थितीवरून ठरवीत असते, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. कायद्याने, घटनेने आपण एकराष्ट्र झालो ही गोष्ट खरी आहे, परंतु अनुभवाने, भावनेने, विचाराने, बुद्धीने, दैनंदिन वैभवाच्या आणि दैनंदिन संकटाच्या प्रसंगी आम्ही सगळे एकराष्ट्र आहोत आणि राष्ट्राचे प्रश्न हे पहिल्या प्रतीचे प्रश्न आहेत, स्वतःचे

प्रश्न नंतर, अशी भूमिका आहे का आपल्या सर्वांची ? हा प्रश्न प्रत्येकाने आपापल्या मनाशी विचारावयाचा आहे. त्याचे जाहीर उत्तर मी मागत नाही. पण हे उत्तर समाधानकारक मिळत नाही हे मी आपणाला सांगू इच्छितो, आणि म्हणून संरक्षणाच्या तयारीबरोबर एकदोन अतिशय महत्त्वाच्या गोष्टी तुम्हा-आम्हाला या देशात कराव्या लागतील. ज्या ज्या गोष्टींमुळे राष्ट्र अधिक एकात्म बनेल, अधिक एकजिनसी बनेल अशी प्रत्येक गोष्ट करण्यासाठी तुम्ही-आम्ही हिरीरीने पुढे आले पाहिजे—व्यक्ती म्हणून, समाज म्हणून, राज्य म्हणून, राष्ट्र म्हणून. हे जर तुम्ही-आम्ही करू शकलो आणि एका मनोबलाने, एका नव्या शक्तीने तयार झालेले हे राष्ट्र आहे असा अनुभव आमच्यासंबंधी दुष्मनीची भावना ठेवणाऱ्या राष्ट्रांना आला, तर माझी खात्री आहे की, शत्रुराष्ट्रांची कितीही बलिष्ठ मैत्री असली तरी हिंदुस्थानविरुद्ध आक्रमणाचे शस्त्र उगारण्यापूर्वी त्यांना मनामध्ये दहा वेळा विचार करावा लागेल. तेव्हा एकराष्ट्र म्हणून तुम्हा-आम्हाला बनावयाचे असेल तर एकराष्ट्र बनण्याची आमची जी प्रक्रिया आहे, ती आम्हाला अधिक वेगाने पुढे न्यावी लागेल, आणि या कामामध्ये आमची तरुण पिढी सगळ्यात महत्त्वाची कामगिरी बजावू शकेल.

आमची ही नवी पिढी एका नवीन पद्धतीने तयार होत आहे. त्यांचे काही अभिमान आहेत, अहंकार आहेत, रागलोभ आहेत; परंतु त्यांच्या अंतःकरणामध्ये थोर राष्ट्रभक्तीही आहे. नवी पिढी ही जुन्या पिढीपेक्षा तसूभर जास्तच राष्ट्रभक्त आहे असे मी मानतो. स्वातंत्र्यासाठी लढलेली पिढी अधिक राष्ट्रभक्त होती असा माझा दावा नाही. कारण स्वातंत्र्या-करिता धडपडणाऱ्या पिढीने अगदी जे आवश्यक होते तेच केले. परतंत्र राष्ट्राचे नागरिक राहण्याइतकी शरमेची दुसरी गोष्ट नव्हती, ती त्यांनी झुगारून दिली. पण नव्या पिढीतील तरुण ज्या हिमतीने आणि ज्या शौर्याने गेल्या संघर्षाच्या वेळी लढले आणि ज्या धैर्याने त्यांनी देशासाठी प्राण टेवले, तसे लढणे किंवा तशा प्रकारचा त्याग करणे, अंतःकरणात देशभक्तीची जाज्वल्य भावना असल्याशिवाय शक्य होणार नाही.

नवी पिढी ही अशी मागच्या पिढीपेक्षा अधिकच देशभक्त असली तरी तिच्यापुढील प्रश्न अधिक गंभीर आहेत. आज हिंदुस्थानच्या प्रश्नांची सगळी पार्श्वभूमी बदललेली आहे. त्या प्रश्नांतला आशयही बदललेला आहे, आणि त्यामुळे कुठल्या प्रश्नांना अग्रहक्क द्यावयाचा यासंबंधीचा निर्णय घेणे आज तितकेसे सोपे काम राहिलेले नाही. पण आपला निर्णय शक्य तो सोपा व्हावा यासाठी आपल्याला मी ही सर्व पार्श्वभूमी सांगितली. सोपा या अर्थाने की, ज्या गोष्टीमुळे देशाच्या एकतेला मदत होईल ती गोष्ट पहिली. ही भूमिका या देशातील सगळ्या नागरिकांनी आणि विशेषत: आमच्या तरुण पिढीने स्वीकारली पाहिजे आणि तिचे आचरण केले पाहिजे. ही अगदी साधी गोष्ट असली तरी ती अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे, तातडीची गोष्ट आहे. हिंदुस्थान हे राष्ट्र बनले आहे याचा प्रत्यय शेजारच्या राष्ट्रांना आला पाहिजे. तो प्रत्यय त्यांना आपल्याला दोन प्रकारे देता येईल. आम्ही एकराष्ट्र आहोत याचा प्रत्यय लोकांच्या दैनंदिन जीवनामध्ये आम्हाला आला म्हणजे अप्रत्यक्षपणे त्यांनाही तो येईल. आणि आमच्या देशावर कितीही आर्थिक संकटे आली तरी त्या आर्थिक संकटांशी आम्ही मुकाबला करू शकतो ही भावना आम्ही या देशामध्ये निर्माण करू शकलो तर तिचीही जाणीव त्यांना होईल. पण हे सगळे काम अतिशय कठीण आहे. ते पार पाडण्यात आमची सर्व देशभक्ती कसोटीस लागणार आहे.

गेल्या चार वर्षांमध्ये या देशावर संकटांच्या राशी कोसळल्या. ज्या नेतृत्वाच्या छायेखाली राष्ट्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वाढले, ती छाया गेली. त्यानंतर कर्तृत्वाने तितक्याच तोलामोलाचा नेता देशाला लाभला. मी हे शास्त्रीजींच्याबद्दल बोलतो आहे. पण दुर्दैवाने त्यांचे नेतृत्व आपणाला अठरा महिन्यांपेक्षा जास्त लाभले नाही. तरीसुद्धा त्या नेतृत्वाने हिंदुस्थानची शान वाढविली. केवळ चीनची किंवा पाकिस्तानचीच नव्हे तर जगातल्या अनेक राष्ट्रांची अशी समजूत होती की, पंडित नेहरूनंतर हे राष्ट्र, राष्ट्र राहणार नाही, निदान या राष्ट्रात लोकशाही खास राहणार नाही. पण आम्ही आमचा नवा इतिहास घडवितो आहोत, आमचा देश नवीन तऱ्हेने

बांधीत आहोत, त्याची त्यांना जाणीव नसल्यामुळे त्यांना असे वाटणे साहजिक होते. पंडित नेहरूंच्या शेवटच्या आजाराच्या वेळी मी अमेरिकेमध्ये होतो. मला आठवते तेथील लोक खाजगी चर्चेमध्ये गोड बोलत, हिंदुस्थासंबंधी अनेक चांगल्या गोष्टी बोलत, पण शेवटी नेहरूनंतर कोण? हा त्यांचा ठरलेला प्रश्न असे. कशासाठी तुम्ही हा प्रश्न विचारता असे मी त्यांना एकदोन वेळा विचारलेही. नेहरूनंतर कोण येणार याबद्दल ते चिंता करीत नव्हते. परंतु हिंदुस्थानात जी लोकशाही नांदते आहे ती नेहरूनंतर टिकेल की नाही ही त्यांची खरी चिंता होती. नेहरूंच्या नेतृत्वामुळे या देशात लोकशाही टिकून आहे अशी त्यांची समजूत होती. पंडित नेहरूंच्यासंबंधी मला नितांत आदर आहे. नेहरूंच्या नेतृत्वासाठी या महाराष्ट्रामध्ये मला काय किंमत द्यावी लागली याचीही आपल्याला कल्पना आहे. परंतु या देशामध्ये असलेली लोकशाही या देशाला एक मोठा नेता होता म्हणूनच आहे यावर माझा पूर्वीही विश्वास नव्हता आणि आजही नाही. नेहरूनंतरही आम्ही या देशात लोकशाही टिकविली. नेहरूनंतर आलेल्या कर्तृत्ववान पुढाऱ्याच्या मृत्यूनंतरही आम्ही या देशात लोकशाही टिकवू शकलो असा या देशाला पुन्हा एकदा अनुभव आला, बाहेरच्या देशांनाही आला. हिंदुस्थानचा हा एक मोठा विजय आहे, असे आम्ही मानले पाहिजे.

हिंदुस्थानची ही जी शक्ती आहे तिचा याप्रमाणे आम्हाला प्रत्यय येत असल्यामुळे आमच्या राष्ट्राचा आत्मविश्वास जरूर वाढतो आहे. परंतु त्याचबरोबर आर्थिक स्वरूपाच्या प्रश्नांची गुंतागुंत अधिक वाढते आहे, ही गोष्ट आम्हाला कबूल केली पाहिजे. कारण ज्या प्रमाणात आमच्या देशातल्या जनतेच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत, त्या प्रमाणात त्यांचा तराजू आम्हाला अजून सावरता आलेला नाही. अपेक्षा वाढल्यामुळे प्रश्न गुंतागुंतीचे झाले आहेत हे खरे आहे. परंतु ज्या गतीने आम्ही आमच्या आर्थिक प्रगतीची पावले टाकावयास पाहिजे होती त्या गतीने आम्ही ती टाकू शकलो नाही, हीही गोष्ट खरी आहे. पण त्याबद्दल केवळ शासनाला किंवा एखाद्या व्यक्तीला आपल्याला दोष देता येणार नाही. या राष्ट्राच्या

जीवनात प्राण ओतून एक नवे राष्ट्र वनविण्याचा प्रयत्न करताना, एका नवीन तऱ्हेच्या आर्थिक जीवनाचा आपणास पाया घालावयाचा होता. हे सर्व करीत असताना आंतरराष्ट्रीय संकटांशी आणि प्रत्यक्ष लष्करी आक्रमणांशी आपणाला मुकावला करावा लागला. इतक्या अनेकविध संकटांना तोंड देऊन राष्ट्र पुढे चालले असताना ज्या आर्थिक गुंतागुंती होत आहेत त्या तुम्हा-आम्हाला तापदायक आहेत. परंतु या आर्थिक गुंतागुंतीतून निर्माण होणारे तणाव व दबाव यांमुळे आम्ही आमच्या राष्ट्रीय एकतेचे किंवा राष्ट्रीय सुरक्षिततेचे महत्त्व कमी मानणार आहोत किंवा काय, आणि आज हे वंद करून आणि उद्या ते वंद करून आम्ही आमचे नशीबच वंद करून घेणार आहोत किंवा काय, हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे.

आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, आजच्या या कठोर आणि गुंतागुंतीच्या दुनियेमध्ये केवळ दोस्तीसाठी कोणी लढाईस सज्ज होत नाही. मैत्रीसाठी लढाई पत्करणे यासारखा वावळटपणा दुनियेमध्ये दुसरा कोणता असू शकणार नाही. तुम्हाला तुमची तयारी करावयाची असेल तर मित्रराष्ट्र म्हणविणारी राष्ट्रे तुम्हाला तुमच्या तयारीत मदत करण्याची तयारी दाखवितील. यापेक्षा मैत्रीची व्याख्या आजकाल अधिक लांबलचक होत नाही. अशा या अतिशय कठोर दुनियेमध्ये, आणि आवतीभोवती असणाऱ्या वादळी वातावरणातून, या देशाचे तारू तुम्हा-आम्हाला धैर्याने आणि निर्धाराने पलीकडच्या किनाऱ्याला पोहचवावयाचे आहे, आणि म्हणून आपल्यापुढे असणाऱ्या प्रश्नांची उकल करण्याची जबाबदारी आपण केवळ एखाद्या नेत्याच्या किंवा एखाद्या पक्षाच्या विचारावरच न टाकता या प्रश्नांचा आज या देशातील प्रत्येक सुजाण व्यक्तीने विचार केला पाहिजे, आणि या प्रश्नांचे महत्त्व व गांभीर्य समजून घेतले पाहिजे.

मी आपल्याला मघाशी सांगितले तेच आपल्याला शेवटी पुन्हा एकदा सांगतो. संरक्षणाची तयारी हा संकटकालीन प्रश्न नसून संरक्षणाची तयारी हा नित्याच्या तयारीचा प्रश्न म्हणून हिंदुस्थानच्या जीवनामध्ये आला आहे आणि तो असा कायमचा राहील अशी माझी भावना आहे. ही गोष्ट गृहीत धरून आर्थिक क्षेत्रामध्ये आमचे मार्ग सुकर कसे होतील आणि राष्ट्राच्या,

एकतेची पकड जनमनामध्ये पक्की कशी होईल याचा आम्ही सतत विचार केला पाहिजे, त्यासाठी आम्ही सतत प्रयत्न केले पाहिजेत. अलग अलग धर्म आणि अलग अलग जातीजमाती आणि भाषा यांमध्ये आम्ही जरी वाटले गेलो असलो तरी भारताचा प्रश्न आल्यानंतर पहिल्या प्रथम मी भारताचा, नंतर बाकीचे प्रश्न, ही भावना आम्ही आमच्या विचारामध्ये, आमच्या कामामध्ये वाढवू शकलो आणि उमेदीने, धैर्याने आणि इर्ष्येने आपल्या सगळ्या प्रश्नांना तोंड देण्याचा आम्ही प्रयत्न केला तर हिंदुस्थान हे एक पहिल्या प्रतीचे आणि मोठे प्रगत राष्ट्र म्हणून दुनियेमध्ये अभिमानाने जगू शकेल, अशी माझी श्रद्धा आहे. राष्ट्र बनविण्याचे हे काम आज तुमच्या आमच्याकडे आले आहे हे तुमचे आमचे भाग्य आहे. हे तुम्हा-आम्हाला आव्हान आहे. हे आव्हान स्वीकारण्याची शक्ती तुम्हा-आम्हाला ईश्वराने द्यावी अशी प्रार्थना करतो आणि आपली रजा घेतो.

जाहीर सभा, ठाणे, दि. २४-४-६६

९ पहिले पाऊल

आपल्या या छोट्या पण ज्याचे माझ्या एका तरुण मित्राने एक जीवंत गाव असे नुकतेच वर्णन केले अशा गावी येण्याची मला संधी मिळाली याबद्दल मला आनंद वाटतो. आणि आपण हे जे येथे चांगले काम सुरू करीत आहात त्या कामाशी आज एक प्रकारचा माझा संबंध प्रस्थापित होतो आहे हे पाहून माझा हा आनंद द्विगुणित झाला आहे.

आपण हाती घेतलेल्या या कामाच्या पाठीमागे जे विचार आहेत, जे तत्त्व आहे, जी दृष्टी आहे त्याचे या मित्राने फार चांगल्या शब्दांत वर्णन केले. या देशातील मुख्य प्रश्न आर्थिक स्वरूपाचा आहे. देशात जेव्हा अर्थटंचाई निर्माण होते तेव्हा त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग म्हणजे देशाच्या गरजा भागविण्याची किंवा देशाला आवश्यक ती साधने उपलब्ध करून देण्याची शक्ती देशामध्ये निर्माण करणे हा आहे. तेव्हा यापुढील आपल्या सगळ्या प्रयत्नांची दिशा ही असली पाहिजे की, आपल्या देशाच्या जीवनामध्ये ज्या अनेक कमजोरी आहेत त्या आपण प्रथम नाहीशा केल्या पाहिजेत. पण या कमजोरी काही तुमच्या आमच्यामुळे निर्माण झालेल्या

नाहीत. पुष्कळ अंशी त्या परंपरेने वाढत आलेल्या आहेत. या देशामध्ये अनेक गोष्टी आपण शेकडो वर्षे करू शकलो नाही, परिस्थितीमुळे करू शकलो नाही पण करू शकलो नाही ही गोष्ट खरी आहे. त्यामुळे आज इतके प्रश्न तुंबून राहिले आहेत, इतक्या प्रश्नांची गुंतागुंत झाली आहे, की त्यांतून मार्ग काढणे आज एक महा बिकट काम होऊन बसले आहे. पण स्वराज्य मिळाल्यानंतर मनामध्ये तर अशी अपेक्षा निर्माण झाली आहे की, या सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळाली पाहिजेत. ही अपेक्षा अर्थात अगदी स्वाभाविक आहे. कारण इंग्रजांचे राज्य असताना आम्ही सर्वांनी या देशामध्ये असे चित्र उभे केले की, इंग्रजांचे राज्य गेले की येथे रामराज्य येईल. आता लोकांच्या मनात अशी भावना निर्माण झाली आहे की, इंग्रजांचे राज्य गेले पण रामराज्य आले नाही; आणि मग हे रामराज्य कधीच निर्माण होणार नाही की काय, आतापर्यंत आपण मानले ते सर्व खोटे होते की काय, आपल्याला कधी चांगले दिवस येणारच नाहीत की काय, अशा प्रकारची एक निराशेची भावना आज प्रत्येक माणसाच्या मनामध्ये येण्याचा संभव आहे; पण ही भावना बरोबर नाही. इंग्रजांचे किंवा परक्यांचे जे राज्य या देशात होते ते, आमच्या दृष्टीने आमच्या देशाची, आमच्या समाजाची नवी रचना करण्याचे जे काम आम्ही हाती घेऊ इच्छित होतो त्यामध्ये एक मोठा अडथळा करणारे होते. तो अडथळा दूर केल्याशिवाय आम्ही या कामाला हात घालू शकत नव्हतो. पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आम्ही या कामाला हात घातल्यानंतर अनेक प्रश्न उभे राहिले. घरात कारभारी मनुष्य कोणी नसावा, घरात कुणाचा पाठिंबा नसावा, लहानपणी आईवडील गेलेले असावे, अशा परिस्थितीत आपल्या कर्तृत्वाने व उमेदीने पुढे येण्याची खटपट करणाऱ्या मुलावर लग्न होऊन संसार करण्याची जबाबदारी पडावी म्हणजे त्या मुलाचे जसे होईल तसे या देशाचे झालेले आहे. प्रपंच फार मोठा आहे. पंचेचाळीस करोड लोकांचा समाज, आणि त्यात अपेक्षाही फार मोठ्या. पाठीमागची परंपराही तशीच लांबलचक. पण राष्ट्र म्हणून राजकीय दृष्ट्या आपण पहिल्या प्रथमच अस्तित्वात आलो. या बाबतीत आपले फार चुकीचे गैरसमज आहेत. खरे म्हणजे खंडप्राय

अशा एका मोठ्या देशाचे आम्ही छोटे छोटे तुकडे होतो. महाराष्ट्र हा असाच एक तुकडा होता. असेच आणखी काही तुकडे होते. पण स्वतंत्र एकजिनसी राष्ट्र म्हणून हिंदुस्थान तुमच्या आमच्या डोळ्यांसमोर पहिल्या-प्रथम अलीकडेच उभा राहिला. त्याच्या अंतर्गत प्रश्नांचे स्वरूप हे असे असल्यामुळे अजूनही हा देश पूर्ण राष्ट्र झाला आहे की नाही असा कधी कधी मनात विकल्प येतो. थोडक्यात म्हणजे प्राथमिक प्रश्नापासून आम्हाला राष्ट्र बनावयाचे आहे. आमच्या देशाचे नेते राष्ट्रीय एकतेची प्रक्रिया अजूनही चालूच आहे असे आम्हाला सांगतात त्याचा अर्थ काय ? राष्ट्रीय एकतेचा प्रश्न अजूनही आमच्यापुढे उभा राहतो याचा अर्थ असा की, राष्ट्राला राष्ट्र बनविण्याचे काम अजूनही चालू आहे. कुंभाराच्या चाकावर असणारे मडके पक्के नसते. कुंभाराच्या भट्टीत जेव्हा ते भाजून निघते तेव्हा ते पक्के बनते. अजूनही आमचे कुंभाराचे चाक फिरते आहे. आमच्या देशाच्या एकतेचे चाक फिरते आहे. त्यावरील मडके अद्यापि पक्के बनावयाचे आहे. देशाच्या निरनिराळ्या भागांत आज जे काही घडते आहे ते याचे द्योतक आहे, निदर्शक आहे.

या देशातील गरिबी, या देशातील विषमता नष्ट व्हावी म्हणून आम्ही स्वराज्य मिळविले. पिढ्यानुपिढ्या आमच्या मानगुटीवर बसलेले हे गरिबीचे भूत उठले पाहिजे. जातींच्या, धर्मांच्या वेडाने आम्ही दबून गेलेलो, तुटलेलो, फाटलेलो असे लोक आहोत. आमची ही दबलेली, तुटलेली, फाटलेली मने बांधली जाऊन एक बनली पाहिजेत. हिंदुस्थान हा सुखासमाधानाने, कर्तृत्वाने आणि वैभवाने नांदणारा असा एक नवा समाज बनावा, एकजिनसी समाज बनावा, असे समाजवादी चित्र आज आमच्या डोळ्यांपुढे आहे. पण हे चित्र पुरे करण्याकरिता जी पावले टाकली पाहिजेत त्यांचा आणि आमचा पुरा मेळ बसत नाही ही मोठी अडचण आहे. देशाच्या प्रश्नाचे मूळ स्वरूप हे असे आहे, आणि म्हणून तुम्ही सुरू केलेले हे छोटे काम छोटे असूनही मला जरूर महत्त्वाचे वाटते. भुईमुगाचे पीक काढणाऱ्या येथल्या व आवतीभोवतीच्या शेतकऱ्यांना आपली स्वतःची गिरणी सुरू करावयाची आहे. कोणातरी व्यापाऱ्याला

आपला माल विकून न टाकता कच्च्या मालाचा पक्का माल आपल्या डोळ्यांसमोर होत असताना पाहावा, त्यात असेल तो फायदा समाजाच्या किंवा संस्थेच्या पदरात पडावा अशा तऱ्हेचे नवीन आर्थिक रचनेचे जे एक युग आपण घडवीत आहोत, त्यातलेच एक छोटेसे काम आज आपण येथे सुरू करता आहात. या छोट्या कामाचा आणि मघाशी राष्ट्राचे मी जे मोठे काम सांगितले त्याचा, परस्परांशी अत्यंत निकटचा संबंध आहे, या गोष्टीची आपण मनाशी सतत जाणीव ठेवली पाहिजे.

राष्ट्राची संकटे ही परराष्ट्रीय आक्रमणातून निर्माण होतात, आर्थिक प्रश्नातून निर्माण होतात, अन्नाच्या प्रश्नातून निर्माण होतात, ही गोष्ट खरी आहे. पण आमच्या राष्ट्राच्या आजच्या ज्या अडचणी आहेत त्या, ज्यांना हे प्रश्न अभ्यासावे लागतात, हाताळावे लागतात, त्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांनीच समजून घ्याव्यात, इतरांनी त्या समजून घेण्याचे कारण नाही अशा प्रकारचे वातावरण जर निर्माण झाले तर या देशाचे काम चालणार नाही. म्हणून मी हा प्रश्न आपल्यासमोर मांडतो आहे. सबंध देशाचे जे प्रश्न आहेत त्यांची पार्श्वभूमी ही अशी आहे. तुमच्या आमच्यासारख्या सर्व माणसांपर्यंत हा विचार जाऊन पोहोचला पाहिजे. आपला सामान्य माणूस फार सुशिक्षित नसेल पण तो शहाणा माणूस आहे. साध्या, सोप्या भाषेत समजून सांगितले तर त्याला हे सगळे प्रश्न समजतात, आणि म्हणून मी आपल्याला सांगतो की, तुम्ही हे जे काम करता आहात ते, त्यामध्ये भागीदार असणाऱ्या लोकांपुरतेच मर्यादित महत्त्वाचे नाही, तर त्याला राष्ट्रीय महत्त्वही आहे. छोट्या गावामध्ये उभा राहिलेला एक कारखाना एवढाच मर्यादित जर या प्रयत्नाचा अर्थ असता तर मी इतक्या लांब तसदी घेऊन आलो नसतो. इतर कारखानदारही कारखाने काढतात. पण तुमच्या या कारखानदारीचे स्वरूप वेगळे आहे. आपण करीत असलेल्या नव्या प्रयत्नांचे हे बीज आहे. आता लवकरच मराठवाड्यातील पहिला साखर कारखाना निघणार आहे. मी दिल्लीहून इतक्या दूर येथे आलो तो एवढ्यासाठी आलो की, बाकीची सर्व कामे जशी महत्त्वाची आहेत, तशीच ही कामेही महत्त्वाची आहेत. कारण आमच्या शेतीचे मोठे दुःख

हे आहे की, शेती करणारा मनुष्य धंदा म्हणून शेती करीत नाही. धंदा करणारा मनुष्य धंद्यात मिळणाऱ्या आर्थिक फायद्यासाठी धंदा करीत असतो. व्यापार करण्यासाठी वसलेला कोठलाही व्यापारी लोकांवर मेहेरबानी करण्याकरिता मी व्यापार करतो असे सांगू लागला तर आपण खरे मानू काय? लोकांना त्याची जरूर मदत होते. परंतु कापडाचा व्यापार करणारा, किंवा धान्याचा व्यापार करणारा, किंवा सोन्याचांदीचा व्यापार करणारा मनुष्य, आपले दुकान मांडून किंवा आपली पेढी उघडून बसतो, त्याचा साधा हेतू हा असतो की, त्याला चार पैसे मिळावे. तेव्हा शेती हा धंदा व्हावयाचा असेल तर तो व्यापारी तत्त्वावर व्हावयास पाहिजे. तरच आपल्या शेतकऱ्याच्या उत्कर्षाचे मार्ग खुले होतील.

त्याचबरोबर आणखीही एक गोष्ट व्हावयास पाहिजे. उसाचा शेतकरी हा साखरेचा व्यापारी किंवा कारखानदार बनला पाहिजे; भुईमूग पिकविणारा शेतकरी हा तेलाचा व्यापारी किंवा कारखानदार बनला पाहिजे; कापूस पिकविणारा शेतकरी हा कापडाचा व्यापारी किंवा कारखानदार बनला पाहिजे. म्हणजे मग कच्च्या मालाचा पक्का माल तयार होत असताना येणारी व्यापारी वृत्ती आणि तिच्यातून निर्माण होणारी पिळवणूक याला पायबंद बसेल. ही पिळवणूक थांबविण्याचा मार्ग आपण काढला नाही तर शेतीचा धंदा बंद करण्यास आम्ही मदत करीत आहोत असा त्याचा अर्थ होईल. तसे होऊ नये म्हणून आपला हा प्रयत्न आहे. येथे भुईमूग पिकविणारी आवतीभोवतीची जी काही पाच-पंचवीस गावे असतील, त्या गावांतल्या शेतकऱ्यांचा माल त्यांच्याच प्रतिनिधीने खरेदी करावा आणि त्याचा जो पक्का माल होण्यासारखा असेल तो करून घेऊन गावाच्या बाजारपेठेत जावे. शेतीच्या धंद्यात जो दोष आहे, जे एक गंडांतर आहे, तो दोष काढून टाकण्याचा, ते गंडांतर टाळण्याचा हा एक मार्ग आहे. या संबंध कामाकडे पाहण्याची आमची दृष्टी ही अशी आहे.

शेतीच्या मालाचे भाव कसे ठरले जातात याची मला माहिती आहे. आपल्याला कल्पना नसेल या गोष्टी कशा घडतात त्या. शेंगांचेच उदाहरण घ्या. शेंगांचे भाव कसे ठरतात? जे व्यापारी असतील ते

आपल्याला वरोबर सांगतील. आता आपण चैत्र महिन्यामध्ये आहोत. आता कोणी शेंग पेरलेली नाही. मृग नक्षत्राचा पहिला पाऊस पडून गेल्यानंतर जेव्हा तुमची शेते उन्हे खातात त्या वेळी या कामाला सुरुवात केली जाते. जगातल्या पाच-दहा व्यापाऱ्यांची एक टोळी असते. सवंध दुनियेमध्ये भुईमुगाखाली असणाऱ्या शेतीचा विचार करून त्यांपैकी हिंदुस्थानची उत्पादनशक्ती किती आहे, आफ्रिकेतील देशांची उत्पादन-शक्ती किती आहे, जगातील आणखी इतर देशांची उत्पादनशक्ती किती आहे याचा हिशेव करून, सवंध दुनियेमध्ये भुईमुगाची शेंग चाळू साली किती निर्माण होण्याची शक्यता आहे याचा ही टोळी अंदाज करते. त्याचप्रमाणे भुईमुगापासून निर्माण होणाऱ्या मालाला किती मागणी येईल याचा अंदाज करून, आणि मागणी व पुरवठा यांचा हिशेव करून, तुम्ही जे पीक पेरणार आहात ते पेरून उगवण्यापूर्वीच त्याची किंमत हे लोक वांधीत असतात. मुलगा होण्यापूर्वीच मुलाचे नाव ठेवावे तशातला हा प्रकार आहे ! ही परिस्थिती आमच्या कावूत आणावयाची असेल तर आम्हाला यातून काही मार्ग काढला पाहिजे. आपण करीत असलेल्या या एका गोष्टीनेच निव्वळ ही परिस्थिती वदलून जाईल असे माझे म्हणणे नाही. पण ही एक दिशा आहे. या दिशेने जर आम्ही गेलो तर आणखी एक पुढचे पाऊल, नंतर आणखी दुसरे पाऊल, याप्रमाणे पावले टाकीत टाकीत राष्ट्रीय धोरणाची जर आपण सरळ गाठ वांधली, तर अशी एक वेळ येईल की, आमच्या मुलाचे नाव, त्याचा जन्म झाल्यानंतर अगदी वरोवर वाराव्या दिवशी वारा सुवासिनींना वोलावून आम्ही ठेवू शकू. पण आमच्या देशात सगळ्यात मोठा धंदा जो शेतीचा आहे तो धंदा राहिलेला नाही, ती योजना राहिलेली नाही, तो उद्योग राहिलेला नाही, अशी आज परिस्थिती आहे. ही जी परिस्थिती आज आपल्या देशात आहे ती आपण आता वदलली पाहिजे.

आपण आज हे जे छोटेसे काम उभे केले आहे ते मी आताच उल्लेख केलेल्या मोठ्या कामातले पहिले पाऊल आहे. मला त्याचा आनंद आहे, माझे तुम्हाला धन्यवाद आहेत. आपण तरुण माणसे हे काम जिद्दीने

करणार आहात. तेव्हा या कामामागील हेतू लक्षात घेऊन आपण काम करण्याचा प्रयत्न करा असे मी आपल्याला सुचवीन. सहकारी क्षेत्रातील आर्थिक दृष्ट्या अतिशय महत्त्वाचे असे हे काम आहे. शेंगांचा व्यापार हा मोठा गुंतागुंतीचा व्यापार असून तेल-कारखान्याचे काम हेही तितकेच गुंतागुंतीचे काम आहे. तेव्हा एकमेकांचा विश्वास असलेली चांगली माणसे एकत्र येऊन, आणि ज्यांच्यासाठी आपण हा कारखाना उभा करता आहात त्यांच्या हितासाठी, त्यांच्या कल्याणासाठी प्रामाणिकपणाने काम करण्याची प्रतिज्ञा घेऊन, आपण हे काम सुरू केले आहे असे मी समजतो; आणि म्हणून या कामाला अंतःकरणपूर्वक शुभेच्छा देऊन आपली रजा घेतो.

चाकूर, मराठवाडा, दि. ११-५-६६

१०

विकासाची शर्यत

गेल्या दोन महिन्यांपूर्वी या समारंभासाठी येण्याचे मी कबूल केले होते, परंतु काही अडचणींमुळे येथे येण्याचे लांबले. आजही तुम्हाला थोडीशी गैरसोयच सहन करावी लागली. कालचा होळीचा व आजचा धुळवडीचा दिवस असतानासुद्धा या दोन्ही दिवसांतला आनंद थोडासा बाजूला सारून आपल्याला इतक्या दूर यावे लागले, याबद्दल मला प्रथम आपली माफी मागितली पाहिजे.

आपल्या उजनी प्रकल्पाची श्री. शंकररावजींनी आपल्याला तपशीलवार माहिती दिलेलीच आहे. नवीन प्रकल्प म्हटला की, त्या प्रकल्पामुळे पुढे होणारे फायदे दिसू लागतात. परंतु त्यातून तावडतोब निर्माण होणाऱ्या ज्या आपत्ती असतात त्यांचाही विचार त्वरित झाला पाहिजे. नवनिर्मिती होत असताना काही गोष्टींचा त्याग करावा लागतो, थोडासा नाशही पत्करावा लागतो. महाराष्ट्रामध्ये पहिली मागणी होती की नदीला धरण हे झालेच पाहिजे. पण नदीला धरण व्हावयास लागले म्हणजे नदीच्या धरणाची उंची कमी झालीच पाहिजे अशी दुसरी मागणी पुढे येते. हे

अर्थात स्वाभाविक आहे, त्यात गैर असे काही नाही. पिढ्यानुपिढ्या ज्या गावामध्ये आम्ही राहिलेलो असतो तो गाव सोडून जाण्याची वेळ आली म्हणजे मनात काय कालवाकालव होते याची मला कल्पना आहे. देशाकरिता एवढे करा असे सांगणे सोपे आहे, पण प्रत्यक्षात ते फार अवघड आहे. जेथे आपले वडील राहिले, जेथे आपले आजोबा राहिले, जेथे आपण कुलदैवताची पूजा केली, जेथे लग्नसमारंभ झाला, जेथे गावची जत्रा भरली, ते गावठाण, ते ठिकाण सोडून कोठे तरी वणवण करीत फिरण्याची पाळी आली म्हणजे आपला नवा संसार कोठे वसणार, आपले कसे होणार अशी चिंता माणसाच्या मनामध्ये निर्माण होते. म्हणून ही चिंता, ह्या अडचणी प्रथम पाहिल्या गेल्या पाहिजेत. हे सर्व अनुभवाने समजून घेऊन महाराष्ट्र सरकारने पुनर्वसनाची जी योजना तयार केली आहे ती अतिशय उपयुक्त आहे, महत्त्वाची आहे. धरण-योजनांबरोबरच पुनर्वसनाच्या योजना तितक्याच महत्त्वाच्या मानल्या गेल्या पाहिजेत. माणसांच्या कल्याणाकरिता ही धरणे बांधावयाची असतात हे तर खरेच, परंतु या धरणांबरोबरच जी माणसे बेघर होणार आहेत त्या माणसांच्या कल्याणाकरिता पुनर्वसनाचा कार्यक्रम आधी हाती घ्यावयास पाहिजे हेही तितकेच खरे आहे. हा विचार या राज्याने स्वीकारला असून मुख्यमंत्री वसंतरावजींनी आता जे आश्वासन दिले आहे ते फार महत्त्वाचे आहे. निव्वळ जी काही कायदेशीर नुकसान-भरपाई असेल ती घेऊन मिळणाऱ्या नोटा पतंगासारख्या हवेत उडविण्यात फारसा अर्थ नाही. तर आधी गावठाण तयार करून आणि विहिरी, घरे, शाळा वगैरे बांधून घेऊन नंतर लोकांना तेथे जावयास सांगणे अधिक उपयोगी पडणारे आहे.

निव्वळ कायद्याची भूमिका ही जुन्या राजवटीला शोभण्यासारखी होती. आपल्या राजवटीला कायद्याने राज्य करावयाचे आहे, पण निव्वळ कायद्याकरिता राज्य करावयाचे नाही. कायद्याचे राज्य हा लोकशाहीच्या कल्पनेतला मुख्य केन्द्रबिंदू आहे. कायद्याचे राज्य असलेच पाहिजे. कुणाही व्यक्तीच्या लहरीचे राज्य असता कामा नये, असा त्याचा अर्थ आहे. काही नीती, काही तत्त्वे, काही धोरणे निश्चित करून ती सर्वांना लागू करता यावीत

म्हणून कायद्याचे राज्य असले पाहिले. कायदा मोडला गेला तर त्या-विरुद्ध दाद मागता आली पाहिजे, कायदा मोडणाऱ्याला शासन झाले पाहिजे, मग तो राज्यकर्ता असो वा जनता असो, हा कायद्याच्या राज्याचा अर्थ आहे. पण त्याचा दुरुपयोगही होतो आणि मग राज्य निव्वळ कायद्याकरिताच चालावयास लागते. पण कायद्याचे राज्य हे माणसांकरिता आहे, माणसे महत्त्वाची आहेत, माणसांचे सुख महत्त्वाचे आहे. मानव व त्याचे व्यक्तिमत्त्व हे सर्व शासनयंत्रणेचे केंद्र आहे, याचा राज्य करणाऱ्यांना कधीही विसर पडता कामा नये.

नदी आडवावयाचे हे जे काम चालले आहे ते तरी कशाकरिता चालले आहे? ही वाहत जाणारी नदी आम्हाला पाहवत नव्हती म्हणून हे काम चालले नसून या नदीच्या पाण्यात जे सामर्थ्य आहे, त्याचा उपयोग आमच्या शेतीला झाला पाहिजे आणि त्या शेतीतून संपत्ती निर्माण झाली पाहिजे असा या कामाचा अर्थ आहे. संपत्ती निर्माण करण्याचे जे साधन निसर्गाने आम्हाला दिलेले आहे त्याचा आपण वापर केला पाहिजे. तो आम्ही आतापर्यंत करीत नव्हतो. तो तसा केला जावा म्हणून तर आपण या योजना सुरू केल्या. आषाढी-कार्तिकीला पंढरपूरला यावे आणि आपल्या हातून जे काही अमंगळ झाले असेल त्यातून मुक्त व्हावे, एवढ्यासाठीच या नदीच्या पाण्याचा आतापर्यंत आपण उपयोग केला. आपल्या अमंगलतेचे ओझे या गंगामातेला, चंद्रभागेला आपण आतापर्यंत वाहावयास लावले. हे सर्व ओझे वाहून ती बिचारी आता अगदी कंटाळली असेल. निदान आता तरी आपले पाणी या सुंदर जमिनीला देऊन तिच्यातून नवजीवन आणि नवी शक्ती निर्माण करण्यासाठी आम्हास मदत करण्यास आपण तिला विनवू या.

आपल्या देशातील अन्नधान्याचा प्रश्न सुटला पाहिजे अशी चिंता आज सर्व लोक करीत असतात. त्या दृष्टीने प्रयत्नही चालला आहे. त्यासाठी आम्ही लांबलांबचे प्रवास करतो आहोत, अमेरिकेला जात आहोत, रशियाला जात आहोत आणि इतरत्रही जात आहोत. पण हे सर्व केले तरी आपल्या देशातील शेतीचे उत्पादन वाढविल्याखेरीज हा प्रश्न

सुटणार नाही ही खरी महत्त्वाची गोष्ट आहे. काही चिंतातुर विचारवंतांचे असे मत आहे की, आपली जनता थोडीशी आळशी आहे. पण हे खरे नाही. लोक कष्ट करावयास तयार आहेत, आजही ते कष्ट करताहेत. पण त्या कष्टांचा उपयोग होत नाही. याचे कारण असे आहे की, आमची शेतीची जी जुनी पद्धत आहे त्या जुन्या पद्धतीने आता काम भागणार नाही. जगात इतर ठिकाणी जास्त पिकते याचे कारण ते लोक आमच्या-पेक्षा अधिक हुषार आहेत किंवा त्यांची जमीन आमच्या जमिनीपेक्षा जास्त सुपीक आहे हे नसून शेतीच्या कामाकरिता त्यांनी नवीन नवीन पद्धतींचा मोठ्या प्रमाणावर वापर केला आहे हे आहे. त्यांचे उत्पादन हे त्यांनी नवीन पद्धतींचा जो स्वीकार केला त्याचा परिणाम आहे. आमच्या शेतात कमी उत्पन्न येते म्हणजे आमचा शेतकरी अडाणी आहे आणि त्यांच्या शेतीत जास्त उत्पन्न येते म्हणजे त्यांचा शेतकरी जास्त शहाणा आहे असे नाही. आमचे मूल आईच्या उदरात नऊ महिने राहते आणि त्यांचे मूल बारा महिने राहते अशी वस्तुस्थिती नाही. आमच्यामध्येही तीच बुद्धिमत्ता आहे, तीच शक्ती आहे, तेच शहाणपण आहे, सगळे काही आहे, फक्त साधने नाहीत, नवीन पद्धतीने शेती करण्याचा मार्ग नाही. मिळण्याजोगे जे पाणी आहे ते जर आपण शेतीला दिले, तिला नवीन पद्धतीचे खतपाणी दिले आणि त्याचबरोबर नवीन तऱ्हेच्या वीवियाण्यांचा वापर केला तर आपली दुनिया पार बदलून जाईल. आतापर्यंत आम्ही हे सर्व म्हणत आलो आहोत पण हे अद्यापि घडलेले नाही.

आज ही जी उजनीची योजना आपण हातात घेतली आहे ती चार-पाच वर्षांत पुरी होणार आहे. म्हणजे १९७२ च्या निवडणुकीच्या मोसमात ती तयार होईल असे दिसते. १९७२ सालचे जे कोणी उमेदवार असतील त्यांच्या मनात हा हिशोब डोकावत असेल ! सुरुवातीला ही योजना लहान होती. नंतर मोठी झाली. योजना मोठी झाल्यावर तिची किंमतही तितकीच मोठी द्यावी लागली. मला येथे सांगण्यात आले की, करमाळे तालुक्यातील वीस गावे या योजनेखाली चालली आहेत. आणि

इंदापूर तालुक्यातीलही वीस गावे या योजनेखाली जात आहेत ! आणखीही काही गावे जाणार असतील. या सगळ्या गावांच्या पुनर्वसनाची आपल्याला जबाबदारी घ्यावी लागणार आहे. पण हे सर्व घडेल आणि हे काम पुरे होईल असा माझा स्वतःचा विश्वास आहे.

आपण मला समारंभासाठी मोठ्या प्रेमाने बोलावले आणि मीही पंढरीच्या विठ्ठलाच्या या परिसरात, त्याच्या या पंचक्रोशीत आज मोठ्या आनंदाने आलो आहे. येताना मी मनात विठ्ठलाला म्हणालो, ' चंद्रभागा तुझ्या अंगणात पोहोचण्यापूर्वीच आज आम्ही तिला अडवली आहे, तिला आम्ही आज साकडे घातले जाहे. तुझ्या चरणांजवळ ही चंद्रभागा अठ्ठावीस युगे वाहत आली. या चंद्रभागेला उजनीजवळ आज आम्ही थांबवितो आहोत. महाराष्ट्रातील शेतकरी दरसाल आषाढी-कार्तिकी एकादशीला खांद्यावर पडशी टाकून 'ग्यानबा तुकाराम' म्हणत म्हणत तुझ्या दाराशी येत असतो. त्या ग्यानबा तुकारामाच्या शेतीत आणि झोपडीत विठ्ठला आता तू जा. तिथे तुझ्या चंद्रभागेला तू भेट. जनाबाईच्या मदतीला तू धावून गेलास आणि तुझी मनापासून भक्ती करणाऱ्या तुझ्या सगळ्या भक्तांच्या मदतीलाही तू धावून गेलास. तशीच तुझी भक्ती करणाऱ्या आणि महाराष्ट्राच्या झोपडीत राहणाऱ्या गरीब शेतकऱ्याने आज तुझी चंद्रभागा अडवली आहे. त्यांच्या कल्याणासाठी, त्यांच्या मदतीसाठी, विठ्ठला, तू त्यांच्या शेतीत जा. तू आता पंढरपूरच्या मंदिरात राहू नकोस. ' विठ्ठलाला मी ही मनोभावे प्रार्थना केली आहे. तुकारामाची, ज्ञानेश्वराची, एकनाथाची आठवण करून मी ही प्रार्थना केली आहे. पण कृपा करून आपण हे मात्र लक्षात ठेवा की, निव्वळ प्रार्थनेने हे सर्व घडणार नाही. त्याकरिता तुम्हाला कष्टांची गंगा उपसावी लागणार आहे. त्यासाठी जिद्दीने काम करण्याचा आपण निश्चय करू या. निव्वळ महाराष्ट्रच नव्हे तर संबंध देश तुम्हाला बांधावयाचा आहे. तुम्हा-आम्हाला हे एक मोठे थोरले आव्हानच आहे.

सर्वांगीण योजना आखून प्रगती करण्याचे काम आपण करीत आहोत. पण योजना आखून प्रगती करण्याचे काम फक्त हिंदुस्थानच करतो आहे

असे नाही, तर इतर दुनियाही हे काम करून राहिली आहे. ज्यांचे तुमच्या आमच्यासंबंधी फारसे चांगले मत नाही, ज्यांच्या मनात आपल्याबद्दल प्रेम नाही तेही लोक योजना करून राहिलेले आहेत. ते काही झोपलेले नाहीत. चीन झोपलेला नाही, आणि पाकिस्तानही झोपलेला नाही. तेही प्रगती करताहेत. पण आमचा हा पंचेचाळीस कोटी लोकांचा अवाढव्य देश, विलक्षण अस्ताव्यस्त पसरलेला आहे. आपले अनेकविध प्रश्न आहेत. गरिबीचे प्रश्न आहेत, भाषेचे प्रश्न आहेत, आणखी किती तरी प्रश्न आहेत. सगळ्या प्रश्नांची नुसती यादी वाचावयाला लागलो तर तोंड मोडून येईल. पण या सगळ्या प्रश्नांशी आपल्याला मुकाबला केला पाहिजे, या सगळ्या प्रश्नांना आपण तोंड दिले पाहिजे, या सगळ्या प्रश्नांचा आपण निकाल लावला पाहिजे.

पण निव्वळ पुढारी आता या प्रश्नांचा निकाल लावू शकणार नाहीत. गांधी-नेहरूंचा जमाना आता संपलेला आहे. मी असे म्हणतो ते अशाकरिता की, त्यांची कामे वेगळी होती, त्यांची व्यक्तिमत्त्वे वेगळी होती, त्यांची परिस्थिती वेगळी होती. आताचे जे प्रश्न आहेत ते कोणी एखादा मोठा पुढारी आला की संपतील असे नाहीत. आताचे जे प्रश्न आहेत त्यांचे मूलभूत स्वरूप असे आहे की, अत्यंत कष्टाने आपण या देशात जी लोकशाही आणलेली आहे, जे स्वातंत्र्य आणलेले आहे, ती लोकशाही आणि ते स्वातंत्र्य कायम ठेवून या लोकशाहीच्या आणि स्वातंत्र्याच्या मदतीने या देशाभध्ये आपणाला समानता निर्माण करावयाची आहे, गोरगरिबांची गरिबी हटवावयाची आहे आणि लहान व मोठा हा भेद मोडून काढावयाचा आहे. हे महत्त्वाचे काम आम्हाला करावयाचे आहे. पण हे काम आपल्या आपणच करावयाचे आहे. जे मोठे आहेत ते हे काम करणार नाहीत. लहानांनीच ते केले पाहिजे. पण लहानांच्या मनात जिद्द नसेल, त्यांच्या मनात जागृती नसेल, त्यांच्या मनात गरिबीसंबंधीचा तिरस्कार, संताप नसेल तर लहान कामाला लागणार नाहीत. लहान, लहान राहिला त्याचे कारण त्याने लहान राहावयाचे ठरविले हे आहे. त्याने आता असा निर्णय घेतला पाहिजे की, मी गरीब राहणार नाही, मी उपाशी

राहणार नाही, मी कोणाचा लाचार राहणार नाही. मी या देशाचा मालक आहे, मी स्वतंत्र देशाचा मालक आहे, मी लोकशाहीचा मालक आहे. मला या देशामध्ये लोकशाही टिकविली पाहिजे, स्वातंत्र्याची शक्ती मोठी केली पाहिजे, माझे स्वत:चे जे व्यक्तिमत्त्व आहे, माझे स्वत:चे जे सामर्थ्य आहे ते मी देशाच्या कामाला लावले पाहिजे. त्यासाठी मला जो जो मार्ग मोकळा दिसेल तो तो मार्ग मी अंगिकारला पाहिजे. या जिद्दीने तो जर उभा राहिला तर पक्क्या देशांतील लोकांना या देशाकडे वाकड्या नजरेने पाहण्याची छाती होणार नाहीच, परंतु या देशामध्ये जास्त लोकांना गरीब ठेवून जे थोडे लोक श्रीमंत राहण्याचा पराक्रम करीत असतील त्यांनाही पराभव स्वीकारावा लागेल. हे मोठे काम आहे, ते तुम्हा-आम्हाला करावयाचे आहे.

आपल्याजवळ वेळ फार थोडा आहे. माझ्या नजरेला जे दिसते आहे ते हे की, ही एक मोठी शर्यत आहे. घोड्यांची शर्यत तुम्ही पाहिली आहे की नाही हे मला माहीत नाही. पुण्याच्या आणि मुंबईच्या शर्यतीच्या मैदानांवर घोड्यांच्या शर्यती चालतात. फक्त एकदोन मिनिटेच. हा पुढे आणि तो पाठीमागे. माझ्यावरोबर माझ्या नजरेने पाहण्याचा जर तुम्ही प्रयत्न केलात तर सबंध दुनियेतल्या देशांची एक भली मोठी शर्यत चालली आहे असे तुम्हाला दिसेल. मला घोडे पळताना दिसत आहेत. आमच्या घोड्याच्या मनात इर्ष्या आहे, आमचा घोडा पिढीजात चांगला आहे. शर्यत खेळणारे, घोडा चांगला कोणता हे पाहताना घोड्याचा बाप कोण होता, त्याची आई कोण होती आणि त्याच्या बापाचा बाप कोण होता याचा हिशेब लावतात. तसा आपला घोडा पिढीजात आहे, राम-कृष्णांचा, गांधी-नेहरूंचा आणि शिवाजी-राणा प्रतापांचा हा देश आहे. शर्यतीमध्ये मनापासून धावला तर तो शर्यत जिंकील. पण आमच्या आधी काही घोडी दोनशे वर्षे, काही घोडी शंभर वर्षे पळावयास लागली आहेत. त्यांना गाठण्याचे तरी कमीत कमी काम आपण केले पाहिजे. पण वेळ थोडा आहे. पाच-दहा वर्षांचा वेळ आहे. या पाच-दहा वर्षांच्या काळात जर आमची आर्थिक प्रगती करण्याचे काम आम्ही पुरे केले नाही, आणि

शेतीच्या व उद्योगाच्या क्षेत्रांमध्ये, निदान कमीत कमी, या देशाला स्वत:च्या गरजेसाठी लागणाऱ्या ज्या गोष्टी आहेत त्या जर आम्ही उभ्या केल्या नाहीत तर मी तुम्हाला सांगतो की, ही शर्यत आपण हरणार आहोत. नुसत्या मनगटाच्या आणि भावनेच्या जोरावर या गोष्टी करता आल्या असत्या तर फार चांगले झाले असते. पण आजकालचे जग इतके सरळ नाही. फार निर्दय, कठोर अशी दुनिया आहे ही ! या कठोर दुनियेमध्ये स्वत:ची मान उंच ठेवून या देशाला राहावयाचे असेल तर तुमचा आमचा, साधनांचा जो काही हिशेब असेल, तो मनामध्ये बरोबर ठेवून आपण आता कामाला लागले पाहिजे. असा हा आजचा खरा प्रश्न आहे.

गेल्या पाच-दहा वर्षांच्या काळात या देशामध्ये एकी ठेवण्याचा आम्ही प्रयत्न केला. पण हे काम सोपे नाही. एक वेळ पाकिस्तानचा पराभव करणे सोपे होते. शत्रूने तलवार चालविली तर तलवारीला तलवार भिडविताना काही वाटत नाही. पण मला दु:ख आहे ते अशासाठी की, देशाच्या काही भागांत सुव्यवस्था राखण्याकरिता आम्हाला आज आमचे सैन्य पाठवावे लागते. यात आम्हाला आनंद नाही. देशातील काही दंगेखोरांच्या बंदोबस्ताकरिता सैन्य वापरण्याची पाळी यावी ही देशाला नामुष्की आहे, सैन्याला नाही. पुष्कळ वेळा मनामध्ये विचार येतो की, ६०–६१ साली पंडित नेहरूंच्याजवळ जेवढे सामर्थ्य होते, जेवढी शक्ती होती ती सर्व पणाला लावून हा देश मोठ्या निकराने पुढे का गेला नाही ? याचे कारण काय ? याचे कारण हे आहे की, या देशाला एक ठेवणे, त्याला एकमनाने समतोल ठेवणे, त्याची एकता साधणे हा फार अवाढव्य प्रश्न आहे, फार कठीण प्रश्न आहे. शेकडो वर्षांचा साचत आलेला हा प्रश्न आहे. तो सावरणे ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. पण तो केव्हा सावरला जाईल ? लोकांच्या मनामध्ये जेव्हा आपण एकतेचे वातावरण तयार करू शकू तेव्हा आपल्याला तो सावरता येईल. मी आज आपल्याला देशाचे लांबचे प्रश्न सांगतो आहे तेही आपल्याला समजले पाहिजेत. त्या प्रश्नांच्या संदर्भात तुमचे आमचे आजचे जे प्रश्न आहेत, त्यांचा आपल्याला विचार करता

येईल. आणि म्हणून या सगळ्या प्रश्नांची ही पार्श्वभूमी आपण लक्षात घेतली पाहिजे.

तुमची शेती हा निव्वळ तुमचा विचार राहिलेला नाही. तुमची शेती हा देशाचा विषय झाला आहे. आम्ही आमची शेती पिकविली नाही तर आम्ही आमच्या घरामध्ये उपाशी राहू असे म्हणून तुम्हाला आता चालणार नाही. तुमची शेती तुमची आहे, पण तशीच ती देशाचीही शेती आहे. तुमची शेती पिकली नाही तर तुमचे नशीब पिकणार नाही एवढाच त्याचा अर्थ नाही, तर त्याचबरोबर देशाचेही नशीब पिकणार नाही. इतके आज व्यक्तीव्यक्तींचे आर्थिक प्रश्न आणि देशाचे आर्थिक प्रश्न एकरूप झाले आहेत. लोकशाहीचा खरा अन्वयार्थ हा आहे की, लोकशाही देशातील व्यक्ती किंवा समाज आणि त्यांचे शासन यांचे हितसंबंध एकरूप झालेले असतात याची जाणीव शासनाला असली पाहिजे. त्याचप्रमाणे ही जाणीव व्यक्तीलाही असली पाहिजे, आणि या जाणिवेतूनच जे सामर्थ्य तुम्हा-आम्हाला वाढवावयाचे आहे ते वाढविले पाहिजे. हा एक विचार आपल्याला सांगावयास पाहिजे होता म्हणून मी तो सांगितला. त्याची आपण आठवण ठेवा, आणि त्याला आवश्यक असे देशाच्या एकतेचे, देशाच्या प्रेमाचे, स्वातंत्र्याच्या प्रेमाचे, लोकशाहीच्या प्रेमाचे, जागरुकतेचे वातावरण आपण निर्माण करा, आणि येतील त्या अडचणींना तोंड देण्याची तयारी ठेवा. असे झाल्यास तुमचा आमचा हा देश वाढत जाईल, प्रगत होत जाईल, यासंबंधी मला मुळीच शंका नाही.

मी पुन्हा प्रार्थना करतो की, तुमची ही योजना लवकर पुरी होवो आणि या योजनेमुळे खऱ्याखुऱ्या अर्थाने, आमचे राष्ट्रगीत म्हणते त्याप्रमाणे तुमची ही भूमी सुजलाम् सुफलाम् होवो.

उजनी प्रकल्पाचे भूमिपूजन, उजनी, दि. ७-३-६६

११ नवी प्रतिज्ञा

आपल्या या उद्‌गीरमध्ये मी आज बऱ्याच वर्षांनंतर आलो. चार-पाच वर्षांपूर्वी या उद्‌गीरला मी धावती भेट दिली होती. इतक्या वर्षांनी पुन्हा आज जेव्हा मी आपल्यामध्ये आलो तेव्हा तुम्हालाही आनंद झाला आणि मलाही आनंद झाला. मला आनंद तुम्हाला परत येऊन भेटण्याचा, आणि तुम्हाला आनंद तुमच्या गावाच्या पाण्याच्या योजनेचा. गावाला पाणी मिळू लागले म्हणजे काय आनंद होतो हे पाणी नसलेल्या गावी राहणाऱ्या माणसालाच जास्त समजते. पाण्यासाठी ओहोळ, विहिरी आणि आड यांच्याशी नित्याची झटपट करणाऱ्या गावाशी माझा जन्मतःच संबंध असल्यामुळे पाणी नसताना काय परिस्थिती होते याची मला थोडीफार कल्पना आहे. त्यामुळे उद्‌गीरमध्ये पाणी आल्याचा तुम्हा पुरुष मंडळींना जो आनंद झाला असेल त्यापेक्षा अधिक आनंद मला खात्री आहे की, या गावातील भगिनींना झाला असेल. कारण आपण पुरुष मंडळी जरी घरातील प्रमुख असलो तरी पाणी आणण्याची व्यवस्था स्त्रियांकडेच असते. ही आपली आर्यपरंपराच आहे. त्यामुळेच पाणी नसलेल्या गावी आपल्या

मुली न देण्याची सामान्य परंपरा होती. आता उद्‌गीरकरांवरचे हे संकट टळले आहे ! आता उद्‌गीरला मुली देण्यास काही अडचण पडणार नाही !

आपल्या गावाला आता पाणी मिळाले आहे. आपल्या गावाला रेल्वे आहे. आपल्या गावी जिनिंगचे कारखाने असून शिवाय, आपल्या गावाला जुनी व्यापारपेठही आहे. म्हणजे आधुनिक जगामध्ये शहराची वाढ होण्यासाठी ज्या गोष्टी असाव्या लागतात त्या सर्व गोष्टी उद्‌गीरमध्ये असून फक्त पाण्याचीच कमतरता होती. ती कमतरताही आता दूर झाली आहे. तेव्हा उद्‌गीर हे आता एक औद्योगिक केंद्र बनू शकेल अशा प्रकारची नवी परिस्थिती उद्‌गीरमध्ये निर्माण झाली आहे. म्हणूनच या गावच्या जनतेचे मी अभिनंदन करतो.

उद्‌गीरची पाणी-पुरवठ्याची योजना जरा अधिक खर्चाची होती. परंतु थोडा अधिक खर्च करून ही योजना हाती घेण्याचा विचार शासनाने काही वर्षांपूर्वी केल्याचे मला स्मरते. आता तर या योजनेची जबाबदारी तुम्ही स्वीकारली आहे. पण आपल्या गावी पाणी आले म्हणून आनंद मानण्यावर केवळ आता भागणार नाही. या गावाची चांगली वाढ करण्याची जबाबदारी आपण आपल्यावर घेतली पाहिजे. या गावामध्ये व्यापार, उद्योगधंदे वाढविण्याच्या दृष्टीने आपण आता नेतृत्व दिले पाहिजे. त्यासाठी आपल्याला विजलीचा उपयोग करून घ्यावा लागेल, सहकारी चळवळीचा उपयोग करून घ्यावा लागेल आणि थोडेसे नवीन भारतीय धोरणही ठेवावे लागेल. कर्तृत्व करण्याची जी शक्ती तुम्हा-आम्हामध्ये लपून बसली आहे तिने हे आव्हान स्वीकारले पाहिजे आणि हे नवीन काम आपल्या शहरामध्ये उभे केले पाहिजे.

मी आपल्याला आपल्या शहरासंबंधी हे सर्व सांगितले त्याला अर्थ आहे. आपण नेहमीच म्हणत असतो की, आपला देश मोठा व्हावयाला पाहिजे. पण देश मोठा व्हावयाचा म्हणजे कसा व्हावयाचा ! केवळ यंत्राने साध्य होणारी ही गोष्ट नाही. हे कर्तृत्व करण्यासाठी अनेक ठिकाणी माणसे प्रत्यक्ष उभी राहिली पाहिजेत. कारण देशाची वाढ करणे म्हणजेच

देशाच्या विकासाची वाढ करणे होय. ही वाढ होण्यासाठी बौद्धिक क्षेत्रामध्ये, औद्योगिक क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त कर्तृत्ववान माणसे निर्माण होतील अशी परिस्थिती आपण निर्माण केली पाहिजे. त्याशिवाय देश मोठा होणार नाही. आज तुमच्या आमच्यापुढे, देशापुढे हा मोठा प्रश्न आहे. उद्‌गीर गावाच्या विकासाचा प्रश्न काय किंवा इतर कोणत्याही गावाच्या विकासाचा प्रश्न काय, शेवटी तो सबंध देशाच्या विकासाच्या प्रश्नाशी निगडित आहे. या देशाची सध्याची खरी समस्या ही आहे की, आमच्याजवळ जी साधने आहेत त्या सगळ्या साधनांचा वापर करण्याची परिस्थिती आपल्याला निर्माण करता आली पाहिजे. एवढेच नव्हे, तर या परिस्थितीचा पूर्ण उपयोगही आम्हास करता आला पाहिजे.

या देशामध्ये शेकडो वर्षे आम्ही गरिबीने राहत आलो आहोत. परंतु या विसाव्या शतकामध्ये एक नवीन परिस्थिती निर्माण झालेली आहे. पूर्वीच्या काळी दुनियेमध्ये अनेक चमत्कार घडून आल्याचे आपण नेहमी ऐकतो. पण हे चमत्कार पूर्वी एखाद दुसऱ्या माणसाच्याच जीवनामध्ये घडून येत असत. विलक्षण कर्तृत्ववान असलेला मनुष्य पूर्वी आपले सारे व्यक्तिगत जीवन बदलून टाकीत असे. तो सुखी होत असे, विद्वान होत असे, लखपती होत असे किंवा साधु-संन्याशी होऊन ऋद्धिसिद्धी प्राप्त करून घेत असे. परंतु हे विसावे शतक असे विलक्षण शतक आहे की, केवळ व्यक्तिगतच नव्हे तर अनेक राजकीय आणि सामाजिक चमत्कार या शतकात घडून आले आहेत, आणि तुमचे आमचे भाग्य असे की, आपण या शतकात जन्माला आलो आहोत. विज्ञानाच्या मदतीने या शतकात जी साधने निर्माण झाली त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात एक नवीन तंत्रयुग (modern technology) उदयास आले. या तंत्रयुगामुळे आणि राजकीय क्षेत्रात निर्माण झालेल्या नव्या परिस्थितीमुळे, केवळ वैयक्तिक जीवनातच नव्हे तर सबंध समाजाच्या आणि देशाच्या जीवनातही आपणांस क्रांती घडवून आणता येईल. गरिबीचा, मागासलेपणाचा शाप लागलेल्या या खंडप्राय अशा देशाच्या जीवनात क्रांती करून आपण ते संपूर्णतया बदलू शकू अशा प्रकारचा काळ आज आला आहे. तेव्हा ही जी जगात नवीन

परिस्थिती निर्माण झाली आहे, तिचा उपयोग तुम्ही आपल्या स्वतःच्या जीवनामध्ये आणि देशाच्या जीवनामध्ये करून घेतला पाहिजे. तो कसा करावयाचा हा खरा प्रश्न आहे. स्वराज्यानंतरचा खरा महत्त्वाचा प्रश्न, जो आपल्या देशातल्या सगळ्या नेत्यांच्या समोर उभा आहे, तो हा आहे.

मूळ प्रश्न शेवटी हा आहे की, स्वराज्याचे हे जे साधन आपल्याला मिळालेले आहे त्या साधनाचा उपयोग आम्ही कसा करणार आहोत? आता या उद्‌गीरच्या पाणीपुरवठ्याचाच प्रश्न घ्या. या उद्‌गीरला आज जे पाणी मिळाले, ते आजच का मिळाले? हे पाणी पूर्वी नव्हते का येथे? दोन मैलांवरून नदीचे पाणी तुम्ही येथे आणलेत. दोन मैलांवर असलेली ही नदी दुनिया निर्माण झाल्यापासून तेथे वाहते आहे आणि मनुष्यसमाज निर्माण झाल्यापासून आम्ही येथे राहतो आहोत. किती हजार वर्षांपूर्वी हे गाव वसले असेल? महाराष्ट्राच्या या भागामध्ये जेव्हा कधी मनुष्यवस्ती झाली असेल तेव्हापासून मानव या उद्‌गीरच्या भूमीवर वास्तव्य करून राहतो आहे. परंतु या नदीचे पाणी अशा तऱ्हेने पहिल्या प्रथम आजच आपणांस प्यावयास मिळते आहे याचा अर्थ काय? याचा अर्थ आमचे वाडवडील कर्तृत्ववान नव्हते असा नव्हे, पण अशा गोष्टीसाठी लागणारी साधनांची अनुकूलताच त्यांच्याजवळ नव्हती. आज जमाना बदलला आहे. स्वराज्यासारखे प्रभावी साधन आज आपणांस प्राप्त झाले आहे; आता या पाणीपुरवठ्यासारख्या लोकाभिमुख अशा किती तरी गोष्टी आम्हास करावयाच्या आहेत.

दुनियेतील पुढारलेला मानव, अमेरिकेतील म्हणा किंवा रशियातील म्हणा कर्तबगारी करू शकतो. अन्नाच्या बाबतीत तो स्वयंपूर्ण आहे. शिक्षणाच्या बाबतीत तो पुढारलेला आहे. विज्ञानाच्या क्षेत्रात तो अग्रेसर आहे. राष्ट्र म्हणून त्याच्या राष्ट्राची शक्ती पहिल्या प्रतीची मानली जाते. धनिक राष्ट्र, महनीय राष्ट्र, प्रतिष्ठित राष्ट्र म्हणून त्याची फार ख्याती आहे. परंतु या राष्ट्रातला हा माणूस आमच्यापेक्षा जास्त शहाणा आहे, आमच्यापेक्षा जास्त बुद्धिमान आहे ही गोष्ट मान्य करावयास आम्ही तयार नाही. त्याच्याएवढीच बुद्धिमत्ता आमच्यामध्येही आहे. किंबहुना त्याच्या-

पेक्षा जास्त मोठी परंपरा, जास्त मोठा इतिहास, जास्त मोठा पराक्रम आमच्या पाठीशी आहे. याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. परंतु हा सगळा पराक्रम इतिहासातील आहे ही सत्य गोष्ट आहे. नवीन निर्माण झालेल्या साधनांचा, तंत्रांचा, ज्ञानाचा आम्ही अद्यापि उपयोग करू शकत नाही आणि तो ते करतात हाच आमच्या दृष्टीने त्यांच्यातील व आमच्यातील महत्त्वाचा फरक आहे. हीच आज आमची खरी समस्या आहे. शेतीच्या क्षेत्रात आम्ही प्राचीन काळी पहिला शोध लावला हे आमचे कर्तृत्व मानले जाते. पण आज आम्ही अन्नाला महाग झालो आहोत ही गोष्टही तितकीच खरी आहे. आज कित्येक लाख टन धान्य बाहेरच्या देशांतून आपणांस आणावे लागते. ते देश आपल्याला हे धान्य देतात हा त्यांचा मोठेपणा, आणि गरज पडली म्हणजे आम्ही ते आणतो हा आमचा शहाणपणा. परंतु आमचे पोट भरण्याकरिता आम्हाला दुसऱ्यांपुढे पदर पसरावा लागतो, हे राष्ट्र म्हणून या देशाला मुळीच अभिमानास्पद नाही.

ही सगळी आपत्ती आमच्यावर का आली याचा नागरिक म्हणून तुम्हा-आम्हाला विचार केला पाहिजे. दोन वर्षांपूर्वी तुमचा संरक्षणमंत्री म्हणून मी दोन-तीन वेळा परदेशांत गेलो होतो. त्या देशांकडून शस्त्रास्त्रे मिळविण्यासाठीच मुख्यतः हे दौरे होते, परंतु आमच्या देशावर ही स्थिती का आली ? कोणते कर्तृत्व, कोणती साधने या देशामध्ये कमी पडली ? आमच्या श्रुति-पुराणात तर असे म्हटले आहे की, 'अनंत हस्ते कमलावराने' आम्हाला दिलेले आहे. काळीशार जमीन त्याने आम्हांला दिली आहे. कृष्णा, भीमा, गोदावरी यांसारख्या शेकडो नद्या या महाराष्ट्रात वाहत आहेत. उत्तरेकडे गंगा, यमुना वाहत असतात. खाली दक्षिणेला कावेरी, तुंगभद्रा आणि इतर कित्येक नद्या वाहत आहेत. पूर्वेला आसामच्या बाजूस ब्रह्मपुत्रा आहे. तिला नदी म्हणत नाहीत, नद म्हणतात. त्याचा सागरा-एवढा मोठा लोंढाच्या लोंढा वाहतो आहे. अनंत माणसे आहेत. काम करणारे अनंत हात आहेत. परमेश्वराने आम्हांला चांगल्या प्रकारची बुद्धीही दिली आहे. कमलावराचा एवढा मोठा वरदहस्त याप्रमाणे आपल्यावर असताना आपली ही परिस्थिती का व्हावी ? आमच्या नद्यांच्या पाण्याचा

आम्ही उपयोग करू शकत नाही, आमच्या जमिनीत पुरेसे अन्न पिकविण्याची ताकद राहिली नाही, असे हे सर्व का व्हावे ? यापुढे आपणांस या प्रश्नांची उत्तरे द्यावी लागणार आहेत.

आपल्याला आता स्वराज्य मिळालेले आहे, पण पुढे काय ? स्वराज्य मिळाल्यानंतरसुद्धा या दुनियेमध्ये आपण गरीब राहिलो तर दुनियेतील इतर माणसे आपल्या नावाचा तिरस्कार करतील. आजच्या दुनियेमध्ये आपण सगळ्या गोष्टींशी तडजोड केली तरी चालेल, पण माझे स्वतःचे असे मत आहे की, एका गोष्टीशी आपण बिलकूल तडजोड करता कामा नये; आणि ती म्हणजे गरिबी. कबिराचा एक प्रसिद्ध दोहा आहे. कबीर एकदा एका सुंदर सरोवराच्या काठाने चालला होता. इतक्यात 'मला तहान लागली आहे, मला तहान लागली आहे' असा आवाज त्याने ऐकला. आवाज ऐकताच कबीर मोठ्या गोंधळात पडला. एवढ्या मोठ्या सुंदर सरोवराच्या काठी 'मला तहान लागली आहे' असे म्हणणारा कोण असावा म्हणून त्याने आवतीभोवती पाहिले. त्याला वाटले सरोवराच्या काठापर्यंत पोहोचू न शकणारा कोणी तरी आंधळापांगळा येथे ओरडत असावा. शक्य झाल्यास मदत करावी या उद्देशाने त्याला शोधण्याचा कबिराने प्रयत्न केला. परंतु त्याला अशा प्रकारचा माणूसच दिसेना. पुन्हा एकदा अधिक एकाग्रतेने त्याने या आवाजाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा सरोवरातल्या पाण्यातील एक मासाच हे ओरडतो आहे असे त्याला आढळून आले ! आता पाण्यातल्या माशाला तहान लागणे हे जितके आश्चर्यकारक किंवा वेडेपणाचे आहे तितकेच या विसाव्या शतकामध्ये हिंदुस्थानसारख्या अनंत साधनांनी युक्त असलेल्या देशामध्ये आम्ही गरीब आहोत असे म्हणणे वेडेपणाचे ठरणार आहे. आम्हांला यापुढे गरीब राहता येणार नाही. गरिबीच्या विरुद्ध आता आपण लढले पाहिजे. आपल्याला ही मोठी क्रान्ती करावयाची आहे. पण हे फार कठीण काम आहे. कठीण अशाकरिता की, आमच्या मनामध्ये आले पाहिजे. मनात आले तर दाघ मारीन पण मेलो तरी मनातच आणणार नाही, असे म्हणणारी आम्ही माणसे आहोत. या देशामध्ये कर्तृत्व केले तर आहे, पण

कर्तृत्व करण्याचे मनातच येत नाही. मी टीका करतो असे आपल्याला वाटेल. पण माझी ही टीका आत्मटीका आहे. मी तुम्हा-आम्हा सर्वांच्या वतीने बोलतो आहे. आम्ही स्वराज्याचा उपयोग किती जिद्दीने, किती ईर्ष्येने, किती योजनेने, किती सहकाराच्या भावनेने करतो यावर या देशाचे भवितव्य अवलंबून आहे.

मध्यवर्ती शासनात मंत्री म्हणून आज ज्या कामांशी माझा दैनंदिन संबंध येतो त्यात प्रत्यक्ष पाणीपुरवठा अथवा शेतीचा विकास या कामांचा अन्तर्भाव नाही. पण माझा आत्मा या कामात आहे. आज मी काय करतो आहे तर या देशासाठी सव्यसाची हत्यारे, बंदुका जमा करतो आहे. गोळीबार कसा करता येईल याची व्यवस्था करतो आहे. सैनिक जमा करतो आहे. विमानतळ कसे बांधले जावेत ते पाहतो आहे. बॉम्बगोळे तयार करतो आहे. अर्थात हे देशाच्या रक्षणाचे काम आहे आणि ते आपण करीत राहिलेच पाहिजे. पण याही क्षेत्रात तीच पूर्वीची गोष्ट आहे. बंदुका तयार करण्याचे काम असो किंवा संरक्षणाची जय्यत तयारी करण्याचे काम असो, हे काम भीक मागून होत नाही. पण आज आम्ही ही गोष्ट करतो आहोत. विमानांचा भला मोठा काफिला उभा करण्याचा आम्ही प्रयत्न करतो आहोत. पण बहुतेक सगळी विमाने आज आम्हाला दुसरीकडूनच आणावी लागतात. म्हणजे आम्ही किती लढावे आणि किती लढू नये हे आमच्या इच्छेवर अवलंबून राहत नाही. लढण्याचे साहित्य जो देश आम्हांला देतो त्याच्या इच्छेवर आम्ही कोणाशी लढावे व किती लढावे हे अवलंबून राहते. १९६५ साली हिंदुस्थान-पाकिस्तानचा लढा झाला. पाकिस्तानच्या मानाने आपण थोडेफार बरे आहोत. आपल्या देशामध्ये आपण काही उत्पादनाची साधने उभी केली आहेत. तुम्हांला आठवत असेल की, त्या वर्षी सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यांमध्ये या दोन्ही देशांना साहित्य द्यावयाचे नाही असे सगळ्या राष्ट्रांनी जाहीर केले. आम्ही लढलो असतो त्यानंतर आणखी काही महिने. पण काही महिन्यांनंतर लढाई आपोआप बंद झाली असती. आमचा नाश करणाऱ्या शत्रूशी आम्ही लढावे की लढू नये हे ठरवावयाचे कोणी ? ज्यांच्याजवळ शस्त्रबळ आहे त्यांनी ? ही जी

नसण्याची परिस्थिती आहे ती नाहीशी झाली पाहिजे. शेती-उत्पादनात काही नाही, उद्योगधंद्यांत काही नाही, शिक्षणात काही नाही, संरक्षणात काही नाही, हा नाही—नाहीचा पाढा आता या देशात बंद झाला पाहिजे. तो ज्या वेळी बंद होईल, त्या क्षणाला हा देश खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला असे तुम्हा-आम्हांला म्हणता येईल.

आपण गृहीत धरू या की, दोन हजार वर्षांपूर्वी तुमचे हे उद्‌गीर गाव वसले असावे. परंतु या दोन हजार वर्षांच्या काळात जी गोष्ट घडली नव्हती ती आज घडते आहे. दोन वर्षांत घरोघर नळ येण्याची शक्यता आज दिसते आहे. मुलाबाळांच्या, स्त्रियांच्या आवाक्यात आज पाणी आले आहे. पण ही गोष्ट प्रयत्न झाला म्हणून घडली. कोणी तरी मनात आणले, शासनाने मनावर घेऊन साहाय्य केले, आणि आपली योजना मार्गस्थ झाली. अशाच प्रकारची गोष्ट पूर्वी भगीरथाने केली. त्याचे आपण नाव घेतो. भगीरथ राजाने गंगा जमिनीवर आणली पण त्याने गंगा आकाशातून आणली नाही. स्थापत्यशास्त्राचे चांगले ज्ञान असलेला तो शहाणा मनुष्य असला पाहिजे. तिकडे वाजूला तोंड करून जाणाऱ्या नदीला त्याने मधला एखादा खडक फोडून गंगोत्रीपर्यंत वळवून आणले असावे, आणि मग त्याने गंगेला खाली उतरविली असावी. अशाच प्रकारचा विचार तुमच्या येथल्या एखाद्या भगीरथाच्या मनात आला असावा. त्याला पुढे शंकरराव चव्हाणांसारखा शहाणा माणूस भेटला. नंतर चार मुत्सद्दी माणसे गोळा झाली. त्यांनी इंजिनियरांची मदत घेतली, महाराष्ट्राच्या मुख्य मंत्र्यांना गळ घातली आणि पस्तीस-चाळीस लाखांच्या या योजनेला मंजुरी मिळाल्या-नंतर आपल्या गावी पाणी आले.

आपण पाण्याला जीवन मानतो ते शब्दार्थाने बरोबर आहे. आज तुमच्या जीवनात पाणी म्हणजे जीवन आले आहे. परंतु आपणांस जे संपूर्ण जीवन जगावयाचे आहे ते जीवन अजून लांब आहे. त्याचे प्रात्यक्षिक म्हणजे नवीन शिकलेल्या प्रत्येक माणसाने अशी प्रतिज्ञा केली पाहिजे की, मी स्वतंत्र हिंदुस्थानात जन्माला आलो आहे; मला जे हवे आहे ते मी मिळवीन, माझ्या देशाला आणि समाजाला जे पाहिजे आहे

ते मी मिळवून देईन; आणि 'नाही'ची परिस्थिती, 'नाही'ची हवा या देशात मी राहू देणार नाही. अशा प्रतिज्ञेने आपणांस आता काम करावयाचे आहे. ही खरी जिद्द आहे. या जिद्दीने समाज पेटला पाहिजे, या जिद्दीने सारा भारत पेटला पाहिजे, विचार करणाऱ्या सगळ्या माणसांच्या मनाला हीच आच लागली पाहिजे. आज आम्ही स्वातंत्र्य उपभोगीत आहोत. पण स्वातंत्र्य म्हणजे काय? स्वातंत्र्य म्हणजे एक प्रकारची वृत्ती आहे, ते एक प्रतीक आहे, ती आपली शक्ती आहे. आपल्या मनात आलेल्या विचारांचा स्वातंत्र्य हा आत्मा आहे. म्हणून मी जी जिद्द म्हणतो ती आपण आता आपल्या मनात निर्माण केली पाहिजे. अशा प्रकारची जिद्दीची शक्ती आपल्या मनात निर्माण झाल्यानंतर, आपल्याला हवी असलेली अशी एकही गोष्ट नाही की, ती शासन करू शकणार नाही; आणि अशी गोष्ट जर शासन करू शकत नसेल तर या हिंदुस्थानात अशा प्रकारचे शासन यापुढे टिकू शकणार नाही, राहू शकणार नाही.

आता यापुढे आपल्या देशात गावे वाढती राहणार आहेत, शहरे वाढती राहणार आहेत. कारण सामान्यपणे जेथे उद्योगधंदे निघण्याची शक्यता असेल तेथे माणसे येत राहतील. आपल्या शेतीचा कितीही विकास झाला तरी शेतीवर आज आहेत तितकी माणसे यापुढे राहू शकणार नाहीत, ही गोष्ट आपण आता पक्की लक्षात ठेवली पाहिजे. किंबहुना आज शेतीवर जितकी माणसे अवलंबून आहेत तितकीच माणसे शेतीवर राहणार असतील तर शेतीचा विकासही होणार नाही. तेव्हा पुष्कळांना दुसरीकडे जावेच लागेल. शहरांत यापुढे माणसांची रीघ लागेल, आणि म्हणून शहरांत आपल्याला या माणसांसाठी उद्योगधंदे सुरू करावे लागतील. या बाबतीत शासनाने मदत केली पाहिजे, मार्गदर्शन केले पाहिजे; परंतु प्रत्येक वेळी केवळ शासनाकडे पाहून चालणार नाही. ती जबाबदारी आपणांपैकी काहींनी उचलली पाहिजे. त्यासाठी योजनाबद्ध काम करणाऱ्या, सहकाराच्या भावनेने काम करणाऱ्या, उदार दृष्टीने काम करणाऱ्या जिद्दी माणसांचा, कार्यकर्त्यांचा संच आपण आता तयार केला पाहिजे. तेव्हाच आपले प्रश्न सुटण्याच्या मार्गाला लागतील.

फार वेळ मी बोलत राहिलो. परंतु माझ्या मनात आलेले दूरवरचे विचार आपल्यापुढे मांडावे असे मला वाटले म्हणून ही लांबण वाढली. आपल्या शहराला आता पाणी मिळाले. पाच-सात वर्षांपूर्वी मंत्रिमंडळात आपल्या या पाणीपुरवठ्याच्या प्रश्नाची चर्चा झाली. दहा-पंधरा लाखांची ही योजना एकदम चाळीस लाखांवर गेली. म्हणून आता उद्‌गीरच्या पाणी-पुरवठ्याचे काय होणार अशी चिंता पडली होती. पण आम्ही एकत्र बसलो आणि ही योजना पुरी करण्याचे ठरविले. कागदावरची उद्‌गीरची योजना मंजूर होऊन माझी सही झाली तो दिवस मला आठवतो. कागदावर शाई होती पण पाणी नव्हते. आज माझ्या मनाला फार आनंद होतो आहे की, पाच-सात वर्षांपूर्वी कागदावर केलेल्या त्या सहीच्या शाईतून पाणी निघाले ! या पाण्याने आपले जीवन संपन्न होणार आहे याचाही माझ्या मनाला आनंद होतो आहे. मी आपल्या गावाला शुभेच्छा व्यक्त करतो. तुमच्या जीवनात आलेले हे नवीन मंगल पाणी तुमचे जीवन खऱ्या अर्थाने सुजलाम सुफलाम करो, तुमच्या जीवनात कर्तृत्व येवो, आनंद येवो आणि तुमचे जीवन सुखाचे बनो अशी प्रार्थना करून मी आपली रजा घेतो.

उद्‌गीर पाणी-पुरवठा योजनेचे उद्‌घाटन, उद्‌गीर, मराठवाडा, दि. ११-५-६६

१२ सहकाराचे पथ्य

आजचा हा समारंभ, समारंभयोजनेच्या दृष्टीने सुद्धा मोठा आदर्श समारंभ आहे. ज्याला संतुलित समारंभ म्हणून म्हणता येईल अशा प्रकारचा हा नमुनेदार समारंभ आहे. स्टेट बँकेचे अध्यक्ष या समारंभाचे अध्यक्ष आहेत, राज्याचे मुख्य मंत्री या समारंभप्रसंगी हजर आहेत, आणि राज्याच्या गृहमंत्र्यांनीही त्यात भाग घेतला आहे. असा हा सुंदर योग या समारंभात साधला आहे. शासनाच्या किंवा लोकजीवनाच्या ज्या प्रमुख यंत्रणा आहेत त्यांच्या मदतीने गेल्या पंचवीस-तीस वर्षांच्या काळात या बँकेने केलेले कार्य लोकांच्या नजरेपुढे आणणे, हा तर या समारंभाचा उद्देश आहेच. परंतु या कार्यातील अडचणी फार शब्दांत न मांडता लोकांच्या नजरेला येतील, आणि अपेक्षा न करता त्यांची उत्तरे मिळतील अशा प्रकारची, हा समारंभ आखताना संचालकांनी केलेली सुरेख व्यवस्थाही या समारंभात मला दिसते आहे; आणि म्हणून या समारंभाच्या संचालकांना मी मनापासून धन्यवाद देऊ इच्छितो. हा समारंभ साजरा करीत असताना, आपण केलेल्या कार्यासंबंधीचा अभिमान बाळगूनही या क्षेत्रात काम

केलेल्या माणसांसंबंधीची कर्तव्यबुद्धी आपण विसरला नाहीत ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. श्री. नीळकंठराव कल्याणींनी आपल्या भाषणात साधने आणि संघटना या सगळ्यांचा, शेवटी माणूस हा नियंत्रक आहे असे जे सांगितले ते माझ्या मते अतिशय महत्त्वाचे आहे. कारण या क्षेत्रात काम करणाऱ्या माणसाची इर्ष्या, त्याची आवड, त्याची कामाकडे पाहण्याची दृष्टी हा या कार्याचा अतिशय महत्त्वाचा भाग आहे. त्याचप्रमाणे हे कार्य करीत असताना या क्षेत्रात उत्तम तऱ्हेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा आदर्श आपण आपल्या नजरेसमोर ठेवला आहे ही गोष्टही मी तितकीच महत्त्वाची मानतो. आपण मिळविलेल्या यशामुळे आणि या क्षेत्रातील कामाच्या वाढत्या गरजेमुळे यापुढे जनता या क्षेत्राकडे अधिकाधिक आकर्षिली जाईल यात शंका नाही. सहकारी तत्त्वाच्या पाठीमागे असलेल्या शक्तीचाही कदाचित अशाच प्रकारचा परिणाम होणे संभवनीय आहे. सहकारी संघटनेकडे कार्यकर्ते आकृष्ट व्हावेत असा आजचा काळ आहे, जमाना आहे. सहकारी तत्त्वाचा प्रत्यक्षात दिसून आलेला परिणाम आज लोकांच्या डोळ्यासमोर आहे, तो लोकांनी आपल्या निष्ठेने, दूरदृष्टीने घडवून आणला आहे. अतिशय चांगली आणि आशादायक अशी ही गोष्ट आहे असे मी मानतो.

भू-तारण, भू-विकास यासारख्या अनेक मार्गांनी ही बँक आपल्या राज्यामध्ये गेली एकतीस वर्षे प्रत्यक्ष काम करते आहे. तिने केलेल्या या चांगल्या कामाचे श्री. नीळकंठराव कल्याणी यांनी उत्तम वर्णन केले आहे. दोन-तीन कालखंडांत त्यांनी त्याची विभागणी केली आहे. बँकेच्या कामाचा व्याप कसा वाढतो आहे याचेही सुंदर वर्णन श्री. वसंतराव नाईक यांनी आपल्यासमोर केले आहे. वाढत्या अंगाचा हा गुण आर्थिक क्षेत्रात सर्वच ठिकाणी दिसून येतो, आणि शेतीच्या क्षेत्रात तर विशेषच. शेतीचा प्रश्न हा आपल्या देशातील एक मोठा विलक्षण प्रश्न आहे. त्याचे स्वरूप कोठेही एकाच प्रकारचे नाही. निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळ्या स्वरूपात हा प्रश्न उभा राहतो. पूर्वी हत्तीचे वर्णन करताना आंधळ्यांची गोष्ट सांगत. हत्ती कसा आहे हे आंधळ्यांनी पाहावयाचे म्हणजे

हस्तस्पर्शाशिवाय त्यांना दुसरा मार्ग उपलब्ध नाही. म्हणून या आंधळ्यांपैकी काहींनी त्याच्या सोंडेला हात लावला, काहींनी त्याच्या शेपटीला हात लावला, तर काहींनी त्याच्या कानाला हात लावला. तेव्हा या आंधळ्यांची अशी गोष्ट सांगतात की, त्यांच्यापैकी काहींना हत्ती सोंडेसारखा लांब वाटला, काहींना शेपटीसारखा लहान वाटला आणि काहींना सुपासारखा पसरट वाटला. आपल्या शेतीचा प्रश्न हा या आंधळ्यांच्या गोष्टीतल्या हत्तीसारखाच फार मोठा प्रश्न आहे. कोणाला या प्रश्नाचा हा भाग दिसतो तर कोणाला तो. पूर्वी रामाला रावणाशी लढताना फक्त दहाच तोंडांच्या रावणाशी लढावे लागले होते, परंतु या शेतीच्या प्रश्नाशी लढावयाचे म्हणजे शंभर तोंडे असलेल्या रावणाशी आपणाला लढावे लागणार आहे. आपल्या शेतीचे प्रश्न अनेकविध आहेत. लहान मुदतीच्या कर्जाचा प्रश्न आहे, दीर्घ मुदतीच्या कर्जाचा प्रश्न आहे, वागायतीचा प्रश्न आहे, बियाण्यांचा प्रश्न आहे, खतांचा प्रश्न आहे, तुकडेबंदीचा प्रश्न आहे; असे अनेकविध शेतीचे प्रश्न आहेत, आणि हे प्रश्नही नेहमी बदलत राहणार आहेत. दुर्दैवाने आपल्या देशामध्ये शेतीचा विकास अनेक शतके थांबला होता. दहा-पाच वर्षे तो थांबला असता तर ती मोठी काळजी करण्यासारखी गोष्ट टरली नसती. परंतु शेकडो वर्षे खितपत पडलेला असा हा प्रश्न असल्यामुळे त्यावर पुष्कळच विचार झाला पाहिजे. गेली काही वर्षे महाराष्ट्रात आपण हा प्रश्न हाती घेतला आहे आणि या काळात आपण अनेक साधनांचाही उपयोग केला आहे, परंतु एवढे घडल्याने आपला कार्यभाग पुरा होईल असे नाही. देशाच्या सर्वच भागांत अशा प्रकारचा विकास घडून आला पाहिजे. केवळ एकाच राज्यात विकास घडून येणे पुरेसे नाही. कारण आपला देश विशाल असल्यामुळे विशालतेबरोबर जसे फायदे येतात तसेच त्याबरोबर तोटेही येतात. देशातील एकाच भागाने चांगले व्हावयाचे ठरविले तर त्याला हे चांगुलपण फार काळ टिकविता येणार नाही असा या विशालतेचा अर्थ आहे.

पूर्वीच्या मानाने आज आपल्या बँकेचे काम खरोखरीच फार

चांगले चालले आहे. सातारा जिल्ह्यात जिल्हा बँकेने केलेले काम प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पाहण्याची मला जी संधी मिळाली ती अगदी मंदीच्या काळात. धान्याच्या किंमती अजिबात उतरल्यामुळे शेतकऱ्यांची त्या वेळी अत्यंत शोचनीय अवस्था झाली होती. त्यांच्या अवाढव्य कर्जबाजारीपणाच्या प्रश्नाला कोठे कसा स्पर्श करता येईल या दृष्टीने पाहण्याचा आमचा तेव्हा प्रयत्न चालला होता. पण हा प्रश्नच इतका मोठा, इतका विकट होता की, त्याच्या एका लहानशा भागालाच स्पर्श करण्याचे आम्ही ठरविले होते तरी, बँकेशी संबंधित असलेले कार्यकर्ते काय, किंवा बँकेकडून कर्ज मागणारी माणसे काय, आम्हा सर्वांच्याच पदरी निराशा पडत असे. लग्न झालेल्या मुलाचा संसार चांगला चालावा म्हणून पूर्वी लँड मॉर्गेज बँकेकडे कर्ज मागितले असता नातवाच्या लग्नाच्या वेळी हे कर्ज मिळत असे ! यातील अतिशयोक्तीचा भाग आपण सोडून दिला तरी त्या वेळची परिस्थितीच इतकी कठीण होती की, फारसे काही करताच येत नसे. पदरी बहुतेक निराशाच पडत असे. आज जिल्हा बँकेने तिच्या कामात निश्चितपणे पुष्कळच प्रगती केलेली आहे यात मुळीच शंका नाही. परंतु त्यातही ज्या काही अडचणी आहेत त्या आपण पाहिल्या पाहिजेत आणि मग पुढे चालले पाहिजे.

मला येथे एकच सूचना करावीशी वाटते. जिल्हा क्षेत्रात काम करताना मला आलेल्या अनुभवावरून मी असे सांगू इच्छितो की, सहकारी चळवळ ही काही एखाद्या पक्षाची चळवळ नव्हे. तात्त्विक दृष्ट्या सहकारी चळवळ ही मूलतः लोकशाहीची चळवळ आहे हे आपण विसरता कामा नये. या चळवळीमागील हा दृष्टिकोण आपण नीट समजून घेतला पाहिजे, आणि लोकशाहीचे हे स्वरूप कोठेही डागळणार नाही अशी आपण काळजी घेतली पाहिजे. पण ते डागळलेच तर ते का डागळले याचा आपण वारंवार शोध घेतला पाहिजे. सामान्य आणि शोषित समाजाच्या उपयोगी पडणे हा तर या चळवळीचा प्राणच आहे. पण खऱ्या अर्थाने आपल्याला ही चळवळ चालवावयाची असेल तर तिच्याकडे आपण लोकशाहीच्या दृष्टिकोणातून पाहिले पाहिजे.

लोकशाही हे जे तिचे स्वरूप आहे, ते आपण सुरक्षित ठेविले पाहिजे; जोपासले पाहिजे. मी आपल्याला आग्रहपूर्वक सांगू इच्छितो की, ही सहकारी चळवळ वाढते आहे त्याचे मुख्य कारण सहकारी चळवळीत आर्थिक विकास करण्याची जी शक्ती आहे ती लोकांना समजून चुकली आहे; ही महत्त्वाची गोष्ट पूर्वी घडत नव्हती आणि आज ती घडते आहे याचे कारण काय ? याचे कारण असे आहे की, आजच्या शासनाने या चळवळीतील विचारवंतांच्या मार्गदर्शनाचा चांगला उपयोग करून घेतला आहे. आणि सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आजच्या शासनाने आर्थिक प्रगतीचे एक मोठे साधन म्हणून या चळवळीचा स्वीकार केला आहे, जेथे जेथे आर्थिक प्रगतीचे हे साधन स्वीकारले गेले तेथे तेथे नवीन कार्यकर्ते तयार झाल्यामुळे कामाची गती सारखी वाढत राहिली आहे. महाराष्ट्र आणि गुजरात या प्रदेशांत या चळवळीला जुनी परंपरा असल्यामुळे तेथे ही चळवळ अधिक मोठ्या प्रमाणावर आकार घेत असलेली दिसते आहे. आपल्याला मदत मिळते आहे, आपल्याला या चळवळीचा उपयोग होतो आहे याची आता लोकांना जाणीव झालेली आहे. त्याबरोबर हेही खरे आहे की, या चळवळीत आर्थिक सत्ता आहे याचीही जाणीव लोकांत आणि त्याचप्रमाणे सहकारी कार्यकर्त्यांत निर्माण झाली आहे. ही चळवळ एका अर्थाने सत्तेचे एक केंद्र आहे, आणि सत्तेचे केंद्र म्हटले म्हणजे लोकशाहीचा अंकुश त्यावर ठेवलाच पाहिजे. तसे न केल्यास अनियंत्रित सत्तेमुळे विकासाचे हे शस्त्र दुधारी ठरेल अशी मला साधार भीती वाटते.

सहकाराच्या क्षेत्रात काम करणारे महाराष्ट्रातील बहुतेक कार्यकर्ते तरुण आहेत, माझ्या विशेष परिचयाचे आहेत म्हणून त्यांच्यापुढे मी हा विषय मांडतो. मघाशी वसंतराव नाईकांनी अतिशय व्यवहारी दृष्टीने सगळ्या प्रश्नांचे विवेचन केले, त्यांतील अडचणी सांगितल्या, त्यासंबंधी मार्गदर्शन केले आणि किती जिद्दीने हे काम करावयास पाहिजे याचाही त्यांनी ऊहापोह केला. विशेषत: भू-विकास बँकेची जी कल्पना आहे ती सतत वाढत जाणारी अशी कल्पना आहे. जगातील उत्पादनाच्या कल्पना

जसजशा बदलत जातील, तसतशी शेतीच्या विकासाची कल्पनाही बदलत जाईल. तेव्हा शेती-विकासाचे हे काम फार मोठे असून सहकारी चळवळ ही या कामासाठी लागणारी एक मोठी यंत्रणा आहे असे आपण मानले पाहिजे. तिचे सामर्थ्य, तिचे पावित्र्य जर आपण कायम ठेवले तर त्यातून निर्माण होणारी शक्ती समाजाला फार उपयोगी पडणारी अशी शक्ती ठरेल; आणि म्हणून मी म्हणतो की, आपली ही बँक म्हणजे लोकांना सामर्थ्य देणारी एक प्रबळ संस्था आहे. तीस वर्षांची तपश्चर्या आणि तीन पिढ्यांतील कार्यकर्त्यांची सेवा तिच्या विकासाच्या कामी खर्ची पडली आहे. या ठिकाणी मी लल्लुभाई सामळदास यांचा उल्लेख करतो, बैकुंठभाईंचा उल्लेख करतो आणि भाऊसाहेब हिऱ्यांचा उल्लेख करतो. या तीन नावांत या तीन पिढ्या आल्या. या तीन पिढ्यांनी अव्याहत केलेल्या कार्याचा आपली ही संस्था जणू काही केंद्रबिंदू आहे. तिच्यात या तीन पिढ्यांच्या कार्याचे सामर्थ्य प्रतिबिंबित झाले आहे.

सतत तीस वर्षे काम करून आपण ही जी सामर्थ्यशाली यंत्रणा उभी केली आहे ती लोकशाहीच्या तत्त्वाप्रमाणे काम करते किंवा नाही हे आपण पाहिले पाहिजे, आणि त्याचबरोबर तिचा उपयोग लोकांची शक्ती वाढविण्यासाठी बरोबर होतो आहे किंवा नाही हेही आपण पाहिले पाहिजे. लोकांन उपयोग होण्याच्या दृष्टीने सत्तेचा उपयोग झाला पाहिजे असे मी वारंवार सांगत आलो आहे. पण सत्ता ही शक्तीच अशी आहे की, ती नेहमी केन्द्रीभूत होत असते. डॉ. गाडगीळ कदाचित यात दुरुस्ती करतील. कारण तेही राज्यशास्त्राचे तज्ज्ञ आहेत. पण सत्तेचा हा गुणच आहे. समपातळीत राहणे हा पाण्याचा मूळ धर्म आहे, तो त्याचा स्वभावधर्म आहे, त्याचप्रमाणे सत्ता ही वस्तू अशी आहे की, तिचे कितीही विकेन्द्रीकरण करू म्हटले तरी शेवटी ती केन्द्रित होतेच. मग तिचा आपण हा दुर्गुण म्हणा अगर तिचा तो स्वभावधर्म म्हणा, पण सत्तेचे स्वरूप हे असे आहे. पाचशे सभासदांचे तुम्ही पार्लमेन्ट निवडले तरी शेवटी वीस माणसांचेच मंत्रिमंडळ बनते, आणि शेवटी त्या मंत्रिमंडळाचा कोणी तरी एक पंतप्रधान होतो. मी हे अनुभवलेले आहे. एके काळी मीही एका राज्याचा प्रमुख

होतो. साडेतीन-चार कोटी जनतेचे राज्य तीनशे माणसांमध्ये, तीनशे माणसांचे सामर्थ्य तीस माणसांमध्ये, आणि तीस माणसांचे प्रमुख पद शेवटी माझ्यामध्ये केन्द्रित झालेले मी अनुभवलेले आहे. सत्तेचा स्वभावधर्म हा असा आहे, आणि म्हणून सत्तास्थानावर असणाऱ्या माणसांनी आपल्या मनाने, भावनेने आणि विचाराने सत्ता विकेन्द्रित करण्याचा नित्य प्रयत्न केला पाहिजे. लोकशाही यंत्रणा तयार करणाऱ्या तज्ज्ञ मंडळींनी राजकीय सत्तेवर कायद्याची आणि इतर बंधने घालून ती सत्ता समतोल करून ठेवली आहे; परंतु आर्थिक सत्ता ही राजकीय सत्तेपेक्षाही अधिक शक्तिमान आहे. सत्ता हेच शेवटी सर्वांत मोठे सामर्थ्य आहे. मग ती सत्ता राजकीय असो अगर आर्थिक असो, आणि म्हणून सत्तेचे स्थान हे लोकांच्या कल्याणासाठी उभारलेली एक वेदी आहे, एक यंत्रणा आहे. ते एक मोठे जोखमीचे काम आहे ही जाणीव सतत आपल्या मनात असली पाहिजे. यासाठी एकच मार्ग आहे आणि तो हा की, आपले हे काम लोकशाहीच्या पद्धतीने चालले आहे की नाही याचे कठोर आत्मनिरीक्षण नित्य झाले पाहिजे. आपल्या बँकेचे कामही याच पद्धतीने होत आहे की नाही हे आपण पाहावे असे मी सुचवीन.

महाराष्ट्रात सहकारी चळवळीचा खरोखरीच विकास झाला आहे यात शंका नाही. बाहेरची मंडळीही हे कबूल करतात. परंतु हे सर्व एकाच राज्यात चालू आहे. त्याचा इतर राज्यांतील लोकांना काही उपयोग नाही. या विशाल देशामध्ये आपणच फक्त चांगले होऊन भागणार नाही, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आपण म्हणत असतो की, आपल्या देशासारख्या अवाढव्य आणि गरीब देशात थोड्याच माणसांनी श्रीमंत असून चालणार नाही. त्यांना तसे राहता येणार नाही. चांगुलपणाचीही काहीशी अशीच गोष्ट आहे. चांगुलपणाचा केवळ देशाच्या ठराविक भागालाच उपयोग न होता त्याचा सर्व समाजाला, सर्व देशाला उपयोग झाला पाहिजे; आणि म्हणून आपण निर्माण केलेली ही सहकाराच्या चळवळीची शक्ती इतर ठिकाणीही नेऊन पोहोचविली पाहिजे. तिचा उपयोग इतरांनाही करता येईल अशा प्रकारची योजना आपल्याजवळ असली पाहिजे. एक अत्यंत

इष्ट गोष्ट म्हणून ही कल्पना मी आपल्यासमोर मांडतो आहे. मघाशी डॉ. गाडगिळांना कुणी तरी खासदार डॉ. गाडगीळ असे म्हटले तेव्हा मी त्यांच्याकडे मोठ्या आनंदाने पाहिले. ते खासदार झाल्याबद्दल मला जरूर आनंद वाटला. परंतु या आनंदाला आणखीही एक कारण आहे. डॉ. गाडगीळ हे सहकारी क्षेत्रातील एक तज्ज्ञ आहेत, एक महर्षी आहेत, एक पंडित आहेत. परंतु ते या क्षेत्रातील नुसतेच पंडित नाहीत, तर त्यांनी महाराष्ट्रातील सहकारी क्षेत्रात अनेक नवीन कामे घडवून आणून आपल्या स्पर्शाने त्या कामांचा मार्ग उजाळला आहे. त्यासाठी त्यांनी अत्यंत व्यावहारिक असे प्रयत्न केलेले आहेत. डॉ. गाडगीळ आता खासदार झाले असल्यामुळे त्यांचे कार्यक्षेत्रही अर्थात अधिक व्यापक झाले आहे. तेव्हा महाराष्ट्रातील सहकारी तत्त्वाचा चांगुलपणा टिकविण्यासाठी, देशात इतरत्र होणाऱ्या सहकाराच्या प्रयत्नांना डॉ. गाडगिळांनी योग्य दिशेने चालना द्यावी आणि महाराष्ट्राचे या क्षेत्रातील यश अधिक उज्ज्वल करावे अशी मी त्यांना या शुभ प्रसंगी विनंती करतो.

आजचा हा समारंभ खरोखरीच महत्त्वाचा समारंभ आहे. कारण महाराष्ट्राच्या एका महत्त्वाच्या आर्थिक क्षेत्रात काम करीत असलेले आपण सर्व कार्यकर्ते, त्या क्षेत्रातील एका संस्थेने गेल्या तीस वर्षांच्या काळात केलेल्या कार्याचे सिंहावलोकन करणार आहात. अशा प्रसंगी, या संस्थेकडून जे कार्य झाले ते कसे होऊ शकले, त्यातली कर्ती माणसे कोण होती, पुढे जे कार्य होणार आहे त्याची दिशा कोणती राहणार आहे, त्यासाठी लागणाऱ्या कार्यकर्त्यांचा संच सर्वतोपरी योग्य आहे किंवा नाही वगैरे गोष्टींचा आपल्याकडून विचार व्हावा. यापुढील काळ कदाचित कठीण असण्याची शक्यता आहे, अनेक अनपेक्षित अडचणी उत्पन्न होण्याचीही शक्यता आहे. हे सर्व गृहीत धरून आपण आपल्या पुढील कार्याची आखणी करावी. त्यासाठी कदाचित आपल्याला आत्मनिरीक्षणही करावे लागेल, आणि म्हणून आपल्या संस्थेच्या जीवनातला आजचा हा दिवस जसा अभिनंदनाचा आणि अभिमानाचा दिवस आहे तसाच तो आत्मनिरीक्षणाचा, आत्मटीकेचाही दिवस आहे असे मला वाटते. याच

दृष्टीने मी आपल्या या आजच्या समारंभाकडे पाहतो आहे आणि आपणही सर्वजण याच दृष्टीने या समारंभाकडे पाहाल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. शेवटी, आपल्या या संस्थेला आणि या संस्थेत काम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना माझ्या संपूर्ण शुभेच्छा व्यक्त करून मी माझे भाषण पुरे करतो.

बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह लॅण्ड मॉर्गेज बँकेचा रौप्य महोत्सव,
मुंबई, दि. १४-४-६६

१३ शेती व नागरीकरण

गेले वर्ष दीड वर्ष, या भिवंडी नगरपालिकेच्या शतसांवत्सरिक समारंभासाठी मी यावे असे माझे येथील मित्र मला सुचवीत होते. पण मी अशा अडचणीत सापडलो होतो की, मी नकारही देत नव्हतो आणि होकारही देत नव्हतो. परंतु शेवटी योगायोगाने हा दिवस मी ठरवू शकलो आणि ठरल्याप्रमाणे तो पार पाडू शकलो याबद्दल मला आज सगळ्यात जास्त आनंद वाटतो आहे.

भिवंडी हे औद्योगिक दृष्ट्या महाराष्ट्राचे एक अतिशय महत्त्वाचे शहर आहे. तेव्हा येथल्या नगरपालिकेने आपली शंभर वर्षांची कारकीर्द पुरी केली याबद्दल या शहराला आनंद वाटणे अगदी स्वाभाविक आहे. महाराष्ट्रातील अनेक नगरपालिकांच्या शतसांवत्सरिक समारंभांना आजच्याप्रमाणे मी हजर राहिलेलो आहे. तेव्हा अशा प्रसंगी जो विचार नेहमी माझ्या मनात येत असतो त्याचा, पुनरुक्तीचा दोष पत्करूनसुद्धा, मी येथे उल्लेख करणार आहे; आणि तो असा की, या शहरातील लोकशाही आता शंभर वर्षांची झाली. शंभर वर्षांपूर्वी या शहराने, शहरातल्या पंचांच्या मदतीने आपला

कारभार चालला पाहिजे हा विचार कायद्याने स्वीकारला, आणि या नगरपालिकेची वाटचाल सुरू झाली. शंभर वर्षांनंतर आज, येथे झालेल्या कामाकडे आपण आनंदाने आणि अभिमानाने पाहू शकाल इतके आपले काम चांगले झाले असेल असे मी धरून चालतो.

पहिल्या पन्नास वर्षांत ज्याला आपण विकासाच्या योजना म्हणतो त्या आपण मोठ्या प्रमाणात घेऊ शकला असाल असे मला वाटत नाही. विकासाची ही गाडी सामान्यपणे गेल्या पंधरा-वीस वर्षांमध्ये फार मोठ्या प्रमाणात सगळ्या शहरांत चालू लागली. परंतु भिवंडी शहराची सध्या जी वाढ होत आहे ती मात्र, इतर कोठल्याही शहराच्या तुलनेने चिंताजनक आहे असे मी म्हणेन. कारण १९६१ च्या खानेसुमारीप्रमाणे या शहराची लोकसंख्या जी सत्तेचाळीस हजार होती ती आज सामान्यपणे एक लाखाच्या घरात गेली आहे. म्हणजे गेल्या पाच-सात वर्षांत आपल्या लोकसंख्येत शंभर टक्क्याने वाढ झाली आहे. अर्थात बाहेरची पुष्कळच माणसे या शहरात उद्योगधंद्यानिमित्त आलेली असल्यामुळे ही अफाट वाढ झाली आहे हे स्पष्टच आहे. माझ्या मते आपल्या देशात आज जोराने होत असलेले लोकसंख्येचे नागरीकरण हे या वाढीचे एक महत्त्वाचे कारण आहे. परंतु लोकसंख्येच्या नागरीकरणाचा प्रश्न हा आज जगातील सर्वच देशांत फार मोठा गंभीर प्रश्न होऊन बसला आहे. त्याला आपला देश अपवाद नाही. परंतु पुढारलेल्या देशांत हा प्रश्न आपल्या येथील प्रश्नापेक्षा काहीसे निराळे स्वरूप धारण करतो. ताश्कंद कराराच्या वेळी रशियातील ताश्कंद भागात मी असताना तेथील शेतीच्या प्रश्नांची माहिती मिळविण्याचा मी प्रयत्न केला. त्या वेळी नागरीकरणाचा हा प्रश्न, तेथल्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे तेथे मोठा गुंतागुंतीचा होऊन बसला आहे, असे मला आढळून आले. खेड्यातून शहराकडे वस्ती जाऊ लागली की मग तेथे अनेक मागण्या पुढे येऊ लागतात. चांगले घर पाहिजे, त्याला मग नळाच्या पाण्याची सोय पाहिजे, त्यानंतर मग ओघानेच शाळा आली, मग दवाखाना आला, मग नाटकगृह आले, मग हवामानाच्या परिस्थितीप्रमाणे एअर-कंडिशनिंग आले. उन्हाळ्याच्या दिवसांत थंड वाऱ्याची व्यवस्था पाहिजे व

थंडीच्या दिवसात गरम पाण्याची व्यवस्था पाहिजे. नागरीकरणाच्या प्रश्नांची ही अशी तेथे गुंतागुंत होते.

परंतु आपल्या येथल्या या प्रश्नाचे स्वरूप पुष्कळच वेगळे आहे. रशियात आणि इतर पुढारलेल्या देशांत खेड्यातील जनता योजनेने शहरात नेली जात आहे. परंतु आमच्या येथे खेड्यातील जनता स्वतः होऊन शहरात जात आहे हा तेथील नागरीकरणात आणि आपल्याकडील नागरीकरणात महत्त्वाचा फरक आहे. त्यांच्याकडील नागरीकरणाचे कारण फार निराळे आहे. शेती-सुधारणा तेथे इतक्या वेगाने होत आहे की शेतीमध्ये तेथे आता अधिक मनुष्यबळाची गरज राहिलेली नाही, तेथे शेतीचे यांत्रिकीकरण, सामुदायिकीकरण (Collectivization) आणि आधुनिकीकरण फार मोठ्या प्रमाणात चालू आहे. जेथे पूर्वी दहा माणसांची गरज होती तेथे आज फक्त दोनच माणसे काम करतात. शेतीवरचे माणसांचे ओझे याप्रमाणे तेथे कमी झाल्यामुळे शेतीतून मोकळ्या झालेल्या माणसांना दुसऱ्या उद्योगधंद्यात गुंतविण्याची आणि त्यासाठी आधुनिक औद्योगीकरणाची तेथे मोठी गरज निर्माण झाली आहे. तेथे आज खेड्यातील माणसे योजनेने उद्योगामध्ये बसविली जात आहेत. आपल्याकडील परिस्थितीमात्र अगदी निराळी आहे. मुंबईचेच उदाहरण घ्या. मुंबईत बाहेरून दररोज नवीन शंभर कुटुंबे येत असतात, पण ही झोपडपट्टीची सोय होत आहे. मुंबईत प्रत्येक दिशेने येणारी गाडी ही, नवीन झोपडपट्टीची गिऱ्हाइके घेऊन येते. बाहेरून येणाऱ्या या लोकांना मुंबईत उद्योगधंदा मिळतोच असे नाही. पण काही तरी उद्योगधंदा मिळेल या आशेने ही मंडळी मुंबईस येत असतात. आमच्याकडचे नागरीकरण हे अशा प्रकारचे असल्यामुळे त्यात यातना फार आहे, दुःख फार आहेत, दैन्य फार आहे. समाजवादी देशातील आणि आपल्या देशातील नागरीकरणामध्ये हा असा महत्त्वाचा फरक आहे.

खेड्यात आज लोक थोडेसे हसताना दिसतात, पण पूर्वी खेड्यातील परिस्थिती काहीशी निराळी होती. मी हे महाराष्ट्रापुरते बोलतो आहे. महाराष्ट्रात मी खूपच हिंडलेलो आहे, महाराष्ट्रातील अनेक लहान-मोठी

खेडी मी स्वतः डोळ्यांनी पाहिली आहेत. १९४८ ते १९५० या दोन वर्षांच्या दरम्यान मी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचा चिटणीस होतो आणि आपल्या राज्याचा एक छोटासा पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणूनही मी काम करीत होतो. या काळात फार वारकाईने महाराष्ट्र पाहण्याचा मी प्रयत्न केला. त्या काळी खेड्यापाड्यातून किंवा गावाच्या बाजूने दुपारी आपण गेलो तर काही हालचाल दिसत नसे. सर्व गाव जणू काही झोपल्यासारखे वाटे. शेतीवर जेथे विहीर असे तेथे विहिरीतून पाणी काढल्याचा आवाज क्वचित ऐकू यावयाचा. दुपारच्या उन्हाने थकून भागून गेलेली माणसे आणि जनावरे चूपचाप पडून असावयाची. पडझड झालेली जीर्ण घरे, मोडकळीस आलेले वाडे आणि तुटलेली शेती हे त्या काळच्या महाराष्ट्रातल्या खेड्यांचे स्वरूप होते. अद्यापिही थोडीफार हीच अवस्था आहे. पण अलीकडे मात्र थोडीशी हालचाल सुरू झालेली दिसते आहे. नागरीकरणाच्या रूपाने खेड्यातील जनतेचा लोंढा हळू-हळू निश्चितपणे शहराकडे सरकत असल्याचे दृश्य आज दिसते आहे. परंतु ग्रामीण विरुद्ध नागरीकरण हे प्रश्न एकमेकात इतके गुंतलेले आहेत की, एकाच्या सुखाचा, दुसऱ्याच्या दुःखाशिवाय आपणाला विचारच करता येत नाही. खेडे आणि शहर यांची सुखदुःखे ही अशी परस्परांशी भिडलेली, परस्परात मिसळलेली आहेत.

तेव्हा आम्हांला या नागरीकरणाच्या प्रश्नाचा गंभीरपणे विचार करावयाचा असेल तर तो आपण दोन-तीन तऱ्हेने करू शकतो. एक तर शहरात जी वस्ती आहे तिला अधिक सुखी करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी लागणारी साधने आपण शहरांना पुरविली पाहिजेत. पण त्याच-बरोबर खेड्यांतून शहरांकडे येणाऱ्या लोकांचा जो ओघ आहे तोही थांबविण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. मुंबईत दररोज येणाऱ्या नवीन पाच माणसांपैकी तीन माणसे महाराष्ट्राच्या बाहेरची असतात असे नुकतेच डॉ. झकेरियांनी सांगितले. ही वाढ मर्यादित करण्यासाठी या प्रश्नाचा राष्ट्रीय स्तरावर विचार होण्याची आवश्यकता आहे. निव्वळ एक राज्य सोडवू शकेल इतका सोपा हा प्रश्न नाही. शिवाय तो कुटुंब-नियोजनाच्या

प्रश्नाशी अतिशय गुंतलेला असा प्रश्न आहे. यातून एकच मार्ग आहे. तो म्हणजे नवीन उपनगरे (Sattellite) वसविणे हा होय. उपनगरांची ही कल्पना डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी या प्रश्नाचा सखोल अभ्यास करून मांडली आहे. काही महत्त्वाची शहरे, विशेषत: मुंबई शहर डोळ्यांपुढे ठेवून या कल्पनेचा आम्ही विचार केला. माझे स्वत:चेच केवळ नव्हे तर अनेक विचारवंतांचे असे मत आहे की, नागरीकरणाचा हा प्रश्न आमच्या शेतीच्या प्रश्नाचा एक भाग आहे, आणि म्हणून शेतीच्या प्रश्नाचा विचार करताना नागरीकरणाचा प्रश्न सतत डोळ्यांपुढे ठेवावा लागतो, इतका महत्त्वाचा हा प्रश्न आहे. सबंध हिंदुस्थानच्या ग्रामीण आणि नागरी भागांच्या विकासासाठी आपणांस जे नवीन उद्योगधंदे सुरू करावे लागतील ते आपण अशा ठिकाणी स्थापन केले पाहिजेत की, ज्या ठिकाणी आपण संपूर्णतया नवीन शहरे वसवू शकू. एखाद्या मोठ्या शहरात नवीन उद्योग-धंदे सुरू केल्याने उद्योगधंद्यासाठी त्या शहरात येणाऱ्या लोकांमुळे त्या शहराच्या प्रश्नांत नव्या प्रश्नांची भर पडत राहते व त्या शहराला नव्या आपत्तींना तोंड द्यावे लागते. हे सर्व टाळण्यासाठी आपल्याला जे नवीन उद्योगधंदे सुरू करावयाचे आहेत त्यासाठी आपण छोटीछोटी नवीन शहरे वसविली पाहिजेत. नागरीकरणाचा प्रश्न सोडविण्याचा हा एक उत्तम उपाय आहे.

नागरीकरणाचा हा प्रश्न यापुढे कोणी थोपवू शकणार नाही. कारण मनुष्य एकदा शहरात राहावयास गेला की, खेड्यात परत जाऊन राहण्याची त्याला इच्छाच होत नाही. शहरात त्याची स्थिती गरिबीची असेल किंवा तो दोन खोल्यांतच राहत असेल किंवा तेथे त्याला मोकळी हवा कदाचित मिळत नसेल, पण शहरामध्ये त्याला किती तरी अन्य साधने उपलब्ध होऊ शकतात. शहरात त्याला मुलांचे शिक्षण करणे सोपे जाते, तेथे त्याला मन रिझविण्याची संधी मिळते, दवाखान्यात औषध मिळते, तातडीने डॉक्टर मिळण्याची आशा असते. शहरात असे अनेक फायदे उपलब्ध असण्याची शक्यता असल्यामुळे खेड्यातील माणसाच्या मनाला शहरासंबंधी नेहमी आकर्षण वाटत असते. खेड्यांतील शिक्षणासंबंधी बोलताना हा

विचार मी अनेक वेळा मांडला आहे. शिक्षणासाठी मुलाला शहरात ठेवून खेड्यातला एखादा शेतकरी जेव्हा त्या मुलाला शिकवून तयार करतो तेव्हा तो मुलगा खेड्यात परत कधीच जात नाही. मी पाहिलेली अशा प्रकारची अनेक उदाहरणे आहेत, माझ्या स्वत:च्या नात्यातली उदाहरणे आहेत. शिक्षणाने माणूस मोठा होतो म्हणून आपला मुलगा शिकावा या हेतूने बाप आपली शेती गहाण ठेवून मुलाला कॉलेजमध्ये पाठवितो. मुलगा कॉलेजमध्ये गेला की बापाला अभिमान वाटतो. असे वाटणे साहजिकंच आहे. कारण आपला मुलगा आपल्यापेक्षा शहाणा झालेला पाहून कोणत्या बापाला आनंद वाटणार नाही? बापाला अशा प्रकारचा आनंद वाटत असतो पण तो तसा बोलून मात्र दाखवीत नाही. कॉलेजमधला मुलगा घरी आला म्हणजे घरात जनावरे असतील तर तो त्यांच्या देखभालीसाठी बापाला मदत करणार नाही. खेड्यात पाणी विहिरीतून शेंदून काढावे लागते. त्यासाठी खांद्यावर घागर घेतली पाहिजे. पण कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुलाला बाप आता आहो जाहो म्हणत असतो. तो त्या मुलाला म्हणेल, "तुम्ही नका आणू घागर. मीच आणीन." शिकून तयार झालेला, शहाणा झालेला हा मुलगा, त्याने मिळविलेली शक्ती घेऊन खेड्यात परत जाऊच शकत नाही. शहराबद्दल त्याला एक प्रकारचे जे आकर्षण निर्माण झालेले असते त्यामुळे तो शहरातच राहण्याचा प्रयत्न करतो. शहरासंबंधी हे जे आकर्षण निर्माण होते ते आपण बंद कसे करणार? शहरासंबंधीचे हे आकर्षण वाईट आहे असे जरी आपण म्हणालो तरी ते कोणी मानणार नाही, त्याला कोणी साथ देणार नाही अशी आज परिस्थिती आहे.

राष्ट्रकार्यात मी पडलो त्या वेळी सुरुवातीला 'खेड्यात परत जा' अशी एक घोषणा दिली जात होती. त्या काळी आम्हाला या गोष्टी कळत नव्हत्या. आम्ही त्या घोषणा म्हणून त्यांचा घोष करीत होतो. निव्वळ खेड्यात परत जा ही घोषणा अर्थशून्य आहे. खेड्यातील समाजजीवन सामर्थ्यशाली करणारे विचार व साधने घेऊन खेड्यात जा या म्हणण्याला काही अर्थ आहे. मला गावाचा अभिमान आहे, गावासंबंधी प्रेम आहे.

पण ज्या गावामध्ये आणि ज्या घरामध्ये मी जन्मलो तेथे पूर्वी जी परिस्थिती होती त्या परिस्थितीमध्ये जाऊन राहा म्हणून जर मला कोणी सांगितले तर मी प्रामाणिकपणे नाही म्हणेन. मला जन्मभूमीचा किंवा गावाचा ज्वलंत अभिमान असूनही मी असे म्हणेन. शहरातील सुखसोयी आणि शहरातील रोजगारांची शाश्वती काही प्रमाणात जरी आपण खेड्यात निर्माण करू शकलो तर सध्या शहरासंबंधीचे खेड्यातल्या माणसाला वाटणारे आकर्षण काहीसे कमी होईल. आज ज्या गावात वीज गेली आहे, ज्या गावात बागायती शेतीची वाढ झालेली आहे, ज्या गावात आधुनिक शिक्षणाचे लोण, निदान पाच-सहा मैलांच्या परिसरात जाऊन पोहोचले आहे, त्या गावात शिकलेली मुले आज परत जात आहेत अशा प्रकारचे चित्र, अशा प्रकारची उदाहरणे मी महाराष्ट्राच्या काही भागात पाहिलेली आहेत. पण सगळ्या महाराष्ट्राचा विचार करता फारच थोड्या प्रमाणात ही गोष्ट घडून येत आहे. हा सारा प्रपंच मी आपल्यापुढे अशासाठी मांडतो आहे की, या आधुनिक शहरांचे जे प्रश्न आहेत, त्या प्रश्नांशी या सगळ्या गोष्टी निगडित आहेत. नागरीकरणाच्या प्रश्नाचा हा मूळ गाभा आपण नीट समजून घेतला पाहिजे.

आपल्या भिवंडी शहराची आज ज्या वेगाने वाढ होत आहे तो वेग भिवंडी शहराला आणि पर्यायाने महाराष्ट्र शासनालाही केव्हा तरी महाग पडेल असे मला वाटते. ही आपल्याला काहीशी न पेलणारी अशी बाब आहे. आपल्या शहराची ही जी वाढ होत आहे त्याचे मुख्य कारण उद्योग-धंदा पुरविण्याची आपल्या शहरामध्ये शक्ती आहे, हे आहे. अनेक ठिकाणचा बेरोजगार झालेला विणकर येथे येऊन झटदिशी या हातमागाच्या धंद्यात पडतो. तेव्हा अशा प्रकारे अनिर्बंधपणे जर आपल्या या जुन्या शहराची आणखी वाढ होणार असेल तर या प्रश्नाचा निदान या शतसांवत्सरिक उत्सवाच्या निमित्ताने विचार व्हावा अशी मी आपल्याला सूचना करीन.

आपल्या नगरपालिकेने आज शंभरी पुरी केली याबद्दल आपल्याला अभिमान वाटणे साहजिक आहे. या शुभ प्रसंगी आपण जी स्मरणिका

प्रकाशित केली आहे, ती पाहत असताना तिच्यात एक मोठे ऐतिहासिक स्वरूपाचे चित्र मला आढळले. बरोबर पन्नास वर्षांपूर्वी लोकमान्य टिळक भिवंडीस आले होते त्या वेळचे हे चित्र आहे. त्यानंतर पन्नास वर्षांनी आज आपण येथे जमलो आहोत. या पन्नास वर्षांमध्ये केवढ्या घडामोडी या देशात झाल्या! लोकमान्य स्वराज्याकरिता केवढ्या प्राणपणाने झगडले! १९१६ साली भिवंडीतल्या एका मोठ्या थोरल्या वृक्षाखाली झालेल्या सभेत लोकमान्यांनी काय सांगितले असेल याचा मघाशी मी विचार करीत होतो. त्या वेळी होमरूलची चळवळ अधिक गतिमान करण्याच्या प्रयत्नात ते होते आणि त्याच वेळी हिंदुस्थानात आलेले गांधीजी हिंदुस्थानने आपली स्वराज्याची मागणी अधिक तेजस्वी करावी असा आवाज उठवीत होते. लोकमान्यांच्या आणि गांधीजींच्या विचारांची एक प्रकारची परिणती होण्याचा कदाचित तो काळ असावा अशा प्रकारचे चित्र आज माझ्या डोळ्यांपुढे उभे राहते. ज्या स्वराज्यासाठी सारी हयात लोकमान्य टिळक आपल्या जिवाचा आटापिटा करीत होते ते स्वराज्य या देशात येऊन आज वीस वर्षे झाली. या वीस वर्षांमध्ये आमचे किती प्रश्न पुढे गेले आहेत? कोणकोणात्या क्षेत्रांत किती किती प्रगती आम्ही केली आहे? देशात चाललेल्या या प्रगतीचे लोण येथे येऊन पोहोचले आहे किंवा नाही? या आणि अशा अनेक प्रश्नांचा मागोवा घेणे हे इतिहासाचे काम आहे. गेल्या वीस वर्षांमध्ये या देशात महत्त्वाचा फरक पडला आहे, ही गोष्ट जरूर कबूल केली पाहिजे. या देशात एक नवीन जाणीव निर्माण झालेली आहे, एक नवीन अभिमान निर्माण झालेला आहे. या देशातील नवी पिढी आशा-आकांक्षांनी आपल्या आयुष्याकडे आज पाहते आहे. तेव्हा निव्वळ गावाचा अभिमान न बाळगता गाव हे शेवटी, देशामध्ये जे घडते त्याचे काही प्रमाणात प्रतीक असते असे आपण मानले पाहिजे. शेवटी एकात्म झालेले राष्ट्र म्हणजे काय? एकात्म झालेले राष्ट्र म्हणजे त्या राष्ट्राचा छोटासा अणुरेणूसुद्धा त्या सबंध राष्ट्राचे प्रतीक असला पाहिजे. मी आपल्याला वेदान्त सांगत नाही. पण विश्वासंबंधी असे सांगतात की, विश्व भरून परमात्मा राहिलेला आहे. विश्वाचा अणुरेणू जरी

पाहिला तरी तो परमात्ममय असलेला आढळून येईल. पण वेदान्तच कशाला पाहिजे ? आपण नित्याच्या व्यवहारातील साधी गोष्ट पाहू. गोड लाडू हातामध्ये दिला, तो सगळा लाडू गोड असतो आणि त्याचा लहानसा तुकडाही गोडच असतो. लाडवामध्ये जे गुणधर्म असतील ते त्याच्या लहानशा कणामध्येही असले पाहिजेत. साखरेचा लहानसा कण तोंडात टाकला तरी तो गोड लागतो आणि मूठभर साखर तोंडामध्ये टाकली तरी ती गोड लागते. त्याचप्रमाणे राष्ट्रामध्ये जे काही चांगले गुण असतील ते त्याच्या लहान स्वरूपात, म्हणजे त्यातल्या गावात, शहरातही दिसले पाहिजेत. आपली ही भिवंडीची लोकशाही म्हणजे देशात झालेल्या लोकशाहीच्या वाढीचा एक बिंदू आहे असे आपण मानले पाहिजे, आणि म्हणून देशाच्या लोकशाहीमध्ये जे गुण आहेत त्या गुणांची वाढ आपल्या येथील लोकशाहीत आपण केली आहे किंवा नाही याचा विचार आपल्या मनाशी आपल्याला जरूर केला पाहिजे. हा विचार विशेषतः पुढच्या पिढीने करावयाचा असला तरी जी सामर्थ्ये राष्ट्रीय जीवनामध्ये आज आली आहेत ती आपल्या शहराशहरांमधून आली आहेत का ? या गोष्टीचा विचार निदान आम्ही केला पाहिजे. भिवंडीने एका अर्थाने हिंदुस्थानच्या एकात्मतेचे चित्र बनण्याचा प्रयत्न केला आहे. हिंदू, मुसलमान आणि इतर वेगवेगळ्या धर्मांची आणि जमातींची माणसे पुष्कळ प्रमाणात येथे आहेत. वेगवेगळ्या भाषा बोलणारेही येथे पुष्कळच लोक असतील. या शहरात महाराष्ट्राच्या बाहेरचीही पुष्कळशी माणसे येत असतील. खऱ्या अर्थाने आपली ही भिवंडी भारतीय शहर बनू लागली आहे, आणि म्हणून येथील जनतेच्या परस्परांच्या संबंधांमध्ये आणि नागरिकत्वामध्ये भारतीय गुण आपण आणले पाहिजेत. आणखी केव्हा तरी पंचवीस, पन्नास वर्षांनी किंवहुना कदाचित आणखी शंभर वर्षांनी ही नगरपालिका अशाच प्रकारचा उत्सव साजरा करील त्या वेळी तिने या मधल्या काळात केलेल्या वाटचालीकडे येथील जनता मोठ्या अभिमानाने पाहत असेल अशा प्रकारचे चित्र आज माझ्या नजरेसमोर उभे राहते आहे, आणि ही वाटचाल भारतीयत्वाची उत्तम साक्ष देणारी असेल

असे माझे मन मला आज निःसंदिग्धपणे सांगते आहे.

आपल्या या नगरपालिकेच्या शतसांवत्सरिक समारंभ प्रसंगी इतर दुसरे प्रश्न आणून त्यांची मी चर्चा करू इच्छित नाही. पण एक गोष्ट मला जरूर सांगितली पाहिजे. ती म्हणजे आपल्या राष्ट्रीय जीवनातील एकते-संबंधी होय. यापूर्वी कधीही झाली नसेल इतकी आज तिच्यासंबंधी आपल्या देशात आवश्यकता निर्माण झाली आहे. आपल्या राष्ट्रीय एकतेला ज्यामुळे बाध येईल अशी कुठलीही गोष्ट आपल्या बोलण्यामध्ये किंवा आपल्या कृतीमध्ये आढळून आल्यास ती विष म्हणून बाजूला टाकण्याचा प्रयत्न आम्ही ठामपणे करतो आहो की नाही हे आम्ही आता न्याहाळून पाहिले पाहिजे. असा प्रयत्न जर आम्ही करू शकलो नाही तर राष्ट्र म्हणून तुम्हा-आम्हांला खास भविष्य नाही. पंडित नेहरूंच्या शेवटच्या दोन-तीन वर्षां-मध्ये त्यांच्याबरोबर काम करताना पुष्कळ वेळा आम्ही जरा अधिक तरुण आणि उत्साही माणसे आर्थिक क्षेत्रात हे घडले पाहिजे, ते घडले पाहिजे असा आग्रह धरीत असू. पण शेवटी त्यांचे जे निर्णय येत ते देशाच्या एकतेच्या दृष्टिकोणातून येत असत. देशाच्या एकतेचा प्रश्न हा त्यांना अद्यापिही महत्त्वाचा वाटत होता. विचार करणारी त्यांच्यासारखी जी माणसे आहेत ती प्रत्येक प्रश्नाचा अधिक व्यापक दृष्टिकोणातून विचार करतात असे मला आढळून आले. कारण एक घटना, एक निशाण, एक केन्द्रीय मध्यवर्ती सरकार, एक नागरिकत्व यातून आपले राष्ट्र बनले आहे ही गोष्ट खरी असली, तरी मनाने आम्ही राष्ट्र बनलो आहोत का हा खरा प्रश्न आहे. या देशात अनेक धर्म आहेत. पण धर्म हा ईश्वराजवळ जाण्याचा एक मार्ग आहे. तो ज्याचा त्याने स्वीकारावा. पण शेवटी धर्म आणि जाती यांच्या पलीकडेही माझ्यामध्ये विशाल असे भारतीयत्व आहे आणि ते मला साहाय्यक ठरणार आहे, माझ्या प्रगतीचे ते एक मोठे महत्त्वाचे साधन आहे, ही जाणीव, ही भावना, देशातल्या प्रत्येक नागरिकाच्या अंतःकरणा-मध्ये ज्या दिवशी खोलपर्यंत जाऊन पोहोचेल त्या दिवशी या देशाला एकही दुष्मन उरणार नाही असा माझा विश्वास आहे. हे काम लहान क्षेत्रामधूनही करता येईल. कारण या भावनेचा दैनंदिन जीवनातून परिपोष

होत असल्या कारणाने नगरपालिकांना, ग्रामपंचायतींना, जिल्हा परिषदांना करता येण्यासारखे असे हे काम आहे. तेव्हा विस्तार पावत असलेले हे भिवंडी शहर, नवीन बनणाऱ्या भारताचे एका अर्थाने प्रतीक बनू शकणारे असे शहर असल्यामुळे, या शहराच्या दैनंदिन कारभाराची ज्यांच्यावर जबाबदारी आहे ते अती भाग्यवान आहेत असे मी म्हणेन. त्यांनी अशा पद्धतीने आपले काम करावे की, कुठल्याही धर्माचा, कुठल्याही जातीचा येथील माणूस असो, त्याला मी या भिवंडीचा नागरिक आहे, याचा अभिमान वाटावा. अशा प्रकारची भावना या शहरामध्ये आपण वाढवू शकलात तर मला फार आनंद होईल.

येथे येता येता मी दोन महत्त्वाची कामे केली. दोन ठिकाणी नवीन प्राथमिक शाळांचे कोनशिला समारंभ पार पाडले. महाराष्ट्रातील शहरांमध्ये आता पाणी-पुरवठ्याची चांगली सोय होत आहे, सांडपाण्याच्या योजना अस्तित्वात येत आहेत वगैरे सर्व गोष्टी चांगल्या आहेत. पण सगळ्या शहरांमध्ये अत्यंत वाईट परिस्थितीत जर कुठली गोष्ट असेल तर ती प्राथमिक शाळा. हल्ली खेड्यातल्या शाळा सुधारू लागल्या आहेत. परंतु पंधरा हजार ते एक लाख लोकवस्ती असलेल्या शहरांमध्ये अत्यंत दुरवस्थेत असलेली कोणती गोष्ट असेल तर ती प्राथमिक शाळा ही संस्था होय. नुकतेच चालू बोलू लागलेले, स्वतंत्र भारतातले लहान मूल "भारत माझा स्वतंत्र आहे" ही अक्षरे ज्या वातावरणामध्ये वाचील त्या वातवारणाला फार महत्त्व आहे. मी असे म्हणतो याचे कारण असे की, स्वतंत्र भारताचा अर्थ त्याला आपल्या भोवतालच्या वातावरणात प्रतीत झाला पाहिजे. हे एक महत्त्वाचे काम आहे, आणि हे समजून आपण ते पार पाडले पाहिजे. मी या गोष्टीचा उल्लेख येथे अशासाठी केला की, या भिवंडी नगरपालिकेने पाच-सहा लाख रुपये खर्च करून चांगल्या प्राथमिक शाळा बांधण्याचा जो निर्णय घेतला आहे तो माझ्या मते शहाणपणाचा आणि अभिनंदनीय असा निर्णय आहे. प्राथमिक शाळांसंबंधी माझी स्वत:ची अशी कल्पना आहे की, या शाळा ठराविक अंतरावर असाव्यात. कारण चार-सहा वर्षांच्या लहान मुलांनी किती अंतर ओलांडून शाळेमध्ये

जावे हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. दोन-तीन मजल्यांची मोठी शाळा या मुलांकरिता आवश्यक आहे असे मी मानीत नाही. त्यांच्यासाठी दोनशे अडीचशेपेक्षा जास्त संख्या असणार नाही अशा अनेक शाळा गावाच्या वेगवेगळ्या भागांत असाव्यात. शाळा एकमजली असावी, तिला पुष्कळशी हवा मिळेल अशी व्यवस्था असावी, बाहेर छोटीशी बाग असावी, आणि शाळेतील मुलांना निदान न्याहारी तरी देता यावी. या गोष्टी ज्या दिवशी घडून येतील तो दिवस माझ्या मताने मोठ्या आनंदाचा ठरेल. कारण प्राथमिक शाळेचा प्रश्न हा एक अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. खेड्यातली शाळा सुधारावी म्हणून शासनाने पुष्कळ प्रयत्न केले. पण या देशातील मुख्य अडचण अशी आहे की, एका कामाकडे आपण लक्ष दिले की, नेमके त्याच वेळी दुसरे कुठले तरी काम अडून पडते. खेड्यातली शाळा सुधारावी म्हणून मोठ्या जोराचे प्रयत्न सुरू झाले तर आमची शहरांतली प्राथमिक शाळा बाजूला पडली. शहरांमध्ये आता चांगली इस्पितळे व्हावयास लागली आहेत. शहरांच्या आसमंतात आता लहान लहान कॉलेजेही होऊ लागली आहेत. या सर्व आनंदाच्या गोष्टी आहेत. पण मूळ शाळेचे जे घर आहे, त्याकडे दुर्लक्ष होता कामा नये. आपण ही गोष्ट विसरणार नाही अशी माझी खात्री आहे. भिवंडीकरांना माझे धन्यवाद आहेत. मी आता आपला जास्त वेळ घेत नाही.

आपल्याशी चार हितगुजाच्या गोष्टी मला बोलता आल्या यामुळे मला अतिशय आनंद झाला. आपल्या या भिवंडी शहराची उत्तरोत्तर अशीच भरभराट होत जावो अशी मी या प्रसंगी शुभेच्छा व्यक्त करतो आणि आपले हे शहर एक आदर्श शहर म्हणून सबंध महाराष्ट्राच्या धन्यवादाला पात्र व्हावे आणि या अभिमानात व आनंदात सहभागी होण्याची आपल्याला संधी मिळावी अशी इच्छा व्यक्त करून मी आपली रजा घेतो.

भिवंडी नगरपालिका शतसांवत्सरिक महोत्सव, भिवंडी, दि. २४-४-६६

आज आपण एवढ्या मोठ्या संख्येने येथे जमलात आणि आपल्या सर्व संस्थांच्या वतीने अतिशय प्रेमाने माझे स्वागत केलेत त्याबद्दल मी आपला अत्यंत ऋणी आहे. नगरपालिकेने मानपत्र दिले आणि अतिशय जिव्हाळ्याने माझ्यासंबंधी जी एक प्रकारची अपेक्षा व्यक्त केली ती पार पाडण्याचा माझ्या शक्तीप्रमाणे मी प्रयत्न करीन. परंतु एक वैयक्तिक उल्लेख मला प्रथमतः केला पाहिजे. इथल्या कलाकारांच्या मदतीने तयार केलेली नॅट विमानाची प्रतिकृती आपण मला भेट म्हणून दिली आहे. हे विमान आपल्या प्रेमाचे प्रतीक आहे असे मी मानतो, आणि म्हणून ते मी या विद्यालयाला माझी आठवण म्हणून देण्याचे ठरविले आहे. ज्या कलाकारांनी आपल्या विमानदलाच्या शौर्याचे प्रतीक म्हणून ही कलाकृती तयार केली त्यांना मी मनापासून धन्यवाद देतो.

यशवंत वेसिक ट्रेनिंग कॉलेज ही शिक्षणसंस्था १९५७–५८ च्या सुमारास श्री. वापूरावजी देशमुख आणि त्यांच्या मित्रांनी आपल्या जिल्ह्यात सुरू केली. तिच्या प्रगतीच्या हकीगती मी अधूनमधून ऐकत होतो. परंतु

प्रत्यक्षात या कामाचे स्वरूप किती वाढले आहे याचा मला पुरेसा अंदाज नव्हता. पण आज मी या जिल्ह्यातील अनेक शिक्षण-संस्थांच्या मुख्याध्यापकांना भेटलो, त्यांच्या विद्यार्थ्यांनी करून दाखविलेल्या कवायती पाहिल्या, आपल्या वृत्तान्तातील सगळा तपशील ऐकला, आणि मी आपल्याला सांगू इच्छितो की, हे सर्व पाहून मला अतिशय आनंद वाटला. आपण करीत असलेले हे काम छोटे नसून फार मोठे आहे. राजकारणात अनेक उलाढाली होत असतात. अधिकारपदे मिळतात आणि जातातही. साम्राज्यांमागून साम्राज्ये जातात तेथे लहान लहान अधिकारपदांची काय कथा ? पण आपण या संस्थांद्वारा जनतेच्या जीवनावर जे संस्कार करता आहात ते चिरंतन टिकणारे, नित्य वृद्धिंगत होत जाणारे असे संस्कार आहेत; आणि म्हणून मी म्हणतो की, आपण करीत असलेले हे काम कार मोठे व महत्त्वाचे आहे. आपल्या संस्थांत पाच हजार विद्यार्थी आहेत म्हणजे पाच हजार घरांपर्यंत शिक्षण जाऊन पोहोचले आहे असा त्याचा खरा अर्थ आहे. आपण करीत असलेल्या या कार्यामुळे हजारो कुटुंबांचे संबंध जीवन बदलणार आहे. त्यांना नवा दृष्टिकोण लाभणार आहे, त्यांना ज्ञानविज्ञान समजणार आहे, दुनियेमध्ये घडत असलेल्या हकिगती त्यांना कळणार आहेत, त्यांच्या मनाला नव्या विचारांचा स्पर्श होऊन ते व्यापक होत जाणार आहे. खेड्यापाड्यांतील जनतेपर्यंत शिक्षण पोचविण्यासाठी आपण हे जे साधन निर्माण केले आहे त्याबद्दल मला आपल्याला शतशः धन्यवाद दिले पाहिजेत.

हिंदुस्थान देश खूप मोठा व्हावा, समृद्ध व्हावा, बलवान व्हावा, अशा तुमच्या आमच्या अपेक्षा आहेत. या वर्धा शहराच्या परिसरामध्ये वसून हे चित्र ज्या गांधीजींनी निर्माण केले त्यांची या भूमीत आल्यानंतर मला प्रथमतः आठवण होते. मला कल्पना नव्हती की, आम्ही शेगावच्या रस्त्यावर वसलो आहोत. या परिसरात वसून गांधीजींनी जे एक नवीन रसायन तयार करण्याचा प्रयत्न केला त्यामुळे या देशाचे स्वरूप संपूर्ण बदलून गेले. या सगळ्या प्रयत्नांच्या मागे एक दृष्टी होती. हजारो वर्षांचा इतिहास असलेला हा चाळीस पंचेचाळीस कोटी लोकांचा देश गरिबीने,

गुलामगिरीने, अज्ञानाने, दबला होता. ज्या योगे त्याची मान उंच होईल, त्याची छाती रुंदावेल अशा प्रकारचे वातावरण निर्माण करणे हाच स्वातंत्र्याचा अर्थ गांधीजींना अभिप्रेत होता. इंग्रजी राज्य जावे आणि इंग्रजी साहेब जाऊन त्याच्या जागी देशी साहेब यावा यासाठी त्यांनी स्वराज्याची खटपट केली नाही. स्वराज्य आल्यानंतर लोकांची मनःप्रवृत्ती आणि परिस्थिती बदलविणे हे स्वराज्याचे खरे पहिले काम. हे काम पार पाडण्यासाठी जी साधने उपलब्ध आहेत त्यांत शिक्षणसंस्थांना फार महत्त्व आहे. या शिक्षणसंस्थांतून आम्ही कोणत्या तऱ्हेचे शिक्षण द्यावे आणि आमचे जे ध्येय आहे ते पार पाडण्यासाठी या शिक्षणाचा आम्ही किती उपयोग करून घ्यावा हे शेवटी तुमच्या आमच्या कर्तबगारीवर आणि शहाणपणावर अवलंबून आहे. परंतु अशा प्रकारची ही साधने निर्माण करणे यापेक्षा अधिक महत्त्वाची दुसरी गोष्ट नाही.

हिंदुस्थान म्हणजे केवळ हिमालय, सह्याद्री किंवा आपणांस माहीत असलेली पाच-पंचवीस खेडी नव्हेत. हिंदुस्थान म्हणजे या देशातील नद्यांच्या काठावर कशीबशी कालक्रमणा करणारे, या देशाच्या माळरानात, डोंगरकपारीत उपेक्षित जीवन जगणारे, या देशाच्या विस्तीर्ण पठारावर जीवन-संग्रामात हतबल झालेले असे जे लक्षावधी, कोट्यवधी लोक आहेत ते लोक म्हणजे हिंदुस्थान. या सर्वांच्या मनात ज्या यातना आहेत, दुःखे आहेत, चिंता आहेत, त्या हिंदुस्थानच्या चिंता असल्या पाहिजेत. पंडित जवाहरलालजी नेहमी म्हणत असत की, हिंदुस्थानची पंचेचाळीस कोटी जनता म्हणजे माझ्यापुढचे पंचेचाळीस कोटी प्रश्न आहेत. किती सार्थ आहेत हे शब्द! जो जो माणूस हिंदुस्थानचा नागरिक आहे, त्याच्या ज्या चिंता आणि दुःखे आहेत, त्याच्या ज्या प्रेरणा आणि आकांक्षा आहेत, या सगळ्यांची चिंता हिंदुस्थानने वाहिली पाहिजे असे मी मानतो. परंतु या माणसाच्या मनापर्यंत पोहोचावयाचे कसे हा महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण ते दबलेले मन आहे. शिक्षणाच्या अभावी, नवीन दुनियेत काय चालले आहे याचा त्याला अंदाज नाही. अशा या दबलेल्या मनामध्ये एक नवे सामर्थ्य निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम चालू आहे.

स्वराज्याच्या प्राप्तीनंतर जे काम आम्ही या देशामध्ये करण्याचा प्रयत्न करतो आहोत त्याचे स्वरूप हे असे आहे. त्या कामाचा, आपण करीत असलेले काम हा छोटासा हिस्सा आहे, आणि म्हणून ज्यांनी हे काम उभे करण्याकरिता प्रयत्न केले त्यांना माझे धन्यवाद आहेत. आपण उभे केलेले हे काम कायम टिकणारे आहे. ही ज्ञानाची ज्योत, शिक्षणाची ज्योत, विचारांची ज्योत, कल्पनांची ज्योत, ध्येयवादाची ज्योत एकदा प्रज्वलित होऊन वाढली आणि कायम स्थिरावली की, हिंदुस्थानचे जीवन सुधारले आणि स्थिरावले असे तुम्हा-आम्हाला म्हणता येईल. म्हणून आपण हे जे काम करीत आहात त्याच्या पाठीमागची ही ध्येयदृष्टी आपण कायम ठेवा.

या इमारतीच्या उद्घाटन-समारंभाकरिता आपण मला बोलाविलेत त्याबद्दल मला आनंद वाटतो. चार-पाच वर्षांपूर्वी या कॉलेजच्या उद्घाटनाच्या निमित्ताने मी येथे आलो होतो. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, नुसत्या इमारती म्हणजे शिक्षणसंस्था नव्हेत. त्या संस्थांमध्ये काम करणारी जी माणसे आहेत, त्यांना प्रेरणा देणारे जे विचार आहेत, जे ध्येयवाद आहेत, ती माणसे, ते विचार, ते ध्येयवाद म्हणजेच या संस्था. ते ध्येयवाद, ते विचार, त्या कल्पना आपण जिवंत ठेवल्या पाहिजेत, आपल्या मनात नित्य स्मरल्या पाहिजेत. परंतु हे ध्येयवाद, विचार आणि कल्पना आपल्या मनापर्यंत पोहोचल्या म्हणजे आपले काम संपले असे नाही. विचारांनी आम्ही विद्यार्थ्यांच्या मनापर्यंत खरोखरी किती पोहोचलो आहोत हेही पाहण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. या शिक्षण-संस्थांत जे शिक्षक असतील, जे प्रमुख असतील ते शेवटी ध्येयवादाच्या दृष्टीने मुलांच्या मनापर्यंत कोठपर्यंत पोहोचतात याला फार महत्त्व आहे. मी आशा करतो की, या ग्राम-शिक्षण-संस्थांद्वारे आपण खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचला आहात. पण ही ध्येयवादाची दृष्टी आपण कायम ठेवा. या संस्थांच्या मागचा हा ध्येयवाद आपण दृष्टीआड होऊ देऊ नका. कारण या ध्येयवादाची दृष्टी जोपर्यंत कायम आहे तोपर्यंतच या संस्था खऱ्या अर्थाने जिवंत राहतील, आणि म्हणून या ध्येयवादाकडे मी आपले लक्ष

प्रामुख्याने वेधू इच्छितो. या पद्धतीने आपण काम करीत राहिलात तर या संस्था सुरू केल्याचे श्रेय खऱ्या अर्थाने आपणांस मिळेल. या कॉलेजच्या इमारतीचे उद्‌घाटन करताना मी मनात प्रार्थना करतो की, या विद्यालयामध्ये शिक्षण घेण्यासाठी जे विद्यार्थी येतील त्यांच्या मनात देश-प्रीती कायम राहो, ज्ञानाची सेवा करण्याची बुद्धी त्यांच्या मनात सदैव राहो, आणि हिंदुस्थानचा ध्वज जो उंच फडकतो आहे तो तसाच उंच फडकत राहावा म्हणून आपल्या मनाने, आपल्या अंगच्या कर्तृत्वाने ही सगळी माणसे कार्यरत राहोत. माझी खात्री आहे की, माझी ही प्रार्थना फुकट जाणार नाही. जय हिंद !

यशवंत बेसिक ट्रेनिंग कॉलेजच्या इमारतीचा उद्‌घाटन समारंभ,
वर्धा, दि. २६-१२-६५

१५ माध्यमिक शिक्षणाचे महत्त्व

मी आज आपला फारसा वेळ घेणार नसून माध्यमिक शिक्षणासंबंधीचे माझे विचार मी आपणांस थोडक्यात सांगणार आहे. श्री. मधुकरराव चौधरी यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात अनेक विषयांना स्पर्श केला आहे. या सर्वच प्रश्नांवर माझी म्हणून काही मते आहेत असा माझा आग्रह नाही, आणि ज्या प्रश्नांबाबत माझी ठाम मते आहेत त्या सर्वच प्रश्नांसंबंधी वेळेच्या अभावी मी आपल्यापुढे बोलूही शकणार नाही. परंतु आज ज्याचे उद्घाटन होत आहे त्या आपल्या माध्यमिक शिक्षणमंडळाकडे, शिक्षण-क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ज्ञ अशा अधिकारी सेवकांचे एक पार्लमेंट, एक संसद म्हणून मी पाहू इच्छितो. कारण संसदेप्रमाणेच या मंडळावर काम करणाऱ्या तज्ज्ञांमध्ये आपल्या विचारांची, आपल्या अनुभवांची देवाणघेवाण होईल, प्रसंगी तत्त्वांचे वा विचारांचे संघर्षही निर्माण होतील, परंतु या विचारांच्या मंथनातून आणि संघर्षातून शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या मंडळींना मार्गदर्शक अशी तत्त्वे तयार होतील, निर्णय घेतले जातील, आणि शिक्षणाचे हे काम उत्तम प्रकारे वाढत राहील या अपेक्षेने मी

आपल्या या मंडळाकडे पाहात आहे.

शिक्षणविषयक प्रश्न बदलत राहतात, आहेत त्या प्रश्नांचे महत्त्व कमी-जास्त होते, हे अगदी स्वाभाविक आहे. कारण शिक्षण हा विषयच सर्व-स्पर्शी विषय आहे. समाजाच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांतील अनेकविध जिव्हाळ्याच्या प्रश्नांशी निगडित असलेला असा हा विषय असल्यामुळे त्या त्या क्षेत्रातले प्रश्न आणि त्यांचे प्राधान्य ही जसजशी बदलत जातील तसतशी या प्रश्नांवरील मतेही बदलत जाणार, हे अगदी उघड आहे. तेव्हा या बदलत्या मतांचा मागोवा घेणे हे या मंडळाचे एक काम राहावे अशी माझी अपेक्षा आहे.

खरे म्हणजे या मंडळाची निर्मिती हे महाराष्ट्र राज्यातील एकात्मतेच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल आहे यात शंकाच नाही. पण तेवढेच त्याचे महत्त्व आहे असे मी मानीत नाही. अर्थात शिक्षणक्षेत्रात हे घडून येणे किती अवघड आहे याची मला जाणीव आहे. कारण विधिमंडळामध्ये किंवा राज्यकारभारामध्ये एकात्मता साधणे एका अर्थाने सोपे आहे, परंतु निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळ्या शिक्षणपद्धती अस्तित्वात असताना या क्षेत्रात एकात्मता साधणे हे फार अवघड काम आहे. पण ही एकात्मता एकदा घडून आली की, लोकांच्या जीवनात हळूहळू फार महत्त्वाचे बदल होत जातील. उदाहरणार्थ, एकाच पद्धतीने शिकणारी लक्षावधी मुले एका विशिष्ट वातावरणात वाढू लागली की, कळत वा नकळत त्यांच्यामध्ये एक एकारचा बंधुभाव तयार होईल, एक प्रकारची एकात्मता तयार होईल. महाराष्ट्राला अशा प्रकारे एकत्र बांधून ठेवणारी ही एकात्मता फार महत्त्वाची गोष्ट ठरेल यात शंका नाही. १९६०-६१ च्या सुमारास आम्ही या प्रश्नाची चर्चा करीत होतो त्या वेळी त्यातल्या गुंतागुंतीची आणि अडचणींची मला थोडीशी कल्पना होती, आणि म्हणून मधुकरराव आणि वसंतरावजींनी हा प्रश्न शेवटी हाताळला त्याबद्दल त्यांना, आणि या बाबतीत विदर्भ व मराठवाड्यातील मंडळींनी त्यांना जे साहाय्य केले त्याबद्दल त्या मंडळींना खरोखरीच मला धन्यवाद द्यावेसे वाटतात.

माध्यमिक शिक्षणमंडळ स्थापन करून आपण एक फार मोठे पाऊल

टाकले आहे यात शंका नाही. परंतु हा त्यातला फक्त एक भाग झाला. कारण या माध्यमिक शिक्षणमंडळाला शिक्षणविषयक जी कामे पार पाडावयाची आहेत त्या कामांचे स्वरूप अतिशय महत्त्वाचे आहे. आपण या दृष्टीने या मंडळाकडे पाहिले पाहिजे. माझ्या मताने आताच्या परिस्थितीत माध्यमिक शिक्षणाचेच महत्त्व अधिक वाढले आहे. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी मी जेव्हा विद्यार्थी होतो तेव्हाचे मला आठवते. प्राथमिक शिक्षण पुरे करणे हे ग्रामीण भागात त्या काळी पुरेसे शिक्षण मानले जात असे. मी प्राथमिक शाळेत जात होतो तेव्हा फार बुद्धिमान मुले सोडली तर बहुतेक मुलांच्या बाबतीत प्रथम प्राथमिक शिक्षण पुरे करा मग पुढे शिकावयाचे की नाही याचा विचार करता येईल असे सांगितले जात असे. पुढील शिक्षण मिळो अगर न मिळो, प्राथमिक शिक्षण पुरे झालेले असले म्हणजे निदान तलाठी किंवा प्राथमिक शिक्षक होणे शक्य होई. परंतु आज अशी परिस्थिती राहिलेली नाही. प्राथमिक शिक्षण पुरेसे आहे असे आज कोणी मानीत नाही. कमीत कमी माध्यमिक शिक्षण पुरे झालेच पाहिजे अशी आज परिस्थिती निर्माण झालेली आहे. म्हणजे प्राथमिक शाळेत एकदा मुलगा घातला की, तो शेवटी माध्यमिक शिक्षण पुरे करूनच बाहेर पडणार आहे हे गृहीत कृत्य आहे. हे सर्व नवीन आहे. परिस्थितीमध्ये असा हा बदल झालेला असल्यामुळे माध्यमिक शिक्षणाचे महत्त्व आज फार वाढलेले आहे. प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण आणि उच्च शिक्षण या शिक्षणाच्या एकापुढील एक पायऱ्या असल्यामुळे, त्यांच्या एकसूत्रीपणाचा (integration) प्रश्न आज फार महत्त्वाचा झाला आहे. प्राथमिक शिक्षण ज्या पद्धतीचे घडेल आणि प्राथमिक शिक्षणाच्या कालात ज्या गुणावगुणांची वाढ होईल, त्या सर्वांचे माध्यमिक शिक्षणावर परिणाम होणार आहेत. तेव्हा माध्यमिक शिक्षण चांगले व्हावे म्हणून प्राथमिक शिक्षण कशा तऱ्हेचे असले पाहिजे याचा आज विचार झाला पाहिजे, आणि या दोन्हींचा उच्च शिक्षणावर काय परिणाम घडेल याचाही आपणास विचार करावा लागणार आहे. खरे म्हणजे शिक्षणक्षेत्रातल्या या निरनिराळ्या स्तरांच्या एकसूत्रीकरणासंबंधी ज्या विचारप्रणाली आहेत त्यांचा माध्यमिक शिक्षणाच्या तज्ज्ञांनी अधिक

खोलवर विचार केला पाहिजे. आज शिक्षणाचा विस्तार झाल्यामुळे जे निरनिराळे पुष्कळच महत्त्वाचे प्रश्न निर्माण झाले आहेत त्यांत उच्च शिक्षणाचाही प्रश्न आहे. माझी स्वत:ची तर अशी भावना आहे की, उच्च शिक्षणही सर्वांना खुले झाले पाहिजे. परंतु नुसत्या आग्रहाने ही भावना किंवा कल्पना मूर्तस्वरूपात येणार नाही. त्यासाठी जी साधने लागतील, जे आर्थिक बळ उभे करावे लागेल त्याचा पूर्ण विचार झाला पाहिजे, आणि हे-सर्व करताना या सतत वाढत जाणाऱ्या गोष्टी आहेत हेही आपण लक्षात ठेवले पाहिजे.

आज मात्र यातून एकच अर्थ निघतो. तो म्हणजे पुष्कळशा मुलांना आपले शिक्षण माध्यमिक शिक्षणानंतर संपवावे लागेल. काही काळ तरी ही परिस्थिती अशीच राहणार आहे. लांबच्या पल्ल्यातून पाहिले तरी शंभरच्या शंभर टक्के मुले उच्च शिक्षणापर्यंत पोहोचू शकणारही नाहीत. याचा अर्थ विद्यार्थ्यांची बरीचशी मोठी संख्या माध्यमिक शिक्षणापर्यंतच थांबणार आहे. थोडक्यात म्हणजे काही काळ तरी माध्यमिक शिक्षण हेच बहुसंख्य मुलांच्या जीवनातील अंतिम शिक्षण असून त्यांच्यापुरते बोलावयाचे झाल्यास हे शिक्षण म्हणजे त्यांच्या भावी जीवनाची खूपच मोठी शिदोरी ठरणार आहे. तेव्हा प्रश्न असा निर्माण होतो की, हे शिक्षण पुरे होत असताना जीवनामध्ये प्रवेश करण्यासाठी लागणारी साधनसामग्री विद्यार्थ्यांच्या पदरात पडते आहे किंवा नाही? हे सर्व पाहण्याची जबाबदारी अर्थातच शासनावर आहे आणि पर्यायाने ती आता या माध्यमिक शिक्षणमंडळावर पडणार आहे.

नोकरीचाकरी मिळविण्यासाठी केवळ शिक्षण पुरे झाल्याचे प्रमाणपत्र आता फारसे उपयोगी पडत नाही. तेव्हा याबाबतीत विद्यार्थ्यांना उपयोगी पडतील अशा कोणत्या गोष्टी करता येणे शक्य आहे याचा आता विचार झाला पाहिजे. शिक्षणकाळात अशा प्रकारची शक्ती विद्यार्थ्यांच्या जीवनात आणण्याचा आम्ही जास्तीत जास्त प्रयत्न केला आहे अशी जाणीव विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबली पाहिजे. प्रत्यक्षात याचा किती उपयोग होईल आणि किती होणार नाही हे सांगणे अवघड आहे. परंतु आज माध्यमिक

शिक्षणामध्ये अनेक प्रकारे विविधता आणण्याची अत्यंत जरुरी आहे हे निश्चित. माध्यमिक शिक्षणात ही विविधता आपण आणली नाही तर माध्यमिक शिक्षणाच्या उपयुक्ततेसंबंधी लोकांच्या मनात संभ्रम निर्माण होऊन माध्यमिक शिक्षण ही एक डोकेदुखी निर्माण करणारी गोष्ट ठरेल. मला कल्पना आहे की, मी बोललो तितके हे सोपे काम नाही. त्यासाठी पुष्कळच प्रयत्न करावे लागतील, योजना कराव्या लागतील आणि या योजना अमलात आणण्यासाठी एक मोठी यंत्रणा उभी करावी लागेल. माध्यमिक शिक्षणाच्या क्षेत्रात आज यासारख्या फार महत्त्वाच्या अशा अनेक संस्था निर्माण झाल्या आहेत.

उच्च शिक्षणाचेही द्वार आम्ही सर्वांना खुले करावे असे मघाशी मी म्हणालो. पण शेवटी याचा अर्थ काय ? याचा अर्थ मी असा मानतो की, शक्य तो सर्वांना उच्च शिक्षणाची संधी मिळावीच. परंतु त्याहीपेक्षा समाजामध्ये पहिल्या प्रतीच्या माणसांची वाढ व्हावी, गुणी माणसांची वाढ व्हावी, ज्ञानाच्या विविध क्षेत्रांत पराक्रम करण्याची संधी त्यांना मिळावी हाही अर्थ त्यात अभिप्रेत आहे. त्यायोगे अशा मंडळींना वैयक्तिक पराक्रम तर करता येईलच, परंतु त्यातून देशाचेही सामर्थ्य वाढेल अशी यापाठीमागची भावना आहे. तेव्हा उच्च शिक्षणासाठी लागणाऱ्या लायकीची, गुणांची मंडळी तयार करण्याचे काम साहजिकच माध्यमिक शिक्षणाला करावे लागेल.

आता उच्च शिक्षणाचेही स्वरूप बदलत चालले आहे. त्यासंबंधीच्या आमच्या अपेक्षाही बदलत चालल्या आहेत. त्यामुळे उच्च शिक्षणाचा पूर्वीचा जो सांगाडा होता तो सारखा बदलत राहणार आहे. मोठमोठ्या शहरांपुरती मर्यादित अशी जी विद्यापीठांसंबंधी पूर्वी कल्पना होती तीही आता बदलत चालली आहे. ग्रामीण विद्यापीठांची कल्पना आता रुजत चालली आहे. हिंदुस्थानच्या परिस्थितीत हा फार मोठा बदल घडून येत आहे. या गोष्टी होणारच, कारण त्या अपरिहार्य आहेत. पण नव्या परिस्थितीतून जात असताना हे सर्व योग्य मार्गाने आणि योग्य पद्धतीने घडते आहे किंवा नाही हे पाहणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

माध्यमिक शिक्षणातील विविधतेचा जसा आपण विचार केला पाहिजे त्याचप्रमाणे उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला उच्च शिक्षणासाठी लागणारी गुणवत्ता आपण प्राप्त करून दिली आहे किंवा नाही हेही आपल्याला पाहिले पाहिजे. त्याचबरोबर जीवनामध्ये स्वतःला मदत करण्याचे सामर्थ्य आपण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करतो आहोत किंवा नाही हेही आपण पाहिले पाहिजे. माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीत अशा अनेक गोष्टींचा विचार करण्याची आज गरज निर्माण झाली आहे.

पूर्वी कधीही नव्हते असे अनन्यसाधारण महत्त्व आज माध्यमिक शिक्षणाला आलेले असल्यामुळे एक प्रकारचा गोंधळ निर्माण होण्याचा संभव आहे. तेव्हा यातून काही मार्गदर्शन करता आले, काही सूचना करता आल्या तर त्याचा परिणाम शिक्षण सुधारण्याकडे होईल. या दृष्टीने आपण हे माध्यमिक शिक्षणमंडळ स्थापन करीत आहात ही फार चांगली गोष्ट आहे. परंतु त्याचे काम फार अवघड काम आहे. महाराष्ट्राच्या भावी पिढीच्या संपूर्ण सांस्कृतिक जीवनाची जबाबदारी या मंडळावर आहे. हे मंडळ स्थापन करून आपण आज ज्या चांगल्या कामाला सुरुवात करीत आहात ते काम यशस्वी व्हावे, आणि लोकजीवनामध्ये सामर्थ्य निर्माण करण्याचे कार्य या मंडळाकडून उत्तम प्रकारे पार पडावे अशी सदिच्छा व्यक्त करून औपचारिक रीत्या आपल्या माध्यमिक शिक्षणमंडळाचे उद्घाटन झाल्याचे मी जाहीर करतो.

माध्यमिक शिक्षण मंडळाचे उद्घाटन, पुणे, दि. ७-३-६६

१६ लोकभाषा हीच ज्ञानभाषा

कोपरगावला मी बऱ्याच वर्षांनंतर आलो आहे. निवडणुकीच्या निमित्ताने झालेली भेट ही मी भेट समजत नाही. ज्या भेटीमध्ये एक बाजू आपल्यापासून दूर राहते तिला भेट कशी म्हणणार? पण आज मी येथे आलो असताना माझ्या बाजूला जय आणि विजय दोन्ही बसलेले पाहून मला आनंद वाटतो आणि म्हणून मला वाटते की, बऱ्याच वर्षांनंतर खऱ्या अर्थाने आज मी कोपरगावला आलो आहे.

आपल्या या शिक्षणसंस्थेच्या कामाची मला पूर्वीपासून माहिती आहे. या शिक्षणसंस्थेतर्फे आता आपण येथे वाणिज्य आणि कला यांचे विद्यालय काढता आहात, आणि या विद्यालयाच्या इमारतीच्या बांधकामाला आज आपण सुरुवात करीत आहात. गेल्या दोन दिवसांमध्ये नगर जिल्ह्यातील बऱ्याचशा शिक्षण संस्थांशी माझा संबंध आला. आज सकाळी एका विद्यालयाच्या उद्घाटनाकरिता मी गेलो होतो. काल रात्री नेवासे येथे दुसऱ्या एका विद्यालयाचा संकल्प सोडून आलो, आणि येथून आणखी एका विद्यालयाच्या पायाभरणी समारंभास मला जावयाचे आहे. सहकाराचे

वातावरण आपल्या जिल्ह्यामध्ये आहेच. त्याजबरोबर शिक्षणाचेही वातावरण आता आपल्या जिल्ह्यामध्ये वाढीस लागले आहे, ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. आपण या क्षेत्रात करीत असलेले प्रयत्न अत्यंत महत्त्वाचे आहेत यात शंका नाही. कारण माणसाचे मन शिक्षणाच्या संस्काराने अधिक संपन्न केल्य शिवाय समाज खऱ्या अर्थाने समाज बनत नाही. शेती सुधारली, हाती थोडाफार पैसा आला, नवीन बागायती शेतीने फुललेले शिवार दिसले, पण त्या शिवाराच्या पाठीमागे असणारे मन जर असंस्कृत राहिले तर त्या शिवाराचा काही उपयोग नाही. आपल्या या हिंदुस्थानातसुद्धा पूर्वी सोन्याचा धूर निघत होता असे म्हणतात. मला माहीत नाही. तो इतिहासकारांचा प्रश्न आहे. निघालाही असेल कदाचित असा धूर. पण आमच्या आठवणीमध्ये तरी हिंदुस्थानच्या जनतेचा सोन्याशी फारसा संबंध आलेला नाही. थोड्या फार लोकांजवळ असेल सोने या देशात. पण आम जनतेचा त्याला फारसा स्पर्श झालेला नाही. या देशातला फार मोठा समाज हजारो वर्षे ज्ञानापासून वंचित राहिल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली. माझ्या मते ह्या परिस्थितीचे खरे कारण हेच आहे. आम्ही इंग्रजी सत्तेशी लढलो, झगडलो. पण इंग्रजी सत्तेने एक फार चांगली गोष्ट केली. तिने आपल्या देशाला मुक्त (लिबरल) शिक्षण देण्याचा उपक्रम सुरू केला. खऱ्या अर्थाने शिक्षणाचा याप्रमाणे आमच्या समाजात, आमच्या देशात प्रवेश झाला, आणि शिक्षणाची द्वारे तत्त्वतः तरी, ज्यांना शक्य असेल किंवा इच्छा असेल त्या सर्वांना मोकळी झाली. पण केवळ शिक्षणाचीच द्वारे मोकळी झाली असे नव्हे तर नव्या विचारांची द्वारेही या शिक्षणामुळे मोकळी झाली, आणि यातूनच नाही म्हटले तरी स्वातंत्र्याच्या चळवळीचा श्रीगणेशा लिहिला गेला हे आपल्याला कबूल करावे लागेल.

यानंतर अनेक घटना घडल्या. आता तर स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षण क्षेत्रात आम्हाला अधिक प्रयत्न करण्यांची जरुरी आहे. शिक्षणाचे हे लोण आता वेगवेगळ्या संस्थांमार्फत ग्रामीण भागापर्यंत बऱ्याच मोठ्या प्रमाणावर पोहोचविण्याचा प्रयत्न चालू आहे. वाणिज्य, कला, विज्ञान,

शेती, स्थापत्य यांसारख्या अनेकविध शास्त्रांचा अभ्यास करण्याची सोय सर्वांना उपलब्ध व्हावी म्हणून आपण आता महाविद्यालये काढतो आहोत. पण काही मंडळींचा असा आक्षेप आहे की, फार महाविद्यालये काढल्याने गुणवत्ता कमी होते, आणि पुष्कळ मुले शिकून शहाणी झाली आणि त्यांना नोकऱ्या मिळाल्या नाहीत म्हणजे सुशिक्षित बेकारांचा प्रश्न तयार होतो. त्यांना यात मोठा धोका दिसतो. पण धोका कोणत्या कामात नाही? आणि यात धोका असलाच तर सुशिक्षित बेकार आणि अशिक्षित बेकार यांमधला कोठला धोका अधिक मोठा? शिक्षणाने देशात बेकारीच निर्माण होणार असेल तर देशामध्ये सुशिक्षित बेकार असणे अधिक चांगले असे मी म्हणेन. कारण सुशिक्षित बेकार निदान विचार तरी करू शकेल. आपण बेकार का राहिलो याची तो कारणपरंपरा शोधील आणि ती दूर करण्याचा तो प्रयत्न करील. तेव्हा शिक्षणाने सुशिक्षित बेकारांचा धोका निर्माण होईल या शंकेत काही अर्थ नाही. आज गरज कशाची असेल तर ती विचार लोकांपर्यंत जाऊन पोहोचण्याची आहे. सगळ्या शास्त्रांचा अभ्यास करणारी माणसे आज समाजात निर्माण झाली पाहिजेत. ती कोणत्या पद्धतीने निर्माण करता येतील, त्यांची गुणवत्ता कशा प्रकारे वाढविता येईल हे पाहण्याचे काम विश्वविद्यालयांचे आहे आणि त्या दृष्टीने त्यांचा प्रयत्न चालू आहे. मला आशा आहे की, या सर्व गोष्टींचा त्यांच्याकडून अधिक गंभीरपणे विचार होईल.

उच्च शिक्षणाच्या प्रश्नामधून आज अनेक प्रश्न आपल्या देशामध्ये निर्माण झाले आहेत. त्यातल्याच एका प्रश्नाची हल्ली बरीच चर्चा सुरू आहे. उच्च शिक्षण हे मातृभाषेतून असावे की नसावे? असल्यास त्याची सुरुवात कोठून व्हावी? माझी स्वतःची या प्रश्नासंबंधी काही ठाम मते आहेत. मी तीन भाषांचा, ज्याला थ्री लँग्वेज फार्म्युला म्हणतात त्याचा पुरस्कर्ता आहे. मातृभाषा, मातृभाषेच्या जोडीला हिंदी आणि हिंदीच्या जोडीला काही काळ तरी इंग्रजी हिंदुस्थानमध्ये राहणे आवश्यक आहे असे माझे मत आहे. मी इंग्रजी हटावेवाला नसून हिंदी पाहिजे म्हणणारा आहे. पण त्याचबरोबर मी हेही सांगू इच्छितो की, आमच्या देशातले उच्च

शिक्षण हे मातृभाषेतून झाले पाहिजे. त्याशिवाय दुसरा मार्ग नाही असे माझे स्पष्ट मत आहे. त्याचे कारण सांगतो मी आपल्याला. मी हे जे बोलतो आहे ते निव्वळ भाषेच्या अभिमानाने बोलत नाही. मी भाषेवर प्रेम करणारा मनुष्य आहे. पण मी भाषेचा संकुचित अर्थाने अभिमानी राहिलेलो नाही, हेही तितकेच खरे आहे. भाषा ही माणसांना एकत्र आणण्याचे साधन बनण्याऐवजी त्यांच्यात ती दुरावा निर्माण करील की काय अशी आज आपल्याला भीती वाटू लागली आहे. पण याचा आणि शिक्षणाच्या माध्यमाचा काहीही संबंध नाही. मी आपणाला असे विचारू इच्छितो की, शिक्षण आम्हाला समाजाच्या खालच्या थरापर्यंत पोहोचवावयाचे असेल तर ते परक्या भाषेतून तेथपर्यंत जाणार कसे? दीडशे वर्षे इंग्रजांचे या देशावर राज्य होते. ते गेल्यानंतरही आम्ही शिक्षण इंग्रजीतून देण्याचा प्रयत्न करतो आहोत. पण शेवटी आज किती लोकांना इंग्रजी येते? म्हणजे नवा विषय समजण्याइतके, वर्तमानपत्रातील मथळे वाचण्यापुरते नव्हे. नव्या विषयाचा अभ्यास करून त्या ज्ञानाचा वापर करण्याइतके इंग्रजी किती लोकांना येते? शेकडा चार टक्के लोकांनाही येत नाही. म्हणजे या बाबतीत देशातले शहाण्णव टक्के लोक या देशामध्ये ज्ञानाला परके आहेत, असा याचा अर्थ होतो. हे काय शास्त्र आहे? आम्ही म्हणतो की, या देशामध्ये आम्हाला लोकशाहीची वाढ करावयाची आहे, आम्हाला सामान्य माणसाला मोठे करावयाचे आहे, पण अशाने सामान्य माणूस मोठा होणार कसा? त्याची सुरुवातीची सगळी शक्ती जर परकी भाषा शिकण्यात निघून गेली तर तो पुढे काय करणार आहे? याचा खरोखरी अधिक खोलवर विचार झाला पाहिजे.

उच्च शिक्षण मातृभाषेतूनच दिले पाहिजे याला एक दुसरेही कारण आहे. ते काहीसे ऐतिहासिक स्वरूपाचे आहे. क्रांती होऊन, सामाजिक उलथापालथ करून एक प्रकारचे नवीन तऱ्हेचे जीवन बनले असे फारसे हिंदुस्थानात कधी घडलेले नाही. याचे खरे कारण असे आहे की, सामान्य माणसापर्यंत महत्त्वाचा विचार किंवा ज्ञान आम्ही कधी जाऊच दिले नाही, ही माझी मुख्य तक्रार आहे. हा मुद्दा थोडक्यात सांगावयाचा झाला

तर मी असे म्हणेन की, ज्ञानभाषा आणि लोकभाषा एक झाल्याशिवाय समाजाचे जीवन समर्थ होत नाही, उन्नत होत नाही, विकसित होत नाही. ज्ञानभाषा एक आणि लोकभाषा दुसरी अशी हिंदुस्थानच्या जीवनाची परंपरागत कहाणी आहे. ऋषिमुनींची आणि पंडितांची ज्ञान-भाषा होती संस्कृत. कारण ती देवभाषा होती आणि जनसामान्यांची भाषा होती प्राकृत. हे फार पूर्वी. पण नंतरही तेच झाले. मुसलमानी अमलात ज्ञानभाषा उर्दू, फारसी, अरबी जी काही असेल ती झाली. त्यानंतर इंग्रज आले आणि या देशातील ज्ञानभाषा इंग्रजी बनली. लोकभाषा अशा तऱ्हेने दुर्लक्षित राहिल्यावर लोक शहाणे होणार तरी कसे ? आता स्वातंत्र्यानंतर जेव्हा जनजीवन आम्हाला विकसित करावयाचे आहे असे आम्ही म्हणतो, तेव्हाही लोकभाषा ज्ञानभाषा होणार नसेल तर ज्ञानभाषा हा ज्यांचा मक्ता होता त्यांचेच संस्कार आणि त्यांचेच साम्राज्य सांस्कृतिक जीवनामध्ये निर्माण होईल. ते होऊ देता कामा नये असे माझे स्वतःचे खंबीर मत आहे. काही लोक विचारतात की, तुम्ही कोर्टात जाल तेव्हा मराठीत बोलणार काय ? पण मी म्हणतो कोर्टात मराठी बोलले तर बिघडले कुठे ? राज्याची भाषा जर मराठी झाली आहे, मल्याळम् झाली आहे, बंगाली झाली आहे, तर मग कोर्ट काय राज्याच्या बाहेर आहे ? पण मी हे जे बोलतो आहे ते मराठीच्या अभिमानाने बोलत नाही. माझा जो मुद्दा आहे तो फार महत्त्वाचा मुद्दा आहे. उच्च शिक्षणा-संबंधाने आम्ही जेव्हा बोलतो आहोत तेव्हा तो आम्हाला एकदा अगदी स्पष्ट केला पाहिजे.

आमच्या देशामध्ये भाषेच्या क्षेत्रात पहिली क्रान्ती करण्याचा प्रयत्न ज्या ज्ञानेश्वरांनी केला त्यांच्या नेवाश्याला काल रात्रीच मी गेलो होतो आणि त्यानंतर आज मी येथे बोलतो आहे, म्हणून एक गोष्ट मला स्पष्ट केली पाहिजे. नेवाश्याला ज्ञानेश्वरांच्या नावाने विद्यालय काढण्याचा संकल्प सर्वांनी केला आहे. सगळीकडे विद्यालये निघून राहिली आहेत, पण महाराष्ट्राचे खरे विद्यापीठ नेवाश्याला आहे. संस्कृतमधल्या ज्ञानाचा मक्ता सगळी विद्वान मंडळी घेऊन बसली होती. त्या विद्वानांच्या तावडीतून

ज्ञानाला सोडवून मराठीत ज्ञानाचा पहिला वृक्ष ज्ञानेश्वरांनी नेवाश्याला लावला. महाराष्ट्राच्या इतिहासात लोकभाषेने ज्ञानभाषेचे पहिले पाऊल तेथे टाकले, आणि म्हणून नेवाश्यालाही एक आधुनिक ज्ञानदीप आता उभा राहतो आहे याबद्दल आपणा सर्वांना आनंद वाटला पाहिजे.

उच्च शिक्षणाच्या माध्यमाबाबत मी आपल्याला एक प्रश्न विचारू इच्छितो. मराठी भाषेतून उच्च शिक्षण देता येणार नाही असे आपण का म्हणता? आम्ही मोठ्या अभिमानाने सांगत असतो की, 'अमृतातेही पैजा जिंके' अशी प्रतिज्ञा करून रसिकांचे मन वळवीत ही भाषा ज्ञानाच्या दिशेने पावलामागून पावले टाकीत चालली आहे. मग तिला अलीकडचे काही समजणार नाही हे कसे? खरे म्हणजे भाषा ही विचाराच्या पाठीमागे येत असते. भाषेचे खरे सामर्थ्य विचार व्यक्त करण्यात आहे. संशोधनाच्या क्षेत्रात नवे विचार आणण्याचा प्रयत्न करणारी माणसे जसजशी निर्माण होतील, वाढतील, तसतशी भाषा वाढत जाईल. नवे अनुभव आले, भाषा वाढली. नवे काम वाढले, भाषा वाढली. पहिल्याने मोटारीची कल्पना आली, मग नंतर मोटार आली आणि त्या मोटारीबरोबर किती तरी नवे शब्द आले, एक नवी परिभाषा आली. साखर कारखान्यांबरोबर किती तरी नव्या कल्पना आल्या, नवीन जीवन आले. नवा विचार आला की भाषा नवे रंगरूप घेऊन आपल्यापाशी येते आणि तो विचार व्यक्त करण्याच्या प्रयत्नात ती स्वतःच संपन्न होऊन जाते. भाषेचे स्वरूप हे असे आहे. तेव्हा भाषा ही सतत वाढत राहील, याबद्दल शंका नको. आम्ही जर ठरविले की, रसायन शास्त्र हे मराठीतून शिकवावयाचे तर त्यात काय अवघड आहे? त्यासाठी प्रयत्न केला पाहिजे हे मात्र खरे आहे. पण निव्वळ परक्या लोकांच्या ग्रंथांचे मराठीत भाषांतर करून मराठी भाषा वाढेल असे नाही. माझ्या मते भाषांतरी भाषा फारशी चांगली नसते. जमिनीतले पाणी, जमिनीतली सत्त्वे आणि जमिनीत इतर जी काही शक्ती असेल ती घेऊन पिऊन जमिनीतून ऊस जसा वाढत जातो तशी भाषा ही जिवंत असली पाहिजे. मराठी भाषेने मराठी मनाचा कस घेऊनच वाढले पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने मराठी भाषा वाढेल, अधिकाधिक

उत्कर्ष पावेल.

शिक्षणाचा भाषेशी निकट संबंध असतो म्हणून मी हे सर्व बोलतो आहे. आपल्या घटनेमध्ये ज्यांचा उल्लेख केला आहे त्या सगळ्या भाषा महत्त्वाच्या आहेत. या सर्व भाषा उच्च शिक्षणाचे माध्यम बनल्या पाहिजेत. पण त्यासाठी इंग्रजीवर बहिष्कार टाकण्याचे कारण नाही. इंग्रजी ही एक अभ्यासाची भाषा राहील. जगातील माहिती आणि ज्ञान आम्हाला समजण्याकरिता आणि दक्षिणेमध्ये हिंदी नको म्हणून जे वेड आहे त्यासाठी इंग्रजी भाषा आपल्याकडे काही काळ तरी राहिली पाहिजे. हिंदी नको हे जरी वेड असले तरी ते आपल्याच घरातले वेड आहे. ते आपण सांभाळले पाहिजे. त्याला बरोबर घेऊन आपण पुढे गेले पाहिजे. या वेडामागे जे काही रागलोभ असतील ते आपण समजून घेतले पाहिजेत, आणि आपले म्हणणे पटवून देण्याचा सतत आपण प्रयत्न केला पाहिजे. त्याशिवाय यातून दुसरा मार्ग नाही. तेव्हा मातृभाषा, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषा राहतील. परंतु मातृभाषा माध्यम होणे हे जे ध्येय आहे, ते योग्य आहे, रास्त आहे, आणि त्याचा पाठपुरावा विद्वानांनी सतत केला पाहिजे. काही विद्वानांना त्यांचे शिक्षण इंग्रजीतून झालेले असल्यामुळे आपल्याला मातृभाषेतून कसे शिकविता येईल ही भीती वाटते. मी त्यांना विचारू इच्छितो, "अहो, तुम्ही ज्ञान शिकला की भाषा शिकला?" तुम्ही इंग्रजीतून जरी ज्ञान शिकला असला तरी तुम्हाला ते तुमच्या मातृभाषेतून सांगता आले पाहिजे. प्रयत्न करा, मोडकेतोडके बोलावयास सुरुवात करा. प्रयत्न केल्यास सर्व काही जमेल.

या संदर्भात मला पां. वा. गाडगिळांची आठवण येते. १९३०–३२ च्या चळवळीनंतर महाराष्ट्रामध्ये समाजवादाचे वाङ्मय समजून घेण्याची जबरदस्त लाट निर्माण झाली. पण हे सर्व वाङ्मय इंग्रजी भाषेत होते. समाजवादाची, राजकारणाची, अर्थशास्त्राची आणि तत्त्वज्ञानाची परिभाषा मराठीत आणण्याचे काम मोठे किचकट होते. परंतु काही मंडळींनी हा प्रयत्न केला. त्यांनी मराठी भाषेत लिहावयास सुरुवात केली. पां. वा. गाडगीळ हे त्यांपैकीच एक होते. मार्क्सचा कॅपिटल हा ग्रंथ मोठा

गुंतागुंतीचा आहे. इंग्रजीतून वाचतानासुद्धा तो लवकर समजत नाही. परंतु गाडगिळांनी तो मराठीत आणण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रातल्या अनेक विचारवंतांनी अशा प्रकारचे प्रयत्न केले. आज खेड्यातला कार्यकर्ता मार्क्सवादावर आणि समाजवादावर साध्या शेतकऱ्याला समजेल इतक्या सुरेख भाषेत व्याख्याने देत असतो. कुठून आले हे सर्व? काही मंडळींनी प्रयत्न केले आणि त्याबरोबर ती भाषा रुळावयास लागली. तेव्हा महत्त्व विचाराचे आहे. भाषा आपोआप त्याच्या पाठीमागे येऊ लागते, आणि म्हणून आपण इंग्रजीतून शिकलो तेव्हा आपल्याला आता मराठीतून कसे शिकविता येईल, ही भीती विद्वानांनी मनात कधीच बाळगू नये. हे हळूहळू सहज जमेल अशी माझी स्वतःची श्रद्धा आहे. देशामध्ये या विषयासंबंधी पुष्कळच चर्चा चालू आहे. म्हणून या बाबतीतले माझे विचार मी आपल्यापुढे मांडले.

आपण मला मोठ्या अगत्याने बोलावले आणि या विद्यालयाच्या पायाभरणीचा आणि शिलान्यासाचा समारंभ माझ्या हस्ते केला त्याबद्दल मला अतिशय आनंद आहे. श्री. करमसीभाई यांचे मला मनापासून अभिनंदन करावयाचे आहे. शिक्षणाच्या बाबतीत ते फार रस घेतात. लोक त्यांना फक्त कारखानदार म्हणून ओळखतात, पण मी त्यांना कारखानदार म्हणून ओळखत नाही तर अतिशय धार्मिक वृत्तीचें गृहस्थ म्हणून मी त्यांना ओळखतो. हिमालयाची पायपीट करून त्यांनी जितकी माहिती मिळविलेली आहे तितकी माहिती हिंदुस्थानातील फारच थोड्या माणसांना असेल. त्यांच्यासारखा एक चांगल्या प्रवृत्तींचा, चांगल्या प्रेरणा असणारा उद्योगपती आपल्यात आहे, याबद्दल मला आनंद वाटतो. त्यांची ही प्रेरणाशक्ती जास्तीत जास्त प्रमाणात समाजाच्या उपयोगी पडो आणि आपल्या या नव्या शिक्षणसंस्थेचा अधिकाधिक विकास होत जावो अशी सदिच्छा व्यक्त करून मी माझे भाषण पुरे करतो.

के. जे. सोमय्या आर्टस व कामर्स कॉलेजचा पायाभरणी समारंभ,
कोपरगाव, दि. ७-९-६७

शिवाजी विद्यापीठाच्या जीवनातच केवळ नव्हे तर, शिवाजी विद्यापीठाच्या कल्पनेशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध आलेल्या सर्व व्यक्तींच्या जीवनात, आणि त्याचप्रमाणे या विद्यापीठाच्या या पहिल्या दीक्षान्त समारंभात जे स्नातक पदवीविभूषित होत आहेत त्या स्नातकांच्या जीवनात आजचा हा दिवस मोठ्या आनंदाचा, गौरवाचा व ऐतिहासिक महत्त्वाचा असा आहे. दोन वर्षांपूर्वी या देशाच्या राष्ट्रपतींच्या आशीर्वादाने शिवाजी विद्यापीठाने आपल्या कामाचा 'श्रीगणेशा' केला. दोन वर्षांच्या या कालावधीनंतर पहिल्यानेच या दीक्षान्त समारंभाच्या निमित्ताने मी आज आपल्यामध्ये उपस्थित झालो आहे. या वेळी माझ्या मनात असलेल्या भावना मी कोणत्या शब्दांत व्यक्त करू अशा प्रकारची माझी मोठी भावविकल मनःस्थिती झाली आहे. दीक्षान्त समारंभासाठी येणारा पाहुणा स्थानिक परिस्थितीशी भावनेने इतका निगडित असू नये. कारण या व्यासपीठावरून त्याने वस्तुनिष्ठ भूमिकेतून स्नातकांना मार्गदर्शन करावयाचे असते. तेव्हा या दीक्षान्त समारंभाचा प्रमुख पाहुणा म्हणून मी

आज येथे आलो असलो तरी तुमच्यासारखाच भावनांनी या समारंभाशी, या करवीर-नगराशी आणि या विद्यापीठाशी मी इतका निगडित झालो आहे की ही वस्तुनिष्ठ भूमिका पार पाडणे मला अवघड वाटते. स्नातकांना उपदेश करण्याकरिता मी आज त्यांच्यासमोर उभा राहिलो असताना, स्नातकाच्या भूमिकेत या करवीरच्या भूमीमध्ये काढलेल्या अनेक वर्षांच्या आठवणी माझ्या मनात गर्दी करीत आहेत. त्यामुळे मी स्नातकांना उद्देशून बोलू की स्नातकांना उद्देशून बोललेले ऐकून घेऊ अशा प्रकारच्या द्विधा मन:स्थितीत मी आहे. या भावनांचा आपल्यासमोर मी उल्लेख करतो आहे खरा, परंतु अशा भावनांना व्यक्तीच्या जीवनात जितके महत्त्व असते तितके ते संस्थेच्या जीवनातही असते असे मात्र नाही. संस्थेच्या जीवनात भावनेपेक्षा कार्याला च अधिक महत्त्व असते.

आज जे स्नातक पदवीविभूषित होत आहेत त्यांना शिवाजी विद्यापीठाचे स्नातक म्हणून तर अभिमान वाटेलच, परंतु शिवाजी विद्यापीठाचे पहिले स्नातक म्हणून अधिक अभिमान वाटेल. हा पहिलेपणाचा आनंद ज्यांना अनुभवण्यास मिळतो ते खरोखरीच भाग्यवान असतात.

विद्यापीठाच्या प्रगतीसंबंधी आपल्यापुढे कुलगुरूंनी जे तपशीलवार निवेदन केले आहे त्यावरून विद्यापीठाने केलेली प्रगती खात्रीने समाधानकारक आहे. या राज्यातील ग्रामीण जनतेच्या जीवनामध्ये या नवीन विद्यापीठाच्या स्थापनेमुळे ज्या अपेक्षा निर्माण झाल्या आहेत त्या अपेक्षा पूर्ण होण्याच्या दृष्टीने विद्यापीठाची पावले निश्चितपणे पडत आहेत.

आज स्नातकांशी बोलत असताना, आपल्या आवतीभोवती असणाऱ्या प्रश्नांसंबंधी माझ्या मनात येणारे विचार जर मी सांगितले नाहीत तर मी एक मोठी चूक केल्यासारखे होईल, म्हणून मी त्यांच्याशी आज मनमोकळेपणाने चार गोष्टी बोलणार आहे. पदवी समारंभानंतर लवकरच आपण जीवनामध्ये प्रवेश करणार आहात. जीवनाच्या संघर्षात प्रवेश करणार आहात. या जीवनसंघर्षाचे स्वरूप आणि त्याच्या पाठीमागे असलेले सामर्थ्य आपण समजून घेतले पाहिजे. विद्यापीठातून आजपर्यंत आपण जे शिक्षण घेतले आहे त्या शिक्षणाची जीवनसंघर्षाच्या पाठीमागे

असणाऱ्या सामर्थ्याचे स्वरूप समजून घेण्यास आपल्याला मदत झाली पाहिजे. सामान्यतः शिक्षणाचा उद्देश आपण हाच मानतो. शिक्षणाने एक प्रकारचे मानसिक व बौद्धिक सामर्थ्य निर्माण झाले पाहिजे. एवढेच नव्हे तर या बौद्धिक व मानसिक सामर्थ्याच्या जोरावर आपल्या जीवनाचा यशस्वी मार्ग आपण शोधून काढीत असताना, ज्या समाजाने आपल्या कल्याणासाठी या ज्ञानगंगा उघडल्या त्या समाजाचेही थोडेफार ऋण फोडण्याची शक्ती व भावना या शिक्षणाने आपल्या मनात निर्माण झाली पाहिजे.

विद्यापीठ हे पदवी मिळविण्याचा एक कारखाना किंवा यंत्रणा आहे या भावनेने विद्यापीठाकडे पाहण्याची प्रवृत्ती अलीकडे वाढू लागली आहे. त्याचबरोबर विद्यापीठांच्या संख्येतही वाढ होत आहे. हे सर्व पाहून जुनी विद्वान माणसे कपाळाला आठ्या आणून विचारीत असतात की, आपण विद्यापीठे वाढवीत आहात पण त्याबरोबर ज्ञान वाढविण्याचाही प्रयत्न होणार आहे ना? तुमच्या कुलपतींचा आताच जो संदेश वाचण्यात आला त्यात कुलपतींनी मोठ्या मार्मिकपणाने दोन वेगवेगळे शब्द वापरले आहेत. आपण ज्ञानीही व्हा व शहाणेही व्हा. ज्ञानात आणि शहाणपणात फरक आहे असे त्यांनी या संदेशात सुचविले आहे. शास्त्रांचे ज्ञान तत्त्वाच्या दृष्टीने करून घेणे अत्यंत आवश्यक असते. परंतु त्या ज्ञानाचा समाज-जीवनात उपयोग करून घेण्याचे जे शास्त्र आहे त्याचे नाव शहाणपण असे मी समजतो. विद्यापीठातून बाहेर पडल्यानंतर ज्ञानाबरोबरच हे शहाणपण तुम्हाला मिळवावे लागणार आहे. कारण या शहाणपणाची देशाला आज फार गरज आहे.

विज्ञानाची आज इतक्या झपाट्याने प्रगती होत आहे की, त्याच्या गतीचे मोजमाप करणे कठीण होऊन बसले आहे. गेल्या वर्षी असणारे शास्त्र आज निश्चित तेच आहे अशी खात्री देता येणार नाही. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी आइन्स्टीनने जे मूलतत्त्व सांगितले ते नक्की बरोबर आहे असे आज त्या क्षेत्रातील शहाणी माणसेही म्हणू शकत नाहीत. याच कोल्हापूरच्या परिसरात वाढलेल्या एका तरुण वैज्ञानिकाने हा प्रश्न जगापुढे निर्माण केला आहे. मी येथे ज्ञानाच्या फक्त एकाच शाखेचा उल्लेख केला.

परंतु अशा प्रकारची प्रगती ज्ञानाच्या इतर शाखांतूनही झालेली आहे. ज्ञानाने केलेली ही प्रगती खरोखरच प्रशंसनीय आहे. परंतु त्याचबरोबर माणसाच्या मनात असा विचार येतो की, या वाढत्या ज्ञानाबरोबर माणसाचे सुख व मनःसामर्थ्य वाढले आहे का? आज जी अत्यंत पुरोगामी व अति-प्रगत अशी राष्ट्रे आहेत त्या राष्ट्रांच्या मनात हा प्रश्न अत्यंत गंभीरपणे घोळत आहे, आणि म्हणून आपण आज आपल्या देशाची एका नवीन तऱ्हेने बांधणी करण्याचा प्रयत्न करीत असताना दुनियेत इतरत्र झालेल्या चुकांची पुनरावृत्ती न करता, प्रगतीचा पल्ला आपण गाठला पाहिजे, हा जो विचार या देशातील अनेक विचारवंतांनी मांडला आहे, तो या शिक्षणकेंद्रांतून बाहेर पडणाऱ्या सर्व स्नातकांच्या मनापुढे असला पाहिजे.

आज तुम्ही तुमच्या क्षेत्रात कर्तेसवरते होऊन बाहेर पडत आहात ही आनंदाची गोष्ट आहे. तुम्ही येथे मिळविलेले सामर्थ्य तुमच्या जीवनात तुम्हाला उपयोगी पडेलच, परंतु त्याचबरोबर ते समाजाच्या जीवनालाही उपयोगी पडण्यास साहाय्यभूत होईल असा आपला सदैव प्रयत्न राहू द्या. कारण अशा समाजनिष्ठ प्रवृत्तीची आज अत्यंत गरज आहे.

जगातील प्रगत देशांमध्ये आज जे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत त्याचे मुख्य कारण, त्या देशांना विज्ञानाच्या प्रगतीतून जसे अनेक फायदे मिळत आहेत, तसेच विज्ञानाच्या प्रगतीतून निर्माण झालेल्या अनेक संकटांच्या सावलीतही हे देश आज वावरत आहेत, हे आहे. आमच्या देशातही आम्हाला विज्ञानाची प्रगती करावयाची आहे. परंतु ही प्रगती करीत असताना, ज्या ध्येयसिद्धीसाठी आपण ही प्रगती करणार आहोत त्या ध्येयाचा आपणांस कधीही विसर पडता कामा नये. या देशामध्ये आम्हांला एक प्रगत लोकशाही बांधावयाची आहे. प्रगत लोकशाहीचा घटक आहे माणूस, प्रत्येक स्त्री व पुरुष. मग तो शहरात राहणारा असो अथवा खेड्यात राहणारा असो, विद्यापीठाचा पदवीधर असो अगर पदवीधर नसो. त्याचे सामर्थ्य म्हणजे त्याच्या मनाचे सामर्थ्य, त्याच्या विचाराचे सामर्थ्य, त्याच्या अनुभवाचे सामर्थ्य आणि त्याच्या शीलाचे सामर्थ्य. हे सामर्थ्य जेणे करून वाढीस लागेल अशा प्रकारची परिस्थिती निर्माण

करून आपणांस आपली लोकशाही दृढमूल करावयाची आहे. ही आपली आजची मौलिक गरज आहे. हे सामर्थ्य देण्याची शक्ती शिक्षणात असते म्हणून तर आपण शिक्षणाच्या पाठीमागे आहोत. अमूक एक पदवी मिळाल्याने अमूक एका क्षेत्रात यशस्वीरीत्या प्रवेश मिळविता येतो याच व्यापारी दृष्टिकोणातून केवळ आपण शिक्षणाकडे पाहता कामा नये. माणूस मनाने, विचाराने मुक्त व समर्थ कसा होईल, ही शिक्षणाची महत्त्वाची कसोटी व साध्य आपण मानले पाहिजे. आजच्या शिक्षणाने ही गोष्ट आपण कितपत साध्य करू शकलो याचे परीक्षण करण्याची आज आवश्यकता निर्माण झाली आहे.

ज्ञानविज्ञानाच्या व्यासंगाने व प्रसाराने, आणि त्यातून निर्माण होणाऱ्या सामर्थ्याने देशातील वातावरण बदलू शकते, समाजाचे संपूर्ण स्वरूप बदलू शकते याचा अनुभव आज अनेक प्रगत देशांत येत आहे. समाजवादी दृष्टीने समाजरचना करणाऱ्या देशांमध्ये तर हा अनुभव जरूर आला आहे. राजकीय दृष्टिकोणातून हा विचार मी आपल्यापुढे मांडीत नसून त्या विचारातून जी परिस्थिती निर्माण होते तिच्यासंबंधी मी बोलतो आहे. वैचारिक स्वातंत्र्यावर आधारलेला समाज बांधला जावा अशी आपली विचारधारा आहे, परंतु अशा प्रकारच्या स्वातंत्र्याचा विचार व आचार साम्यवादी देशातून अशक्य असतो असा एक समज आपल्यामध्ये आहे. पण प्रत्यक्षात मात्र आपणांस आज निराळेच चित्र दिसू लागले आहे. ज्या ठिकाणी ही वैज्ञानिक व्यासंगाची लाट समाजातील घराघरांपर्यंत जाऊन पोहोचली आहे त्या समाजात एक प्रकारची नवी शक्ती निर्माण झाल्याचा आगळा अनुभव आज येतो आहे. त्या समाजाच्या वैचारिक स्वातंत्र्यावर शासनाकडून किंवा दुसऱ्या कोणत्याही शासकीय वा अशासकीय शक्तींकडून पडणारी बंधने, हे जे ज्ञानाचे स्वातंत्र्य निर्माण झाले आहे त्यामुळे आपोआप ढिली होऊ लागली आहेत. इतके विलक्षण सामर्थ्य या ज्ञानविज्ञानाच्या प्रसारात आहे. आपल्याही देशात विद्यापीठांच्याद्वारे आपणांस हे सामर्थ्य आता वाढवावयाचे आहे.

गेल्या शे-पाऊणशे वर्षांच्या काळात, शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून

भारतामध्ये व विशेषतः महाराष्ट्रामध्ये ज्यांनी ज्यांनी प्रेरणा देण्याचा प्रयत्न केला, त्या सर्वांच्या मनात एक विचार प्रमुख होता. तो हा की, शिक्षणामुळे सामान्य माणूस पारंपरिक विचारांच्या बंधनातून मुक्त होणार आहे; कुठल्याही तऱ्हेच्या दबावाने न दबणारा, आपली मान उंच करून स्वाभिमानाने चालणारा, स्वतःचे भाग्य स्वतःच्या हाताने घडविण्याचे सामर्थ्य असणारा असा माणूस शिक्षणामुळे तयार होणार आहे. या प्रेरणेसाठी महात्मा फुल्यांनी, राजर्षी शाहुमहाराजांनी, कर्मवीर भाऊराव पाटलांनी अत्यंत कष्टाने समाजात फार मोठे कार्य केले आहे. या विद्यापीठाच्या जन्मामागेही हीच प्रेरणा आहे. शिवाजी विद्यापीठ निघावे अशी जी भावना होती ती निव्वळ एका शहराच्या अभिमानातून जन्म पावली नव्हती, किंवा या विद्यापीठाला एका महापुरुषाचे नाव देऊन त्याचा सन्मान करावा असाही उद्देश या विद्यापीठाच्या जन्मामागे नव्हता. शिवाजीमहाराजांचे नाव या विद्यापीठाला दिल्यामुळे शिवाजीमहाराजांचा सन्मान झाला नसून खरोखरी तो या विद्यापीठाचाच सन्मान झाला आहे. पण या विद्यापीठामागे असलेली प्रेरणा ही सगळ्यात महत्त्वाची गोष्ट असून आज या विद्यापीठातून बाहेर पडणाऱ्या स्नातकांनी तिचे स्वरूप समजून घेतले पाहिजे. शिवाजी विद्यापीठाचा जन्म हा निव्वळ इतर विद्यापीठांच्या जन्मापैकी एक असे मी मानीत नाही आणि त्या दृष्टीने मी या विद्यापीठाकडे पाहातही नाही. शिवाजी विद्यापीठाच्या पहिल्या स्नातकांना ते जसे पहिले स्नातक आहेत म्हणून अभिमान असला पाहिजे तसेच त्यांच्यावर पडणारी पहिलेपणाची जबाबदारीही त्यांनी ओळखली पाहिजे. माणसाला मुक्त करण्याची, त्याचा स्वाभिमान जागृत करण्याची, त्याचे जीवन प्रगतीच्या दिशेने मार्गस्थ करण्याची प्रतिज्ञा घेऊनच या विद्यापीठाचा जन्म झालेला आहे. तुमचीही भावना अशीच असली पाहिजे. आज या विचारांची फार गरज आहे. पूर्वी कधीही नव्हती इतकी गरज या देशाला आज या विचारांची आहे. माणसाला घडविण्याचे हे काम, समाजाच्या सामर्थ्यातून ज्यांनी शिक्षणाची संधी घेतली आहे त्या सर्व स्नातकांनी पार पाडावयाचे आहे. आपण असे समजता कामा नये की,

आपण स्नातक झाल्याचे पूर्ण श्रेय केवळ आपल्यालाच आहे. या श्रेयात समाजाचाही पुष्कळच मोठा भाग आहे. या विद्यापीठाच्या रूपाने आपणापर्यंत ज्ञानगंगा आणून सोडण्याची समाजाने व्यवस्था केली नसती तर आज जे स्नातक पदवीविभूषित झाले आहेत, त्यांपैकी पुष्कळांना पदवी प्राप्त करून घेण्याची संधीच मिळाली नसती आणि म्हणून आपल्या मनात या सामाजिक ऋणाची प्रेरणा सतत असली पाहिजे. शिवाजी विद्यापीठाचे पदवीधर म्हणून आपण बाहेर जाल तेव्हा स्वतःचे वैयक्तिक गुण दाखविण्याची आपण संधी साधालच. परंतु त्याबरोबरच या विद्यापीठाच्या प्रत्येक स्नातकाकडून मी अशी अपेक्षा करीन की, या विद्यापीठाच्या विचारांचा, येथल्या अनुभवांचा तो प्रतिनिधी आहे ही भावना त्याच्या मनात सतत स्फुरत राहील, सतत फुलत राहील.

यापुढे आपले क्षेत्र पूर्वीप्रमाणे मर्यादित राहणार नाही. कर्तृत्वाच्या साऱ्या दिशा आपणाला आता मोकळ्या होणार आहेत. आपण कोठेही असा. परंतु आपली जबाबदारी पार पाडीत असताना आपणाला जे सामर्थ्य प्राप्त होईल ते शेवटी अनुभवाचेच सामर्थ्य असेल. कारण ज्ञान केवळ पुस्तकातूनच मिळते असे नाही. सामान्यपणे मी असे मानतो की, ज्यामुळे ज्ञानाचा पाठलाग करण्याची, ज्ञानाची सफर पुरी करण्याची शक्ती आणि दृष्टी माणसात निर्माण होते ते शिक्षण होय. पदवीपरीक्षेपर्यंत मनुष्य शिकतो आणि पदवीपरीक्षेनंतर सर्वांच्या संमतीने कुलगुरू त्याच्यावर अनुग्रह करतात. त्या अनुग्रहाचा अर्थ असा असतो की, स्वतःच्या परिश्रमाने अधिक ज्ञान मिळविण्यास तुम्ही आता पात्र झाला आहात. शिक्षणाचा हा खरा अर्थ आहे. स्नातकाला पदवी देण्यात आली म्हणजे तो ज्ञानी झाला असे मी मानीत नाही. पदवीपरीक्षेचा तो अर्थही नाही. स्वतःच्या परिश्रमाने ज्ञान मिळविण्यास स्नातक समर्थ बनला एवढाच पदवीदानाचा अर्थ आहे. कारण स्नातकाला मिळालेले शिक्षण इतके अपुरे असते की, प्रत्येक क्षणाक्षणाला त्याला शिकावे लागते. मिळालेल्या शिक्षणाचा उपयोग करून त्याने समर्थ बनावयाचे असते, पुढे जावयाचे असते. आपल्या भावी जीवनात आपणाला हे सामर्थ्य लाभावे आणि आपली सतत प्रगती व्हावी

अशी मी या प्रसंगी प्रार्थना करतो.

स्नातकांपुढे आज मी उभा राहिलो असताना मला आपल्या जुन्या उपनिषदांतील प्रार्थनेची आठवण होते.

असतो मा सद्गमय
तमसो मा ज्योतिर्गमय
मृत्योर्मा अमृतं गमय

असत्यापासून सत्याकडे, अंधारातून प्रकाशाकडे, मृत्यूपासून अमृताकडे मला ने. या अमृतत्वाच्या प्राप्तीसाठी देवांनी समुद्रमंथन केले. पण त्या समुद्रमंथनातून जे अमृत निघाले ते देव प्राशन करून बसले. आता आमच्यासाठी अमृत शिल्लकच राहिलेले नाही, म्हणून शिवाजी विद्यापीठाने घोषणा केली आहे की 'ज्ञानमेवामृतम्' आता ज्ञान हेच अमृत आहे. या अमृताने तुम्हाला समर्थ बनावयाचे आहे, समाजजीवन समर्थ बनवावयाचे आहे.

अशी किती तरी नवीन नवीन शास्त्रे आहेत की, त्या शास्त्रांचा आपण उपयोग करू शकलो तर या हिंदुस्थानचे जीवन आपणास एका पराकोटीला पोहोचविता येईल. मी परदेशात फारसा गेलेलो नाही, परंतु गेल्या वर्षी जाण्याचा योग आला. पण मी आपणास सांगू इच्छितो की, मी फारसा प्रभावित होऊन परत आलो नाही. उलट काहीसा कष्टीच होऊन परत आलो. कष्टी होऊन आलो तो अशाकरिता की, आमच्यामध्ये जे सामर्थ्य आहे त्याचा आम्ही उपयोग केलेला नाही. या देशाने भगवान श्रीकृष्ण निर्माण केले आहेत, ज्ञानेश्वर निर्माण केले आहेत, सी. व्ही. रमण निर्माण केले आहेत आणि नारळीकर निर्माण केले आहेत. फार प्राचीन काळापासून ते अगदी आजपर्यंत आमच्यामध्ये हे सामर्थ्य आहे. याचा पडताळा आम्हांस अनेक वेळा आलेला आहे. परंतु या सामर्थ्याचा आम्ही उपयोग केलेला नाही. माझ्या परदेशच्या दौऱ्यात प्रचंड पराक्रम करणारी, प्रगती करणारी राष्ट्रे मी पाहिली, या राष्ट्रांनी माणसाचे सर्वांत मोठे सामर्थ्य जी त्याची बुद्धी, तिचा तेजस्वीपणाने उपयोग करून प्रचंड सामर्थ्ये निर्माण केली आणि या सामर्थ्यांतूनच ही राष्ट्रे आज मोठी बनली आहेत. कुठलाही देश आमच्यापेक्षा भूगोलाने मोठा किंवा लोकसंख्येने

ोठा म्हणून मोठा झालेला नाही. काही देश भूगोलाने आमच्यापेक्षा हान आहेत तर काही लोकसंख्येने लहान आहेत. पण ते आपल्या कर्तृत्वाने मोठे झाले आहेत. कारण इतिहासाने दिलेली आव्हाने त्या देशातील कर्तबगार माणसांनी स्वीकारली आणि आपली सर्व शक्ती पणाला लावून ज्ञानाच्या व विज्ञानाच्या क्षेत्रातील प्रचंड सामर्थ्य त्यांनी हस्तगत केले. आम्हालाही आमचे सामर्थ्य वाढविण्याचे काम आता करावयाचे आहे. परंतु हे सामर्थ्य आपण कसे निर्माण करणार आहोत? हे सामर्थ्य दहा-पाच पुढारी निर्माण करू शकतील अशी आपली समजूत असेल तर ती चुकीची आहे. दहा-पाच मोठी माणसे महापुरुष होऊ शकतात. त्यांच्या कर्तृत्वाने आपल्या मनात एक विश्वास, आत्मविश्वास निर्माण होतो, की मलाही हे करता येणे शक्य आहे. परंतु खरे सामर्थ्य निर्माण होते, खरी शक्ती वाढते आणि राष्ट्रे पहिल्या प्रतीची बनतात ती शेवटी बुद्धीच्या क्षेत्रात, ज्ञानाच्या क्षेत्रात. या क्षेत्रात निरलसपणे अखंड सेवा करणारी जी माणसे असतात त्यांच्या कार्यामुळेच राष्ट्रे मोठी होतात हे मी आपणांस सांगू इच्छितो. ज्ञानाच्या अखंड सेवेमधून निर्माण होणारे जे सामर्थ्य आहे तेच खरे सामर्थ्य आहे. म्हणून मी म्हणतो की, ज्या अमृताच्या शोधात तुम्ही-आम्ही आहोत ते अमृत खरे आहे. त्या अमृतानेच खरे सामर्थ्य येणार आहे. मित्रहो, ज्याच्यासाठी विद्यापीठाचा जन्म झाला आणि ज्याच्या प्राशनाने आमचा समाज समर्थ बनणार आहे त्या अमृताचे कुंभ आज तुमच्यापुढे तुमच्या कुलगुरूंनी भरून ठेवले आहेत, ते तुम्ही प्राशन करा. जे कुंभ आज तुमच्यापुढे नसतील ते शोधून काढा, आणि जे शोधून सापडणार नाहीत, ते निर्माण करा. शेवटी याच एका अमृताने लोकजीवनाची गंगा समृद्ध होणार आहे, दुथडी भरून वाहणार आहे. ते अमृत शोधण्याची, जनतेपुढे सादर करण्याची जबाबदारी स्नातक म्हणून तुम्ही आज स्वीकारली आहे. म्हणून मला तुमच्या आणि तुम्हाला माझ्या शुभेच्छा.

शिवाजी विद्यापीठ दीक्षान्त समारंभ, कोल्हापूर, दि. ६-१०-६४

१८ राष्ट्रभाषेचा प्रश्न

अखिल भारतीय राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष-स्थान देऊन आपण माझा गौरव केला आहे असे मी समजतो. या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्षस्थान महात्मा गांधी, पुरुषोत्तमदास टंडन, डॉ. राजेंद्र-प्रसाद, पंडित जवाहरलाल नेहरू, लाल बहादूर शास्त्री यांसारख्या थोर थोर व्यक्तींनी भूषविले आहे. त्यांच्या मालिकेत आपले नाव पाहून आपला गौरव झाला असे कोणास वाटणार नाही ? विद्वत्ता किंवा राजकीय थोरवी या दोन्ही बाबतींत मी त्यांच्याशी बरोबरी करू शकत नाही याची मला पुरेपूर जाणीव आहे. असे असूनही केवळ विनम्रतेच्या व देशभक्तीच्या भावनेने आणि हिंदी ही आपली राष्ट्रभाषा आहे अशी माझी श्रद्धा असल्या-मुळे राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या या आमंत्रणाचा मी स्वीकार केला आहे.

दीड तपाहून अधिक काळ मी शासनात काम करीत आहे. या काला-वधीत राष्ट्रभाषेच्या प्रश्नासंबंधी विचार करावयास भाग पाडणाऱ्या अनेक प्रसंगांना मला तोंड द्यावे लागले आहे. या प्रश्नाचा मी जसजसा अधिका-धिक विचार करू लागलो तसतशी आज ना उद्या हिंदीलाच राष्ट्रभाषेचे

स्थान द्यावे लागेल यावद्दल माझी खात्री पटत गेली. त्यावरोवरच, या प्रश्नाचे त्रिनतोड व सर्वांना मान्य होईल असे उत्तर मिळणे किती त्रिकट आहे हे पाहिल्यानंतर हिंदीसंवंधीचे माझे हे मत अधिकच दृढ झाले. माझे हे मत केवळ भावनेवर आधारलेले नाही किंवा परंपरेचा आदर राखलाच पाहिजे अशी औपचारिक स्वरूपाची भूमिकाही त्यामागे नाही, हे मी येथे सांगू इच्छितो. उलट आपल्या राष्ट्रीय जीवनातील काही विशिष्ट मूलभूत तत्त्वे व आपल्या इतिहासातील काही प्राथमिक सत्ये यांवर ते आधारलेले आहे.

राष्ट्रभाषेच्या या प्रश्नाचा देशातील सद्यःस्थितीच्या संदर्भात आपण विचार केला आणि त्याचवरोवर आपल्या देशाचा गेल्या एक हजार वर्षांचा इतिहास आपण नजरेसमोर आणला तर आपल्या राष्ट्रीय विकासाच्या दृष्टीने शासनाची अखिल भारतीय भाषा म्हणून हिंदीचा विकास करणे किती अगत्याचे आहे हे मला वाटते, कोणासही पटेल. अर्थात या ध्येय-सिद्धीच्या वावतीत ज्या ज्या अडचणी येतील, मग त्या कितीही मोठ्या असोत, त्यांचे आपण निराकरण केले पाहिजे.

देशातील सद्यःस्थितीचा विचार आपण प्रथम करू. भारत हे लोकशाही राष्ट्र आहे. चौदा राज्यांचे मिळून वनलेले ते एक संघराज्य आहे. या राज्यांपैकी वहुतेकांची स्वतःची वेगळी अशी भाषा आहे, स्वतःच्या वेगळ्या अशा परंपरा व रीतिरिवाज आहेत आणि स्थूल मानाने स्वतःची वेगळी अशी जीवनपद्धती आहे. राज्य मोठे असो अगर लहान असो, त्या त्या राज्यात राहणाऱ्या लोकांची जी भाषा असेल तिचा, तेथल्या शासनाचे, शिक्षणाचे व दैनंदिन व्यवहाराचे माध्यम म्हणून स्वीकार झाला नाही तर लोकशाही शासन हे केवळ नावापुरतेच लोकशाही शासन राहील. लोकशाहीचा आत्माच ते हरवून वसलेले असेल. कारण जनतेची इच्छा हा लोक-शाहीचा मूळ आधार असल्यामुळे लोकांच्या इच्छा, त्यांच्या अंतर्मनातील भावना व सुप्त संवेदना, त्यांच्या आशा-आकांक्षा यांना प्रकट रूप देण्याचा भार त्यांच्या भाषेनेच वाहिला पाहिजे ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे.

लोकशाहीच्या मार्गावरील आपली वाटचाल ज्यांनी अनेक शतकांपूर्वी

सुरू केली त्या देशांना या सत्याचा शोध फार पूर्वीच लागला. यांपैकी प्रत्येक देशाला भाषेच्या बाबतीत आपल्यापुढे आज जो प्रश्न उभा आहे त्या प्रश्नाला कमी-अधिक प्रमाणात तोंड द्यावे लागले आहे आणि साकल्याने विचार करून आणि जनतेची इच्छा लक्षात घेऊन या प्रत्येक देशाने अखेरीस लोकभाषेच्या बाजूनेच कौल दिला आहे.

इंग्रज लोकांना आपल्या भाषेचा मोठा अभिमान आहे. तथापि आपल्या राष्ट्रीय जीवनाच्या सर्व क्षेत्रांत इंग्रजी भाषेला तिचे रास्त स्थान मिळवून देण्यासाठी त्यांना शंभराहून अधिक वर्षे प्रयत्न करावा लागला ही माहिती आपल्या दृष्टीने उद्‌बोधक ठरेल. अगदी एकोणिसावे शतक उजाडेपर्यंत इंग्लंडमधील न्यायालयांत फ्रेंच व लॅटिन या अधिकृत भाषा होत्या हा इतिहास आज फारसा कोणाला माहीत नाही. "ग्रेट ब्रिटनमधल्या न्यायालयांतील सर्व कामकाज यापुढे इंग्रजी भाषेमधून चालेल," असे एक विधेयक १७३९ साली पार्लमेंटपुढे मांडण्यात आले. त्याचा परिणाम काय झाला असेल? या विधेयकाचा पार्लमेंटमध्ये तीव्र निषेध करण्यात आला आणि त्याच्या मंजुरीस जोराचा प्रतिकार झाला. ब्रिटिश सरकारचा अधिकृत इतिहासकार म्हणतो, "त्या वेळच्या निष्णात व नामांकित कायदेपंडितांनी असे जोरदार प्रतिपादन केले की, कायद्याची भाषा म्हणून लॅटिन व फ्रेंच या भाषांना स्थानभ्रष्ट करून त्यांच्या जागी तुम्ही एखादी दुर्बोध भाषा व लिपी आणलीत तर इंग्रजी कायदा नष्ट झाल्यावाचून राहणार नाही." या आडमुठ्या विरोधावर मात करून सर्वांना समजेल अशा इंग्रजी भाषेला इंग्लंडमधल्या न्यायालयांत तिचे योग्य स्थान मिळवून देण्यास तेथील सुधारकांना शंभर वर्षे लागली. ही गोष्ट शक्य कोटीत आणण्यासाठी त्यांना १८३० सालपर्यंत वाट पाहावी लागली.

इंग्लंडसारख्या देशाला लॅटिन व फ्रेंच भाषांऐवजी आपली स्वतःची भाषा वापरात आणणे एवढे अवघड झाले व त्यासाठी एवढा प्रदीर्घ काळ प्रयत्न करावा लागला. तेव्हा या बाबतीत गेल्या अठरा वर्षांत आपण फारशी प्रगती करू शकलो नाही याबद्दल खंत करण्याचे कारण नाही. शेक्सपीयर, बेकन यांसारखे जागतिक कीर्तीचे अनेक साहित्यिक इंग्लंडमध्ये

होऊन गेले असतानासुद्धा, इंग्लंडमधील सर्वसामान्य लोक गेल्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत कोर्टकचेऱ्यांतून आपल्या कज्जे-खटल्याची कामे परक्या भाषेमधून चालवीत. आपल्याला निश्चितच धीर मिळावा अशी ही गोष्ट आहे. अर्थात राष्ट्रभाषेच्या बाबतीत बदल घडवून आणण्याच्या कामी आपणांकडून कसल्याही प्रकारची कसूर केली जाणार नाही. तथापि या बाबतीतले अपयश व वैफल्य आपणांस टाळावयाचे असल्यास राज्यघटनेतील भाषेबाबतच्या तरतुदी अमलात आणणे हे दीर्घ मुदतीचे काम आहे ही गोष्ट आपण केव्हाही नजरेआड करता कामा नये.

काही विशिष्ट शासकीय पातळीवर इंग्रजीच्या जागी हिंदीचा वापर करण्याचे काम तसेच कारण नसताना लांबणीवर टाकावे असा माझ्या म्हणण्याचा उद्देश नाही. जेथे विलंब टाळता येण्यासारखा असेल तेथे तो जरूर टाळला पाहिजे. राज्याप्रमाणेच केन्द्राच्या बाबतीतसुद्धा लोकशाही शासनाचे आपले जे उद्दिष्ट आहे त्याच्या पूर्तीसाठी लोकभाषाच वापरात आली पाहिजे असे माझे ठाम मत आहे. राज्यकारभार व सामान्य जनता यांच्यामधील ही दरी बुजविल्याखेरीज सरकार व जनता यांच्यात सामंजस्य प्रस्थापित होणार नाही आणि जोपर्यंत एक परकी भाषा राज्यकारभाराची भाषा म्हणून चालू राहील तोपर्यंत असे सामंजस्य निर्माण होणे शक्य नाही. शहाणासुरता कोणताही माणूस या विधानास आक्षेप घेईल असे मला वाटत नाही.

राष्ट्रभाषेच्या बाबतीत माझ्या मते ज्या गोष्टी मूलभूत व वादातीत आहेत त्यांचाच फक्त मी येथे पुनरुच्चार केला आहे. काही विशिष्ट अखिल भारतीय स्वरूपाच्या शासकीय कामासाठी इंग्रजीची जागा हिंदीस द्यावी ही गोष्ट निर्विवाद असली तरी त्या दिशेने पाऊल टाकण्यासाठी निरनिराळ्या प्रदेशांतील व राज्यांतील लोकांची आपण संमती मिळविली पाहिजे, ही गोष्टही तितकीच खरी आहे. आपले पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी बिगरहिंदी राज्यांना हेच आश्वासन दिले होते आणि त्यांच्यानंतरचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनीही त्याच आश्वासनाचा पाठपुरावा केला. भारत सरकार या आश्वासनास बांधलेले असून त्याला

कायद्याचे स्वरूप देण्याच्या दृष्टीने भारत सरकार शक्य तितक्या लवकर जरूर ती उपाययोजना करील.

तथापि या सर्व बाबी ज्याला शासकीय व वैधानिक किंवा स्थूल राजकीय क्षेत्र असे म्हणता येईल त्यात मोडतात. आपली संघटना या क्षेत्राबाहेर आहे. देशात आणि विशेषतः बिगर हिंदी प्रदेशांत हिंदीचा प्रचार कोणत्याही प्रकारचा गाजावाजा न करता आपण शांतपणे करीत आहोत. आपल्या कार्याचे स्वरूप कृतिशील व विधायक असल्यामुळे, आपल्या कार्यकर्त्यांना व प्रचारकांना संशयाने किंवा शंकाकुशंकांनी कधीच पछाडलेले नाही ही फार समाधानाची गोष्ट आहे. ज्या भागात लोकांना हिंदीचे फारसे ज्ञान नव्हते त्या भागात आपले कार्यकर्ते सेवाभावाने कार्य करीत असून त्यांनी हिंदीचे लोण दूरवर पोहोचविले आहे. काही विशिष्ट भागात हिंदीला राजकीय व तशाच इतर काही कारणांसाठी होत असलेल्या विरोधामुळे ते आपल्या कार्यापासून विचलित होऊ शकले नाहीत याचे कारणही अगदी सहज समजण्यासारखे आहे. बिगरहिंदी लोकांना हिंदीचे ज्ञान करून देणाऱ्या या कार्यकर्त्यांना इतर भारतीय भाषांबिषयीही तितकाच आदर असून हिंदीप्रमाणेच ते याही भाषांचे पुरस्कर्ते आहेत. लोकांनी हिंदी शिकावी असा जेव्हा ते आग्रह धरतात तेव्हा इतर भाषांचे महत्त्व ते कोणत्याही प्रकारे कमी लेखीत नाहीत. तेव्हा आपले हे कार्यकर्ते याच वृत्तीने काम करीत राहिल्यास हिंदीचा प्रसार वाढत जाऊन काही कालावधीतच सबंध देशात हिंदी पोहोचेल याबद्दल मला शंका नाही.

आज देशाच्या जवळ जवळ सर्वच भागातील लोकांना सोपी हिंदी समजते याचे श्रेय आपल्या समितीने आणि हिंदीच्या प्रचारकार्यास वाहून घेतलेल्या इतर बिनसरकारी संस्थांनी जे चांगले कार्य केले आहे त्याला प्रामुख्याने द्यावे लागेल. एक सक्तीचा अथवा ऐच्छिक विषय म्हणून हिंदी आज देशाच्या सर्व राज्यांत शिकविली जाते. शासकीय नोकरवर्गात हिंदीचा प्रसार व्हावा म्हणून शासनाकडून जे प्रयत्न होत आहेत तेही चांगले यशस्वी होत आहेत. या सर्व घटनांचा कालांतराने योग्य तो परिणाम होऊन देशातील भाषिक वातावरण सुधारण्यास नक्कीच मदत

होईल. म्हणून आपणाला व हिंदीच्या इतर पुरस्कर्त्यांना व प्रचारकांना माझी अशी कळकळीची विनंती आहे की, त्यांनी धीर न सोडता हिंदीच्या प्रचाराचे आपले काम धीमेपणाने करीत राहावे. मात्र ते करीत असताना हिंदीला राजकारणाच्या व वादाच्या आवर्तांबाहेर ठेवावे. कारण सहिष्णुता व क्षमावृत्ती हेच विरोधाला खरे उत्तर होय. काही देशांवरच केवळ नव्हे तर खंडप्राय भूप्रदेशावरसुद्धा ज्या विचारांचा व भाषांचा प्रभाव पडलेला आपण पाहतो त्यांचा प्रसार याच मार्गाने झालेला आहे ही गोष्ट आपण लक्षात घ्यावी.

हिंदीच्या प्रचाराच्या मार्गात ज्या अडचणी आहेत त्यांची या कामाचा आपणाला प्रत्यक्ष अनुभव असल्यामुळे, चांगली माहिती असेल. मला या अडचणींची थोडीफार कल्पना आहे. परंतु त्यांपैकी फक्त एकाच अडचणीसंबंधी मी आज येथे थोडे विवेचन करणार आहे. भारतीय भाषांच्या अभ्यासाच्या मार्गात आणि त्याचप्रमाणे हिंदीचा झपाट्याने प्रसार होण्याच्या मार्गातही माझ्या मते आज सर्वांत मोठी धोंड कोणती असेल तर ती लिपीसंबंधीच्या प्रश्नाची होय. भारतातील सर्व प्रमुख भाषा एका लिपीतून लिहिल्या गेल्यास लोकांना हिंदी झपाट्याने शिकता येईल आणि हिंदी भाषिकांनाही इतर भाषांचे ज्ञान अगदी सुलभ रीतीने संपादन करता येईल. अशा रीतीने एकाच लिपीचा अवलंब केला गेल्यास भारतातील भाषिक प्रश्नाची तड फार लवकर गाठता येईल. अखिल भारतीय राष्ट्रीय एकात्मता परिषदेने काही वर्षांपूर्वी या बाबतीत एक कळकळीचे आवाहन केले होते. प्रादेशिक भाषा देवनगरी लिपीतून लिहिण्यास वाढत्या प्रमाणात उत्तेजन मिळावे अशी त्या परिषदेने शिफारस केली होती. लिपीबाबत असा बदल जर आपण घडवून आणू शकलो तर भाषिक प्रश्नाचा पूर्ण कायापालट होऊन जाईल. आपल्याला अलग ठेवणाऱ्या अनेक भिंती त्यामुळे जमीनदोस्त होऊन तुटकपणाचे बांध वाहून जातील आणि भाषाभाषांमध्ये देवाणघेवाण सुरू होऊन सर्व भाषा समृद्ध बनतील. आजच्यापेक्षा किती तरी अधिक प्रमाणात यामुळे त्या परस्परांच्या निकट येतील.

आणखी एक गोष्ट आपण विसरता कामा नये. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्या देशात ज्या राष्ट्रीय शक्ती मुक्त झाल्या आहेत आणि विकासाची जी देशव्यापी कामे सध्या आपण हाती घेतली आहेत त्यामुळे लोकांचा आपापसातील संपर्क खूपच वाढला जाहे. या संपर्कामुळे निरनिराळ्या भाषांच्या सरहद्दींना छेदून जाणारी अशी एक समान शब्दसंहिता आज झपाट्याने तयार होत असून, या भाषांचे रूप व रचना यावर, याचा निश्चित परिणाम होत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. या शब्दसंहितेबरोबरच या भाषांना जर आपण एक समान लिपी देऊ शकलो तर त्या सर्वांना एकत्र जोडणारा एक सुंदर व भक्कम असा सेतू बांधल्याचे श्रेय आपल्या पदरात पडेल. प्रत्येक भारतीयाला मग किमान दोन-चार भाषा अगदी सहज रीतीने अवगत करून घेता येतील.

या संदर्भात मी आणखी एक सूचना करू इच्छितो. हिंदी भाषेसंबंधीचे ज्ञान व साक्षरता यांचा प्रसार करण्याच्या कामी माझ्या या सूचनेची आपल्याला मदत होईल. ती सूचना अशी की, ज्या लिपीतून हिंदी लिहिण्याची लोकांची इच्छा असेल त्या लिपीतून हिंदी लिहिण्याची मुभा आपण लोकांना ठेवावी. संस्कृत भाषा ही गेल्या अनेक शतकांपासून आपण वेगवेगळ्या लिपीमधूनच शिकत आलो आहोत. पण संस्कृत भाषा फक्त एका लिपीतूनच शिकली व शिकविली पाहिजे असा आग्रह जर एखाद्याने धरला असता तर देशाच्या सर्व भागांत संस्कृत जिवंत राहिली असती किंवा नाही याबद्दल मला शंका आहे. लिपीच्या बाबतीत अशा प्रकारचे स्वातंत्र्य दिल्याने लोक जर हिंदी लवकर शिकणार असतील तर ते स्वातंत्र्य आपण जरूर द्यावे असे मला वाटते. हे अर्थात माझे वैयक्तिक मत आहे. ते कितपत योग्य आहे याचा विचार विद्वानांनी, शिक्षण-तज्ज्ञांनी व आपल्यासारख्या संस्थांनी करावयाचा आहे.

हिंदी राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या कार्याचा व्याप क्रमाक्रमाने वाढतो आहे, आणि हिंदीचे अध्यापन व परीक्षापद्धती यांत सर्वांगीण प्रगती होत आहे, ही फार आनंदाची गोष्ट आहे. बिगरहिंदी भागात हिंदीच्या अभ्यासास उत्तेजन मिळावे म्हणून काही खास प्रलोभने ठेवावीत अशी एक विचार-

सरणी असल्याचे मी पुष्कळ वेळा ऐकले आहे. अशा प्रकारची प्रलोभने ठेवण्यात गैर असे काही नाही. परंतु हिंदीच्या प्रसारासाठी अशा प्रकारच्या प्रलोभनांची मला काही आवश्यकता वाटत नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, काही राज्यांतील विशिष्ट लोकांकडून हिंदीला उघड वा प्रच्छन्न विरोध होत असला तरी हिंदीच्या साक्षरतेचा प्रसार वेगाने होत आहे. बहुसंख्य सुशिक्षित लोकांना हिंदीचे कामचलाऊ ज्ञान प्राप्त झाल्यानंतर माझ्या मते आपण अशा टप्प्यापर्यंत पोहोचू की जेथे हा वाद संपुष्टात आलेला असेल. तेव्हा जे कार्यकर्ते आज सरकारी वा बिन-सरकारी पातळीवर राष्ट्रभाषेच्या प्रचाराचे काम करीत आहेत त्यांनी पूर्वी-प्रमाणेच यापुढेही आपले काम सेवाभावाने व समर्पणाच्या भावनेने चालू ठेवले पाहिजे. माझ्या मते ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे.

या वर्षीच्या संमेलनाचे अध्यक्षपद मला देऊन भाषिक प्रश्नावरील माझे विचार व्यक्त करण्यास आपण मला ही जी संधी दिलीत त्याबद्दल मी आपले पुन्हा एकदा आभार मानतो.

अखिल भारतीय राष्ट्रभाषा प्रचार समिती वार्षिक अधिवेशन,
औरंगाबाद, दि. २८-५-१९६६

१९ तरुणांपुढील कार्याची दिशा

मी जेव्हा तरुणांसंबंधी बोलतो तेव्हा स्वाभाविकपणे मला माझ्या तरुण-पणच्या दिवसांची आठवण होते आणि सध्याच्या पिढीतील वैफल्यासंबंधी आपण जेव्हा बोलतो तेव्हाही, माझ्या मनात त्या जुन्या दिवसांच्या आठवणी उभ्या राहतात. माझ्या पिढीतील तरुणांची विचारसरणी काय होती हे मला ठाऊक आहे. ती पिढी काही विशिष्ट ध्येयांनी प्रेरित झालेली होती. देशभक्ती, त्याग किंवा अशाच प्रकारच्या इतर उदात्त ध्येयांनी तेव्हाचे वातावरण धुंद होऊन राहिले होते. परंतु त्याही वेळी तरुणांपैकी थोडेचजण देशासाठी कार्य व त्याग करण्याच्या प्रेरणेने झपाटलेले होते. सबंध देश देशभक्तीच्या भावनेने ढवळून निघाला असताना, ज्या पिढी-साठी आम्ही लढत व झगडत होतो ती पिढी दैनंदिन कामात मग्न राहावी हे पाहून माझे मन विषण्ण होई. तथापि माझी ही विषण्णता कधीही दीर्घ-काळ टिकली नाही. कारण तरुण लोकांचा स्वभाव हा असाच असतो याची मला लागलीच जाणीव होत असे. तरुण माणसे त्यांच्या कामात व्यग्र असली तरी राष्ट्रकार्यासंबंधीच्या त्यांच्या भावना तितक्याच तीव्र

असतात असा माझा अनुभव होता. तेव्हा सध्याच्या तरुण पिढीसंबंधी बोलताना त्यांच्याकडून काही मूलभूत चूक होत आहे असे मला व्यक्तिशः वाटत नाही. आजची तरुणमंडळी काही विशिष्ट गोष्टी बोलत असतील किंवा काही विशिष्ट तऱ्हेने वागतही असतील, परंतु त्याचा अर्थ ही मंडळी काही मूलभूत चूक करीत आहेत असा नव्हे. तरुणांच्या बाबतीत आपले जर काही कर्तव्य असेल तर ते हे की, आपण त्यांच्या बरोबर वसले पाहिजे, त्यांच्याशी बोलले पाहिजे, त्यांना निरनिराळ्या गोष्टी समजावून सांगितल्या पाहिजेत, त्यांच्यातील उत्तमोत्तम माणसे हुडकून काढली पाहिजेत आणि त्यांची शक्ती विधायक कार्याला लागेल अशा प्रकारचे कार्यक्रम आपण त्यांना दिले पाहिजेत. असे झाले तरच राष्ट्राने आपल्यापुढे ठेवलेली ध्येये साध्य करण्यास आपण त्यांना उद्युक्त करू शकू.

आजच्या तरुण पिढीने कोणती कामे करावीत असा प्रश्न मला विचारण्यात आला आहे. आजच्या घडीची जी आव्हाने आहेत त्यांच्या संदर्भातच या कामांचा विचार करता येईल. ही आव्हाने कोणती? स्थूलमानाने या आव्हानांचे चार वर्ग करता येतील : १ आर्थिक, २ सामाजिक, ३ परराष्ट्रीय व ४ राजकीय. राजकीय आव्हानांचा हा जो मी उल्लेख केला तो राजकीय पक्षांच्या संदर्भात नव्हे तर देशातील राजकीय क्षेत्रातल्या सर्वसाधारण आव्हानांसंबंधीचा होय.

आपली आर्थिक आव्हाने कोणती आहेत? आपल्या देशापुढील मूलभूत आर्थिक आव्हान विकासासंबंधीचे आहे. आपण ब्रिटिशांशी लढलो ते केवळ शासनाचे स्वरूप बदलण्यासाठी नव्हे तर स्वतःमध्ये बदल घडवून आणण्याची आपल्याला संधी मिळावी म्हणून. ब्रिटिशांची येथून हकालपट्टी करण्याचा जेव्हा आम्ही प्रयत्न करीत होतो तेव्हा त्या प्रयत्नामागील आमचा विचार खरोखरी हा होता की, स्वराज्याच्या मार्गाने आम्हांला आमच्या जीवनामध्ये व आमच्या विचारसरणीमध्ये बदल घडवून आणता यावा आणि तांत्रिक दृष्ट्या अधिक प्रगत व आधुनिक अशी संस्कृती आम्हांला या देशात निर्माण करता यावी. माझ्या या म्हणण्याचा आपण गैरसमज करून घेऊ नका. कारण असे म्हणण्यात आपली प्राचीन

संस्कृती कमी प्रतीची होती असे मला मुळीच सुचवावयाचे नाही.

अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य या ज्या लोकांच्या प्राथमिक गरजा आहेत त्या भागविणे हे स्वाभाविकपणे आर्थिक क्षेत्रातील आपले अगदी किमान उद्दिष्ट म्हणता येईल. ब्रिटिशांशी लढण्यात आपला हा जो मूलभूत उद्देश होता तो अद्यापि तरी असफलच राहिला आहे. स्वातंत्र्य-संपादनानंतर आणि आपले राष्ट्रीय सरकार अस्तित्वात आल्यानंतर आपण आपल्यासाठी जणू काय एक नियम ठरवूनच टाकला आहे आणि तो म्हणजे सर्वच गोष्टी सरकारवर सोपविणे हा होय. एवढेच नव्हे तर या सर्व गोष्टी पार पाडण्याची जबाबदारी सरकारची आहे असाही एक समज आपण करून घेतला आहे. परंतु अशाने आपल्या प्रगतीचे पाऊल कधीच पुढे पडणार नाही. अगदी किमान कार्यक्रम पार पाडावयाचा झाला तरी सबंध राष्ट्राची शक्ती त्याच्यामागे उभी राहिली पाहिजे. एखादा कार्यक्रम आखून आणि त्याची उद्दिष्टे ठरवून अंमलबजावणीसाठी कोणत्या तरी शासकीय यंत्रणेकडे तो सुपूर्द करण्याने काहीही साध्य होणार नाही. ही दृष्टीच मुळात चुकीची आहे. आपल्या उत्पादनपद्धतीत व त्याचबरोबर आपल्या विचारसरणीत आणि प्रश्नांकडे पाहण्याच्या आपल्या दृष्टीत प्रथम मूलभूत स्वरूपाचा बदल झाल्याशिवाय कोणतेही परिवर्तन घडून येणे केवळ अशक्य आहे. आपण ठरविलेली आर्थिक समानतेची उद्दिष्टे साध्य होण्यासाठी, काही विशिष्ट कार्यक्रम आखून एका विशिष्ट पद्धतीने शासन-कारभार चालविला म्हणजे झाले असे म्हणून भागणार नाही. आज सर्वांत अधिक निकड जर कशाची असेल तर ती देशातील प्रत्येक व्यक्तीच्या वृत्तीत बदल घडवून आणण्यासंबंधीची आहे. आपल्या तरुण मंडळींना याची जाणीव आहे किंवा नाही हेच माझ्या मते आर्थिक क्षेत्रातील आजच्या घडीचे मोठे आव्हान आहे.

सामाजिक क्षेत्रात कोणती आव्हाने आहेत? आपला देश शंभर वर्षांपूर्वी जेवढा कर्मठ किंवा पुराणमतवादी होता तेवढाच तो आजही आहे असे म्हटल्याखेरीज गत्यंतर नाही. अगदी आजही जाती, पोटजाती, धर्म, प्रदेश, भाषा, बोली, अशा एक ना दोन अनेक गोष्टींमुळे आम्ही विभागले

गेल्रो आहोत. या विभाजक प्रवृत्तींमुळेच भारत इतिहासात प्रदीर्घ काळ परकीय अमलाखाली गांजला व भरडला गेला. या प्रवृत्ती आजही कार्य-प्रवण आहेत, एवढेच नव्हे तर त्या वाढत आहेत व अधिकाधिक तीव्र बनत आहेत असे दृश्य दिसते. तरुणांपुढील हे सर्वांत मोठे आव्हान आहे असे मी समजतो.

पहिल्या जागतिक युद्धानंतर भारतात जी थोर व कर्तृत्वशाली माणसे झाली त्या सर्वांनी आपल्या तरुणपणीच राष्ट्रकार्यात पदार्पण केले होते. गांधीजींनी त्या वेळी आपल्याभोवती जो परिवार गोळा केला त्यात राजेन्द्र-बाबू, देशबंधू दास, मोतीलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद वगैरे मंडळी होती. मी काही थोड्या व्यक्तींचीच नावे येथे घेतली आहेत. ही माणसे आपल्या देशाचे नेतृत्व करण्यास लायक होती एवढेच नव्हे तर खंडप्राय भूप्रदेशाचे पुढारीपण करण्याचेही कर्तृत्व त्यांच्या ठिकाणी होते असे मी विनदिक्कतपणे म्हणतो. मनात येते तर त्यांना वाटेल ते होता आले असते. परंतु असे असूनही देशासाठी आपले जीवन समर्पित करण्याचे त्यांनी ठरविले. तेव्हाच्या तरुण पिढीची भावना ही अशी होती. मग ही भावना आजच्या तरुण पिढीत का नाही? ही भावना प्रथम आपण आपल्यामध्ये बाणविली पाहिजे आणि मग तरुणांच्या अंतःकरणात तिचे बीजारोपण केले पाहिजे. एकात्म भारताच्या कल्पनेने त्या काळी लोकांची हृदये कार्वीज केली होती आणि त्यामुळेच त्या वेळचे लोक भाषा, जात व धर्म या भावनांच्या पलीकडे जाऊ शकले. हे जर तेव्हा घडू शकले तर ते आतासुद्धा घडावयास हवे. पण मी जेव्हा देशाच्या निरनिराळ्या भागांत आज जात असतो तेव्हा तरुण पिढी अद्यापिही संकुचित निष्ठांच्या संदर्भातच विचार करीत असल्याचे मला आढळून येते. ही खरोखर फार दुर्दैवाची गोष्ट आहे. अशा संकुचित निष्ठांच्या आहारी आपण जातो याचे कारण हेच की, ज्या रूढ व पारंपरिक कल्पनांच्या वर्चस्वाखाली आपण पिढ्यानुपिढ्या वावरलो त्यांच्याशी आपण अद्यापि पूर्ण मुकाबला केलेला नाही, त्यांचे आव्हान अद्यापि आपण पूर्ण स्वीकारलेले नाही. अद्यापिही आपण लोकांना जुन्या चाकोरीच्या बाहेर काढू शकलेलो नाही. आधुनिक

जग, आधुनिक शक्ती व आधुनिक भारत यांच्या संदर्भात विचार करावयास आपण त्यांना शिकविलेले नाही. राजकीय क्षेत्रात पुनरुत्थान घडलेले असले तरी सामाजिक क्षेत्रात त्याचा आपल्याला अद्यापि अनुभव यावयाचा आहे. पोशाखातील सुधारणा, रेडिओ, टेलिव्हिजन, चित्रपट यांसारख्या आधुनिक सुखसोयींमुळे एक प्रकारची आज जी आधुनिक जीवनपद्धती अस्तित्वात आल्याचे दृश्य दिसते आहे तिचे महत्त्व मी कमी लेखीत नाही. परंतु जोपर्यंत लोकांच्या दृष्टिकोणात व प्रवृत्तीत आपण क्रांतिकारक बदल घडवून आणीत नाही तोपर्यंत आपला देश जुन्या चाकोरीच्या बाहेर पडणार नाही. या सबंध प्रश्नाची मेख येथेच आहे. सामाजिक आव्हान असे ज्याला मी म्हणतो ते हे होय.

आता आपण परराष्ट्रीय आव्हानाचा विचार करू. मला वाटते हा विषय अगदी सुपरिचित आहे. चीनकडून, पाकिस्तानकडून अगर इतर अन्य ठिकाणांहून आपल्याला येणारी जी परराष्ट्रीय आव्हाने आहेत ती तुम्हांला माहीतच आहेत. ही आव्हाने आपल्यापुढे दीर्घ काळ राहणार असल्यामुळे या धोक्याबाबत आपली तरुण मंडळी सतत जागरूक राहतील अशी मी आशा करतो. कारण एखादा झंझावात धोंगावत यावा आणि थोड्याच वेळात तो ओसरून जावा अशा प्रकारची ही काही गोष्ट नाही. ही आव्हाने आपल्यासमोर सतत राहणार आहेत असे धरूनच जीवन जगण्याची कदाचित आपल्याला तयारी करावी लागेल व त्यांच्याशी आपल्याला लढा द्यावा लागेल. मी हे जे बोलतो आहे ते लष्करी दृष्टिकोणातून बोलत नाही. अशा प्रकारचे एखादे आव्हान जेव्हा आपल्यासमोर उभे राहते, तेव्हा आपले सामर्थ्य, आपले अंगीभूत गुण, आपले चारित्र्य व आपली एकूण राष्ट्रशक्ती वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने त्या आव्हानाचा मुकाबला करण्यास आपण शिकले पाहिजे. हे आणखी एक असे क्षेत्र आहे की, जेथे फक्त तरुणांनाच या आव्हानाचा स्वीकार करता येईल. वडिलधाऱ्या माणसांनी या बाबतीत आपल्या देशाच्या आशा-आकांक्षांसंबंधी मार्गदर्शन करावे किंवा त्यासंबंधी जागृती निर्माण करावी. परंतु येथे प्रत्यक्ष कृतीमात्र तरुणांकडूनच होऊ शकेल. तरुणांनी सैन्यात

दाखल व्हावे, एवढेच सांगण्याचा माझा यामागील उद्देश नाही. मला म्हणावयाचे आहे ते हे की, तरुणांनी या क्षेत्रातील प्रश्नांचा सांगोपांग अभ्यास करावा व हे प्रश्न व्यवस्थित समजावून घ्यावेत. तसे झाले म्हणजे राष्ट्रीय संरक्षणाच्या क्षेत्रातील आपल्या डावपेचांचे तंत्र हे आपले मनुष्य-बळ, साहित्य, भूगोल व इतर संबंधित बाबींचा अनुभव व ज्ञान यांतून विकसित होईल. देशाच्या संरक्षणाचे तंत्र हे काही आभाळातून पडत नाही. तरुण माणसे जेव्हा या आव्हानांचा गंभीरपणे विचार करतात आणि आपल्या सामर्थ्याने व कल्पनाशक्तीच्या बळावर त्यांचा मुकाबला करण्याची जाणीव त्यांच्या ठिकाणी निर्माण होते तेव्हाच ते देशाच्या संरक्षणाचे तंत्र उभे करू शकतात.

चौथे आव्हान हे राजकीय क्षेत्रातील आहे. या क्षेत्रात दोन मूलभूत आव्हाने आहेत. एक भारताच्या एकात्मतेचे आणि दुसरे लोकशाही जीवनपद्धतीचे. आज विभाजक शक्ती जोर करीत आहेत याबद्दल माझ्या मनात शंका नाही. अशा परिस्थितीत आपल्या राष्ट्रीय जीवनातील भेदांचा स्वाभाविकपणेच लोक विचार करू लागतात. व्यक्तिशः मला या भेदांचे मुळीच भय वाटत नाही. नैसर्गिक व भौगोलिक भेद हे राहणारच. कारण आपला देशच मुळी अवाढव्य असून तो इतक्या विविधतेने भरलेला आहे की, असे भेद असणे अगदी स्वाभाविक आहे. देशाच्या या अवाढव्य-पणामुळे प्रचंड प्रश्न निर्माण होतात. पण हे प्रश्न नसतील तर मग आव्हानेही नसतील. प्रश्न आहेत आणि ते यापुढेही राहणार आहेत. आपल्या जीवनातून व आपल्या प्रगतीतून प्रश्न हे निर्माण होत राहणारच. पण या प्रश्नांचा आपण योग्य दृष्टिकोणातून विचार करतो की नाही आणि त्यांतून निर्माण होणाऱ्या आव्हानांचा स्वीकार करून त्यांच्याशी मुकाबला करतो की नाही हा खरा मुद्द्याचा प्रश्न आहे. या सर्व प्रश्नांतून, आव्हानातून आणि त्यांतून उत्पन्न होणाऱ्या अडचणींतून देशात ताण निर्माण होत जातात. दुर्दैवाने देशातील विभाजक शक्ती या परिस्थितीचा आपल्या स्वार्थासाठी उपयोग करून घेत असतात. देशाच्या एखाद्या भागास आपल्याला एखादे नवे बंदर किंवा एखादा नवा कारखाना मिळावा असे

वाटत असल्यास त्यात गैर असे काहीच नाही. ही अगदी स्वाभाविक अशी आकांक्षा आहे. परंतु ती साध्य करून घेण्यासाठी आपण विभाजक शक्तींच्या आहारी जाणार आहोत की विधायक मार्गांचा अवलंब करणार आहोत हा खरा प्रश्न आहे. आपण या प्रश्नांचा योग्य दृष्टिकोणातून विचार करून व्यवहार्य मार्गाने त्यांची उकल करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एखाद्या भाषिक वा प्रादेशिक गटाचे घटक म्हणून नव्हे तर भारतीय म्हणून आपण या प्रश्नांची उकल केली पाहिजे. गांधीजी आणि नेहरू यांनी सर्वांत मोठी जर कोणती गोष्ट केली असेल तर ती ही की, ते नेहमी सर्वंध भारताचा विचार करीत असत. भारत हा भौगोलिकदृष्ट्या एकात्म आहे आणि एका राज्यघटनेनुसार चालणारा देश आहे असे म्हणून केवळ भागणार नाही. ते सत्यच आहे आणि पडेल तो त्याग करून आपण त्याचे रक्षण करणारच आहोत. तथापि देशातील जनतेमध्ये एकात्मतेची भावना कशी निर्माण करता येईल हे मूलभूत आव्हान आपल्यापुढे आहे. काही निश्चयी बाण्याच्या लोकांनी आपले जीवन या ध्येयासाठी व या कार्यासाठी वाहून घेतल्याखेरीज भारताचे पाऊल पुढे पडणार नाही.

राजकीय क्षेत्रातील दुसरे आव्हान हे लोकशाही जीवन-पद्धतीला असलेले आव्हान होय. आपण जेव्हा आर्थिक प्रगतीसंबंधी किंवा आर्थिक विषमता दूर करण्यासंबंधी बोलत असतो तेव्हा व्यक्तिव्यक्तीमधील समानता आपल्याला अभिप्रेत असते. विचार-स्वातंत्र्य आणि आचार-स्वातंत्र्य ही लोकशाहीची पायाभूत कल्पना आहे. आपल्या राज्यघटनेच्या कोंदणात आपण तिला मानाने बसविले आहे. प्रत्येक व्यक्तीला माणूस या नात्याने आपला उत्कर्ष साधण्याची आकांक्षा बाळगण्याचा पूर्ण अधिकार आहे. लोकशाहीची ही पायाभूत कल्पना आपण सावधगिरीने, कौशल्याने, आत्मविश्वासाने व प्रामाणिकपणाने अमलात आणली पाहिजे.

निरनिराळ्या क्षेत्रांतील निरनिराळ्या आव्हानांचा मी येथवर निर्देश केला. तरुण मंडळींनी त्यांचा विचार केला पाहिजे. तो त्यांनी आपल्या दृष्टिकोणातून करावा. पण त्यांचा दृष्टिकोण नेहमी विधायक व आधुनिक असाच असला पाहिजे. त्यांना जी कामे पार पाडावयाची आहेत ती त्यांना

ग्रंथ संग्रहालय, डाग. स्वरूप
क्र. ७५८२५ दि: ...
क्र. २७२६ दि: २५।७७

आपापसात वाटून घेता येतील. आपल्यापुढील कामाचे क्षेत्रच एवढे प्रचंड आहे की कोणाही एका व्यक्तीने या सर्व आव्हानांचा स्वीकार करू म्हटले तरी ते अशक्य आहे. म्हणून प्रत्येकाने आपल्याला योग्य ते काम निवडून घ्यावे. तसेच अशा प्रकारचे आव्हान स्वीकारण्याइतके आपल्या-जवळ मोठेपण नाही असे कोणीही मानू नये. कोणीही जन्माने मोठा असत नाही. आम्ही सर्व लहानच होतो. परंतु आमच्यापुढील आव्हाने व प्रश्न मोठे होते आणि त्यांचा स्वीकार करण्यासाठी आवश्यक असलेल्या मनोधैर्यानेच आम्हांला त्यांचा मुकाबला करण्याइतके मोठे बनविले. आव्हानांचा मुकाबला करण्याच्या वृत्तीतूनच व्यक्तीमधले उत्तमोत्तम गुण प्रगट होत असतात. त्यासाठी लागणारी मनाची तयारी हेच खरे आमच्या तरुण पिढीपुढील मूलभूत आव्हान आहे.

वयच केवळ नव्हे तर आपल्यापुढील आव्हान स्वीकारून त्याला तोंड देण्याची कुवत हे पण मी तारुण्याचे गमक मानतो. खरे म्हणजे माणूस तरुण आहे की वृद्ध आहे यार्ची कसोटी त्यावरच ठरते. लोकमान्य टिळक प्रीव्ही कौन्सिलात आपला खटला हरल्यानंतर, "या पराभवाने तुमचे मनोधैर्य खचले का?" असे त्यांना कोणीसे विचारले. त्यावर टिळकांनी उत्तर दिले, "माझे धैर्य कदापि खचणार नाही. मी ज्या पिढीत वाढलो त्या पिढीवर आकाश जरी कोसळले तरी त्या कोसळलेल्या आकाशावर पाय रोवून ती उभी राहील आणि लढत देईल." टिळकांचे हे तेजस्वी उद्‌गार आमच्या तरुणांचे ध्रीदवाक्य झाले पाहिजे. तरुण माणसाने नेहमी आव्हाने शोधीत राहिले पाहिजे, आपल्या दृष्टीसमोर त्याने ध्येये ठेवली पाहिजेत आणि ही ध्येये गाठण्याकरिता त्याने आपले मनोधैर्य सदैव शाबूत राखले पाहिजे. ज्या तरुणाच्या दृष्टीसमोर स्वप्ने नाहीत तो तरुणच नव्हे. स्वप्ने पाहण्याचीच केवळ नव्हे तर ही स्वप्ने वास्तवात आणण्याची कुवत व धैर्य त्याच्यापाशी असले पाहिजे. आमची तरुण माणसे हे करतील तर आपल्या ध्येयस्वप्नातील भारत लवकरच समूर्त झालेला आपल्याला दिसेल अशी मी ग्वाही देतो.

अभ्यासगट दिल्ली, जानेवारी ६८

२० सामाजिक प्रगतीच्या प्रेरणा

आजच्या या समारंभासाठी मी मोठ्या आनंदाने आलो आहे. आपण एवढ्या आपुलकीने आणि प्रेमाने मला या समारंभासाठी बोलाविले त्याबद्दल मी आपले प्रथम मनःपूर्वक आभार मानतो.

विसावे शतक सुरू झाले आणि दादासाहेब गायकवाडांचा जन्म झाला. या शतकाच्या गेल्या सदुसष्ट वर्षांमध्ये ज्या अनंत उलाढाली हिंदुस्थानात झाल्या, आणि हिंदुस्थानच्या बाहेरही झाल्या त्या सर्वांचा परिणाम आपल्या देशावर झाला आहे. सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या माणसांचे जीवन हे या उलाढालींतून जे संघर्ष निर्माण होतात त्या संघर्षांचे प्रतीक बनलेले असते. अशा सामाजिक कार्यकर्त्यांचे जीवन यशस्वी झाले की अयशस्वी झाले हे सांगणे जसे कठीण असते तसेच हे ठरविण्यासाठी कोणती कसोटी लावावी हे ठरविणेही तितकेच कठीण काम असते. वयाला साठ-सत्तर वर्षे झाली यातच आयुष्याचे यश मिळाले असे समजणारी पुष्कळ माणसे असतात, तर काहींना संपत्ती मिळते, अधिकार मिळतो म्हणून आपले जीवन यशस्वी झाल्यासारखे वाटते. काहींना या दोहोंपैकी काहीच

मिळत नाही म्हणून त्यांचे जीवन वर वर पाहणाऱ्याला अयशस्वी झाल्यासारखे दिसते. परंतु खऱ्या कर्तृत्ववान माणसाच्या जीवनाचे यश मोजावयाचे झाल्यास त्याच्या ऐन उमेदीच्या, कर्तबगारीच्या काळात, प्रगतीच्या दिशेला घेऊन जाणाऱ्या ज्या ज्या गोष्टी घडल्या, जे जे विचार निर्माण झाले, ज्या ज्या चळवळी उभ्या राहिल्या, त्या त्या गोष्टींचे, विचारांचे आणि चळवळींचे, आणि या सर्वांतून निर्माण होणाऱ्या संघर्षांचे, प्रेरणांचे आणि भावनांचे प्रतिबिंब त्या माणसाच्या जीवनात पडले आहे की नाही हे आपण प्रथम पाहिले पाहिजे. या दृष्टीने जर आपण यशस्वी जीवनाचे मोजमाप करावयाचे ठरविले तर दादासाहेबांचे जीवन हे एक यशस्वी जीवन आहे हे आपल्याला कबूल करावे लागेल.

जी कर्तबगार माणसे असतात त्यांच्या जीवनात कोठल्या तरी महत्त्वाच्या प्रेरणा त्यांना पुढे रेटीत असतात, कोठल्या तरी विचारांचा, कोठल्या तरी ध्येयाचा, त्यांना एक प्रकारचा नाद लागलेला असतो, छंद लागलेला असतो. लौकिक अर्थाने आपण ज्याला नाद किंवा छंद म्हणतो तो सोडून द्या. परंतु वैचारिक किंवा ध्येयविषयक नाद असल्याशिवाय कर्तृत्ववान माणसाचे जीवन घडूच शकत नाही. अलीकडेच प्रसिद्ध झालेले बर्ट्रांड रसेल यांचे आत्मचरित्र मी वाचले. रसेल यांचे वय सध्या नव्वद पंचाण्णवाच्या घरात असून इंग्लंडमधले एक फार प्रख्यात तत्त्वज्ञानी, एक फार थोर विचारवंत, एक महान शांततावादी म्हणून ते जगभर प्रसिद्ध आहेत. दोन भागांत प्रकाशित झालेल्या या ग्रंथाच्या सुरुवातीसच त्यांनी आपल्या जीवनाचा सारांश एका वाक्यात सांगितला आहे. ते वाक्य असे आहे : " My life is controlled by three passions. " आता या पॅशन शब्दाचे भाषांतर विचार म्हणून करावयाचे, की भावना म्हणून करावयाचे, की प्रेरणा म्हणून करावयाचे ते मी आपल्या कल्पनेवर सोडून देतो. पण त्यांनी हे सगळे किती सहजतेने आणि प्रामाणिकपणाने सांगितले आहे ! त्यांनी असे म्हटले आहे की, 'त्यांचे मन प्रीतीने मोहित झाले होते, ज्ञानाने मोहित झाले होते आणि दुःखी मानवाबद्दलच्या करुणेने ते भरून गेले होते.' एका थोर माणसाच्या जीवनातल्या या प्रेरणा आहेत. प्रीतीचा मोह

कोणाला असत नाही ? तो तर मानवी स्वभावधर्मच आहे. परंतु त्याचबरोबर त्यांनी ज्ञानाचा पाठलाग केला, ज्ञानाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आणि दु:खी मानवावद्दल त्यांच्या अंत:करणात जो करुणेचा भाव होता त्याने त्यांना तत्त्वज्ञानी बनविले, विचारवंत बनविले, शांततेसाठी सतत लढणारा लढवय्या बनविले. दु:खी मानवासंबंधीच्या करुणेने बुद्धाला प्रेरणा दिली आणि मानवतेला एक महा पुरुष मिळाला. दक्षिण आफ्रिकेतील दु:खितांच्या अपमानातून गांधीजींच्या मनात प्रेरणा निर्माण झाली आणि दुनियेला सत्याचा मार्ग सापडला व हिंदुस्थानला आपला राष्ट्रपिता मिळाला. गरिबांच्या, पददलितांच्या घरात जन्म झाल्यामुळे होणाऱ्या अपमानाची, अन्यायाची तिडीक पोटामध्ये जळू लागली आणि त्यातूनच डॉ. आंबेडकर निर्माण झाले. महा पुरुषांना जन्म देणाऱ्या प्रेरणा या अशा आहेत. परंतु कुठल्याही प्रेरणेशिवाय मनुष्य अगर राष्ट्र पुढे जातच नाही.

गेल्या शंभर वर्षांचा हिंदुस्थानचा इतिहास आपण पाहिला तर या काळात या देशामध्ये तीन महत्त्वाच्या प्रेरणा काम करीत होत्या, असे आपणांस आढळून येईल. पहिली प्रेरणा होती हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची. तिने अनेकांच्या जीवनात क्रान्ती केली आणि संकटाच्या वेळी अनेकांच्या हातांत सामर्थ्य दिले. लक्षावधी माणसे या प्रेरणेने प्रेरित होऊन आपापल्यापरीने आपापल्या ठिकाणी काम करीत राहिली. कोणी हालअपेष्टा सहन केल्या तर कोणी या प्रेरणेच्या पूर्तीसाठी प्राणत्याग केला. सबंध राष्ट्राला सारखे पुढे ओढीत नेण्याचे प्रचंड सामर्थ्य या प्रेरणेत होते. दुसरी प्रेरणा होती मानवतेच्या दु:खासंबंधीची. तिच्यातून सामाजिक न्यायाची कल्पना आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध लढण्याची लढाऊ प्रवृत्ती निर्माण झाली. बंगालमध्ये राजा राममोहन राय यांनी, पंजाब व उत्तर भारतामध्ये आर्यसमाजाच्या रूपाने दयानंद सरस्वतींनी आणि महाराष्ट्रामध्ये ज्योतिबा फुले, लोकहितवादी आणि आगरकर यांनी हे काम हाती घेतले. हिंदुस्थानच्या प्रत्येक प्रान्तात या प्रेरणेचा आवाज उठविणारी माणसे निर्माण झाली. तेव्हाच्या काळात सामाजिक न्यायाचा, सामाजिक प्रगतीचा एक अतिशय समर्थ विचार या प्रेरणेने हिंदुस्थानला दिला; आणि तिसरी

प्रेरणा होती ती ज्ञानाच्या, विज्ञानाच्या प्रसाराची. सामाजिक न्यायासंबंधीचा किंवा सामाजिक अन्यायासंबंधीचा जो एक पोटतिडकीचा भाग होता, त्यातूनच निर्माण झालेली ही एक भावना होती, प्रेरणा होती असे म्हटले तरी चालेल.

आपल्या देशाच्या जीवनात या ज्या तीन महत्त्वाच्या प्रेरणा होत्या त्यांपैकी दादासाहेब गायकवाड हे दुसऱ्या प्रेरणेतले आमच्या पिढीचे आजचे वारसदार आहेत असे आम्ही मानतो. दादासाहेब हे डॉ. आंबेडकरांचे शिष्य. त्यांच्या छायेखाली वाढलेले. पण खुद्द डॉ. आंबेडकरांनी महात्मा फुले यांना आपले गुरू म्हणून मानले. परंतु त्यांचे स्वत:चेच कर्तृत्व आणि बुद्धिवैभव एवढे मोठे होते की, त्यांनी आपले विचार अधिक विशाल अशा स्तरावर मांडले, आणि दु:खातूनच त्यांचा जन्म झाला असल्यामुळे त्याला त्यांनी अतिशय परिणामकारक अशी वाचा फोडली. त्यासाठी त्यांनी टाकलेली पावले इतकी मूलगामी आणि क्रांतिकारक स्वरूपाची होती की, त्यातून त्यांनी फक्त आपल्या अनुयायांनाच एक नवा प्रकाश दिला असे नव्हे तर त्यांनी आपल्या विचारांचे हे वैभव सबंध देशासाठी खुले केले असे मी मानतो.

राजकीय स्वातंत्र्याची जी पहिली प्रेरणा होती ती आज पुरी झाली आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीचे काम आज एका अर्थी पुरे झाले आहे. पण मी आताच सांगितलेल्या दुसऱ्या प्रेरणेचेही काम आज पुरे झाले आहे असे तुम्हा-आम्हांला म्हणता येणार नाही. स्वातंत्र्यप्राप्तीचे काम आज पुरे झालेले असले तरीही जी दुसरी प्रेरणा आहे ती संपूर्ण यशस्वी होईपर्यंत स्वातंत्र्याचेही काम पुरे झाले आहे असे मी मानीत नाही.

दादासाहेब गायकवाड यांच्या वाढदिवसाच्या सत्कारसमारंभासाठी आल्यानंतर मनामध्ये आज जे विचार येत आहेत ते मी बोलले पाहिजेत. त्यांची वैयक्तिक स्तुती आम्ही किती करणार? कोणी कवितागायन केले, कोणी चरित्रलेखन केले, आणि अनेकांनी त्यांच्या गुणगौरवपर येथे भाषणेही केली. पण आपल्या गुणगौरवाची भाषणे ऐकून घेण्याची हौस आज दादासाहेबांना राहिली आहे असे मला वाटत नाही. कारण साठ

वर्षांनंतर हळूहळू मनुष्य यातून मुक्त व्हावयास लागतो असे आपण मानतो. पण हा प्रश्न महत्त्वाचा नाही. माणसे शेवटी जी मोठी होतात ती निव्वळ मोठ्यांच्या पोटी जन्माला येतात म्हणून नव्हे. मोठ्यांच्या पोटी जन्माला आल्यामुळे मिळणारे मोठेपण आता जुन्या इतिहासात जमा झाले आहे. आधुनिक काळात समाजामध्ये अनेक प्रश्न, अनेक आव्हाने निर्माण होत असतात. त्यांचा धैर्याने स्वीकार करून त्यामध्ये यशस्वी होण्याचा जी माणसे प्रयत्न करतात तीच माणसे मोठी होतात. दादासाहेब गायकवाड हेही त्यांपैकीच एक होत. त्यांचे शिक्षण तसे फारसे झालेले नाही. विद्वान म्हणून नावापुढे लावण्यासाठी शिक्षणाच्या ज्या पदव्या असतात त्यांपैकी कोठलीही पदवी त्यांच्याकडे नाही. परंतु कोठल्याही विद्वानाने त्यांच्याजवळ जाऊन शिकावे असे त्यांच्यामध्ये आजही पुष्कळसे आहे. आजही ते लोकसभेत बोलावयास उभे राहिले म्हणजे सभागृहातील सर्व सभासद कान टवकारून त्यांचे भाषण ऐकत असतात. मी आपणांस सांगू इच्छितो की, दिल्लीच्या फडावर काम करणे इतके सोपे नाही. पण दादासाहेबांच्या अनुभवाने, कर्तृत्वाने, शहाणपणाने ही गोष्ट घडत असते. त्यांचे हे मोठेपण एका चळवळीतून निर्माण झालेले असून ही चळवळ अशी आहे की, जिच्यासाठी अजूनही कित्येक वर्षे आपल्याला लढा द्यावा लागेल. लढा म्हणजे तावडतोब हातामध्ये कुठला तरी काळा, पांढरा किंवा तांबडा झेंडा घरून उभे राहावयाचे, अशा प्रकारचा हा लढा नाही. हा विचारांचा लढा आहे, हे विचारांचे आंदोलन आहे, सामाजिक न्यायाचे तत्त्व प्रस्थापित व्हावे म्हणून उभी राहिलेली ही चळवळ आहे. सामाजिक न्यायाचे एक नवे जीवन निर्माण करण्याचा जो प्रयत्न हिंदुस्थानामध्ये सुरू आहे त्यासाठी अनेक मोठमोठ्या माणसांना जन्म घ्यावा लागला. महात्मा फुले, आगरकर, लोकहितवादी, महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर यांनी आपली सर्व हयात या कामासाठी वेचली. दादासाहेब गायकवाड यांनीही आपल्या परीने या कामातला आपला वाटा उचलला आहे. या दृष्टीने त्यांचे जीवन हे यशस्वी जीवन आहे. हे काम पुरे होण्यास आणखी काही कालावधी लागणार आहे. पण हे काम आपल्याला

पुरे केलेच पाहिजे. त्याशिवाय त्यातून आपली सुटका नाही.

अद्यापिही एखाद्या वक्षिसासाठी आपल्याला आपली जात, आपला धर्म लिहावा लागतो. १९६८ साली जेव्हा हे घडते तेव्हा मनाला अती दुःख होते. एखाद्या पारितोषिकासाठी शिक्षण आणि वय विचारणे योग्य होईल, पण त्यासाठी जात लिहावी लागते हे मोठे विचित्र आहे. महाराष्ट्रात मराठा की ब्राह्मण, सोनार की माळी असे काही लिहावे लागते. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, ज्यावर तुमचे-माझे अत्यंत प्रेम आहे तो आपला स्वतंत्र झालेला भारत म्हणजे काही निव्वळ नकाशातला भारत नव्हे. तो भारत म्हणजे तुम्ही, मी, सर्व माणसे आहोत. कोणी तरी चार मोठी माणसे निवडणुका लढवीत आहेत, कोणी तरी मंत्री होत आहेत, कोणाला तरी हारतुरे मिळत आहेत याला विशेष महत्त्व नाही. कारण माणसे येतील आणि जातील. परंतु तुमच्या-आमच्या मनात ज्या शक्ती निर्माण व्हावयास पाहिजेत त्या शक्ती जर आम्ही निर्माण करू शकलो नाही, तर भारत स्वतंत्र झाला, भारत मोठा झाला, भारताचा इतिहास पुढे गेला असे आपल्याला प्रामाणिकपणाने म्हणता येणार नाही.

हिंदुस्थानने एक गोष्ट केली आहे. त्याचे एक वैशिष्ट्य आहे. अनेक मोठमोठे क्रांतिकारक, साधुपुरुष या देशात जन्माला आले, पण त्या सगळ्यांना त्याने पचविले. त्याने क्रांती होऊ दिली नाही. महात्मा बुद्ध जन्माला आले आणि क्रांतीचा एक नवा विचार त्यांनी दिला. पण क्रान्तीचा त्यांचा हा सगळा विचार हिंदुस्थानच्या बाहेर ब्रह्मदेश, सिलोन, चीनमध्ये गेला, तो त्याच्याही पलीकडे जपानपर्यंत गेला, पण हिंदुस्थानात त्याचा पराभव झाला. यातच काही माणसे अभिमान मानीत असली तर मानोत बिचारी ती ! पण हिंदुस्थानमध्ये जातींच्या, धर्माच्या अशा ज्या काही जुन्या परंपरा आहेत त्या परंपरांनी सामाजिक क्रांतीला नेहमी पराभूत केलेले आहे. आम्ही कसे आहोत ? तर आम्ही आमच्या-सारखेच आहोत. हा विचार मी अनेक वेळा मांडला आहे. "आपुल्या-सारिखे करिती तात्काळ" असे संतांबद्दल सांगितले आहे. पण हे खरे नाही. आम्ही लोक असे आहोत की आम्ही आमच्या संतांनासुद्धा आमच्या-

सारखे करतो. उदाहरणच घ्या. पंढरीच्या वारकऱ्याला जागा करून चंद्रभागेच्या वाळवंटावर जातभेद काही नाही असेच जणू घोषित करीत भागवत धर्माचा झेंडा उभा राहिला. माझ्या कल्पनेने तो सुधारणेचा झेंडा होता. आजही मी पंढरपूरच्या मंदिरात जातो तेव्हा याच भावनेने जातो. चंद्रभागेच्या वाळवंटावर महाराष्ट्रातल्या खेड्यापाड्यातला ब्राह्मण, मराठा, माळी, न्हावी, भंगी, कुंभार, सुतार, महार—मी हे वेगवेगळे जातिवाचक शब्द वापरतो त्यांचा उल्लेख केला पाहिजे म्हणून वापरतो, मला त्याची काही हौस नाही—हे सगळे तेथे एका मेळ्यामध्ये आले आणि त्यांनी पंढरीचा झेंडा, भागवत धर्माचा झेंडा उभा केला. त्यामध्ये जसे तुकाराम झाले, नामदेव झाले, रामदास झाले, ज्ञानेश्वर झाले, तसेच चोखा मेळा, गोरा कुंभार आणि सावता माळी हेही झाले. खरे म्हणजे सामाजिक क्रांतीच व्हावयास पाहिजे होती अशा वेळी. पण आजही आम्ही असे पाहतो की, सावता माळी फक्त माळ्यांचा संत आहे, नामदेव फक्त शिंप्यांचा संत आहे, चोखा मेळा फक्त महारांचा संत आहे, गोरा कुंभार फक्त कुंभारांचा संत आहे. अशीच वाटणी का आम्ही नेहमी करणार आहोत? शिंपी समाजाला नाव देताना नामदेव शिंपी समाज असे म्हणतात. नामदेवांचे एवढे मोठे विश्वव्यापी काम! परंतु आज आम्ही काय त्यांना एका शिंपी समाजाचे प्रतीक मानणार? मी शिंपी समाजाला दोष देत नाही. पण आमची प्रवृत्ती कशी आहे पाहा. ज्योतिबा फुल्यांनी सामाजिक क्रांतीचा संदेश दिला. त्या संदेशातून डॉ. आंबेडकर यांच्यासारखी कर्तृत्ववान, धगधगती माणसे निर्माण झाली. एक मोठी शक्ती निर्माण झाली. पण महात्मा फुले फक्त माळ्यांचे, डॉ. आंबेडकर फक्त बौद्धांचे, गांधी फक्त गुजराथ्यांचे, टिळक फक्त ब्राह्मणांचे, शिवाजी-महाराज फक्त मराठ्यांचे अशा प्रकारे जर आम्ही या महापुरुषांच्या वाटण्या केल्या, तर या हिंदुस्थानमध्ये सामाजिक क्रांती कधीच होणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी ही दोन्ही नावे मी बरोबर घेतो. त्याचे कारण तेव्हाच्या राजकारणामध्ये त्यांच्यात कोठे कोठे

मतभेद झाले असतील, पण इतिहासाचा एक मोठा फलक नजरेसमोर ठेवून या माणसांच्या कामाचा हिशेब जेव्हा आम्ही मनामध्ये लिहू लागतो, तेव्हा या दोघांनी केलेली कामे एकाच दर्जाची आहेत असे आपल्याला वाटू लागते. त्यांनी जे विचार सांगितले, त्यांनी जे आदर्श आमच्या नजरेसमोर ठेवले, ते विचार आणि ते आदर्श यशस्वी करण्याचे काम इतके मोठे आहे की, ते तुमच्या-आमच्या जीवनामध्ये पुरे होणारे काम नाही. पण त्याकरिता लढत राहिल्याशिवाय हे काम पुरे होणार नाही ही गोष्टही आपण मनात पक्की धरली पाहिजे.

आणि म्हणून कोणी राजकारणाच्या क्षेत्रात काम करीत असतील, कोणी साहित्याच्या क्षेत्रात काम करीत असतील, कोणी आर्थिक क्षेत्रात काम करीत असतील किंवा कोणी दुसऱ्या कुठल्या क्षेत्रात काम करीत असतील, पण या सगळ्यांनी मनामध्ये हे समजले पाहिजे, की आम्ही आमच्यामध्ये नाना तऱ्हेच्या सामाजिक भेदाभेदांची मोठी थोरली उतरंड रचली म्हणून हिंदुस्थान दुबळा झाला. हिंदुस्थानचा दुबळेपणा, हिंदुस्थानचा मागासलेपणा हा या उतरंडीचा परिणाम आहे असे माझे स्पष्ट मत आहे. आम्ही खूप खटपट करतो आहोत आर्थिक क्रांती करावयाची, औद्योगिक क्रांती करावयाची. हातात आलेल्या मोठ्या थोरल्या स्वातंत्र्याच्या शक्तीचा, लोकशाहीच्या सत्तेचा वापर करावयाचा प्रयत्न चालला आहे. पण गाडा अजूनही काही फार पुढे जात नाही. याचे कारण समाजातील ही उतरंड आहे. उतरंड हा शब्द मी मुद्दामच वापरीत आहे. कारण आम्ही सर्व एकमेकांच्या डोक्यावर बसलो आहेत आणि वरचा जो खालच्याच्या डोक्यावर बसला आहे तो नुसता बसलेला नाही तर तो त्याचा गळा धरून बसला आहे, त्याचे तोंड बंद करून बसला आहे. खालच्याला काही वावच नाही. समाजामध्ये आम्ही ही जी उच्चनीचतेची, जातिभेदांची, वर्णभेदांची उतरंड रचलेली आहे ती केवळ एकाच प्रांतात रचलेली नसून सर्व हिंदुस्थानभर रचलेली आहे. ही उतरंड मोडण्याचे काम ज्या दिवशी आपण करू त्या दिवशी आपण खरी क्रान्ती केली असे मी म्हणेन. मला अतिशय आनंद आहे की, दादासाहेब गायकवाड हे मला

या क्रांतिकारक प्रवृत्तीचे एक प्रतीक म्हणून दिसत आहेत.

डॉ. आंबेडकर आणि गायकवाड यांचे नाते कोणते? जुनेच उदाहरण द्यावयाचे झाले तर प्रभू रामचंद्राचे आणि हनुमानाचे उदाहरण आपल्याला देता येईल. डॉ. आंबेडकर होते तेव्हाही दादासाहेब गायकवाड यांचे नाव आपण ऐकत होतो, पण त्यांचा पराक्रम त्या वेळी आमच्या फारसा लक्षात आला नव्हता. डॉक्टरांनी सांगितले आणि दादासाहेबांनी केले, डॉक्टरांची आज्ञा आणि दादासाहेबांचा आचार असा त्यांचा संबंध होता. मोठी कर्तृत्ववान माणसे निघून गेल्यानंतर त्यांच्या पाठीमागे आराजक निर्माण व्हावे असा आपल्याला शाप आहे. डॉ. आंबेडकरांच्यानंतर तसे होईल की काय अशी भीती होती. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, डॉ. आंबेडकरांच्यानंतर दादासाहेबांसारखा अत्यंत अनुभवी, मुरब्बी असा बौद्ध नेता समाजाला मिळाला, रिपब्लिकन पक्षाला मिळाला. त्यांनी आपली शक्ती पुष्कळ प्रमाणात एकत्र ठेवली, एवढेच नव्हे तर ती शक्ती अधिक व्यापक करण्याचा नवा मार्गही घालून दिला. यात दादासाहेबांची व्यवहारबुद्धी तर दिसलीच, पण नव्या परिस्थितीत नवी पावले टाकण्याचे त्यांचे जे धोरण दिसून आले त्याबद्दल त्यांना त्यांच्या शहाणपणाची आपल्याला पावती द्यावी लागेल. कारण ग्रंथप्रामाण्य हे पुष्कळ वेळा अडून धरते. एखाद्या महापुरुषाने एखादी गोष्ट सांगितली म्हणजे आपण त्यालाच चिकटून बसतो. पण सामाजिक जीवन हे सारखे वाढत असते, बदलत असते, गतिमान होत असते. ते तसे बदलले नाही तर तो प्रवाह होणार नाही, तो डोह होईल. डोह सुंदर असेलही कदाचित. सुरेख आंघोळ करावयालाही तो चांगला असेल. त्याच्या भोवताली मोठी चांगली बागही असेल. पण शेवटी डोह तो डोह! डोहाचा जर प्रवाह व्हावयाचा असेल तर तो बदलत राहिला पाहिजे. नाशिकच्या या घाटावर मी आता जेव्हा बोलतो आहे तेव्हा मला समोर दिसणारे पाणी पुढच्या क्षणाला तेथे असणार नाही. ते कुठल्या कुठे निघून गेलेले असेल. असे जेव्हा पाणी वाहत राहते तेव्हा ते जिवंत राहते. समाजाचे जीवनसुद्धा आपल्याला असेच प्रवाही आणि जिवंत

ठेवावयाचे असेल तर आपण विचारांची अंमलबजावणी केली पाहिजे, त्याचा आचार घडविला पाहिजे. पण हे करताना भोवतालची परिस्थिती आणि वातावरण यांचा विचार करावा लागतो, त्यासाठी व्यवहारबुद्धी असावी लागते. ही व्यवहारबुद्धी दादासाहेबांनी आपल्या कामात फार उत्तम तऱ्हेने दाखविलेली आहे. आपल्या मूळ निष्ठा, मूळ प्रेरणा यांच्याशी कोठलीही तडजोड न करता त्यांचा लोकजीवनामध्ये आचार घडवीत असताना करावे लागणारे फेरफार ज्या माणसाला समजतात त्याला मी नेता मानतो, आणि अशा प्रकारचे अतिशय यशस्वी व उत्कृष्ट नेतृत्व दादासाहेबांनी आपल्याला दिले आहे.

आज त्यांचे वय ६७ वर्षांचे आहे. ते १०० वर्षे जगावेत अशी आपण प्रार्थना करू या. त्यांच्यासारखा कर्तृत्ववान मनुष्य आज आमच्यामध्ये आहे म्हणून आम्ही सगळी माणसे एकत्र येऊ शकलो याबद्दल आम्हांला अतिशय आनंद आहे. येथे पक्षाची दृष्टी नाही. या समारंभाचे स्वागताध्यक्ष आहेत महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध साहित्यिक आणि कवी. या समारंभाचे अध्यक्ष आहेत महाराष्ट्राचे मुख्य मंत्री, आणि सत्कार-समारंभाचा हा रथ ओढण्याकरिता आम्ही सर्व लहानथोर माणसे आज येथे एकत्र जमलो आहोत. त्या सगळ्यांमध्ये एक प्रेरणा आहे, एक ध्येय आहे आणि ही प्रेरणा आणि हे ध्येय दादासाहेबांच्या रूपाने या रथात बसले आहे असे आम्ही मानतो. दादासाहेबांचे जीवन अधिक यशस्वी होवो आणि त्यांनी जे काम आपल्या हाताशी धरले आहे, ते काम नित्य पुढे पुढे जात राहो अशी मी प्रार्थना करतो आणि माझ्या संपूर्ण सदिच्छा त्यांना देऊन मी माझे भाषण पुरे करतो.

दादासाहेब गायकवाड सत्कार समारंभ, नाशिक, दि. १३-१०-६८

२१ आमची मूळ समस्या

दोन वर्षांपूर्वी शिवाजी विद्यापीठाच्या उद्घाटनसमारंभासाठी मी राष्ट्राध्यक्षांच्या बरोबर कोल्हापूर येथे आलो होतो. त्यानंतर शिवाजी विद्यापीठाच्या कामासाठी पुन्हा मी आज कोल्हापूरला आलो आहे. अशा वेळी आपल्या नगरपालिकेने आपणा सर्वांना भेटण्याची मला सुसंधी आणून दिली त्याबद्दल नगरपालिकेच्या अध्यक्षांचे आणि इतर कार्यकर्त्यांचे मला आभार मानले पाहिजेत. आज दोन समारंभ माझ्या हातून आपण घडवून आणले आहेत. परंतु निव्वळ या कामासाठी मी आलो नसतो आणि आपणही केवळ एवढ्यासाठी मला बोलाविले नसते. आज माझ्या हस्ते आपण आपल्या मार्केटचे उद्घाटन केले आणि दत्तोबा शेळके यांच्या नावाने बांधलेल्या एका छोट्याशा शाळेचा नामकरण समारंभही आपण माझ्या हस्ते पार पाडला. मार्केटसंबंधी मी विशेष काय बोलू? परंतु दत्तोबा शेळक्यांसंबंधी मला दोन शब्द बोलले पाहिजेत. ते नगराध्यक्ष असताना मी त्यांना भेटलो होतो आणि त्यांचे कामही मी पाहिले होते. स्थानिक क्षेत्रात काम करणाऱ्या चांगल्या कार्यकर्त्यांची समाजाने कृतज्ञता-

पूर्वक जाणीव ठेवली पाहिजे. सामान्यतः सगळ्या लहानमोठ्या गोष्टींना गांधी, नेहरू, शिवाजीमहाराज यांसारख्या फार मोठ्या पुरुषांची नावे द्यावयाची अशी आपल्याकडे एक प्रथा पडली आहे. गांधी, नेहरू, शिवाजी-माहाराज ही फार मोठी माणसे आहेत. त्यांची स्मारके मोठ्या कार्यासाठी, मोठ्या गोष्टींसाठी झाली पाहिजेत आणि ती तशी होतीलही. लहानसहान गोष्टींना त्यांची नावे देण्याने त्यांच्या मोठेपणात आपण भर घालत नाही तर त्यांच्यासंबंधी आपल्याला वाटणारा सद्भाव आणि आदर आपण व्यक्त करीत असतो. परंतु शेळक्यांनी केलेले कार्य आपण रुजू करून घेतले आणि एका छोट्याशा संस्थेला त्यांचे आपण नाव दिले याला फार महत्त्व आहे. समाजाला कृतज्ञतेची जाणीव आहे अशी भावना त्यामुळे लोकांमध्ये निर्माण होते, कार्यकर्त्यांच्या कुटुंबियांमध्ये निर्माण होते, त्यांच्या जवळच्या आप्तेष्टांमध्ये आणि त्यांच्या विभागामध्ये निर्माण होते. कार्यकर्त्यांना वाटते, ठीक आहे, समाज आपले काम जाणतो; आणि म्हणून या स्मारकाच्या रूपाने आपण फार चांगली गोष्ट केलीत, एक फार चांगला पायंडा पाडलात याबद्दल मला अतिशय आनंद वाटतो.

आपल्याला कदाचित कल्पना असेल की, कामाची व्याप्ती जितकी जास्त तितकी त्याची खोली कमी असते. निसर्गाचाच हा नियम आहे. परंतु लहान क्षेत्रात काम करणारा जो मनुष्य असतो त्याचे काम उभे राहते, त्याचे काम उठून दिसते. अशा प्रकारच्या कामाचा दैनंदिन जीवनाशी संबंध असल्यामुळे, या क्षेत्रात नेकीने काम करणाऱ्या, तळमळीने काम करणाऱ्या माणसांची समाजाला आज फार गरज आहे; आणि म्हणून दत्तोबांचे नाव आपण या शालागृहाला दिले ही आपण फार चांगली गोष्ट केली. अशा प्रकारचे काम करण्यासाठी शंभर टक्के गुण असणारा कार्यकर्ता असावा लागतो असे नाही, आणि अशा कार्यकर्त्याला सगळी विशेषणे लावण्याचीही गरज नाही. आज अशी किती माणसे सापडतील की, ज्यांना सगळीच विशेषणे आपल्याला लावता येतील? आपण लावतो ही विशेषणे; पण ती सगळीच खरी असतात असे थोडेच आहे? व्यवहार म्हणून लावतो ही विशेषणे

आपण एकमेकांना. आताच माझ्यासंबंधी बोलताना आपण बरीचशी विशेषणे लावलीत ती सगळीच खरी असतील असे का आपणांस म्हणावयाचे आहे? परंतु सामान्य माणसांतला एखादा मनुष्य जेव्हा काही कार्य करण्याचा प्रयत्न करतो, त्याच्या कार्याच्या रूपाने आपण त्या गुणांचा स्वीकार करतो आणि त्याच्या स्मारकाच्या रूपाने आपण त्या गुणांची पूजा बांधतो; आणि म्हणून आपण आयोजित केलेला हा समारंभ पाहून मला फार आनंद वाटला. दत्तोबांची दोन छोटी मुले शेजारी होती. आपल्या वडिलांनी केलेले कार्य समाजाने स्वीकारले हे त्यांना या शाळेच्या रूपाने दिसले. त्यामुळे या मुलांपुढे आपल्या वडिलांचा मोठा आदर्श राहील, आपल्या वडिलांबद्दल मोठा अभिमान वाटेल, एवढेच नव्हे तर या शहराबद्दलही त्यांना अभिमान वाटेल. या शहराकरिता आपल्यालाही काही केले पाहिजे असा विचार कधीतरी त्यांच्या मनामध्ये येऊन जाईल, आणि म्हणून दत्तोबांनी केलेल्या कार्याचे आपण हे जे स्मरण ठेवीत आहात ही अत्यंत महत्त्वपूर्ण अशी गोष्ट आहे. पण याचा अर्थ असा नव्हे की, उठल्या सुटल्या सर्व संस्थांना आपण आपलीच नावे देत सुटावे. असे होता कामा नये. यातल्या ज्या मर्यादा आहेत, जे धोके आहेत ते आपण ओळखले पाहिजेत.

कोल्हापूरच्या नागरिकांना मी आज भेटतो आहे. तेव्हा सर्वसामान्यपणे माझे विचार मला त्यांच्यापुढे मांडले पाहिजेत. नगरपालिकेने नागरिकांना उद्देशून मला येथे बोलाविले आहे, तेव्हा अगदीच नगरपालिकेच्या मर्यादित क्षेत्रापुरते बोलण्याची मला आवश्यकता वाटत नाही. पण मी पूर्वी बोललो होतो त्याची पुनरुक्ती करून एक गोष्ट मला जरूर बोलली पाहिजे.

आपले हे कोल्हापूर शहर ऐतिहासिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या आणि इतर अनेक दृष्टींनी पूर्वी महत्त्वाचे होते ही गोष्ट खरी आहे. हे शहर पूर्वी कोल्हापूर राज्याची राजधानी होते. पण ते आता एका विद्यापीठाची राजधानी झाले आहे. ते एक विद्यापीठनगर झाले आहे. ही फार महत्त्वाची बाब आहे. कोल्हापूर आणि त्याच्या आवतीभोवतीच्या पाच-

सहा जिल्ह्यांतील नवीन उगवती पिढी, कोल्हापूरकडे शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी म्हणून एका विशिष्ट भावनेने पाहणार आहे. या विद्यार्थ्यांना कोल्हापुरात यावे-जावे लागेल. कोल्हापूरच्या अनेक गोष्टी ते पाहतील. कोल्हापूरच्या जीवनाचा, त्यांच्या जीवनाशी काही ना काही संपर्क येत राहील आणि त्याचा परिणाम त्यांच्या जीवनावर जरूर घडेल. त्यामुळे कोल्हापूरच्या सार्वजनिक जीवनावरही एक नवीन जबाबदारी आली आहे. त्यासाठी काय केले पाहिजे हा आपला प्रश्न आहे. आपले हे शहर विद्यापीठनगर झाले म्हणजे आपल्या शहराची शोभा वाढविणारी एक गोष्ट घडली अशाच अभिमानाने आपण या घटनेकडे पाहिले तर ते अपुरे ठरेल. तसे पाहण्यास काही हरकत नाही. तसे पाहिलेही पाहिजे. पण नुसते तसे पाहणे अपुरे ठरेल. आपले शहर विद्यापीठनगर बनल्यामुळे त्यावरोबर येणाऱ्या नवीन जबाबदारीचा काहीसा तरी हिस्सा आपल्या नगरपालिकेला जरूर उचलावा लागेल. येथे जे हजारो विद्यार्थी येत राहतील, त्यांच्या सुखसोयींचा प्रश्न निर्माण होईल. त्यांचे काही काळ तरी येथे वास्तव्य राहील आणि त्यातून अनेक प्रश्न निर्माण होतील. त्यांच्या मनावर चांगले संस्कार व्हावेत म्हणून काही गोष्टी करणे आपल्याला प्राप्त होईल, त्यासंबंधी आपल्याला विचार करावा लागेल. आपल्याला हे सर्व पाहावे लागेल. इतर देशांमध्ये विद्यापीठनगरे असतात तेथे काय केले जाते आणि त्या दृष्टीने आपल्याला येथे काय करता येणे शक्य आहे याचाही आपल्याला विचार करावा लागेल. आपण म्हणाल की, विद्यापीठ होते आहे तर विद्यापीठाचा परिसर (Campus) बनेल. शासन पैसा खर्च करील. शासन तर आपली जबाबदारी उचलीलच. शासनाने ज्या गोष्टी केल्या पाहिजेत त्या गोष्टी शासन करीत राहील. परंतु विद्यापीठनगरामुळे काही नागरी स्वरूपाचे प्रश्न निर्माण होतात, जबाबदाऱ्या निर्माण होतात, गरजा निर्माण होतात, त्यांचा आपणालाही विचार करणे आवश्यक आहे. नगरपालिकेने आयोजित केलेल्या नागरिकांच्या या सभेमध्ये या गोष्टींचा उल्लेख करणे मला आवश्यक वाटले म्हणून त्यासंबंधी मी हे सर्व बोललो.

सामान्यपणे मला ज्या दुसऱ्या गोष्टींसंबंधी आपल्याशी बोलले पाहिजे त्यांच्याकडे मी आता वळतो. १९६४ साल हे हिंदुस्थानच्या इतिहासामध्ये एक मोठे जबाबदारीचे साल ठरले आहे. गेली सोळा-सतरा वर्षे या देशाचे ज्यांनी नेतृत्व केले ते पंडित नेहरू गेल्यामुळे त्यांच्याशिवाय हिंदुस्थानचे चित्र डोळ्यांपुढे उभे करण्याचा दुर्धर प्रसंग, दुःखदायी प्रसंग, आपल्यावर आलेला आहे. १९६४ पूर्वीच्या स्वातंत्र्योत्तर कालाचा आपण विचार केला तर एका दृष्टीने आपण फार भाग्यवान होतो असे म्हटले पाहिजे. कारण जी माणसे देशाच्या स्वातंत्र्याच्या किंवा देशाच्या जीवनात घडणाऱ्या क्रान्तीची आखणी करतात, बांधणी करतात, त्यांनाच ती क्रान्ती पुरी करण्याचा किंवा त्या क्रान्तीतून निर्माण झालेल्या शक्तींचा आणि साधनांचा वापर करून देशाची पुनर्रचना करण्याचा योग क्वचितच लाभतो. फ्रान्सच्या राज्यक्रान्तीचाच इतिहास घ्या. या क्रान्तीतून लोकशाहीचा जन्म झाला म्हणून आम्ही या राज्यक्रान्तीकडे मोठ्या अभिमानाने पाहतो. परंतु लोकशाहीला जन्म देण्याशिवाय ही राज्यक्रान्ती लोकशाहीची अधिक सेवा करू शकली नाही. ज्या पिढीमध्ये या राज्यक्रान्तीने लोकशाहीला जन्म दिला त्याच पिढीमध्ये तिने नेपोलियनसारखा एक सम्राटही निर्माण केला असा या राज्यक्रान्तीचा इतिहास आहे. दुसरे उदाहरण रशियन राज्यक्रान्तीचे आहे. या राज्यक्रान्तीचा प्रणेता लेनिन हा मोठ्या दूरदृष्टीचा पुढारी होता. त्याने जी राज्यक्रान्ती केली तिचे सहा-सात वर्षे मार्गदर्शन करण्याची त्याला संधी मिळाली. १९१७ च्या ऑक्टोबरमध्ये रशियात क्रान्ती झाली आणि क्रान्तीनंतरच्या अंतर्गत यादवीमुळे पाच वर्षे रशियाला अतिशय विकट गेली. १९२२ च्या डिसेंबर महिन्यात पूर्वेकडून रशियावर आक्रमण करणाऱ्या जपानी सैन्याची शेवटची तुकडी रशियातून बाहेर पडली आणि त्याच महिन्यात लेनिनला अर्धांगवायूचा झटका आला आणि जवळ जवळ वर्षभर तो विकलांग स्थितीत पडून होता. मी या सगळ्या गोष्टींचा केवळ तुलनेकरिता उल्लेख करतो आहे. आपल्याकडील परिस्थिती अगदी निराळी होती. १९२० ते १९४७ या सत्तावीस वर्षांच्या कालखंडात, ज्यांच्या हातून अनेक घटना घडल्या, आणि ज्यांच्या-

मुळे आपल्याकडील क्रान्तीला एक वेगळे स्वरूप प्राप्त झाले अशी गांधी, नेहरू, सरदार पटेल, राजेन्द्र प्रसाद, मौलाना आझाद, यांच्यासारखी पल्लेदार काम करणारी माणसे आपणांत होती. परंतु जवळ जवळ हे सर्व नेते १९४७ नंतर थोड्याच वर्षांच्या अवधीने आमच्यातून गेले. पण त्यांच्यातला एक फार मोठा पुरुष या क्रान्तीतून निर्माण झालेल्या स्वराज्याला, सुराज्याचे आणि समाजवादी राज्याचे स्वरूप देण्याकरिता सोळा-सतरा वर्षे आम्हांला मार्गदर्शन करीत राहिला. म्हणून हिंदुस्थान या दृष्टीने फार भाग्यवान होता असे म्हटले पाहिजे.

पण १९६४ नंतर तुम्हा-आम्हांला जरा दुसऱ्या दृष्टीने विचार केला पाहिजे. त्याची आज फार गरज आहे. हा जो विचार मी मांडतो आहे तो पक्षीय विचार नसून राष्ट्रीय विचार आहे. कारण हिंदुस्थानचे आजचे जे प्रश्न आहेत ते इतके मूलभूत आहेत की, या प्रश्नांकडे केवळ पक्षीय दृष्टीने पाहिल्यास त्यांची उकल करण्याचे काम फार अवघड होऊन बसेल. हिंदुस्थानचे हे जे प्रश्न आहेत, ह्या ज्या समस्या आहेत त्या सगळ्यांत महत्त्वाची समस्या देशाच्या विकासाची आहे. कारण सबंध दुनियेमध्ये स्वातंत्र्याच्या ज्या चळवळी किंवा क्रांत्या झाल्या त्या चळवळींचा किंवा क्रांत्यांचा मूळ हेतू समाजाचा विकास करण्याचा होता. समाजवादाकडे राजकीय किंवा वैचारिक मतभेदांच्या चष्म्यातून न पाहता समाजाचा गतिशील रीतीने विकास करण्याचे ते एक तंत्र आहे, या दृष्टीने समाजवादाकडे आपण पाहिले पाहिजे. मागासलेला समाज, थोड्याच काळात प्रगतिमान करण्याचे ते एक तंत्र आहे. खरे म्हणजे विकासाचा प्रश्न हा आज सर्व दुनियेमध्ये खरा महत्त्वाचा प्रश्न होऊन बसला आहे. केवळ तुम्ही आम्हीच या देशामध्ये त्याचा विचार करतो आहोत, किंवा जे अविकसित देश आहेत तेच फक्त विकासाचा प्रयत्न करतात असे नसून जे अती विकसित देश आहेत तेही अधिक विकासाचा प्रयत्न करून राहिले आहेत.

विमानाच्या उत्पादनक्षेत्राशी गेल्या दोन वर्षांचा माझा संबंध आहे. अनुभव असा आहे की, अतिशय महत्त्वाचे म्हणून मानल्या गेलेल्या

विमानाच्या उत्पादनाची रचना आणि तयारी केल्यानंतर प्रत्यक्ष उत्पादनासाठी कित्येक वर्षांचा काळ निघून जातो, आणि या काळात आपल्या लक्षात येते की दुनिया आणखी पुष्कळच पुढे गेलेली आहे. या परिस्थितीचे तीन-चार वर्षांपूर्वी एका गृहस्थाने माझ्याजवळ फार चांगल्या पद्धतीने वर्णन केले होते. तांत्रिक जगाची आज जी झपाट्याने प्रगती होत आहे तिचे वर्णन करताना हे गृहस्थ म्हणाले होते की, "To remain where you are, you have to run very fast" तुम्ही जेथे आहात तेथेच तुम्हांला जरी थांबावयाचे असले तरी त्यासाठीसुद्धा तुम्हांला फार वेगाने धावावे लागेल. तुम्ही अजिबात धावला नाहीत तर पुढे जाण्याची गोष्टच सोडून द्या. तुम्ही आहात तेथे तर तुम्हांला राहता येणार नाहीच, उलट एकसारखे तुम्ही मागे पडत राहाल. आजकालच्या जीवनातली गतिमानता ही इतकी वाढलेली आहे.

तेव्हा हिंदुस्थानच्या विकासाचा खरा प्रश्न हा आहे की, किती जलदीने आम्ही विकास करू शकतो. दुसऱ्या क्षेत्रातले आमचे जुने प्रश्न पुनःपुन्हा आम्हाला तोंड दाखवून आठवण करताहेत की आम्ही आहोत, आम्ही गेलेलो नाही. स्वातंत्र्याच्या सोळा-सतरा वर्षांनंतरही आमचा जुना अन्नधान्याचा प्रश्न हळूच तोंड वर करून आम्हांला सांगतो आहे की मी आहे, मी अजून गेलेलो नाही. अन्नधान्याच्या प्रश्नाचे हे दुखणे आमच्या पाठीमागे कैक वर्षे लागलेले आहे. हे सगळे प्रश्न पुनःपुन्हा आमच्यापुढे उभे राहतात, याचे कारण हे आहे की, आमच्या विकासाची शक्ती ज्या गतीने वाढली पाहिजे त्या गतीने ती वाढत नाही. आपण प्रयत्न करतो आहोत पण तो अपुरा पडतो आहे. काही मंडळी याचा अर्थ असा करतात की, आम्ही विकास करीतच नाही. पण हे खरे नाही. विकास होतो आहे. परंतु तो समाजाच्या सगळ्या गरजा, सगळ्या अपेक्षा पूर्ण करण्याइतका परिणामकारक होत असल्याचे दिसत नाही. तो तसा व्हावा म्हणून काय करणे आवश्यक आहे हे आपण पाहिले पाहिजे. समाजाची विकासक्षमता जेव्हा वाढवावयाची असते तेव्हा त्याला गतीने पुढे जावे लागते. तीन पंचवार्षिक योजनांच्या काळात आपण हे करू शकलो नाही.

आता चौथ्या आणि पाचव्या पंचवार्षिक योजनांचा काळ असा आहे की, हिंदुस्थानची असेल नसेल ती शक्ती एकवटून प्रयत्न केल्याशिवाय आपण प्रगती करू शकणार नाही. एवढेच नव्हे तर असा प्रयत्न न झाल्यास गेल्या दहा-पंधरा वर्षांमध्ये आपली जी प्रगती झाली आहे तीही हातातून निसटून जाण्याचा संभव निर्माण होणार आहे. राजकारणाच्या पुढचा आज आमचा प्रश्न कोणती घोषणा द्यावी हा नसून विकासासाठी, गतिमान विकासासाठी, जलद विकासासाठी, कोणत्या तऱ्हेचे तंत्र आम्ही वापरले पाहिजे हा आहे. आपल्याला अभिप्रेत असलेला विकास साधण्यासाठी साधने कोणती असावीत, साधने अपुरी असतील तर ती निर्माण करण्याकरिता कोणत्या तऱ्हेची उपाययोजना करावी याचाही विचार ओघाने येतो. त्यासाठी कोणत्या तऱ्हेची समाजपद्धती किंवा राज्य-पद्धती स्वीकारली पाहिजे याचाही विचार होणे आवश्यक होते.

समाजाने स्वतःच्या जीवनासाठी एक प्रकारची शिस्त स्वीकारावी लागते. ती शिस्त स्वीकारण्याची आपली किती तयारी आहे हासुद्धा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. आम्ही याचाही विचार केला पाहिजे. स्वतःच्या जीवनासाठी समाज कशा प्रकारची शिस्त पाळतो याचे उदाहरण मी रशियामध्ये पाहिले. ज्या देशात मनुष्य जाऊन येतो त्या देशाची तो स्तुती करू लागतो, हा आपला नेहमीचा अनुभव आहे. पण निव्वळ रशियाची स्तुती करण्याकरिता मी या गोष्टीचा उल्लेख करीत नाही. तर परदेशात आपल्याला जे चांगले दिसले ते आपण लक्षात ठेवले पाहिजे. त्यापासून योग्य तो बोध घेतला पाहिजे, म्हणून मी आपल्याला ही गोष्ट सांगतो आहे. रशियामध्ये सध्या गव्हाची कमतरता आहे. बाहेरून गहू आणण्याचा तेही प्रयत्न करतात. परंतु या टंचाईमुळे आपण ज्याला व्हाईट ब्रेड म्हणतो तो तेथे कमी प्रमाणात देतात. याचा अर्थ तेथे खाण्यापिण्याची कमतरता आहे असा नाही. पुष्कळ लोकांचा हा गैरसमज आहे. आमच्या देशात तृणधान्य खाण्याची आम्हाला सवय असल्यामुळे अन्नधान्याचा प्रश्न म्हणजे गहू, तांदूळ, ज्वारी वगैरेचा प्रश्न असे आम्ही समजतो. परंतु रशियामध्ये लोक वेगवेगळ्या तऱ्हेचे मासे, वेगवेगळ्या

तऱ्हेचे मांस आणि वेगवेगळ्या तऱ्हेचे पदार्थ खातात आणि तेही चांगले खातात. तेथे पाव खाण्याची पद्धत आहे. पण गव्हाच्या टंचाईमुळे व्हाईट ब्रेडचे व ब्राऊन ब्रेडचे फक्त दोन-दोन तुकडे तेथे देतात. सगळ्या भोजन-समारंभाच्या वेळी मला हा अनुभव आला. पाव खाण्याच्या वेळी माझा हात सवयीप्रमाणे पहिल्याने पांढऱ्या तुकड्याकडे जात असे. पण मी वारकाईने पाहिले तेव्हा मला असे आढळून आले की रशियन माणसाचा हात अगदी साध्या माणसापासून तो थेट क्रुश्चेव्हपर्यंत, पहिल्याने ब्राऊन ब्रेडकडे जात असे. भोजनाच्या प्रत्येक प्रसंगी मला हा अनुभव आला. मी आपल्याला सांगितलेली ही गोष्ट अगदी साधी आहे, अगदी लहान आहे. पण तिच्यामध्ये एक सामाजिक शिस्त आहे. ती शिस्त पाळण्याची, स्वीकारण्याची तिच्यात एक प्रकारची तयारी आहे. समाजामध्ये ज्या वेळी काही गोष्टींची कमतरता निर्माण होते, त्यांची तीव्रतेने टंचाई भासू लागते, त्या वेळी त्या गोष्टी आम्हांला मिळाल्या पाहिजेत अशा घोषणा करून चालत नाही, रागावून भागत नाही, तर आहेत त्या गोष्टी स्वीकाराव्या लागतात आणि त्यांची कमतरता दूर करण्यासाठी प्रयत्न करावा लागतो. हे करीत असताना काही शिस्त स्वीकारावी लागते. याचा अर्थ आपण अधिक कष्ट करा किंवा कमी खा असा नाही. मी या सामाजिक शिस्तीचा उल्लेख अशा अर्थाने केला की, जेव्हा विकासाच्या या मोठ्या यात्रेमध्ये तुम्हा-आम्हांला आपल्या देशाला पुढे घेऊन जावयाचे आहे तेव्हा काही कठीण शिस्तीचे प्रयोग आपल्याला या देशामध्ये स्वीकारावे लागतील. प्रगत देशांमध्ये आढळणाऱ्या सगळ्या सुखसोयी आणि गरिबी हटविण्याची गरज या दोन्हीचे लग्न लागत नाही, हे आपण आता ओळखले पाहिजे.

या देशाच्या मूळ समस्यांत, संरक्षणाच्या प्रश्नांची आणि या प्रश्नांतून निर्माण झालेल्या जबाबदाऱ्यांची बरीच मोठी भर पडली आहे. एक गोष्ट साफ आहे की, चीनच्या आक्रमणामुळे संरक्षण-प्रश्नांची आणि संरक्षण-प्रयत्नांची एक भली मोठी, लांबलचक मालिका या देशापुढे निर्माण झालेली आहे. आर्थिक विकासाची प्रगती चालू असताना संरक्षणाच्या

प्रयत्नांचे हे जे ओझे आपल्यावर पडलेले आहे ते आपण स्वीकारले पाहिजे. हिंदुस्थानपुढील ही एक अत्यंत कठीण समस्या आहे; आणि ही कठीण समस्या जेव्हा आज आपल्याला जास्त तीव्रतेने जाणवते आहे त्या वेळी पंडित नेहरू तुमच्या-आमच्यामध्ये नाहीत. पण कर्तव्याची जाणीव आपण नेहमी मनामध्ये ठेवली पाहिजे. नेहरूंसारखा फार मोठा नेता सगळ्यांनाच बरोबर घेऊन पुढे जात असतो. पण तो जेव्हा निघून जातो तेव्हा सगळ्यांनाच नेता बनण्याची गरज उत्पन्न होते. याचा अर्थ सगळ्यांनी पुढारी बनावे असा नाही, तर यातून जी परिस्थिती निर्माण होते त्याची आपल्याला जाणीव असली पाहिजे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला या विचाराने प्रेरित होण्याची आज गरज निर्माण झालेली आहे. माझ्या मते ही गरज ज्या प्रमाणात हिंदुस्थानच्या जीवनामध्ये व्यक्त होईल, प्रतीत होईल, त्याच प्रमाणात आणि त्याच गतीने हिंदुस्थानचा प्रश्न सुटणार आहे. हिंदुस्थानचा प्रश्न हा एका पक्षाचा, एका विचाराचा मक्ता नाही. चाळीस कोटी जनतेच्या भाग्योदयाचा हा प्रश्न असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीने त्या दृष्टीने या प्रश्नाकडे पाहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हा प्रयत्न करण्यासाठी माझ्या या चार विचारांची आपल्याला मदत झाली तर मला अतिशय आनंद वाटेल. जयहिंद !

कोल्हापूर नगरपालिका सत्कार समारंभ, कोल्हापूर, दि. ६-१०-६४

२२ आजच्या साहित्याकडून अपेक्षा

उद्‌घाटनाचे महत्त्वाचे जे कार्य ते मी पार पाडले आहे. दीपज्योती प्रज्वलित करून उद्‌घाटन झाल्याचे कृतीने जाहीर केल्यानंतर शब्दोच्चाराने ते जाहीर करण्याची फारशी आवश्यकता नाही. परंतु एक औपचारिक भाग म्हणून मी आपल्यापुढे चार शब्द बोलणार आहे. साहित्यसंमेलन हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील एक मोठा सोहळा आहे. ह्या सोहळ्यात सामील होण्याकरिता महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांतून अनेक पंडित, प्राचार्य, साहित्यिक आणि सामान्य रसिक दरवर्षी गोळा होतात आणि हा संमेलन-सोहळा साजरा करतात. या संमेलनाच्या सोहळ्यामध्ये मलाही आपण या वर्षी सामील करून घेतले आहे त्याबद्दल स्वागत-मंडळाचा मी मनापासून आभारी आहे.

या ठिकाणी एकत्र येऊन साहित्यातील विविध प्रवाहांसंबंधी आपण चर्चा कराल, साहित्यातील जीवन यापुढे कसे बांधावे यासंबंधी आपण विचारविनिमय कराल आणि महत्त्वाचे निर्णय घेऊन येथून परत जाल. अशा वेळी माझ्यासारख्या माणसाने मध्येच तोंड उघडावे हे एक प्रकारचे

संकटच आहे. माझ्यावरही आहे आणि आपल्यावरही आहे, परंतु गेल्या दोन-तीन महिन्यांत प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनी त्यांच्या सत्कार समारंभांतून जो एक फार चांगला विचार मांडला आहे, त्याची मला आज आठवण झाली. मला समीक्षा आवडत नाही, साहित्य आवडते असे ते या सत्कार-समारंभांतून म्हणाले. हा त्यांनी फार चांगला विचार सांगितला. पण विचाराची हीच पद्धती पुढे चालू ठेवावयाची झाली तर असे म्हणता येईल की, साहित्य हेसुद्धा एका अर्थाने जीवनाची समीक्षा आहे. साहित्य-निर्मिती करावी, पण खरे म्हणजे जीवनावरचा लोभ सोडू नये, जीवनावरचे प्रेम कायम ठेवावे. जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत काम करणाऱ्या सगळ्याच माणसांचा नाही म्हटले तरी साहित्याशी संबंध येतो. मग हे काम जीवनाच्या कोठल्याही क्षेत्रातले असो. शब्दांच्या मदतीशिवाय ते आपणांस पार पाडता येत नाही. शब्दांचा वापर करून त्यांच्यामार्फत विचार मांडावयाचा असतो. मग हे प्रकटीकरण कोणी लेखनद्वारा करील किंवा कोणी वाचेद्वारा करील. पण या प्रकटीकरणातूनच शेवटी साहित्य-निर्मिती होत असते. निव्वळ शब्दलालित्य म्हणजे साहित्य ही साहित्याची व्याख्या घेऊन त्याप्रमाणे चालण्याचा काळ संपलेला आहे. याचा पुरावा या साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष प्रा. वा. ल. कुलकर्णी हे स्वतःच आहेत. मला वाटते, मराठी साहित्यसंमेलनाचे समीक्षक अध्यक्ष प्रा. कुलकर्णी हे पहिलेच असावेत. जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांशी अधिक निकटचे संबंध प्रस्थापित केल्याशिवाय आणि जीवनामध्ये असलेले श्लेष आणि काव्य यांच्याशी अधिक जवळीक केल्याशिवाय साहित्यात फारशी मोलाची भर कोणी घालू शकेल असे मला वाटत नाही.

मला आपल्यापुढे जो एक विचार आग्रहाने मांडावयाचा आहे त्याचा उल्लेख आताच महामहोपाध्यायांनी केला आणि त्यांच्यापूर्वी श्री. एकबोटे यांनीही त्याचा उल्लेख केला. ज्या काळामध्ये आपण वावरतो आहोत तो काळ आपल्या देशाच्या दृष्टीने एका अर्थाने क्रांतिकारक असा काळ आहे. घडलेल्या इतिहासाचे संक्षेपण करण्याचे काम ही इतिहास-संशोधक मंडळी करीतच आहेत. परंतु भारतातील कोट्यवधी लोकांच्या जीवनावर

एका अर्थाने अत्यंत दूरगामी परिणाम करणारा असा इतिहास आज येथे घडतो आहे आणि यापुढेही तो घडत राहणार आहे. देशाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये आज जे एक प्रकारचे मोठे रामायण घडले जात आहे, जे एक नवीन जीवन निर्माण करण्याचे प्रयत्न होत आहेत, त्याचाही परिणाम आपल्या जीवनावर झाल्याशिवाय कसा राहील ? आणि म्हणून या नव्याने येऊ घातलेल्या जीवनाशी संबंध प्रस्थापित करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. आजकाल संघर्षाचा उल्लेख पुष्कळ वेळा केला जातो. पण मला वाटते बऱ्याच वर्षांनंतर—शेकडो वर्षांच्या कालावधीनंतर—एक-भारतीयत्वाची अनुभूती केवळ नुसत्या शब्दानेच नव्हे, केवळ नुसत्या भावनेनेच नव्हे तर अत्युच्च त्यागाच्या कृतीने आम्ही पहिल्या प्रथम प्रत्यक्षात आणली आहे. तसा अनुभव आज येतो आहे आणि हा अनुभव यापुढे वाढत राहणार आहे. भारताची एकात्मता सांस्कृतिकदृष्ट्या इतिहास-कालापासून आहे किंवहुना त्याही कालापूर्वीपासून आहे. परंतु आज जे घडते आणि उद्या घडत राहणार आहे ते सगळ्यांच्या प्रयत्नाने घडत आहे, घडणार आहे, हा अनुभव नवीन आहे आणि तो नित्य वाढत राहणार आहे, आणि म्हणून मला वाटते की, जे साहित्यिक आहेत त्यांच्या अनुभवाच्या मर्यादा, ज्या विभागात त्यांचे वास्तव्य आहे त्या विभागातील विविध क्षेत्रांपर्यंत तर पोहोचल्या पाहिजेतच. परंतु त्याहीपेक्षा त्यांच्या कक्षा अधिक विस्तृत झाल्या पाहिजेत, आणि म्हणून हैदराबादला भरणारे हे साहित्य संमेलन या दृष्टीने मला एक फार मोठी शुभ घटना वाटते.

आता येथे कोणीसे म्हटले की, इतर भाषा-भगिनींच्या साहित्य-जीवनाशी संपर्क ठेवण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. परंतु अशा प्रकारचा संपर्क ठेवून आमच्या साहित्यात फारसा फरक होईल असे मी मानीत नाही. मला वाटते, याच्याही पुढे आपण जावयास हवे. अधिक स्पष्ट करून बोलावयाचे म्हणजे तिथल्या प्रत्यक्ष जीवनाशी संपर्क न ठेवता, केवळ तिथल्या भाषाभगिनींशी संपर्क साधून साहित्यातील आपले संबंध अधिक जिव्हाळ्याचे होतील हे म्हणणे मला खरे वाटत नाही. भारत किती विशाल आहे, याचा अनुभव भारतातल्या त्या त्या विभागांतील

जीवनाशी समरस होण्याचा प्रयत्न केल्याशिवाय येत नाही. आपल्यापैकी जी माणसे बाहेर हिंडतात, फिरतात त्यांना हा अनुभव येत असेल. आपण तर महाराष्ट्राच्या सीमेबाहेर आपला संसार करता आहात. तेव्हा आपल्याला ह्याची अधिक कल्पना आहे. मी माझ्या फिरतीमध्ये अनेक वेळा सांगत असतो की, भारताच्या जीवनामध्यें इतकी विशालता आणि इतकी विविधता आहे की, आसेतुहिमाचल हा नुसता शब्द उच्चारल्यामुळे त्याची बरोबर कल्पना येत नाही. त्याच्या जीवनामध्येही किती वेगवेगळे अनुभव आहेत, किती वेगवेगळे भौगोलिक प्रकार आहेत—हवामानाचे, मनुष्यस्वभावाचे, चालीरीतींचे किती नानाविध प्रकार आहेत, या चाली-रीतींमध्येही केवढी एकात्मता आहे आणि हे सर्वच जीवन किती सौंदर्य-संपन्न आहे याचा प्रत्यय, हे जीवन प्रत्यक्ष जवळून पाहिले म्हणजे येतो. हिमालयाच्या उत्तुंग प्रदेशात तेथल्या हिवाळ्यातील कडक थंडीत, बर्फातले जीवन सुखसौंदर्याने जगणारी सामान्य माणसे तेथे जाऊन पाहिली की, या विविधतेचा आणि सौंदर्यसंपदेचा अनुभव येतो. दहा-बारा हजार फूट उंचीवरच्या खेड्यांत राहणारी ही माणसे अत्यंत भोळ्याभाबड्या मनाने पाहुण्याचे स्वागत करतात, आणि त्यांच्या नृत्याशी तालाला ताल देऊन जेव्हा आपण नाचावयास लागतो, तेव्हा एक प्रकारचा अननुभूत आनंद आपल्या अनुभवाला येतो. हाच अनुभव तुम्हाला मिझोभूमीमध्ये येईल, नागाभूमीमध्ये येईल आणि देशातील इतर ठिकाणीही येईल; आणि म्हणून भारतातील वेगवेगळ्या ठिकाणी हे जे विविधत्व आहे त्याच्याशी आपण संपर्क जोडला पाहिजे, आणि त्याच्यातून अनुस्यूत असलेल्या एक-भारतीयत्वाचा आपण अनुभव घेतला पाहिजे. हा अनुभव घेण्याचा आपण कदाचित प्रयत्न करीत असाल, परंतु हा अनुभव आमच्या साहित्याद्वारे लोकापर्यंत जाऊन पोहोचला पाहिजे.

आम्हाला आभार मानले पाहिजेत मुख्य मंत्री ब्रह्मानंद रेड्डींचे. आम्हा मराठी भाषिकांना निमंत्रण देऊन आमचे मोठ्या जिव्हाळ्याने त्यांनी स्वागत केले, ही फार चांगली गोष्ट झाली. आमच्या भारतीय जीवनाची एकात्मता वाढते आहे त्याचा हा पुरावा असून ती अशीच वाढत जाईल याबद्दल मला

शंका नाही. आंध्रच्या वावतीत तर आमच्या गोपाळराव एकबोट्यांनी सांगितल्याप्रमाणे आमचे फार निकटचे नाते आहे. आम्ही कृष्णेच्या माहेरची माणसे आज तिच्या सासरी आलो आहोत ! नुसते मुख्य मंत्री म्हणून नव्हे तर आमचे व्याही म्हणून ब्रह्मानंद रेड्डींनी आज आमचे स्वागत केले असे आपण म्हटले पाहिजे. ही गोष्ट चांगली आहे. परंतु आमच्या अनुभूतीच्या ज्या मर्यादा आहेत त्यांचा याहीपेक्षा अधिक विकास झाला पाहिजे, त्या अधिक विस्तारल्या पाहिजेत. कारण साहित्य हे एक सामर्थ्य आहे. व्यक्तीच्या जीवनाप्रमाणेच राष्ट्राच्या जीवनात जी आव्हाने येतात ती आव्हाने झेलण्याचे सामर्थ्य जेव्हा प्रत्यक्ष अनुभवाला येते तेव्हा राष्ट्र मोठे होते असा आतापर्यंतचा अनुभव आहे. पण हे सामर्थ्य कशाने प्राप्त होते ? हे सामर्थ्य शस्त्राने प्राप्त होत नाही, वंदुकीच्या गोळीने प्राप्त होत नाही. हे सामर्थ्य विचारांतून येते, संस्कारांतून येते. हे विचार आणि हे संस्कार देण्याचे काम भाषेमार्फत, साहित्यामार्फत घडते, म्हणून साहित्याचे मोल जास्त आहे असे मी मानतो; आणि म्हणून हे सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न या देशामध्ये झाला पाहिजे. शस्त्रास्त्रांनी आमच्यापेक्षा किती तरी अधिक समर्थ राष्ट्रे या जगात असतील. परंतु आम्ही आमचे भारतीयत्व गमविणार नाही, आम्ही आमचे स्वत्व गमविणार नाही, आम्ही आमचा स्वाभिमान गमविणार नाही या त्वेषाने, या जिद्दीने हे राष्ट्र आज उभे राहिले आहे. त्याला उमेद आहे की, आमच्यात ज्या सुप्त शक्ती आहेत, त्या सुप्त शक्तींना आवाहन करून, त्या जागृत करून, आम्ही आमचे सामर्थ्य वर्धिष्णू करू. सामर्थ्य-संवर्धनाचे हे काम आज साहित्यिकांनी केले पाहिजे, साहित्यिकांची ही भूमिका असली पाहिजे. मग ते साहित्यिक मराठी असोत, गुजराथी असोत, तेलगू असोत किंवा इतर अन्य भाषिक असोत. मी तर असे म्हणेन की, हिंदुस्थानातील निरनिराळ्या भाषांतून लिहिणाऱ्या लेखकांच्या पुढे आज हे एकच काम आहे. या कामाचे रंगरूप वदलेल कदाचित. पुण्याची मराठी भाषा डोक्यावर पगडी घालील आणि हैदरावादची तेलगू उघड्या डोक्याने हिंडेल, पण आज राष्ट्रीय कर्तव्य म्हणून जे एक ऐतिहासिक कार्य आपल्यापुढे उभे आहे ते वेगवेगळे नसून एकरूप आहे.

स्थानिक स्वरूपाचे काही वेगवेगळे प्रश्न असतील, स्थानिक स्वरूपाचे काही वेगवेगळे तात्पुरते रागलोभ असतील; परंतु विसाव्या शतकातील हिंदुस्थानपुढे असणारे प्रश्न पाहण्याचा जो कोणी प्रयत्न करील त्याला असे आढळून येईल की, हिंदुस्थानचे महत्त्वाचे प्रश्न येथून तेथून एकच आहेत. या प्रश्नांची उत्तरे देण्याची शक्ती समाजाच्या जीवनामध्ये निर्माण करणे हे साहित्यिकांचे महत्त्वाचे काम आहे. ही मूळ भूमिका धरून साहित्य संमेलनापुढे असणाऱ्या प्रश्नांचा विचार झाला पाहिजे. अर्थात साहित्याच्या विविध क्षेत्रांत हिंदुस्थानातील निरनिराळ्या भाषांची कमीअधिक प्रमाणात प्रगती होऊ शकेल हे मी नाकारत नाही. कुठे नाटक पुढे असेल तर कुठे कादंबरी पुढे असेल; कुठे लघुकथा प्रदीर्घ असेल तर कुठे ती अतिसूक्ष्म असेल; कुठे कविता जुन्या थाटाची असेल तर कुठे ती नवीनतेने फुललेली असेल. परंतु या सर्वांच्या पाठीमागच्या ज्या मूळ प्रेरणा आहेत, त्यांच्या पाठीमागचे जे मूळ विषय आहेत, त्या प्रेरणांशी आणि त्या विषयांशी, निदान आज तरी या देशातील साहित्यिकांच्या प्रेरणा आणि विषय एकरूप असले पाहिजेत. म्हणजे मग हा देश खऱ्या अर्थाने एकरूप झाला असे म्हणता येईल.

यासाठी काय करता येणे शक्य आहे यासंबंधीचा एक विचार मी आपल्यापुढे सूचना म्हणून मांडू इच्छितो. निव्वळ दहा भाषांतील लोक एकत्र बसल्याने हे घडेल असे मी मानीत नाही. यापेक्षाही अधिक प्रयत्नांची गरज आहे. आमच्या सामाजिक जीवनातील जमाखर्च कसा चालला आहे याचा आजही आम्हाला अंदाज येत नाही. लेखन हे एखाद्या विशिष्ट अनुभवापुरते मर्यादित राहते आणि हे स्वाभाविकही आहे. लेखक आपल्या अनुभवाच्या आत्मप्रत्ययातून लेखन करण्याचा प्रयत्न करतो. पण हा अनुभव एकाच विशिष्ट विभागापुरता मर्यादित न राहता देशव्यापक झाला पाहिजे. त्याने या मर्यादित सीमा ओलांडून पलीकडे जाण्याचा प्रयत्न केल्याशिवाय या देशाला एकभारतीयत्व देण्याची आज जी गरज आहे असे मी मानतो, ती पुरी होणार नाही. त्यासाठी आमचे जे काही दुरभिमान असतील ते आम्ही सोडले पाहिजेत, आमचे जे काही

आग्रह असतील ते आम्ही बाजूला ठेवले पाहिजेत, आणि इतरांचे प्रश्न समजावून घेण्याचा आम्ही प्रयत्न केला पाहिजे. हा प्रयत्न करण्याची आज नितांत गरज आहे आणि हे काम साहित्यिकांनी करावयाचे आहे. कारण राजकारणामध्ये पुष्कळ वेळा जे घडते त्याच्या मूळ प्रेरणा साहित्यातून निर्माण होत असतात. महाराष्ट्रापुरते बोलावयाचे झाले तर संयुक्त महाराष्ट्राची प्रेरणा महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून निघाली. महाराष्ट्राची कायदेशीर स्थापना झाल्यानंतर पाच वर्षांनी का होईना साहित्यक्षेत्रातील सर्व मंडळी आज येथे बंधुभावाने येऊन बसली आहेत यात मला आनंद आहे.

कधी साहित्यिक राजकारण्यांना मार्गदर्शन करतात, तर कधी राजकारणी साहित्यिकांना मार्गदर्शन करतात, असे हे सर्वत्र चालत आलेले आहे. तेव्हा माझ्या दृष्टीने मला जो महत्त्वाचा विचार आपल्याला सांगावयाचा आहे तो हा की, एक अनुभूती आणि एक विचार राबविण्याचे हे जे काम आहे ते अविभाज्य आहे. ते केवळ मराठीचे, बंगालीचे, तेलगूचे किंवा कानडीचे काम नसून भारतातील सर्वच भाषांचे ते काम आहे. ही अविभाज्यता, ही एकरूपता अनुभवाला आली पाहिजे, आणि हा अनुभव साहित्यिकांना त्यांच्या जीवनामध्ये आला तरच तो ते जनतेपर्यंत पोहोचवू शकतील. परंतु ही आजच्या घडीची मागणी आहे, आजच्या घडीची ऐतिहासिक अपेक्षा आहे. मला आशा आहे की, आपण येथे जमलेले सर्व प्रमुख साहित्यिक या दृष्टीने मराठी जनतेला मार्गदर्शन कराल आणि त्यातून एका नवीन कामाचा उपक्रम सुरू होईल.

आपल्याला पुन्हा भेटण्याची ही संधी मिळाली याबद्दल मला आनंद वाटतो. या संमेलनाचे अध्यक्ष प्रा. वा. ल. कुलकर्णी हे एक बुद्धिमान आणि विचारवंत असे साहित्यिक आहेत. त्यांना लाभलेल्या या बहुमानाबद्दल त्यांचे अभिनंदन करून, या संमेलनाचे उद्घाटन झाल्याचे मी जाहीर करतो.

मराठी साहित्य संमेलन, हैदराबाद, दि. २५-१२-६५

२३ मराठी रंगभूमीची अखंड परंपरा

आज मराठी रंगदेवतेच्या वार्षिक यात्रेचा मंगल दिवस आहे. आपल्याला माहीतच आहे की, मराठी माणूस नेमाने कुठल्या ना कुठल्या यात्रेला जात असतो. पंढरीच्या यात्रेपासून भूदान यात्रेपर्यंत अनेक प्रकारच्या यात्रांत मराठी माणूस रंगतो. ज्यांना दरवर्षी नेमाने यात्रेला जाता येत नाही, ते अधूनमधून जात असतात. अशा या यात्रिकांपैकीच मी एक यात्रिक आहे, आणि म्हणून मी आज आपल्या ह्या दिंडीत सामील झालो आहे. अर्थात नांदेडकरांनी मला या दिंडीत सहभागी होण्याचे प्रेमाने आमंत्रण दिले म्हणूनच हे साधले. तेव्हा नांदेडकरांचे मी प्रथम आभार मानतो.

मराठी नाटकाचा जन्म कृष्णाकाठी झाला आहे आणि माझाही जन्म कृष्णाकाठीच झाला आहे. म्हणून माझे आणि नाटकाचे काहीतरी सुप्त नाते आहे असे मला नेहमीच वाटते. नाटक पाहण्याची लहानपणापासून मला विलक्षण आवड आहे आणि शक्य तो मी ती पुरी करीत आलो आहे. परंतु तोंडाला रंग लावून रंगभूमीवर येण्याची माझी लहानपणची इच्छा मात्र तशीच राहून गेली आहे. माझ्यासाठी परमेश्वराने कदाचित

राजकारणाच्या रंगभूमीवरील भूमिका नेमून दिली असावी. त्याला तुमचाही इलाज नाही आणि माझाही नाही. ते काहीही असले तरी नाटकाबद्दलची माझी आवडमात्र अद्यापि कायम राहिली आहे. अर्थात आवड असली तरी सवड मात्र पूर्वीसारखी नाही. तरी पण जेव्हा संधी मिळते तेव्हा मी नाटक पाहिल्याशिवाय राहत नाही.

आपण या क्षेत्रातील थोर मंडळी येथे जमला आहात. यात नाटककार, नट, गायक इत्यादी रंगभूमीची प्रत्यक्ष सेवेकरी मंडळी बरीच आहेत. आपले तर हे घरचेच कार्य आहे. आपल्या उपस्थितीशिवाय या समारंभाला शोभा येणारच नाही. पण मी का आलो ? याचे उत्तर उघड आहे. आपण नाटकाचा हा जो एवढा संसार मांडता त्यात रंग भरतो तो प्रेक्षकांमुळे. नाटककार, नट आणि प्रेक्षक हेच रंगभूमीचे तीन मूलभूत घटक आहेत. यांतील एक जरी नसला तरी नाटक होऊच शकत नाही. तेव्हा हा जो तिसरा म्हणजे प्रेक्षकांचा घटक आहे त्यांचा प्रतिनिधी म्हणून, त्यांच्यापैकीच एक म्हणून मी आज येथे आलो आहे; आणि म्हणून या नाट्यसंमेलनाचे उद्घाटन करण्याचा मान माझ्यासारख्या एखाद्या प्रेक्षकाला मिळाला हे, खोटे सौजन्य न बाळगता, योग्यच झाले असे मी मानतो !

मराठवाडा हा महाराष्ट्राचा कलानिधी आहे. नाट्याच्या दृष्टीने पाहिले तरी या मराठवाड्यात फार मोठे नाट्यप्रसंग इतिहासाने पाहिले आहेत. रेड्याकडून वेद म्हणविण्याइतका नाट्यमय प्रसंग या मराठवाड्याच्या भूमीत घडला आहे. जगाच्या पाठीवर असा प्रसंग अन्यत्र कुठे घडला असेल असे वाटत नाही, आणि याच भूमीतील एकोणीस वर्षांच्या एका कोवळ्या मुलाने असा एक अलौकिक ग्रंथ निर्माण केला की, सातशे वर्षे उलटून गेली तरी त्या ग्रंथाचे एकही पान शिळवटलेले नाही. तिकडे वेरुळ-अजिंठ्याच्या पत्थरात हजारो वर्षे, कुंचल्याचे व छिन्नी हातोडीचे अमर नाट्य रसिकांचे लोचन निववीत उभे आहे. असा हा मराठवाडा मराठी संस्कृतीचा दीप हातात घेऊन शतकानुशतके येथे उभा आहे. या वेळी माझ्या मनात सहज एक विचार तरंगतो आहे. मराठी भाषेचा उगम विदर्भात झाला, मराठी संस्कृती मराठवाड्यात विकास पावली आणि मराठी

तलवारीचे कर्तृत्व पश्चिम महाराष्ट्रात तळपले. या तीन प्रदेशांच्या संस्कारांतून आजचा मराठी माणूस तयार झाला आहे; आणि आज, जेथे मराठी संस्कृती फुलली, वहरली अशा गोदाकाठच्या एका तीर्थक्षेत्रात हा सांस्कृतिक मेळावा भरत आहे. नांदेडने इतिहासकालात विविध सत्तांच्या अदलाबदलीचे नाट्य अनुभवले असेल, पण त्याच्याही आधी वनवासी पांडवांचे पाय या शहराला लागले होते अशी आख्यायिका आहे. नाट्याने ओतप्रोत भरलेल्या महाभारताच्या कथेचे नायक ज्या शहराला पदस्पर्श करून गेले त्या शहरात आधुनिक नाट्यकर्ते जमावेत हा योगायोग अपूर्व असाच म्हटला पाहिजे.

आणखी एक गोष्ट मला सहज जाणवली. हे आपले सत्तेचाळीसावे नाट्यसंमेलन आहे. परंतु ज्या नाट्यपरिषदेच्या विद्यमाने हे संमेलन भरत आहे त्या नाट्यपरिषदेच्या वयाला या वर्षी साठ वर्षे पुरी झाली आहेत. म्हणजे नाट्यपरिषदेची ही एकसष्टी आहे, हा नाट्यसंमेलनाचा दुसरा अपूर्व योग आहे, आणि या दोन योगांवरोवरच तिसरा योग म्हणजे या संमेलनाला श्री. पु. ल. देशपाडे यांच्यासारखा वहुगुणी नट आणि साहित्यिक अध्यक्ष म्हणून लाभला आहे. हा त्रिवेणी संगम पाहण्याचे भाग्य मला लाभले म्हणून मला जो आनंद होत आहे तो मी शब्दांत व्यक्त करू शकत नाही.

मराठी रंगभूमीसंवंधी आमच्या शेतकऱ्यांच्या भाषेत सांगावयाचे झाले तर मराठी रंगभूमीचे सध्या सुगीचे दिवस आहेत असे म्हणावयास हरकत नाही. सध्या मराठी नाटकांना होत असलेली गर्दी, मराठी नाटकांवर होणारी चर्चा, नव्या नाटकांच्या फडकणाऱ्या जाहिराती हे सर्व पाहता मराठी रंगभूमीला पुन्हा सुगीचे दिवस दिसू लागले आहेत असेच म्हणावे लागेल. मोठ्या समाधानाची गोष्ट आहे ही. कारण काही वर्षांपूर्वी मराठी रंगभूमीचे काय आणि कसे होणार असा प्रश्न आपणा सर्वांच्या मनात येऊन आपण अस्वस्थ झालो होतो. साधारणपणे १८८० ते १९३० पर्यंतचा काळ, मराठी रंगभूमीच्या भरजरी वैभवाचा काळ मानला जातो. त्या काळात प्रभावी नाटककार व वलदंड नट होऊन गेले. किर्लोस्कर,

देवल, खाडीलकर, कोल्हटकर, गडकरी, वरेरकर या नाटककारांच्या आणि भाऊराव कोल्हटकर, गणपतराव जोशी, मोरोबा वाघोलीकर, दत्तोपंत हल्याळकर, केशवराव भोसले, बालगंधर्व, केशवराव दाते, चिंतामणराव कोल्हटकर ह्या कलाकार मंडळींच्या नावांचा जरी नुसता उच्चार केला तरी मराठी रंगभूमीच्या वैभवाची प्रचीती येऊ शकेल. रंगभूमीचा तो भरजरी काळ ज्यांना पाहावयास मिळाला त्यांचे भाग्य थोर होते यात मुळीच शंका नाही. पण याचा अर्थ असा नव्हे की, तो काळ गेल्यानंतर मराठी रंगभूमीवर पाहण्यासारखे काही राहिलेच नाही. निदान मी तरी तसे मानणाऱ्यांपैकी नाही. तसे असते तर आजपावेतो मराठी रंगभूमी या नावाची चीज अस्तित्वात राहिलीच नसती. १९३० नंतरही वरेरकर, अत्रे, रांगणेकर, पु. ल. देशपांडे, वसंत कानेटकर, विजय तेंडुलकर यांच्यासारख्या नाटककारांची गाजलेली नाटके हेच दर्शवितात की, मराठी रंगभूमीची परंपरा मोठी आहे, ,ती अशी डगमगणार नाही. काही काळ तिला कठीण गेला असेल. सबंध राष्ट्राच्या जीवनातसुद्धा बरा वाईट काळ येत असतो. मग रंगभूमीच्या जीवनात तो तसा आला तर त्यात वावगे काय आहे ? जुन्याचा अभिमान जरूर असावा. कारण नवे हे त्यातूनच आलेले असते. पण जुने तेवढेच चांगले, नवे तेवढे वाईट असेही समजण्याचे कारण नाही. मानवी जीवनाची ही दिंडी अखंडपणे पुढे चालली आहे. तीत नव्यानव्या गावांतील लहानमोठ्या दिंड्या येऊन मिळत आहेत, प्रत्येक नवी गोष्ट केव्हा ना केव्हा तरी जुनी होणारच असते. जुन्या गोष्टी पाहिलेल्या माणसाला त्या गेल्याबद्दल हळहळ वाटणे स्वाभाविक आहे. पण आपण आपली दुर्बीण मागच्याच काळाकडे लावून बसलो तर पुढून येणारे किंवा आपल्याजवळ येऊन पोहोचलेले नवे आपल्याला कधीच नीट दिसणार नाही. तेव्हा जुन्यातील चांगले वेचावयाचे, गाठी बांधावयाचे आणि नव्याच्या स्वागतास पुढे यावयाचे हीच आपली वृत्ती असली पाहिजे. क्षेत्र कुठलेही असो, दोन पिढ्यांत अंतर आणि प्रसंगी संघर्ष हे येणारच. त्यातूनच प्रगती होत असते. मी आशावादी माणूस आहे. जुनी रंगभूमी वैभवसंपन्न असेल पण

म्हणून नवी रंगभूमी तशी कधीच होणार नाही असे थोडेच आहे? रंगभूमी हाही आपल्या जीवनाचाच एक भाग आहे. आपले जीवन, आपला समाज जसजसा बदलत जाईल त्याप्रमाणे रंगभूमीही बदलत जाणे अपरिहार्य आहे. आता रंगभूमीवर साडी नेसून पुरुष कधीही येऊ शकणार नाही. तेव्हा साडी नेसलेला बालगंधर्वांसारखा नट पुन्हा रंगभूमीवर दिसणार नाही म्हणून उगाच हळहळण्यात काय अर्थ आहे? आता रंगभूमी अधिकाधिक लोकाभिमुख झाली तरच ती टिकणार आहे. प्रत्यक्ष जीवनाच्या अधिक जवळ आलेली नाटके लोकप्रिय होतात, यशस्वी होतात, हे आपण पाहतोच आहोत. नाटक जीवनाचा जितका खोल वेध घेईल, तुम्हा-आम्हाला ग्रस्त करणाऱ्या प्रश्नांना जितक्या यशस्वीपणे हात घालील, तितके ते तुम्हा-आम्हाला जवळचे वाटणार आहे. ही दिशा अपरिहार्य आहे.

जुने नाट्य आणि नवे नाट्य यांच्या संघर्षात मला शिरावयाचे नाही. तो माझा अधिकारही नाही. पण ढोबळ मानाने माझे मत काय आहे ते मी सांगितले आहे. मला जरूर असे वाटते की, जुने नाट्य वा नवनाट्य काहीही असो, त्यातले नाट्य आपण पकडले पाहिजे, आणि रंगभूमीचे सातत्य टिकविण्यासाठी त्या दृष्टीने देवाणघेवाण झाली पाहिजे. आज हौशी रंगभूमी आणि व्यावसायिक रंगभूमी असे जे दोन तट दिसतात ते परस्परपूरक होण्याच्या दृष्टीने त्यांची भक्कम सांगड कुठेतरी घातली गेली पाहिजे. या दृष्टीने मी नाट्य परिषदेप्रमाणेच या संमेलनाचे अध्यक्ष श्री. पु. ल. देशपांडे यांच्याकडे मोठ्या आशेने पाहत आहे. कारण देशपांडे हे नव्या पिढीचे 'प्रतिनिधी असले तरी जुने संस्कारही ते आपल्याबरोबर घेऊन आले आहेत. त्यांनी हा सांधा वेमाळूम जुळवावा अशी सर्वांचीच अपेक्षा आहे.

नाट्यकलेला प्रोत्साहन देण्यात सरकारने कधीच हात आखडता घेतलेला नाही. महाराष्ट्र राज्यात होणाऱ्या नाट्यस्पर्धांमुळे रंगभूमीच्या दृष्टीने काहीना काही फायदा निश्चित झालेला आहे. नाटकाचे वातावरण आज पुन्हा महाराष्ट्रात निर्माण झाले असून या कलेची आवड असणाऱ्यांना

कर्तृत्व करून दाखविण्याची संधी उपलब्ध झाली आहे. अनेक वरी-वाईट नाटके लिहिली जात आहेत, अनेक कलावंत धडपड करीत आहेत. व्यावसायिक रंगभूमीवरही अलीकडे खूपच चैतन्य दिसू लागले आहे. मी तर ऐकतो की, मुंबईत प्रत्येक नाटकाला गर्दी लोटते. ही चांगली चिन्हे आहेत. मला यात उद्याच्या उज्ज्वल रंगभूमीची चाहूल लागते आहे. रंगभूमीचा प्रसाद कामगारांपर्यंत पोहोचला आहे. आज ना उद्या तो आमच्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे. त्यांना नाटकाची गोडी लागली पाहिजे, म्हणजेच रंगभूमीची मुळे खोलवर गेली पाहिजेत. तरच ती भक्कम होत जाईल.

सरकारी नाट्यस्पर्धांच्या बाबतीत एक विचार माझ्या मनात येतो तो मी येथे बोलून दाखवितो. अर्थात हा प्रश्न राज्य सरकारचा आहे. स्पर्धेत पहिल्या व दुसऱ्या क्रमांकांनी येणाऱ्या नाटकांचे प्रयोग अधिक प्रमाणात झाले पाहिजेत. त्या नाटकांचे प्रयोग सरकारी साहाय्याने प्रत्येक जिल्ह्यातील प्रमुख गावात केले गेले तर हे प्रयोग करणाऱ्या संस्थांनाही भरीव फायदा होईल, अधिक उमेद येईल आणि जिल्ह्यातील लोकांनाही उत्कृष्ट प्रयोग पाहण्याची संधी मिळेल. त्यायोगे स्थानिक नाट्य चळवळीलाही चालना मिळेल. हा सहज एक विचार मनात आला तो मी आपल्यापुढे मांडला.

मराठी नाट्यपरिषदेच्या मौलिक कार्याकडेही मी आपले लक्ष वेधू इच्छितो. नाट्यसंमेलने भरविण्याखेरीज या संस्थेने नाट्य व्यवसायातील मंडळींना आपत्काली मदत देता यावी म्हणून एक निधी उभारण्याचे काम हाती घेतले आहे. त्याला प्रत्येक मराठी प्रेक्षकाने हातभार लावला पाहिजे. याशिवाय कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी परिषदेने सुवर्णपदके व लेखी पुरस्कार यांची योजना आखली आहे, हीही समाधानाची गोष्ट आहे. नाट्याचे शिक्षण देण्याचे कार्य या संस्थेमार्फत होत असून नाट्य-विषयक ग्रंथांच्या प्रकाशनाचे कामही या संस्थेने अंगावर घेतले आहे. इतकेच नव्हे तर "स्टेज फायनान्स कार्पोरेशन" सारखी संघटना स्थापन करण्याचे ध्येय या संस्थेने डोळ्यांपुढे ठेवले आहे. निःस्वार्थ बुद्धीने सेवा करण्याची मराठी माणसाची परंपरा नाट्यपरिषदेने चालविली

आहे यावद्दल मला समाधान वाटते. नाट्यपरिषदेच्या कार्याला यश येवो आणि तिने उराशी बाळगलेली स्वप्ने पुरी झालेली पाहण्याचा योग आपणाला लवकरच लाभो अशी मी प्रार्थना करतो.

कुठलाही आणि कसलाही कार्यक्रम यशस्वी करून दाखविण्यात श्री. पु. ल. देशपांडे यांचा हातखंडा आहे, तसा त्यांचा लौकिक आहे. तेव्हा त्यांच्या अध्यक्षतेखाली भरणारे हे नाट्यसंमेलन शंभर टक्के यशस्वी होईल अशी मी त्यांच्यावतीने ग्वाही देतो आणि या नाट्यसंमेलनाचे उद्घाटन झाले असे जाहीर करतो.

मराठी नाट्य परिषद, ४७ वे अधिवेशन, नांदेड, दि. ३१-१-६५

काही महिन्यांपूर्वी श्री. वेन्द्रे हे दिल्लीस आपल्या चिरंजीवांकडे विश्रांतीसाठी आले असताना त्यांनी "मालोजीराजे आणि शहाजी-महाराज" या ग्रंथाची मुद्रितावस्थेत असलेली काही प्रकरणे माझ्याकडे ठेवून देऊन ती वाचून पाहण्याची मला विनंती केली. त्या वेळी या ग्रंथाचे प्रकाशन माझ्या हस्ते व्हावे अशी त्यांची फार इच्छा दिसली. माझ्या फुरसतीच्या वेळात मी ही सगळी प्रकरणे चाळून पाहिली. काही आठवड्यांपूर्वी, ग्रंथ तयार झाला असून त्याच्या प्रकाशनासाठी मी आलेच पाहिजे असे त्यांच्याकडून आग्रहाचे पत्र आले. त्यांच्यासंबंधी मला जो आदर आहे, त्या आदरामुळेच मी या प्रकाशन-समारंभासाठी येण्याचे मान्य केले. या समारंभास येण्याबाबत मला थोडासा संकोच वाटत होता. कारण इतिहासावरील चर्चात्मक असे हे पुस्तक असल्यामुळे त्याचे प्रकाशन एखाद्या नामवंत इतिहास-पंडिताकडून झाले असते तर ते अधिक उचित झाले असते. परंतु श्री. वेन्द्रे यांचा आग्रह मला मोडवेना म्हणून मी येथे आज उपस्थित झालो.

श्री. वेन्द्रे यांचा या विषयाचा अभ्यास बऱ्याच वर्षांचा आहे हे मला आठ-दहा वर्षांपूर्वी समजले. त्या वेळी ते संभाजीमहाराजांच्या चरित्राची तयारी करीत होते. अधिकृत शिवचरित्र लिहिले जावे अशी त्या वेळी महाराष्ट्रातून मागणी होती म्हणून त्या बाबतीत मी त्यांच्याशी बोललो. परंतु संभाजीमहाराजांच्या काळाचा त्यांचा अभ्यास चांगला असल्यामुळे संभाजीमहाराजांच्या चरित्रलेखनावरच आपले लक्ष केंद्रीभूत करण्याचा त्यांचा मनोदय दिसून आला. तरीही अधूनमधून मी त्यांना भेटतच असे. विद्वानांना भेटावे, त्यांच्या विचारांना चालना द्यावी आणि त्यांचे बोलणे ऐकत बसावे असे मला नेहमीच वाटते. त्यामुळे पुष्कळसे न वाचताच बहुश्रुत होण्याचे समाधान लाभते. मी जेव्हा वेन्द्रे यांना भेटत होतो त्या वेळी माझ्या असे लक्षात आले की, शहाजीराजे आणि मालोजीराजे यांच्या काळातील इतिहासासंबंधीचाही त्यांचा व्यासंग बराच आहे. एवढेच नव्हे तर आजपर्यंत जो इतिहास लिहिला गेला आहे, आणि जो आम्ही परंपरेने स्वीकारला आहे त्यापेक्षाही काही वेगळे असे त्यांना सांगावयाचे आहे हेही त्या वेळी माझ्या लक्षात आले; आणि म्हणून त्यानंतर मी त्यांना जेव्हा जेव्हा भेटत असे तेव्हा प्रत्येक वेळी शहाजीराजांवर व मालोजीराजांवर कधी ग्रंथ लिहिणार आहात अशी मी त्यांच्याकडे आग्रहाने विचारणा करीत असे. शेवटी त्यांनी या विषयावर ग्रंथ लिहिण्याचे माझ्याजवळ कबूल केले. अर्थात माझ्यापाशी अनेक माणसे याप्रमाणे गोष्टी कबूल करतात, पण वेन्द्रे यांचे कबूल करणे हे एक वचन होते हे आज माझ्या लक्षात आले. त्यांच्यासारख्या विद्वान माणसांचा व्यासंग हीच महाराष्ट्राची खरी दौलत आहे. अशा माणसांची आपण बूज राखली पाहिजे, त्यांच्याशी आपण सतत संपर्क ठेवला पाहिजे. श्री. बाळासाहेब देसाई यांच्यावर या बाबतीत मी सोपविलेली कामगिरी त्यांनी उत्तम प्रकारे पार पाडली आहे वेन्द्रे यांचा हा जो ग्रंथ आज प्रकाशित होत आहे त्याबद्दल मला फार आनंद वाटतो आणि त्याच्या प्रकाशनाचा मान त्यांनी मला दिला त्याबद्दल मला जरूर अभिमानही वाटतो.

श्री. वेन्द्रे यांचा संभाजीमहाराजांवरील ग्रंथ प्रकाशित झाल्यानंतर

त्यासंबंधी जी चर्चा झाली ती मी थोडीफार ऐकली आहे, आणि त्यावर झालेली टीकाही मी वाचली आहे. त्या ग्रंथासंबंधीचा खुलासा त्यांनी त्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत केला आहे. त्यांचे म्हणणे असे की, त्यांनी हे चरित्र लिहिले ते सर्वसामान्य अर्थाने आपण ज्याला चरित्र म्हणतो तशा अर्थाचे चरित्र नाही. चरित्रनायकासंबंधी अथपासून इतिपर्यंतच्या सगळ्या गोष्टी एका सूत्ररूपाने शैलीदार भाषेत सांगण्याचा जो एक चरित्रलेखनाचा उद्देश असतो तशा प्रकारचा उद्देश हा ग्रंथ लिहिण्यात त्यांचा नव्हता. संभाजीमहाराजांवरचा हा ग्रंथ आणि त्याचप्रमाणे मालोजीराजे आणि शहाजीमहाराज हाही ग्रंथ मला वाटते तशा अर्थाने चरित्रग्रंथ नव्हे. चर्चात्मक अशा तऱ्हेची जी माहिती त्यांना होती ती माहिती देण्याचा त्यांनी या चरित्रग्रंथांत प्रयत्न केला आहे. मी तर असे म्हणेन की, या सगळ्या ऐतिहासिक पुरुषांची चरित्रे लिहिण्यासाठी जी साधने एका अर्थाने उपलब्ध व्हावयास पाहिजेत तशा प्रकारची साधने पुरविणारा प्रस्तुत मालोजीराजे आणि शहाजीमहाराज हा एक साधनग्रंथ आहे. या अर्थाने हा ग्रंथ अधिकृत चरित्र आहे असा श्री. वेन्द्रे यांचाही दावा नसावा. कारण हिंदुस्थानच्या सगळ्याच इतिहासासंबंधी एक मोठी अडचण आहे. आपल्या देशाच्या इतिहासाची, मधली हजारो वर्षे अगदी अंधारा-सारखी गेली आहेत. आम्हाला राम आणि कृष्ण माहीत आहेत, पण त्यानंतर एकदम अलीकडचे अशोक किंवा त्याच्यासारखे इतर सम्राट. नंतर पुन्हा सर्वत्र अंधार. त्यानंतर मग मोगलांच्या अमदानीपासूनचा थोडाफार इतिहास उपलब्ध आहे. पण मधल्या शतकानुशतकांच्या इतिहासाचे धागेदोरे आम्हाला मिळतच नाहीत. काय घडले, कसे घडले, यासंबंधीची जवळजवळ काहीच माहिती आपल्याजवळ उपलब्ध नाही. तेव्हा ही माहिती प्रथम गोळा करणे हे मला अत्यंत महत्त्वाचे काम वाटते.

मी काही इतिहासाचा पंडित नाही, पण इतिहासाचा जरूर एक अभ्यासू आहे. वर्तमानकाळ समजण्यासाठी इतिहासाचे सतत चिंतन करावे लागते. कारण वर्तमानकाळाशी झगडणाऱ्या माणसाला भूतकाळ समजण्याची जर अक्कल नसेल तर वर्तमानकाळाशी तो फारसा झगडू

शकणार नाही, आणि म्हणून त्यासाठी इतिहासाचा थोडाफार अर्थ समजून घ्यावा लागतो. इतिहासाच्या अर्थासंबंधीचा असाच एक प्रश्न माझ्या मनात पुष्कळ दिवस होता. म्हणून मी श्री. वेन्द्रे यांना शहाजीमहाराजांचे चरित्र लिहिण्याचा आग्रह केला. तो अशाकरिता की शिवाजीमहाराजांसारखी जी एक अद्वितीय व्यक्ती सतराव्या शतकात महाराष्ट्रात निर्माण झाली ती काय अगदी एकाएकी निर्माण झाली? माझे स्वत:चे असे मत आहे की, महापुरुष, आकाशात विद्युल्लता चमकावी आणि निमिषार्धात अन्तर्धान पावावी तसे एकाएकी येतात आणि निघून जातात असे कधीही घडत नाही. महापुरुषांच्या निर्मितीला, त्यांच्या कार्याला, त्यांच्या पराक्रमाला काही सामाजिक कारणपरंपरा असावी लागते. त्यांच्या पाठीमागे हळूहळू समाजजीवनाची शक्ती निर्माण व्हावी लागते. शिवाजीमहाराज म्हणजे फक्त भवानी देवीचा प्रसाद असे मी मानीत नाही. शिवाजीमहाराजांचे जीवन हे मराठी जनतेच्या जीवनाचा प्रसाद आहे अशी माझी स्वत:ची भावना आहे, आणि ही गोष्ट खरी असेल तर मग त्यांच्या पित्याचे जीवन, त्यांच्या आजोबांचे जीवन, त्यांच्या भोवतालच्या महाराष्ट्राचे जीवन म्हणजे त्या वेळचा महाराष्ट्र कसा होता, मराठी समाज कसा होता वगैरे गोष्टी आपल्याला समजल्या पाहिजेत. ही कारणपरंपरा जर आपल्याला समजली नाही तर शिवाजीमहाराज आपल्याला समजणार कसे? आजही, आम्ही आहोत असे का आहोत याची कारणपरंपरा आम्हाला समजली पाहिजे. मराठी माणसाच्या मनात थोडासा अहंकार आहे आणि तो कदाचित रास्तही असेल. पण याचे कारण काय? याचे कारण हे आहे की, हे सर्व इतिहासातून घडत आलेले आहे, बनत आलेले आहे. आजही आम्ही बदलतो आहोत. सतराव्या शतकात आम्ही जसे होतो तसेच आज विसाव्या शतकात आम्ही राहिलेलो नाही. पण आम्ही बदललेले असलो किंवा बदलत असलो तरीसुद्धा, मूळ पिंड आहे त्याला धरूनच बदलत राहणार हेही तितकेच खरे आहे. तेव्हा हा जो आपला स्वभावधर्म घडला आहे त्याची आपल्याला माहिती असणे आवश्यक आहे, आणि म्हणून शहाजीमहाराज आणि मालोजीराजे यांच्या जीवनाचा इतिहास म्हणजे

त्यांच्या काळाचा इतिहास असला पाहिजे, त्या वेळच्या समाजाचा इतिहास असला पाहिजे, त्या वेळच्या परिस्थितीचा इतिहास असला पाहिजे.

अमक्याने अमक्यापासून प्रेरणा घेतली आणि अगदी त्याच्या पायाशी बसून धडे घेतले, अशा प्रकारचा समज आमच्याकडे फार आहे. हा अमक्याचा गुरू आणि तो तमक्याचा शिष्य. गुरू भेटला आणि शिष्याला साक्षात्कार झाला आणि मग तो शहाणा झाला, अशाच प्रकारच्या आमच्याकडे कल्पना आहेत. मी असे मानीत नाही; आणि हा ग्रंथ वाचण्यापूर्वी शहाजीमहाराजांपासून शिवाजीमहाराजांनी साक्षात प्रेरणा घेतली असे मी मानीत नसे आणि हा ग्रंथ वाचल्यानंतरही त्या माझ्या मतात बदल झालेला नाही. परंतु त्याचबरोबर मला असेही वाटते की, शहाजी महाराजांनी जे केले ते त्यांनी केले नसते आणि त्याच्याही पूर्वी मालोजीराजांनी जे केले ते त्यांनीही केले नसते तर शिवाजीमहाराजांनी जे केले ते त्यांना सुद्धा करता आले नसते. कारण कोणत्याही महत्कार्याला काही परंपरा असावी लागते. शहाजीमहाराजांच्या काळामध्ये त्यांना असलेले महत्त्व राधामाधव विलास चंपूत वर्णन केलेले आहे. या राधामाधव विलास चंपूला राजवाड्यांनी प्रदीर्घ प्रस्तावना लिहिली असून या प्रस्तावनेतील काही भाग श्री. वेन्द्रे यांनी आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत उद्धृत केला आहे. त्यामुळे राधामाधव विलास चंपूच्या प्रस्तावनेची कैक वर्षांनी माझी पुन्हा उजळणी झाली. फारसे कळत नव्हते म्हणून वाचले पाहिजे या आग्रहाने, या हट्टाने ही प्रस्तावना मी पूर्वी वाचली होती. आज जरा समजते आहे म्हणून ही प्रस्तावना मी पुन्हा वाचली. या प्रस्तावनेत महाराष्ट्राची रचना कशी झाली, महाराष्ट्रात वसाहत कशी झाली, येथला मनुष्यभाव कसा बनला, तो तसा का बनला वगैरे गोष्टींचे राजवाड्यांनी अतिशय चांगले विवेचन केले आहे. त्यात काही अर्थपूर्ण वाक्ये आहेत. त्या प्रस्तावनेत त्यांनी असे लिहिले आहे की, येथला मूळ जो बहुसंख्य समाज होता, राजवाड्यांच्या शब्दांत बोलावयाचे म्हणजे येथले मूळचे जे मराठा क्षत्रिय, मराठा कुणबी, शूद्र कुणबी आणि नागवंशी महार होते, त्यांच्या गुणदोषांचा परिणाम त्या काळच्या अल्प-

संख्यांक महाराष्ट्र क्षत्रिय आणि ब्राह्मण यांच्यावर म्हणजे त्या काळच्या बुद्धिमंतांवर आणि विचारवंतांवरही घडला. एवढेच नव्हे तर त्या काळच्या महाराष्ट्राचा गुरुत्वमध्य त्यांनी निर्देश केलेल्या ह्या बहुसंख्य समाजात होता हा विचार राजवाड्यांनी मोठ्या आग्रहाने या प्रस्तावनेत मांडला आहे. परंतु या वातावरणात त्या काळी एक फरक पडला तो असा की, त्या वेळी ज्या मुसलमानी राजवटी येथे होत्या त्या शहाजीमहाराजांसारख्या कर्तृत्ववान सरदारांची आणि माणसांची मदत घेतल्याशिवाय चालूच शकल्या नसत्या अशी काहीशी परिस्थिती त्या काळात निर्माण झाली होती. शहाजीमहाराजांना बोलवल्याशिवाय निजामशाही वाचविणे अवघड आहे, आदिलशाही वाचविणे अवघड आहे, कर्नाटकात पराक्रम करणे अवघड आहे. थोडक्यात म्हणजे येथल्या जनतेवर आधारलेले सरदार सेनापती उभे केल्याशिवाय राज्य चालविणे अवघड आहे असे वातावरण त्या वेळी निर्माण झाले होते; आणि याच वातावरणातून, आपल्या शक्तीने जर आपण त्यांची राज्ये चालवितो आहोत, वाचवतो आहोत तर त्याच शक्तीच्या जोरावर आपण आपलेही राज्य उभे करू शकतो, स्वातंत्र्य उभे करू शकतो असे विचार करणारे शिवाजीमहाराज पुढच्या काळामध्ये तयार झाले. अशीही एक मीमांसा शक्य आहे, आणि म्हणून शहाजीमहाराज आणि मालोजीराजे यांच्या काळातला हा इतिहास माझ्या समजुतीने अतिशय महत्त्वाचा असा इतिहास आहे. या विचाराचा अभ्यास होण्याची अद्यापिही गरज आहे. आणि वेन्द्रे यांचे वैशिष्ट्य हे आहे की, त्यांनी या दृष्टीने या इतिहासाकडे पाहण्याचा प्रयत्न केला आहे.

मी जेव्हा बेन्द्रयांना आग्रह करीत होतो तेव्हाही आता ते जसे थकलेले दिसत आहेत तसेच मला ते थकलेले वाटत होते. मी त्यांना सांगत असे की, त्यांनी मिळविलेले सर्व ऐतिहासिक ज्ञान, त्यांनी केलेली असंख्य टाचणे आणि नोंदी हे सर्व ग्रंथरूपाने प्रकाशित न झाल्यास त्यांच्यानंतर व्यर्थ जाणार आहे. ज्यांच्याजवळ सांगण्यासारखे ईश्वराने काही दिले आहे ते त्यांनी सगळ्यांना सांगितले पाहिजे. आपल्याजवळ सांगण्यासारखे असेल ते सांगून सगळ्यांना शहाणे करावे असे आमच्या महाराष्ट्रातल्या

संतांनी आम्हाला शिकविले आहे. वाद घालणारे वाद घालणारच, आणि असे वाद झाले नाहीत तर महाराष्ट्रात जीवन ते काय राहणार? तेव्हा असे वाद झाले पाहिजेत. परंतु बेन्द्रे यांच्यासारख्या विद्वानाने त्यांच्या पाठीमागे राहील असे काहीतरी लिहावे असा माझा फार आग्रह होता; आणि मला अतिशय आनंद वाटतो की, त्यांनी या वयातही हा ग्रंथ लिहिला. आपल्याला काहीतरी सांगावयाचे आहे आणि ते मनात इतके अधिरेपणाने वसले आहे की, अक्षरांद्वारे ते कागदावर उतरविल्याशिवाय मोकळेच वाटणार नाही अशी जेव्हा स्थिती होते तेव्हाच माणूस लिहू शकतो. आजही श्री. बेन्द्रे यांची अशी स्थिती आहे. अजूनही सांगण्यासारखे त्यांच्याजवळ पुष्कळ आहे. त्यांनी जसा मालोजी आणि शहाजी लिहिला; संभाजी लिहिला, शिवाजीमहाराजानंतरच्या काळाचा इतिहास लिहिला आणि त्यांच्या अगोदरच्या काळाचा इतिहास लिहिला, त्याचप्रमाणे, मी त्यांना प्रार्थना करीन की, शिवकालीन खरा पराक्रमाचा महाराष्ट्रातला जो काळ आहे त्यासंबंधीही त्यांनी आता लिहावे, आणि तेसुद्धा शिवाजीमहाराजांच्या वैयक्तिक जीवनावर नुसते नव्हे. तशा प्रकारचे आतापर्यंत पुष्कळ लिहिले गेले आहे. परंतु माझ्या मते त्या काळाचा इतिहास ही खरी महत्त्वाची गोष्ट आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, या थोर माणसाचे जे जीवन आहे ते जनतेच्या कर्तृत्वाचे प्रतीक असे जीवन आहे. माझी ती स्वतःची श्रद्धा आहे. मराठ्यांच्या सगळ्या इतिहासाचा सर्वांत मोठा पैलू जर कोणता असेल तर तो जरूर शिवाजीमहाराजांचा काळ आहे. त्या काळात शिवाजीमहाराजांनी जे देदीप्यमान कर्तृत्व केले ते प्रत्येक मराठी माणसाच्या अभिमानाचा विषय आहे, त्याच्या स्फूर्तीचा तो जिवंत झरा आहे.

मराठ्यांच्या इतिहासात असाच दुसरा एक अती स्फूर्तिदायक काळ आहे. त्या काळासंबंधीही मला जबरदस्त आकर्षण आहे, आणि मी आपल्याला सांगू इच्छितो की, त्या काळासंबंधीसुद्धा मी म्हणतो तसे लिहिले गेले पाहिजे. तो काळ म्हणजे संभाजीमहाराजांच्या मृत्यूनंतरचा जवळजवळ पंचवीस वर्षांचा काळ होय. लौकिक अर्थाने ज्यांना नेते

म्हणतात, राज्यकर्ते म्हणतात ते कोणीही नसताना या पंचवीस वर्षांच्या काळात सतत चालू असलेल्या आक्रमणाला मराठी जनतेने अफाट धैर्याने तोंड देऊन आपले सामर्थ्य उभे केले. तुम्ही त्या काळामध्ये जाण्याचा प्रयत्न करा. शिवाजीमहाराज गेलेले, लोकांचे मन हटून जावे अशा तऱ्हेने संभाजीमहाराजांचा वध झालेला, संभाजीमहाराजांचा विच्छेद करून माळावर टाकलेले त्यांचे प्रेत शिवावयाचे कोणी इतकी धास्ती लोकांच्या मनामध्ये भरलेली, असा विलक्षण काळ होता तो! छिन्नविच्छिन्न झालेला तो देह शिवण्यात स्वतःवर मोठी आपत्ती ओढवून घेण्यासारखी परिस्थिती असतानाही ज्या गावातल्या लोकांनी प्रथम जाऊन ते प्रेत शिवले त्या गावातील लोकांनी त्या काळी तो मोठाच पराक्रम केला. त्या गावातील पाटलांनी हे काम केले म्हणून लोक त्यांना आजही शिवले पाटील म्हणतात. असा हा क्रूर अमानुष वध झाला होता. राजपत्नी येसूबाईसाहेब यांना छोट्या शाहूमहाराजांसह अटक करून दिल्लीस नेण्यात आले होते. महाराष्ट्रात राहणे अशक्य म्हणून राजारामम्हाराज उठून जिंजीला गेले होते. राज्यकर्ता पुरुषच नाहीसा झाला अशी विचित्र परिस्थिती त्या काळात महाराष्ट्रात निर्माण झाली होती. महाराष्ट्रातल्या या अती विकट काळामध्ये भागाभागांतून अनेक व्यक्तींनी विलक्षण पराक्रमी नेतृत्व केले. कोणी धनाजी झाला तर कोणी संताजी झाला. पण हे लोकांतून उठलेले नेतृत्व होते. ते जुळवून तयार केलेले नेतृत्व नव्हते. जनमनामध्ये जे सामर्थ्य निर्माण झाले होते त्यातून ठिकठिकाणी अनेक सुभेदार, सरदार आणि सेनापती निर्माण झाले, आणि अशा या जनतेच्या नेत्यांनी सतत पंचवीस वर्षे परकीयांशी निकराने लढा दिला. महाराष्ट्राच्या सगळ्या इतिहासामध्ये महाराष्ट्रावर एवढे जबरदस्त आक्रमण कधी झाले नव्हते. स्वतः दिल्लीचा पातशहा औरंगजेब आपल्या सर्व सैन्यानिशी पंचवीस वर्षे महाराष्ट्रात तळदेऊन बसला होता. पण याला धडाडीने तोंड देणारे कर्तृत्व निर्माण करण्याचे काम या छोट्याछोट्या नेत्यांनी केले, आणि या नेत्यांना निर्माण करण्याचे काम जनतेने केले. जनमनामध्ये अशी तयारी व्हावी लागते, परिस्थितीतून जनतेचे असे सामर्थ्य

उभे राहावे लागते तेव्हाच असा प्रचंड पराक्रम घडून येतो, जनतेतून असे नेते निर्माण होतात.

जनता आणि नेते यांचे असे हे माता आणि पुत्र यांचे नाते आहे. जनता हीच शेवटी माता. तिच्या आशीर्वादातून, तिच्या सर्वस्वातून, तिच्या भावनेतून, तिच्या परंपरेतून नेतृत्व उभे राहते. जनता व नेतृत्व यांचे हे नाते निर्माण होण्याचे काम इतिहासकाळात घडावे लागते. हे सर्व समजून घेणे हा इतिहास समजण्याचा एक उद्देश असला पाहिजे. हे काम महाराष्ट्रात कोणी तरी जिद्दीने करावयास पाहिजे होते. इतिहाससंशोधक हे काम करीत नाहीत असे मला सुचवावयाचे नाही. पुण्यातली, नागपुरातली व इतर ठिकठिकाणची पुष्कळ मंडळी हे काम आपापल्यापरीने करीत आहेत. परंतु अगदी एकाकी परिस्थितीत, ज्या तऱ्हेने वेन्द्रे यांनी हे काम आज अनेक वर्षे केलेले आहे, त्याचे नुसते कौतुकच नव्हे तर त्याचा कृतज्ञतापूर्वक स्वीकार महाराष्ट्राकडून व्हावयास पाहिजे.

या ग्रंथाच्या निर्मितीसंबंधी वेन्द्रे यांच्याबरोबर मी अनेक वेळा बोललो होतो असे मी सुरुवातीस सांगितले. पण अधिकारावर असणारा मनुष्य जेव्हा बोलतो तेव्हा त्याचा थोडासा तरी परिणाम घडून येतो ही गोष्ट मला आज समजली! सरकारतर्फे मागण्याची माझी सवय असली तरी मी त्यांच्याशी सरकार म्हणून बोललो नव्हतो. कारण इतिहास हा माझा वैयक्तिक आवडीचा विषय आहे. परंतु सहज बोललेल्या शब्दांतूनही मोठे काम घडू शकते असा आज मला अनुभव आला. श्रम त्यांचे, माझे फक्त बोलणे होते. पण त्या बोलण्यातून हे काम घडले यात मला अतिशय आनंद आहे. त्यांच्या गुणांचे व कर्तृत्वाचे चीज महाराष्ट्र शासन करील आणि अशाच तऱ्हेची कामे महाराष्ट्रात चालू राहतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि श्री. वेन्द्रे यांना दीर्घायुष्य लाभो व त्यांचा प्रत्येक क्षण या कामाकरिता मिळो अशी मी प्रार्थना करतो.

—य.

मालोजीराजे आणि शहाजीमहाराज ग्रंथ प्रकाशन समारंभ,
रंगमंदिर, नायगाव, मुंबई, दि. २-७-६७

२५ सोन्याचा सोहळा

कवी यशवंत यांच्या छत्रपती शिवराय या महाकाव्याच्या प्रकाशन-समारंभाचे जेव्हा मला निमंत्रण आले तेव्हा माझे मन काहीसे संकोचले. कारण साहित्यिकांच्या या व्यासपीठावर आपण बसल्याने त्याची शोभा तर कमी होणार नाही ना अशी शंका माझ्या मनात आली. पण यशवंतांबद्दल माझ्या मनात जो जिव्हाळा आहे आणि त्यांनी व प्रकाशकांनी ज्या प्रेमाने मला या प्रकाशन-समारंभासाठी निमंत्रण दिले, त्या जिव्हाळ्यामुळे आणि प्रेमामुळे त्यांना नाही म्हणणेही माझ्या जिवावर आले, आणि म्हणून मी आज येथे आलो आणि डोळ्यांचे पारणे फेडणारा हा सोहळा पाहिला.

यशवंतांच्या पिढीतली बहुतेक सर्व माणसे आता सत्तरीच्या घरात आहेत. आम्ही शाळकरी मुले होतो, तेव्हा रविकिरण मंडळाची पुस्तके आम्ही पाहत होतो, आणि त्यांची नावे ओळीने वाचीत होतो. त्या रविकिरण मंडळाचे अनेक प्रकाशमान तारे आज येथे उपस्थित आहेत. कवी यशवंत आहेत, कवी गिरीश आहेत, घाटे आहेत, रानडे आहेत, त्याच प्रमाणे खांडेकरही आहेत. ज्यांच्या हाताखाली आम्ही शिकलो आणि जे

रविकिरण मंडळाचे एक प्रमुख आधारस्तंभ होते ते माधव ज्युलियन आज हयात असावयास पाहिजे होते. त्यांच्या आठवणीने माझे हृदय आज भरून येत आहे. त्यांच्याच थोडेसे आधीचे प्रा. फडके हेही येथे आहेत. नव्या पिढीतले शिरवाडकर आहेत, पु. ल. देशपांडे आहेत, रणजित देसाई आहेत. अशी ही सगळी प्रथितयश मंडळी साहित्यिकांच्या दरबारात आज येथे वसली आहेत, आणि या सगळ्यांच्या साक्षीने या ग्रंथाचे प्रकाशन करून मराठी भाषेच्या संसारातला एक सोन्याचा सोहळा आज आपण साजरा करीत आहोत.

काव्यासंबधाने बोलण्याचा माझा अधिकार नाही. पण मघाशी खांडेकरांनी सांगितल्याप्रमाणे सगळीच तरुण माणसे आपापल्यापरी छोटे छोटे कवी असतात. कोणी कविता लिहितात, कोणी लिहीत नाहीत एवढाच फरक असतो. मला आठवते की, आम्ही कॉलेजमध्ये होतो तेव्हा म्युझिक सर्कल्स असत, साहित्य मंडळे असत, तसेच कवींचे हुरहुर क्लबही असत. मनामध्ये कविता यावयाची पण पुष्कळदा ती कागदावर उतरत नसे. पण ज्यांच्या मनामध्ये कविता डोकावून जात असे असे पुष्कळच विद्यार्थी त्या वेळी असावयाचे. ज्या तरुणांच्या मनामध्ये काव्य येत नसेल तो तरुण, तरुण नसला पाहिजे असे म्हटले तरी चालेल. हे सगळे आता महाकवीच्या पदाला पोहोचलेले कवी. त्या वेळच्या आमच्या हुरहुर क्लबचे आणि आमच्या सर्वांच्या डोळ्यापुढचे एक मोठे स्वप्न होते.

कवी यशवंत आणि मी एका जिल्ह्यातले आहोत. हे तर त्यांचे माझे एक नाते आहेच. पण त्यांचे माझे दुसरे नाते म्हणजे त्यांचे व माझे नाव एक आहे. त्यांच्या व माझ्या नावातले हे साम्य, त्या काळी माझ्या अभिमानाचा एक विषय होता. मला आठवते त्यांच्या कवितांमध्ये मनाला नित्य ओढ लावणाऱ्या अशा किती तरी कविता होत्या. मला चांगला आवाज असता तर त्यांतल्या काही मी आज म्हणूनही दाखविल्या असत्या आईवर प्रेम न करणारा माणूस दुनियेमध्ये कुठे सापडेल? पण कवी यशवंतांना आईची आठवण झाली आणि घराघरातली आई जागी झाली.

देशभक्तीवरही त्यांनी अनेक कविता लिहिलेल्या आहेत. त्या वेळच्या संसारातल्या बारीकसारीक दु:खांची त्यांनी आपल्या कवितेतून इतक्या नाजूकपणे मांडणी केली आहे की, जणू काही या माणसाला आपले मन कळले होते की काय, तो आपलेच दुखणे रस्त्यावर मांडतो आहे की काय, आपली कहाणी त्याला कोणी जाऊन सांगितली की काय, असे घराघरातल्या स्त्री-पुरुषांना वाटावे. जिव्हाळ्याने ओतप्रोत भरलेली अनेक अती सुरेख चित्रे त्यांच्या कवितेमध्ये आपल्याला पाहावयास सापडतात. ही सगळी गीते वाचीत असताना मनाला एक आगळा आनंद होत असे. काव्याची आवड असणाऱ्या त्या पिढीतल्या माणसांना आजही त्या आनंदाची आठवण येईल. पण आताच्या पिढीवर या गीतांचा किती संस्कार झाला आहे याची मला कल्पना नाही.

काव्यातली गेयता ही रविकिरण मंडळाने मला वाटते जास्त स्पष्टपणे लोकांच्यापुढे मांडली. नाटकांना अलीकडे जशी गर्दी होत असते तशी यशवंतांच्या कविता ऐकण्यासाठी लोक त्या काळी हजारोंच्या संख्येने गर्दी करीत. काव्यगायन ऐकण्यासाठी पुण्या-मुंबईला तर माणसे जमतच असत. पण मला आठवते की, कवी गिरीशांची आणि यशवंतांची गीते ऐकण्यासाठी त्या काळी आम्ही मोठ्या संख्येने आमच्या लहानशा गावीही जमलो होतो. त्यातल्याच एका ज्येष्ठ कवीने महाराष्ट्राच्या जिवाला आज एक वेगळी ओढ लावली आहे.

शिवाजीमहाराजांच्या रूपाने अती भव्य असे एक चरित्र इतिहासाने आम्हाला दिले आहे. त्या चरित्राची मांडणी करण्याचे काम इतिहासकार आपल्या शब्दांनी करीत आहेत आणि कादंबरीकारही आपल्या शब्दांनी करतील. पण प्रतिभावान कवीच्या शब्दांमध्ये ते चरित्र रंगल्याशिवाय त्यातला खरा जिव्हाळा आपल्याला समजणार नाही; आणि म्हणून हे एवढे सुंदर चरित्र एका महाकवीची वाट पाहत उभे आहे असे मी नेहमी म्हणत असे. यशवंतांनाही मी एकदा म्हणालो होतो की, अतिशय उत्कंठेने तुमच्या महाकाव्याची हे चरित्र वाट पाहत तिष्ठत उभे आहे. या ग्रंथाच्या पुरस्काराच्या छोट्याशा चार ओळींमध्ये माझी एक जुनी

आठवण मी सांगितली आहे. १९६२ साली काही कामानिमित्त यशवंत मला भेटण्यासाठी मुंबईस आले होते. त्या वेळी त्यांनी आपल्या मनातली पहिली हुरहुर मला सांगितली. यशवंत प्रकृतीने थकलेले होते. पण इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलता बोलता, ईश्वराने आयुष्य आणि आरोग्य दिल्यास शिवरायाचे चरित्रगीत रचण्याची आपली मनीषा त्यांनी मजजवळ प्रकट केली. त्यानंतर जेव्हा जेव्हा त्यांची माझी गाठभेट होत असे तेव्हा तेव्हा मी त्यांना त्यांच्या शिवकाव्यासंबंधी विचारीत असे. खरे म्हणजे माझे हे विचारणे अन्यायी होते. परंतु जीव राहत नसे म्हणून मी विचारीत असे, आणि तेही मोठ्या जिव्हाळ्याने झालेली प्रगती मला सांगत असत; आणि काही आठवड्यांपूर्वी जेव्हा त्यांचे हे ग्रंथलेखन पुरे झाले असे त्यांनी मला लिहिले आणि त्याच्या प्रकाशनासाठी मला प्रत्यक्ष निमंत्रण दिले तेव्हा त्यांचा जीव तर मोठा झालाच, पण माझाही जीव फार मोठा झाला. फार मोठा आनंद झाला त्या वेळी. आपले काव्य पुरे झाल्याबद्दल कवीला आनंद व्हावा हे तर स्वाभाविकच आहे. परंतु माझ्यासारख्या त्यांच्या एका मित्रालाही अतिशय आनंद झाला. तो अशासाठी की, शिवाजीमहाराजांचे जीवन हे आमच्या मराठी जीवनातले जे एक भव्य आणि विशाल असे शिल्प आहे, ते आता महाकाव्याच्या रूपाने आमच्यासमोर उभे राहणार आहे.

बाबासाहेब पुरंदरे आणि कुसुमाग्रज यांनी मघाशी जे सांगितले ते खरे आहे. शिवचरित्राने आम्हाला इतिहास दिला. या सह्याद्रीच्या डोंगर-खोऱ्यांतून आम्ही राहत होतो, शेती करीत होतो, कसेबसे जीवन जगत होतो. आमच्यापैकी कोणी पांडित्य करीत होते, तर कोणी भाऊबंदकीच्या भांडणामध्ये गुंतले होते. हे सगळे चाललेले होते. परंतु इतिहासामध्ये मराठ्यांचा म्हणून जो इतिहास गाजला त्याचा श्रीगणेशा ज्या जीवनातून लिहिला गेला ते अती विशाल असे शिल्प होते. त्या शिल्पामध्ये सर्व काही आहे. त्यामध्ये एक प्रकारचे उत्तुंग यश आहे, त्यामध्ये शौर्य आहे, त्यामध्ये त्वेष आहे, त्यामध्ये प्रेम आहे आणि त्यामध्ये कारुण्यही आहे. कवीच्या मनाला जे जे गुण वेडावून सोडतात ते ते सगळे गुण त्या

जीवनामध्ये भरलेले आहेत.

सरदाराच्या पोटी जन्म होऊनही पित्यापासून वंचित झाल्यामुळे आईच्या मायेखाली जवळ जवळ एकाकी असे जीवन महाराजांना लहानपणी काढावे लागले, कर्तृत्ववान माणसे त्यांना आपल्या भोवताली उभी करावी लागली आणि फार मोठ्या अडचणींना त्यांना तोंड द्यावे लागले. पण एका विशाल सत्तेशी लढण्याचा विडा उचलून ते बसले होते, लढत होते, पण मनाने ते कधीच हरले नाहीत. अधूनमधून संकटे आली तरीही नवे राज्य उभे करण्याचा ते प्रयत्न करीत होते. गडामागून गड घेतले पण पित्याचा रोष होईल ही भीती मनामध्ये निर्माण झाली. त्यांनाही सावरावे, आईलाही सावरावे, साऱ्यांना सावरावे, आणि आपल्या नव्या राज्याच्या संसाराचे काम पुढे पुढे नेत राहावे असे सारखे चालले होते. क्षणाक्षणाला ज्या महापुरुषाने हे काम केले त्यांच्या जीवनात किती संकटे आली असतील, किती निराशा आली असेल? पण हे सगळे सहन करीत करीत त्या महापुरुषाने एक नवा इतिहास आम्हाला दिला. आज तुम्ही-आम्ही सगळी माणसे आपल्या कृतज्ञतेची फुले शिवाजीमहाराजांना वाहत असतो. पण महाराज जेव्हा इतिहासाचे जीवन जगत होते, इतिहास घडवीत होते तेव्हा त्यांच्या जीवनाचा अर्थ सहानुभूतीने समजून घेणारी जाणती माणसे महाराष्ट्रामध्ये आणि महाराष्ट्राबाहेर फार थोडी होती असे म्हटले पाहिजे. त्यांच्या अभिषेकासाठी त्यांना महाराष्ट्राच्या सीमेबाहेरून गागाभट्टांना आणावे लागले, आणि त्यांच्या गुणांची गाथा गाण्याकरिता बुंदेलखंडातल्या भूषणांना येथे यावे लागले. ज्याला महाराजांचे गुण समजले होते असा एक प्रतिभावान पुरुषमात्र या महाराष्ट्रात होता आणि तो म्हणजे समर्थ रामदास. पण महाराष्ट्रातील सामान्य माणसे, मावळे, लंगोट्या घालून जीव देण्यासाठी महाराजांच्या पाठीमागे लक्षांनी उभी होती. एका कठीण परिस्थितीत महाराज दिल्लीला गेले आणि राजकारणातला डाव फसून अंगावर येतो की काय असा प्रसंग आला. आग्र्यामध्ये कैदी झाले. तेथूनही पार झाले. राज्याभिषेक झाला. राज्याभिषेकानंतर त्यांच्या जीवनात अनेक करुण प्रसंग आले. चंद्राचा प्रकाशमान

भागच जसा आपल्याला दिसतो तसेच कर्तृत्ववान माणसाचे जे प्रकाशमान जीवन असते तेच फक्त दुनियेला दिसते. पण त्याच्या वैयक्तिक जीवनातील व्यथांची आपल्याला कल्पना नसते. नव्याने स्थापन केलेले हे राज्य राहील कसे, टिकेल कसे, कौटुंबिक वादातून त्याला शाप लागेल की काय, अशा प्रकारच्या अनेक चिंता महाराजांच्या मनाला लागून राहिल्या असतील. त्यांची आपल्याला कल्पनाही येणे शक्य नाही. परंतु ते जे तेजस्वी, पराक्रमी, कर्तृत्ववान असे जीवन जगले त्याने आमच्या मनाला विलक्षण ओढ लावली. त्या जीवनातून एक तेजस्वी शक्ती आमच्या मनामनांमध्ये, घरांघरामध्ये सतत तेवत राहिली आणि अद्यापिही ती तेवत आहे. तिला व्यक्त स्वरूप कवीने देण्याची फार गरज होती; आणि ते व्यक्त स्वरूप कवी यशवंतांनी आज तिला या महाकाव्याच्या रूपाने दिले आहे.

महाराष्ट्राबाहेर रवींद्रांनी आणि इतर अनेक कवींनी शिवाजीमहाराजांची गीते गाइली आहेत. शिवाजीमहाराजांचे नाव महाराष्ट्राबाहेर हिंदुस्थानातील सगळ्या जाणत्या माणसांना ठाऊक आहे. बंगालमध्ये आपण गेलो म्हणजे तेथील माणसे शिवाजी महाराजांचे नाव मोठ्या आदराने आपल्यासमोर काढतात शिवाजीमहाराजांसंबंधी रवींद्रनाथांनी लिहिलेल्या ओळी घडाघड म्हणून दाखविणारी शेकडो माणसे आज आपणांस बंगालमध्ये पाहावयास मिळतात. बुंदेलखंडात, हरियानात, राजस्थानात, उत्तर प्रदेशात किंवा बिहारमध्ये तुम्ही गेलात की तुम्ही शिवाच्या मुलखातले ना असे म्हणून तेथील खेड्यांतली माणसे शिवासंबंधीच्या ओव्याच्या ओव्या तुम्हाला सहज म्हणून दाखवितील. हे मी माझ्या गेल्या सहा वर्षांच्या प्रवासात अनुभवले आहे. तेथील माणसे महाराजांना महाराज म्हणत नाहीत तर ते त्यांना शिवा म्हणून संबोधितात. शिवाजीमहाराजांचे नाव हे असे सर्वत्र पोहोचले आहे. महाराष्ट्रात अनेक कवींनी, शाहिरांनी त्यांची गीते गायिली आहेत. परंतु त्यांचे गीत एखाद्या प्रतिभासंपन्न कवीने महाकाव्याच्या रूपाने गाण्याची फार आवश्यकता होती. ते काम आज यशवंतांनी घडवून आणले आहे, म्हणून मला आनंद होतो आहे.

राम आणि कृष्ण हे अवतारी पुरुष होते असे आपण मानतो. पण व्यासांनी आणि वाल्मिकींनी मनात आणले नसते तर राम आणि कृष्ण हे महापुरुषसुद्धा आज कुठे असते परमेश्वरालाच माहीत. त्यांचे उत्तुंग जीवन शब्दबद्ध करण्यासाठी व्यासांची आणि वाल्मिकींची प्रतिभा फुलावी लागली. शिवाजीमहाराजांचे जीवन विशाल आहे, रोमहर्षक आहे, पण ते पिढ्यानुपिढ्या गाइले जाण्यासाठी प्रतिभावान कवीच्या स्पर्शाची गरज होती. आम्हाला आनंद हा आहे, अभिमान हा आहे, की आमच्या पिढीतले कवी यशवंत हे आज शिवरायाचे गीत गात आहेत. त्यांचे अभिनंदन करण्याचा माझा अधिकार नाही. त्यांचे कौतुक करण्याचा तर मुळीच नाही. माझा अधिकार फक्त त्यांच्याबद्दल अभिमान बाळगण्याचा आहे.

मला आज आठवते की, कवी यशवंत जेव्हा बडोद्याच्या साहित्य संमेलनास गेले होते तेव्हा त्यांनी तेथे स्वत:ची " दऱ्याखोऱ्यांतून आला कवी हा खास दरबारी " ही कविता म्हणून दाखविली होती. या कवितेत त्यांनी जे म्हटले आहे ते खरे आहे. चाफळच्या मांडवीच्या काठी भटकत असताना ' न्यारीचा वकुत ' झाल्याची मनातील गोड ओढ टिपणारा हा कवी आज शिवजीवनाच्या दरबारामध्ये महाकवी म्हणून प्रवेश करतो आहे याचा आम्हाला खरोखरीच अभिमान आहे. यापेक्षा अधिक काय बोलावे मी या प्रसंगाला ?

कवी यशवंतांचे सर्व साथी आज येथे उपस्थित आहेत. गिरीशांचे डोळे पाण्याने भरलेले पाहिले आणि आम्हा सर्वांचे डोळे भरून आले. घाट्यांसारखी, रानड्यांसारखी एका पिढीतील ही कर्तबगार माणसे येथे बसून आपल्या मित्राचे कौतुक पाहत आहेत. यशवंतांनी नव्याने हे जे काम हाती घेतले होते त्याला आलेली ही सुंदर, सुगंधित फुले पाहून त्यांना आज अतिशय आनंद वाटत असेल. हे काव्य आता महाराष्ट्रातील जनतेच्या हातांत जाईल. साहित्यिक त्याचे समीक्षण करतील, विद्वान त्याचे कदाचित खंडनही करण्याचा प्रयत्न करतील. परंतु आम्ही सामान्य रसिक माणसे ते गात राहू, आवडीने गात राहू, एवढेच मी यशवंतांना

सांगतो, आणि माझ्या शुभेच्छा मी त्यांना देतो; आणि भाऊसाहेब खांडेकरांनी अतिशय उत्कटतेने म्हटल्याप्रमाणे संध्याकाळची सांजवात वाऱ्याच्या झुळकेने मालवू नये म्हणून जशी एखादी सौभाग्यवती तिला आपल्या पदराखाली घेऊन जाते, तशीच महाराष्ट्रातील जनता तुमच्या प्रतिभेची ही सांजवात आपल्या पदराखाली धरून राहील असा विश्वास व्यक्त करून मी माझे भाषण पुरे करतो.

'छत्रपती शिवराय' प्रकाशन समारंभ, पुणे, दि. १४-१०-६८

२६ काँग्रेसची ऐतिहासिक भूमिका

आज येथे उपस्थित राहून आपल्याला भेटण्यात व काँग्रेस पक्षाच्या वतीने आपल्या बरोबर चर्चा करण्यात एक प्रकारे माझा सन्मानच होत आहे असे मी समजतो. काँग्रेस पक्षाच्या वतीने आज मी येथे बोलणार आहे याचा अर्थ त्या पक्षातर्फे अधिकृत दृष्ट्या मी आपल्यापुढे बोलणार आहे असामात्र नाही, ही गोष्ट प्रथम मला स्पष्ट केली पाहिजे. पण आपल्या या संस्थेने विनंती केल्यानंतर मला समजलेली काँग्रेसची भूमिका येथे येऊन आपल्यापुढे मांडण्याचा प्रयत्न करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

आजचा हा प्रसंग खरोखरीच अतिशय उचित असा प्रसंग आहे. कारण निरनिराळे राजकीय पक्ष व त्यांचे कार्यक्रम यांसंबंधी देशात आज चर्चा चालू असून हे प्रश्न समजून घेण्याची लोकांत एक प्रकारची मानसिक तयारीही दिसते आहे. लवकरच देशात सार्वत्रिक निवडणुका होणार असून या सार्वत्रिक निवडणुकींच्या रूपाने जनतेला शिक्षण देण्याची फार मोठी संधी उपलब्ध होत असते असे मानणाऱ्यांपैकी मी एक आहे; आपण

म्हणालात त्याप्रमाणे लोकशाही शासनात राजकीय प्रश्नांचे आकलन करून घेणे ही प्रत्येक नागरिकाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे, आणि म्हणून प्रत्येक राजकीय पक्षास आपल्या धोरणाचे समर्थन करण्याच्या दृष्टीनेच नव्हे, तर आपले धोरण विशद करण्याच्या दृष्टीनेही आजच्या या कार्यक्रमासारखी संधी मिळाल्यास फार चांगले होईल. आमच्या पक्षाबाबत आपली खात्री पटवून देण्याच्या उद्देशाने केवळ मी येथे आलेलो नाही, तर येथे येण्यामागचा माझा हेतू हा आहे की, माझ्या ज्या निष्ठा आहेत त्या आपल्याला समजावून सांगाव्यात, म्हणजे आपल्यालाही आपल्या निष्ठा तपासून पाहता येतील आणि कदाचित त्यांचा तटस्थ आणि वस्तुनिष्ठ दृष्टीने विचार करण्यास आपल्याला मदत होईल.

परंतु या व्यक्तीत माझा शब्द हा अखेरचा शब्द असेल असे जे आपण म्हणालात ते केवळ माझ्यावरील प्रेमामुळे. असे काही ऐकले की कानाला फार गोड लागते, कारण आपला शब्द खरोखरीच अखेरचा शब्द असावा असे आपल्याला कितीतरी वाटत असते. पण हा विषयच फार अवाढव्य आणि गुंतागुंतीचा असल्यामुळे, काँग्रेसची ऐतिहासिक पार्श्वभूमी, काँग्रेसपुढे आज असलेले ऐतिहासिक कार्य आणि हे कार्य फलद्रूप व्हावे म्हणून काँग्रेसने अंगिकारलेली निरनिराळी धोरणे, एवढ्यासंबंधीच फक्त मी आपल्यापुढे थोडक्यात विवेचन करणार आहे. धोरणासंबंधीच्या तपशिलात मी शिरणार नाही. कारण मला देण्यात आलेल्या अवघ्या पंचेचाळीस मिनिटांत इतक्या खोलात जाणे अगदी अशक्य आहे. पण भाषणानंतर ठेवण्यात आलेला प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम या दृष्टीने अधिक उपयुक्त ठरेल. कारण ज्या बाबींसंबंधी आणि प्रश्नासंबंधी मी बोलावे अशी आपली इच्छा आहे त्यांच्यासंबंधी अधिक मनमोकळेपणाने मला तेव्हा बोलता येईल.

काँग्रेसपक्ष आजपर्यंत जे कार्य करीत आला आहे त्यातून त्या पक्षाला अनुकूल आणि प्रतिकूल अशी दोन्ही प्रकारची परिस्थिती निर्माण झाली आहे. अनुकूल परिस्थिती अशा दृष्टीने की, स्वतंत्र्यप्राप्तीनंतर लगेच राष्ट्ररचना करण्याची जी जबाबदारी होती ती उचलण्याची संधी—जिला

भारताच्या इतिहासातली महानातली महान संधी असे म्हणता येईल ती काँग्रेसला लाभली आहे. पग दिलेली अभिवचने पुरी अरण्याची जबाबदारी शिरावर वाहणारा असा हा एकच पक्ष आहे ही या पक्षाच्या दृष्टीने प्रतिकूल परिस्थिती म्हणता येईल. कारण ज्या घटना घडत आहेत त्या वश्त बसावे किंवा त्यांवर टीका करावी एवढेच काम इतर पक्षांना करावयाचे असल्याने त्यांचे काम फार सोपे आहे. अर्थात हा काही त्यांचा दोष नव्हे. पण तसाच तो आमचाही नाही.

तांत्रिक दृष्ट्या काँग्रेस हा एक राजकीय पक्ष आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेस हा अनेक संसदीय पक्षांपैकी एक पक्ष झाला, आणि काही विशिष्ट राजकीय तत्त्वांवर व ध्येयधोरणांवर आधारित असलेल्या जाहीरनाम्यावर त्याने निवडणुका लढविल्या. पण जवळ जवळ गेली वीस वर्षे काँग्रेस सातत्याने करीत असलेल्या कामावर आपण दृष्टिक्षेप टाकल्यास काँग्रेस हा केवळ एक राजकीय पक्ष नसून ती एक जनतेची चळवळ आहे, असे आपणांस दिसून येईल. भारताच्या राजकीय इतिहासातील हे एक विलक्षण दृश्य आहे. एखाद्या राजकीय पक्षाची भूमिका तुम्हाला समजून घ्यावयाची असेल तर तो पक्ष शेवटी कोणता कार्यक्रम पार पाडण्यास बद्धपरिकर आहे हे शोधण्याचा तुम्ही प्रयत्न केला पाहिजे. त्या पक्षाचा उगम कसा झाला, कोणती परिस्थिती त्याला कारणीभूत झाली, त्याची कसकशी वाढ होत गेली आणि त्याची ध्येयधोरणे काय होती व आहेत या सगळ्या गोष्टींची शहानिशा तुम्ही केली पाहिजे. ऐतिहासिक दृष्ट्या या सर्वच गोष्टी काँग्रेसपक्षाला निश्चित अनुकूल आहेत. काँग्रेस हा आज एक संसदीय पक्ष असला आणि काही वर्षांपूर्वी त्याने राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली असली तरी त्याला काही जुन्या विशिष्ट परंपरा आहेत. एक राजकीय पक्ष म्हणून काँग्रेसचे अधिष्ठान काय आहे ? सांप्रतच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक विचारांनी जसे त्याचे रूप घडविले जात आहे तसेच काही विशिष्ट परंपरांचे वारसदार होण्याचे भाग्यही त्याला लाभलेले असल्यामुळे त्याची जडणघडण होण्यात या परंपरांचाही हातभार लागलेला आहे ही वस्तुस्थिती आहे.

दादाभाई नवरोजींच्या वेळची काँग्रेस ही लोकमान्य टिळकांच्या वेळची

काँग्रेस नव्हती, तसेच लोकमान्य टिळकांच्या वेळची काँग्रेस ही गांधीजींच्या वेळची काँग्रेस नव्हती, आणि गांधीजींच्या वेळची काँग्रेस व पंडित नेहरूंच्या वेळची काँग्रेस ही अगदी सारखीच होती असेही आपल्याला म्हणता येणार नाही. याच न्यायाने पंडित नेहरूंच्या वेळची काँग्रेस ही भावी काळातही तशीच राहील असे नाही. पण मी जे सांगतो आहे त्याचा कृपा करून आपण गैरसमज करून घेऊ नका. मला जे सांगावयाचे आहे ते हे की, काँग्रेसचे आज आमूलाग्र परिवर्तन झालेले आहे. अलीकडेच हिमालयातून प्रवास करीत असताना हृषिकेशला मी गंगेचे दर्शन घेतले. नंतर हृषिकेशच्या पलीकडल्या बाजूला असलेली गंगा मी पाहिली आणि नंतर अलाहाबाद, पाटणा आणि कलकत्त्याजवळ पुन्हा मी गंगेला भेटलो. या सर्व ठिकाणी तीच पवित्र गंगा होती. गंगे-संबंधी मी हे बोलतो आहे ते गंगेची काँग्रेसशी तुलना करण्याच्या दृष्टीने नव्हे. गंगेसंबंधी मी केवळ उदाहरणादाखल बोलतो आहे. सर्वत्र तीच गंगा होती. तोच जलप्रवाह होता. पण हृषिकेशला मी जी गंगा पाहिली तिच्याहून अलाहाबादला मला ती वेगळी दिसली आणि पाटण्याला व कलकत्त्याला मी पाहिलेली गंगा आणखी पुष्कळच वेगळी होती. काँग्रेसच्या बाबतीतही बरोबर हेच घडले आहे. खरे म्हणजे काँग्रेसची ही जी जडणघडण झाली ती ऐतिहासिक घटनांतून झाली आहे. या अर्थाने ही एक ऐतिहासिक प्रक्रिया आहे असे म्हटले पाहिजे. काँग्रेस हे एक जनतेचे आंदोलन होते. विविध प्रकारच्या प्रश्नांना तोंड देत देत, लोकांच्या विविध आकांक्षांचे प्रतिनिधित्व करीत करीत, इतिहासाने निर्माण केलेली विविध आव्हाने काँग्रेस स्वीकारीत आली आहे, आणि आजही तिचे स्वरूप हेच आहे. कधी तिच्या पदरात यश पडते तर कधी तिला अपयश येते. पण तिची वाटचाल चालूच आहे. तेव्हा काँग्रेस हा काही केवळ एक राजकीय पक्ष नाही तर 'ती एक जनतेची चळवळही आहे या दृष्टीने आपण काँग्रेसकडे पाहिले पाहिजे.

काँग्रेस ही जनतेची चळवळ आहे असे जेव्हा मी म्हणतो तेव्हा त्याचा अर्थ असा की, कोणत्याही साचेबंद तत्त्वांनी ती जनतेशी बांधली

गेली नसून जनतेच्या भावना, जनतेच्या आशाआकांक्षा, जनतेच्या मागण्या आणि जनतेचे रागलोभ या जिवंत रज्जूंनी काँग्रेस जनतेशी बांधली गेली आहे. काँग्रेस ही जनतेच्या जीवनाशी एवढी एकरूप झाली आहे की, ज्या विशिष्ट गोष्टींचा ती पायाभूत तत्त्वे म्हणून स्वीकार करते त्या गोष्टींवरच मुळी जनतेच्या जीवनाचा पाया उभारलेला असतो, आणि खरे म्हणजे या गोष्टीच काँग्रेसच्या पायाभूत तत्त्वांना आकार देत असतात. तेव्हा काँग्रेसबाबत निर्णयाप्रत येण्यापूर्वी या मूलभूत गोष्टींचा आपणाला विचार करावा लागेल.

जनतेचे प्रतिनिधित्व करणारी काँग्रेस ही भारताच्या राजकीय इतिहासातील एक विलक्षण दृश्य आहे असे मी पुन्हा एकवार म्हणतो. गेली वीस वर्षे काँग्रेसमध्ये जे घडत आले आहे त्याचा, इतिहासाचा एक अभ्यासक म्हणून मी जेव्हा विचार करतो, तेव्हा काँग्रेसचे निरनिराळे कालखंड माझ्या नजरेसमोर उभे राहतात. या निरनिराळ्या कालखंडांचा अभ्यास करताना काँग्रेसकडे शक्य तितक्या तटस्थतेने पाहण्याचा मी प्रयत्न करीत असतो. काही लोक म्हणत असतात की, भारताच्या स्वातंत्र्यसंपादनाच्या कामात काँग्रेसने जो पुढाकार घेतला त्यामुळे जनतेच्या नेतृत्वाचा किंवा शासकीय अधिकारपदांचा फायदा काँग्रेस पक्षाला मिळाला. एवढेच नव्हे तर त्या थोर यशाचा धनी म्हणून काँग्रेस आज सर्व फायदे उठवीत आहे. पण आपल्या आवतीभोवतीच्या देशांकडे आपण जरा दृष्टिक्षेप टाकून पाहा. गेल्या वीस वर्षांमध्ये त्या देशांत जो इतिहास घडला आहे तो आपण जरा नजरेखाली घाला आणि मग काय चित्र दिसते ते पाहा. या देशांना स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या राजकीय पक्षांची आज काय स्थिती आहे? ज्या मुस्लिम लीगमुळे पाकिस्तान अस्तित्वात आले तिची आज काय अवस्था झाली आहे ते पाहा. तिच्या नशिबी काय हेच होते? ब्रह्मदेशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात युनायटेड फ्रंट हा पक्ष आघाडीवर होता. आज त्या देशात या पक्षाला काय भवितव्य आहे? आणि इंडोनेशियात काय घडले आहे हेही आपण पाहा. मी हे सर्व सांगतो आहे ते त्या देशावर किंवा तेथील राजकीय पक्षांवर टीका

करण्याच्या उद्देशाने सांगत नाही. परंतु राजकीय, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रांत काँग्रेसवर जी टीका झाली त्या सगळ्या टीकेचे प्रहार सहन करून आणि ज्या अनेक संकटांना तिला तोंड द्यावे लागले त्या सर्व संकटांवर मात करून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या देशातील अधिकारारूढ पक्ष होण्याचे, एवढेच नव्हे तर गेली वीस वर्षे या देशाचे सर्वांगीण नेतृत्व करण्याचे भाग्य काँग्रेस मिळवू शकली ही खरोखरच मोठी विलक्षण गोष्ट म्हटली पाहिजे. स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेस ही या देशातील अधिकारारूढ पक्ष म्हणून तर राहिलीच, पण याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या ध्येयधोरणांच्या दृष्टीने लोकांच्या मूलभूत आशाआकांक्षांशी सरस होण्याचा तिने प्रामाणिकपणे प्रयत्न केलेला आहे. अद्यापिही ती हा प्रयत्न करते आहे. मी हा जो उल्लेख करतो आहे त्याला फार महत्त्व आहे. कारण या दृष्टीने काँग्रेसकडे आपण पाहिल्यास काँग्रेस ही आजही जनतेची चळवळ आहे असे जे मी आवर्जून म्हणतो आहे ते का याचे रहस्य आपल्या लक्षात येईल.

राजकीय पक्षांचे काम काय असते ? तर मी अगोदरच म्हटल्याप्रमाणे, देशातील आर्थिक व सामाजिक परिस्थिती जी आव्हाने निर्माण करते त्यांचा मुकाबला करणे हे होय. राजकीय पक्षाची कसोटी त्यावरच होते आणि त्याचे यशापयशही त्यावरच अवलंबून असते.

आपण जेव्हा राजकीय स्वातंत्र्याविषयी बोलत होतो तेव्हा राजकीय स्वातंत्र्य म्हणजे काय आणि त्यामुळे आपल्याला कोणती फलप्राप्ती होणार आहे हे जाणून घेण्याची आपली इच्छा होती. स्वातंत्र्याची मूलतत्त्वे कोणती, त्याचा आशय कसा असेल हे समजून घेण्यासाठी आपण एक प्रकारच्या भावनात्मक अनुभवातून गेलो. स्वराज्याने आपली तहान भागणार नाही असे आपण म्हणत होतो. पण स्वराज्य म्हणजे काय ? मला आठवते १९३१ साली कराचीस सरदार पटेलांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या काँग्रेसमध्ये स्वराज्याचा आशय काय असावा हे ठरविण्याचा प्रयत्न झाला होता. काँग्रेसच्या कार्यक्रमात अशा प्रकारे लोकांच्या गरजा व मागण्या प्रतिबिंबित होत असत. त्या मागण्यांमध्ये व गरजांमध्ये आता आमूलाग्र

बदल झाला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताची मूलभूत अशी जर कोणती गरज असेल तर ती राष्ट्रीय एकात्मतेची होय. पण त्याबरोबरच देशात लोकशाही राज्यकारभार प्रस्थापित करून देशाच्या आर्थिक जीवनात बदल घडवून आणणे, आणि ज्यायोगे प्रत्येक नागरिकास विकासाची समान संधी लाभेल आणि समानतेची, समान संधीच्या अनुभवाची, सहजीवनाची, सहानुभवाची आणि आपल्या श्रेयसाची भावना त्याच्या मनात निर्माण होऊन ती रुजू लागेल, वाढीस लागेल अशा प्रकारची समाजरचना घडवून आणणे याही स्वातंत्र्योत्तर कालातील आपल्या प्रमुख व निकडीच्या गरजा आहेत.

या दृष्टीने गेल्या वीस वर्षांमध्ये प्रत्यक्षात किती काम झाले असा प्रश्न तुमच्यापैकी कोणी तरी उठून मला विचारीलही. पण आपल्यापुढे आकड्यांचे जंजाळ उभे करण्याची माझी इच्छा नाही. कारण आपण सर्वजण अर्थशास्त्राचे व प्रचलित राजकारणाचे अभ्यासक आहात. तेव्हा या बाबतीत आपण स्वत: सहज खातरजमा करून घेऊ शकाल. पण गेल्या वीस वर्षांकडे आपण पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की आपली पहिली चार वर्षे देशासाठी प्रजासत्ताक राज्याचा पाया घालण्याच्या कामात गेली. आज आपण पुस्तकांच्या दुकानातून आपल्या राज्यघटनेची प्रत सहज घेऊन येतो. पण देशासाठी लोकशाही राज्यघटना तयार करणे हे काम तितके सोपे नव्हते. ते एक अत्यंत महत्त्वाचे आणि क्रांतिकारक असे काम होते. या संदर्भात आपण फ्रान्सच्या इतिहासावर किंवा रशियाच्या सद्य:कालीन इतिहासावर थोडी नजर टाकून पाहावे. आणखीही काही देशांचा इतिहास आपल्याला पाहता येईल. त्या सर्वांचीच नावे मी सांगत नाही, कारण त्याचा विपर्यास होण्याची भीती आहे. खरे म्हणजे या संदर्भात मुख्यत: पाकिस्तान माझ्या नजरेसमोर आहे. आपल्याला माहीत असेल की, १९१७ साली रशियात क्रांती झाल्यानंतर झारचा पराभव झाला आणि मेन्शेविकांनी सत्ता काबीज केली. देशाला लोकशाही राज्यघटना देण्याची त्यांची इच्छा होती. पण थोड्याच अवधीत ते सत्तेवरून हुसकावले गेले आणि त्यांच्या जागी जे आले त्यांनी आपली स्वत:ची

राज्यघटना बनविली. फ्रेंच राज्यक्रांतीचा इतिहास तर आपल्याला सुपरिचित आहे म्हणून तो मी येथे सांगत बसत नाही. पाकिस्तान खरोखरीच स्वतंत्र राष्ट्र झाले, पण त्याची राज्यघटना कोणत्या प्रकारची आहे ? आज ना उद्या तिच्यात बदल होण्याची शक्यता असली तरी हा बदल कोणत्या तत्त्वावर होईल हे कोणासही सांगता येणार नाही. खुद्द त्या देशातील लोकांना किंवा राज्यकर्त्यांनाही ते सांगता येणार नाही. या उलट भारताने शांततेच्या व लोकशाहीच्या मार्गाने या देशाची राज्यघटना तयार केली. देशातील लोकांच्या मागण्या व गरजा यांची पायाभूत सनद म्हणता येईल अशी ही लोकशाही राज्यघटना आहे. यानंतर भारताच्या एकीकरणाचे ऐतिहासिक कार्य आपणांस पार पाडावयाचे होते. केवळ राज्यघटनेच्या दृष्टीने पाहिले तर हे काम पार पडले आहे. पण त्याला मजबुती आणण्याचे, सुस्थिर बनविण्याचे काम अद्यापि चालू आहे. ते पुरे होण्यास आणखी काही कालावधी लागेल.

भारत हा एक महान देश आहे, आणि आपण भारतीय आहोत हे आपले सद्‌भाग्य म्हटले पाहिजे. तथापि आपल्यापैकी फारच थोड्या जणांना भारत म्हणजे खरोखर काय आहे याची भावनात्मक जाण असेल. प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहीपर्यंत भारत काय आहे हे मलाही समजले नव्हते. देशभक्तीपर गाणी ऐकून किंवा गाऊन मनात देशभक्तीची भावना प्रस्फुरित झालेल्या कोणाही माणसास भारत जेवढा समजेल तेवढेच भारताचे बौद्धिक आकलन मला तोपर्यंत झाले होते. भारत हा माझा देश आहे आणि त्यासाठी मी माझे प्राणही वेचीन, अशी देशासंबंधी कोट्यवधी भारतीयांची जी भावना आहे तशीच माझीही भावना होती. पण भारताच्या निरनिराळ्या भागात हिंडून आल्यानंतर आणि भारतातील विविधता पाहिल्यानंतर भारत म्हणजे काय आहे याची मला चांगली कल्पना आली. मी माझा स्वतःचा एक अनुभव आपल्याला सांगतो. त्याचा मी पूर्वी अनेक वेळा उल्लेख केला आहे. १९४५ च्या सुमाराची ही गोष्ट आहे. त्या वेळी मी एक तरुण राजकीय कार्यकर्ता होतो. याच सुमारास पंडित जवाहरलाल नेहरू अहमदनगरच्या कारागृहात 'भारताचा

शोध' हा आपला जगप्रसिद्ध ग्रंथ लिहीत होते. भारताचा नेता म्हणून आम्ही ज्याची देवासारखी पूजा बांधीत होतो तो अद्यापि भारताच्या शोधात आहे याचा अर्थ तरी काय समजावयाचा? मला या गोष्टीचे खरोखरी नेहमी आश्चर्य वाटावयाचे. पण मी जेव्हा भारतात फिरू लागलो तेव्हा मलाही शोध लागतो आहे अशी माझी भावना झाली. हा माझा स्वतःचा अनुभव आहे. सिंधूच्या तीरावरील लेहच्या परिसरातील भारत, ब्रह्मपुत्रेच्या दऱ्याखोऱ्यातील भारत, नागाभूमीच्या पर्वतराजीतील भारत, राजस्थानच्या लांबच लांब पसरलेल्या वैराण वाळवंटातील भारत, नर्मदा, साबरमती, तापी, कृष्णा, गोदावरी या नद्यांच्या तीरावरील भारत अशी मी भारताची विविध रूपे पाहिली. दक्षिणेकडे तर भारतातील विविधतेचे आपल्याला पुरेपूर दर्शन घडते. पण मूलभूत दृष्ट्या भारत हा सर्व ठिकाणी एकच आहे ही भावना प्रकर्षाने आपल्या मनात सतत राहते.

पण हे सर्व आपण समजून घेतले पाहिजे. भारताच्या ऐक्याच्या कल्पनेत एक रोमहर्षक काव्य आहे, एक प्रकारची जादू भरून राहिलेली आहे. या कल्पनेने आजही मला स्फुरण चढते आणि आपल्यापैकी प्रत्येकजण तिने भारावून जातो. तेव्हा भारताच्या ऐक्याच्या दृष्टीने देशात असा एक राजकीय पक्ष असला पाहिजे की, जो केवळ काही विशिष्ट राजकीय विचारप्रणालीवरच आधारलेला नाही, तर त्याला जनतेच्या प्रश्नांची बौद्धिक व भावनिक पातळीवरून जिव्हाळ्याने दखल घेता आली पाहिजे, देशातील कोट्यवधी लोकांच्या अंतःकरणांत त्याला सहयोगाची तार छेडता आली पाहिजे. थोडक्यात म्हणजे भारताचे राजकीय भवितव्य घडविणाऱ्या गोष्टींतील अत्यंत महत्त्वाची गोष्ट ही आहे की, ज्याला खऱ्या अर्थाने संपूर्ण भारतीय म्हणता येईल असा एक राजकीय पक्ष या देशात असला पाहिजे.

केवळ अखिल भारतीय नाव देऊन एखादी नवीन संस्था काढण्यासारखा हा प्रश्न नाही. प्रश्न हा आहे की, अखिल भारतीय स्वरूप प्राप्त होण्यासाठी ज्या गोष्टींची आवश्यकता लागते त्या गोष्टी तुमच्यापाशी आहेत किंवा नाहीत? लोकांपुढे जाण्यासाठी तुमची भूमिका काय आहे? त्यासाठी

संघटनात्मक दुवे जुळविण्याची तुमची ताकद किती आहे, या गोष्टींना फार महत्त्व आहे. संघटनात्मक दुवे म्हणजे केवळ इथे तिथे कार्यालये स्थापन करणे नव्हे, तर लोकांच्या अंतःकरणापर्यंत पोहोचून ज्याला आपण भारत म्हणतो त्या मध्यवर्ती राष्ट्रीय कल्पनेभोवती लोकांना एकत्र आणणारी यंत्रणा म्हणजे संघटनात्मक दुवे होत. या मूलभूत गोष्टी आहेत. तेव्हा जनतेची चळवळ म्हणून जो पक्ष राहू इच्छितो त्याच्याजवळ अशा प्रकारची यंत्रणा असली पाहिजे की, जिच्यामुळे त्याला आपले राजकीय भविष्य तर शाबूत राखता येईलच, परंतु त्याचबरोबर जनतेची अंतःकरणेही त्याला आपल्याशी जोडता येतील. याला आपण संघटनात्मक व्यूह म्हणू या. पण मी हा जो व्यूह शब्द वापरतो आहे तो लौकिक अर्थाने नाही. तर त्यात एक प्रकारचा कार्य करण्याचा पद्धतशीरपणा मला अभिप्रेत आहे. या संघटनात्मक व्यूहाबरोबरच त्या पक्षाजवळ एक प्रकारचा आर्थिक व्यूहही असला पाहिजे.

आपल्या देशाला आज कोणत्या प्रकारच्या आर्थिक व्यूहाची गरज आहे? कृषी आणि औद्योगिक उत्पादनपद्धतीत क्रांतिकारक बदल करून पारंपरिक व अविकसित भारतीय समाज आधुनिक करणे आणि त्याचबरोबर समाजातील आर्थिक विषमता दूर करणे हे दुहेरी ध्येय या व्यूहाचे असले पाहिजे. हे सर्व समजून घेण्याची आणि प्रत्यक्षात पुरे करण्याची कुवत पक्षात किती आहे यावरच शेवटी त्या पक्षाच्या कार्यक्रमाची कसोटी लावली पाहिजे हीच खरी कसोटी आहे आणि याच कसोटीवर केवळ काँग्रेसचेच नव्हे तर कोणत्याही राजकीय पक्षाचे मूल्यमापन करण्याचा मी प्रयत्न करीत असतो. या मूलभूत कसोटीला काँग्रेस उतरते किंवा नाही हा खरा प्रश्न आहे. पण एक गोष्टमात्र निश्चित आहे. ती म्हणजे भारताच्या आर्थिक जीवनात मूलगामी बदल घडून आला पाहिजे. अशा प्रकारचा क्रांतिकारक बदल घडवून आणण्याचे सामर्थ्य काँग्रेसमध्ये आहे काय? या कसोटीवर काँग्रेसची आणि देशातील इतर निरनिराळ्या राजकीय पक्षांची तुम्हाला नक्कीच तुलना करता येईल. या देशातील काही राजकीय पक्ष आज जैसे थे स्वरूपाचा कार्यक्रम स्वीकारून भविष्यकाळात देशाचे नेतृत्व

करणारे खरेखुरे राष्ट्रीय पक्ष बनण्याची उमेद बाळगतात, हे पाहिले म्हणजे मला काहीसे आश्चर्य वाटते. राजकारणाचा एक अभ्यासक म्हणून मी जेव्हा या प्रश्नाकडे पाहतो तेव्हा मला असे वाटते की, हे पक्ष खरोखरी भूतकाळात वावरत आहेत. कोणाही व्यक्तीवर टीका करण्याच्या उद्देशाने मी हे बोलत नसून या पक्षांच्या भूमिका समजावून घेण्याचा माझा हा प्रयत्न प्रामाणिक आहे. या देशात आणि विशेषतः या शतकात केवळ आपल्या आवतीभोवतीच्या, आपल्या शेजारपाजारच्या किंवा आपल्या गावच्य लोकांचाच विचार करून भागणार नाही, तर देशातील सबंध जनतेचा आपल्याला विचार केला पाहिजे. आम जनतेचे प्रश्न काय आहेत, त्यांच्या मागण्या काय आहेत, त्यांच्या आशाआकांक्षा काय आहेत हे जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

अत्यंत महत्त्वाच्या अशा या गोष्टींचा विचार न करता उलट एखादा पक्ष गतकालाकडेच सारखी दृष्टी लावून बसणार असेल तर तो पक्ष माझ्या मते इतिहासजमा झाला आहे असे समजले पाहिजे. आम्हीच फक्त बुद्धिमान आहोत, सुसंस्कृत आहोत असे का तुम्ही लोकांना सांगणार आहात ? जे गुणश्रेष्ठ आहेत त्यांचीच जीत व्हावी आणि इतरांनी अंधारात चाचपडत राहावे हे म्हणणे वरवर पाहिले तरी न्याय्य दिसते काय ? विछान्यावर पडलेल्या आजारी माणसाला पळण्याच्या शर्यतीत भाग घेण्यास सांगण्यात आणि यात फारसा फरक नाही. तुम्ही शरीराने सदृढ आहात, कामाच्या पद्धतीचे तुम्ही शिक्षण घेतले आहे, तुमच्या अंगी शिस्त बाणलेली आहे. याउलट देशातील कोट्यवधी लोक शतकानुशतके अज्ञानात व दारिद्र्यात पिचत आहेत. तेव्हा तुमच्या आणि त्यांच्यामधल्या शर्यतीला तुम्ही काय शर्यत म्हणाल ? देशात आज हे जे दारिद्र्य व अज्ञान दिसते आहे त्याबद्दलचा सगळाच दोष मी ब्रिटिश साम्राज्यशाहीला देणार नाही. या देशातच काही उणिवा होत्या. ब्रिटिशांच्या काळातच नव्हे तर माझ्या मते त्याच्याही पूर्वीपासून या देशाची प्रगती थांबलेली होती. उलट मी असे विचारीन की, ब्रिटिश येथे आलेच कसे ? याचे कारण या देशाची प्रगती अगोदरच खुंटलेली होती आणि म्हणून ते आले. राजकीय दृष्ट्या

गतिशील असलेल्या समाजाने, राजकीय दृष्ट्या गतिशील असलेल्या विचाराने येथला गतिशून्य समाज दुभंगून टाकला आणि त्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. या देशात जे घडले त्याची उपपत्ती माझ्या मते ही अशी आहे. पण याचा अर्थ आपल्या समाजात थोर किंवा सुसंस्कृत माणसे नव्हती असा नाही. ब्रिटिश सत्ता येथे विजयी झाली याचे कारण तिच्यापाशी अत्यंत सामर्थ्यशाली शस्त्रे तर होतीच, पण शिवाय तिच्याकडे तितकीच सामर्थ्यशाली शास्त्रेही होती. पाश्चात्त्य जगात त्या वेळी औद्योगिक क्रांतीची वाटचाल सुरू झाली होती, तिने त्यांना एक वेगळी दृष्टी दिली. व्यापार, उद्योग व वैज्ञानिक विकास यांची कास धरणाऱ्या संस्कृतीची नवी शक्ती बरोबर घेऊन ते भारतात आले आणि त्यांनी येथल्या लोकांना नामोहरम केले. आपला पराभव अगदी सहजगत्या झाला. हे सर्व सांगण्यातला माझा मुद्दा हा की, केवळ ब्रिटिश काळातच नव्हे तर ब्रिटिश येथे येण्यापूर्वीही आपला समाज कुचंबलेला होता.

या अवकळेतून देशाला आता आपल्याला वर काढावयाचे आहे. हे आपण कसे करणार आहोत? खरा प्रश्न तर हाच आहे. जे हा प्रश्न कमीत कमी वेळात सोडवू शकतील त्यांचाच राजकीय क्षेत्रात लोकांच्या निष्ठेवर हक्क राहील हे माझे गृहीत कृत्य आहे. काँग्रेसपाशी अशा प्रकारचा कार्यक्रम आहे काय? या प्रश्नाला माझे उत्तर 'हो' असे आहे. मी आपल्याला नम्रपणे सांगू इच्छितो की, काँग्रेसजवळ हा कार्यक्रम आहे. आपल्या देशातील शेतीचा उद्योग ज्या कोंडीत अडकून पडला आहे त्यातून आपल्याला त्याला प्रथम बाहेर काढावयाचे आहे. शेती हा आपल्या देशातील खाजगी क्षेत्रातला सर्वांत मोठा उद्योग होय. कधी कधी खाजगी व सार्वजनिक क्षेत्रांतील उद्योगधंद्यांसंबंधी एक वाद घालण्यात येतो. आज आपण फक्त सार्वजनिक क्षेत्र व औद्योगिक क्षेत्र यांचीच उभारणी करावी हे मत मला मान्य नाही. शेती हा या देशातील सर्वांत मोठा उद्योगधंदा आहे, आणि काही अपवाद सोडून दिले तर तो सर्वस्वी खाजगी क्षेत्रांत आहे. या उद्योगाबाबतची आजची परिस्थिती काय आहे, वीस वर्षांपूर्वी ती काय होती, आणि नजीकच्या व दूरच्या भविष्यकाळात ती काय

राहणार आहे ? या बाबतीत आपण काय केले आहे आणि काय, करू इच्छितो या फार महत्त्वाच्या गोष्टी आहेत. तेव्हा एखाद्या राजकीय पक्षासंबंधी आपले मत बनविताना आपण या सर्व गोष्टी लक्षात घेणार आहात किंवा नाही ? आणि त्या लक्षात घेणार असाल तर त्याबाबत आपण कोणती कसोटी लावणार आहात ? माझ्या मते त्या पक्षाच्या कामाचा कार्यक्रम हेच या प्रश्नाचे उत्तर राहील.

भारताच्या राजकीय जीवनात कृषिक्रांतीचा कार्यक्रम प्रथम काँग्रेस पक्षानेच पुरविलेला आहे. या कार्यक्रमाची विविध अंगे आहेत. कसणाऱ्याला जमीन, किफायतशीर जमीनधारण क्षेत्रे, सहकारी सेवा संघ वगैरे कल्पना या कार्यक्रमात अंगिकारण्यात आलेल्या असून त्या कृतीत उतरविण्यासाठी कसोशीचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यात यश किती आले, अपयश किती आले हा तपशिलाचा भाग असून तो टीकेचा विषय होऊ शकेल, तुलनात्मक अभ्यासाचा विषय होऊ शकेल. पण यातून जो अनुभव मिळेल त्या अनुभवातूनच आपण पुढील प्रगतीचा मार्ग चोखाळू शकू. पण कार्यक्रमाच्या दृष्टीतून विचार करता, काँग्रेसची या प्रश्नासंबंधीची भूमिका बरोबर आहे असेच आपल्याला म्हणावे लागेल.

आपली शेतीच जर आजपर्यंत कुचंबलेल्या अवस्थेत होती तर उद्योगधंद्यांच्या क्षेत्रात महत्त्वाचे असे काय घडणार होते ? पण या क्षेत्रातील आर्थिक संबंधात बदल घडवून आणणे ही एक अत्यंत निकडीची गोष्ट होती. समाजात क्रांतिकारक बदल घडवून आणला पाहिजे असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा त्याचा यापेक्षा दुसरा अर्थ तो काय असणार ? आर्थिक संबंधात बदल घडवून आणणे म्हणजे समाजातील निरनिराळ्या वर्गांच्या आर्थिक हितसंबंधांत बदल घडवून आणणे. पण वर्ग ही संज्ञा कार्ल मार्क्सने ज्या अर्थाने वापरली आहे त्या अर्थाने ती मी येथे वापरीत नाही, म्हणजे वर्गविग्रहाच्या अर्थाने ती मी वापरीत नाही. परंतु समाजाच्या निरनिराळ्या विभागांच्या संबंधांत बदल हा झालाच पाहिजे, एक प्रकारचा मूलभूत स्वरूपाचा बदल झाला पाहिजे यासंबंधी वाद नाही. पण तो आपण कसा करणार आहोत ? कोट्यवधी लोकांना खायला धड अन्न

नाही, ल्यायला धड कपडा नाही, शिक्षणाच्या सोयी नाहीत, धडपणे जगता येत नाही, शरीरपोषण करता येत नाही, मन सुसंपन्न करता येत नाही, त्यासाठी लागणाऱ्या संधी उपलब्ध नाहीत अशी ही या देशातील परिस्थिती आहे. ही परिस्थिती सुधारण्यासाठी एक आर्थिक कार्यक्रम हाती घेऊन तो नियोजनद्वारा नेटाने अमलात आणण्याचा काँग्रेसने प्रयत्न केला आहे. त्यातील काँग्रेसचे यशापयश हा पुन्हा एक चर्चेचा विषय असून त्याबाबत दोन्ही बाजूंनी बोलता येण्यासारखे आहे.

देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्व असलेल्या आपल्या परराष्ट्रीय धोरणाचाही आपण येथे विचार करू या. गटबंदीपासून अलिप्तता (Non-alignment) हे आपल्या देशाच्या परराष्ट्रीय धोरणाचे मुख्य सूत्र आहे. काही लोकांना हे जवाहरलाल नेहरूंचे एक खूळ आहे असे वाटते. पण भारताचे परराष्ट्रीय धोरण हे नेहरूंनीच घडविले व त्यांनीच त्याला विशिष्ट रूप दिले. एवढेच नव्हे तर परराष्ट्रीय धोरणाची चाळ आर्थिक व्यवहारांशी नेहरूंनीच सांगड घातली ही गोष्टही अगदी निश्चित आहे. परंतु स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात काँग्रेसने ज्या धोरणांचा पाठपुरावा केला त्यातच खरोखर म्हणजे आपल्या परराष्ट्रीय धोरणाची बीजे होती असे माझे मत आहे. तुम्ही आजचे जग पाहा, आणि बीस वर्षांपूर्वी काय स्थिती होती ते नजरेसमोर आणा, म्हणजे केवढा तरी बदल या काळात घडून आला आहे हे आपल्या लक्षात येईल. एका बाजूला समाजवादी गट तर दुसऱ्या बाजूला विगरसमाजवादी गट अशा प्रकारच्या युतिकरणाची प्रक्रिया जगात या काळात सुरू झाली. हे युतिकरण चालू असताना हे दोन्ही विरोधी गट जागतिक वर्चस्वासाठी धडपडत होते. अशा वेळी कोणत्या तरी एका बाजूला बांधून घेणे हे आपल्या दृष्टीने शुद्ध अविचारीपणाचे ठरले असते. ज्या देशांनी तसे केले त्यांचा विशेष फारसा फायदा झालेला नाही. दीर्घ परंपरा व इतिहास असलेल्या भारतासारख्या प्रचंड देशाच्या दृष्टीने या गटबंदीपासून दूर राहणे हेच योग्य धोरण होते. कोणत्याही गटापासून दूर पळून जाण्याचा त्यात हेतू नव्हता. परंतु प्रत्येक प्रश्नाच्या गुणावगुणावर स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची स्वावलंबी

आणि स्वतंत्र देशाला शोभणारी अशी ही नीती होती. संरक्षणमंत्री या नात्याने मला आलेल्या अनुभवावरून मी आपल्याला सांगू इच्छितो की, यां आपल्या धोरणाचे सर्व फायदे आजमितीलाही आपल्याला मिळत आहेत.

काही गोष्टींत बदल हा होतच असतो. आजच्या जागतिक घडामोडींचे तुम्ही निरीक्षण केलेत तर अनेक गोष्टी बदलल्याचे तुम्हाला आढळून येईल. साठ सालच्या दशकातील समाजवादी जग हे पन्नास सालच्या दशकातले समाजवादी जग राहिलेले नाही. पूर्वीसारखे ते आज सुसंघटित व एकसंध नाही. कोसिजिनचा रशिया व माओचा चीन यांच्यामध्ये आज एक प्रकारचा संघर्ष आहे. या गोष्टीचे परिणाम स्वाभाविकपणे सभोवारच्या परिस्थितीवर होत असतात. चालू घडीची जागतिक परिस्थिती पाहून तिचा आलेख काढण्यास मला आपण सांगितले तर मी एक चौकोन काढीन. मास्को आणि पेकिंग, पेकिंग आणि दिल्ली, दिल्ली आणि पिंडी व पिंडी आणि मास्को यांना जोडणाऱ्या रेषा काढल्या म्हणजे एक प्रकारचा चौकोन तयार होतो. पन्नास सालच्या दशकात मास्को व पेकिंग यांच्यामध्ये मैत्रीची जशी एक रेषा होती तशीच समझोत्याची एक रेषा पेकिंग व दिल्ली यांच्यातही होती. त्याचप्रमाणे मास्को व दिल्ली यांना जोडणारी एक कर्णरेषाही होती. पिंडी व दिल्ली यांनाही जोडणारी एक प्रकारची काहीशी रेषा होती. पण पिंडी आणि मास्को त्याचप्रमाणे पिंडी व पेकिंग यांना जोडणाऱ्या त्या काळात मुळीच रेषा नव्हत्या. पण आता साठ सालच्या दशकात काय चित्र आहे ? मी आताच वर्णन केलेली आकृती या काळात पार बदलून गेली आहे. मास्को व पेकिंग यांच्यामध्ये आता रेषा राहिलेली नाही. तशीच दिल्ली व पेकिंग यांच्यामध्येही ती दिसत नाही. पण दिल्ली व मास्को आणि पिंडी व पेकिंग यांच्यामधील कर्णरेषा मात्र अगदी स्पष्टपणे दिसत आहेत.

आजच्या जागतिक परिस्थितीत झालेला बदल हा असा आहे. पण चीनमध्ये आज जे घडत आहे त्याला आपल्या दृष्टीने खरे म्हणजे फार महत्त्व आहे. पेकिंगमध्ये सध्या जी सांस्कृतिक क्रान्ती चालू आहे तिचा

अर्थ काय असा प्रश्न साहजिकपणे प्रत्येकजण विचारीत आहे, आणि ह्या क्रांतीच्या सुरुवातीपासून तिचा राजकीय अन्वयार्थ लावण्याच्या प्रयत्नात तज्ज्ञ मंडळी आहेत. तेव्हा या घटनेचा अर्थ समजून घेणे आपल्या दृष्टीने उद्‌बोधक ठरेल. 'अ' ला 'ब' चा पराभव करावयाचा आहे आणि 'ब' ला 'अ' ची जागा बळकावयाची आहे, आणि म्हणून 'क' हा 'अ' ब 'ब' या दोघांशी डाव खेळण्याचा प्रयत्न करतो आहे, असा हा सारा प्रकार आहे.

चीनमधल्या क्रान्तीच्या प्रतिक्रिया आता दिसू लागल्या आहेत. हा अर्थातच सत्तेसाठी चाललेला एक झगडा आहे. माओनंतर कोण हे या झगड्याचे स्वरूप दिसते. पण चीनमध्ये जे घडत आहे त्याचा अधिक सखोलपणे आपण विचार केला तर सत्तांतराची ती एक अभिजात किंवा पारंपरिक स्वरूपाची कहाणी आहे हे आपल्या ध्यानात येईल. माओ-वादाच्या भवितव्याची चिंता हे खरे तेथले दुखणे आहे. त्याचप्रमाणे रशिया व चीन या दोन प्रचंड भूभागामध्ये वर्धिष्णू असणाऱ्या दोन उग्र राष्ट्रवादांच्या संघर्षाचीही याला पार्श्वभूमी आहे.

स्टॅलिनला आपल्या मृत्यूनंतर स्टॅलिनवादाचे काय होईल याची कधी कल्पना तरी आली असेल काय? स्टॅलिननंतर क्रुश्चेव सत्तेवर आला आणि स्टॅलिनच्या कल्पना व विचार त्याने पार बदलून टाकले. आपल्यामागे आपल्या विचारांचे काय होईल या भीतीने माओला ग्रासून टाकले आहे. आपल्या विचारांना मजबुती आणण्याचा तो प्रयत्न करीत असून त्याच्या विचारसरणीवर ज्यांचा विश्वास दिसत नाही अशांची त्याने हकालपट्टी करण्यास सुरुवात केली आहे. परंतु माओच्या चीनने लष्करी दृष्ट्या अधिक लढाऊ असे जे धोरण स्वीकारले आहे, तोच खरा चिंतेचा विषय आहे. वास्तविक पाहता चीनच्या सध्याच्या राजकीय व लष्करी धोरणांची चिंता फक्त भारतीयांनीच वाहावी असे नसून माझ्या मते लोकशाही जीवनपद्धतीवर निष्ठा असणाऱ्या प्रत्येक सुजाण व्यक्तीने ती वाहावयास हवी. ही एक जागतिक महत्त्वाची घटना आहे, आणि ती प्रथमच आपल्या सीमेपलीकडे घडत आहे. जगाच्या कुठल्या तरी भागात घडणाऱ्या

घटनांना कधी कधी आपल्या दृष्टीने आत्यंतिक महत्त्व प्राप्त होते. कारण आपल्या जीवनात बदल घडवून आणण्याचे या घटनांत सामर्थ्य असते. आजचा काळ असा आहे की, जागतिक घटनांच्या मध्यबिंदूच्या अगदी नजीक आपण सरकलो आहोत. आज ज्या काही क्रांतिकारक गोष्टी घडत आहेत त्यांतून काय हलाहल बाहेर पडेल ते सांगता येणार नाही. पण हे सारे आपल्या अगदी नजीक हिमालयाच्या पल्याड घडते आहे, आणि म्हणून ते तुमच्या, माझ्या आणि आपणा सर्वांच्याच दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

अशा प्रकारे क्षणाक्षणाला बदलणाऱ्या जगात आपण आज राहत आहोत. पण त्याने घाबरून न जाता, आपण आपले विचार, आपली औद्योगिक विकासक्षमता आणि आपली जनशक्ती यांवरच विसंबून राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे, आणि त्यासाठी जनतेची तयारी केली पाहिजे. आज ज्या घटना घडत आहेत त्यांच्याकडे केवळ वस्तुनिष्ठ दृष्टिकोणातून पाहण्याचा मी प्रयत्न करतो आहे. खंबीर निर्धाराने उभ्या राहिलेल्या लोकांचा लहानसा गटही जगातील सर्वांत शक्तिमान अशा सत्तेचा मुकाबला करू शकतो. जनतेचे मनोबल, जनतेचा निर्धार आणि जनतेची मनःप्रवृत्ती या गोष्टीच कोणत्याही राजकीय तत्त्वज्ञानाचा, आर्थिक धोरणाचा व परराष्ट्रीय नीतीचा पाया असतात हे सत्य आपण सतत नजरेसमोर ठेवले पाहिजे. शेवटी जनतेचा शब्द हाच अंतिम शब्द असतो हे लक्षात घेऊन गांधीजी आणि नेहरूंनी जनतेच्या मनाची तयारी केली, आणि आजही काँग्रेस या दृष्टिकोणाचे प्रतिनिधित्व करते आहे असे माझे व्यक्तिशः मत आहे.

आम्ही या देशाचे किंवा त्या देशाचे मित्र आहोत असे जाहीर करणे म्हणजे अलिप्ततावाद नव्हे. तर आपल्याला सर्वांचेच मित्र व्हावयाचे आहे, ही मूलभूत गोष्ट आहे. आपण जागतिक शांततेचे पुरस्कर्ते आहोत. कारण जागतिक शांततेखेरीज प्रगती अशक्य आहे. पण आम्हाला जागतिक शांतता हवी असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा अमुक वा तमुक देशाशीच आम्ही मैत्री करू असे आपल्याला म्हणता येणार नाही. पाकिस्तान व

चीन या देशांच्या बाबतीत आपले काही प्रश्न आहेत. पण या देशांबरोबर आमचे संबंध मैत्रीचे राहणार नाहीत असे आपण म्हणता कामा नये. अगदी या घटकेलासुद्धा पाकिस्तान काही तुरळक हालचाली करीत आहे. तुमच्या आमच्या दृष्टीने ही जरूर काळजी करण्यासारखी बाब आहे, आणि म्हणून आपल्या सरहद्दीच्या पलीकडे काय चालू आहे याबर मला नजर ठेवावी लागत असली तरी पाकिस्तान आपला सदा सर्वकाळ शत्रूच राहील असे आपण मानीत नाही. फार काय आजसुद्धा पाकिस्तान आपला शत्रू आहे असे आपण मानू नये. मात्र त्यांनी आडदांडपणा करण्याचा प्रयत्न करू नये, एवढी काळजी आपल्याला जरूर घ्यावी लागेल. तसा आडदांडपणा ते करणार असतील तर गेल्या खेपेस जे केले तेच पुन्हा या देशाला करावे लागेल. आडमुठेपणा करणाऱ्यांशी वागण्याचा हाही एक मार्ग आहे. परंतु सनातन वैर हे काही आमचे तत्त्वज्ञान नाही. आमचे तत्त्वज्ञान मैत्रीचे आहे. पाकिस्तानबरोबर आम्हाला मैत्रीच हवी आहे. जे घडले आहे त्यापासून आम्ही जरूर काही धडे शिकलो आहोत. चीनपासून आम्ही एक धडा शिकलो. तरीही आम्ही आमचे तत्त्वज्ञान सोडलेले नाही. आजही आम्हाला सर्व देशांबरोबर मैत्रीच हवी आहे.

मैत्री हे तर आपले मूलभूत तत्त्वज्ञान आहे. परंतु इतर देशांबरोबर मैत्रीचे संबंध राखण्याचे धोरण जर यशस्वी व्हावयाचे असेल तर आपण आपला पाया मजबूत केला पाहिजे. हा पाया म्हणजेच जनता होय. जनतेला समाधानी ठेवून आपण जनतेची तयारी केली पाहिजे, तिचे बळ वाढविले पाहिजे, तिच्या अंतःकरणात भविष्याबद्दलची आशा निर्माण केली पाहिजे. हे सर्व घडून येण्यासाठी आपल्याला विकासाचा कार्यक्रम हाती घेणे प्राप्त आहे. काँग्रेसची ध्येयप्रणाली, काँग्रेसची उद्दिष्टे, काँग्रेसचा कार्यक्रम वगैरेंचा बरोबर हाच अर्थ आहे. गेली वीस वर्षे याच गोष्टींचा पाठपुरावा ती करीत आली आहे.

यात आपल्याला किती यश आले? मला हे मान्य आहे की, आपल्याला मिळालेले यश पुरेसे नाही. जेवढे यश यावयास हवे होते असे आपल्याला वाटते तेवढे नक्कीच आलेले नाही. याची अनेक कारणे असू शकतील.

अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेत काही दोष असू शकतील. उच्च पातळीवर काही चुका झाल्या असतील, तशाच त्या मधल्या व कनिष्ठ पातळीवरही झाल्या असतील. १९५१ साली आपण आर्थिक नियोजनाची व परराष्ट्रीय धोरणाची जी नीती रचली ती पार पाडण्यास बराच मोठा कालावधी लागणार ही गोष्ट स्पष्टच होती आणि दुसरे असे की, आपल्याला हव्या असणाऱ्या सर्वच गोष्टी पार पाडण्याची आपल्यात ताकदही नव्हती; आणि म्हणून आपण आपली सर्व साधनसामगी, आपली सर्व शक्ती, आपले सर्व मनुष्यबळ, आर्थिक विकासाच्या कार्यक्रमावर केंद्रित केले. परंतु त्यानंतर आता दुसऱ्या दशकाच्या मध्यावर आपण आलो असताना संरक्षणाची फार मोठी जबाबदारी आपल्या शिरावर येऊन पडली आहे. आणि ही जबाबदारी अशी आहे की, त्यासाठी प्रचंड साधनसामग्रीची गरज आहे. त्यातून काही नवे अडचणीचे आर्थिक प्रश्न निर्माण झाले आहेत, आणि म्हणून आर्थिक विकासाचा तपशीलवार जेव्हा आपण विचार करतो तेव्हा एक पक्ष म्हणून नव्हे तर एक राष्ट्र म्हणून आपण या ज्या जबाबदाऱ्या स्वीकारलेल्या आहेत त्यांचा आपल्याला कधीही विसर पडता कामा नये.

राजकीय पक्षाची आपली निवड करताना सरतेशेवटी ज्या गोष्टी आपल्याला पाहाव्या लागतील आणि ज्या गोष्टींचा आपल्याला काळजीपूर्वक विचार करावा लागेल अशा या सर्व मूलभूत गोष्टी आहेत. माझे आपल्याला असे सांगणे आहे की, एखाद्या पक्षाची दखल घेताना कुठल्या एका प्रश्नाकडे, कुठल्या एका समस्येकडे किंवा कुठल्या एका कार्याकडेच केवळ आपल्याला पाहून चालणार नाही. तर सर्व प्रकारची शहानिशा करून आपण जो राजकीय पक्ष निवडणार आहात त्या पक्षामध्ये राष्ट्रापुढे आज जी मूलभूत आव्हाने आहेत, जे महान ऐतिहासिक प्रश्न उभे आहेत त्यांची व्याप्ती अजमावण्याची, त्यांचा अर्थ समजून घेण्याची आणि शास्त्रशुद्ध रीत्या हे सर्व प्रश्न हाताळण्याची ताकद आहे किंवा नाही हे आपणांस पाहावेच लागेल. हे जे सर्व प्रश्न आपल्यापुढे उभे आहेत त्यांची उत्तरे कोणती ? त्यांची जी उत्तरे येतील त्यावरून आपल्याला

आपल्या पसंतीचा राजकीय पक्ष निवडता येईल.

काँग्रेस पक्षाने केलेले कार्य आणि त्याचे स्वरूप दर्शविणारे आकडे माझ्याजवळ आहेत. पण या आकड्यांचे ओझे मी आपल्यावर लादू इच्छित नाही. कारण पक्षामार्फत प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तिकेत हे सर्व आकडे देता येतील, आणि निवडणुका जवळ आल्यानंतर पक्ष हे सर्व आकडे देईल याची मला खात्री आहे. पण काँग्रेसने काय काय चुका केल्या हे दाखवून देण्याची निवडणूक काळात इतर पक्षांमध्ये शर्यत लागेल. काँग्रेसने आजवर काय केले त्यासंबंधीची माहिती पुरवून अर्थात आम्ही त्या प्रचाराला तोंड देऊ. काही क्षेत्रात आम्हाला अपयश आले ही गोष्ट खरी आहे. पण प्रत्यक्षात आपल्या हातून चुका होणारच नाहीत असे कोण म्हणू शकेल ?

काँग्रेससंबंधीची माझी भूमिका मी आपल्यासमोर मांडली. या देशापुढे आज काही आव्हाने असून त्यांचा मुकाबला झालाच पाहिजे. या देशापुढे आज सर्वांत महत्त्वाचा प्रश्न कोणता असेल तर तो लोकांची मने जी जुनाट परंपरेत अडकून पडली आहेत त्यांना वाट मोकळी करून देण्याचा आहे, त्यांच्यातल्या बुद्धिमत्तेला, त्यांच्यातल्या शक्तींना वाट मोकळी करून देण्याचा आहे, आणि देशापुढे असलेली आव्हाने स्वीकारून त्याला एक आधुनिक देश बनविण्याचा आहे. येत्या काही दशकांमध्ये देशापुढे कोणती मूलभूत समस्या असेल असे जर मला विचारले तर त्याचे मी थोडक्यात असे उत्तर देईन. पहिल्याने आपण आपली शेती आधुनिक बनविली पाहिजे, आपले उद्योगधंदे आधुनिक धर्तीचे बनविले पाहिजेत, तांत्रिक विकासाच्या संधी आपण निर्माण केल्या पाहिजेत, आणि प्रगत उद्योग-धंद्यांवर आधारित असलेले संरक्षण धोरण बांधून ते विकसित करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. हे होऊ शकले तरच अनेक कटकटींनी आणि समस्यांनी घेरलेल्या या जगात भारताला आपले स्वातंत्र्य टिकविता येईल, आपली मान उंच ठेवता येईल.

परिसंवाद, ज्युनिअर चेंबर ऑफ कामर्स, अहमदाबाद, दि. ४-९-६६

२७ आमच्या सामर्थ्याचे जीवनस्रोत

ह्या शिबिराच्या कल्पनेमागला मूळ हेतू हा आहे की, आपल्या संघटनेमध्ये जो अपुरेपणा असेल त्याची चर्चा व्हावी, तपासणी व्हावी. तेव्हा आपल्या अपुरेपणाची आपणास जाणीव नाही असे कोणीसे आता येथे म्हटले, ते खरे नाही. आपल्याला आपल्या अपुरेपणाची जाणीव आहे. हे तर या शिबिरामागचे गृहीत कृत्य आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी म्हणून आपण जेव्हा जमतो ते काही चार-दोन प्रस्ताव घाईघाईने पास करून निघून जाण्याच्या दृष्टीने नव्हे, तर एका मोठ्या कुटुंबातील माणसे म्हणून, एकत्र बसून आपण सगळ्या प्रश्नांची चर्चा केली पाहिजे, हा त्यातला खरा उद्देश असतो. आपण जी उद्दिष्टे ठरविली होती ती पार पाडण्यासाठी आपण टाकलेली पावले पुरेशी आहेत का? आपण जे काही नवीन धोरण बांधण्याचा प्रयत्न केला ते धोरण नवीन राहिले आहे का? किंवा ते धोरण तरी राहिले आहे का? महाराष्ट्राची आज राजकीय परिस्थिती काय आहे? सामाजिक परिस्थिती काय आहे? नवीन म्हणून आम्ही जे काम बांधले, कृषि-औद्योगिक समाजाची

जी आम्ही दृष्टी घेतली, आणि गेल्या सात-आठ वर्षांमध्ये त्याकरिता जे प्रयत्न केले त्यातून किती घडले आहे ? अद्यापि किती घडावयाचे आहे ? सहकाराची चळवळ किंवा पंचायत राज्याची एक दिशा आपण आखली, आणि त्यातून जे उभे करण्याचा आम्ही प्रयत्न केला त्या दिशेने आपण किती पुढे गेलो आहोत ? त्यामध्ये कुठे अपुरेपणा आहे ? हे आणि यासारखे अनेक प्रश्न आज आपल्यासमोर उभे आहेत. धोरणाच्या अंमलबजावणीच्या बाबतीत तर गणपती करावयास बसावे आणि त्यातून चुकून माकड तयार व्हावे असा प्रकार काही काही वेळा होतो. याचे मुख्य कारण असे आहे की, असंख्य बाळगोपाळांना बरोबर घेऊन जनतेच्या जीवनाचे जे गोकूळ आपणांस उभे करावयाचे आहे त्यामध्ये अशी काही गडबड होण्याचा संभव असतो, आणि म्हणून आपण अधूनमधून एकत्र बसून, या आणि अशाच इतर प्रश्नांची मोकळेपणाने चर्चा केली पाहिजे. हे शिबिरही याच हेतूने घेण्यात आले आहे. खरे म्हणजे या शिबिराचा मूळ उद्देश आत्मसंशोधनाचा आहे, आत्मटीकेचा आहे. तेव्हा आपणांस आपल्या अपुरेपणाची जाणीव नाही हा प्रश्नच येथे उपस्थित होऊ शकत नाही.

आतापर्यंत येथे झालेल्या चर्चेमध्ये, कळत न कळत माझा उल्लेख आला. माझे म्हणून एक नेतृत्व आहे आणि ते बळकट केले पाहिजे वगैरे विचार काही मित्रांनी येथे चांगल्या भावनेने मांडले. मी या सर्व मित्रांना मानतो. त्यांच्या प्रेमाबद्दल मी त्यांचा अतिशय आभारी आहे. पण मी आपणाला सांगू इच्छितो की, मी आत्मटीका करून घेणारा आणि माझ्या मर्यादा समजणारा मनुष्य आहे. तेव्हा माझे एक वैयक्तिक नेतृत्व आहे, या दृष्टीने मी माझ्याकडे पहात नाही, आपणही कृपा करून तसे पाहू नका. राजकारणामध्ये केवळ वैयक्तिक महत्त्वाकांक्षा धरून चालणाऱ्या माणसांना यश मिळत नाही, तशी महत्त्वाकांक्षा कोणी धरूही नये, असे शहाणपणाने मानणारा मी माणूस आहे. परंतु मला हे जरूर म्हटले पाहिजे की, महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील काही प्रश्नांच्या बाबतीत कळत न कळत मला जबाबदार धरले जाते. पण ही जबाबदारी व हे कर्तृत्व माझे नाही. ही जबाबदारी व हे कर्तृत्व तुमच्या सगळ्यांचे आहे. या बाबतीत मला

एकदा केव्हातरी स्पष्टपणे बोलले पाहिजे, एवढ्यासाठीच या गोष्टीचा मी येथे उल्लेख केला.

गेल्या दोन वर्षांमध्ये सबंध राष्ट्रीय जीवनावर जे एक नवीन सावट आले आहे, त्याची काहीतरी मीमांसा झाली पाहिजे आणि त्याच्या संदर्भात महाराष्ट्राच्या प्रश्नांचा विचार झाला पाहिजे, हा एक या शिबिराचा उद्देश आहे. शिवाजीरावांनी यासंबंधीचा जो प्रबंध वाचला त्यावर धारियांनी चांगलेच टीकास्त्र सोडले. पण हा दोष शिवाजीरावांचा नाही. सबंध राष्ट्रीय जीवनाचा प्रश्न त्यांनी आपल्यापुढे उभा केला आहे, परंतु हा प्रश्नच असा आहे की, या देशातील कोणाही एका व्यक्तीस या प्रश्नाचे समग्र उत्तर देता येणार नाही. श्री. मोहन धारिया यांनी या प्रश्नाचे उत्तर देण्याचा थोडासा प्रयत्न केला, परंतु त्यांचे उत्तर काहीसे नकारात्मक पद्धतीचे होते. गेल्या निवडणुकीमध्ये काँग्रेसचा पराभव का झाला या प्रश्नाची चर्चा आज सबंध देशभर चालू आहे. इतर पक्षांत चालू आहे आणि काँग्रेसमध्येही चालू आहे. आपल्या महाराष्ट्रातही आपण त्याची चर्चा केली पाहिजे, त्याची कारणमीमांसा शोधली पाहिजे. या प्रश्नासंबंधीचे माझे निदान मी आज आपणांसमोर ठेवणार आहे. परंतु ते निदान म्हणजे अखेरचा शब्द आहे असा माझा मुळीच दावा नाही.

श्री. खाडीलकरांनी नुकतेच सांगितले की, काँग्रेस ही आतापर्यंत या देशातले एक नॅशनल कॉन्सेन्सस होते, एक राष्ट्रमत होते. देशामध्ये जे राष्ट्रमत बनत असते त्याचे प्रतिनिधित्व करणारा काँग्रेस हा एक पक्ष होता. अर्थात सामान्यपणे कोठलाही राष्ट्रीय पक्ष काही बाबतीत नॅशनल कॉन्सेन्ससचे, राष्ट्रमताचे प्रतिनिधित्व करीतच असतो. नाही तर तो राष्ट्रीय पक्ष बनूच शकत नाही. लोकशाही चालविण्यासाठी कमीत कमी दोन पक्षांची गरज असते. परंतु काँग्रेससारखा राष्ट्रीय मताचे प्रतिनिधित्व करणारा दुसरा पक्ष दुर्दैवाने या देशात अस्तित्वात नाही. सगळ्या पक्षांचे कडबोळे म्हणा, किंवा हा शब्द अवघड वाटत असल्यास आपण त्याला आघाडी म्हणू या, पण अशा प्रकारची आघाडी राष्ट्रीय मत बनू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. अर्थात ही गोष्ट खरी आहे की,

हिंदुस्थानसारख्या विशाल देशात राष्ट्रीय पक्ष बांधणे तितकेसे सोपे काम नाही. आज राष्ट्रीय पक्ष चालविताना निर्माण होणारे प्रश्न आणि त्या प्रश्नांतून निर्माण होणारे संघर्ष यांचे स्वरूप पाहिले म्हणजे राष्ट्रीय स्वरूपाचा पक्ष बांधण्यासाठी गेल्या शंभर वर्षांतील पाच पिढ्यांना, आणि त्यातील पहिल्या प्रतीच्या प्रतिष्ठित नागरिकांना काय प्रयत्न करावे लागले असतील याची कल्पना येते. राष्ट्रीय मताचे, राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करणारा काँग्रेससारखा दुसरा एखादा पक्ष हिंदुस्थानात असता, तर एका अर्थाने या देशाचे काम पुष्कळसे सोपे झाले असते. पण दुर्दैवाने आज तशी वस्तुस्थिती नाही. सबंध देशभर ज्याची संघटना आहे आणि जो राष्ट्रीय मताचे प्रतिनिधित्व करतो अशा काँग्रेस पक्षाला विरोध करणे शक्य न झाल्यामुळे एक प्रकाराचा नकारात्मक दृष्टिकोण तयार करून—ज्याला ॲन्टी-काँग्रेसिझम म्हणतात—बाकीचे सर्व पक्ष काँग्रेसला विरोध करण्याच्या आणि काँग्रेसला बाहेर काढण्याच्या भावनेने आज एकत्र झालेले आहेत. काही ठिकाणी त्यांचा हा प्रयत्न यशस्वी झाला आहे. परंतु त्यामुळे हिंदुस्थानपुढे काही महत्त्वाचे प्रश्न उभे राहिलेले आहेत. हिंदुस्थानातली लोकशाही चालावयाची असली तर कमीत कमी राष्ट्रीय पक्ष कोणते आहेत, त्यांनी कोणत्या तऱ्हेने वागले पाहिजे आणि कोणत्या पद्धतीने प्रमुख राष्ट्रीय प्रश्नांवर त्यांनी एकमेकांशी सल्लामसलत (–कन्सल्टेशन्स्–) केली पाहिजे अशा प्रकारचे मूलभूत स्वरूपाचे काही प्रश्न गेल्या वर्ष दोन वर्षांच्या परिस्थितीतून निर्माण झालेले आहेत.

या प्रश्नांचे उत्तर देणे तितके सोपे नाही. कारण एका बाजूला काँग्रेससारखा पक्ष उभा आहे तर दुसऱ्या बाजूला एका विशिष्ट विचारप्रणालीवर अधिष्ठित असलेला असा कम्युनिस्ट पक्ष आहे. पण आज त्या पक्षातही लक्ष वेधून घेणारे असे फार मोठे अंतर्गत संघर्ष सुरू आहेत. कम्युनिझमचा विचार हा केवळ देशाच्या प्रश्नांपुरता मर्यादित नसून त्याच्या पाठीमागे एक आंतरराष्ट्रीय पार्श्वभूमी आहे. दुनियेत आज या पक्षामध्ये ज्या निरनिराळ्या विचारधारा आहेत त्या विचारधारांच्या संघर्षातून या पक्षामध्ये हिंदुस्थानात आज नवे नवे प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यांच्यामध्ये आज

उजवा पक्ष आहे आणि डावा पक्ष आहे, आणि या डाव्या पक्षामध्ये आणखी एक दुसरा डावा पक्ष उभा राहण्याचा प्रयत्न करतो आहे. डावा पक्ष उजव्या पक्षाला कम्युनिस्ट पक्ष मानीतच नाही असे म्हटले तरी चालेल. माओवर निष्ठा असणारी त्यांच्यातली जी मंडळी आहेत त्यांचा सोविएत रशियामध्ये नवीन भांडवलशाही तयार झाली आहे असाच दावा आहे. यातले खरे कोणते आणि खोटे कोणते या चर्चेमध्ये पडण्याचे आपल्याला कारण नाही. या कम्युनिस्ट पक्षाबरोबरच विरोधी बाजूला, पुराणाभिमान जागृत ठेवणारी जी प्रेरणा आहे – याला आपण 'रिव्हायव्हॅलिझम' किंवा सांप्रदायवाद म्हणू या – त्या प्रेरणेचा आधार घेऊन सर्व प्रश्नांकडे पाहण्याचा प्रयत्न करणारा जनसंघ हा एक पक्ष नव्याने उभा राहिला आहे. कम्युनिस्टांचा साम्यवाद आणि जनसंघाचा सांप्रदायवाद या विचारांबरोबरच आणखी एक तिसरा विचार या देशात नव्याने आकार घेऊ पाहत आहे. पण त्याला अद्यापि राष्ट्रीय स्वरूप आलेले नाही. तो विचार आज स्वतंत्र पक्षाच्या रूपाने उभा राहिलेला आहे. आजच्या नवीन दुनियेतील आधुनिक तंत्रे सर्व प्रकारे प्रतिबिंबित करण्याचा हा पक्ष प्रयत्न करीत असला तरी आर्थिक क्षेत्रामध्ये एक प्रकारच्या "जैसे थे"वादाचा अभिमान बाळगणारा आणि खाजगी मालमत्तेच्या ज्या सगळ्या जुन्या कल्पना आहेत, आग्रह आहेत त्या सगळ्या कल्पना आणि ते सगळे आग्रह गृहीत धरून चालणारा असा हा पक्ष आहे. प्रजासमाजवादी व संयुक्त समाजवादी जी मंडळी आहेत ती चांगली माणसे आहेत. आदर वाटण्यासारखी माणसे आहेत; परंतु मूलतः त्यांच्यात वैचारिक दृष्ट्या काँग्रेसपासून कुठे काही वेगळेपणा दिसत नाही. मी तर असे म्हणेन की, ते प्रॉटेस्टंट काँग्रेसमेन आहेत. त्यांचा सगळा कार्यक्रम, त्यांची दृष्टी, त्यांचा इतिहास, त्यांचे जुने संबंध हे सर्व काँग्रेसमध्ये आहेत. त्यामुळे त्यांच्यातली मंडळी रागावली की कोठे येतात ? तर काँग्रेसमध्ये. आणि हे स्वाभाविक आहे. सासुरवाशीण रागावली तर माहेरीच येईल. दुसरीकडे जाणार कुठे ? मी त्यांना प्रॉटेस्टंट काँग्रेसमेन अशा अर्थाने म्हणतो की, संबंध पक्षाची वैचारिक रचना करण्याचा त्यांचा जो प्रयत्न

आहे त्यामध्ये वेगळा काही विचार, वेगळा काही कार्यक्रम किंवा वेगळी दृष्टी त्यांनी दिली आहे असे मी मानीत नाही. हिंदुस्थानातील प्रमुख राजकीय पक्षांची एकंदर पार्श्वभूमी ही अशी असल्यामुळे राजकीय क्षेत्रात हिंदुस्थानापुढे आज जे प्रश्न नव्याने उभे राहिले आहेत त्यांचे उत्तर मिळणे अवघड होऊन बसले आहे.

काँग्रेसचा पराभव करण्यात विरोधी पक्षांच्या आघाडीला कितपत यश मिळाले हा एक चर्चेचा विषय होऊ शकेल. परंतु या चर्चेत आज आपण जाणार नसून आपल्या दृष्टीने आपल्या पराभवाची कारणमीमांसा काय याचाच आपणाला आज प्रामुख्याने विचार करावयाचा आहे. काँग्रेसच्या पराभवाचे आपल्या दृष्टीने खरे कारण कोणते ? खरे म्हणजे या पराभवाचे एकच कारण नाही. कारण अमुक एका कारणामुळे काँग्रेसचा पराभव झाला असे सांगणे म्हणजे हा प्रश्न अतिशय सोपा करण्यासारखे आहे. हा प्रश्नच इतका गुंतागुंतीचा आहे की, अशा प्रकारचे उत्तर बरोबर होणार नाही. ज्या कारणासुळे काँग्रेसचा बिहारमध्ये पराभव झाला त्याच कारणामुळे पंजाबमध्ये पराभव झाला असे म्हणता येणार नाही. ज्या कारणांमुळे काँग्रेसचा महाराष्ट्रात विजय झाला त्याच कारणांमुळे तो आंध्रमध्ये आणि म्हैसूरमध्ये झाला असे म्हणता येणार नाही. ज्या कारणांमुळे उत्तरेतल्या प्रान्तांमध्ये काँग्रेसचा पराभव झाला त्याच कारणांमुळे दक्षिणेतल्या प्रांतांतही पराभव झाला असेही सांगता येणार नाही. किंवहुना मद्रासमध्ये ज्या कारणांमुळे पराभव झाला त्याच कारणांमुळे केरळमध्ये पराभव झाला असे सांगता येणार नाही. पण एक गोष्ट निश्चित की, ही कारणे जरी वेगवेगळी असली तरी सबंध देशाची जी काँग्रेस आहे तिचे स्वरूप बदलणे आता आवश्यक झाले आहे.

एक गोष्ट आपल्याला मान्य केली पाहिजे ती ही की, पूर्वीचा जमाना आता संपलेला आहे. ज्याला वाटरशेड ऑफ हिस्टरी असे म्हणता येईल, असे हे १९६७ चे निवडणुकीचे वर्ष मानावे लागेल. केंद्रामध्ये आणि सगळ्या राज्यांमध्ये एकपक्षीय सत्ता असा जो जमाना स्वातंत्र्यप्राप्तीनंतर वीस एक वर्षे या देशामध्ये चालू होता तो जमाना आणि तो काळ आता

संपलेला आहे असे आपण गृहीत धरून चालले पाहिजे. गेलेले स्थान परत मिळविण्याचा प्रयत्न करण्यास, खटपट करण्यास अर्थातच हरकत नाही. परंतु पूर्वीचीच परिस्थिती संपूर्णतया पुन्हा येईल अशी आपली समजूत असेल तर ती बदलण्याची आपण मनाची तयारी केली पाहिजे, आणि अधूनमधून एखाद्या राज्यामध्ये एखादा पक्ष, दुसऱ्या राज्यामध्ये दुसरा पक्ष येण्याची शक्यता गृहीत धरून चालण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.

पण शेवटी राष्ट्रहिताच्या दृष्टीने काँग्रेस व तिची शक्ती राहिली पाहिजे, तिचे बळ वाढले पाहिजे, तिची प्रतिमा चांगली असली पाहिजे. ज्या काँग्रेसचे आपण सभासद आहोत, जिचे आपण शिलेदार आहोत, शिपाई आहोत, तिचे आपण रक्षण करू इच्छिता आणि जिची आपण सेवा करू इच्छिता ती काँग्रेस राष्ट्रीय संदर्भामध्ये काय आहे हे पाहण्याचा आपण प्रयत्न करू या. गेल्या शंभर वर्षांत आपली ही काँग्रेस घडली ती काही ऐतिहासिक प्रश्नांचे उत्तर म्हणून घडली, आणि शेवटी काँग्रेस हा एक राष्ट्रीय मताचे प्रतिनिधित्व करणारा पक्ष बनला. जनतेच्या काही अपेक्षा असतात, काळाच्या काही प्रेरणा असतात, इतिहासाच्या काही हाका असतात आणि याला उत्तर म्हणून शेवटी राजकीय पक्ष बनत असतो. पक्ष म्हणजे कलाकाराने आपल्या घरात एखादे चित्र रंगवावे आणि लोकांनी ते स्वीकारावे अशातला काही प्रकार नाही. कोट्यवधी लोकांच्या भावनांशी जाऊन मिळणारा आणि त्यांच्या विचारांना साथ देणारा असा जेव्हा पक्ष बनतो तेव्हा त्याच्या पाठीमागे अनेक गोष्टी उभ्या असतात. अशा कोणत्या गोष्टी काँग्रेसच्या पाठीमागे होत्या ? अशा कोणत्या ऐतिहासिक गरजा काँग्रेसने पुऱ्या केल्या ? अशा प्रकारच्या गरजा पुऱ्या करण्याची काँग्रेसमध्ये आज शक्ती आहे काय ? या दृष्टीने काँग्रेसमध्ये आज अपुरेपणा आला आहे काय ? या सर्व गोष्टींचा आपण विचार केला पाहिजे,

दहा कलमी कार्यक्रमाला माझा पाठिंबा आहे. त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे असा माझाही आग्रह आहे. पण हा दहा कलमी कार्यक्रम म्हणजेच काँग्रेस हे समीकरण चुकीचे आहे. तसे समजणे म्हणजे

शरीराचा एखादा अवयव म्हणजेच शरीर असे समजण्यासारखे आहे काँग्रेसचा मूळ पिंड जनआंदोलनाचा आहे. जनतेच्या आकांक्षांचे प्रामाणिक प्रतीक जेथे काँग्रेस असते तेथे ती विजयी होते. चुकीच्या स्थानिक नेतृत्वामुळे जेथे तिचे हे स्वरूप राहत नाही तेथे जनतेतला काही भाग काँग्रेसपासून दूर होतो, अलग होतो, आणि तेथे तिचा पराभव होतो अशी माझी मीसांसा आहे. ज्या अर्थाने किंवा ज्या एका विशिष्ट तऱ्हेने इतर पक्ष बनलेले आहेत त्या अर्थाने किंवा त्या पद्धतीने काँग्रेस पक्षाची घडण झालेली नाही. तांत्रिक अर्थाने तो आज राजकीय पक्ष झाला आहे, हे खरे; परंतु काँग्रेस म्हणून आपण आज जी पाहतो त्या काँग्रेसचे मूळ स्वरूप कोणते हे समजल्याशिवाय मी म्हणतो त्या मीमांसेचा अर्थ स्पष्ट होणार नाही.

हिंदुस्थानमध्ये आज या प्रश्नाचे फार महत्त्व आहे. काँग्रेसचा जन्म हा नव्या हिंदुस्थानच्या राजकीय प्रेरणांवरोवरच झाला. सांस्कृतिक परंपरेच्या दृष्टीने हिंदुस्थानची थोरवी पुष्कळच मोठी होती. परंतु आंदोलनाच्या रूपाने एक राष्ट्र म्हणून बनण्याच्या प्रयत्नाला जेव्हा हिंदुस्थान लागला तेव्हा त्याच्या एकतेची एक नवीन कल्पना निर्माण झाली, आणि तिच्या बरोबरच एका नव्या विचाराचा—ज्याचा आपण आज धर्मनिरपेक्षता (सेक्युलॅरिझम) म्हणून उल्लेख करीत असतो – आपल्या देशाने स्वीकार केला. सर्वधर्मसहिष्णुता हा एक वेगळा भाग आहे. तो एक धर्मभावनेचा भाग मानला जातो. पण केवळ राजकीय विचार म्हणूनच नव्हे तर दैनंदिन जीवनामध्ये, सामाजिक जीवनामध्ये, आर्थिक जीवनामध्ये, राजकीय जीवनामध्ये ज्याचा आचार केला पाहिजे असा हा एक नवा विचार स्वीकारण्याचे काम एक राष्ट्रीय पक्ष म्हणून काँग्रेसने त्या वेळी केले. त्यानंतर समाजवादाचा विचार आला. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा संग्राम अधिक तीव्र व अधिक स्पष्ट होण्याच्या मार्गावर असताना साम्यवादाचा पहिला आवाज १९२० च्या सुमारास कम्युनिस्ट पक्षाच्या रूपाने हिंदुस्थानात आला. परंतु समाजवादाच्या विचाराची खरी हाक १९३० च्या सुमारास आली. काँग्रेसमधला हा विचार १९३० साली उघडपणे उच्चारला गेला. पुढे त्यावर चर्चा झाली. विचारांची देवाणघेवाण झाली आणि नेहरूंच्या मार्गदर्शनाने

हा विचार काँग्रेसच्या विचारप्रणालीचा एक भाग बनला. थोडक्यात म्हणजे आजच्या काँग्रेसच्या जीवनामध्ये एकतेचा विचार, धर्मनिरपेक्षतेचा विचार आणि समाजवादाचा विचार हे मूलभूत असे विचार असून या सर्वांच्या मागे लोकशाहीचा विचार आहे. स्वातंत्र्याची चळवळ आपण बांधीत होतो त्या वेळी या विचारांना जितके महत्त्व होते, तितकेच महत्त्व आजही त्यांना असून कोणत्याही राष्ट्रीय पक्षाला या चार मूलभूत विचारांच्या बाबतीत अत्यंत सावध राहावे लागेल, त्याच्या आचाराबाबत फार काळजी घ्यावी लागेल. ज्या ज्या वेळी या विचारांच्या आचाराबाबत दुबळेपणा घडेल, मग तो काँग्रेस पक्षाकडून घडो किंवा इतर कोणत्याही राष्ट्रीय पक्षाकडून घडो त्या त्या वेळी राष्ट्रीय जीवनावर संकट येईल आणि या संकटाबरोबर लोकशाहीसुद्धा संकटात येते की काय असे वाटू लागेल. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर सगळ्यात मोठा आवाज आपल्याला ऐकावयास सापडतो तो हा की, लोकशाहीवर संकट आले आहे. पण एकतेचा विचार, धर्मनिरपेक्षतेचा विचार, समाजवादाचा विचार आणि लोकशाहीचा विचार हे या देशातील जे पायाभूत विचार आहेत त्यात गडबड झाली तरच अशा प्रकारचे संकट येऊ शकेल. मी आपणास सांगू इच्छितो की, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या वीस वर्षांच्या कालानंतरही या चार विचारांचे रक्षण करणे हे अत्यंत महत्त्वाचे, प्राधान्याचे काम आहे. याच्याही पुढच्या मोठ्या शिकारी ज्यांना करावयाच्या असतील ते त्या करोत. परंतु कमीत कमी या चार विचारांना आपणांस जपावेच लागेल. या चार विचारांवर आधारलेले जनतेचे आंदोलन म्हणजेच काँग्रेस असे काँग्रेससंबंधीचे माझे मत आहे. हीच खरी काँग्रेसची व्याख्या आहे. जेथे जेथे हे आंदोलन दुबळे होते तेथे तेथे काँग्रेसचा पराभव होतो. एवढेच नव्हे तर या चार विचारांपैकी कोठलाही विचार जेथे दुबळा ठरला तेथे काँग्रेसचा पराभव झालेला आहे.

मी आपल्याला आताच सांगितले की, धर्मनिरपेक्षतेचा विचार हा आपल्या पायाभूत विचारांपैकी एक आहे. त्यासंबंधाने आता आपल्याला फार गंभीरपणे विचार केला पाहिजे. आपण सहज बोलून जातो. पण शेवटी आचारावरच त्याची कसोटी लागली जाते किंवा लावली

जाते. जेथे जेथे अल्पसंख्याकांच्या मनामध्ये काँग्रेसच्या नेत्यांसंबंधी किंवा काँग्रेसच्या संघटनेसंबंधी अविश्वासाची भावना निर्माण झाली तेथे तेथे काँग्रेस हरली. काँग्रेस हरली तेथेही ती शेवटी फक्त पाच-दहा टक्के मतांच्या फरकानेच हरली. पण तेथेसुद्धा सर्वांत मोठा पक्ष म्हणून शेवटी काँग्रेसच होती. उत्तर प्रदेशामध्ये, बिहारमध्ये, बंगालमध्ये काँग्रेसच मोठा पक्ष होता. मध्य प्रदेशामध्ये आणि हरियाणा-मध्ये तर आमचे बहुमत होते. ते आम्ही आमच्या हाताने घालविले, आमच्यातील पक्षांतर करणाऱ्यांमुळे, 'आयाराम गयाराम' यांच्यामुळे आम्ही गमावले. परंतु मी पूर्वीच म्हटल्याप्रमाणे या प्रत्येक ठिकाणी आम्हांला झालेल्या विरोधाची आणि आमच्या पराभवाच्या तपशिलाची कारणे वेगवेगळी आहेत. त्यांची स्थानिक कारणमीमांसा वेगळी आहे. पण महत्त्वाची गोष्ट मी आपणाला सांगत होतो ती ही की, जेथे अल्पसंख्या-कांच्या मनात आपण विश्वास निर्माण करू शकलो नाही तेथे गडबड झालेली आहे. याच कसोटीवर तुम्ही महाराष्ट्राचीही परीक्षा केली पाहिजे. मी असे म्हणत नाही की, या बाबतीत आपण फार बरे आहोत. मघाशी श्री. भारदे यांनी तुलनेने आपण बरे आहोत असे म्हटले ते बरोबर आहे. पण आपणाला वारंवार या गोष्टीची कसोटी पाहिली पाहिजे. या संदर्भा-मध्ये आपण हाती घेतलेले सगळे कार्यक्रम या कसोटीला लावून पाहिले पाहिजेत.

मी ज्या वेळी अल्पसंख्याकांचा उल्लेख करतो, त्या वेळी केवळ राष्ट्रीय अल्पसंख्याकांचाच विचार माझ्या मनात असतो. हरिजन, नवबौद्ध, आदिवासी, ख्रिश्चन आणि मुसलमान हे सामान्यतः राष्ट्रीय अल्पसंख्याकांत येतात. त्यांच्या बाबतीत आपल्या राज्यामध्ये आपण भरपूर करतो आहोत किंवा नाही याची कसोटी आपण घेतली पाहिजे. राज्यस्तरावर जेथे पुष्कळ करण्याची शक्यता आहे, तेथे आपण ते करतोही आहोत; परंतु जेव्हा आपण शहरांतून, गावांतून, आमच्या पंचायत राज्याच्या नव्या प्रयोगातून जाण्याचा प्रयत्न करतो तेव्हा ही माणसे आमच्या बरोबर आहेत, असा आम्हाला प्रत्यय येत नाही, अनुभव येत नाही. आणि म्हणून विशेषतः

ग्रामीण भागामध्ये जो हरिजन आणि मुसलमान समाज आहे त्याला जवळ घेण्याचा आम्ही प्रयत्न केला पाहिजे. त्यांना गावामध्ये काय प्रतिष्ठा आहे, ते ज्या गावात राहतात त्या गावासंबंधी त्यांना अभिमानाची भावना आहे किंवा नाही हा फार महत्त्वाचा प्रश्न आहे. गावामध्ये ही गोष्ट जर आम्ही करू शकलो नाही, तर शहरामध्ये आपण ती करूच शकणार नाही. मुंबईसारखे शहर किंवा पुणे, नागपूरसारखी शहरे सोडून द्या. पण वीस, पंचवीस, पन्नास हजार लोकवस्तीची जी शहरे आहेत त्या शहरांमध्ये शेवटी या गोष्टीची खरी कसोटी लागण्याचा संभव आहे, आणि म्हणून आम्हांला या बाबतीत अधिक विचार केला पाहिजे.

अलीकडेच पंचायत राज्यासंबंधी एक परिसंवाद झाला. त्याचा वर्तमानपत्रांतून मी जो अहवाल वाचला त्यात एक अशी टीका होती की, पंचायत राज्याच्या या प्रयोगातून नवीन नेतृत्व निर्माण झालेले असले तरी सामाजिक नेतृत्व निर्माण झालेले नाही. विचारांती मला ही टीका बरोबर वाटली. सर्व सामाजिक थरांचा विश्वास असलेले व सर्व सामाजिक थरांना विशेषतः खालच्या मानल्या गेलेल्या थरांतील कार्यकर्त्यांना विश्वासाह वाटणारे व कार्याच्या भागीदारीत भाग घेणारे नेतृत्व म्हणजे नवे सामाजिक नेतृत्व होय. आपण आज आपल्या घरामध्ये बसलो आहोत म्हणून हा विचार मी आपल्यापुढे ठेवीत आहे.

विकासाचा विचार हा देशाच्या दृष्टीने प्रधान विचार आहे हे मला मान्य आहे. पण विकास म्हणजेच आर्थिक विकास असे मानण्याची चुकीची पद्धत पडलेली आहे. त्यासंबंधी आपण जरा अधिक विचार केला पाहिजे. मला फार भीती वाटते की, आमच्या सगळ्या कामामध्ये एक प्रकारचा एकॉनॉमिझम – अर्थवाद – आला आहे. त्याची गरज आहे हे मी सांगू इच्छितो. पण मी जे बोलतो आहे त्याचा गैरसमज होता कामा नये. मी आपणाशी आता जे बोलतो अहे ते थोडेसे टीकात्मक दृष्टीने बोलतो आहे. काय चांगले घडले आहे, ते मला माहीत आहे. उत्पादनाच्या नव्या नव्या प्रेरणा खेड्यापर्यंत जाऊन पोहोचल्या आहेत. उत्पादनाची एक नवीन परंपरा निर्माण झालेली आहे,

एक नवा दृष्टिकोण आलेला आहे, नवीन साधने उपलब्ध झालेली आहेत. पण हे सगळे घडत असताना, देश बनविण्याच्या दृष्टीने धर्मनिरपेक्षतेचा विचार हा फार महत्त्वाचा विचार आहे हे आपण विसरता कामा नये. कारण काँग्रेस त्यात आहे. या दृष्टीने आमची काही प्रगती झाली आहे काय? ग्रामपंचायतीचा किंवा गावाचा किंवा तालुक्याचा किंवा जिल्ह्याचा जो पुढारी आहे त्याला ही जबाबदारी आपली आहे असे वाटते का हा खरा प्रश्न आहे. ही जबाबदारी तातडीने पार पाडण्यात तो यशस्वी झाला की नाही हे मी पाहणार नाही, त्याची मी अपेक्षाही करणार नाही. कारण हजारो वर्षांपासून चालत आलेल्या गोष्टींत चार-दोन वर्षांत यश आलेच पाहिजे असे आपणांस कसे म्हणता येईल? तसे म्हणणे म्हणजे स्थानिक पुढाऱ्यावर अन्याय केल्यासारखे होईल. परंतु मी हा विचार करतो आहे की, हा पुढारी ही आपली जबाबदारी मानतो आहे किंवा नाही? कारण आपण ही अपेक्षा केली नाही तर एका राजकीय पक्षामध्ये वसण्याचे आपल्याला काय कारण आहे? कमीत कमी ध्येयाच्या कमीत कमी अपेक्षा आपण करणार नसलो तर मग आपल्यात साधर्म्य ते काय राहिले? आपण एकमेकांच्या कशाकरिता जवळ आलो? कोणी तरी तिकीट वाटणारे, आणि कोणी तरी तिकीट घेणारे म्हणून तर नाही ना आपण एकत्र आलो आहो? किंवा आपण सर्व गांधीटोप्या घालतो म्हणून एकत्र आलो आहोत? तुम्ही-आम्ही एकत्र आलो आहोत याचे कारण तुम्हा-आम्हाला एका ठिकाणचा प्रवास करावयाचा आहे, एका दिशेने जावयाचे आहे आणि तुमची आमची ही दिशा नक्की आहे.

सामाजिक नेतृत्व ही शेवटी अशी जबाबदारी आहे की, ती सर्वांत वाटली जाणार आहे. निदान ह्या जबाबदारीची जाणीव आपल्या मनात असली पाहिजे. मी सांगू इच्छितो की, या दृष्टीने आपल्याला महाराष्ट्रात प्रयत्न केला पाहिजे. महाराष्ट्रात असणाऱ्या मुसलमान, हरिजन आणि ख्रिश्चन मंडळींच्या मनात धर्मनिरपेक्षतेच्या विचारासंबंधी अद्यापि विश्वास निर्माण झालेला दिसत नाही, आणि म्हणून हा विचार ही आपण आपली पहिली कसोटी मानली पाहिजे. रिपब्लिकन मंडळींच्या बाबतीत हरिजन

हा शब्द मी वापरू इच्छित नाही. कारण तो शब्द त्यांचा नाही, तो शब्द त्यांनी टाकून दिलेला आहे. त्यांचा राग मी समजू शकतो, पण निव्वळ राजकीय पक्ष म्हणून मी त्यांच्याकडे पाहत नाही. राजकीय पक्षाच्या दृष्टीने पक्षाला काही राजकीय धोरणे असावी लागतात. रिपब्लिकन मंडळींची मूळची प्रेरणा राजकीय नसून सामाजिक आहे. आमचीही मूळ दृष्टी सामाजिक आहे आणि या दृष्टीने हे दोन्ही समाज असे अलग वाटले जाऊ नयेत. हिंदू हा एक समाज आणि त्यातून बाहेर गेलेली ही मंडळी हा एक दुसरा समाज अशा प्रकारची अलगपणाची भावना आपण या बाबतीत निर्माण होऊ देता कामा नये. कारण खेड्यात कष्ट करणारा हरिजन आणि किसान, गिरणीत राबणारा हल्लीचा नवबुद्ध आणि बिगर-बुद्ध यांच्यातला माणूस शेवटी एकच आहे, त्यांचा स्थायीभाव एकच आहे आणि त्यांच्यातली व्यक्तीही एकच आहे. तिच्यात काही फारसा फरक नाही. ऐतिहासिक काळात काही कारणांमुळे हे भाग वेगवेगळे झाले. पण मूळचा समाज एकच आहे, त्याचा पिंडही एकच आहे. सामाजिक चालीरीतींमुळे किंवा इतर दुसऱ्या कारणांमुळे जो फरक पडलेला दिसतो तो आपण मोडून काढला पाहिजे, मोडून काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. राजकारणामधले मतभेद आपण बाजूला ठेवू. त्याला माझी हरकत नाही. पण माणूस म्हणून समाजामध्ये वागण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. आपण सर्व एक आहोत मी भावना जर रिपब्लिकन मंडळींच्या मनामध्ये आपण निर्माण करू शकलो तर मला वाटते फार मोठे काम होईल; आणि म्हणून जिल्हा परिषदेच्या प्रश्नांचा विचार करताना आपण याचा विचार केला पाहिजे, जिल्हा परिषदेत बसणाऱ्या स्थानिक पुढाऱ्यांनी याचा विचार केला पाहिजे.

आर्थिक विकास व राजकीय पक्ष यांच्या परस्पर संबंधाबाबत मला थोडे अधिक बोलले पाहिजे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, निव्वळ आर्थिक विकास करणाऱ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप पडते किंवा त्यामुळे निश्चित राजकीय शक्ती मिळतेच असे नाही. याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे मद्रासचे. गेल्या बीस वर्षांच्या योजना-काळात मद्रासने स्वत:ची

जेवढी प्रगती करून घेतली तेवढी प्रगती दुसऱ्या कुठल्याही राज्याने केलेली नाही. मद्रासचा राज्यकारभार हा हिंदुस्थानातला चांगल्यातल्या चांगला राज्यकारभार म्हणून गेल्या वीस वर्षांत लौकिक पावला होता. असे असतानासुद्धा तेथे काँग्रेसचा पराभव झाला. मी आपणाला सांगू इच्छितो की, जेथे तुम्ही निव्वळ आर्थिक प्रगतीच्या पाठीमागे लागला आहात, पण जेथे तुमच्या आणि लोकांच्या मनाची मिळणीजुळणी झालेली नाही तेथे लोक तुम्हाला मते देतीलच असे निश्चितपणे सांगता येणार नाही. याचे कारण काय? याचे कारण असे आहे की, तुम्ही जेव्हा आर्थिक विकास करीत असता, तेव्हा तुम्ही आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतून नव्या शक्ती निर्माण करीत असता. या नव्या शक्तींचे स्वरूप समजून न घेता, किंवा त्यांच्याशी संबंध न ठेवता तुम्ही अलग राहिलात तर तुम्ही निर्माण केलेल्या या शक्ती चागल्या असतील तर कदाचित त्या तुमच्या बरोबर राहतील. पण तुम्ही जर चुकीच्या शक्ती निर्माण केलेल्या असतील तर त्या तुम्हाला खाऊन टाकण्याचा प्रयत्न करतील. निसर्गाप्रमाणेच राजकारणाचाही हा नियम आहे, आणि म्हणून आर्थिक विकासाच्या कामामध्ये ज्या काही नव्या शक्ती निर्माण होत असतात त्या चांगल्या शक्ती आहेत की वाईट शक्ती आहेत याचा आपण विचार केला पाहिजे; आणि दुसरी गोष्ट म्हणजे या ज्या शक्ती निर्माण होत असतात त्यांचा उपयोग तुम्ही तुमच्यापुढचे काम वाढविण्यासाठी करून घेणार आहात की त्या तुम्ही तशाच सोडून देणार आहात, हाही एक प्रश्न आहे. तेव्हा ज्याला आर्थिक प्रगती म्हणता येईल अशा प्रकारची प्रगती महाराष्ट्रात दिसते आहे, उत्पादन वाढते आहे, शेती बदलते आहे, शिक्षण वाढते आहे, सहकारी चळवळींचा जोर वाढतो आहे, एवढाच हा प्रश्न नाही. तर या आर्थिक प्रगतीतून, या शिक्षणाच्या विकासातून, या सहकारी चळवळीच्या विस्तारातून ज्या शक्ती निर्माण होत आहेत त्या समाजाला अधिक शक्ती देण्यास समर्थ आहेत की नाहीत याची आता आपण परीक्षा केली पाहिजे. त्या तशा नसतील तर त्या सुधारण्यासाठी आपण नवीन उपाय योजले पाहिजेत, शोधले पाहिजेत.

मी आपल्याला सांगू इच्छितो की, आर्थिक विकासातून निर्माण होणारे हे जे सामर्थ्य आहे ते जर आपण पुरोगामी करण्याचा प्रयत्न केला नाही किंवा त्यावर आपण पुरोगामी शक्तींचा अंकुश ठेवला नाही तर उद्या समाजवादी धोरणाचा घात होणार आहे, आणि म्हणून सहकारी चळवळ किंवा जिल्हा परिषद किंवा यासारख्या इतर कामांसंबंधाने आपण जे नेतृत्व बांधता आहात, ज्या शक्ती बांधता आहात, त्यांची अंतिम दृष्टी कोठे आहे, हे आपण पाहिले पाहिजे. त्यांची दृष्टी गरिबीविरुद्ध लढण्याची व गरिबांना न्याय देण्याची आहे की नाही हे आपण पाहिले पाहिजे. त्यांची प्रेरणा समतावादाची व सामाजिक न्यायाची आहे की केवळ सत्ता-संपादनाची आहे हेही आपण तपासले पाहिजे. आपल्या संघटनेसाठी नवीन माणसांची निवड करण्याचा प्रसंग येतो त्या वेळी आपण ही कसोटी लावणे आवश्यक आहे. हे सर्व एकदम जमणार नाही. परंतु आपल्यामध्ये ही दृष्टी आहे किंवा नाही हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

महाराष्ट्रातील कोरडवाहू शेतीचा प्रश्न घ्या. तो इतका महत्त्वाचा आहे की, त्यासंबंधी आपण सतत जागृत राहिले पाहिजे. कोरडवाहू शेतीचा हा प्रश्न तसा अगदी काही नवीन नाही. वसंतरावदादांनी जेव्हा पहिला कारखाना सुरू केला तेव्हा वसंतरावदादा स्वत: या प्रश्नासंबंधाने जागृत होते. त्या कारखान्याच्या उद्घाटन-समारंभाला मी हजर होतो. त्या वेळी त्यांनी आपल्या स्वागताच्या भाषणात हा विचार बोलून दाखविला होता. कोरडवाहू जमिनीची शक्ती आपण वाढवितो आहोत की नाही ? कोरड-वाहू शेतीतील शेतकऱ्यांना नुसत्या कोरड्या सहानुभूतीचा काही उपयोग नाही, काही फायदा नाही. अद्यापि या बाबतीत पुरेसा विचार झालेला नाही. परंतु कोरडवाहू जमिनीच्या शेतकऱ्यांसाठी काही तरी झाले पाहिजे असा जो श्री. वसंतरावजींचा शासनामार्फत प्रयत्न आहे त्याबद्दल मला त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. चौथ्या योजनेच्या बाबतीत काही दिवसां-पूर्वी डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी जो दृष्टिकोण मांडला त्यात त्यांनी हा विचार मांडलेला आहे. आपण यापुढे या प्रश्नासंबंधी सतत जागृत राहिले पाहिजे. जिल्हा परिषदांच्या संदर्भात जी चर्चा चालू आहे त्या दृष्टीने हा

विषय महत्त्वाचा असल्यामुळे मी तो आपल्यापुढे ठेवला आहे.

समाजवाद हा आपल्या विचारप्रणालीतला एक महत्त्वाचा विचार आहे. सामान्यपणे समाजवादाच्या माझ्या कल्पनेने तीन कसोट्या आहेत. सर्वांना समान संधी (इक्वालिटी ऑफ ऑपर्च्युनिटी) ही त्यांतली पहिली कसोटी. खरे म्हणजे ही लोकशाहीचीच व्याख्या मानली गेली होती. परंतु राजकीय लोकशाहीचा अनुभव नसल्यामुळे तिच्यातून मग समाजवादाचा विचार निघाला, आणि सर्वांना समान संधी ही समाजवादाची एक कसोटी समजली गेली. नंतर उत्पादनाच्या पाठीमागची प्रेरणा ही वैयक्तिक नफेबाजीपेक्षा समाजाच्या सुखाची, समाजाच्या हिताची असली पाहिजे ही समाजवादाची दुसरी कसोटी, आणि उत्पादनाबरोबरच त्याच्या विभागणीचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा असल्यामुळे ही विभागणी होत असताना लोकांच्या गरजा आणि त्यांच्या विकासाची शक्याशक्यता यासंबंधीचा विचार ही समाजवादाची तिसरी कसोटी. समाजवादाच्या या कसोट्यांवर आपल्या देशातील परिस्थिती तपासून पाहिली तर समाजवादाच्या दिशेने आमची जशी पावले पडाव्यास पाहिजेत तशी ती अद्यापि पडलेली दिसत नाहीत. अजूनही आम्ही नुसती समाजवादाची भाषा बोलतो आहोत, पण समाजवादाच्या बाबतीत आपण जरूर एक गोष्ट केलेली आहे; आणि ती म्हणजे गेल्या वीस वर्षांमध्ये जे नवीन औद्योगीकरण होत होते, उद्योगाचा जो विस्तार होत होता, त्यामध्ये सार्वजनिक क्षेत्रातल्या उद्योगधंद्यांची एक नवी शक्ती आपण निर्माण करून ठेवली आहे. सार्वजनिक क्षेत्रातल्या उद्योगधंद्यांसंबंधी पुष्कळच मतभेद आहेत. सामान्यपणे हल्ली पुष्कळ वेळा असे भासविले जाते की, खाजगी क्षेत्रातले उद्योगधंदे म्हणजे सगळ्या गुणांचे पुतळे आणि सार्वजनिक क्षेत्रातले उद्योगधंदे म्हणजे वाया गेलेले, सगळ्या अवगुणांनी पूर्ण असलेले असे धंदे. माझ्या मते असे समजणे चुकीचे आहे. खाजगी क्षेत्रात जे मोठे धंदे निघतात त्या धंद्यांच्या बाबतीतले तंत्र पाहण्यासारखे आहे. हे धंदे कोणाच्या तरी ताब्यात असतात, कोणी तरी मॅनेजिंग डायरेक्टर असतात आणि सुरुवातीला त्यांनी थोडेसे भांडवल उभारलेले असते. पण शेवटी त्यांच्या पाठीमागे ज्या भांडवलाची शक्ती उभी राहते त्यातले

पुष्कळसे धन सामाजिक धन असते. ते कोठल्या तरी बँकेतून घेतलेले असते, कोठल्या तरी कॉर्पोरेशनकडून घेतलेले असते आणि सरकारी पाठिंब्याची त्याला जरुरी असते. अशा या खाजगी क्षेत्रातल्या धंद्यांपेक्षा सार्वजनिक क्षेत्रातल्या उद्योगधंद्यांसंबंधीच आज पुष्कळसे विरोधी बोलले जाते. पण आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, सार्वजनिक क्षेत्रातले सगळे धंदे असे आहेत की, त्यांच्या बाबतीत लांब मुदतीचा प्रयत्न केल्याशिवाय त्यांतला कोठलाही धंदा यशस्वी होऊ शकणार नाही. उत्पादनाची कसोटी अर्थात त्यांना आपण जरूर लावून पाहिली पाहिजे. त्यांच्यामध्ये जी उत्पादनक्षमता आहे, त्या उत्पादनक्षमतेचा संपूर्ण उपयोग केला जातो की नाही एवढीच कसोटी लावावयाची असेल तर त्या कसोटीवर खाजगी क्षेत्रातल्या आणि सार्वजनिक क्षेत्रातल्या उद्योगधंद्यांची तुलना करण्यास माझी हरकत नाही. पण आता ज्या तुलना होतात त्या जमाखर्चाच्या (अकौंटिंग) पद्धतीने होतात. सार्वजनिक क्षेत्रातल्या धंद्यांमध्ये आज जितके धन घातले गेले आहे, जवळ जवळ तितकेच धन तेथे नगररचना, कामगारांसाठी घरे व इतर सामाजिक गरजा पुऱ्या करण्यासाठी खर्ची पडले आहे. पण तेथे बसणारा जो हिशेबतज्ज्ञ असतो तो हा सगळा जमाखर्च करून किती टक्के फायदा झाला आणि किती टक्के तोटा झाला हे ठरवीत असतो. मी ही जमाखर्चाची कसोटी खरी मानीत नाही. अनेक उद्योगधंद्यांत भांडवल घालून आपण जे नवीन औद्योगिक सामर्थ्य उभे केलेले आहे त्यातून किती निर्माण झाले आणि किती झाले नाही हे आपण जरूर पाहावे. या बाबतीत सार्वजनिक क्षेत्रातले काही धंदे जसे अपयशी ठरले आहेत तसेच खाजगी क्षेत्रामधलेही काही धंदे अपयशी ठरले आहेत. परंतु सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंदे हे समाजवादाच्या दृष्टीने पडलेले आमचे फक्त एकच पाऊल असे आहे की, ज्यावर कदाचित आम्ही उद्या लोकशाही समाजवादाची रचना करू शकू. समाजवादाच्या दुसऱ्या दिशेने अजून आमची पावले पडलेली नाहीत, पडत नाहीत, आणि त्याच्या मार्गात अडचणी येतात अशीच आज परिस्थिती आहे, हे नाकारण्यात फायदा नाही. समाजवादाच्या लोकशाही समाजवादाच्या दिशेने ज्या रस्त्यावर आपली पावले पडावयास

पाहिजेत त्या रस्त्याची आणि आमची चुकामूक होईल की काय अशी धास्ती वाटण्यासारखीच आज परिस्थिती आहे. देशामध्ये मी जे वातावरण पाहतो आहे त्यातून ही गोष्ट जरूर मनामध्ये येते, आणि म्हणून आपणाला या बाबतीत अतिशय जागरूकतेने पाहिले पाहिजे. या बाबतीत आपण चुकणार नाही अशी दक्षता घेतली पाहिजे आणि या बाबतीतले आपले विचार आणि आपल्या कल्पना आपण सतत जागृत ठेवल्या पाहिजेत.

आज एक नवा सुशिक्षित वर्ग बनतो आहे. पण एक गोष्ट मी आपल्याला विचारू इच्छितो. तीस वर्षांपूर्वी बनणारा जो बुद्धिजीवी वर्ग होता त्याला समाजवादाचे जसे आकर्षण होते तसेच समाजवादासंबंधीचे आकर्षण या दशकामध्ये तयार होणाऱ्या या वर्गाला आहे की नाही हे सांगणे कठीण आहे. मी ज्या वेळी कॉलेजमध्ये होतो, वाचीत होतो आणि आवतीभोवती पाहत होतो त्या वेळची परिस्थिती निराळी होती. श्री. खाडिलकरांचाही मला वाटते असाच अनुभव असेल. सध्या वातावरण बदललेले आहे. त्याचे कारण असे असण्याची शक्यता आहे की, सध्या संधी वाढते आहे, नवीन तांत्रिक क्षेत्रे, नवीन प्रशासकीय क्षेत्रे मोकळी झाली आहेत. जिकडे तिकडे प्रगतीच्या दिशा दिसत आहेत. तरीही नव्या बुद्धिजीवी वर्गामध्ये समाजवादासंबंधी कमी आकर्षण असेल तर त्याची कारणे तुम्हा-आम्हाला तपासली पाहिजेत, आणि म्हणून हिंदुस्थानच्या भावी प्रगतीची कसोटी जर आपण समाजवादाच्या प्रगतीवर पाहणार असलो, तर ज्यांनी हा विचार स्वीकारला आहे त्यांनी जागृत राहून त्याच्या पाठीमागे लोकांचे सामर्थ्य उभे करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. समाजवादाच्या दृष्टीने आमची पावले आपोआप पडत राहतील ही गोष्ट मी मानीत नाही. यासाठी करावा लागणारा प्रयत्न आणि धरावा लागणारा आग्रह तुम्हा-आम्हाला आपल्या मनामध्ये जागा ठेवला पाहिजे, आणि या बाबतीत जितकी काळजी घेण्याची शक्यता आहे, आवश्यकता आहे तितकी काळजी आपण घेतली पाहिजे. हे काम महाराष्ट्राने जरूर केले पाहिजे. प्रगतीच्या दिशेने जाणारा जो विचार आहे, तो मांडण्याचा आम्ही प्रयत्न केला पाहिजे. मला आशा आहे की, हे काम महाराष्ट्राची काँग्रेस

करू शकेल. आम्ही व्यक्ती कदाचित दुबळ्या ठरू, अपुऱ्या ठरू, बाजूला फेकल्या जाऊ. कित्येक व्यक्ती येतील आणि जातील, पण शेवटी महत्त्व आहे विचारांचे आणि ध्येयवादी नीतीचे. माझ्या कल्पनेप्रमाणे महाराष्ट्र काँग्रेसचे जर खरे कोणते ऐतिहासिक कर्तव्य असेल तर ते हे आहे की, समाजवादाच्या नीतीला काँग्रेसमध्ये जागती ठेवण्यासाठी जो आवाज निघेल त्यात महाराष्ट्राचा आवाज पहिला असला पाहिजे. मी अपेक्षा करतो की, आपण हे काम उत्तम प्रकारे पार पाडू.

मी आतापर्यंत धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद यावद्दल आपल्यापुढे बोललो. तिसरा एक विचार आहे. त्यासंबंधीही मला थोडे बोलले पाहिजे आणि तो म्हणजे एकतेचा. मी आपल्याला सांगू इच्छितो की, एकतेच्या प्रश्नाबाबत एकच धोका मला सगळ्यात जबरदस्त वाटतो आणि तो म्हणजे भाषाभिमान आणि भाषांच्या अभिमानावर आधारलेले प्रान्तांचे अभिमान. हे सगळे अभिमान एका मर्यादेपर्यंत ठीकही आहेत. मला महाराष्ट्राचा अभिमान आहे, मराठीचा अभिमान आहे; पण दुसऱ्या कुण्या माणसाला पंजाबीचा, हिंदीचा, तामिळचा अभिमान असेल तर त्यात काही गैर आहे असे मी मानीत नाही. व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला वाव असला पाहिजे, संधी असली पाहिजे, या गोष्टीवरही माझा विश्वास आहे व त्या बाबतीत मी आग्रह धरीन. परंतु हा विचार असा आहे की, एका विशिष्ट मर्यादेपर्यंत न थांबता तो अधिक उग्र रूप धारण करण्याची शक्यता आहे, आणि म्हणून तुम्हा-आम्हाला खंबीरपणाने या प्रश्नाच्या बाबतीत लक्ष घातले पाहिजे.

कालच आम्ही मुख्य मंत्र्यांच्या परिषदेत निरनिराळ्या सेनांसंबंधी चर्चा करीत होतो. टीका करण्याच्या विचाराने शिवसेनेचा उल्लेख करून मी तिचे महत्त्व वाढवू इच्छित नाही. महाराष्ट्रातील जनतेला अधिक रोजगार मिळाला पाहिजे असे कोणी म्हणत असले तर ते योग्य आहे. काँग्रेसमन म्हणूनही मी असे म्हणेन. पण मी असे म्हणू शकत नाही की, हा कोणी दक्षिणेकडून आलेला आहे म्हणून याला बाजूला काढून टाका. महाराष्ट्राच्या जनतेच्या नावाने जे आवाज उठवीत आहेत तो कोणाविरुद्ध ? तर नोकरी-

करिता स्पर्धा करणाऱ्या गरीब माणसाविरुद्ध. कारखान्याच्या मालकीची ते चुकूनसुद्धा अपेक्षा करीत नाहीत. आज समाजवादाची नवी शक्ती या मुंबईच्या, महाराष्ट्राच्या मनात वाढते आहे हा आमच्या अभिमानाचा विषय आहे. पण कोण कुणाचा कारकून व्हावयाचा आणि कोण कुणाचा शिपाई व्हावयाचा यात कसली ईर्ष्या आहे? मुंबईसंबंधीचा माझा जुना अनुभव मी मुख्य मंत्री झाल्यावर एका भाषणात सांगितला होता. पूर्वी आम्ही सातारकर मुंबईमध्ये येत असू ते सुरुवातीला डोक्यावर लोखंडाची ओझी वाहण्याकरिता, नंतर मुंबईमध्ये पोलिस होण्याकरिता, नंतर कापड गिरणीतला कामगार होण्याकरिता आणि नंतर मंत्री होण्याकरिता. मी फक्त सातारकरांबद्दल बोललो होतो, पण आता सगळ्याच महाराष्ट्राबद्दल बोललेले बरे. मी हे आपल्याला कशाकरिता सांगतो आहे? संपत्तीचा धूर वाहणाऱ्या या शहरात लोकशाही समाजवादाचा नवा आर्थिक विचार मांडण्याकरिता जर कोणी म्हटले की मी एखादी सेना काढली आहे तर मी त्याच्या पाठीवर शाबासकीची थाप देईन. मघाशी माधवन् बोलले. मला वाटते त्यांच्या भाषणासंबंधी गैरसमज झाला. शिवसेनेमुळे काँग्रेसचा काय फायदा झाला हे ते सांगत नव्हते. त्यातून नकारात्मक काय परिणाम होतो आहे हे सांगण्याचा ते प्रयत्न करीत होते. मला वाटते मी त्यांच्यातर्फे खुलासा केलेला बरा. शिवसेनेच्या बाबतीत मी प्रतीकात्मक बोलतो आहे. निव्वळ शिवसेनेसंबंधी मी बोलत नाही. हिंदुस्थानातील या सगळ्या सेनांचा आणि चळवळींचा राष्ट्रीय एकतेच्या दृष्टिकोणातून आपण विचार केला पाहिजे. काही लोक म्हणत असतात की, सबंध हिंदुस्थान एका नकाशामध्ये आला, एका घटनेखाली आला, तेव्हा आता एकतेचा प्रश्न संपला. पण हे खरे नाही. एकतेचा प्रश्न सुरुवातीला जेवढा महत्त्वाचा होता तेवढाच महत्त्वाचा तो आजही आहे. एकतेवरील संकट गेलेले नाही. आजही त्यासंबंधी इतके प्रश्न उभे राहतात की, त्यातून काय काय निर्माण होईल, कसले विष निर्माण होईल अशी शंका वाटावी, भीती वाटावी, अशी आज परिस्थिती आहे, आणि म्हणून या देशातील हा एकतेचा प्रश्न, धर्मनिरपेक्षतेचा प्रश्न, आणि समाजवादी विचारसरणीचा

प्रश्न याबाबत तुमची आमची काँग्रेसमन म्हणून मोठी रखवालदारी आहे. तुम्ही-आम्ही आपल्या गावात, गल्लीत, मोहल्ल्यात ही जिम्मेदारी किती पार पाडू शकतो त्यावर या एकात्मतेच्या प्रश्नाची कसोटी लागणार आहे.

गेल्या आठदहा वर्षांत महाराष्ट्राने जरूर प्रगती केली आहे. पुष्कळच चांगले घडलेले आहे. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, नुसते चांगले होणे पुरेसे नाही. चांगले बनणाऱ्याला अधिक चांगले बनण्याचा प्रयत्न केल्याखेरीज तो चांगलाही राहू शकत नाही असा दुनियेचा अनुभव आहे. महाराष्ट्राभोवती अशी काही चीनसारखी भिंत बांधलेली नाही की, बाहेर निर्माण होणारे वारे येथे येऊन पोहोचणार नाहीत. ते तर अगोदर येऊन पोहोचलेलेच आहेत. परंतु हिंदुस्थानमध्ये ही जी वेगवेगळी "वारी" उभी राहिली आहेत त्या सगळ्यांचे मूळ महाराष्ट्रात आहे हे तुम्हाला नाकारून चालणार नाही. पण सुदैवाने आणि आमच्या प्रयत्नाने आजपर्यंत या सगळ्या विचारांची "वारी" आम्ही त्यांच्या त्यांच्या गल्ल्यांमधून बाहेर जाऊ दिलेली नाहीत. हिंदु-मुसलमानांमध्ये भांडणे लावणारा सांप्रदायवादी विचार – रिव्हायव्हॅलिझम – धर्मनिरपेक्षतेचा जसा शत्रू आहे, तसाच चातुर्वर्ण्याचा विचारही आमचा शत्रू आहे. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की हे जुनाट विचार देशाच्या एकतेइतकेच हिंदुधर्मालाही मारक आहेत. जे लोक या जीर्ण विचारांचा पाठपुरावा करतात त्यांच्या ध्यानात हा धोका आलेला दिसत नाही. ते कसेही असले तरी एकतेविरुद्ध जाणाऱ्या या अप्रगत विचारांशी आपल्याला लढत द्यावीच लागेल. एवढेच नव्हे तर एकतेविरुद्ध जाणाऱ्या कोणत्याही विचारांशी आपल्याला लढत द्यावी लागेल, त्यासाठी आपल्या मनाची आपल्याला तयारी ठेवावी लागेल. कारण देशाचे भवितव्य त्यात गुंतलेले आहे आणि एकतेचे रक्षण करूनच आपण त्यातून पार पडणार आहोत.

धर्मनिरपेक्षता, समाजवाद, एकता आणि लोकशाही या चतुःसूत्रीवर आधारलेला आपला काँग्रेस पक्ष आहे. पण तो केवळ एक राजकीय पक्ष नसून अद्यापिही तो चळवळीच्या स्वरूपात उभा आहे. त्याचे हे चळवळीचे स्वरूप आपण टिकविले पाहिजे. स्वातंत्र्याच्या प्रेरणेतून निर्माण

झालेला हा पक्ष आज समतेच्या, समाजवादाच्या चळवळीत अग्रभागी उभा आहे. त्याचे हे पुरोगामित्व टिकविणे, त्यासाठी सतत लढत राहणे हे तुमचे आमचे कर्तव्य आहे. कारण यातच देशाचे भले आहे, देशाचे कल्याण आहे, देशाचा उत्कर्ष आहे. आपण ही जागरूकता सदैव आपल्या मनाशी ठेवावी आणि त्यासाठी पडतील ते कष्ट उपसण्याची आपली तयारी असावी एवढीच आपल्याला विनंती करून मी माझे भाषण संपवितो.

आमच्या सामर्थ्याचे जीवनस्रोत, काँग्रेस कार्यकर्त्यांचे शिबिर.

तीन दिवस चालू असलेले हे शिबिर आणखी थोड्या वेळात संपेल. या शिबिराकडून आपली जी अपेक्षा होती ती किती पूर्ण झाली हे मला माहीत नाही. कारण चर्चेसाठी आपण घेतलेला "पुढे काय?" हा प्रश्न कधी न संपणारा असा प्रश्न आहे. हे शिबिर भरविण्यापूर्वी आपण "पुढे काय?" असा प्रश्न विचारला असता तर आम्ही "शिबिर भरवू" असे उत्तर दिले असते. हे शिबिर भरविण्यापूर्वीसुद्धा पुढे काय असाच प्रश्न होता. विचारासंबंधीच्या, कामासंबंधीच्या अनेक गोष्टी, अनेक शंका मनामध्ये येत असत. आपण वारंवार भेटत असू. काही प्रमुख व्यक्ती, काही प्रमुख माणसे "पुढे काय?" याला शिबिर असे उत्तर देत असत. तेव्हा आपण शिबिरात बसू या आणि या सर्व गोष्टींचा विचार करू या असे ठरले. कारण शेवटी आपण लोकशाहीच्या पद्धतीनेच काम करतो आहोत. आपण जर एकत्र बसलो नाही, आपले विचार, आपल्या शंका परस्परांसमोर मांडल्या नाहीत तर "पुढे काय?" याचा रस्ता कधी सापडणार नाही. १९३०-३२ साली जेव्हा मी पहिल्याने तुरुंगात गेलो त्या वेळची

मला आज आठवण येते. आम्ही सर्व कार्यकर्ते असेच काम करीत होतो. तरुणपणी मनुष्याला खूप काम करण्याची हौस असते. नवा दिवस उजाडला की, आता पुढे काय करावयाचे असा प्रश्न आमच्यापुढे असे. आम्ही असेच काम करीत राहिलो आणि एक दिवस पकडले गेलो. तुरुंगात दिवसभराच्या कष्टाने आम्ही झोपी गेलो. दुसऱ्या दिवशी उजाडल्यानंतर माझा एक दोस्त चटकन म्हणाला, "आता पुढे काय?" मी म्हटले, "पुढे येरवडा, पुढे काही नाही." परंतु आपण तीन दिवस येथे जे जमलो आणि विचार केला त्यातून काही घडले नाही असे आपण समजू नये. लक्षावधी माणसांच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा जेव्हा आपण प्रयत्न करीत असतो तेव्हा त्यातून पार पडण्याचा शिबिर – म्हणजे एकत्र बसून मनमोकळी चर्चा करणे – हा एक मार्ग आहे. कारण आपल्यातली माझ्या-सारखी चार माणसे कदाचित जास्त दिवस काम करीत असली तरी आम्हांला सगळ्याच प्रश्नांची उत्तरे सापडली आहेत असे नाही. मी या नम्र भावनेने आपणाशी बोलू इच्छितो.

गेल्या तीन दिवसांत देशाच्या आणि महाराष्ट्राच्या संदर्भामध्ये आपण जे विचार मांडले आहेत ते मोठे नवीन विचार आहेत असे नाही. ते विचार जुनेच आहेत. परंतु पुन्हा एकदा ते घासूनपुसून स्वच्छ करून, त्यांची मोकळ्या मनाने चर्चा केल्यानंतर त्याचा कोणाच्या मनावर काही परिणाम घडला तर त्याची सेवा मिळविण्याचा प्रयत्न करणे हे आपले काम आहे. आम्ही एका पक्षाचे राज्यकर्ते आहोत. पण पगार घेऊन आम्ही पक्षाचे काम करीत नाही. आपल्या बुद्धीने जे स्वीकारले ते आपले काम मानून त्यासाठी मनापासून झटणारे अनेक कार्यकर्ते आपल्या पक्षात आहेत. इतर देशांत लोकशाहीची जी बांधणी झाली तिचा इतिहास कितीही मनोरंजक असला, तरी माझे स्वतःचे अभ्यासाने बनलेले मत असे आहे की, हिंदुस्थानातल्या लोकशाहीची रचना करणारी काँग्रेस ही दुनियेच्या लोकशाही राजकारणातले एक आश्चर्य आहे. या पक्षाचा कोणी मंत्री म्हणून काम करीत असला, कोणी अध्यक्ष म्हणून काम करीत असला तरी या पक्षाचे सर्व देशभर पसरलेले असे असंख्य कार्यकर्ते आहेत की ते कोणीच नाहीत, पण तरीही

ते पक्षाचे काम करीत असतात. बुद्धीने, भावनेने त्यांनी काही विचार पत्करला, काही निष्ठा पत्करली आणि ते कामाला लागले. आपण स्वीकारलेली निष्ठा बळकट व्हावी, ती बरोबर आहे असा पुन्हा विश्वास निर्माण व्हावा यासाठी विचारांची तपासणी करणे हे अतिशय आवश्यक असे काम आहे. पक्ष चालतात ते निष्ठेने चालतात हे जरी खरे असले, तरी लोकशाही पक्ष हे विचारांच्या निष्ठेने चालले पाहिजेत असा तुमचा आमचा आग्रह असला पाहिजे. व्यक्तीवरच्या निष्ठा चुकीच्या आहेत. त्या निष्ठा काम देत नाहीत. कारण व्यक्ती शेवटी चूक करू शकते. मनुष्य कितीही मोठा असला तरी त्याच्या हातून चूक होणार नाही असे विधान कोणीही करू शकणार नाही, आणि म्हणून आपल्या विचारांची तपासणी करण्याकरिता आपण येथे जमलो; आणि गेले दोन-तीन दिवस वसंतरावजींबरोबर बोलत असताना माझ्या लक्षात आले की, आजची ही महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसची सभा म्हणजे काही विधानमंडळाची सभा नाही की जेथे प्रत्येक गोष्टीचे आम्ही समर्थन केलेच पाहिजे. कौटुंबिक रीत्या जमलेल्या माणसांची ही सभा आहे, आणि कुटुंबातली माणसे जरी मोकळे बोलली, तरी शेजाऱ्याकडे जाऊन त्याच्या कानात आपण काय बोललो ते सांगत नाहीत. कुटुंबातील चर्चेचा खरा अर्थ हाच असतो, आणि म्हणून त्यातली मर्यादा आपण लक्षात ठेवली पाहिजे. मी कुठल्याही चुकीचे समर्थन करीत नाही आणि कोणीही ते करू नये. समर्थनाचा तो भाग नव्हे. तसे करण्याची माझी इच्छा नाही. चुका असल्या तर त्या चुका म्हणून स्वीकारल्या पाहिजेत आणि पुढे जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

महाराष्ट्रामध्ये आपण एका विशिष्ट पद्धतीने काम करतो आहोत. ही पद्धत मी सुरू केलेली नसून ती आमची जुनी परंपरा आहे. या परंपरेने आमच्या कामाच्या वाटचालीत आम्हांला थोडीफार मदत केली आहे. ही परंपरा अशी आहे की, आम्ही एकत्र बसावे, बोलावे, थोडेसे भांडावे, रुसावे, रागवावे आणि प्रसंग पडला तर रडावेही. कारण मित्र भांडू लागले आणि शेवटी ते रडले नाहीत तर ते मित्र नव्हेत. एकमुखाने, हसतमुखाने शेवटी बाहेर पडावे अशी ही आमची परंपरा आहे. या पद्धतीने आपण -

पाच-पंचवीस वर्षे काम केले, सत्तेवर आल्यानंतरही आपण गेली दहा-वीस वर्षे काम केले आणि महाराष्ट्र बनल्यानंतरही आपण दहा-बारा वर्षे काम करतो आहोत. तेव्हा माझी आपणा सर्वांना एक विनंती राहील. महाराष्ट्राच्या राज्यकारभाराची धुरा वाहणारा माणूस हा तुम्ही-आम्ही विचारपूर्वक, विश्वासपूर्वक निवडला आहे यावर तुमचा विश्वास आहे का ? मला उत्तर पाहिजे. सगळ्यांकडून उत्तर पाहिजे. कारण कुटुंबप्रमुखावर जर तुमचा विश्वास आहे तर मग कुटुंबप्रमुखाशी आधी बोलल्याशिवाय एखाद्या प्रश्नासंबंधी बाहेर चर्चा करणे ही कुटुंब चालविण्याची पद्धत नाही. माझी एवढीच तक्रार आहे. तुम्ही चूक म्हटले म्हणून माझी तक्रार नाही. चूक असली तर तुम्ही चूक म्हटलेच पाहिजे. चुकीला चूक न म्हणण्याचा प्रयत्न जर आपण आपल्या प्रांतात करू, आपल्या कामात करू, तर आपला नाश होईल हे मला मंजूर आहे. दुनियेला कळू नये म्हणून चुकीची गोष्ट, वाईट गोष्ट कोण किती दिवस झाकून ठेवू शकेल ? आणि आजच्या ह्या लोकशाहीच्या काळात ती झाकलीही जाणार नाही. गेल्या तीन-चार वर्षांत हिंदुस्थानच्या इतर प्रांतांत हेच केले गेले की, माणूस निवडावा आणि त्याच्या खाजगी जीवनातले खरेखोटे बाहेर बोलून त्याचा नाश करावा. नाश होण्यासारखा असेल त्याचा नाश झाला तर चिंता करण्याचे किंवा त्यासंबंधी अश्रू ढाळण्याचे कारण नाही. पण महाराष्ट्राची धुरा ज्यांच्या खांद्यावर आहे त्यांच्या बाबतीत मी जो नियम पाळतो तो मी आपणाला सांगू इच्छितो. महाराष्ट्र राज्याच्या कारभारासंबंधाने मुख्य मंत्र्याने विचारणा केल्याशिवाय त्यासंबंधी बोलावयाचे नाही, सल्ला द्यावयाचा नाही असा नियम मी कटाक्षाने पाळला आहे; आणि तो ह्या विश्वासाने आणि भावनेने पाळलेला आहे की, ज्याच्यावर ही जबाबदारी टाकण्यात आली आहे तो शहाणा मनुष्य आहे, न्यायी मनुष्य आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, महाराष्ट्र राज्याचा राज्यकारभार करताना नाईकांनी कुठल्याही जिल्ह्यामधला कार्यकर्ता किंवा गट हा आपला, आणि तो दुसऱ्याचा असे कधी मानले नाही. राज्य, राज्यकारभार आणि संघटना न्यायाने पुढे न्यावयाची असेल तर ही कसोटी पाळणारा कुटुंबप्रमुख असला पाहिजे, या भावनेने आपण काम

केले पाहिजे. राज्यकारभारात काही चुका असतील, पोलिसांच्या बाबतीत काही चुकत असेल. मला कबूल केले पाहिजे की, तुम्ही म्हणता त्याप्रमाणे राज्यकारभारात अनेक दोष आहेत. तुम्ही एक गोष्ट सांगितली तर मी तुम्हांला लाख गोष्टी सांगेन. पण मुख्य गोष्ट शेवटी अशी आहे की, आपली जी राज्ययंत्रणा आहे ती कार्यक्षम करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. परवा श्री. लक्ष्मणशास्त्रींनी नोकरशाहीसंबंधी विषय मांडला. आपण तो जरूर मांडला पाहिजे. मला वाटते, तुमच्या निष्कर्षांमध्ये तुम्हांला हा निष्कर्ष घालावयास हरकत नाही की, नोकरशाहीवर घोडेस्वारांनी आपली पकड पक्की बसविली पाहिजे. त्याशिवाय ती चालणार नाही अशी परिस्थिती आहे.

तीच गोष्ट तुमच्या या दुसऱ्या लाचलुचपतीच्या प्रश्नासंबंधी. तो एक मोठा जबरदस्त प्रश्न आहे. पण त्याचे उत्तर शोधले पाहिजे. लाचलुचपतीच्या बाबतीत लाचलुचपत आपण संपूर्णपणे दूर करू शकू किंवा नाही असा येथे कोणी तरी प्रश्न उपस्थित केला. पण या तात्त्विक वादामध्ये शिरण्याचे आपल्याला कारण नाही. लाचलुचपतीला पायबंद घालण्याचा आम्ही प्रामाणिकपणाने जास्तीत जास्त प्रयत्न करतो आहोत असे वातावरण, असा विश्वास आपण निर्माण केला पाहिजे. आपल्याला माहीत आहे की, मध्यवर्ती सरकारमध्ये शेवटी सगळ्या गोष्टींची चर्चा होते. संसदेच्या याच अधिवेशनामध्ये लोकपालासंबंधीचे विधेयक मांडले गेले आहे. तुम्ही, मी आणि व्यक्तिव्यक्तीने बोट्टून सुटण्यासारखा हा प्रश्न नाही. त्यासाठी कायदेशीर संघटना उभी केल्याशिवाय यातून मार्ग नाही.

सत्तेवर गेल्यानंतर माणसाच्या भोवताली अनंत तऱ्हेची वातावरणे तयार होतात. चुका करण्याचे वातावरण तयार होते, त्याला मोह घालण्याचे वातावरण तयार होते, आणि फायदे घेणारी माणसे त्याच्याकडे पहिली येतात. मुख्य मंत्री असताना पहिल्या महिन्यानंतर मी माझ्या मनाला सांगू लागलो की, अनोळखी मनुष्य हार घेऊन आला की काही तरी धोका आहे असे आपण समजले पाहिजे. अशीच माणसे लवकर जवळ येतात. साहेब म्हणून नमस्कार करणारी माणसे पहिल्या प्रथम येतात. पण हा सत्तेचा दोष आहे. त्याला आपण काय करणार ?

दुसरी गोष्ट अशी आहे की, सत्तेवर असणाऱ्या माणसावद्दल शंका घेणारी माणसेही फार असतात. या शंका खऱ्याही असतात, खोट्याही असतात. पण त्या एकदम खोट्या म्हणून धरून चालणे चांगले नव्हे. पण त्या सगळ्या खऱ्या आहेत असे गृहीत धरून त्यांची जाहीर चर्चा करावी हे तरी चांगले आहे का ? आणि म्हणून यातून मार्ग निघाला की, कायद्याने अशी एक संघटना उभी केली पाहिजे की, जिथे आपल्याला तक्रार करता येईल. या गोष्टीची आम्ही मध्यवर्ती सरकारात वर्षभर चर्चा केल्यानंतरच लोकपालासंबंधीचे विधेयक तयार करण्यात आले आहे.

पण लाचलुचपतीच्या प्रश्नाबाबत येथे चर्चा झाली हे एका अर्थाने फार चांगले झाले. कारण हे सारखे कुजबुजले जात होते, बोलले जात होते. गेली बावीस वर्षे मी ऐकतो आहे. १९४६ सालापासून एकसारखा सत्तेवर असणारा मी एक माणूस आहे. हे सुदैव आहे की, दुर्दैव आहे ते मला माहीत नाही. पण मी असे कसे समजू की, माझ्यासंबंधानेही कोणी काही बोलत नसेल म्हणून ? पण लाचलुचपतीच्या बाबतीत जो आरोप करतो त्याने आरोपांची जबाबदारी घेतली पाहिजे, आणि त्याचबरोबर तो आरोप सिद्ध करू शकला नाही तर त्याबद्दल प्रायश्चित्त घेण्याचीही त्याची तयारी असली पाहिजे. या पद्धतीने आपण काम केल्यास ते ठीक होईल. परंतु कृपा करून महाराष्ट्रातील मंत्रिमंडळात अमके चालले आहे, तमके चालले आहे असे संशयाचे वातावरण निर्माण करू नका. असे वातावरण निर्माण करून आपण महाराष्ट्राचे हित करणार नाही आणि काँग्रेसचेही हित करणार नाही. तुम्हांला सार्वजनिक जीवन, काँग्रेसचे जीवन, सुधारावयाचे आहे. मला हे मंजूर आहे. ते सुधारले पाहिजे, ते सुधारण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. जे घडले पाहिजे, पण घडत नाही ते घडविण्याचा आपण प्रयत्न करीत राहिले पाहिजे. ते घडवून आणण्याचा आपण प्रयत्न करू या.

आपण ज्या इतर गोष्टी येथे सांगितल्या त्यांची आपण जरूर काळजी घेतली पाहिजे. कार्यकर्त्यांची अवहेलना होते अशी एक भावना आहे. मन दुःखीकष्टी करणारा हा प्रश्न आहे. तीस तीस, चाळीस चाळीस वर्षे रावलेले अनेक कार्यकर्ते काँग्रेसमध्ये आहेत. ते कोठेही निवडणुकीला उभे

ग्रंथ ... स्वीकृत
क्रम ७५७२५ दि: नियंत्रण
क्र ...२०१६... बोर्ड दि: ...

राहिलेले नाहीत. ज्यांच्या अंगावर पांढरे स्वच्छ कपडेही नसतात असे अनेक जुने कार्यकर्ते आपल्यात आहेत. आपल्या पक्षाचे प्रतीक असणारी सत्तेवरची माणसे आली की, त्यांनी आपल्याला ओळखावे, आपली विचारपूस करावी यापेक्षा त्यांची अधिक अपेक्षा नसते. तेव्हा जुन्या पिढीचे ऋण म्हणून सत्तेवर असणाऱ्या मित्रांनी या कार्यकर्त्यांना सन्मानाने वागवावे आणि त्यांच्या वाव्रतीत ही गोष्ट कटाक्षाने पाळावी अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री. नरूभाऊ लिमयांनी मघाशी काँग्रेसभवनाबद्दल सांगितले. ते म्हणाले ती गोष्ट खरी आहे. पुण्यास गेल्यानंतर आपल्याला येऊन भेटणाऱ्या माणसांपेक्षा आपल्याला ज्यांना जाऊन भेटावेसे वाटते अशा माणसांकरिता जर तास दोन तास मिळाले तर फार बरे होईल अशी माझी नेहमी भावना असते. अनेक स्नेही आहेत, मित्र आहेत, काम केलेली माणसे आहेत. त्यांच्या घरी आपण जावे, त्यांना भेटावे, त्यांच्याकडे हक्काने चहा मागून घ्यावा अशी मनात सारखी इच्छा असते. पण जाता येत नाही. वेळ सापडत नाही. काँग्रेसभवनावर जावे, बसावे असे अनेक वेळा वाटते. मी इतरांच्या-बद्दल सांगत नाही. पण माझी स्वत:ची अशी इच्छा असते, भावना असते. पण पूर्वीसारखे काँग्रेसभवनावर कोणी असत नाही. नोटीस दिल्याशिवाय कोणी भेटणार नाही अशी आज परिस्थिती आहे. आम्ही जात नाही म्हणून काँग्रेसभवनामध्ये कोणी येत नाही असे जर असले, तर तेही संघटनेला फारसे शोभादायक नाही. सर्किट हाऊसमध्ये भेटण्यात आम्हांलाही आनंद वाटत नाही. पण कोठे तरी थांबले पाहिजे. कोठे तरी आपण स्थिर असल्याशिवाय इतरांना भेटणार कसे? आपण असे ठिकाण ठरवा की, जेथे गेल्यानंतर माणसे निश्चितपणे भेटतील. तेथे तास अर्धा तास चक्कर मार-ण्यास माझी काही हरकत नाही. मंत्री किंवा अधिकारपदावर असणाऱ्या आणि कदाचित उद्या अधिकारपदावर जाणाऱ्या सगळ्यांचाच हा आचार असला पाहिजे. निदान काँग्रेस पक्षाला याची गरज आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, प्रत्यक्ष अधिकारावर असणाऱ्या माणसांच्या पुण्याईपेक्षा कणाकणाने काम करणाऱ्या असंख्य काँग्रेस कार्यकर्त्यांच्या पुण्याईवरच हा पक्ष चाललेला आहे. अधिकारपदावर जी माणसे आहेत, ती सगळी

थोडी भाग्यवान माणसे आहेत. एखादे फूल देवाच्या पूजेला जाते तर दुसरे फूल दुसरीकडे कुठेतरी जाते. याचप्रमाणे दैवाचा भाग म्हणून म्हणा, काही माणसे सत्तेवर जाऊन बसली आहेत. पण हा जो अनामिक, असंख्य काँग्रेस कार्यकर्त्यांचा संच आहे त्याच्याबद्दल आपल्याला जिव्हाळा असला पाहिजे, आस्था असली पाहिजे.

जिल्हे ताब्यात असणारे जे मंत्री आहेत त्यांच्या कामासंबंधीची फेरतपासणी मला वाटते वसंतरावजींनी एकदा स्वतःच केली पाहिजे. त्यांना इतर ठिकाणी बदलता आले तर अशा प्रकारचा बदल करून पाहण्यास मला वाटते काही हरकत नसावी. अशा प्रकारची फेरतपासणी करण्याची गरज असेल तर मंत्रिमंडळाने एकदा बसून त्याचा विचार केला पाहिजे. आपल्या काँग्रेस कार्यकर्त्यांची या प्रश्नाच्या पद्धतीवर जर टीका होत आहे तर या पद्धतीत काही गैर आहे काय, काही चुकते आहे काय, याचा त्यांनी एकदा बसून विचार केला पाहिजे. कदाचित या बाबतीत सुधारणा कराव्या लागतील, कामाच्या पद्धतीमध्येही सुधारणा कराव्या लागतील. त्या त्या जिल्ह्यातले मंत्री घालण्याचा हेतू असा होता की तेथील माणसांना ते अधिक जाणतात, त्यांचे सार्वजनिक प्रश्न त्यांना अधिक समजतात. पण त्यांच्यावर जर स्थानिक गटांचा दबाव पडत असेल तर त्याही बाबतीत आपण काही पाहिले पाहिजे. कारण संघटनेसंबंधी आपला असा दावा नाही की, आपल्यात जिल्ह्या-जिल्ह्यामध्ये भांडणे नाहीत किंवा जिल्ह्या-जिल्ह्यामध्ये गट नाहीत. पण आपल्या संघटनेमध्ये, आपल्या शासनामध्ये ऐक्य आहे. याचा अर्थ समझोता आहे, समजूतदारपणा आहे. माझे म्हणणे एवढेच की, जेथे गट आहेत तेथे गटांच्या वागणुकीची पद्धत आपण शोधून काढली पाहिजे, आणि या गटांचा अनिष्ट परिणाम होणार नाही अशा दृष्टीने यासंबंधी आपल्याकडून विचार झाला पाहिजे.

पण मला आणखीही दुसरे बोलावयाचे आहे. येथे ज्या चर्चा झाल्या, त्या अतिशय महत्त्वाच्या चर्चा झाल्या हे कृपा करून आपण ध्यानात घ्या. मीसुद्धा पुष्कळच नवीन समजू शकलो. ज्या जुन्या गोष्टींवर माझा विश्वास होता तो विश्वास अधिक दृढ करून मी चाललो आहे. सहकारी चळवळी-

संबंधी अधिक दृढ निष्ठा घेऊन मी चाललो आहे. जे घडते आहे ते बरोबर घडते. पण ते अधिक बरोबर घडावे याकरिता खरा प्रयत्न आहे. येथे ज्या टीका झाल्या त्या आपण अधिक चांगले व्हावे याकरिता झाल्या. तुम्हांला मी सांगितले की, हे सर्व आत्मटीकेसाठी आहे. यामध्ये दोष दाखविण्याकरिता नव्हे तर दोष दुरुस्त करण्याकरिता दोष आहेत का, हे पाहण्याची क्रिया होती आणि म्हणून त्यासंबंधीच्या ज्या चर्चा झाल्या, त्यासंबंधीचे जे निर्णय झाले त्यांची अंमलबजावणी करण्याचा आपण अधिक प्रयत्न केला पाहिजे. सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न शेवटी माझ्या मताने हा आहे की, तुमचे आमचे राजकीय विचार आपण परत तपासून घेतले पाहिजेत, शुद्ध करून घेतले पाहिजेत. त्यांच्यासंबंधीच्या निष्ठा तपासून घेतल्या पाहिजेत. बाकी सगळे घडून हे जर घडत नसेल तर कदाचित काही माणसांचा साधुसमाज आपण फार तर बनू, पण आपण राजकीय पक्ष बनणार नाही.

धर्मनिरपेक्षतेच्या विचारासंबंधी मी बोललो. पण सकाळीच मला कोणी तरी छोटीशी चिठ्ठी दिली की, धर्मनिरपेक्षतेच्या विचाराचा खरा निश्चित अर्थ काय? या विचाराचे दोन भाग आहेत. मला माफ करा. मी ह्या गोष्टीची पुनरावृत्ती करतो आहे, पण त्याची गरज आहे. या विचाराचा पहिला जो अर्थ आहे तो म्हणजे निधर्मता, धर्मनिरपेक्षता. परंतु त्यासाठी विनोबाजींनी जो शब्द वापरला आहे तो फार चांगला आहे. तो शब्द म्हणजे सर्वधर्मसमभाव. मी हिंदू आहे, मला हिंदुधर्म प्रिय आहे. पण मला हिंदुधर्म प्रिय असला तरी मुसलमानी धर्मासंबंधी, ख्रिस्ती धर्मासंबंधी माझ्या मनात विरोधी भाव नसला पाहिजे. ही एक पहिली, एक मानसिक भावना झाली. पण या विचाराचा अर्थ निव्वळ धर्मनिरपेक्षता असा नाही. त्याचा दुसराही एक महत्त्वाचा भाग आहे, आणि तो भाग असा आहे की, मी जेव्हा राजकारण करीन तेव्हा माझ्या राजकारणामध्ये मी धर्माला प्राधान्य देणार नाही. तेथे धर्माला स्थान नाही. राजकारणामध्ये जेव्हा धर्माला प्राधान्य येते तेव्हा ते राजकारण जातीयवादी बनते. पण जातीयवादी राजकारण म्हणजे काय? जेव्हा तुम्ही राजकारणाचा विचार करता, आणि मी हिंदू आहे व हिंदुत्वाचा मला विचार केला पाहिजे, माझ्या हिंदुत्वाला जास्त प्रतिष्ठा प्राप्त झाली

पाहिजे किंवा माझ्या इस्लामला जास्त प्रतिष्ठा मिळाली पाहिजे असा ज्या वेळी तुम्हां मनात विचार आणता त्या वेळी राजकारण जातीयवादी बनते. या जातीयवादी राजकारणाचा दुसराही एक महत्त्वाचा भाग आहे. जे लहान लहान अल्पसंख्य आहेत त्यांच्या मनामध्ये संशय निर्माण झाला, शंका निर्माण झाली तर ती समजण्यासारखी आहे. परंतु जो बहुसंख्य समाज आहे तोच जर जातीयवादी झाला तर राष्ट्र संपले म्हणून समजावे. म्हणून हिंदू समाजाला या जातीयवादाच्या विचारापासून वाचविणे, त्याला प्रयत्नपूर्वक या विचारापासून बाजूला काढणे या गोष्टीला महात्माजींनी अतिशय प्राधान्य दिले होते. तेव्हा धर्मनिरपेक्षतेच्या विचारासंबंधी आपल्या मनात असलेली श्रद्धा आपण वरोवर तपासून घेतली पाहिजे.

आपण हे जे विचार मांडले आहेत ते जुनेच विचार आहेत. पण शेवटी तुमचे माझे संपूर्ण राजकारण, तुमचे माझे संपूर्ण राजकीय जीवन या विचारांच्या पायावर आधारलेले आहे आणि म्हणून ही चतुःसूत्री. ही चतुःसूत्री जुनी आहे. तिच्यात नवीन असे काही नाही. हे सर्व नेहमीचेच आहे; पण प्रश्न असा आहे की, पुष्कळ वेळा आपण नेहमीचीच गोष्ट विसरण्याचा संभव असतो, आणि म्हणून तिच्यावर अधिकाधिक जोर देण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.

या चतुःसूत्रीच्या कसोटीवर निर्माण होणारे जे नवे नवे प्रश्न आहेत, ते लोकांना समजावून देण्याचा आम्ही प्रयत्न करतो का हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. काँग्रेस पक्षाचा एक कार्यकर्ता म्हणून कार्य करण्याचा मी प्रयत्न करीत होतो तेव्हापासूनचे अनेक अनुभव आहेत माझ्याजवळ. असा एक आठवडा जात नव्हता की, देशामध्ये निर्माण झालेल्या प्रश्नांची माहिती देण्याकरिता आम्ही काँग्रेसची सभा घेतली नाही. हा १९४५ पर्यंतचा अनुभव आहे. १९४५ नंतर हे गेले. नंतर आल्या त्या सत्काराच्या सभा, समारंभाच्या सभा, आणि दुसऱ्या ज्या सभा आता होतात त्या विरोधाच्या सभा होतात. आमचे म्हणणे चूक कसे आहे, आमचे म्हणणे दुष्ट कसे आहे, आमचे म्हणणे अराष्ट्रीय कसे आहे, आमचे म्हणणे स्वार्थी कसे आहे, आमचे म्हणणे फक्त पक्षनिष्ठ कसे आहे, हे सांगण्याकरिता विरोधी पक्षाचे

सारखे फड उठत असतात. आमच्या बाजूने जी वर्तमानपत्रे आहेत ती थोडी आहेत. इतर वृत्तपत्रे त्यांच्या स्वतःच्या मताचे जेवढे असेल ते ती मांडतात. त्यांनी तरी का मांडावे आमचे म्हणणे ? अशी अपेक्षा का असावी आमची त्यांच्याकडून ? त्यांना पटत नसले तरी त्यांनी ते मांडावे असे आपल्याला कसे म्हणता येईल ? तेव्हा निरनिराळ्या प्रश्नांबाबत लोकमत आपल्या बाजूने जागृत करण्याकरिता आपण काय करतो आहोत हा महत्त्वाचा प्रश्न आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, उच्चारलेल्या शब्दांची म्हणजे वाचेची शक्ती ही सगळ्यात मोठी शक्ती आहे. सगळी वृत्तपत्रे विरुद्ध असतानाही शेवटी काँग्रेस निवडणूक जिंकते हा महाराष्ट्रातील अनुभव आहे. गेल्या चार-पाच वर्षांपूर्वीचा हा अनुभव आहे. १९६१–६२ सालचा मुंबई शहराचा हा अनुभव आहे. मी काँग्रेसबद्दल बोलतो आहे. त्या वेळच्या उमेदवारांबद्दल नाही. सगळी वृत्तपत्रे काँग्रेसविरोधी असतानाही काँग्रेसला विजय मिळाला. याचे कारण असे आहे की, तोंडाने जो आपला संदेश जातो तो फार परिणामकारक ठरतो. पण हल्ली आम्ही मंत्री आलो म्हणजे सभा होतात. यशवन्तराव आले किंवा वसन्तराव आले म्हणजे सभा होतात. हे फारसे चांगले नाही. हा पांगुळगाडा आपण मोडला पाहिजे. या बाबतीत यशवंतराव मोहिते जे म्हणाले त्याला माझा पाठिंबा आहे. यासाठी त्यांनी एखादे आंदोलन करावयाचे ठरविले तर त्याचे नेतृत्व मी करीन. आज मी बरोबर विचार करतो आहे असे धरून चालले तरी उद्या चुकीचा विचार करण्याची शक्यता आहे. शेवटी मी माणूस आहे. माझ्या हातून चूक घडणार नाही असे मी सांगू शकणार नाही. माझ्याही विचारामध्ये काही दोष असण्याचा संभव आहे. माझ्याही हातून चुका घडण्याचा संभव आहे. कुठल्याही व्यक्तीच्या विचारावर किंवा निष्ठेवर आधारलेले काम टिकत नाही. महात्मा गांधींसारख्या माणसाला लोक विसरले. मी उद्या सत्तेतून गेल्यानंतर माणसे मला विसरतील हे मला माहीत आहे. माणसे काय असतात ते मी पाहिलेले आहे. मुख्य मंत्री झाल्यानंतर मी स्वतः ऐकलेली एक गोष्ट आपल्याला सांगतो. मी आमच्या जिल्ह्यातल्या एका गावामध्ये गेलो होतो, तेथे ऐकलेली ही कथा आहे.

मोठी अर्थपूर्ण हकीगत आहे. तेथल्या एका माणसाने मला ही हकीगत सांगितली. तो म्हणाला की पूर्वी तो फार गरीब होता. त्याला गावात कोणी विचारीत नव्हते. पण एकदा त्याच्याकडे काही उत्पन्नाची बाजू आली. तेव्हा त्याने त्या उत्पन्नाचे एक दिवस काही दागिने आणले आणि आपल्या घराच्या पाठीमागे परड्यामध्ये एक खड्डा करून तेथे त्याने ते पुरून ठेवले. ही बातमी गावात पसरताच त्याला कधीही न विचारणारे लोक दुसऱ्या दिवसापासून रामराम घालावयास लागले. त्यांनी रामराम म्हटल्यानंतर पहिल्या दिवशी त्याला जरा चुकल्यासारखे वाटले. पण दुसऱ्याही दिवशी जेव्हा त्यांनी राम राम केला तेव्हा तो म्हणाला, "मी जाऊन सांगतो." लोकांना कळेना तो काय बोलत होता ते. तेव्हा त्याने सांगितले की, हा जो राम राम होत होता तो त्याला नव्हता. त्याच्याकडे जे काही आलेले होते त्याला हा राम राम होता, आणि म्हणून लोकांनी केलेला राम राम त्याने जे पुरून ठेवले होते त्याला तो सांगणार होता, असा 'त्याला जाऊन सांगतो' याचा अर्थ होता! अशी आहे ही या खेडेगावातल्या माणसाची गोष्ट. मी मुख्य मंत्री झाल्यानंतर लोकांचे जास्त नमस्कार यावयास लागले तेव्हा मी माझ्या मनाला म्हणालो, 'हे सगळे नमस्कार जाऊन सांगणार आहे मी माझ्या सचिवालयातल्या खुर्चीला'. आपल्याला माहीत आहे की, ही सत्तेतून घडणारी गोष्ट आहे. यात थोडेफार माणसाचे असते, थोडेफार कामाचे असते, थोडेफार सत्तेचे असते; पण हे सर्व व्यक्तिनिष्ठेवर आधारलेले असते. कोणी तरी हा मोठा आणि तो लहान असा प्रकार असतो हा. पण शेवटी आम्ही लहान माणसे मोठी दिसतो ती कशामुळे? हे कर्तृत्व आमचे नाही. ते राजकारणाचे कर्तृत्व आहे, पक्षाचे कर्तृत्व आहे. माणसे जन्मतःच मोठी नसतात. मोठे प्रश्न सोडविताना गुण दाखविण्याची पुष्कळांना जी संधी मिळते त्यातून माणसे मोठी होतात. पण संधी कोण देते? काँग्रेस पक्षाचा आशीर्वाद पाठीशी नसता तर कुठे असते यशवंतराव आणि कुठे असते वसंतराव कोणाला ठाऊक? तेव्हा पक्ष म्हणून जो असतो तो, एका राजकीय विचाराची देन आहे, आणि म्हणून परत महाराष्ट्रामध्ये निवडणुका होतील तेव्हा काय

होईल याची चिंता करू नका. मी त्याची चिंता करणार नाही. सगळा अभ्यास वरोवर केल्यानंतर परीक्षा काय व्हावयाची असेल ती होईल. त्याची चिंता करण्याचे कारण नाही. तुमची माझी जर विचारावर श्रद्धा असली आणि त्यासाठी जनतेशी संपर्क ठेवण्याचा आम्ही मनमोकळेपणाने प्रयत्न करणार असलो, तर मग आम्हांला चिंता करण्याचे कारण नाही.

आवांच्यासारखा एक अत्यंत निर्मळ कार्यकर्ता माझा मित्र आहे. ते वसंतराव नाईकांचे मित्र आहेत, ते आमच्या सगळ्यांचे मित्र आहेत, आणि त्यांच्यासारखे आपले इतर अनेक कार्यकर्ते आहेत. या सर्वांना माझे असे सांगणे आहे की, ज्याच्यामुळे संशयाचे वातावरण निर्माण होईल असे काही करू नका. संशयाच्या वातावरणाने काँग्रेस किंवा संघटना संकटात आली तर त्याचे दुःख नाही. पण आज देशाचे जे चित्र आम्ही पाहतो आहोत ते असे आहे की, दुर्दैवाने काँग्रेस मोडली तर राष्ट्र मोडेल. आजच्या राजकारणाची परिस्थिती ही अशी आहे. काँग्रेसशिवाय आणखी दुसरे मोठे पक्ष बनत नाहीत हे दुर्दैव आहे.

लोक म्हणतात दोन तुल्यबल पक्ष बनले पाहिजेत. हे सगळे खरे आहे. पण काँग्रेससारखा दुसरा पक्ष या देशात नाही ही जी आज परिस्थिती आहे, ती आपल्याला विसरता येणार नाही. मंदिरामध्ये मूर्ती असते म्हणून मंदिर बनते, ती मूर्ती काढण्याचा अधिकार भक्तांचा आहे. भक्त बनवितो म्हणून मंदिर बनते. भक्त बनवितो म्हणून मूर्ती देव बनते. मूर्ती काढावयाची असेल तर जरूर काढा; पण त्या मूर्तीच्या ठिकाणी दुसरे काय बसवावयाचे ते पहिल्याने मनाशी पक्के करा. तसे काही न करता मूर्ती उठविली तर मंदिर पार उजाड, ओसाड दिसावयास लागेल हे आपण लक्षात ठेवा.

रिपब्लिकन पक्षाबरोबरच्या करारासंबंधी श्री. तुळशीराम कांबळे यांनी प्रश्न उपस्थित केला. खरे म्हणजे त्यांनी या करारासंबंधाने शंका व्यक्त केली. मी हा करार करण्यास तयार झालो त्यात माझा निव्वळ राजकीय हिशेब नव्हता. एवढा मोठा बहुजनसमाज जो येथे आहे त्याच्याजवळ जाण्याचा मी प्रयत्न केला. बहुजनसमाज हा शब्द मी मासेस या अर्थाने

वापरतो. ज्या एका वेगळ्या अर्थाने हा शब्द महाराष्ट्रामध्ये वापरला जातो त्या अर्थाने मी तो वापरीत नाही. मी हा प्रयत्न या भावनेने केला की, त्याच्यामध्ये जे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाचे भंगलेले देऊळ दिसते आणि हे माझे जुने म्हणणे आहे – ते भंगलेले देऊळ आम्ही दुरुस्त केले पाहिजे. ही खरी त्याच्या पाठीमागची कल्पना आहे.

येथे उपस्थित करण्यात आलेल्या सगळ्याच प्रश्नांना उत्तर देणे शक्य नाही आणि मला वाटते त्याची जरुरीही नाही. बरेच दिवस माझ्या मनामध्ये होते की, कार्यकर्त्यांत वसावे, त्यांच्याशी बोलावे, त्यांच्याशी चर्चा करावी. या शिबिरामुळे मला ही संधी मिळाली आणि आपण मोकळेपणाने बोललो व चर्चा केली. त्यातून काही तरी निघेल अशी आशा आहे. पुढे काय याचा हा अर्थ आहे, आपणही बरेचजण बोललात. थोडेसे कठोरतेने बोललात, रागाने बोललात; पण त्यामध्ये चांगला हेतू होता. बोलले म्हणजे सुधारेल या भावनेने आपण बोललात; आणि आपण हे सगळे या आशेने केले आहे की, यातून काहीतरी मार्ग सापडेल, परत कार्यकर्त्यांचा संच उभारता येईल, ध्येयनिष्ठ पक्ष उभारता येईल आणि जे ध्येय गाठावे अशी तुमची आमची सर्वांची प्रार्थना आहे ते ध्येय थोडेतरी, चार-दोन पावले तरी, आपणाला जवळ करता येईल. या भावनेनेच आपण या मार्गावर चाललो आहोत आणि म्हणून "पुढे काय" तर पुढचे पाऊल पुढे.

काँग्रेस कार्यकर्त्यांचे शिबिर, मुंबई, दि. २२-५-६८

२९ पक्षसंघटनेच्या बदलत्या दिशा

आपल्या जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यकर्त्यांपुढे आज बोलताना गेली दहा-पंधरा वर्षे या जिल्ह्यात चाललेल्या काँग्रेसच्या कामासंबंधीच्या अनेक जुन्या आठवणी माझ्या मनात भरून राहिल्या आहेत. आपल्या जिल्ह्यातील काँग्रेसच्या कामाला एक मोठी परंपरा आहे. या कामात महत्त्वाचा भाग घेतलेले आचार्य भिसे, श्री. भाऊसाहेब परांजपे, श्री. भाऊसाहेब धामणकर यांसारखे अनेक थोर कार्यकर्ते येथे वसलेले आहेत. त्यांना पाहिले की, काँग्रेस कार्यकर्त्यांच्या जुन्या पिढीच्या कामाची माझ्या मनात आठवण येते, आणि त्या वेगळ्या काळामध्ये या जिल्ह्यातील काँग्रेस संघटना कशी काम करीत होती याचे चित्र माझ्या डोळ्यांपुढे उभे राहते.

श्री. भाऊसाहेब वर्तक यांच्या नेतृत्वाखाली काँग्रसचे जे नवीन कार्यकर्ते आज या जिल्ह्यात काम करीत आहेत तेही या जिल्ह्यातील आपल्या कामाच्या परंपरेची आठवण ठेवून आपले काम करतील अशी मी आशा करतो. या गोष्टीचा मी मुद्दाम उल्लेख करतो आहे. कारण ही उपयोगी पडणारी अशी परंपरा आहे. काँग्रेसच्या कार्यासंबंधीचे जे ध्येयात्मक

स्वरूपाचे प्रश्न आहेत त्यांचा विचार आपण जरूर करूच. पण मी आज काँग्रेसच्या कार्यकर्त्यांपुढे बोलतो आहे, तेव्हा आपल्या कार्यासंबंधीचे जे संघटनात्मक स्वरूपाचे प्रश्न आहेत त्यांपैकी काहींचा येथे उल्लेख करणे मला फार आवश्यक वाटते, म्हणून त्यांचा मी आपल्यासमोर ऊहापोह करणार आहे.

सुदैवाने महाराष्ट्रात काँग्रेसची परिस्थिती इतर प्रदेशांपेक्षा तुलनेने अधिक चांगली आहे. परंतु जे इतरत्र घडते आहे ते आपल्याकडे घडणारच नाही असे समजून मात्र चालणार नाही. कारण मनुष्यस्वभाव सगळीकडे सारखाच आहे. ज्यातून संघर्ष निर्माण होतात ते सत्तेसंबंधीचे प्रश्न सगळीकडे सारखेच आहेत. मग इतरत्र जे घडते ते येथे का घडत नाही हा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. या देशातल्या अनेक प्रदेशांत मी नेहमी जात असतो. जुन्या काँग्रेसच्या कामाची फार मोठी परंपरा असलेले असे काही प्रदेश आहेत. १९३० च्या आणि १९४२ च्या चळवळीत भाग घेतलेले शेकडो कार्यकर्ते या प्रदेशांच्या खेड्याखेड्यांतून पसरलेले आहेत. तेसुद्धा काँग्रेस संघटना आता कोठे कोठे दुबळी झाली आहे असे सांगतात, तेव्हा मला आश्चर्य वाटते. मी त्यांना विचारीत असतो की, तुम्हांला असे का वाटते? मी जेथे जेथे जातो तेथे तेथे तर मला मनापासून कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचे वातावरण दिसून येते. त्यावर त्यांचे उत्तर असे की, काँग्रेसला तेथे बाहेरून विरोध नाही, तर तेथे काँग्रसमध्येच अंतर्गत संघर्ष आहे. सुदैवाने महाराष्ट्रापुरते आज आपण असे खात्रीपूर्वक सांगू शकतो की, अशा प्रकारची परिस्थिती आपल्याकडे नाही. इतर ठिकाणी जे घडले किंवा घडत असेल, त्यापेक्षा येथे जे निराळे घडते त्याचे कारण काय असावे ते शोधून काढण्याचा मी प्रयत्न केला. माझ्या मते याचे कारण हे आहे की आपल्याकडे अनेकविध नवीन नवीन कार्यक्षेत्रे आपण निर्माण करतो आहोत आणि त्यामुळे अनेक कार्यकर्त्यांना या क्षेत्रांत काम करण्याची संधी आहे. अशा प्रकारची कार्यकर्त्यांच्या मनात आपण आशा निर्माण करतो आहोत, वातावरण निर्माण करतो आहोत. त्यामुळे कामाची वाटणी होऊन कामाचे क्षेत्र वाढत राहिले आहे. याचा अर्थ असा की, ज्या परि-

स्थितीमुळे वैयक्तिक संघर्ष निर्माण होतात अशा प्रकारची परिस्थिती येथे निर्माण झालेली नाही. आपल्या येथे आज जे वातावरण आहे त्याचे हे एक मुख्य कारण असण्याची शक्यता आहे.

दुसरे कारण परंपरेसंबंधीचे आहे. एकत्र बसावे, एकत्र विचारविनिमय करावा अशी जुन्या कार्यकर्त्यांची एक परंपरा आहे. माणसामाणसामध्ये जो संघर्ष निर्माण होतो तो टाळण्याचा हा एक मार्ग आहे. जेथे संघर्ष होत नाहीत तेथील माणसे निर्जीव असतात किंवा त्यांच्याजवळ भांडण्याची शक्ती नसते, किंवा त्यांना आकांक्षा नसतात म्हणून तेथे संघर्ष होत नाहीत असे नाही. असे असेल तर तो अगदी निर्जीव लोकांचा प्रदेश होईल. माझ्या मते ही फारशी अभिमान बाळगण्यासारखी गोष्ट नाही. पण एक प्रकारची समजुतदारपणाची भावना कार्यकर्त्यांमध्ये असेल आणि त्यामुळे संघर्ष निर्माण होत नसतील तर ती जरूर अभिमानाची गोष्ट आहे. एकत्र बसावे, मतभेदाचे प्रश्न निर्माण झाले तर एकत्र विचारविनिमय करून ते सोडवावे, कार्यकर्ता नवीन असला तर त्याला कोणते कार्य करता येणे शक्य आहे याचा विचार करावा आणि त्याला त्याच्या कामामध्ये मार्गदर्शन करावे, ही जी वृत्ती आहे, ती ठाणे जिल्ह्यातील जुन्या परंपरेतील आहे. मी हे आपल्याला अशाकरिता सांगतो आहे की, या परंपरेचे माझ्यावर थोडेफार ऋण आहे. ही परंपरा आता तुमच्या जिल्ह्यापुरतीच मर्यादित राहिलेली नाही. हा जो वडीलधारेपणा परंपरेने आला होता त्याचा उपयोग कसा करावा हे मी कै. अण्णासाहेब वर्तकांकडून शिकलो. त्यांचे माझ्यावर ऋण आहे. एक प्रकारचे बौद्धिक स्वरूपाचे ऋण आहे. वादाचे, मतभेदाचे प्रश्न निर्माण झाले म्हणजे अण्णासाहेबांनी नेहमी म्हणावे की, वाद तर असणारच, मतभेद तर असणारच. आपण काय मेलेली माणसे आहोत की आपल्यात मतभेद नसतील ? बसू या, बोलू या आपण एकत्र, तुमची बाजू काय आहे, आमची बाजू काय आहे, ते आपण समजावून घेऊ. मग त्यांनी क्षत्रियांचे जेवण तयार करून आम्हाला जेवावयाला बोलवावे. जेवण झाल्यानंतर त्यांचे ते सुरेख पान हाताशी घेऊन आम्ही चर्चा करीत असू. मला खूप आठवते की, त्या चर्चेतून बाहेर पडताना आम्ही मनाचा समझोता

करून बाहेर पडत असू. मी आपणांस सांगू इच्छितो की, अशा प्रकारची वृत्ती ही एक अत्यंत आवश्यक गोष्ट आहे. संघटनेचे हे एक मूळ सूत्र आहे असे आपण मानले पाहिजे. संघटनेत काम करणारी जी माणसे आहेत त्यांच्यात दोन मते होणारच. दोन मते झाली नाहीत तर मला आश्चर्य वाटेल. माझा हा आवडता सिद्धान्त आहे की, लोकशाही सांभाळण्यासाठी दोन मते नसतील तर मग लोकशाहीचे कारणच राहणार नाही; आणि दुसरा प्रश्न असा आहे की, दोन्हीही मते खरी असण्याचा संभव आहे. नुसतीच दोन मते असतात असे नव्हे, तर एखादे वेळी दोन्हीही मते बरोबर असण्याचा संभव असतो. म्हणून तर लोकशाहीची गरज आहे. मी म्हणतो तेच बरोबर आहे आणि तुम्ही म्हणता ते बरोबर नाही असे असेल तर मग तुमची आणि माझी लोकशाही राहत नाही. मग मीच सांगणारा कोणी तरी आहे आणि तेच खरे झाले पाहिजे अशी "च" ची भाषा येते आणि मग ती हुकूमशाही होते. माझेही बरोबर आहे आणि तुम्ही म्हणता तेही कदाचित बरोबर असण्याचा संभव आहे, असे जर मी गृहीत धरले तर तुमच्यात आणि माझ्यात संभाषण शक्य होते. नाही तर संभाषणाचे कारण काय? मग फक्त आज्ञाच करावयाची. लोकशाहीमध्ये आज्ञा नाही. लोकशाहीमध्ये डायलॉग आहे, संभाषण आहे. विचारांची आणि मतांची देवाणघेवाण आहे हे आपण विसरता कामा नये.

स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीच्या काळात आपण काँग्रेसचे जे काम करीत होतो ते एका अर्थाने सोपे होते. इंग्रजांशी लढावयाचे एवढाच प्रश्न त्या वेळी प्रामुख्याने काँग्रसपुढे होता. त्यामध्ये मतभेदाला फारसा वाव नव्हता. १९३० साली पंधरा-सोळा वर्षांचा असताना मी काही पंडित होतो किंवा मला शहाणपण आले होते अशातला भाग नव्हता. पण इंग्रजांशी आपणांस लढावयाचे आहे हा मी माझ्या मनाशी पक्का निर्णय घेतला होता. त्या वेळच्या भाषणांतून मी हे लोकांना सांगत असे. हे सांगण्यासाठी कुठल्याही ग्रंथाची जरुरी नव्हती. मन पेटले होते. इंग्रजी सत्तेच्या बाजूस असणारा प्रत्येक माणूस मग तो कितीही मोठा अगर विद्वान असो, महामूर्ख असला पाहिजे अशी माझ्या मनाची पक्की खात्री होती. परकीय सत्तेविरुद्ध लढा

देणे हेच कार्य प्रामुख्याने त्या काळी काँग्रसपुढे असल्यामुळे ते कार्य करताना आपल्या निर्णयासंबंधी मन द्विधा होण्याचा फारसा संभव नव्हता. या अर्थाने त्या वेळचे काँग्रेसचे कार्य सोपे होते. पण ते तितकेच अवघडही होते. कारण पूर्वीच्या काळी काँग्रेसचा कार्यकर्ता बनणे म्हणजे क्लेश सहन करणे होते, त्याग करणे होते. हे कार्य करताना त्या काळी काही द्यावे लागत असे, काही भोगावे लागत असे, आणि म्हणून पुष्कळ वेळा जुने कार्यकर्ते आता काय, काँग्रेसचे कार्य करणे सोपे झाले आहे असे म्हणत असतात. एका अर्थाने ते खरेही आहे. कारण ज्या अर्थाने पूर्वी काँग्रेस कार्यकर्त्याला त्याग करावा लागे, भोगावे लागे तशा प्रकारची परिस्थिती आज राहिलेली नाही. पण लोकसेवेचे काम अंगावर घेतलेल्या माणसाला नेहमीच दुःख भोगले पाहिजे अशा प्रकारची परिस्थिती असणे योग्य ठरेल काय? ही परिस्थिती बदलावी म्हणून तर आम्ही स्वराज्याकरिता प्रयत्न केला. आत ही परिस्थिती बदलली आहे त्याबद्दल आपल्याला खरोखरी आनंद वाटला पाहिजे.

पण मला आपल्याला सांगितले पाहिजे की, काँग्रेसचे आजचे काम काही लोकांना वाटते तितके सोपे राहिलेले नाही. एका अर्थाने ते आता बरेच अवघड झालेले आहे. पूर्वीच्या काळी आपल्या कामासंबंधी आपण जो निर्णय घेत होतो त्याबाबत आपण अगदी निःशंक होतो. आपल्या निवडीला त्या वेळी फारसा वाव नव्हता. आज तशी परिस्थिती राहिलेली नाही. आता आपल्याला अनेक कामांतून आपल्या कामाची निवड करावयाची आहे. हे काम केव्हाही अवघड आहे. पण काँग्रेसचे काम करीत असताना तुम्ही जेव्हा अधिकारपदावर जाल, जबाबदारीच्या पदावर जाल, त्या वेळी हे काम विशेष अवघड असल्याचे तुम्हांला आढळून येईल. कारण मग मी बांध बांधण्याच्या कामाला प्राधान्य देऊ की विहिरी बांधण्याच्या कामाला प्राधान्या देऊ, समुद्रकाठच्या कामाला अधिक महत्त्व देऊ की डोंगरकाठच्या कामाला अधिक महत्त्व देऊ, शेतीचे काम मी अधिक लक्ष देऊन करू की औद्योगिक क्षेत्राच्या कामाला मी अधिक प्राधान्य देऊ, अशा प्रकारच्या मन द्विधा करणाऱ्या परिस्थितीतून तुम्हाला आपले निर्णय घ्यावे लागतील.

हे काम तितके सोपे नाही, आणि आपल्या कामाच्या कक्षा आणि आपल्या साधनांच्या मर्यादा एकदा का लक्षात आल्या म्हणजे मग हे सर्वच प्रश्न अवघडातले अवघड होऊन बसतात असे आपल्याला दिसून येईल.

दैनंदिन कामाची आखणी करून त्याची अंमलबजावणी करण्याचे काम आज सत्तेने स्वीकारले असून अशा सत्तेचा कारभार चालविण्याजी जिम्मेदारी आपल्या पक्षाने घेतलेली आहे. आपला पक्ष आज कर्ता पक्ष आहे. सामान्य माणसाच्या भाषेत तो आज कर्तासवरता, कारभारी पक्ष झाला आहे, आणि म्हणून त्याच्या कामाची पद्धत आता आपण बदलली पाहिजे. ती बदलत चालली आहे हे निश्चित. ती कशी बदलत चालली आहे हे आपण सांगू शकाल. माझ्या शेजारीच आपल्या प्रदेश काँग्रेस कमिटीचे पूर्वीचे अध्यक्ष श्री. आबासाहेब खेडकर बसले आहेत. ते फार अनुभवी गृहस्थ असून एका काळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्षपद त्यांनी यशस्वी रीतीने भूषविलेले आहे. ते मला सांगत होते की, या जिल्ह्यातील आमदार मोठे हुषार आहेत. तालुक्यातालुक्यातले प्रश्न सचिवालयात नेऊन कसे, केव्हा पोहोचवितात याचा पत्ता लागत नाही. हे एक आपल्याला प्रशस्तीपत्रच आहे. आपला जिल्हा मुंबईच्या इतक्या जवळ आहे की, मुंबईचे सचिवालय हे आपल्या जिल्ह्यात नाही असे आपण म्हणू शकणार नाही. परंतु जो विषय मी आपणाला सांगत होतो तो म्हणजे आपल्या कामाचे स्वरूप जसे बदलत चालले आहे त्या दृष्टीने आमच्या काँग्रेस कमिटीच्या कामाची दिशा बदललेली आहे किंवा नाही? माझी स्वतःची काँग्रेस संघटनेसंबंधीची कल्पना मी आपणाला सांगू इच्छितो. आपल्या कामाची दिशा आता अशी बदललेली आहे की, त्यामध्ये आता विशिष्टीकरण – स्पेशालायझेशन – आले आहे. हे विशिष्टीकरण या अर्थाने आले आहे की, काँग्रेसचे कार्यकर्ते म्हणून तुम्ही एकत्र बसल्यानंतर जे अनेकविध प्रश्न निघतात त्या वेळी आपल्या जिल्ह्यातील प्रश्नांवर अधिकारवाणीने तुम्हाला बोलता आले पाहिजे. उदाहरणार्थ, दिल्लीला महाराष्ट्रातील माझ्या अनुभवातले, माझ्या नित्याच्या कामातले काही प्रश्न निघाले तर मी माझे मत झटदिशी देऊ शकतो. मग तो सहकाराचा प्रश्न असो, शेतीचा प्रश्न असो, राजकीय स्वरूपाचा प्रश्न

असो, कृषि-औद्योगिक कार्यक्रमाचा असो किंवा औद्योगिक क्षेत्रातील कामगार (हिताचा) असो. अनुभवामुळे आत्मविश्वासानें बोलता येते व निर्णय घेणे सोपे जाते. आजच्या लोकजीवनातील अशा प्रकारच्या अनेकविध प्रश्नांशी आपला संपर्क आहे की नाही हे आता आपण पाहिले पाहिजे.

काँग्रेस आज अधिकारपदावर आहे. पण शेवटी काँग्रेस ही जी संघटना आहे, जिल्हा संघटना आहे, तिचे काम कोणते ? जिल्हा काँग्रसचे व जिल्हा परिषदेचे नाते काय ? जुन्या पिढीच्या परिभाषेत बोलावयाचे म्हणजे हे नाते पितापुत्रांचे आहे. याचा अर्थ असा की, कार्याची आखणी आणि मार्गदर्शन करून कामामध्ये माणसे गुंतविण्याचे काम जिल्हा काँग्रसचे आहे. जिल्हा परिषदेत कोणी जावे, विधान सभेमध्ये कोणी जावे, सहकार-क्षेत्रामध्ये कोणी काम करावे, मच्छीमार समाजातील लोकांत कोणी काम करावे, आदिवासी लोकांत कोणी काम करावे, औद्योगिक क्षेत्रात कोणी काम करावे, हे ठरविण्याचे काम जिल्हा काँग्रेसचे आहे. नुसत्या शेतीचाच प्रश्न घ्या. त्यालाही अनेक अंगे आहेत. समुद्रकाठच्या शेतीच्या प्रश्नांची माहिती असणारा मनुष्य, डोंगरकाठच्या शेतीच्या कामासंबंधाने अधिकारवाणीने मत देऊ शकेलच असे खात्रीपूर्वक सांगता येणार नाही. कोकणच्या शेतीची माहिती असणारा मनुष्य, खानदेशच्या शेतीच्या प्रश्नासंबंधाने निश्चित मत देईल हे खरे नाही. द्राक्षाचे उत्तम मळे करणारा उसाची चांगली शेती करील ही खात्री नाही. चांगला भात पिकविणारा अशी ज्याची ख्याती आहे तो चांगला गहू पिकवू शकेल याची हमखास खात्री देता येणार नाही. किसानांत काम करणारा कार्यकर्ता किंवा आदिवासींत जाऊन चांगल्या जिव्हाळ्याने काम करणारा कार्यकर्ता अंबरनाथच्या किंवा कल्याणच्या मैदानात उभा राहून त्या उद्योगक्षेत्रातील कामगारांना आकर्षित करील अशी खात्री नाही. मी हे अशाकरिता सांगतो आहे की, आता विशिष्टीकरणाचे युग सुरू झालेले आहे. अनुभवाचे, ज्ञानाचे, कामाच्या पद्धतीचे आता विशिष्टीकरण सुरू झाले आहे. संघटनेमध्ये नवे कार्यकर्ते घेताना या सर्व गोष्टींचा आता विचार झाला पाहिजे. कार्यकर्त्यांना निव्वळ क्रियाशील कार्यकर्त्याचा अर्ज भरून आता चालणार नाही. प्रत्यक्षात

संघटनेपुढे, समाजापुढे जे प्रश्न आहेत त्यांपैकी कुठल्या प्रश्नात जिल्हा काँग्रेसला त्यांची मदत होईल, असे कोणते विशिष्टीकरण, अनुभवाचे, विचाराचे किंवा सतत संपर्काचे त्यांच्याजवळ आहे की त्याच्या बळावर त्या त्या क्षेत्रातील माणसे ते जमा करू शकतील, या प्रश्नांचा आता विचार झाला पाहिजे. सुरुवातीला मी जे म्हणालो की कामाच्या स्वरूपामध्ये आता बदल झालेला आहे तो या अर्थाने होय. हा जो बदल झालेला आहे त्याची जाणीव तुम्हा-आम्हाला आता सतत असली पाहिजे.

मला माहीत आहे की आमच्या पाठीमागची पिढी आता राजकारणामध्ये कर्तृत्ववान व्हावयास लागली आहे. ती तशी झाली पाहिजे असा आमचा आग्रह आहे. तिला आम्ही शक्ती दिली पाहिजे, सामर्थ्य दिले पाहिजे. परंतु आपल्यापुढे प्रश्न हा आहे की, ही जी नवीन पिढी उगवते आहे तिच्यामध्ये मी आता म्हटल्याप्रमाणे निरनिराळ्या प्रकारचे विशिष्टीकरण आणण्याचा आम्ही प्रयत्न करतो आहोत किंवा नाही ? त्यासाठी लागणारी शक्ती, मनाची तयारी आम्ही तिच्यामध्ये निर्माण करतो आहोत किंवा नाही ? सरकार चांगले चालावे म्हणून खात्यांची जशी वाटणी करतात तशीच आपल्या कामाची वाटणी करण्याची आता वेळ आलेली आहे. आता आम्हाला आमच्या कामाची वाटणी जिल्हावार, तालुकावार करावी लागेल. जिल्हा परिषदा व पंचायत कमिट्यांच्या कामापुरतेच विकेंद्रीकरण करण्याची गरज आहे असे नव्हे, तर संघटनात्मक कामाच्या क्षेत्रामध्ये सुद्धा आता हे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये वेगवेगळ्या प्रकारची माणसे पेरून त्यांच्या शक्तीचा जास्तीत जास्त उपयोग कसा करून घेता येईल, त्यांना जास्तीत जास्त संधी कशी मिळेल या दृष्टीने आपण आता प्रयत्न केला पाहिजे. कोणी कामगार आघाडीवर काम करतील, कोणी सहकाराच्या क्षेत्रात काम करतील, तर कोणी इतर क्षेत्रांत काम करतील; पण आपण लक्षात ठेवले पाहिजे की, आपला पक्ष राजकीय असला तरी त्याला जिल्ह्यातले आर्थिक व सामाजिक प्रश्न सोडवावयाचे आहेत. हे प्रश्न निव्वळ राजकीय स्वरूपाचे नाहीत. या सगळ्या प्रश्नांची दखल घेऊन त्यासंबंधी मार्गदर्शन करण्याची जबाबदारीही आपल्यावर आहे. ही जबाबदारी पार पाडावयाची

असेल तर आपल्याला जिल्हावार आर्थिक व सामाजिक पाहणी करावी लागेल आणि जिल्ह्यातले जे प्रश्न असतील त्यांसंबंधी योजनांची आखणी करून हे काम निरनिराळ्या कार्यकर्त्यांकडे सोपवावे लागेल. जेथे कार्यकर्त्यांमध्ये मतभेद असतील तेथे हा प्रयोग आपण जरूर करून पाहावा. दुसऱ्यांना संधी आहे आणि आपल्याला नाही ही भावना एकदा निर्माण झाली की, संघर्ष अटळ ठरतो. परंतु आपल्याकडे कामाची इतकी विविध क्षेत्रे आहेत की, आपल्याकडे कितीही कार्यकर्ते असले तरी अशा प्रकारचा संघर्ष निर्माण होऊ नये. कार्यकर्त्याच्या शक्तीप्रमाणे आणि अनुभवाप्रमाणे आपण त्यांच्यामध्ये हे सर्व काम वाटून दिले, तर मला वाटते हे काम आपणाला सोपे जाईल. याचा अर्थ आपण कागद घेऊन वसा व सहकार, शेती, उद्योग, शिक्षण, कामगार अशी टेबले आखून माणसांची यादी करा असा नाही. ते आपल्याला अनुभवाने ठरवावे लागेल. परंतु आम्ही जर आपापल्या जिल्ह्यातील काँग्रेसच्या कार्यकर्त्यांत अशा प्रकारचा प्रयोग करू शकलो तर मला वाटते आपण एक अत्यंत प्रभावी संघटना उभी करू शकू.

आपल्याकडे निवडणुकी आल्या की आपण जागे होतो. मग कोण कोण कार्यकर्ते आहेत, कोणा कोणाच्या मनात वार्शिंग बांधावयाचे आहे याचा शोध सुरू होतो. परंतु अशी परिस्थिती असणे उपयोगाचे नाही. ग्रामीण पद्धतीने सांगावयाचे झाले तर पहिलवान असा तयार असला पाहिजे की, सांगेल तेव्हा तो कुस्तीला उभा राहिला पाहिजे. अगोदर करार करून आणि मग खुराक खाऊन अमक्या अमक्या तारखेला कुस्ती लढतो असे म्हणणे ही कुस्ती नव्हे. बोलणे झाल्याबरोबर अर्ध्या तासाच्या आत तो मैदानात आला पाहिजे आणि कुस्ती झाली पाहिजे. अशा प्रकारची काँग्रेस पक्षाची किंवा कोठल्याही पक्षाची तयारी असली पाहिजे. एकपक्ष लोकशाही हे काही आपले ध्येय नाही. देशामध्ये जे विविध पक्ष आहेत ते चालत राहणार आहेत. संसदीय लोकशाही चालवावयाची असेल तर याशिवाय मला दुसरा मार्ग दिसत नाही. अर्थात विरोधी पक्ष वाढण्यासाठी मी थोडीच त्यांना मदत करणार आहे ? ते त्यांच्या शक्तीने वाढतील. पण ते तसे वाढावेत असेमात्र मला वाटते. केव्हाही निवडणूक लढविण्याची तयारी

असली म्हणजे मग निवडणूक हे एक विलक्षण संकट आहे किंवा पाठीमागे लागलेली ती एक मोठी उपाधी आहे किंवा एक मोठा बोजा आहे असे आपल्याला वाटणार नाही.

काँग्रेसचे स्वरूप आता बदलत आहे असे मी म्हणतो त्याचा अर्थ देशापुढे असलेल्या कामात आता बदल झाला आहे. काँग्रेसमध्ये आता बदल व्हावयास पाहिजे याचा अर्थ काळामध्ये आता बदल झालेला आहे, परिस्थितीत आता बदल झालेला आहे, आणि म्हणून देशासाठी काम करणाऱ्या काँग्रेसच्या कामामध्ये, तिच्या स्वरूपामध्ये, तिच्या कार्यक्रमामध्ये आणि तिच्या कार्यपद्धतीमध्ये आता बदल झाला पाहिजे. मी आपल्यापुढे हा एक मूलभूत विचार मांडतो आहे. माझी खात्री आहे की, हे आपण करू शकलात तर आपण अधिक महत्त्वाची कामगिरी पार पाडू शकू. उदाहरणार्थ, आपला ठाणे जिल्हाच घ्या. आजचा ठाणे जिल्हा हा १९६० चा ठाणे जिल्हा राहिलेला नाही. त्याच्या जीवनामध्ये आज नवीन सामाजिक शक्ती निर्माण झालेल्या आहेत. या जिल्ह्यात आद्योगीकरण झपाट्याने पुढे चालले आहे. एक नवीन कामगार-जीवन येथे उभे राहिले आहे. एक नवीन जागृत शेतकरी समाज येथे निर्माण झाला आहे. मुंबई जवळ असल्यामुळे शिक्षणाचा प्रसारही या जिल्ह्यामध्ये पुष्कळच प्रमाणात झालेला आहे. ज्याला आपण उपनगरे म्हणतो अशा प्रकारची अनेक नवी नवी शहरे या जिल्ह्यात पसरत चालली आहेत. येथील आदिवासी आता पुष्कळच बदलला असून त्यामध्ये आता नवीन जागृती निर्माण झाली आहे, त्यामध्ये एक नवीन अभिमानाची भावना निर्माण झाली आहे. ठाणे जिल्ह्याचा पूर्वी आम्ही दोन तऱ्हेने विचार करीत असू. पश्चिम रेल्वेवरचा ठाणे जिल्हा काय म्हणतो आणि कल्याणचा ठाणे जिल्हा काय म्हणतो. आता हे काम इतके सोपे राहिलेले नाही. आता अशी वाटणी करून चालणार नाही. जे वसईमध्ये बोलले जाते तेच नेमके डहाणूमध्ये बोलले जाईल अशी खात्री नाही किंवा जे आज भिवंडीमध्ये बोलले जाईल तेच तुमच्या वाड्यामध्ये बोलले जाईल अशी खात्री नाही. वाड्याचे प्रश्न वेगळे आहेत, वाड्याच्या मागण्या वेगळ्या आहेत. त्याचप्रमाणे भिवंडीचे प्रश्न

वेगळे आहेत, आणि त्यांच्या मागण्याही वेगळ्या आहेत, आणि या दोहोमध्ये असणाऱ्या गावांचे प्रश्न आणि त्यांच्या मागण्या याही आता बदललेल्या आहेत. प्रत्येक ठिकाणी परिस्थिती वेगळी आहे. तेव्हा हें जे सगळे समाजाचे प्रश्न आहेत त्यांचा आता आपल्याला विचार करावा लागेल. समाजाच्या आकांक्षा पाहाव्या लागतील आणि हे सर्व पार पाडण्यासाठी आपले कोणते कार्यकर्ते तयार आहेत हेही पाहावे लागेल. ही जागरूकता आता आपण सतत ठेवली पाहिजे. या पद्धतीनें आपण जर काम करू शकलो तर मला वाटते आपले काम अधिक सोपे होईल.

आपल्या जिल्ह्यात आज जे नवीन प्रश्न निर्माण झाले आहेत त्यांच्या बाबतीत आता आपल्याला अधिक लक्ष घालावे लागेल. विशेषतः आदिवासींचा प्रश्न हा या जिल्ह्यातील फार महत्त्वाचा प्रश्न असून त्याचबरोबर आपल्या जिल्ह्यात औद्योगिक क्षेत्राची जी झपाट्याने वाढ होत आहे त्या क्षेत्रातील कामगारांचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा होऊन बसणार आहे. या दोन्ही क्षेत्रांत आपण जागृत राहून संघटना केली तर आपले काम फारसे अवघड राहणार नाही. विशेषतः कामगारक्षेत्रामध्ये आपल्याला खूपच मोठे प्रयत्न करावे लागणार आहेत. कारण ज्याला आपण गतिमान वर्ग म्हणून म्हणतो असा तो एक मोठा गतिमान व क्रियाशील असा वर्ग आहे. मी तर असे म्हणेन की, तो फार सामर्थ्यवान वर्ग आहे. कारण संघटित रीत्या संपत्ती उत्पादनाचे काम तो करीत असतो आणि त्याच्या डोळ्यांना हे सर्व दिसत असते. तो जास्त जागृत असतो याचे कारण त्याच्या शक्तीने जग कसे बदलते आहे, संपत्ती कशी निर्माण होते आहे आणि आपले स्वतःचे सामर्थ्य किती मोठे आहे याची त्याला जाणीव असते. अशा प्रकारचा आपल्या सामर्थ्याचा माणसाला एकदा प्रत्यय आला की, मग त्याची क्रियाशीलता वाढत जाते. आपल्या हातून काही घडणारच नाही अशा भावनेने पुष्कळशी माणसे मरगळलेली असतात, समाज मरगळलेले असतात. पण आपल्या हातूनही हे घडू शकते, ते घडू शकते असा प्रत्यय आला की माणसाच्या चेहऱ्यावर एक वेगळे तेज दिसू लागते. अशाच प्रकारची जागृती कामगारांच्या मनात निर्माण झालेली असते. आपल्या

संघटित प्रयत्नाने निर्माण झालेली संपत्ती तो पाहत असतो. एवढेच नव्हे तर ती संपत्ती थोड्याच लोकांच्या हातात जाऊन ते कसे मोठे होतात हेही तो आपल्या डोळ्याने पाहत असतो. स्वतःच्या सामर्थ्यासंबंधी त्याचे मन जागृत असल्यामुळे आपल्या सामर्थ्याचा दुसरा गैर उपयोग करतो आहे याची जाणीव होताच त्याच्या प्रतिकाराकरिता तो ठाम उभा राहतो. असा हा कामगारांचा वर्ग तुमच्या जिल्ह्यामध्ये वाढत आहे, वाढणार आहे. पण हा कामगार ठाण्याच्या पूर्वीच्या परंपरेतून वाढलेला असेलच असे नाही. तो महाराष्ट्राच्या इतर भागांतून, कदाचित हिंदुस्थानच्या वेगवेगळ्या भागांतूनही आलेला असेल. आपला समाज एकजिनसी समाज बनावा म्हणून ज्या काही प्रक्रिया आपल्या देशात चालू आहेत त्यांतलीच ही एक प्रक्रिया आहे. तेव्हा या सगळ्या बदललेल्या परिस्थितीकडे लक्ष देऊन, बदललेले वातावरण लक्षात घेऊन, आपली धोरणे, आपल्या कामाच्या पद्धती, आपल्या कामाच्या संघटनेचे स्वरूप आपण वारंवार तपासले पाहिजे आणि काम करीत राहिले पाहिजे. हे जर आपण करीत राहिलो तर मला वाटते काँग्रेस ही एक फार मोठी पुरोगामी शक्ती होईल. काँग्रेस ही एक समर्थ शक्ती आहे, तो एक मोठा सामर्थ्यवान पक्ष आहे एवढेच काँग्रेसचे वर्णन आम्हास पुरेसे वाटता उपयोगी नाही. तर आम्ही पुरोगामी आहोत आणि समाजाच्या ज्या पुरोगामी मागण्या आहेत त्या मान्य करून घेण्याची शक्ती आमच्यात आहे आणि आमचा तो विचार आहे असे काँग्रेसचे वर्णन आम्हाला करता आले पाहिजे. अशा प्रकारचा काँग्रेस पक्ष आपल्याला आता संघटित करावयाचा आहे.

महाराष्ट्रातील काँग्रेस ही एक पुरोभागी काँग्रेस मानली जाते, सामान्य माणसाचे प्रतीक असलेली काँग्रेस मानली जाते आणि अजूनही या काँग्रेस-मध्ये जी थोडीफार शक्ती आहे त्याचे खरे कारण असे आहे की, अशा प्रकारची दृष्टी ठेवण्याचा आम्ही प्रयत्न करतो आहोत. आज मध्यम वर्गाचे, किसानांचे, आदिवासींचे आणि असेच इतर जे प्रश्न आहेत त्याबाबत आम्ही जागृत राहिले पाहिजे. थोडक्यात म्हणजे ज्याला आमचे काकासाहेब गाडगीळ 'नाहीरेवाले' म्हणत, त्या नाहीरेवाल्यांतर्फे आम्ही

आमचा आवाज उठविला पाहिजे. ही भावना आम्ही आमच्या मनात नित्य ठेवली पाहिजे. या बाबतीत आपण चूकभूल केली तर मी आपल्याला सांगू इच्छितो की, काँग्रेसमध्ये काँग्रेसपण राहणार नाही. काँग्रेसची पाटी राहील कदाचित, पण मला काँग्रेसच्या पाटीचे महत्त्व वाटत नाही. प्रश्न असा आहे की, काँग्रेसचे काँग्रेसपण कशात आहे ? काँग्रेसचे काँग्रेसपण यात आहे की, तिच्या संघटनेमध्ये गरिबीविरुद्ध, विषमतेविरुद्ध, अन्याया-विरुद्ध बंड करण्याची शक्ती असणारी माणसे आहेत. पण त्यासाठी बंड केले पाहिजे किंवा विरोधी मैदानात उभे राहिले पाहिजे असेही नाही, तर आपल्या कामाच्या जबाबदारीची आखणी करून ती पार पाडण्याची जी एक वृत्ती आहे त्या वृत्तीत काँग्रेस आहे आणि याच वृत्तीत काँग्रेसचे पुरोगामित्व व तिच्या वाढीची बीजे आहेत. ही बीजे आमच्या विचारामध्ये, आमच्या संघटनेमध्ये, आमच्या कामामध्ये, आहेत की नाहीत ही खरी महत्त्वाची गोष्ट आहे. सत्तेवर कोण आहे आणि अधिकारपदावर कोण आहे याला फारसे महत्त्व नाही. लोकशाहीच्या जमान्यात आज आहे तो उद्या नाही. आणि जोपर्यंत लोकशाही आहे तोपर्यंत हे असेच चालत राहणार आहे. काळ सारखा बदलतो आहे. त्यामुळे अधिकारपदावर कोण आहे ही बाब फारशी महत्त्वाची नसून अधिकारपद मिळविण्यासाठी विचारांची जी शक्ती लागते ती आमच्यामध्ये आहे की नाही आणि अधिकार हातात आल्यानंतर तो जनतेच्या कामाकरिता वापरण्याची बुद्धी आमच्यामध्ये आहे की नाही ही खरी महत्त्वाची कसोटी आहे. आमच्यामध्ये ही मूळ दृष्टी जोपर्यंत जागी आहे तोपर्यंत कसल्याही संकटाची भीती नाही. इकडे तिकडे थोड्या चुका होतील. पण लहानसहान चुकांना फारसे महत्त्व नाही. एखादे वेळी निर्णयामध्येही चूक होईल, पण चुका न करण्याची आम्ही शपथ घेतलेली नाही. चुका या होत राहणारच. परंतु त्या अजाणतेपणी घडल्या किंवा चुकून घडल्या तर त्या क्षम्य ठरतील. काँग्रेस-मध्ये बाकीचे इतर बदल झालेले असले तरी तिचे जे मूळ सूत्र आहे ते बदललेले नाही, बदलता काम नये. गांधीजींची, लोकमान्यांची आणि सत्तेवर येण्यापूर्वीच्या नेहरूंची काँग्रेस अशी होती की, समाजात बदल

घडवून आणण्यासाठी लागणाऱ्या संघर्षाचे ती प्रतीक बनली होती. त्यासाठी लागणाऱ्या शक्तीची बीजे त्या वेळच्या काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आणि त्यांच्या कामामध्ये दिसत होती. ती बीजे आज आमच्यामध्ये आहेत की नाहीत हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

डॉक्टर रोग्याला तपासून पाहतो तेव्हा प्रथम तो काय पाहतो ? स्टेथॉस्कोप वगैरे तो नंतर लावतो. प्रथम तो रोग्याच्या नाडीवर हात ठेवतो आणि ती सुरक्षित आहे की नाही हे पाहतो, आणि नंतर मग रोग्याला काय झाले आहे, काय होणे शक्य आहे याचा तो विचार करतो. मला कोणी एखाद्या काँग्रेसवाल्याची परीक्षा करावयास सांगितली तर प्रथम मी त्याची नाडी तपाशीन, म्हणजे त्याच्यामध्ये जिद्द आहे की नाही हे मी प्रथम पाहीन. तो हुषार असेल पण त्याच्यात जिद्द नसेल तर त्याचे काँग्रेसप्रेम माझ्या उपयोगाचे नाही. जुनी एक कहाणी सांगतात की, रामाला युद्धात विजय मिळाला आणि लंकेहून परत आल्यानंतर सीतामाईने हनुमानाला नवरत्नांचा हार दिला. त्याने तो हातात घेतला आणि त्या नवरत्नांतले प्रत्येक रत्न त्याने दाताने फोडले. सीतामाईने ते पाहिजे आणि त्याला ती म्हणाली, 'शेवटी वानर तो वानरच. तुला मी नवरत्नांचा हार दिला त्याचे तू हे काय केलेस ? कशाकरिता तू ही रत्ने फोडलीस ?' तेव्हा त्याने उत्तर दिले, 'या नवरत्नांत कोठेतरी आत राम आहे की नाही ते मी पाहिले. आणि त्यात जर राम नसेल तर या नवरत्नांचा मला काय उपयोग आहे ?' त्याचप्रमाणे कोणत्याही काँग्रेसवाल्यामध्ये अन्यायाविरुद्ध लढण्याची, गरिबीविरुद्ध लढण्याची, विषमतेविरुद्ध लढण्याची जिद्द आहे की नाही, या सर्व गोष्टींसंबंधी त्याच्या मनात तिरस्कार आहे की नाही, त्याविरुद्ध झगडण्याची त्याच्या मनात ईर्षा आहे की नाही हे मी पाहीन. ही जिद्द, ही ईर्षा जर त्याच्यात नसेल तर माझ्या मताने तो मृत काँग्रेसवाला आहे. तो सत्तेवर असेल, अधिकारपदावर असेल, किंवा तो मोठाही असेल परंतु त्याच्या मनात जर ही जिद्द नसेल तर आपल्याला त्याचा काही उपयोग नाही. काँग्रेस वाढणार असेल तर ती या जिद्दवाल्या लोकांच्या कामामुळे वाढणार आहे आणि जिवंत राहणार आहे. निवडणूक जिंकणे न जिंकणे ही फारशी

महत्त्वाची गोष्ट नाही. लोकशाहीमध्ये निवडणुकींना जरूर महत्त्व आहे आणि त्या आम्ही जिंकूही, पण तो सहज धर्म झाला पाहिजे. सहज जाता जाता आम्ही ही गोष्ट केली अशा प्रकारे ती घडली पाहिजे.

आज आपली सर्वांची भेट झाल्यामुळे मला अतिशय आनंद झाला. या जिल्ह्यातील काँग्रेस कमिटीसमोर मी आज बोलत होतो म्हणून पुन्हा कधी जर मी जिल्हा काँग्रेसचा अध्यक्ष झालो—आता तशी माझी इच्छा राहिलेली नाही—तर मी काँग्रेस संघटना नव्याने रचावयाचा कसा प्रयत्न करीन यासंबंधीचे माझ्या मनात जे काही विचार होते ते मी आपल्यापुढे मांडले. आपण ते स्वस्थ चित्ताने ऐकून घेतलेत त्याबद्दल मी आपला आभारी आहे. जयहिंद.

—•—

ठाणे जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यकर्त्यांची सभा, ठाणे, दि. २४-४-५६.

३० आर्थिक प्रश्नांचे राजकीय स्वरूप

पंतप्रधानांनी आपल्या टिपणात ज्या प्रश्नांचा व बाबींचा उल्लेख केला आहे ते सर्व प्रश्न व बाबी लक्षात घेऊन देशातील एकूण आर्थिक परिस्थितीचा आपण तपशीलवार व सांगोपांग विचार केला. आपल्यापुढे असलेल्या ठरावास अनुमोदन देणे एवढेच माझे काम असल्याने, आतापर्यंत येथे जे बोलले गेले त्याची मी पुनरुक्ती करू इच्छित नाही. पण या ठरावाच्या पार्श्वभूमीवर काही स्थूल विचार मांडण्याचा आणि थोडेसे धाष्टर्य करून आपल्या आर्थिक प्रश्नांची राजकीय बाजू विशद करण्याचा माझा विचार आहे. आपला हा पक्ष आर्थिक तज्ज्ञांची किंवा विशुद्ध शास्त्रीय दृष्टिकोणातून अर्थशास्त्राचा विचार करणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांची संस्था नसून आर्थिक प्रश्नांचा राजकीय दृष्टिकोणातून विचार करणाऱ्या राजकारणी लोकांची ही एक संघटना आहे. लोकांचीही मला वाटते या बाबतीत आपल्याकडून हीच अपेक्षा आहे. गेल्या सात-आठ वर्षांच्या काळात आमचे जे विचारमंथन चालू आहे ते पाहण्याचा, या पक्षाचा एक सभासद आणि भारतीय राजकारणाच्या कार्यक्षेत्रातील एक कार्यकर्ता म्हणून मी जेव्हा प्रयत्न

करतो तेव्हा आर्थिक प्रश्नांसंबंधीची चर्चा, त्यासंबंधीचे वादविवाद आणि संभाषणे याच गोष्टी या काळात सातत्याने व अखंडपणे चालू आहेत असे मला आढळून येते. आपण वरचेवर एकत्र जमतो, चर्चा करतो आणि काही निर्णय घेऊन ठराव पास करतो. आपल्यापुढे असणाऱ्या प्रश्नांचे आपल्याला उत्तर मिळाले अशी त्या वेळी आपली भावना होते आणि आपण परत जातो. पण आपले निर्णय कृतीत आणण्याचा जेव्हा आपण प्रयत्न करतो तेव्हा आपल्या हाती काहीच लागलेले नाही असे आपल्याला समजून येते, आणि पुन्हा आपल्या विचारविनिमयाला सुरुवात होते. यात अस्वाभाविक असे काहीच नसले तरी या बाबतीत आपण आपली प्रतारणा तर करीत नाही ना, की हे सर्व प्रश्नच एखाद्या मृगजळासारखे आहेत असे मी स्वतःला पुष्कळ वेळा विचारतो. पण विचारांती ही शंका खरी नसल्याचे मला आढळून येते. कारण हे प्रश्नच असे आहेत की, ते सतत चालू राहणारे असून त्यांवर तोडगा शोधून काढण्याचा आपल्याला सतत प्रयत्न करावा लागणार आहे. एखादा प्रश्न सोडविण्याचा आपण जेव्हा प्रयत्न करतो तेव्हा त्यातून अनेक नवे नवे प्रश्न निर्माण होत असतात. समाजाची वाढ ही अशाच प्रकारे होत असते, आणि म्हणून आर्थिक प्रश्नांच्या बाबतीत एक राजकीय पक्ष म्हणून आपला दृष्टिकोण कधीही स्थितिनिष्ठ असता कामा नये.

आपण आर्थिक प्रश्न हाताळीत असतो तेव्हा खरे म्हणजे आपण मनुष्यमात्रांनाच हाताळीत असतो. अशा प्रश्नांची उकल करताना साहजिकपणेच या प्रश्नांतला माणूस हा घटक प्रामुख्याने लक्षात घेणे आवश्यक असल्यामुळे केवळ तज्ज्ञांनी किंवा शास्त्रज्ञांनीच सोडविले पाहिजेत असेच हे प्रश्न नाहीत. आपल्यापुढे पंतप्रधानांनी हे जे टिपण ठेवलेले आहे त्याचेही अगदी शास्त्रशुद्धरीत्या परिष्करण झाले आहे असे, मला वाटते, खुद्द पंतप्रधानसुद्धा म्हणू शकणार नाहीत. केवळ शासनालाच नव्हे किंवा केवळ आपल्या पक्षालाच नव्हे तर सबंध देशाला ज्या प्रश्नांची उत्तरे शोधूनही अद्यापि सापडलेली नाहीत अशा काही निकडीच्या प्रश्नांची तड लावण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्याकूळ मनाचे हे टिपण म्हणजे एक

वक्तव्य असून त्यात देशातील आर्थिक परिस्थितीचे प्रामाणिक मूल्यमापन केलेले स्पष्टपणे दिसत आहे.

आपल्यापुढील ठराव काय आहे? ठरावावरोबर देण्यात आलेल्या या टिपणात आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीची दखल घेतली असल्याचे आपल्याला आढळून येईल. ती म्हणजे तत्त्वांची किंवा सिद्धान्तांची भाषा बोलून आता भागणार नसून या प्रश्नांच्या सर्वच तपशिलात शिरण्याची फार आवश्यकता आहे. पंतप्रधानांच्या या टिपणातील निरनिराळे मुद्दे आपण संगतवार पाहिले म्हणजे आपल्या ध्यानात येईल की, तात्त्विक विवेचन करण्याचाच केवळ त्यात प्रयत्न केलेला नसून निरनिराळ्या अवस्थांत असणाऱ्या ज्या प्रश्नांना देशाला व शासनाला आज तोंड द्यावे लागत आहे अशा काही मूलभूत प्रश्नांची आणि त्यांच्या दृश्य स्वरूपांची त्यात नोंद घेण्यात आलेली आहे. उदाहरणार्थ, राजविधिबद्ध (कार्पोरेट) संस्थांच्या कारभाराचाच प्रश्न घ्या. या संस्थांवर होणारा अनुत्पादक खर्च आणि त्यांच्या विकासासाठी फार मोठ्या प्रमाणावर होणारा विनियोग आपण लक्षात घेतला म्हणजे या संस्थांच्या धोरणाबाबत आणि त्यांच्या कारभाराबाबत आज जी वस्तुस्थिती आहे तिचे आपल्याला चांगलेच दर्शन घडेल. देशापुढे अशा प्रकारचे जे आर्थिक प्रश्न आहेत त्यांच्या अंगोपांगांची तपशीलवार दखल तर या टिपणात घेण्यात आलीच आहे. पण सामाजिक न्यायाचे आपले उद्दिष्ट साध्य होण्यासाठी आपण किती प्रयत्नशील आहोत आणि राजविधिबद्ध संस्थांकडे सुपूर्त करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करण्याचा आपण योग्य तो प्रयत्न करतो आहोत किंवा नाही या दृष्टीने आपल्या आर्थिक कारभाराच्या समग्र क्षेत्राची पाहणी करण्याची सूचनाही या टिपणात केंद्र व राज्य सरकारांना करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे उत्पादन वाढविण्यासाठी सर्व प्रकारे उत्तेजन देण्याचे आवाहन या टिपणात उत्कटतेने करण्यात आले असून न्याय्य वाटपाच्या तत्त्वावरही त्यात विशेष भर देण्यात आला आहे.

आणखी एक अतिशय महत्त्वाचे पाऊल टाकण्याचा आपला मनोदय आहे. ते म्हणजे मालाचे उत्पादन करणारे उद्योगधंदे सार्वजनिक क्षेत्रात

आणणे हे होय. आज सर्वांत जास्त नफा जर कोणत्या उद्योगधंद्यांत मिळत असेल तर तो उपभोग्य मालाचे उत्पादन करणाऱ्या उद्योगधंद्यांत होय. मूलभूत स्वरूपाचे उद्योगधंदे परिपक्व अवस्थेत येऊन नफा देऊ लागेपर्यंत बराच मोठा कालावधी जावा लागतो. पण उपभोग्य मालाचे उत्पादन करणारे उद्योगधंदे हे एक असे क्षेत्र आहे की, जेथे खरोखरी नफ्याचे प्रमाण माझ्या मते अगदी भरमसाठ असते. या उद्योगधंद्यांचे स्वरूपच हे असे असल्यामुळे त्यांची वाढ खाजगी क्षेत्रात व्हावी हे अगदी स्वाभाविक आहे. आपण आता अशा एका अवस्थेला पोहोचलो आहोत की, केवळ औद्योगीकरणाची गती वाढवून आपले भागणार नाही, तर औद्योगीकरणाच्या वाढत्या गतीबरोबर अधिकाधिक छोट्या लोकांना आपले स्वतःचे उद्योगधंदे सुरू करण्यासाठी क्षेत्र मोकळे झाले पाहिजे आणि औद्योगीकरणाच्या या वेगवान प्रक्रियेतला आपला वाटा त्यांना उचलता आला पाहिजे. खरे सांगावयाचे म्हणजे देशापुढील हा आजचा एक मोठा प्रमुख प्रश्न आहे. आपले उद्दिष्ट तसे फार मर्यादित आहे याची मला जाणीव आहे. उपभोग्य मालाचे उत्पादन करणारे सर्वच उद्योगधंदे सार्वजनिक क्षेत्रात आणणे शक्य नाही हे आपण सर्वजण जाणतो. तरीही सध्याच्या परिस्थितीत शक्यच असेल तेथे उपभोग्य मालाच्या उद्योगधंद्यांचे क्षेत्र हे एक तर सहकारी संस्थांसाठी, नाही तर लघू उद्योगांसाठी राखून ठेवावे असे या ठरावात म्हटले आहे. हे एक अतिशय महत्त्वाचे असे उद्दिष्ट आपल्यापुढे असून आपल्या धोरणाचा एक भाग म्हणून आपण त्याचा जाणीवपूर्वक पाठपुरावा केला पाहिजे. महाराष्ट्र राज्यात कापड व साखर यांसारख्या काही महत्त्वाच्या उद्योगधंद्यांत सहकारी संस्थांना आम्ही प्रयत्नपूर्वक वाव दिला आहे. हे फार मोठे क्रांतिकारक पाऊल आहे अशातला भाग नाही. केवळ महाराष्ट्रातच हे घडले नसून म्हैसूर व आंध्र या राज्यांतही ते घडले आहे. ज्या भागांत हे उद्योगधंदे सहकारी क्षेत्रात आणले गेले आहेत तेथे जो वैशिष्ट्यपूर्ण बदल घडून आला आहे तो प्रत्यक्ष जाऊन बघितल्याखेरीज त्यावर आपला विश्वासच बसणार नाही. एखादा साखर कारखाना सुरू करणे ही काही विशेष क्रांतिकारक बाब आहे असे नाही. साखर उद्योगधंदा

हा आपल्या देशात तसा गेली चाळीस-पन्नास वर्षे चालू आहे. पण ग्रामीण भागात जेव्हा अनेक शेतकरी एकत्र येऊन अशा प्रकारच्या उद्योगधंद्यांच्या योजना आखतात आणि त्या कार्यावाहीत आणून एखादा कारखाना चालवितात, त्या कारखान्याच्या उलाढालीत सर्व प्रकारे भाग घेतात तेव्हा त्यातून एक नवी सामाजिक शक्ती निर्माण होत असते, आणि म्हणून आर्थिक प्रश्नांना निश्चितपणे एक विशिष्ट राजकीय अंग असते असे मी मानतो. चांगले सरकार असून केवळ भागत नाही, तर सरकार चांगले आहे हे लोकांना जाणवले पाहिजे. त्याचप्रमाणे आपल्याजवळ केवळ आर्थिक तोडगे असून चालणार नाही, तर हे तोडगे कृतीत आणले जात आहेत हे देशामधील लोकांना जाणवले पाहिजे. आपले प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न होत आहे अशा प्रकारची लोकांमध्ये जाणीव निर्माण करणे हाच आपल्या देशातला आज एक मोठा प्रश्न आहे. ही काही टीका नव्हे. कारण लोकांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न होत आहेत हे मला माहीत आहे. आपल्या आर्थिक धोरणातही तसा काही दोष आहे असे मला वाटत नाही. परंतु राज्यकर्ते आणि प्रशासक म्हणून आपण निर्जीव वस्तूंवर राज्य चालवीत नसतो तर गतिमान सामाजिक घटना आपणांस हाताळावयाच्या असतात, मानवी प्राण्यांचे प्रश्न आपणांस सोडवावयाचे असतात, आणि म्हणून मला जे सांगावयाचे आहे ते मी पुन्हा एकदा स्पष्ट करतो. आर्थिक प्रश्न हाताळण्याचे दोन मार्ग आहेत. विशिष्ट पद्धतीने आकडेवारी गोळा करणे, भांडवल गुंतविण्याच्या बाबतीत शास्त्रशुद्ध रीतीने अग्रक्रम ठरविणे, विकासाची गती निश्चित करणे आणि अशा रीतीने प्रश्नांचे उत्तर मिळाल्याचे आपल्या सदसद्विवेक बुद्धीला सांगणे. हा झाला शास्त्रशुद्ध मार्ग. दुसरा मार्ग म्हणजे आपल्याभोवतीच्या प्रश्नांची सविस्तर पाहणी करून त्यांतील कोणते प्रश्न आपण सोडविले आहेत याची तपासणी करणे हा आहे.

ग्रामीण भागात आज असंतोष असल्याचे आपल्याला आढळते. या असंतोषाचे कारण काय? आपण समाजवादाची भाषा बोलतो. पण समाजवादाचे मूलभूत उद्दिष्ट काय आहे? राष्ट्रीयीकरण अथवा समाजी-

करण हेच केवळ काही त्याचे उद्दिष्ट नाही. माझ्या समजुतीप्रमाणे निरनिराळ्या वर्गांमधील आर्थिक संबंधात रचनात्मक बदल घडवून आणणे ही समाजवादामागची मुख्य कल्पना आहे. ग्रामीण भागातील निरनिराळ्या वर्गांच्या आर्थिक संबंधात अशा प्रकारचा रचनात्मक बदल घडून आला आहे असे आपण म्हणू शकतो काय ? मला वाटते आपले उत्तर होकारार्थी असणार नाही. प्रामाणिकपणे आपण या गोष्टींचा विचार करू या. ग्रामीण भागातील भूमिहीन मजूर, हरिजन आणि गिरिजन यांच्यामध्ये आज असंतोष धुमसतो आहे. या वर्गाचे प्रश्न आपण सोडविले नाहीत तर समाजाच्या मूलभूत आर्थिक समस्या सोडविल्याचा आपल्याला कधीच दावा करता येणार नाही. आज या देशात असंतुष्ट तरुण माणसांची संख्याही फार मोठी आहे. तसे पाहिले तर गेल्या वीस वर्षांत शिक्षणाच्या क्षेत्रात आपण पुष्कळच प्रगती केली आहे. शिक्षणासंबंधी जनतेमध्ये असलेली ओढ आपण अशा प्रकारे भागविलेली असली तरी प्रचलित शिक्षणपद्धतीतून आज शेकडो नवे प्रश्न निर्माण झालेले आहेत. ग्रामीण व शहरी भागात आज सुशिक्षित तरुणांची एक मोठी फौजच्या फौज निर्माण झाल्याचे दृश्य दिसत आहे. शेतकऱ्याचा तरुण मुलगा शिकला की आईबापांच्या अभिमानाचा तो विषय होतो. पिढ्यान्‌पिढ्या शेतकरी शिक्षणापासून वंचित राहिला होता. त्यामुळे त्याला असा अभिमान वाटणे साहजिक आहे. आपला मुलगा आता पदवीधर आहे. एक सोडून दोन पदव्या त्याने मिळविल्या आहेत हे पाहून स्वाभाविकपणेच त्याची छाती फुगून येते. परंतु हाच तरुण मुलगा जेव्हा नोकरीचा विचार करू लागतो तेव्हा त्याचे आईबाप किंवा त्याचा शेतकरी समाज त्याच्या सेवेला तर मुकतोच, परंतु आर्थिक दृष्ट्या आपल्या कुटुंबाचे भले करण्याचीही कुवत आपल्यामध्ये नसल्याचे त्याला आढळून येते. तरुणांना आज कामधंदा नाही आणि पुढे तो मिळेलच याची खात्री नाही अशी अवस्था आज निर्माण झाली आहे. या तरुणांना आपण काय सांगणार आहोत ? त्यांना आपण असे का सांगणार आहोत, " हे पाहा मित्रांनो, तुम्ही सुशिक्षित आहात. तुम्ही समंजस व समजुतदार असले पाहिजे. तुम्हाला ठाऊकच

आहे की, आपल्या देशाची प्रगती हात असली तरी तिचा वेग काहीसा मंद आहे. तेव्हा थोडी कळ सोसा आणि आपली प्रगती 'उड्डाणा'चा टप्पा गाठीपर्यंत जर तुमची उपासमार झाली तर थोडा धीर धरून ती तुम्ही सहन करा." हा युक्तिवाद वाजवी आहे असे जरी म्हटले तरी तो मानवतेला धरून नाही. आपल्यापुढे असलेली आव्हाने ही अशी असून त्यांचे स्वरूपही निश्चित आहे. देशात आज एक प्रकारची अस्वस्थता आहे. यामुळेच आपल्या आर्थिक प्रश्नांची उकल करण्याबाबत सातत्याने विचारविनिमय करणे अत्यावश्यक होऊन बसले आहे. मुख्य प्रश्न हा की, आपल्या भोवती जे सामाजिक प्रश्न आहेत त्यांवर आपला प्रभाव पडतो आहे किंवा नाही? देशामध्ये आज जो एक अखंड विचारविनिमय चालू आहे त्याचे प्रमुख लक्ष हेच आहे. माझ्या मते हा विचारविनिमय आपल्याला चालू ठेवावाच लागेल. ऐतिहासिक दृष्ट्या काँग्रेस पक्ष हा जनतेच्या आशा-आकांक्षा नेहमीच प्रतिबिंबित करीत आला असून आधुनिक राज्यशास्त्राच्या परिभाषेतला तो केवळ एक राजकीय पक्ष नाही, आणि म्हणून यापुढील काळातही काँग्रेसला आपल्याभोवती जे प्रश्न व आव्हाने आहेत त्यांच्या-संबंधी सातत्याने चिंतन करावेच लागेल.

बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा प्रश्न या देशात गेली पाच-सहा वर्षे मोठ्या तीव्रतेने चर्चिला जात असून सैद्धान्तिक स्तरावर तर मला वाटते या प्रश्नाची चर्चा गेली कित्येक वर्षे चालू आहे. माझ्या आठवणीप्रमाणे या प्रश्नाची गंभीर चर्चा प्रथम पंडित नेहरूंच्या काळात सुरू झाली. १९६३ सालच्या भुवनेश्वर काँग्रेस अधिवेशनाच्या कित्येक वर्षांआधीची ही गोष्ट असावी. या चर्चेत भाग घेण्याचे सद्भाग्य मला लाभले होते. १९६३ सालच्या अखेरच्या महिन्यात काँग्रेस कार्यकारिणीने आपल्या सभासदांच्या एका समितीस या प्रश्नाचा सांगोपाग अभ्यास करण्याचा आदेश दिला. सामाजिक दृष्ट्या बँकांचे राष्ट्रीयीकरण स्वीकारार्ह आहे असा एक दृष्टिकोण मांडण्यात आला. परंतु बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यासाठी अद्यापि योग्य वेळ आलेली नाही असे त्या वेळच्या अर्थमंत्र्यांचे मत पडल्यामुळे हा प्रश्न त्या वेळी आपल्या हातातून निसटला. पण त्यासंबंधीच्या चर्चा, वादविवाद

वगैरे गोष्टी सुरूच राहिल्या. त्यानंतर १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पूर्वी या प्रश्नाला पुन्हा चालना मिळून काँग्रेसच्या निवडणूक जाहीरनाम्यात बँकांच्या राष्ट्रीयीकरणाच्या प्रश्नास काय स्थान असावे यासंबंधी चर्चा झाली. सामाजिक नियंत्रण हा शब्दप्रयोग त्याच वेळी स्वीकारण्यात आला. शब्दार्थाच्या तात्त्विक चर्चेत शिरण्याची माझी इच्छा नाही. सामाजिक नियंत्रणाची कल्पना कशी जन्मास आली एवढेच मला सांगावयाचे आहे. परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, सामाजिक नियंत्रणाच्या कल्पनेस आमच्यापैकी ज्यांनी त्या वेळी पाठिंबा दिला त्यांपैकी कोणासही सामाजिक नियंत्रण हे राष्ट्रीयीकरणाहून काही वेगळे असू शकेल असे वाटले नाही. राष्ट्रीयीकरणावाचून सामाजिक नियंत्रणाला काही अर्थ नाही आणि सामाजिक नियंत्रणावाचून राष्ट्रीयीकरण ही केवळ फसवणूक ठरेल. सामाजिक धोरणाशिवाय शासनाने बँका ताब्यात घेतल्यास त्याचा परिणाम या संस्थांचे केवळ नोकरशाहीत अधःपतन होण्यात होईल. तेव्हा या वादाला सध्या सैद्धान्तिक असे वळण देण्याचा जो प्रयत्न होत आहे तसा तो होऊ नये असे मला वाटते. आता आपली दिशा निश्चित ठरली आहे. अशा प्रकारे आपण आपली दिशा निश्चित केल्यानंतर आपली पावले परत मागे वळविणे फार अवघड गोष्ट आहे. बँकांचे राष्ट्रीयीकरण आज होईल, उद्या होईल की पुढल्या वर्षी होईल हे भाकीत करण्याची माझी इच्छा नाही. कारण ही गोष्ट अखेरीस पक्षाच्या राजकीय सुज्ञपणावर अवलंबून राहील. तथापि मी आपल्याला एक गोष्ट सांगू इच्छितो की, अशा प्रश्नांच्या वाटतीत राजकीय सुज्ञपणाचे मूल्य फार मोठे आहे. काँग्रेस कार्यकारणीचे इतर दोष काहीही असोत पण विशुद्ध राष्ट्रभक्ती आणि एकत्र राहण्याचे शहाणपण या गोष्टींचेच तिच्यावर नेहमी प्राबल्य राहिले आहे. हाच तिचा मोठा गुण आहे. मला माहीत आहे, काही लोक आमच्यावर टीका करतात आणि विचारतात, कशासाठी एकत्र राहावयाचे ? मी त्यांना उलट प्रश्न विचारू इच्छितो, " वेगळे तरी कशासाठी व्हावयाचे ? " निश्चित उद्देश असल्याखेरीज ऐक्याला काही अर्थ नाही हे मी जाणतो, पण त्याचबरोबर आपल्याला मी हेही सांगेन की केवळ पुरोगामी आर्थिक कार्यक्रमाने लोकांना

एकत्र ठेवता येईल या भ्रमातही आपण राहू नये. तथाकथित डाव्या पक्षांत आज काय घडत आहे याचा आपण जरा कानोसा घ्या. हे पक्ष सुसंघटित, क्रांतिकारक कार्यक्रमाची भाषा बोलत असतात, परंतु एकमेकांचे गळे घोटण्याची त्यांची तयारी पाहिली म्हणजे केवळ क्रांतिकारक कार्यक्रमाने काही साध्य होत नाही हेच सिद्ध होते. या प्रश्नाची आणखी एक बाजू आहे, आणि ती म्हणजे आपले राजकीय विचार कृतीत आणण्यासाठी एक प्रकारचे राजकीय साधन किंवा वाहन नेहमीच आपल्या हाताशी असावे लागते. साधन आणि विचार हे नेहमी हातात हात घालून एकत्र गेले पाहिजेत. शरीर व आत्मा यांची येथे उपमा देता येईल. आत्म्याला आपले स्वतःचे असे अस्तित्व असेलही. पण आकलन करण्याची शक्ती त्याच्यात नाही. उलट आत्म्याखेरीज नुसत्या शरीराला काही अर्थ नाही. तेव्हा महत्त्वाची गोष्ट ही की, आपल्याजवळ राजकीय विचारप्रणाली तर असलीच पाहिजे, पण त्याचबरोबर राजकीय विचारप्रणाली अंमलात आणण्याकरिता काँग्रेससारखी बलशाली व सुसंघटित संघटनाही आपल्यापाशी असली पाहिजे हीही गोष्ट तितकीच महत्त्वाची आहे, किंबहुना थोडी अधिकच महत्त्वाची आहे. आपल्यापुढे असलेल्या या ठरावाने कोणती एक गोष्ट साध्य केली असेल तर ती ही की, आपल्यापुढे जे प्रश्न आहेत ते सोडविण्याच्या दृष्टी, त्यांचा सातत्याने आढावा घेत राहण्याची गरज आपल्या मनावर ठसविली गेली आहे. त्याचबरोबर एकमेकांचे दृष्टिकोण समजावून घेऊन आपले ऐक्य अभंग राखण्याचा प्रयत्नही या ठरावात केला आहे. या ठरावाचें सर्वांत मोठे यश खरोखरी यातच आहे.

मी आपला अधिक वेळ घेऊ इच्छित नाही. हा ठराव आपण स्वीकारावा अशी मी शिफारस करतो. तसेच या चर्चेत ज्यांनी माझे विचार शांत चित्ताने ऐकून घेतले त्या सर्व श्रोत्यांना मी अशी कळकळीची विनंती करीन की, आपण सर्वजण एका मोठ्या कार्यातले अगदी निकटचे सार्थीदार आहोत ही भावना त्यांनी आपल्या अंतःकरणात सतत जपून ठेवावी. या देशात समाजवाद–लोकशाही समाजवाद प्रस्थापित करण्याच्या समान उद्दिष्टाने आपण सर्वजण प्रेरित झालो आहोत. आपण दोस्त म्हणून राहू

या, मित्र म्हणून राहू या, एकमेकांच्या हेतूबद्दल शंका न घेता आपली महान उद्दिष्टे साकार व्हावीत म्हणून आपण एकमेकांना साहाय्य करू या.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
क्रमांक ७५७२५ दि: निबंध
२११६ नों. दि: २१/३/७१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९७७३७

REFBK-0017737





अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटी अधिवेशन, बंगलोर, दि. ११-७-६९